उत्तरकोंकणांतील प्राचीन गङ्गातीरस्थ

# शुक्लयजुर्वेदीय ब्राह्मण,

अथवा

# देशस्थ शुक्लयजुर्वेदीय ब्राह्मण

ह्यांची खरी माहिती.

 हा ग्रन्थ,

नारायण विठ्ठल वैद्य पुरन्दरे पुणताम्बेकर

ह्यांनीं केला;

तो,

ग्रन्थकार आणि मण्डळी ह्यांनीं

बॉम्बे एज्युकेशन सोसैटीच्या छापखान्यांत
छापून प्रसिद्ध केला.

मुम्बई,
शके १८०६.



किंमत रुपये ३।.

व टपाल हांशिल आणे ४.

मुम्बईत कालिकादेवीचा रस्ता घरनम्बर ६७ येथें ग्रन्थकाराकडेस रोख किंमत पाठविली असतां हा ग्रन्थ रवाना करण्यांत येईल.

# ग्रन्थार्पणम्.

श्री याज्ञवल्क्यशिक्षानुयायी समस्त स्वशाखीय शुक्ल-यजुर्वेदीय माध्यन्दिनवाजसनेय ब्राह्मणांस;

हा ग्रन्थ,

प्रीतिपूर्वक त्यांचा स्वशाखीय जो ग्रन्थकार

ह्यानें अर्पण केला असे.

नारायण विठ्ठल वैद्य
पुरन्दरे पुणताम्बेकर.

~~श्रीधर मल्हार जोशी. भानू~~

Presented to

A. M. T. Jackson Esq.

M. A.

Private Secretary to I.C.

His Excellency the

Governor of B.

by

Keshav. Abba

Padhye

Thana

# प्रस्तावनिका.

उत्तरकोंकणांत प्राचीन कालापासून जे **देशस्थ शुक्लयजुर्वेदीय ब्राह्मण** राहतात, त्यांविषयींची खरी माहिती सर्वांस मिळावी, अशा प्रकारचा एखादा ग्रन्थ प्रसिद्ध करावा असें बहुत दिवस आमच्या मनांत होतें; परन्तु ह्या कामास आधारभूत जे जुने लेख ते साध्य करून एकत्र करण्याचे कामीं बराच काल लागला. तशांत हे लेख साध्य करण्यास आर्जव, द्रव्य आणि श्रम ह्यांची किती आवश्यकता आहे, हें सर्वांस माहीत आहेच. पुढें शके १८०१ ह्या वर्षी कांहीं मिळालेल्या जुन्या लेखांच्या आधारानें **विनन्तिपत्र** ह्या नांवाचें एक लहानसें पुस्तक तयार करून व छापून तें स्वशाखीयांस अर्पण केलें. त्यावरून कित्येक स्वशाखीयांनीं सदरहू विनन्तिपत्रांत दर्शित केलेलें कार्य, सिद्धीस नेण्याच्या कामीं आम्हांस मदत न करितां, उलट नानाप्रकारचे कुतर्क मात्र काढिले. ह्या त्यांच्या कृतीस न भितां शके १८०२ ह्या वर्षी कुतर्की जनांचा संशय दूर होण्याकरितां, आह्मीं **शंकानिवृत्ति**नामक दुसरें पुस्तक तयार करून स्वशाखीयांस अर्पण केलें. नन्तर आमचें समाधान करण्याच्या इरादानें मुम्बईतील स्वशाखीयांनीं कित्येक सभा मात्र भरविल्या; परन्तु, त्यांतील कित्येक महत्त्वाकांक्षी गृहस्थांचे कृतीनें त्यांपासून कांहींएक निष्पन्न झालें नाहीं.

२. वर दर्शित केल्याप्रमाणें कोणी मदत करोत किंवा न करोत; पण आपल्या एकट्याच्यानें जें स्वशाखेचें अंशतः हित होईल तें तरी करावें, असा विचार मनांत आणून आह्मीं शके १८०४ ह्या वर्षी "**श्रीशुक्लयजुर्वेदीयमाध्यन्दिनवाजसनेयाह्निकसूत्रावली**" नामक नित्यकर्मांचा ग्रन्थ तयार करून त्याच्या प्रती क्षेत्रोक्षेत्रीं व गांवोंगांवीं स्वशाखीय व परशाखीय ब्राह्मणांस अर्पण केल्या. ह्या सूत्रावलीविषयीं अनेकशाखीय ब्राह्मणांच्या सदस्तूरसम्मति आह्मांस मिळाल्या असून, त्यांपैकीं कांहीं सम्मति, सूत्रावलीच्या द्वितीयावृत्तीच्या शेवटीं छापिल्या आहेत.

३. आतां प्रस्तुत ग्रन्थाविषयीं उद्योग सुरू झाल्यावर जे जे जुने लेख, (सरकारी किंवा खासगी) आढळले त्यांच्या आधारानें हा **उत्तरकोंक-**

णांतील **प्राचीनगङ्गातीरस्थ शुक्लयजुर्वेदीय ब्राह्मण** ह्या नांवाचा ग्रन्थ तयार करून तो आह्मीं कित्येक विद्वान् मित्रांस दाखविला. त्यांपैकीं रा. ब. **गोपाळराव हरी देशमुख** ह्यांनीं कृपा करून तो ग्रन्थ (जुने लेखांसह) अवलोकन केला आणि हा ग्रन्थ व लेख छापिले असतां त्यांपासून देशाच्या इतिहासास बरेंच साधन होईल असें त्यांनीं सुचविलें. तसेंच कित्येक ग्रामस्थ व क्षेत्रस्थ स्वशाखीय ह्यांस देखील तो ग्रन्थ दाखविला, त्यांनींहि वरप्रमाणेंच सुचविलें. त्यांपैकीं कित्येकांचीं नांवें येणेंप्रमाणें:-**पैठण येथील**:-विश्वनाथ अमृत बावळे देशपाण्डे ऊर्फ बापूसाहेब, त्र्यम्बक आनन्दराव ऊर्फ नाना महाजन पाटील कावळे, बापू महादेव भट्ट कण्व श्रौती बिडकीनगांवकर, दादाचार्य, भाऊ जोशी, त्र्यम्बकराज धर्माधिकारी, हरीभाऊ अग्निहोत्री वगैरे; **नगर येथील**:—भाऊ वामन डाङ्गे, नाना बापूजी जोशी रेखी, हरि शास्त्री शनी, विष्णु धर्माधिकारी, नाना लङ्के वकील वगैरे; **औरङ्गाबाद येथील**:—लक्ष्मीकान्त ऊर्फ आपा बापू शास्त्री जुन्नरकर, सखाराम गोपाळ जोशी अग्निहोत्री चिखलठाणकर वगैरे; **सांवखेड** (शामराजक्षेत्र) **येथील**:—सखाराम दादा माण्डे वगैरे; **त्र्यम्बक येथील**:—गणपति महादेव आराधी, चिन्तामण मोरेश्वर शुक्ल, गोपाळ नाना दीक्षित, वासुदेव गणेश दीक्षित, मोहिनीराज ऊर्फ राजाबा त्र्यम्बक शिङ्गणे, वामन रामभट्ट वाडेकर वगैरे; **नासिक येथील**:-दाजी रामचन्द्र दीक्षित, बापाजी बेळे, गङ्गाधर बापू पञ्चाक्षरी वगैरे; **वांई येथील**:-प्रभाकर दाजी जोशी, नीलकण्ठ प्रभाकर जोशी वगैरे; **जुन्नर येथील**:--विष्णु गोपाळ उपासनी वगैरे; **काशी येथील**:-चिन्तामण भिकम्भट्ट जावजी, वैजनाथ वेणीराम पुराणिक वगैरे.

४. ह्याप्रमाणें ग्रन्थ तयार झाल्यावर कित्येक स्वशाखीयांनीं तो छापून प्रकट करण्याच्या कामीं द्रव्याचें साह्य करण्याचें आह्मांजवळ कबूल केलें; त्यांतून कित्येक विद्वान् आणि द्रव्यवान् ह्मणविणाऱ्या गृहस्थांनीं तर कांहीं रकम देण्याचें अभिवचन मूळपासूनच दिलें होतें, परन्तु ग्रन्थ छापण्याची वेळ येऊन थडकली त्या वेळीं त्यांनीं कित्येक असमंजसपणाचे अडथळे दाखवून "**वदामि बहुवाक्यानि न ददामि कपर्दिकाम्**" अशी अपूर्व मदत केली!! ही त्यांची कृति त्यांसच शोभो.

५. पुढें हा ग्रन्थ छापण्यास लोकांकडून द्रव्यद्वारा मदत व्हावी ह्मणून

सूचनापत्रें छापून प्रसिद्ध केल्यावर वर्गणीदार मिळत असतां; ते न मिळावे व ह्या ग्रन्थास कोणत्याहि प्रकारें आश्रय मिळूं नये, ह्मणून परोत्कर्षासहिष्णु कित्येक उदार मण्डळीनें एक निनांवी विनन्तिपत्र छापून गांवोगांवीं प्रविष्ट केलें. त्यांतून एक इसम तर लोकांच्या घरोघर जाऊन सांगत फिरला कीं; हा ग्रन्थ छापण्यास अमक्याअमक्याची मदत नाहीं सबब ग्रन्थकारास कोणींहि मदत करूं नये. ह्याविषयींची जनवार्ता प्रसिद्धच आहे; ज्यांचीं ज्यांचीं नांवें तो घेत गेला त्यांच्या नांवांचा येथें उल्लेख करणें अप्रशस्त होय. कारण ह्मटलें आहे–'**परोक्षे कार्यहन्तारं प्रत्यक्षे प्रियवादिनम् । वर्जयेत्तादृशं मित्रं विषकुम्भं पयोमुखम्**'.

६. वरील कारणांवरून ह्या ग्रन्थास आश्रय जितका जलद मिळावा तितका न मिळाल्याकारणानें असें वाटूं लागलें कीं, ह्या कामीं केलेला द्रव्यव्यय, श्रम इत्यादि व्यर्थ जाऊन ग्रन्थ छापिला जात नाहीं, ह्मणून हा ग्रन्थ उदयास कसा येईल? इत्यादि विचार मनांत येऊं लागले. अशा समयीं ईश्वराची कित्येक स्वशाखीयसद्गृहस्थांस प्रेरणा झाल्यामुळें, त्यांनीं, हा ग्रन्थ छापून प्रसिद्ध करावा, एतदर्थ आह्मीं आपणांस द्रव्यद्वारा मदत करूं, असें आह्मांस प्रोत्साहन दिल्यावरून हा ग्रन्थ छापण्यास आरम्भ केला. ज्या सद्गृहस्थांनीं द्रव्यद्वारा मदत केली त्यांचीं नांवें; ह्या ग्रन्थासम्बन्धीं जमाखर्चाची चोपडी लौकरच छापून तीची एकेक प्रत आश्रयदात्यांस देण्यांत येईल तींत आभारसह दिलीं जातील.

७. ज्या गृहस्थांनीं मला आपले जुने लेख दिले त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहें. असे लेख देणारांचीं नांवें परिशिष्टांत प्रत्येक लेखाच्या प्रथम पृष्ठावर दिलीं आहेत. ज्यांच्या पूर्वजांस अनेक राजांकडून वगैरे असले लेख मिळाले आणि ज्यांच्या वंशजांनीं आपल्या पूर्वजांच्या लेखांचें जिवापलीकडे संरक्षण केलें व करीत आहेत, त्यांचे महदुपकार, उत्तरकोंकणांतील समस्त स्वशाखीयांनीं अवश्य मानिलेच पाहिजेत. कारण कीं, हे लेख आहेत ह्मणूनच ह्या वाजसनेयांबरोबर शत्रुत्व बाळगणारे लोक लज्जायमान होऊन निरुत्तर होत्साते स्तब्ध राहतात.

८. विशेषतः वे. रा. रा. **केशव ऊर्फ केरोबा वासुदेव वैद्य** सांवखेडकर, **पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी** स्मार्त शिङ्गणें, **नीलकण्ठ विठ्ठल शास्त्री** उपाध्ये क्षीरसागर **यशवंत हरिश्चद्र जोशी**, इत्यादि गृहस्थांनीं

कित्येक उपयुक्त पुस्तकें अवलोकनार्थ दिलीं त्याबद्दल मी सदर्हू गृहस्थांचाहि आभारी आहें. तसेंच कित्येक लेखांचे उतारे करण्यास वे. रा. रा. परशुराम नारायण वैद्य पुरन्दरे, महादेव व विठ्ठल सखाराम जोशी शासनकर धर्माधिकारी आणि दामोदर धोण्ड जोशी पुरन्दरे इत्यादिकांनीं मदत केली असून, मोंगलाई लेखांचे उतारे करण्यास शेकअहमद वल्लद महंमद इब्राहिम कोकाटे ह्यांनीं मदत केली आहे.

९. मोंगलाई आणि पोर्तुगीज लेखांचें, त्या त्या लेखांत दर्शित केलेल्या गृहस्थांनीं इंग्लिश भाषान्तर केल्यावर त्याचा मराठींत सारांश आह्मीं केला आणि ह्या कामीं कित्येक ठिकाणीं वे. रा. रा. **बाळकृष्ण बापू आचार्य** ह्यांनीं साहाय्य केलें हें सूचविण्यास आनन्द वाटतो. छापखान्यांतून आलेलीं ह्या ग्रन्थसम्बन्धीं मराठी सूचिपत्रें तपासण्यास वे. शा. सं. रा. रा. **विठ्ठल नारायण शास्त्री गोरे, ब्रह्मदेव काका देवकुटे** वगैरे मण्डळीनें साहाय्य केलें व फारशी सूचिपत्रें तपासण्यास मुनशी **सय्यद महंमद अलीशहा** ह्यांनीं साहाय्य केलें आहे.

१०. ह्या ग्रन्थ लिहिण्याचीं प्रयोजनें अशीं आहेत कीं:—**प्रथम**—ह्या वाजसनेयांची खरी माहिती प्रायः कित्येकांस नसल्यामुळें, इतर लोकांचा गैरसमज होत चालला आहे, तसा न व्हावा आणि त्यांचे भ्रान्तिमूलक समज नष्ट व्हावेत. **द्वितीय**—ह्या वाजसनेयांविरुद्ध दुरभिमानी अथवा असमंजस लोकांनीं जे लेखप्रकाश केले असतील त्यांचें हि यथार्थ खण्डन व्हावें; **तृतीय**—प्राचीन व जीर्ण झालेल्या लेखांचेंहि पुनरुज्जीवन व्हावें; **चतुर्थ**—दुसऱ्यांच्या अनुषंगानें वागून प्रत्यक्ष स्वशाखीय जे ह्या वाजसनेयांविषयीं निरर्थक कुतर्क काढितात त्यांचें खण्डन व्हावें; **पञ्चम**—दुर्बुद्धि लोक आपमतलबासाठीं विनाकारण ह्यांस नांवें ठेवितात हें ह्या वाजसनेयांचे अन्नदाते (यजमान) आणि इतरजन ह्यांस समजावें. **षष्ठ**—आगाशी येथील श्रीभवानीशङ्कराचे खटल्यांत निवाडा एक प्रकारचा झाला असून, प्रतिपक्षी ह्या वाजसनेयांची सर्वतोपरि नुकसानी व्हावी ह्मणून लोकांस ह्या निवाड्याचा द्वेषबुद्धीनें भलत्याच प्रकारचा अर्थ करून दाखवितात, हें लोकांस समजावें; **सप्तम.**—हे वाजसनेय खरे असतांहि त्यांस आज सुमारें शें-

सत्यांशीं वर्षें होत आलीं तेव्हांपासून महत्त्वाकांक्षी लोकांपासून कसकसा त्रास पोहोंचत आहे ह्याचा विचार त्यांच्या मूलदेशीय वाजसनेयांनीं करावा.

११. आह्मांस गङ्गथडीकडील विशेष माहिती मिळावी ह्मणून आह्मीं शके १८०६ जेष्ठ महिन्यांत कांहीं मण्डळीस बरोबर घेऊन गोदेच्या उभयतटांनीं पैठण, नगरजिल्हा इत्यादि स्थलीं गेलों आणि जी माहिती आढळली तिचा समावेश ह्या ग्रन्थांत केला आहे.

१२. आतां कोणी असा प्रश्न करील कीं, ह्या ग्रन्थांत दिलेली माहिती इतके दिवसपर्यन्त प्रसिद्ध करण्यांत कां आली नाहीं? तर त्यास उत्तर हेंच कीं, हल्लींच्या काळांत जशा सुधारणुका होत चालल्या आहेत, तशा पूर्वीं नव्हत्या व अनेक ठिकाणचे लेख एकत्र करण्याची ही मोठी खटपट कोणी मनावर घेऊन केली नाहीं, हेंच होय.

१३. सारांश, हा ग्रन्थ मिळालेल्या आधारांवरून जितका सुगम करितां आला तितका करण्याचा प्रयत्न केला आहे. जेथें जेथें जुन्या लेखांत अवघड शब्द आढळले तेथें तेथें त्यांचे पर्यायशब्द त्यांच्याच पुढें कौंसांत दाखल केले आहेत.

१४. ह्याप्रमाणें हा ग्रन्थ समस्त विचारशील गृहस्थांच्या समोर ठेविला आहे तेव्हां त्यांस इतकीच विनन्ती आहे कीं, केवळ शब्दांकडे किंवा ऱ्हस्वदीर्घादिदोषांकडे न पाहतां ग्रन्थाचे अर्थावर नजर देऊन त्यांनीं न्यूनाधिक्याची क्षमा करावी. इत्यलम्.

मुम्बई, कालिकादेवीचा रस्ता घर नम्बर ६७ शके १८०६ भाद्रपदशुद्ध ५ मी सोमे तारणाब्दे.

नारायण विठ्ठल वैद्य पुरन्दरे
पुणताम्बेकर.

---

## ह्या ग्रन्थांतील विशेष अवलोकनीय विषयः–

# अनुक्रमणिका.

## चुकीची दुरुस्ती.

परिशिष्ट 'ओ' पृष्ठ ७० टीपेंत असें वाचावें कीं, हा दस्तऐवज वे. शा. सं. रा. रा. रामकृष्ण मोरेश्वर भट्ट ऊर्फ बाबा पाठक पञ्चानन ह्यांजकडेसच मूळपासून होता तो त्यांनीं ग्रन्थकारास दिला.

---

## ADDENDA.

परिशिष्ट 'ल्ल' पृष्ठ ५१ व परिशिष्ट 'ग' पृष्ठ ८९ ह्या दस्तऐवजांची सरकारांत बारनिशी येणेंप्रमाणेः—

ल्लचीः—Bombay, TOWN HALL,
13*th July* 1743.

Registered in the Portuguese Book of Simple Bonds L. F.129.
( Signed ) W. DAVIS.

The above to be read below the word Naique at page 52 of the appendix.

गचीः—Bombay, TOWN HALL,
5*th February* 1766.

Registered in the Book of Portuguese Simple Bonds, &c., letter No. 21 276 to 277 at the request of Ramchandra Gopal Carwant.

( Signed) CAUANDERS, Registrar.

The above to be read below figure ( 42 ) at page 98 of the appendix.

॥ श्री ॥

ॐ तत्सत्.

# उत्तर कोंकणांतील प्राचीन गङ्गातीरस्थ शुक्ल-यजुर्वेदीयब्राह्मण.

## ह्या पुस्तकाचा उद्देश.

ह्या उत्तर परशुरामक्षेत्रांत प्राचीन कालापासून जे गङ्गातीरस्थ शुक्लयजुर्वेदीयमाध्यन्दिनवाजसनेय ब्राह्मण ह्मणजे-देशस्थ शुक्लयजुर्वेदीब्राह्मण-राहतात, ते कोण? कोठील? आणि त्यांची मूलपीठिका काय आहे? इत्यादि माहिती करून घेणें सर्वांस योग्य आहे. तशांत, हें कृत्य विशेषतः सम्पूर्ण ब्राह्मणांस आवश्यक असून, अतिमहत्त्वाचें आहे. ह्या माहितीपासून आपापसांत प्रसङ्गवशात् निरर्थक उत्पन्न होणारे कलह, मात्सर्य, द्वेष, कुतर्क आणि वाग्जल्पना, ह्या लयास जाऊन, ब्रह्मत्वास आधारभूत जें सत्य, त्यास सर्व ब्राह्मण ईश्वरपरायणबुद्धीनें अनुसरतील व तेणेंकरून आपापलें ऐहिक आणि पारमार्थिक साधन करून घेण्यास, आणि ऐक्यभावानें वागून परस्परांचें अभीष्टचिन्तन करण्यास झटतील, अशी आशा आहे.

२. सदर्हू देशस्थ*शुक्लयजुर्वेद्यांचीं मूलस्थलें:—ज्या मूलस्थलांहून हे वाजसनेयब्राह्मण ह्या उत्तरकोंकणांत आले, तीं स्थलें विशेषतः गङ्गथडींत मोडतात. श्रीत्र्यम्बकेश्वर येथील ब्रह्मगिरीपर्वतावरील औदुम्बरवृक्षाचे मूलापासून गौतमी प्रकट होऊन, वाहतवाहत प्रवरेस मिळते; तिलाच गोदा (गोदावरी) अथवा वृद्धगङ्गा असें ह्मणतात. पुढें ही नदी पूर्वसमुद्रास अथवा बङ्गालच्या उपसागरास सप्तगोदा ह्या नांवानें प्रसिद्ध होऊन सात मुखांनीं मिळते. नासिकापुढील सायखेड्यापासून औरङ्गाबादेपर्यन्त ज्या प्रदेशांतून ही

* ह्या शुक्लयजुर्वेद्यांस विशेषतः वाजसनेयब्राह्मण ह्मणण्याचा परिपाठ आहे.

गोदा वाहत जाते, त्या प्रदेशास गङ्गास्थल किंवा प्राकृतांत गङ्गथडी असें नांव आहे. ह्या नदीचे कांठीं त्र्यम्बक, नासिक (जनस्थान), सांयखेडें, निफाड, पिम्पळगांव (बसवन्ताचा), चान्दोरी, कोपरगांव, पुणताम्बें (पुण्यस्तम्भ), मञ्जीरथ, राक्षसभुवनं, गङ्गाखेड (खेडाविसाद), बीड, कायगांव, टोकें, धोङ्गी (धोण्डराई), नेवासें, सांवखेडें (शामराजतीर्थ), उज्जनी (सङ्गमनेर परगण्यांतील), पैठण (प्रतिष्ठान), मुङ्गी, प्रवरासङ्गम इत्यादिस्थलें असून, कांहीं अन्तरावर पळशी, वनकुटें (पारनेर महालांतील), बावरें, औरङ्गाबाद*, दौलताबाद (देवगिरी) वगैरे गांवें गङ्गथडींतच मोडतात. पुढें नगरहवेली†, कोळगांव आणि राहुरी इत्यादि स्थलें लागतात. ह्या बहुतेक स्थलांहून शके १२२१ ह्या वर्षी आणि तदनन्तर हे प्राचीन वाजसनेयब्राह्मण ह्या उत्तरकोंकणांत आले. त्याचप्रमाणें कोल्हापूर (करवीर), आणि वऱ्हाड ह्या प्रान्तांतून ते व त्यांचे सुहृत्सम्बन्धी वेळोवेळीं येत गेले.

३. गङ्गथडीचें वर्णन.—गङ्गथडी हा प्रदेश ७३ पासून ८२ रेखांश आणि १७ पासून २० अक्षांश ह्यांच्यामध्यें आहे. ह्याच्या चतुःसीमाः— उत्तरेस खानदेशजिल्हा आणि तापी नदी; दक्षिणेस पुणेंजिल्हा; पूर्वेस मोंगलाई अथवा निझामाचें राज्य; पश्चिमेस टाणेंजिल्हा आणि मुम्बई. गङ्गथडीची हवा समशीतोष्ण आहे खरी, परन्तु त्र्यम्बकेश्वरापेक्षां ह्या प्रान्तीं हिंवाळा व उन्हाळा कडक असतो; पर्जन्यकाळींहि कोंकणाप्रमाणें येथें पर्जन्य फारसा पडत नाहीं. हवा एकन्दरीनें शरीराला आरोग्यकारक अशी आहे. गोदानदीचा प्रवरेशीं सङ्गम झाल्याकारणानें, पाण्याचा पुरवठा उन्हाळ्यांत बराच असतो व तें पाणीहि निर्विकार आहे. ह्याविषयीं लोकांत एक म्हण अशी आहे कीं "स्नान करावें गङ्गेचें, (आणि) पाणी प्यावें प्रवरेचें." गङ्गथडीची जमीन काळी असून सुपीक

* औरङ्गाबादेस 'खुजस्तेबुनियाद' व देवगिरीस देवगड अशीं नांवें आहेत.
† नगरहवेलीस अहमदनगर अथवा नगर असेंहि म्हणतात.

आहे. पीक ह्मटलें ह्मणजे, जोन्धळा, हरभरा, बाजरी, गहूं वगैरे धान्यांचें आहे. बागाईत विरळ आढळतें. तथापि येथें पांढरे उंसांचें बरेंच उत्पन्न आहे. येथें नारळी, पोफळी, फणस भेण्ड वगैरे झाडें नाहींत. आम्बे, वड, अश्वत्थ नान्दरूख (वडाची एक जात), पारिभद्र (कडूनिम्ब), बाभूळ, रामरूख (बाभळीची एक जात आहे, तिला कांटे नसतात.) इत्यादि झाडें कोंकणाप्रमाणेंच असतात. सर्पणास रानगोंवऱ्यांवांचून दुसरें कांहीं मिळणें नाहीं. कार्यप्रयोजन असल्यास आपापल्या कबज्यांतील वाळगलेलें एखादें झाड तोडून लांकडें करावीं लागतात. नगरच्या सरहद्दीपर्यन्त जे लहान मोठे डोंगर किंवा घाट आहेत, त्यांजवर झाडझाडोरा मुळींच नसल्याकारणानें उन्हाळ्यांत प्रवाश्यांस शीतल वायू मिळणें फारच कठीण पडतें.

४. गाई, ह्मशी इत्यादि ग्राम्यपशूंस बहुधा सर्वलोक बाळगितात, तेणेंकरून त्यांस दुभत्याची अडचण पडत नाहीं. गङ्गथडी तुपाची आख्या इकडील लोकांस माहीतच आहे. ह्या पशूंचा चारा, सरम (बाजरीचें) आणि कडबा (जोन्धळ्याचा) हीं होत. गङ्गथडी तट्टांची प्रसिद्धी बरीच आहे. हीं तट्टें दुमदार असून इतकीं सदृढ आहेत कीं, कारणपरत्वें बारा तासांत तीस कोसपर्यन्त कण्डाळ घेऊन मञ्जल मारणारीं आहेत. येथें बैलांच्या गाड्या देखील आहेत. नगरापासून सहा-सात कोसावर इमामघाट टाकिला ह्मणजे जमीन एकसारिखी सपाट आहे. पुढें डोंगर व जंगल हीं मुळींच लागत नाहींत. तसेंच जमीन मैदान असल्यामुळें ह्या प्रान्तीं व्याघ्रादि पशूंचा व सर्पादिकांचा उपद्रव होत नाहीं.

५. गङ्गथडींतील लोकः—गङ्गथडींत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ह्या चार वर्णांचे लोक आढळतात; त्यांत ऋग्वेदी (आश्वलायन), यजुर्वेदी (माध्यन्दिनवाजसनेय) आणि प्रथमशाखी (कण्व), ह्यांचा भरणा विशेष आहे; त्यांपैकीं वाजसनेयब्राह्मण हे येथें येऊन कधीं स्थायिक झाले, हें निश्चितपणें सांगतां

येत नाहीं; तथापि ते फार प्राचीनकाळीं येथें आले असावे असें अनुमान होतें; कारण कीं, ह्या गोदातटीं विशेष पुण्यस्थळें व पवित्र तीर्थें असल्यामुळें ब्राह्मणांस उदरनिर्वाहाची बरीच सोय आहे, ह्मणून त्यांचा समुदाय येथें स्थायिक झाला. जनस्थान आणि पुण्यस्तम्भ ह्या क्षेत्रांत श्रीयाज्ञवल्क्यानें पूर्वी यज्ञ केलेले प्रख्यात आहेत. इत्यादि कारणांवरून त्याचवेळीं हे ब्राह्मण तेथें स्थायिक झाले असावे, असें वाटतें. मुसलमानी राज्य झालें तेव्हां मुसलमान व पेशवाई झाली तेव्हां चित्पावन, कऱ्हाडे वगैरे कोंकणचे लोक, नोकरीच्या सम्बन्धानें गङ्गथडींत येऊन राहिले.

६. पैठण हें तीर्थस्थल असून पूर्वी मोठें भरभराटीचें शहर होतें व शालिवाहनाचाहि जन्म येथेंच झाला. इत्यादि गोष्टी इतिहासांवरून कळण्यांत येतात. साम्प्रतकालीं देखील पैठणीपागोटीं नांवाजलीं जातात. हें पैठणशहर हल्लीं बऱ्याच निकृष्ट दशेस आलें आहे. साम्प्रत तेथें मोंगलाचा ( हैद्राबादच्या निझामाचा ) अम्मल आहे, तथापि ईश्वरकृपेनें आजमितीपर्यन्त तेथें बरेच वैदिकब्राह्मणांचें वास्तव्य आहे. पूर्वीहि विद्येविषयीं पैठण फार प्रख्यात असे.

७. त्या प्रान्तांतील इतर ब्राह्मणांप्रमाणें हे वाजसनेय देखील वर्णानें काळेसांवळे, शरीरानें सदृढ, श्रम सहन करण्याजोगे आणि स्नानसन्ध्यादि आचारसम्पन्न असून बव्हंशीं सत्याला अनुसरणारे आहेत. अलीकडील दाम्भिक सुधारणुकेचा मार्ग त्यांस मुळींच आवडत नाहीं व तसल्या लोकांपासून दूर राहण्याचा ते प्रयत्न करितात. चांगलें इंग्लिश शिकून एखादा हुद्दा स्वीकारण्याची महत्त्वाकांक्षा ते बाळगीत नाहींत, तथापि त्यांतील कित्येक कामदार मोंगलाईत आहेत. वेद, शास्त्र, पुराण, ज्योतिष आणि क्वचित् वैद्यक्रिया ह्यांचा अभ्यास ते करितात. पोटापुरती भाकरी मिळाली ह्मणजे कायतो सन्तोष, मग घर सोडतो कोण? अशी ह्या वाजसनेयांची समजूत आहे. ह्यांच्या स्त्रिया शरीरानें पुरुषांपेक्षां किञ्चित गौरवर्ण असून संसारकृत्यांत दक्ष असतात. ह्या स्त्रिया

केसांचा बुचडा बान्धित असतात. त्यांचा कोंकणस्थांच्या स्त्रियांप्रमाणें वेणी घालण्याचा साम्प्रदाय विरळा आढळतो. स्त्रीपुरुषांचा कपडालत्ता शक्त्यनुसार असतो; वापरण्याचा गहिनावगैरे त्या मानानेंच समजावा. इतकेंमात्र खरें कीं, हे वाजसनेय एकन्दरीनें थोडेंबहुत जमिनीचें उत्पन्न असणारे असतात. ह्यांची भाषा मराठी असून त्या देशाच्या चालीप्रमाणें आहे. नित्याचें अन्न कायती भाकरी. वैश्वदेवासाठीं मात्र भात. कार्यप्रयोजनांत भात व पक्वान्नें वगैरे येथल्याप्रमाणेंच थाट असतो. सणवारीं पुरण घालण्याचा प्रघात विशेष आढळतो. नेहमीं दूध, तूप वगैरे असतेंच; परन्तु ताक, दहीं वगैरे खाण्याचा ह्यांचा फारसा प्रचार नाहीं. कारण कीं, तिकडील हवेस तीं मानवत नाहींत.

८. गङ्गथडींतील यजुर्वेद्यांच्या कुलदेवता वगैरेः—श्रीगणपति, श्रीव्यङ्कटेश, श्रीनरसिंह, श्रीमोहिनीराज, श्रीखण्डोबा, श्रीबहिरवनाथ, श्रीदेवी इत्यादि देवता, उपनांवें व कुलाचार हीं सर्व उत्तरकोंकणांतील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांप्रमाणेंच आहेत.

९. गङ्गथडीची प्राचीन माहिती.—गङ्गथडीचा प्रदेश महाराष्ट्रदेशांतच आहे, ह्मणून जो महाराष्ट्रदेशाचा इतिहास तोच ह्या प्रदेशाचा समजावा. फार प्राचीनकालीं दाशरथीराम अरण्यवासाचे वेळीं गोदातटीं पञ्चवटींत राहिले होते; तसेंच श्रीयाज्ञवल्क्यानें जनस्थान व पुण्यस्तम्भ येथें यज्ञ केले, हें वर निरूपण केलेंच आहे. त्यापुढची माहिती सांगण्याजोगी मिळत नाहीं. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांत तगर हें एक मोठें व्यापाराचें स्थल होतें, असें एका ग्रीकग्रन्थावरून समजतें. हें शहर प्रतिष्ठानाचे पूर्वेस पन्नास कोसांवर असावें. तगर येथें सिल्हारवंशाचे रजपूत राज्य करीत होते. पुढें पैठणास शालिवाहन जन्मला, तेव्हांपासून त्याचा शक सर्व महाराष्ट्रदेशांत चालू झाला. बाराव्या शतकांत यादवकुळाचे राजे झाले, त्यांची राजधानी देवगिरी हें शहर होतें. हे राजे बहुधा बल्लाळवंशाचे असावे असें अनुमान इंग्लिश ग्रन्थकारांच्या

इतिहासावरून होतें. देवगिरी येथील रामदेवास व त्याच्या मुलास इ० स० १२९४ चे सुमारास मारून अल्लाउद्दीन खिलजी ह्यानें ह्या राज्याची समाप्ति केली. हा रामदेव बिम्बाचा तीर्थरूप असून सूर्यवंशी राजा असावा असें बिम्बाख्यानादि ग्रन्थांवरून अनुमान करण्यांत येतें.

१०. राजाबिम्बानें उत्तरकोंकण घेतलें त्याचें वर्णनः—उत्तरेस—सुरतजिल्हा; दक्षिणेस—जंजिरा किंवा हबशांचा मुलूख; पूर्वेस-सह्याद्रिपर्वत, नगर व पुणें हे जिल्हे; पश्चिमेस-आरबीसमुद्र. हा प्रदेश ७३ रेखांश व १७—२२ अक्षांश ह्यांच्या मध्यें आहे. हल्लींचा कुलाबाजिल्हा अथवा अष्टागरप्रान्त, पूर्वी उत्तर कोंकणांतच मोडत होता. ह्या कोंकणांतील जमीन बहुतेक डोङ्गराळ आहे. सह्याद्रीच्या पश्चिमेकडील जमीन मात्र सुपीक आहे व तींत मुख्यत्वें भात पिकतें. नारळी, ताड, पोफळी, आम्बे, फणस, चिञ्च, ऊंस, केळीं, वगैरेंचें बागाईत बरेंच आहे. वड, अश्वत्थ, भेण्ड, नान्दरुखी वगैरे वृक्षहि पुष्कळ आहेत. पर्जन्यहि विशेष पडतो. येथें मोठ-मोठीं रानें असून त्यांत साग, खैर, आईन, शिसवा, बिबला वगैरे इमारतीस उपयोगीं पडण्याजोगीं लांकडें व जळाऊ लांकडें होण्याजोगीं झाडें पुष्कळ उत्पन्न होतात. कुम्पणासाठीं बुन्धी (वेलजाळी) पुष्कळ मिळतात. येथील जंगलांत हिंसक व्याघ्रादि श्वापदें आणि सर्पादि विषारीप्राणी बहुत असल्यामुळें, त्यांपासून मनुष्यांस व गृहपशूंस बराच उपद्रव होण्याचा सम्भव आहे. गाई, म्हशी इत्यादि जनावरें बाळगणारे लोक बरेच आहेत; तेणेंकरून दुभत्याची उणीव बहुतकरून नसते. बसण्यास बैलांच्या गाड्या, ओझीं वाहण्यास रेड्यांचे गाडे, ऐषआरामासाठीं घोडे व घोड्यांच्या गाड्या मिळतात. गवत किंवा पेण्ढा हाच गाई म्हशींचा चारा असतो, घोड्यांचा चारा मात्र गवत. पाण्याचा पुरवठा उन्हाळ्यांतहि बराच असतो. जेथें जमीन ताम्बडी, बिनलागवडीची, खारट व डोंगराळ आहे, तेथें मात्र उन्हाळ्यांत पाणी मिळणें कठीण पडतें.

११. उत्तरकोंकणांतील खाड्याः—येथें बऱ्याच खाड्या आहेत. त्यांतून उम्बरगांवची, डहाणूची, चिञ्चणीची, सातपाटीची, दाण्डयाची, दांतिवऱ्याची, वसईची, तुर्भ्याची, भिवण्डीची, ठाण्याची वगैरे खाड्या प्रसिद्ध आहेत. वैतरणा नदी मोठी असून ती पश्चिमसमुद्रास मिळते. हिच्या स्नानाचें महात्म्य पुराणांत वर्णिलें आहे. ह्याखेरीज सूर्यनदी, उल्हासानदी, पाताळगङ्गा, मोरनदी इत्यादि लहान मोठ्या नद्या पुष्कळ आहेत. त्रिमल, निर्मल, वज्रेश्वरी, मातृका, उच्छळा, महालक्ष्मी (कोळवणची), वालूकेश्वर इत्यादि पुण्यस्थलेंहि बरींच असून तेथें यात्रेच्या सम्बन्धानें हजारों लोक प्रतिवर्षी जमतात.

१२. येथें मोठमोठीं खाजणें आहेत, तेणेंकरून हल्लींचे सरकारास मिठाचे जकातीपासून लक्षावधी रुपयांचें उत्पन्न होतें. ताड, माड व खजुरी ह्यांपासून दारूचें उत्पन्न आणि रानें असल्यामुळें इमारती लांकडांपासून व जळाऊ लांकडांपासून देखील बरेंच उत्पन्न आहे. सर्वांपेक्षां विशेष उत्पन्न ह्मटलें ह्मणजे जिराईत जमिनीपासून आहे.

१३. ह्या प्रान्तांतील मुख्य शहरें येणेंप्रमाणेंः—मुम्बई, ठाणें, भिवण्डी (भीमापुरी), कल्याण, वसई, माहीम, तारापूर, डहाणू, दमण वगैरे. हल्लीं पृथ्वींतील जीं शहरें व बन्दरें व्यापारासाठीं पहिल्या प्रतीचीं ह्मणून नांवाजलीं जात आहेत, त्यांतच मुम्बईची गणना केली आहे. येथील मोठमोठे रस्ते, लोहपथ (रेल्रोड), बाष्परथ (आगगाड्या), बाष्पनौका (आगबोटी), दूरस्थश्रवणयन्त्र (टेलीफोन), विद्युल्लेखज्ञापकयन्त्र (टेलीग्राफ), सूत्राम्बरजनकबाष्पयन्त्र (स्पिनिङ्ग आन्ड वीव्हिङ्ग मिल्स्), प्रतिलेखनयन्त्रें (छापखाने), राजमुद्रालय (टांकसाळ), विद्युद्दीप (इलेक्ट्रीकलैट), सरकारी आणि सावकारी मोठमोठ्या इमारती, पाठशाला, रोगपरिहारकशाला (हास्पिटल्स्), अनेक देवांचीं भव्य मन्दिरें व उत्कृष्ट व्यापार इत्यादिकांची माहिती आबालवृद्धांस असल्यामुळें त्यांचा विस्तार येथें लिहिला नाहीं. सुमारें दोनअडीचशें वर्षांपूर्वी मुम्बई हें साधारण

प्रतीचें एक अप्रसिद्ध स्थल होतें. तेंच आतां पृथ्वीवर प्रख्यात आणि उच्चावस्थेंतील शहर बनून गेलें आहे.

१४. अलीकडे ह्या शहरीं पृथ्वीवरील सर्व देशांतले-हिन्दु, ख्रिश्चियन, मुसलमान, ज्यू (यहुदी), पार्शीवगैरे-लोक आढळतात. हल्लीं मुम्बई ह्मटली ह्मणजे, जणूं काय सर्वांचें माहेर घरच झालें आहे.

१५. ज्या गङ्गातटस्थ शुक्लयजुर्वेदीयमाध्यन्दिनवाजसनेय-ब्राह्मणांस आणून ह्या उत्तरकोंकणांत राजाबिम्बानें स्थायिक केलें, त्यांचे व त्यांच्या वंशजांचें विवरण करणें हें विशेषतः ह्या पुस्तकांत देण्याचें आह्मीं योजिलें आहे. ह्या वाजसनेयब्राह्मणांच्या रीतिभाती हुबेहूब त्यांच्या मूलदेशस्थ वाजसनेयांप्रमाणेंच आहेत. आज सुमारें पांच-सहाशें वर्षें ह्यांच्या पूर्वजांस येथें येऊन झालीं, तथापि त्यांचे वंशजांच्या रीतिभातींत फरक पडला नाहीं. त्यांची विद्या वगैरे त्यांच्या मूलदेशीयबान्धवांप्रमाणेंच समजावी. ह्यांच्यांत उत्कृष्ट इङ्ग्लिश शिकून सरकारी किंवा सावकारीनोकरी करणारे गृहस्थहि क्वचित् आढळतील. हे ब्राह्मण येथें येऊन भाकरीच्या ऐवजीं ताकभात झोडगारे झाले; बाकी सर्व स्थिति त्यांच्या मूलदेशस्थांप्रमाणेंच आहे. मूलस्थलांतील लोकांपेक्षां हे किञ्चित् अशक्त असून ह्यांच्यानें फार श्रम करवत नाहींत. ह्यांच्या स्त्रियाहि अशक्त असून त्यांच्या रीतिभाति सर्व प्रकारें त्यांच्या मूलदेशस्थभगिनींप्रमाणेंच आहेत.

१६. ह्या प्रान्तीं पुरुषोत्तमपन्त कावळ्याच्या समागमें गङ्गथडींतून जे वाजसनेयब्राह्मण येथें आले, त्यांच्या वंशजांची उपनांवें, कुलस्वामी वगैरे प्रत्येकाच्या नांवासमोर दिलीं आहेत. पुढील एकाप्रकरणांत तीं उपनांवें व त्यांचे कुलस्वामी वगैरे दिले आहेत, ते तेथें पहावे.

१७. कोंकणाची प्राचीन माहितीः—श्रीपरशुरामानें कोंकण उत्पन्न करून तेथें वसाहत केली हें पुराणप्रसिद्ध आहे; ह्यावरून ह्यास **परशुरामक्षेत्र** असें ह्मणतात. आगाशीजवळील अर्नाळें येथें श्रीरे-

णुकेची स्थापना परशुरामाच्या हातची आहे असें कित्येक ह्मणतात, व तेव्हांपासून ह्यास कीकटदेश असें नांव पडलें आहे. कोंकण हा शब्द संस्कृत भाषेंतील आहे. राज्यक्रान्तीमुळें ह्याच्या सरहद्दी वेळोवेळीं बदलत गेल्या, तेणेंकरून कोंकण हा शब्द कोणत्या प्रदेशास लागू होता, हें त्या त्या वेळच्या इतिहासावरून कळून येतें. ज्यास हल्लीं कोंकण ह्मणतात त्याची लाम्बी सुमारें १६० कोस व रुन्दी १९ पासून ३० कोसपर्यन्त आहे. आरबलोक ह्या प्रदेशास "केमकेम" असें ह्मणत. टालमीनें 'लारिका' असें नांव दिलें होतें. ह्या प्रदेशांत सोपारा अथवा उपारा हें एक मोठें बन्दर होतें, असें पेरिप्लस ह्मणतो. लासन ह्यानें असें प्रतिपादन केलें आहेकीं, 'सारूला' हें नांव वसईचें असावें. फेरिस्तानें देखील कोंकणाची कांहीं माहिती लिहिली आहे. इ० सनाच्या ६ व्या शतकांत कासमस ह्या नांवाचा एक ग्रीक व्यापारी कोंकणांत आला होता, त्यानें कल्याण ही एक मोठी राजधानी त्या वेळीं होती असें दर्शविलें आहे. इ० सनाच्या ४थ्या शतकाच्या सुमारास फाहियान आणि ७व्या शतकाच्या सुमारास हैओयुयन थस्याङ्ग हे दोन्ही चिनीगृहस्थ कान्हेरी येथील बुद्धांची लेणीं पहावयास आले होते. इ० सन ८५१च्या सुमारास कोंकण ("कोकम") हा एक, बल्हार (भडोचें) येथील राज्याचा भाग होता असें आरब लोकांचें ह्मणणें आहे. पर्शियन (इराणी) आणि इजिप्शियन (मिसरी) लोक प्राचीनकालापासून व्यापारासाठीं येथें येत असत, परन्तु रोमन (रुमी) लोकांनीं कधीं ह्या प्रान्ताबरोबर व्यापार केला असेल, हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. इ० सन ९५६नांत थाणा (ठाणें) ह्याचा उल्लेख अलमासुद्दीन ह्यानें केला आहे. सन १३२०सांत ओडोरिकस नामक एक इटालियन पाद्री ठाण्यास आला होता, त्यानें तेथील माहिती दिली आहे.

## उत्तरकोंकणांतील प्राचीन राजे.

१८. प्राचीनकालीं परशुरामानें हा प्रदेश उत्पन्न केल्यावर, त्यांत जे ब्राह्मण त्यानें उत्पन्न केले त्यांसच ह्या प्रदेशाचा अधिकार दिला

होतीं.* ह्या प्रदेशाचे ६४ प्रान्त करून तीन वर्षेपर्यंत आपणांतून एका ब्राह्मणास मुख्य करून, आणि त्यास ४ मन्त्री करून देऊन त्यांनीं सर्व कारभार चालविला होता. पुढें यादवकुलोत्पन्न क्षत्रिय येथें येऊन त्यांनीं राज्य केलें असावें; कारणकीं, द्वारका, कोंकण-प्रान्तास नजीक असून समुद्रमार्गानें त्यांस येथें येण्यास सुलभ पडे. तशांत प्रभासक्षेत्रीं यादवांची घडामोड होऊन वाताहत झाली, त्या समयीं हे येथें आले आणि कोंकण हा एक आपले राज्याचा भाग आहे, असें समजून त्यांनीं येथें राज्य केलें असावें, असें कित्येकांचें ह्मणणें आहे. कांहीं वर्षें लोटल्यावर बौद्धधर्माचें प्राबल्य झालें, आणि तद्धर्मानुयायी राजांनीं येथें राज्य केलें, असें त्यांचीं नाणीं मिळतात त्यांवरून सिद्ध होतें. तिगस्तसालीं सोपाऱ्याजवळ बुरुड राजाची टेंकडी किंवा किल्ला येथील विहाराचा शोध† लागला; त्यांतून पाषाणाची एक पेटी खणून काढिली, तींत बौद्धधर्माच्या मिळालेल्या मूर्ति व नाणीं हीं निदान ३००० हजार वर्षांपलीकडील असावीं असें समजतें. त्या नाण्यांवर "शूर्पारक" असें सोपाऱ्याचें नांव आहे. सोपारें त्यावेळेस मोठें नामांकित शहर व बन्दर असून, पाश्चिमात्यांस त्याची माहिती होती. "विहार" ह्या शब्दाचा अपभ्रंश "विरार" झाला, व तें गांवहि वरील सोपाऱ्याजवळ हल्लीं आहे. कान्हेरी, घारापुरी, चन्दनसारवगैरे ठिकाणचीं लेणींहि ह्याच लोकांचीं असावीं. कान्हेरी‡ येथील लेणीं खरोखर सुरेख आहेत इतकेंच नाहीं; तर तीं बुद्धधर्मानुयायांचीं देवळें, पाठशाला आणि मठ ह्यांचीं दर्शकचिन्हें होत. ह्या लेण्यांतून साठांवर कोरींव लेख आहेत, त्यांजवरून इ. डब्ल्यु वेस्ट साहेब असें अनुमान करितो कीं, हे लेख इ० सनाच्या १ पासून १३ शतकांच्या आंतील असावे. दोन लेखांवर मात्र शके ७९९ (इ० सन ८७७) ह्या वर्षाचा लेख आहे. डाक्टर बर्ड ह्यास जो एक ताम्रपट सांप-

* बाळगङ्गाधर शास्त्री जाम्भेकर ह्यांनीं केलेला हिन्दुस्थानाचा इतिहास पहा.
† हा शोध पण्डित भगवानलाल इन्द्रजी ह्यांनीं लाविला.
‡ विशेष माहितीसाठीं ए, के. नैर्नकृतकोंकण ह्या नांवाचें इंग्लिश पुस्तक पहा.

डला, त्याजवर संवत् २४५ (इ० सन १८९) हा शक असून, तो लेख आन्ध्रवंशांतील राजांचे वेळचा असावा असें त्याचें ह्मणणें आहे. ह्याप्रमाणें इतर लेण्यांवरील लेख व ताम्रपट ह्यांजवरून असें सिद्ध होतें कीं, साष्टी व कोंकण येथें बौद्धलोकांची राज्यसत्ता प्रबल असावी. पोर्तुगीजलोकांनीं साष्टी घेतली, त्यावेळेस तिकडील कित्येक लेण्यांच्या गुहेंत जोगीलोक रहात असत. इ० सन १७८७ ह्या वर्षीं ठाण्याचे किल्यांत खणतांना एक ताम्रपट आढळला, त्याजवर ९३९ (इ० सन १०१८) असा शक असून सिल्हार-वंशाचा राजा अरिकेसरीदेवराज ह्यानें कांहीं जमीन दान दिल्याचा लेख आहे. ह्यावरून तो सर्व कोंकणप्रान्ताचा राजा असावासें वाटतें. शके ९४८ (इ० स० १०२७) ह्या वर्षाचाहि एक ताम्रपट भाण्डपाजवळ मिळाला आहे, त्याजवरून असें दर्शित होतें कीं, कोंकणांतील १४०० गांवांचा अधिपति चिमणादेवराज हा असून, पुरी हें शहर त्याची राजधानी होती. ह्याच राजानें ६६ गांवांचा वरील ताम्रपट करून दिला असावा असें वाटतें. उत्तन आणि येवर येथील कांहीं जमीन केशीदेवराज ह्यानें दिल्याची शिला आहे, तिजवर इ० सन १०४७ हा शक आहे. इ० सन १०९९ ह्या वर्षीं हरपालदेवानें वरील गांवांतील जमीन दिल्याचा दुसरा एक लेख आहे. ठाण्यास दुसरे जे दोन ताम्रपट पहाण्यांत आले, त्यांजवर शके ११९४ (इ० सन १२७३) आणि शके १२१२ (इ० सन १२९१) हीं वर्षें असून यादवकुलांतील श्रीरामचन्द्र अथवा रामदेव ह्याचा वंशवृक्ष दिला आहे. इ० सन १२९५त दक्षिणेंत प्रथमतः मुसलमानांनीं स्वारी करून देवगिरी घेतली, तेथील जो रामदेव राजा तो हाच असावा असें वाथेनसाहेब ह्मणतो. इ० सनाच्या ११ पासून १३ व्या शतकापर्यन्त कोंकणांत लहान लहान राज्यें बहुत असावीं आणि त्यांच्यांतील मुख्यराजा देवगिरी येथील राजाच्या कांहीं अंशीं तरी ताब्यांतला असावा, असें वरील लेखांवरून दर्शित होतें. उत्तरकोंकणांतील मुख्यराजा

सिल्हारवंशांतील असून साष्टींतील पुरी गांव ही त्याची राजधानी असावी. इ० सन ६०० पासून ११५१ पर्यन्त चालुक्यवंशाचे राजे कल्याणास अधिकारी असावे. पुढें देवगिरी येथील यादवकुळाचे राजे उत्तरकोंकणांत बलिष्ठ होऊन त्यांनीं चालुक्यराजांस मागें पाडलें असावें, असें अनुमान होतें.

### बिम्बदेव येण्याच्या पूर्वींची उत्तरकोंकणाची स्थिति.

१९. बिम्बदेव येथें आला त्यावेळेस ह्या उत्तरकोंकणांत जिकडे-तिकडे रान माजलेलें असून, व्याघ्रादि हिंसकश्वापदें व सर्पादि विषारीप्राणी ह्यांचें मनुष्यमात्रांस विशेष भय असे. जङ्गल असल्यामुळें येथील हवा व पाणी रोगोत्पादक असून मनुष्यवस्ती विरळ होती. जमीन बहुंशीं बिनलागवडीची असल्यामुळें, तिचें उत्पन्नहि त्याच मानाचें होतें. इकडील हवेची स्थिति अजून देखील तशीच आहे. अद्यापि प्रतिवर्षी शरदृतूंत शेंकडो लोक हिंवतापानें त्रास पावतात, हें सर्वांस माहीत आहे; तेव्हां बिम्बाच्या वेळेस ह्या प्रान्ताची स्थिति, हवापाणीवगैरेंच्या मानानें, कशी होती ह्याचा विचार सहज होतो.

### बिम्बाच्या पूर्वींचे उत्तरकोंकणांतील लोक.

२०. ह्या उत्तरकोंकणांत बिम्बाचा अम्मल झाला त्या वेळीं कित्येक ठिकाणीं सिल्हार व सोळंखीराजांचे सरदारांचीं लहान लहान संस्थानें होतीं, ह्मणून हा प्रान्त बिम्बास काबीज करण्यास फारसे श्रम पडले नाहींत. थोरले बाजीराव पेशवे ह्यांनीं सुरुसन इसन्ने अर्बैन मया व अलफ ११४२ (शके १६४६) ह्या वर्षी वसई घेतली, त्यावेळीं गङ्गाजीनाईक, बुवाजी नाईक व जनार्दन नाईक ह्यांनीं पेशव्यांस बरीच मदत केल्यावरून, त्या त्रिवर्गनाइकांस अणजोरची सरपाटीलकी इनाम दिल्याची सनंद* पेशव्यांनीं करून दिली आहे; तींत मजकूरनाईक सोळंखीवंशाचे आहेत, असें लिहिलें आहे.

---

* ही सनद हल्लीं त्यांचे वंशज रा. रा. नारायण बापाजी अणजोरकर ह्यांजकडेस आहे.

२१. येथें वस्ती ह्मटली ह्मणजे, गोवर्धन (गोळक), सामवेदी-ब्राह्मण, कोळी, भिल्ल, कायवटी, दुबळे वगैरे लोकांची होती. अष्टागरांत मात्र किरवन्त, गोळक, भिल्ल व कांहीं कोंकणस्थ लोक असत. इकडील सर्व लोकांकडील अष्टाधिकारांसह वृत्तीचा हक्क गोळकांचाच होता. हे गोळक येथें कधीं स्थायिक झाले हें कळत नाहीं. इतकें मात्र खरें कीं, ते सधन होते ह्मणून त्यांचें दरबारांत बरेंच वजन असावें, असें अनुमान होतें. पुरुषोत्तमपन्त कावळे पैठणकर ह्यांस जी वृत्ति बिम्बानें विकत घेऊन दान दिली, ती गोविन्द मिटकरी गोवर्धन ह्याची होती. वृत्ति दान देतेसमयीं तेथें बरेच गोवर्धन अधिकारी हजर होते. आतां येथें सामवेदीब्राह्मण कधीं आले ह्याचाहि निश्चय होणें अशक्य होय. त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, परशुरामानें आह्मांस वैतरणासङ्गमाजवळ उत्पन्न केलें. त्या वेळेपासून आह्मीं येथेंच आहों. पूर्वीं सोपारें भरभराटींत असतां, तेथें ह्यांचा व्यापार बराच चालत असून त्यांची वस्तीहि बरीच होती, ह्मणून त्यांस सोपारेब्राह्मण* ह्मणण्याचा प्रघात पडला. हल्लीं देखील ह्या प्रान्तीं बागबागाईत करणारे हेच सामवेदीलोक विशेष असून, तत्सम्बन्धीं व्यापार ह्यांच्याच हातीं आहे. पूर्वीं ह्यांजकडील उपाध्यायवृत्ति प्रभास येथील वझे (ज्यांस गुगुळ्या ह्मणतात ते) चालवीत. प्रस्तुतकालीं त्यांजकडील उपाध्यायवृत्ति इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मणच चालवितात. कोंकणस्थ व किरवन्त ह्यांविषयीं विशेष सांगणें नको. कारणकीं, त्यांची माहिती सर्वांस आहे. भिल्ल, कोळी वगैरे ह्यांची स्थिति मूळपासून जशी होती तशीच अद्यापि आहे असें समजावें.

## राजा†बिम्बाची मूल‡§पीठिका.

२२. बिम्बाचें घराणें सूर्यवंशी उदेपुराकडील स्थायिक रजपूत

---

*परिशिष्ट घ पृष्ठ ९८ पहा. † राजाबिम्बास इंग्लिश ग्रन्थकार भीम असेंहि ह्मणतात.

‡ रा. रा. रघुनाथ पुतळाजी राणे ह्यांनीं छापिलेलें बिम्बाख्यान आणि हस्तलिखित ह्या पुस्तकाच्या मूळप्रती ह्यांच्या आधारावरून ही पीठिका दिली आहे.

§ धर्मपूरचे हल्लींचे राजे बिम्बाचे वंशांतील असावे, कारण कीं तेहि 'राणे' असें ह्मणवितात.

ह्यांतील होते. ह्यांचे मूलपुरुष, राणे ह्या उपनांवानें प्रसिद्ध होते. ह्यांचे गोत्र भारद्वाज आणि कुलदेवता प्रभावती.

२३. संवत् ९७४ त उदेपुरांतील सिंही येथें रामराजानें गादी स्थापन केली. हा बिम्बाचा मूलपुरुष होता. इ० सनाच्या ११ व्या शतकांत गिझनीकडून मुसलमानलोक हिन्दुस्थानांत पुढें पाऊल टाकूं लागले, त्यावेळेपासून हिन्दूंची निकृष्ट दशा आली. हिन्दूंचे सूर्यवंशी आणि सोमवंशी राजे मुसलमानांनीं पादाक्रान्त केले आणि ते मुसलमान उत्तरेकडेस सत्ता चालवूं लागले; ह्मणून रजपूतराजांस स्वराज्यें सोडून गांवोंगांव देशत्याग करण्याचें अगत्य पडलें, हें इतिहासप्रसिद्धच आहे.

२४. त्या वेळीं सिंहीचा राजा रामदेव ह्याजवर मुसलमानांनीं गदा फिरविली, तेव्हां तो पैठणास आला आणि तेथें विक्रमभोजराजाच्या आश्रयानें राहिला. ह्या रामदेवास तीन पुत्र होते. वडील केशव, ह्यानें देवगिरी येथें राज्य स्थापिलें. दुसरा ब्रिम्बदेव हा उदेपुरासच राहिला. तिसरा प्रतापशहा ह्यानें अहिनलवाडा (कडीपाटण) येथें राज्य स्थापिलें. ह्याप्रमाणें कांहीं वर्षें व्यवस्था चालली असतां, अल्लाउद्दीन खिलजी ह्यानें देवगिरीवर हल्ला करून, तें शहर स्वाधीन करून घेतलें. हें वर्तमान पैठणास समजल्यावरून रामदेव तिकडील राजाच्या कुमकेनें देवगिरीस* आला. प्रतापशहा हाहि अहिनलवाड्याहून तेथें गेला. अल्लाउद्दीनाबरोबर जी त्यांची लढाई झाली, तींत रामदेव राणा शके १२१० (इ० सन १२८८) ह्या वर्षीं मारला† गेला; आणि प्रतापशहा पळत असतां, त्यासहि असेंच फळ प्राप्त होऊन, अहिनलवाडा आणि चाम्पानेर हीं अल्लाउदीनाचे हस्तगत झालीं. बिम्बदेवास ही बातमी कळतांच तो देवगिरीस आला खरा, परन्तु पैठण देखील अल्लाउद्दीनाचे हातीं गेलें; तेव्हां आपला इलाज चालणार

---

* देवगिरीस धारानगरी असेंहि मुसलमानी तवारीखेंत नांव दिलें आहे;

† परिशिष्ट क पृष्ठ ३९-४८ पहा.

नाहीं, असें बिम्बानें पाहून देवगिरी सोडून तो अहिनलवाड्यास आला; परन्तु तेथील सत्ता अल्लाउद्दीनानें आपल्या हस्तगत करून घेतल्याकारणानें त्यास समुद्रतीर धरणें भाग पडलें. रामदेवाची व अल्लाउद्दीनाची जी लढाई झाली तींत, त्याचे राजगुरु पुरुषोत्तमपन्त कावळे पैठणकर होते. (परिशिष्ट क पहा.)

## बिम्बाचें उत्तरकोंकणांत आगमन व तेथील राज्य घेणें.*

२५. वर लिहिल्याप्रमाणें बिम्बानें उत्तरकोंकणांत समुद्रतीरानें येऊन डंबै† फत्ते केली, आणि राणोजी बिरका ह्याजवळून दवण घेतली. पुढें बालापार्डी, चिञ्चणी व तारापूर हीं गांवें हस्तगत करून घेऊन, विनाजी घोडेल ह्यास पदच्युत करून महिमाहीम

* ठाणें, अरुणोदय, ता. १२ आगष्ट सन १८८३:—"इ. स. १७३९ त पोर्तुगीजलोकांपासून मराठ्यांनीं वसई घेतली, त्या नन्तरचे कांहीं कागदपत्र मिळाले आहेत, त्यांवरून असें सिद्ध होतें कीं, मुसलमानांनीं दक्षिणेंत प्रथम स्वारी करून देवगिरीच्या ज्या रामदेव राजाचा पराभव केला, त्याचा पुत्र राजा भीम यानें १३ वे शतकाचे अखेरीस कोंकणप्रान्त जिंकिला. दुसऱ्या कांहीं लेखांवरून तो दुसऱ्या कुळांतला होता असें दिसून येतें. तसेंच कोठें कोठें तो परभू होता असें आढळतें व कोठें कोठें तो रजपूत किंवा शूद्र होता असें आढळतें. सारांश तो कोणत्या जातीचा होता ही गोष्ट वादग्रस्त होय. या भीमराजानें नाईक राजांचा मुलूख काबीज केला आणि चिंचणी, तारापूर, अशीरी, केळवेंमाहीम, तळें, साष्टी, व (मुंबई) माहीम हीं घेऊन शेवटलें गांव ह्मणजे मुंबईमाहीम हें आपलें मुख्य शहर केलें. त्यानें आपल्या ताब्यांतील सर्व मुलखाचे पन्धरा महाल केले होते; त्यांत एकन्दर ४४४ गांव होते. यानें आपल्या पदरच्या सरदारांना केळवें, वसई इ. परगण्यांवर नेमिलें. याचा मुलगा प्रतापशहा यानें साष्टी परगण्यांतील मरोल हें आपलें मुख्य शहर करून त्याचें प्रतापपुरी असें नांव ठेविलें. चौलचा राजा नागरशहा यानें आपला मेहुणा प्रतापशहा याचा पराभव करून त्याचें राज्य घेतलें. पुढें (मुसलमानांनीं नागरशहाचा पराभव केला.) पराभव पावण्याची नागरशहाची पाळी आली, तेव्हां मुसलमानांनीं त्याचा पराभव केला. इ॰स॰ १०१३व इ॰स १२५० यांचे दरम्यान अन्हलवाडा वंशांत भीम नांवाचे तीन राजे होऊन गेले व अन्हलवाडा येथील राजवंशाचा कोंकण व कल्याण यांशीं फार निकटसम्बन्ध होता, असें टाड यानें आपले ग्रन्थांत लिहिलें आहे. १४ वे शतकाचे आरम्भीं देवगिरीच्या यादवराजांपैकीं एकाचें नांव राजा भीमदेव होतें व त्याचे भावाचें नांव हरिपालदेव होतें, असा सर डब्ल्यु इलियट याचा लेख आढळतो. या दोहोंपैकीं कोणत्या तरी एका भीमराजानें कोंकणप्रान्त काबीज केला असें मानिल्यास, त्या मतास मागें उल्लेख केलेल्या कोरींव लेखांचा आधार मिळण्यासारखा आहे.

† हल्लीं डभोई ह्मणतात. हें गांव नर्मदेपासून कांहीं अन्तरावर आहे.

(केळवेंमाहीम) घेतलें. येथें बिम्बानें मातृकेची प्रतिष्ठा केली, ती देवी अद्यापि आहे. नन्तर केळवेंमाहीम हें गांव आपली राजधानी करून त्यास बिम्बस्थान हें नांव दिलें. पुढें केळव्याचा मुख्य कामगार कोकाटचा बिम्बराजास शरण आला.

२६. बिम्बानें वर सांगितल्याप्रमाणें देश काबीज केला, हें वर्तमान अल्लाउद्दीनास समजल्यावरून, तो मोठा खुष झाला आणि बिम्बास आपल्या पुत्रासमान मानून, त्यास बिम्बशाहा हा किताब दिला. पुढें बिम्बानें शके १२१७ ( इ० सन १२९५ ) ह्या वर्षी वसई* (वत्सापूर) घेतली. नन्तर ठाण्याचा राजा यशवन्तराव ह्यास ठार मारून ठाणें* आणि साष्टी हीं घेतलीं. ठाण्यास बिम्बानें अहिनलवाडापाटण हें नामाभिधान दिलें. शके १२१९ ( इ० सन १२९७) त चेऊल (चम्पावती) चा राजा भोज ह्यानें ठाण्यावर स्वारी केली, तींत बिम्बानें त्याचा पराभव केला आणि त्यास ठार मारून चेऊल आपल्या स्वाधीन करून घेतलें. तेव्हां अर्थातच् अष्टागरप्रान्त बिम्बाचे स्वाधीन झाला. चेऊल हस्तगत करून घेण्याचे समयीं महिमुम्बई† राजा बिम्बानें घेतली असावी. ह्याप्रमाणें राज्यसम्पादन केल्यावर, राजाबिम्बानें मालाड गांव ही आपली राजधानी केली; आणि आपल्या बरोबर जे अकरा उमराव आले होते, त्यांतून प्रत्येकास राज्यांतला एक एक भाग दिला; व अष्टप्रधान नेमून राज्यकारभार चालवूं लागला. राजगुरु पुरुषोत्तमपन्त कावळ्यास शके १२२१ (इ० सन १२९९ ) ह्या वर्षी सरदेसाई व सरदेशपाण्डेपणा आणि अष्टाधिकारांसह वृत्ति देऊन‡ दिली. ह्यावरून त्यांस व त्यांचे वंशजांस 'नाईकराव' असें नामाभिधान पडलें. राजाबिम्ब ह्या कोंकणांत येतेसमयीं त्याजबरोबर वरील उमराव आणि राजगुरु होते, आणि ज्या लढाया बिम्बानें मारिल्या त्यांतहि ते होते.

---

* ठाण्यास श्रीस्थानक आणि वसईस गुलछनाबाद असें नांव होतें.

† महिमाहीमास (मुम्बईमाहीमास) परभादेवी (प्रभावती) चें देवालय प्रथमतः राजाबिम्बानें बान्धिलें असें कित्येकांचें ह्मणणें आहे.

‡ परिशिष्ट अ पहा.

२७. बिम्बानें पैठणाहून वगैरे उंचप्रतीचे लोक उत्तरकोंकणांत आणून त्यांस स्थायिक केलें. त्यानें उत्तम रीतीनें राज्य चालवून रयतेस सुख दिलें. एकन्दर पांसष्ट वर्षें राज्य करून बिम्ब परलोकवासी झाला. त्यावेळेस त्याच्या वडील स्त्रीनें त्याबरोबर सहगमन केलें.

## बिम्बाच्यामागें त्याच्या राज्याची व्यवस्था.

२८. बिम्बराजा निवर्तला त्यावेळेस त्याचा पुत्र केशव हा पांच वर्षांचा होता, ह्मणून त्याची आई कामाई ही राज्यकारभार पाहूं लागली. केशव वयांत आल्यावर तोच राज्य चालवूं लागला. ह्याप्रमाणें त्यानें वीस-पंचवीस वर्षें राज्य केलें, आणि सन्तान न होतां तो मरण पावला. पुढें सर्वानुमतें बिम्बाच्या वेळच्या एका विश्वसनीय उमरावांतील वंशजास त्याच्या गादीवर बसविलें. कित्येक ठिकाणीं असाहि लेख आढळतो कीं, बिम्बाचे मुलाचें नांव प्रतापशहा असें होतें; परन्तु, हें नांव केशव हा प्रौढदशेंत आल्यावर त्यानेंच धारण केलें असावें असें वाटतें. ह्याच प्रतापशहानें साष्टींतील मरोळ गांवास प्रतापपूर असें नांव दिलें होतें, असें कित्येक ह्मणतात.

२९. ह्याप्रमाणें राज्य चालत असतां, बेदर येथील मुसलमानांनीं तेराव्या शतकाच्या अखेरीस बिम्बानें स्थापित केलेल्या राज्याची समाप्ति केली. बेदर, अहमदनगर, विजापूर आणि गुजराथ येथील मुसलमानीराजांचे हातीं उत्तरकोंकण वेळोवेळीं गेलें. शेवटीं भोङ्गळे यांणींहि कित्येक गांवांत आपली सत्ता चालू केली.

## उत्तरकोंकणांत मुसलमानांचें राज्य.

३०. ए. के. नेर्नकृत 'कोंकण' ह्या पुस्तकावरून असें समजतें कीं, इ० सन १२९४ त मुसलमानांनीं देवगिरी घेतली, तेव्हांपासून दक्षिणेंत त्यांचा पाय पुढें सरसावत चालला. पुढें इ० सन १३१२ त मलिक काफूर ह्यानें कोंकणकिनारा व महाराष्ट्रदेश ह्यांत आपली सत्ता बसविली.

३१. हुसनगङ्गु ऊर्फ अल्लाउद्दीन ह्यानें प्रथम कलबुर्गा येथें इ० सन १३४७ त गादी स्थापिली. नन्तर बेदर हें शहर आपली

राजधानी केली. इ० सन .१५२६ ह्या वर्षी हें राज्य लयास गेलें. ह्यास बाहामणी (ब्राह्मणी) राज्य किंवा बेदरचें राज्य असें ह्मणत.

३२. विजापूर* ऊर्फ विजापूर येथें यूसफ अदिलशाह ह्यानें इ० सन १४८९ त गादी स्थापिली, तिचा शेवट इ. सन १६८६ त झाला. ह्यास अदिलशाही अथवा विजापुरचें राज्य असें ह्मणत.

३३. अहमदनगर येथें अहमदशाह ह्यानें इ. सन १४९० ह्या वर्षी गादी स्थापिली. हें राज्य इ० सन १६३६ त समाप्तीस गेलें. ह्या राज्यास निजामशाही अथवा नगरचें राज्य असें ह्मणत.

३४. गुजराथ येथें मुझफरशाह ह्यानें इ. स. १३९६ त राज्य स्थापिलें, त्याचा शेवट इ. स. १५६१ ह्या वर्षी झाला. ह्यास गुजराथचें सुलतानी राज्य असें ह्मणत.

३५. दिल्लीचे मोंगलबादशहांनीं देखील येथें कित्येक ठिकाणीं राज्य केलें, पुढें पोर्तुगीजांचा अम्मल सुरू झाला.

## उत्तरकोंकणांत पोर्तुगीजांचें राज्य.

३६. पोर्तुगीजांचा† सरदार व्हासकोडीगामा हा, इ० सन १४९७त प्रथमच हिन्दुस्थानांत कालिकोट येथें आला. पुढें पोर्तुगीजांनीं इ. सन १५१० त गोवें घेतलें व गुजराथचा राजा बहादुरशाह ह्याजवळून इ. सन १५३३ त वसई‡ घेतली. पोर्तुगीजांचें राज्य नष्ट-होईपर्यन्त कल्याण व भिवंडी§ मोंगलबादशाहांच्याच स्वाधीन होतीं. ह्याच राजांच्या वेळीं शेणवीब्राह्मण गोवें वगैरे ठिकाणांहून येथें राजाश्रयानें आले. पुढें पोर्तुगीजांची येथील सत्ता पेशव्यांनीं बुडविली.

## उत्तरकोंकणांत पेशव्यांचें राज्य.

३७. चिमणाजी आप्पानें इ. सन १७३९ च्या दुसऱ्या महिन्याचे १७तारखेस (शके १६६१) ह्या वर्षी पोर्तुगीजांजवळून वसई¶ घेतली,

---

* विजापुरास दारुल्जफर असें मुसलमानींत नांव होतें.

† पोर्तुगीजांस इकडील लोक फिरंगी असें ह्मणतात. ‡ वसईस 'बहादुरपूर' हें नांव ह्याच बहादरशहानें दिलें. हल्लीं देखील 'बहादरपुरा' ह्या नांवानें एक आळी तेथें प्रसिद्ध आहे. § भिवण्डीस 'इसलामाबाद' असेंहि नांव होतें.

¶ शेवटले बाजीराव पेशवे ह्यांनीं वसईस 'बाजीपुरा' असेंहि नांव दिलें होतें.

तेव्हां अर्थातच डहाणूपर्यन्त सर्व उत्तरकोंकण पेशव्यांचे हस्तगत झालें. ह्या वेळेस थोरले बाजीराव पेशवे होते. पेशव्यांची सत्ता येथें झाल्यावरून चित्पावन, कऱ्हाडे इत्यादि दक्षिणकोंकणांतील लोक ह्या प्रान्तीं आले. पेशव्यांची कारकीर्द इतिहासप्रसिद्ध आहे खरी; तथापि, येथें पेशवाई झाल्यापासून तिचे अखेरीपर्यन्त इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांस जीं सुखदुःखें भोगावीं लागलीं, त्यांचें विवरण त्या इतिहासांत नसल्याकारणानें त्यांचें वर्णन पुढें केलें आहे. तें सर्वांनीं लक्षपूर्वक वाचावें. शेवटीं इ. स. १८१८ (शके १७४०) ह्या वर्षी पेशव्यांची सत्ता नष्ट होऊन हा प्रदेश इंग्लिशांच्या हस्तगत झाला.

## उत्तरकोंकणांतील इङ्ग्लिशांचें राज्य.

३८. इ. सन १६०० ह्या वर्षी प्रथमतः इङ्ग्लिशलोक हिन्दुस्थानांत व्यापारासाठीं आले. इ० सन १६६२ त त्यांचा राजा २ रा चार्लस ह्यास पोर्तुगीजांचे राजाकडून मुम्बईबेट आन्दण मिळालें. नन्तर हे लोक हळूहळू एतद्देशीयराज्यांत हात घालूं लागले; तेणेंकरून शेवटीं सर्व हिन्दुस्थानाचे मालक बनले. इ. सन १८१८ ह्या वर्षी शेवटला पेशवा बाजीराव, ह्यास इङ्ग्लिशांनीं पदच्युत करून पेशवाई रसातळास नेली. तेव्हांपासून उत्तरकोंकण त्यांच्याच स्वाधीन आहे, आणि ह्याविषयींची माहिती हिन्दुस्थानाच्या इतिहासांत दिली असून ती सर्वांस श्रुतच आहे.

## गङ्गथडीहून प्राचीन वाजसनेयब्राह्मणांचें वगैरे उत्तरकोंकणांत आगमन.

३९. इ. सन. १२९९ ह्या वर्षी बिम्बास सम्पूर्ण उत्तरकोंकणचें राज्य प्राप्त झाल्यावर, ह्या देशांतील जमीन सुपीक आणि लोकांची वस्ती विरळ पाहून, त्यानें गङ्गथडींतील कित्येक लोकांस ह्या उत्तरकोंकणांत आणून स्थायिक केलें. छापील बिम्बाख्यानावरून कळतें कीं, बिम्बानें ब्राह्मणांखेरीज एकन्दर ६६ कुळें पैठण-

वगैरे ठिकाणचीं येथें बोलावून स्थायिक केलीं. त्यांचा तपशीलः—
२७ सोमवंशी*, १२ सूर्यवंशी*, ९ शेषवंशी, ५ पञ्चाळ, ७ घोडेले† ऊर्फ कुणबी, १ लाड, १ दसालाड, १ विसालाड, १ मोड, १ दसामोड, १ विसामोड. क्षत्रियांचीं जीं कुळें राजाबिम्बाबरोबर ह्या प्रान्तीं आलीं त्यांचीं उपनांवें:—

४०. सूर्यवंशीः—राणे, प्रधान, नवलकर, कोठारे, ब्रह्माण्डकर, धुरन्धर, मानकर, नायक, देसाई, व्यवहारकर, केळकर, दळपते.

४१. सोमवंशीः—रणजीत, गोरक्ष, रावरत, जयकर, धराधर, कीर्तिकर, तळपदे, अजिंक्य, धैर्यवान, सेनजित, विजयकर, त्रैलोकेकर, वाजकर, रक्षी, ठाकूर, दाढीम्बे, महन्त, टूर, आदवन्त, राऊत, साहानी, धिप, राणे, क्षात्रे, पालवण, चोधरी, अमर.

४२. तसेच, बिम्बासमागमें आलेले अकरा शुक्लयजुर्वेदीय माध्यन्दिनवाजसनेयब्राह्मण ( त्याचा राजगुरु वगैरे ) आणि एक आश्वलायनब्राह्मण ( त्याचा पुराणिक ), ह्यांसहि बिम्बानें येथें ठेवून घेऊन, त्यांच्या उदरनिर्वाहार्थ व्यवस्था करून दिली, तेणेंकरून ते सर्वब्राह्मण कुटुम्बांसह येथें राहिले. नन्तर वेळोवेळीं त्यांचे सुहृत्सम्बन्धी आणि ज्ञातीचे लोकहि येथें येत गेले.

४३. वर दर्शितकेल्याप्रमाणें राजाबिम्बानें ह्या प्रान्तीं जीं सहासष्ट कुळें आणून स्थायिक केलीं, त्यांच्या वंशजांनीं कसकसें वर्तन करावें, एतद्विषयींचें निरूपण बिम्बाख्यानांत 'वंशावली' नामक प्रकरणांत दिलें आहे. हें प्रकरण त्यांच्या वंशजांनीं आपले प्रमुखउपाध्याय ( इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मण ) ह्यांजकरवीं तयार करवून शके १२७० फाल्गुनमासांत महालसंस्थानीं श्रवण

---

* ह्या सूर्य व सोमवंशी कुळांपैकीं हल्लीं पैठणाकडेस तीन-चार घरें आहेत. मागें पांचपन्नास घरें होतीं. परन्तु सुमारें चारशें वर्षांपूर्वी गोदेस मोठा पूर येऊन अर्धें शहर उडून गेलें. पांच-सहाशें वर्षांमागें तेथून बहुत लोक उत्तरकोंकणांत गेले असें तिकडील लोक म्हणतात. ह्यांच्या उपनांवांदिकांवरून असें दिसतें कीं, हे सर्व क्षत्रिय मूळ एकाच जातीचे असावे. इकडील ह्यांचे वंशज हल्लीं आपणांस भिन्न समजून पाठारे क्षत्रिय आणि पत्तनप्रभु ( पाताणे परभु ) असें म्हणवितात.

† ह्यांस पैठणाकडेस हल्लीं घोडेकर असें ह्मणवितात.

करून घेतलें. त्यावेळेस "१–धोण्डीनाईक यजुर्वेदी माध्यन्दिन, 'गोत्र पौतमाख्य, एकवीरा कुळदेवी, पसपवली देशस्थ साण्डोरे,' 'कोंकणीं सेनापतीचे आश्रित. तैसेच २–कावळे आँबानाईक,' 'देशस्थ पैठणकर, सरदेशमुख कोंकणचे, गोत्र भारद्वाज,' 'यमाई कुळदेवी, सोमसूर्यवंशीचे कुळगुरु, देणें राजाचें,' 'वृत्तिवन्त मालाडपरगण्यांतील, पाहाड गांव इनाम बिम्बानें' 'दिधलें, रघुनाथपन्तापासून चवथा पुरुष. ३–त्रिंठोबाना-' 'ईक छत्रे, गोत्र शौनक, योगेश्वरी कुळदेवी, यजुःशाखी मा-' 'ध्यन्दिन, पूर्वस्थान परोळ येथील राजाबिम्बास उपाध्येपण' 'मुम्बईस वतन भट्ट जोशी जो त्या स्थानीं राहील त्याजकडील' 'अष्टाधिकार आणि सभापण्डित प्रतापबिम्बाचें हें पद. अनन्त-' 'भट्ट छत्रे यांजपासून सहावा पुरुष, वृत्तिवन्त मुम्बईचा.' '४–केशव रामाचार्य देवधर प्रधान, यजुःशाखी वाजसनेय,' 'पैठणकर, गोत्र शार्ङ्ग, पञ्च प्रवर, कुलस्वामीण एकवीरा,' 'राजप्रधान. ५–वामन पण्डित चामरे, भार्गवगोत्री, पञ्चप्रवर,' 'यजुःशाखी, देशस्थ पैठणकर, पुरोहित राजवंशी, वृत्तिवन्त' 'काम्बे ठाणें. आणखी वृत्तिवन्त ठायीं ठायीं देशस्थ व गोव-' 'र्धनञ्च गान्धर्विक या समस्त विप्रांचे संमतें हा धर्म सांगितला' 'ते समयीं नायकोराय मालाडकर* देसाय, व जिवाजी' 'देसला मरोळकर, दादसावे आगाशीकर, पोसठाकूर बेल-' 'वडींचे, दादचुरी केळव्यांचे, रतनसावे मूळ गांवचे, केशव' 'पाटेल दादरुत माहीमचे, रामपाटेल नामराउत, देवचो-' 'रघे पापडीचे, घोसजी ठाणेकर, विठोजी सुतार, बाबुराणा' 'वडकर, बाबुराणा, रघुपुरो, मुकुन्द परभू, हे मुख्य नामा-' 'ङ्कित व दुसरे पिढीजात या सर्वांस धर्म सांगितला, त्यांस'

---

* ह्याचे प्रपितामह वे. रा. रा पुरुषोत्तमपन्त कावळे ह्यांस राजाबिम्बानें उत्तरकोंकणांतील सरदेसाई, सरदेशपाण्डेगिरी वगैरेचें वतन करून दिलें, तें 'अ' ह्या परिशिष्टांत दाखल केलें आहे.

'तो मानला. सन्तोषी होऊन कुळगुरूची ज्याचें त्याणें अर्घ्य-'
'पाद्यमधुपर्कविधीनें पूजा केली. वस्त्र, अलङ्कार दिधले.'
'सर्व ब्राह्मणांस यथापात्र पाहून दक्षिणा दिधली. परस्परें क्षेम'
'आलिङ्गन पहिरावण्या झाल्या. फार ग्रन्थविस्तारण. हस्ताक्षर'
'केशवाचार्य. वंशपद्धती या संमती पूर्ण झाली."

४४. खालीं दिलेल्या इकडील प्राचीन वाजनेयब्राह्मणांचे बहुतेक गोत्रज हल्लीं श्रीप्रतिष्ठान (पैठण) येथें उपलब्ध आहेत. मागें पैठणशहर भरभराटींत असतां, तेथें वरील सर्व ब्राह्मण आपापल्या मूलस्थलांहून येऊन स्थायिक झाले, ह्मणूनच इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मण आणि पैठणाकडील त्यांचे गोत्रज (ह्मणजे मूलदेशीय ब्राह्मण) वारंवार पैठणच आपलें पूर्वस्थल आहे असें लावीत गेले, व सद्यःहि लावितात. तश्यांत खेड्यांपाड्यांच्या मूलस्थलांचे नांवांवरून इतरांची समजूत करून देण्यास दुरापस्त पडतें. तेव्हां तसें न व्हावें ह्मणून जो तो आपलें पूर्वस्थल पैठणच सांगत गेला. हल्लीं देखील मुम्बई, कलकत्ता, मद्रास इत्यादि प्रान्तांतील गांवचे लोकांचा असाच साम्प्रदाय आढळतो.

बिम्बाश्रयानें उत्तरकोंकणांत आलेले देशस्थशुक्लयजुर्वेदीब्राह्मण व तदनन्तर जे त्यांचे सुहृत्सम्बन्धी येथें आले त्यांची मिळालेली माहिती येणेंप्रमाणेः—*

१. भारद्वाजगोत्रोत्पन्न, भारद्वाज-आङ्गिरस-बार्हस्पत्येति त्रिप्रवराः—

१. कावळे†—"नाईकराव. मूळपुरुष-पुरुषोत्तमपन्त आणि विश्वनाथपन्त उभयतां बन्धु, ह्यांचे तीर्थरूप श्रीधरपन्त, पितामह

* उपनांव, गोत्र, प्रवर, मूळपुरुष, पूर्वस्थल, कुलस्वामी, कुलाचार इत्यादिकांची माहिती वर्गणीदारांकडून भरून आलेल्या सूचनापत्रांवरून व जुन्या लेखांच्या आधारांवरून येथें दाखल केली आहे. इतकेंहि असून यदाकदाचित् ह्यांत एकादी चुकी राहिली असल्यास त्याबद्दल ग्रन्थकार कोणत्याहि प्रकारें जोखमदार नाहीं.

† ज्या उपनांवांवर * हें चिन्ह आहे ते बिम्बाश्रयानें उत्तर कोंकणांत आले असें समजावें.

रघुनाथपन्त. पूर्वस्थल–पैठण (दुर्गोडींतवाडा). कुलस्वामीण-यमाई (मातापुरनिवासिनी). कुलाचार-खण्डोबाचा. ह्यांचे वत्सगोत्री कावळे उपनांवाचे मातुळ पैठणाकडेस होते. बिम्बराजाचे राजगुरु. हल्लीं ह्यांचे वंशज ठाणें, मालाड वगैरे ठिकाणीं राहतात. हेच ठाणें, साष्टी येथील वृत्त्यंशी वतनदार आहेत. हे नाईकराव कावळे असें ह्मणवितात. ह्यांचे पैठणाकडील उपाध्याय भागवत उपनांवाचे आहेत.'' (१).

२. जावळे.–“नाईक. मूळपुरुष–केशव व कमलाकर उभयतां बन्धु, ह्यांचे तीर्थरूप आबाभट्ट. पूर्वस्थल-पळशी-वनकुटें (पारनेर महालांतील) व पैठण. कुलस्वामीण-एकवीरा (पुण्या-जवळ कार्लें येथें). कुलाचार-गणपतीचा. हे याज्ञिक असत. हल्लीं ह्यांचे वंशज मुम्बई, मुम्बई-माहीम, वसई, केळवें-माहीम वगैरे ठिकाणीं राहतात. ते जावळे, भट्ट, वैद्य, नाईक असें ह्मणवितात. मुम्बई-माहीम येथील सर्व लोकांकडेस हे वृत्त्यंशी वतनदार आहेत.'' (२).

## २. भार्गवगोत्रोत्पन्न, भार्गव-च्यावन-आप्नवान्-और्व-जामदग्नेति पञ्चप्रवराः–

१. चाँमरे*–“पण्डित, मूळपुरुष-भास्कर पण्डित आणि हेमाडपन्त दोघे बन्धु, ह्यांचे तीर्थरूप श्रीरामपन्त. पूर्वस्थल-नेवासें. कुलस्वामीण-चण्डिका. कुलाचार- खण्डोबाचा. राजाचे पण्डितराव. हल्लीं ह्यांचे वंशज मुम्बई, ठाणें, कळवें, भुयगांव (भूमिग्राम), मुम्बई–माहीम वगैरे ठिकाणीं राहतात. ते चामरे, छत्रे, पण्डित असें ह्मणवितात. त्यांपैकीं माहिमाकडील नाईक व भुयगांवाकडील चन्द्रे असें ह्मणवितात.'' (३.)

## ३. शौनकगोत्रोत्पन्न, शौनक-भार्गव-गार्त्सदेति त्रिप्रवराः—

१. छत्रे*–“नाईक. मूळपुरुष–अनन्तनाईक. पूर्वस्थल–मुङ्गी. कुलस्वामीण-जोगेश्वरी (जोगाईचे आम्ब्याजवळ). कुलाचार-

व्यङ्कटेशाचा. राजाचे पोतनीस. हल्लीं ह्यांचे वंशज मुम्बई, गोखवें (गोखिरें), कोहोरें वगैरे ठिकाणीं राहतात. ते छत्रे, नाईक, भट्ट असें ह्मणवितात. ह्यांचे सूर्य- सोमवंशांतले क्षत्रिय यजमान आहेत. मुम्बईचे मूळ वतनदार वृत्त्यंशी हेच होत. ह्यांची वृत्ति गोखिरें वगैरे ठिकाणीं आहे." (४).

४. पौतमाख्यगोत्रोत्पन्न, आङ्गिरस-साङ्कृति-गौरवीति त्रिप्रवराः

१. वैद्य*—"नाईक—सांवखेडकर. मूळपुरुष—गङ्गाधर, आबा, आणि देवधर. पूर्वस्थल-सांवखेडें (शामराजतीर्थ). कुल-स्वामीण-एकवीरा (पुण्याजवळ कार्लें येथील). कुलाचार-व्यङ्कटेशाचा. ह्यांचे काश्यपगोत्री माण्डे उपनांवाचे मातुळ सांवखेडास होते. राजाचे हसबनीस. ह्यांचे वंशज मुम्बई, जुहूं, भायन्दर, वसई, चिम्नणी वगैरे ठिकाणीं राहतात. ते वैद्य, नाईक, भट्ट असें ह्मणवितात. ह्यांचे सूर्य—सोमवंशांतले क्षत्रिय यजमान आहेत. हे मुम्बईतील छत्र्यांचे वृत्तीपैकीं भागीदार आहेत. ह्यांची वृत्ति भायन्दर आणि वसई प्रान्तीं आहे." (५).

५. वत्सगोत्रोत्पन्न, भार्गव—च्यावन—आप्नवान—और्व जामदग्नेति पञ्चप्रवराः—

१. शिङ्गणे*—"जोशी—स्मार्त-भट्ट-पाटील. मूळपुरुष—सन्त भट्ट. पूर्वस्थल—नेवासें. कुलस्वामीण-म्हालसा—ह्मालसा (त्र्यम्बकेश्वर येथील). कुलाचार-मोहिनीराजाचा. हे पुत्राचें व कन्येचें चौल किंवा जात्रळ मोहिनीराजाजवळ करितात. हे राजाचे पुजारी. ह्यांचे वंशज मुम्बई, आलेवाडी, खारेकुरण, केळवें, शिरगांव, येडवन, केळवें-माहीम वगैरे ठिकाणीं राहतात. ते स्मार्त, जोशी, भट्ट असें ह्मणवितात. मुम्बईस कांहीं परभांकडे ह्यांची उपाध्यायपणाची वृत्ति चालू आहे. केळवें-माहीम येथील सर्व चित्पावन, कऱ्हाडे वगैरे ब्राह्मणांकडेस विवाहादि मङ्गलकार्यांत ह्या सर्वांचा मुळेपणा (जोशी-

पणा ) प्राचीनकालापासून चालत आला आहे. हल्लीं देखील त्यांच्यांतील मुख्य दाण्डेकर, केळकर, मोडक, पेणशे वगैरे कोंकणस्थ आणि कोशे, गोंसावी कुकुरमुण्डेकर वगैरे देशस्थ, ह्या शिङ्गण्याकडूनच आपल्याकडील लग्न, मुञ्जी इत्यादि सर्व कार्यें उरकून घेतात.'' (६).

६. कौशिकगोत्रोत्पन्न, कौशिक–विश्वामित्र–अघमर्षणेति त्रिप्रवराः—

१. क्षीरसागर- ''उपाध्ये. मूळपुरुष—अमरउपाध्ये आणि पोसम्भट्ट उपाध्ये, ह्यांचे तीर्थरूप—गोपाळभट्ट. पूर्वस्थल—राहुरी वाम्बोरी (नगराजवळ). कुलस्वामीण—महालक्ष्मी (कोल्हापूर येथील). कुलाचार—खण्डोबाचा. क्षत्रियांचे पुरोहित. हल्लीं ह्यांचे वंशज मुम्बई, मुम्बई-माहीम, केळवें—माहीम, ठाणें वगैरे ठिकाणीं राहतात. ते उपाध्याय ह्मणवितात. मुम्बई-माहीम येथें सर्व लोकांकडेस वृत्त्यंशी वतनदार हे व जावळे आहेत.'' (७).

७. कौशिकगोत्रोत्पन्न, कौशिक–अघमर्षण–नैध्रुवेति त्रिप्रवराः—

१. धर्माधिकारी—'' जोशी—शासनकर. मूळपुरुष—त्र्यम्बक गङ्गाधरभट्ट. पूर्वस्थल—शासन (बीडाजवळ) व पिम्पळगांव (बसवन्ताचा). कुलस्वामीण—महाजाई. कुलाचार—श्रीव्यङ्कटेशाचा. हल्लीं ह्यांचे वंशज मुम्बई, केळवें—माहीम, सोपारें, पोफरण, त्रिम्बणी वगैरे ठिकाणीं राहतात. ते जोशी, शासने (शासनकर) असें ह्मणवितात. ह्यांपैकीं पोफरणास व खारेकुरणास राहणारे बान्धवलीकर, पाटील असें ह्मणवितात. मुम्बईंत परभांकडील ग्रामजोशी हेच शासनकर आहेत.''(८)

२. पाध्ये—'' मूळपुरुष—जनार्दन आबा. पूर्वस्थल—नेवासें. कुलस्वामीण-सप्तशृङ्गी (नासिकाजवळ). कुलाचार-बहिरवनाथाचा. हल्लीं ह्यांचे वंशज मुम्बई,आवास वगैरे ठिकाणीं राहतात. ते

पाध्ये असें ह्मणवितात. ह्यांची वृत्ति चेऊल व आवास येथें आहे." (९)

८. अत्रिगोत्रोत्पन्न, आत्रेय–आर्चनानस–श्यावाश्वेति त्रिप्रवराः—

१. *जोशी "बाबरेकर—नाईक–येवलेकर-भट्ट. मूळपुरुष–सीताराम अनन्त. पूर्वस्थल-बाबरें (औरंगाबादेजवळ). कुलस्वामीण-सप्तशृङ्गा. कुलाचार-श्रीगणपतीचा. शेषवंशाचे उपाध्ये. हल्लीं ह्यांचे वंशज मुम्बई, कोहरें, विरार, शिरगांव, खारेकुरण, नान्दगांव, चिञ्चणी वगैरे ठिकाणीं राहतात. ते बावरेकर, जोशी, भट्ट असें ह्मणवितात. नान्दगांवाकडील येवलेकर, नाईक असें ह्मणवितात. चन्दनसाराकडील नाईक असें ह्मणवितात. चिञ्चणी–तारापूर येथील चित्पावन, कऱ्हाडे वगैरे समस्त लोकांकडील ग्रामजोशी उपाध्याय हेच आहेत. मुम्बईत कांहीं परभूलोकांकडेस उपाध्यायपण ह्या बाबरेकर जोशांचें आहे." (१०)

९. अगस्तिगोत्रोत्पन्न, अगस्ति—दार्ढ्यच्युत–इध्मवाहेति त्रिप्रवराः–

१. उपाध्ये "मटकर. मूळपुरुष–विठ्ठल भट्ट. पूर्वस्थल-धोण्ड्री (गेवराई). कुलस्वामीण—अपराजिता. कुलाचार—श्रीनृसिंहाचा. हे पूर्वापार धरमपूरच्या राण्याचे राजगुरु होत. हल्लींहि ह्यांचे वंशज तेथील राण्याचे राजगुरु आहेत. हे मुम्बई, केळवें–माहीम, माकुणसार वगैरे ठिकाणीं राहतात. ते उपाध्ये-मटकर, भट्ट असें ह्मणवितात. मुम्बईत ह्यांचे कितीएक यजमान परभू, भाटे वगैरे आहेत."(११)

१०. वात्स्यायनगोत्रोत्पन्न, आङ्गिरस—पौरुकुत्स-त्रासदस्यवेति त्रिप्रवराः—

१. पञ्चानन–"पाठक. मूळपुरुष–मालपाठक. पूर्वस्थल–नगर हवेली. कुलस्वामीण–जोगेश्वरी (जोगाईच्या आम्ब्या-

जवळ). कुलाचार—सिद्धिविनायकाचा. राजाश्रित घनपाठी. हल्लीं ह्यांचे वंशज मुम्बई, ठाणें, केळवें, वगैरे ठिकाणीं राहतात. ते पाठक, पञ्चानन, असें ह्मणवितात. हे मुलींचें चौल करितात व मुलीमुलांचें नालछेदन करीत नाहींत. ह्यांचें मुम्बईस भाटे, परभू वगैरे यजमान आहेत. केळवें येथें सर्व महाराष्ट्रलोकांचे उपाध्ये हेच आहेत." (१२)

११. शाण्डिल्यगोत्रोत्पन्न, शाण्डिल्ल-असित—देवलेति त्रिप्रवराः —

१. *राजे—"रांजणे—जावळे-छत्रे—पण्डित-नाईक—कीर्तने. मूळपुरुष—पुरुषोत्तम नाईक. पूर्वस्थल—बीड. कुलस्वामीण—एकवीरा (पुण्याजवळ कार्ले येथें). कुलाचार—श्रीनृसिंहाचा. हल्लीं ह्यांचे वंशज मुम्बई, मुम्बई-माहीम, ठाणें, केळवें-माहीम, सोपारें, उमराळें, विरार, येडवन, चिञ्चणी वगैरे ठिकाणीं राहतात. ह्यांपैकीं केळवें-माहिमाकडील कित्येक हरदासी बाण्यावरून कीर्तने, नाईक असें ह्मणवितात; ठाण्यास राहणारे छत्रे, नाईक असें ह्मणवितात. सोपारें, उमराळें वगैरे ठिकाणीं राहणारे जावळे, नाईक असें ह्मणवितात. चिञ्चणी, वरोर वगैरे ठिकाणीं राहणारे पण्डित असें ह्मणवितात." (१३)

१२. मैत्रेयगोत्रोत्पन्न, मैत्रेय-आङ्गिरस-अत्रीति त्रिप्रवराः-

१. मुद्गलपण्डित." मूळपुरुष—हरीगङ्गाधर. पूर्वस्थल—मुङ्गी. कुलस्वामीण-अम्बिका. कुलाचार-श्रीव्यङ्कटेशाचा. हल्लीं ह्याचे वंशज मुम्बई, मुम्बई-माहीम, उसरणी, खारेबाव, वसई, केळवें, केळवें-माहीम, खारेकुरण, अणजोर, आंचोळें, नान्दगांव, चिञ्चणी, शिरगांव, वाढिव, धरमपूर वगैरे ठिकाणीं राहतात. ते मुद्गलपण्डित असें ह्मणवितात." (१४)

१३. वासिष्ठगोत्रोत्पन्न, वसिष्ठ—इन्द्रप्रमद—आभरद्वस्विति त्रिप्रवराः—

१. पिङ्गळे-"त्रिवेदी-भट्ट. मूळपुरुष-कृष्णम्भट्ट. पूर्वस्थल-सङ्गमनेर. कुलस्वामीण-महालक्ष्मी (कोल्हापूरची). कुलाचार–श्रीखण्डोबाचा. हल्लीं ह्याचे वंशज मुम्बई-माहीम, नाळें वगैरे ठिकाणीं राहतात. ते मोरवेकर, त्रिवेदी असें ह्मणवितात. ह्यांस त्रिवेदी ह्मणण्याचें कारण असें आहेकीं, गङ्गभट्टानें सामवेदी ब्राह्मणांकडील वृत्ति सम्पादन केल्यामुळें, त्यांजकडील कृत्यें त्यास सामवेदमन्त्रेंकरून करणें भाग पडलें." (१५)

२. पाध्ये–" मूळपुरुष (?) पूर्वस्थल-धोण्ड्री (गेवराई). कुलस्वामीण–(?)कुलाचार–(?)हल्लीं ह्यांचे वंशज आवास, मुम्बई वगैरे ठिकाणीं राहतात." (१६)

## १४. वासिष्ठगोत्रोत्पन्न, वासिष्ठ-अघमर्षण—नैध्रुवेति त्रिप्रवराः—

१. *मोगरे–"जोशी–पाटील, मूळपुरुष–गोविन्दजोशी, पूर्वस्थल–पैठण, कुलस्वामीण-महालक्ष्मी. (कोल्हापूर येथील). कुलाचार–श्रीव्यङ्कटेशाचा. राजाचे जोशी. हल्लीं ह्याचे वंशज मुम्बई, सत्पाळें, श्रीग्राम (शिरगांव), पुणें, केळवें वगैरे ठिकाणीं राहतात. त्यांतून कित्येक मोगरे, पाटील, जोशी असें ह्मणवितात. हे शिरगांव येथील वृत्यंशी वतनदार असून चित्पावनवगैरे ह्यांचे यजमान आहेत." (१७).

## १५. काश्यपगोत्रोत्पन्न, काश्यप–अवत्सार–नैध्रुवेति त्रिप्रवराः—

१. धोण्डे–"नाईक–देव–मूळपुरुष–केशव. पूर्वस्थल–पिम्पळगांव (बसवन्ताचा). कुलस्वामीण–महालक्ष्मी (कोल्हापूर). कुलाचार–श्रीनृसिंहाचा. सूर्यवंशाचे गुरु. हल्लीं ह्याचे वंशज मुम्बई, जुहूं, चेम्भूर, पुणें वगैरे ठिकाणीं राहतात. त्यांतून कित्येक देव, भट्ट, नाईक असें ह्मणवितात. ह्यांची वृत्ति पुणें खेरीजकरून त्या त्या गांवीं आहे." (१८).

२. भास्कर—"आचार्य-जोशी—भट्ट. मूळपुरुष—बाजी जोशी आणि भास्कर जोशी हे उभयतां बन्धु. पूर्वस्थल—पुणताम्बें. कुलस्वामीण—तुकाई (तुळजापूर). कुलाचार-खण्डोबाचा. ह्यांतून बाजी जोशी ह्याचे वंशज ब्राह्मणांकडेस पौरोहित्य करूं लागल्यामुळें त्यांस 'आचार्य' असें ह्मणतात. हल्लीं हे मुम्बई, भिवण्डी, वसई, आगाशी, सोपारें, केळवें, केळवें-माहीम वगैरे ठिकाणीं राहतात. मुम्बईस वृत्त्यंशी वतनदार हे असून ह्यांची वृत्ति भिवण्डी, कामण, व मनोर वगैरे प्रान्तीं आहे. भास्कर जोशी ह्याचे वंशज 'भास्कर', 'जोशी', 'भट्ट' असें ह्मणवितात. ह्यांचें आराध्य दैवत सप्तशृङ्गा (नासिकाजवळ) आहे. मुम्बई आणि चन्दनसार वगैरे ठिकाणीं भास्कर ह्या उपनांवानें हे प्रसिद्ध आहेत." (१९).

३. भानुशे—"जोशी—भट्ट—पण्डित. मूळपुरुष—गङ्गाधर अनन्त भट्ट. पूर्वस्थल-घनेसाङ्गवी, (घनसांवगी) (अम्बड महाल.) कुलस्वामीण—महालक्ष्मी (कोल्हापूर). कुलाचार—खण्डोबाचा. हल्लीं ह्याचे वंशज मुम्बई, वसई, तर्खड, वाघवली, नाळें, सोपारें, यडवन वगैरे ठिकाणीं राहतात. ते भानुशे, भट्ट, जोशी, पण्डित, असें ह्मणवितात. ह्यांची वृत्ति वाघोलीस आहे. तर्खडाकडील पण्डित, हरदास असें ह्मणवितात." (२०).

४. भानू—"जोशी. मूळपुरुष—नागेश श्रीधर जोशी. पूर्वस्थल-पळशी—वनकुटें (पारनेर महालांत). कुलस्वामीण-सप्तशृङ्गा (नासिकाजवळ). कुलाचार-श्रीव्यङ्कटेशाचा. हल्लीं ह्याचे वंशज मुम्बई, बोळिंज वगैरे ठिकाणीं राहतात. ते जोशी ह्मणवितात. बोळिंजास राहणारे ह्यांजकडे सामवेद्यांची वृत्ति असल्यामुळें त्यांस कित्येक त्रिवेदी असें ह्मणतात." (२१).

५. पाराशरे—"नाईक—जोशी. मूळपुरुष—बापाजी महादेव. पूर्वस्थल—कोल्हापूर. कुलस्वामीण-सप्तशृङ्गा (नासिकाजवळ). कुलाचार—(?) हल्लीं ह्याचे वंशज मुम्बई, दहिंसर, घोडबन्दर,

वसई, कोहरें वगैरे ठिकाणीं राहतात. ते पाराशरे, जोशी, नाईक असें ह्मणवितात." (२२).

६. पारायणे—"नाईक. मूळ—पुरुष-(?). पूर्वस्थल—वाशीम (बाळाजीचें वऱ्हाडांत). कुळस्वामीण-महाजाई. कुलाचार—बालाजीचा. हल्लीं ह्याचे वंशज ठाणें, केळवें-माहीम, खारे-कुरण, चिञ्चणी वगैरे ठिकाणीं राहतात. त्यांपैकीं कित्येक पाराशरे किंवा पारायणे, नाईक असें ह्मणवितात. राजा-बिम्बानें केळवें-माहिमास स्थापित केलेल्या श्रीमातृकेची पूजा ह्यांचे वंशज करितात. व त्यांस सरकारांतून वेतन मिळतें." (परिशिष्ट 'ह' पृष्ठ. २०५ पहा). (२३).

७. माण्डे—पण्डित "मूळपुरुष-बाळकृष्ण पण्डित. पूर्वस्थल—सांवखेडें. कुलस्वामीण—महालक्ष्मी (कोल्हापूर). कुलाचार—नृसिंहाचा. हल्लीं ह्याचे वंशज वसई, वटार वगैरे ठिकाणीं राहतात. ते पण्डित जोशी, असें ह्मणवितात." (२४).

८. पुरन्दरे—"वैद्य–जोशी–नाईक. मूळपुरुष—गोविन्द. पूर्वस्थल—पिम्पळगांव (बसवन्ताचा). कुलस्वामीण——सप्तशृङ्गा (नासिकाजवळ). कुलाचार—बहिरवनाथाचा. हल्लीं ह्याचे वंशज, ठाणें, शिरगांव, चिञ्चणी, झायबोर्डी, दमण (दवण) वगैरे ठिकाणीं राहतात. ते वैद्य, नाईक, जोशी असें ह्मणवितात." (२५).

१६. <u>मौनसगोत्रोत्पन्न</u>, भार्गव–वीतहव्य–सावेतदसेति त्रिप्रवराः—

१. नाईक—"मूळपुरुष—गणेश वामन—पूर्वस्थल—शेण्डी—पोखरडी (नगराजवळ). कुलस्वामीण—(?). कुलाचार—श्रीखण्डोबाचा. हा सराफी करी. हल्लीं ~~ह्याचे~~ वंशज वसई (वासळई) वगैरे ठिकाणीं राहतात. ते नाईक असें ह्मणवितात." (२७).

१७. <u>जामदग्न्यगोत्रोत्पन्न</u>, जमदग्नि–भार्गव–च्यवन–आप्नव–और्ववाहेति पञ्चप्रवराः—

१. पाध्ये—“ पाटील—मूळपुरुष—पण्ढरीनाथ चिन्तामण. पूर्वस्थल—उमरखेड (वऱ्हाड). कुलस्वामीण—माहुरची यमाई कुलाचार—श्रीखण्डोबाचा. हल्लीं ह्याचे वंशज चन्दनसार वगैरे ठिकाणीं राहतात. ते तिकडील वृत्त्यंशी वतनदार असून पाध्ये, पाटील असें ह्मणवितात.” (२८).

२. काळे—“ मूळपुरुष—(?). पूर्वस्थल—वाशीम (वऱ्हाडांतील). कुलस्वामीण—चण्डिका. कुलाचार—बालाजीचा. हल्लीं ह्याचे वंशज मुम्बई, आवास वगैरे ठिकाणीं राहतात. ते काळे असें ह्मणवितात. ह्यांची वृत्ति आवास वगैरे ठिकाणीं आहे.” (२९).

१८. उपमन्युगोत्रोत्पन्न, वसिष्ठ—आभरद्वसु—इन्द्रप्रमदेति त्रिप्रवराः—

१. पण्डित—“ मूळपुरुष—वैजनाथ विनायक. पूर्वस्थल—निफाड. कुलस्वामीण—सप्तशृङ्गा (नासिकाजवळ). कुलाचार—श्रीव्यङ्कटेशाचा. हल्लीं ह्याचे वंशज शिरगांव व त्रिम्बगीस राहतात. ते पण्डित असें ह्मणवितात.” (३०)

१९. गार्ग्यगोत्रोत्पन्न, गार्ग्य—आङ्गिरस—बार्हस्पत्य—भारद्वाज शैन्येति पञ्चप्रवराः—

१. कीर्तने—“मूळपुरुष-नारायण केशव. पूर्वस्थल—त्रिडाकिन् (औरङ्गाबादजिल्ह्यांत). कुलस्वामीण—अम्बिका. कुलाचार—बहिरवनाथाचा. हल्लीं ह्याचे- ~~वंशज केळवें~~-माहिमास राहतात. ते हरिभजनांत तत्पर असल्याकारणानें त्यांस ‘बोवा’ असें ह्मणतात.” (३१)

२०. गौतमगोत्रोत्पन्न, गौतम—आङ्गिरस—आयास्येति त्रिप्रवराः—

१. पुरन्दरे—“वैद्य—नाईक—मूळपुरुष—शङ्कर वैद्य व रङ्गोपन्त नाईक. पूर्वस्थल—पुणताम्बें. कुलस्~~वामीण—कामाक्षी~~ (श्रीत्र्यम्बकेश्वर येथील. जिला ‘निलिम्बिका’ ह्मणतात). कुलाचार-

श्रीसिद्धिविनायकाचा. हल्लीं ह्यांचे वंशज मुम्बई, नाळें, केळवें वगैरे ठिकाणीं राहतात. त्यांपैकीं कितीएक वैद्य-पुरन्दरे, नाईक-पुरन्दरे असें ह्मणवितात. हे पूर्वापार गृहस्थ असल्याकारणानें ह्यांस मुळींच उपाध्यायपणाची वृत्ति नाहीं." (३२).

२. पुरन्दरे—"जोशी—भट्ट—मूळपुरुष—( ? ). पूर्वस्थल—निफाड. कुलस्वामीण—एकवीरा. कुलाचार—श्रीखण्डोबाचा. हल्लीं ह्याचे वंशज मुम्बई, वसई, ठाणें, पुणें, आगाशी वगैरे ठिकाणीं राहतात. ते जोशी व भट्ट असें ह्मणवितात. वसई व आगाशी येथील वृत्त्यंशी मुळे वतनदार हेच पुरन्दरे आहेत." (३३).

३. पुरन्दरे—"जोशी—पाटील—मूळपुरुष—शिवराम जोशी-पूर्वस्थल—उज्जनी (सङ्गमनेर सिन्नरचे भागांत, जिल्हा नगर). कुलस्वामीण-एकवीरा, कुलाचार—श्रीगणपतीचा. हल्लीं ह्याचे वंशज नाळें, बोळिंज, वाढींव, येडवन, कोहरें वगैरे ठिकाणीं राहतात. येडवनाकडील राहणारे पुरोहित, नाईक असें ह्मणवितात. बाकी पुरन्दरे—पाटील, जोशी ह्मणवितात. येडवन, कोहरें वगैरे ठिकाणीं हे वृत्त्यंशी आहेत." (३४).

४. पुरन्दरे—"पण्डित—मूळपुरुष—धर्मपण्डित. पूर्वस्थल-मातापूर (माहूर). कुलस्वामीण-यमाई. कुलाचार-हरसिद्धीचा. हल्लीं ह्याचे वंशज केळवें—माहीम येथें राहतात. ते पुरन्दरे, पण्डित असें ह्मणवितात. हे केळवें—माहीम येथील वृत्त्यंशी वतनदार आहेत." (३५).

## २१. आत्रेयगोत्रोत्पन्न, आत्रेय—गाविष्ठिर—पौर्वातिथेति त्रिप्रवराः—

१. सप्तर्षी—"पाठक-मूळपुरुष-ब्रह्मदेव पाठक. पूर्वस्थल-मुङ्गी. कुलस्वामीण-शामलायनी. कुलाचार-श्रीव्यङ्कटेशाचा. हल्लीं ह्याचे वंशज मुम्बई, जुहूं, आवास, वसई वगैरे ठिकाणीं राहतात. हे सप्तर्षिपाठक, नाईक असें ह्मणवितात. जुहूं येथील राहणारे

ह्यांची कुलस्वामीण- जटाई. चेऊल व आवास येथें ह्यांची वृत्ति आहे." (३६).

## २२. कौण्डिण्यगोत्रोत्पन्न, कौण्डिण्य—वासिष्ठ—मैत्रावरुणेति त्रिप्रवराः—

१. तरडे—"नाईक-पाटील-घड्याळे. मूळपुरुष-(?). पूर्वस्थल -कोळगांव (नगराजवळ). कुलस्वामीण-कोळाई. कुलाचार-खण्डोबाचा. हल्लीं ह्यांचे वंशज मुम्बई, मुम्बई-माहीम, जुहू, वाढींव, केळवें, पोफरण, आवास, थळ, पुणें वगैरे ठिकाणीं राहतात. त्यांपैकीं कित्येक पाटील, नाईक, घड्याळे, असें ह्मणवितात." (३७).

## २३. शार्ङ्गगोत्रोत्पन्न, दार्ढ्य—अच्युत-इध्मवाह—जामदग्न्येति पञ्च प्रवराः—

१. आचार्य-"मूल पुरुष-केशवराव. पूर्वस्थल-कोल्हापूर. कुलस्वामीण-एकवीरा. कुलाचार—(?). हल्लीं ह्यांचे वंशज मुम्बई वगैरे ठिकाणीं राहतात. ते आचार्य, जोशी असें ह्मणवितात."(३८)

## २४. चन्द्रात्रगो०, आत्रेय-गाविष्ठिर-पूर्वातिथीति त्रि०:—

१. औपासनी—"मूळपुरुष—सदाशिव दीक्षित—पूर्वस्थल—जनस्थान. कुलाचार—(?). ह्याचे वंशज नाहींत." (३९).

## २५. गोत्रांची माहिती नाहीं ते.

१. हेमटे—"परशुराम." } ह्यांची कांहींच माहिती नाहीं.
२. जाधवे—"कृष्ण जाधवे." }

३. थिगळे—"मूळपूरुष-गोविन्द महीधर. पूर्वस्थल-बीड. कुलस्वामीण—व कुलाचार—(?) ह्यांचे वंशज पूर्वी ठाण्यास रहात असत. हे स्वशाखी असून सुमारें शें-दीडशें वर्षांमागें ह्यांच्या कोणीं एका पुरुषानें अष्टागरांतील कोणी एका कोंकणस्थाच्या कन्येबरोबर लग्न केलें; ह्मणून ह्याचे वंशजांची हल्लीं माहिती मिळणें कठीण आहे."

5

४. "औटी, पारनाईक इत्यादि उपनांवाचे स्वशाखीय पूर्वी येथें होते खरे; परन्तु, पेशवाईत कोंकणस्थांतील कन्या करून व त्यांजकडेस आपल्या कन्या देऊन त्यांत मिसळले असें वडीलवडील सांगत आले; तेव्हां हल्लीं ह्यांच्या वंशजांचा पत्ता लागणें फारच कठीण आहे."

५. शेवन्तकर—"उपनांवाचा मूळ पैठणचा राहणार एकनाथ ह्या नांवाचा एक स्वशाखीय ब्राह्मण होता. त्यानें द्रव्याच्या लालुचीनें वर दर्शित केल्याप्रमाणें कित्येक स्वशाखीय कुटुम्बांतील गृहस्थांस द्रव्याच्या आशेनें भुलथाप देऊन कोंकणस्थांबरोबर कन्याव्यवहार करविला. असा शाखासङ्कर करण्याचा त्याचा क्रम स्वशाखीय मण्डळीस न आवडल्याकारणानें ह्या मण्डळीनें त्यास अपङ्क्त करून त्याजवर ग्रामण्य केलें. ह्मणून तो कोठें चालता झाला, त्याचा शोध आजतागाईत लागत नाहीं. तेव्हां त्याच्या वंशजांची हल्लीं माहिती मिळणें फारच कठीण आहे."

६. घोडे*—"मूळपुरुष—रामचन्द्रपन्त. पूर्वस्थल—नेवासें. कुळस्वामीण व कुलाचार—(?). हे राजाचे पुराणिक असून, आश्वलायनशाखेचे होते सबब ह्यांचे वंशजांचा येथें उल्लेख करण्याचें प्रयोजन नाहीं."

## वे. रा. रा. पुरुषोत्तम श्रीधरपन्त कावळे पैठणकर ह्यांस व त्यांचे अनुयायी ब्राह्मणांस उत्तरकोंकणांत उपाध्यायपणाची वृत्ति मिळण्याचें कारण.

४६. राजाबिम्बानें शके १२२१ प्रवसंवत्सरीं, वैशाख वद्य अमावास्येच्या दिवशीं सूर्यग्रहणपर्वणीस उत्तरकोंकणांतील चवदा महालांची वृत्ति सदर्हू पुरुषोत्तम पन्त कावळ्यास दान दिली. ही वृत्ति गोविन्द मिटकरी गोळक ह्याची होती. तो निवर्तल्यावर त्याची बायको चाङ्गुणाबाई हिनें तिचे नवऱ्याचें सरदेसाई, सरदेशपाण्डेपणाचें वतन आणि अष्टाधिकारांसह वृत्ति चोवीस हजार होन घेऊन आत्मसन्तोषें राजाबिम्बास विकत दिली. नन्तर बिम्बानें एकवर्ष

तीन महिने त्या वतनाचा उपभोग घेऊन, त्याचे राजगुरु पुरुषोत्तमपन्तकावळे ह्यांस तें सर्व वतन वंशपरम्परेनें दान दिलें. हें दान अव्याहत चालावें ह्मणून बिम्बानें पुरुषोत्तमपन्तास दानपत्रिका करून दिली, व तत्सम्बन्धीं गांवोंगांवीं शिलाशासनें करवून ठेविलीं. (परिशिष्ट 'अ' पृष्ठ १ पहा.) १—बिम्बाचा तीर्थरूप रामदेव ह्याबरोबर अल्लाउद्दीनानें जी लढाई मारली, तींत पुरुषोत्तमपन्त होते; २—बिम्बानें उत्तरकोंकणांत लढाया करून हा देश जिंकिला, त्या सर्वांत पुरुषोत्तमपन्त होते; ३—ह्या प्रान्तीं उच्चवर्णाचे ब्राह्मण नसल्याकारणानें बिम्बाबरोबर आलेले सूर्यवंशी व सोमवंशी, त्यांचे सुहृत्सम्बन्धी आणि इतर कामदार ह्यांजकडील उपाध्येपण चालविण्यास हरकत पडूं नये; ४—पुरुषोत्तमपन्त व त्यांचे अनुयायी ब्राह्मण हे मूलस्थलीं होते, तेव्हांपासून वरील सूर्यवंशादि मण्डळीचे उपाध्याय होतेच, तेव्हां अर्थात् ह्या प्रान्तीं देखील ते उपाध्याय व हे यजमान असणें यथान्याय आहे; ५—वर एकाठिकाणीं विदित केल्याप्रमाणें, गोवर्धन, सामवेदी आणि किरवन्त ह्यांवांचून ह्या प्रान्तांत वृति चालविण्यास दुसरे कोणी नव्हते, तथापि बिम्बाबरोबर आलेल्या क्षत्रियमण्डळीस असल्या लोकांचा सहवास नसल्याकारणानें, त्यांजकडून आपल्याकडील धर्मसम्बन्धीं कार्यें उरकून घेण्याचें त्यांस श्रेयस्कर वाटत नसे; इत्यादि कारणांवरून पुरुषोत्तमपन्तास इकडील वृत्ति मिळणें साहजिक व यथाशास्त्र आहे.

४७. बिम्बाश्रयानें येथें आलेल्या ब्राह्मणांसहि वरील मिळालेल्या वृत्तींपैकीं कित्येक भाग पुरुषोत्तमपन्तांनीं दिले. ह्या ब्राह्मणांनीं यजमानांस अडचण पडूं नये ह्मणून, गांवोगांवीं आपापले सुहृत्सम्बन्धी गुमास्ते ठेवून सदर्हू वृत्ति अव्याहत चालविली. ती हल्लींहि चालू आहे.

## राजगुरु पुरुषोत्तमपन्त कावळे पैठणकर ह्यांचें वर्णन.

४८. पुरुषोत्तमपन्त कावळे हे मूळचे पैठण येथील राहणारे असून, त्यांचे तीर्थरूप श्रीधरपन्त, पितामह रघुनाथपन्त होते. हे देशस्थ शुक्लयजुर्वेदीब्राह्मण असून ह्यांची कुलस्वामीण

यमाई (मातापूरनिवासिनी). ह्यांचें गोत्र भारद्वाज आणि प्रवर तीन. ह्यांचें घराणें पैठणांत सम्भावितांपैकीं असून ते तिकडील एक महाजन होते. ह्या कावळ्यांचा वाडा दुर्गाडींत* असे. हे कावळे विद्वान् घराण्यांतील असल्याकारणानें ते पिढीजाद राजगुरु असत. ह्यांचे मातुल पैठणाकडील वत्सगोत्री कावळे होत. एवञ्च पुरुषोत्तमपन्त वरील वृत्ति दान घेण्यास पात्र असलेच पाहिजेत, हें सांगणें नको. आतां हे जसे विद्वान्, तसे योद्धेहि होते, असें परिशिष्ट 'ऋ' पृष्ठ ४१ वरून स्पष्ट दिसतें. जसे हे दोन्ही गुण पुरुषोत्तमपन्तांत वसत होते, तसाच परोपकार हा गुण त्यांच्यांत विशेष वास करीत होता. कारण कीं, त्यांजबरोबर गङ्गथडींतील आलेले स्वशाखीय-ब्राह्मण ह्यांस त्यांनीं वृत्तिवन्त करून त्यांच्या उपजीविकेची व्यवस्था सुरळीत करून दिली. ह्या व्यवस्थेचें चिरकालिक सुख व उपभोग ह्या ब्राह्मणांचे वंशज अद्यापि घेत असून अनुभवीत आहेत. गङ्थडींतून जो कोणी अनाथ स्वशाखीयब्राह्मण येई, त्यास पुरषोत्तमपन्त ह्या प्रान्तीं ठेवून घेत, व त्याच्या उदरनिर्वाहार्थ तजवीजहि करीत. सारांश, "सत्पात्रे दीयते दानम्" आणि "परोपकारार्थमिदं शरीरम्" असाच परस्पर न्याय होत गेला. असें ऐकण्यांत आहे कीं, पुरुषोत्तमपन्त आपल्या वयाच्या ६३ वे वर्षी परलोकवासी झाले. ह्यांचे पुत्र नायकराव हेहि सज्जन असून मुसलमानीराज्यांत चांगले वजनदार असत. त्यांचे दुसरेहि कित्येक वंशज आबा कावळे आणि भास्करराव कावळे इत्यादि वैभवशाली पुरुष होऊन गेले. अखेरीस अन्ताजी रघुनाथ कावळे पेशवाईत मोठे मुत्सद्दी व पराक्रमी झाले. पेशव्यांस ह्या प्रान्तांतील राज्य मिळवून देण्यास ते बहुतांशीं कारणीभूत झाले, हें ह्या पुस्तकांतील परिशिष्टांत दिलेल्या पेशव्यांच्या कित्येक पत्रांवरून वाचकांच्या लक्षांत सहज येईल. अन्ताजीपन्त हे आहिताग्नि चातुर्मास्ययाजी होते. स्वधर्मरक्षण व्हावें एतदर्थ, पुण्यास

* हें स्थान आम्हीं प्रत्यक्ष नुकतेंच पाहून आलों.

थोरले बाजीराव पेशवे ह्यांजकडेस जाऊन त्यांस पोर्तुगीजलोकांनीं महाराष्ट्रधर्मी लोकांवर जो जुलूम करण्यास आरम्भ केला होता, त्याचें त्यांनीं सविस्तर निरूपण केलें. तेणेंकरून पेशव्यांस इतकी ईर्षा उत्पन्न झाली कीं, शके १६६१ ह्या वर्षीं वसई वगैरे सर्व उत्तरकोंकण पेशव्यांनीं पोर्तुगीजांपासून जिंकून घेतलें. शके १६६३ दुर्मतिनामसंवत्सरे पौष शुद्ध ९ स अन्ताजीपन्त कैलासवासी झाले. ह्यांस कांहीं सन्तान नव्हतें. अन्ताजीपन्ताचे बन्धु जीवन कावळे, ह्यांचे प्रपौत्र हल्लीं वे० शा० सं० बाबा*, सखाराम, आणि गोपिनाथ भाऊ कावळे, हे विद्यमान असून त्यांची सज्जनांत गणना आहे. तसेच पुरुषोत्तम रघुनाथ, रामचन्द्र बळवन्त, व वासुदेव हरिश्चन्द्र कावळे हे ह्यांचेच वंशज विद्यमान आहेत.

४९. संवत् १४३१ ( शके १२९६ इ. सन १३७५ ) भाद्रपद शुद्ध ९ ह्या दिवशीं मोरवेकर गाङ्भट्ट कृष्णम्भट पिङ्ळे ऊर्फ त्रिवेदी ह्यांजकडून एक हजार लोहरी† घेऊन उत्तरकोंकणांतील कित्येक सामवेद्यांकडील अष्टाधिकारांसह वृत्ति दावूवंझा‡, माळवझा, कानवझा, पोसवझा, वामवझा ह्यांनीं त्यांस विकत दिली. तेव्हांपासून सामवेदी हे वाजसनेय ब्राह्मणांचे यजमान झाले. ही वृत्ति आजतागाईत ह्या ब्राह्मणांकडेस चालत आहे. पुढें सवडीप्रमाणें बाकी राहिलेले सामवेदी आणि किरिवन्त§ ह्यांचीहि वृत्ति ह्या वाजसनेयांस प्राप्त झाली. (परिशिष्ट 'ग' पृष्ठ ८९ पहा.) ह्याप्रमाणें बालापारडीपासून तहत् अष्टागरापर्यंन्त वृत्तीचा उपभोग हे वाजसनेय घेत आहेत.

५०. शके १६५५ व तदनन्तर धरमपूर येथील राण्यानें वे. रा. रा. माधवजी विठ्ठल, विठ्ठल आणि मुकुन्द केशव, उपाध्ये मटकर ह्यांस त्या प्रान्तांतील उपाध्यायपणाची वृत्ति वंशपरम्परेनें चालविण्याचा

---

* ह्या पुस्तकांत परिशिष्टांत दिलेले मोंगलाई दस्तऐवज ह्यांजकडेस आहेत.

† ह्या नाण्याची काय किंमत होती हें समजत नाहीं.

‡ ह्या वृत्तीचें विक्रीखत फारच लाम्ब असून त्याची भाषा फार जुनाट व अबद्ध असल्यामुळें तें येथें दाखल केलें नाहीं.

§ किरवन्त आपणांस क्रमवन्त असें ह्मणवितात.

अधिकार दिला. ही वृत्ति त्यांचे वंशज आजपर्यन्त चालवीत आहेत. (परिशिष्ट 'आ', 'इ', 'ई' व 'उ' पृष्ठ १४।२० पहा.)

## बिम्बापासून प्रत्येक राज्यक्रान्तींत उत्तरकोंकणांतील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांच्या दैनन्दिनचर्येचें संक्षिप्त वर्णन.

९१. राजाबिम्बानें उत्तर कोकणांत स्थापित केलेलें राज्य जितका कालपर्यन्त चाललें, तितक्या कालांत वरील ब्राह्मणांस सर्वदा सुख व सम्पत्ति हीं अनुकूल होत गेलीं. जे अधिकार व ज्या वृत्त्या त्यांस मिळत गेल्या, त्या सर्वांचा त्यांनीं व त्यांचे वंशजांनीं यथान्याय उपभोग घेतला; तसेंच जो जो वाजसनेयब्राह्मण गङ्गथडीहून ह्या कोंकणांत येत गेला, त्याचा त्याचा आदरसत्कार येथील वाजसनेयांकडून यथास्थित होत गेला. कदाचित् कोणी गरीब स्थितींत असल्यास, त्यास येथें राहविण्याचें प्रोत्साहनहि ह्या वाजसनेयांकडून मिळत गेलें. ह्यामुळें बिम्बानन्तर देखील हळू हळू हे वाजसनेयब्राह्मण येथें येऊन स्थायिक होऊं लागले. सारांश, त्या समयीं येथें ह्या ब्राह्मणांची बरीच उन्नति होऊन, त्यांनीं आपले दिवस सुखानें घालविले.

## मुसलमानांच्या राज्यक्रान्तींत उत्तरकोंकणांतील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांच्या दैनन्दिनचर्येचें संक्षिप्त वर्णन.

९२. मालाड येथील पिच्छोडीचा दावा.—इ० स० १४१६ ह्या वर्षी वे० रा० रा० नाईकराव कावळे पैठणकर ह्यांनीं बेदर येथील बादशहा अल्लाउद्दीन गाजी ह्याजकडेस असें गाऱ्हाणें केलें कीं, साष्टीप्रान्तांतील पिच्छोडीचा हक्क आमचा वंशपरम्परेचा असून देव देसला ठाकूर हा, तो हक्क बळकावूं पाहतो; सबब आमचा हक्क आह्मांस देण्याविषयीं हुकूम व्हावा. बादशहानें ह्या खटल्याची चौकशी करून नाईकरावाच्या तर्फे निवाडा केला. (परिशिष्ट 'ऊ' पृष्ठ २१।२९ पहा.)

९३. केळवें-माहीम येथील परभांकडील अग्रपूजेचा दावा—इ. स. १४९९ ह्या वर्षी वे. रा. रा. मुरारभट्ट गङ्गाधरभट्ट आणि

कानभट्ट दादजोशी धर्माधिकारी व ग्रामोपाध्ये कसबे केळवें-माहीम येथील राहणार ह्यांनीं दवण येथील नवाब चान्दखान ह्याजकडेस अशी फिर्याद केली कीं, परभूलोकांकडील उपाध्याय-पण आमचें असतां, त्र्यम्बक नारायण आश्वलायन चक्रवर्तीकर हा परभांकडील मुञ्जीचे कार्यांत मेखलापूजनाचा आमचा पूर्वापार चालत आलेला हक्क बळकावूं पाहतो; सबब आमचा हक्क आह्मांस देववावा. ह्या खटल्याची चौकशी नवाबानें करून वादींच्या तर्फे निवाडा केला. ( परिशिष्ट 'ऋ' पृष्ठ ३९।४८ पहा.

९४. मुसलमानीराज्यांत आणखीहि बरेच निवाडे उत्तरकोंक-णांतील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांचे तर्फेनें झाले आहेत, परन्तु स्थलस-ङ्कोचामुळें ते येथें नमूद करितां आले नाहींत. सारांश, यवनीसत्ता ह्या प्रान्तीं प्रबल झाली होती, तथापि ह्या वाजसनेयब्राह्मणांस कोणत्याहि प्रकारें त्यांच्या वृत्तिसम्बन्धानें अडथळे आले नाहींत, तेणेंकरून मुस-लमानी राज्यांतहि त्यांनीं सुखानें दिवस काढिले हें सांगणें नको.

## पोर्तुगीजांच्या राज्यक्रान्तींत उत्तरकोंकणांतलि वाजसनेय-ब्राह्मणांच्या दैनन्दिनचर्येचें संक्षिप्त वर्णन.

९५. इ० स० १९७८ ह्या वर्षीं वे० रा० रा० नारायण आचार्य ह्यांस हरबा जोशी गिरनाळा ब्राह्मण ह्यानें आत्मसन्तोषें, जिल्हा ठाणें, तालुके केळवें-माहीम, परगणे मनोर येथील आपली अर्धी वृत्ति दिली. ( परिशिष्ट 'ऌ २' पृष्ठ ३८७।३८८ पहा.) ही वृत्ति हल्लीं त्यांचे वंशजांकडेस चालत आहे.

९६. इ० स० १७३४ ह्या वर्षीं वे. रा. रा. अन्ताजी रघुनाथ-पन्त कावळे पैठणकर ह्यांजवर पोर्तुगीजसरकारची इतराजी झाल्या-कारणानें, त्यांचें वंशपरम्परेचें सरदेसाई आणि सरदेशपाण्डेपणाचें वतन त्यांनीं हिरावून घेतलें होतें, तें त्यांस परत मिळण्याविषयीं पेशव्यांनीं इंग्लिशसरकारास एक पत्र लिहिलें आहे; परन्तु ह्या पत्राचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं. (परिशिष्ट 'ऋ' पृष्ठ ४८।९१ पहा. )

५७. इ० स० १७४३ ह्या वर्षी वे० रा० रा० गौतम नाईक वैद्य सांत्रखेडकर ह्यांस मुम्बई येथील वे० रा० रा० हरनाईक छत्रे ह्यांनीं आपल्या वृत्तीचा सहावा हिस्सा विकत दिला. त्याविषयींचा पोर्तुगीजसरकारांत बहाल झालेला दस्तऐवज आहे. (परिशिष्ट 'ऌ' पृष्ठ ५१।५४ पहा.)

५८. सारांश, पोर्तुगीजराज्याच्या अमदानींत गोंवें वगैरे ठिकाणचे शेणवीब्राह्मण ह्या प्रान्तीं आले, तेणेंकरून त्यांजकडील उपाध्याय व ज्योतिषपणाची वृत्ति इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांस मिळाली आणि त्या राज्यांत ह्मणण्यासारखे वृत्तीसम्बन्धीं खटले इकडील प्राचीनवाजसनेयब्राह्मणांविरुद्ध उपस्थित झाले नाहींत. तेव्हां हे वाजसनेय ह्या राज्यांत सुखानें राहत होते असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

५९. ह्याप्रमाणें आणखीहि मुम्बई व मुम्बई-माहीम येथील प्राचीन वाजसनेयब्राह्मण वृत्त्यंशी ह्यांजकडेस बहुत पोर्तुगीजदस्तऐवज आहेत, परन्तु हल्लीं त्या लेखांची भाषा उमगणारे क्वचित् असल्याकारणानें व स्थलसङ्कोचामुळेंहि ते आह्मीं येथें दाखल केले नाहींत.

## पेशव्यांचे* राज्यांत उत्तरकोंकणांतील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांचे दैनन्दिनचर्येचें वर्णन.

६०. ज्या वेळीं पोर्तुगीजांनीं महाराष्ट्रलोकांवर धर्मान्तर करविण्याचा जुलूम माण्डिला, त्या कालीं अन्ताजी† रघुनाथपन्त व त्यांचे बन्धु रामचन्द्रपन्त कावळे ह्यांनीं पुण्यास जाऊन बाळाजी बल्लाळ पेश-

---

* वसई वगैरे प्रान्त घेण्यास पेशव्यांनीं जी मूळपासून खटपट केली, त्यावेळेपासून तों पेशवाईचे अखेर पर्यन्तचें हें वर्णन आहे. ह्मणून खालीं दिलेल्या कित्येक प्रकरणांत वसईप्रान्त घेण्याचे अगोदरचे शक आढळतील ह्यांत नवल नाहीं.

† ह्याप्रान्तीं मूळवृत्ति सम्पादनकरणारे पुरुषोत्तमपन्त कावळे पैठणकर ह्यांचे प्रपौत्राचे पौत्र अन्ताजी रघुनाथपन्त होत. गङ्गाजी नाईक, बुवाजी नाईक वगैरे सोळंखी यजमान, ह्या अन्ताजीपन्ताचे होते व वसई वगैरे घेण्यास ह्यांनीं देखील पेशव्यांस बरीच मदत केली, असें वर एका ठिकाणीं सांगितलेंच आहे. 'काव्येतिहास—संग्रह ७, साष्टीची बखर' ह्मणून एक पुस्तक इ. सन १८८२ सालीं छापिलें आहे' त्यांत ह्या अन्ताजीपन्ताचा उल्लेख आढळतो. (पृष्ठ ६, ९ आणि १०. पहा.)

त्यांस सर्व वृत्तान्त निवेदन केला. पुढें पेशव्यांचें राज्य येथें झाल्यावर, अन्ताजीपन्तास व त्याचे शाखेचे ब्राह्मण आणि सर्व महाराष्ट्रधर्मी-लोक--(जे त्यांचे यजमान) ह्यांस जो अत्यानन्द झाला, तो येथें वर्णन करवत नाहीं. परन्तु, शेवटीं ह्याच राज्यांत त्या अत्यानन्द मानणाऱ्या लोकांचे उद्गार कसे विपरीत निघत गेले हें सर्वांस माहीत आहे.

६१. पोर्तुगीजांपासून वसई वगैरे प्रान्त घेवविण्यास, अन्ताजीरघुनाथपन्त कावळे ह्यांनीं जें साह्य केलें होतें, त्याजबद्दल पेशव्यांनीं त्यास सरदेसाई व सरदेशपाण्डेपणाचें वतन पूर्वापार चालत आल्याप्रमाणें अव्याहत चालावें ह्मणून सनदा करून दिल्या. (परिशिष्ट 'लृ' पृष्ठ ५५ आणि 'ए' पृष्ठ ६०।६६ पहा.) परन्तु, पेशव्यांकडील सनदा पाहण्यास तो मुळींच राहिला नाहीं. त्या पोंहोचण्यापूर्वींच तो निवर्तला होता. ह्या अन्ताजीपन्ताचा व पेशव्यांचा पत्रव्यवहार परिशिष्ट 'लृ' पृष्ट ५५।७० पहा. तसेंच त्यांस व त्यांच्या बन्धूसहि पेशव्यांकडील कांहीं पत्रें* आहेत.

---

* अखण्डित लक्ष्मीअलङ्कृत राजमान्यराजश्री रामचन्द्र रघुनाथ देसाई व देशपाण्डे वसई वगैरे प्रान्त फिरङ्गाण गोंसावी यांसीः --

सेवक बाजीराव बल्लाळ प्रधान. नमस्कार. सुा सलासीन मया व अल्लफ (शके १६२१) तुह्मीं जिवाजी गोविन्द या समागमें पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन साविस्तर वर्तमान कळलें. त्यास आमचेंहि चित्तीं हाच हेत आहे, कीं कार्य करावें. अशा निमित्तें राजश्री अन्ताजीपन्तास जें सांगणें तें सांगितलें आहे. तुम्हीं आपली खात्रीनिशा करून कार्य साधणें. तुमचें ऊर्जित करून येथून राजश्री बापूजी मेघःश्याम व दत्ताजी तुर्क पाठविले आहेत, त्यांची निशा सर्व गोष्टींची करणें. जाणिजे चन्द्र १९ रज्जब. बहुतकाय लिहिणें ?

* अखण्डित लक्ष्मीअलङ्कृत रा० रा० अन्ताजी रघुनाथ गोंसावी यांसीः--सेवक बाजीराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुा खमस सलासीन मया व अल्लफ. (शके १६५६) तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. कार्याचा मजकूर व सेनासमुदाय पाहिजे याचा अर्थ विस्तारें लिहिला तो कळला. व कित्येक अर्थ राजश्री केशव लिङ्गोजी यांणीं विदित केला. ऐशियास कार्य करावें हें अत्यावश्यकच आहे. जागां जागां जमाव उत्तम आहे. तो मोकळा करून आणावयास पौर्णिमेची सन्धी अनुकूल पडत नाहीं; याजकरितां जमाव जमाकरून अमावास्येस कार्यभाग निश्चयरूप करावाच. जमाव व फौज तयार करीत असून तुह्मीं लागभाग, वाटा-लिटा, हवेलागे, दोरेसारे, राजश्री वासुदेव जोशी यांचे निदर्शनास आणून देणें. अतःपर कार्य कर्तव्यच. दुसरा विचार नाहीं. जाणिजे छ ९ रमजान, आज्ञाप्रमाण.

हीं दोन्हीं अस्सल पत्रें मोडी लिपींत असून तीं चिन्तामण बाळम्भट जावळे पळशीकर हल्लीं वस्ती दादर (मुम्बई माहीम) यांजपाशीं आहेत. व ह्या दोन्ही पत्रांवर लेखनसीमेचा मोर्तब आहे.

६२. श्रीवज्राईस नेमणूक.—इ० स० १७३० ह्या वर्षी वे० रा० रा० विष्णुभट्ट पुरोहित, राहणार येडवन, ह्यांनीं तिकडील श्रीवज्राईची पूजा करावी सबब तिच्या नैवेद्यास व सदहू विष्णुभट्टजीचे बेगमीस पेशव्यांनीं धर्मार्थ शेतें दिलीं आहेत. (परिशिष्ट 'ज', 'झ', पृष्ठ ११६।११७ पहा.) ह्या देवीची पूजा आजपावेतों ह्यांच्या वंशजांकडे चालत आहे.

६३. येडवन येथील वृत्तीविषयीं.—इ० स० १७३३ ह्या वर्षी वे० रा० रा० विष्णुभट्ट पुरोहित ह्यांची येडवन येथील जोशी व उपाध्येपणाची वृत्ति पूर्वापारप्रमाणें सुदामत चालूं द्यावी, ह्याविषयीं पेशवाईंतून आज्ञा झाली आहे. (परिशिष्ट 'ऐ' पृष्ठ ६९।७० पहा.) ही वृत्ति आजपर्यंत सदहू विष्णुभट्ट ह्यांच्या वंशजांकडेस चालू आहे.

६४. कोहरें येथील वृत्तीविषयीं.—इ० स० १७३७ ह्या वर्षी वे० रा० रा० विठ्ठल जोशी पुरन्दरे ह्यांनीं पेशव्यांस अर्ज केला कीं, मौजे कोहरें येथील आमच्या जोशी व उपाध्येपणाच्या वृत्तीची हिस्सेरशीनें वांटणी करून देववावी. त्याप्रमाणें वृत्तीच्या चार तक्षीमा करून दिल्या. (परिशिष्ट 'ञ' पृष्ठ ११८।११९ पहा.) ही वृत्ति सदहू विठ्ठल जोशांचे वंशजांकडे अद्यापि चालत आहे.

६५. अग्निहोत्राचा खटला.—इ० स० १७४२ ह्या वर्षी वे० रा० रा० तुकम्भट्ट धर्मभट्ट अग्निहोत्री जावळे पळशीकर, मुक्काम वसई, ह्यांनीं पुणें मुक्कामीं पेशव्यांकडेस अशी फिर्याद केली कीं, प्रतिवादी गोविन्द भट्ट जोगळेकर, महादाजीपन्त फडनीस वगैरे वसई येथील कोंकणस्थ ह्यांनीं आमच्या श्रौताग्निकुण्डांचा विनाकारण उच्छेद केला; सबब त्याची चौकशी होऊन आमचें श्रौत पूर्ववत् स्थापन करण्याची आज्ञा व्हावी.

६६. त्यावर प्रतिवादीनें असें प्रतिपादन केलें कीं, ह्यांस श्रौताग्निसाधन करण्याचा अधिकार नाहीं.

६७. श्रौताग्नि साधनकरण्यास आपणास अधिकार आहे, ह्याविषयींचे सम्मतिपत्र आपण श्रीक्षेत्र नासिक व त्र्यम्बक येथील ब्राह्मणांचें

आणावें, असें पेशव्यांकडून कळून आल्यावर, वादीनें तसें सम्मतिपत्र पेशव्यांकडेस हजर केलें (परिशिष्ट 'ओ' पृष्ठ ७०|७८ पहा.) ह्या सम्मतिपत्रावर चित्पावन व कऱ्हाडे ह्यांच्याहि स्वदस्तूर सह्या आहेत. पुढें ह्या संमतिपत्रान्वयें तुकम्भट्टांनीं पुनः आपलें अग्निहोत्र चालू केलें.

६८. ठाणें येथील वृत्ति.—इ० स० १७४८ ह्यावर्षी वे० रा० रा० रामभट्ट व नागेशभट्ट क्षीरसागर उपाध्ये ह्यांस ठाणें येथील जोशी व उपाध्येपणाची वृत्ति पुरातनकालापासून चालत आल्याप्रमाणें त्यांनींच चालवावी अशी पेशव्यांनीं आज्ञा केली. (परिशिष्ट 'औ' पृष्ठ ७८|७९ पहा.) ही वृत्ति वरील क्षीरसागरांच्या वंशजांकडेस अद्यापि चालत आहे.

६९. साष्टी प्रान्तांतील वृत्तीविषयीं.—इ०स०१७४८ ह्या वर्षी पेशव्यांनीं अभयपत्रान्वयें अशी आज्ञा केली कीं, वसई, बेलापूर वगैरे ठिकाणीं इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांची वगैरे जोशी व उपाध्येपणाची वृत्ति जशी पूर्वापार चालत आली आहे, त्याप्रमाणेंच साष्टी येथील वृत्त्यंशांची वृत्ति अव्याहत चालूं देणें. (परिशिष्ट 'अं' पृष्ठ ८०|८५ पहा.) ह्याप्रमाणें आज तागाईत ही वृत्ति चालत आहे खरी, तथापि चित्पावन, कऱ्हाडे वगैरे लोकांनीं ह्या कामांत अडथळे घालण्याची सुरुवात ठेविलीच आहे.

७०. मालाड येथील वृत्तीविषयीं.—इ०स० १७४८ ह्या वर्षी वे. रा. रा. गोविन्द नाईक व जीवन नाइक कावळे ह्यांची मालाड येथील जोशी व उपाध्येपणाची वृत्ति पुरातन जाणून ती त्यांनींच अव्याहत चालवावी, एतद्विषयीं पेशव्यांनीं त्यांस अभयपत्र दिलें आहे. (परिशिष्ट 'ख' पृष्ठ ८८|८९ पहा.) ही वृत्ति आज तागाईत त्यांचे वंशजांकडे चालत आहे.

७१. कोहरें येथील वृत्तीविषयीं.—इ०स०१७५४ ह्या वर्षी वे० रा० रा० किङ्कर पण्डित ह्यास दादजोशी ह्यानें दत्तक घेतल्यावरून कोहरें येथील जोशी व उपाध्येपणाची निम्मे वृत्ति किङ्कर पण्डि-

तानेंच अव्याहत चालवावी, ह्मणून त्यास पेशव्यांनीं आज्ञा दिली आहे. (परिशिष्ट 'अः' पृष्ठ ८५।८७ पहा.) ही वृत्ति आजपर्यंन्त त्यांच्या वंशजांकडे चालत आहे.

७२. श्रीहनुमन्ताची स्थापनाः—इ० स० १७६४ ह्यावर्षी वे० रा० रा० जीवन नाईक व राम नाईक कावळे मालाड येथील जोशी व उपाध्ये ह्यांनींच तेथें, त्यांच्या यजमानिणीनें नूतन बान्धलेल्या देवालयाची प्रासादप्रतिष्ठा करावी, इतर ब्राह्मणांनीं करूं नये, ह्मणून पेशव्यांनीं ताकीद दिली आहे. (परिशिष्ट 'क' पृष्ठ ८७।८८ पहा. ) त्याप्रमाणें ही प्रतिष्ठा ह्याच ब्राह्मणांनीं केली. सदहू जीवन नाईक व रामनाईक कावळे हे (४०साव्या पृष्ठांत दर्शित केलेल्या ) अन्ताजीपन्ताचे बन्धु होते.

७३. अग्निहोत्राचा दुसरा खटला.—इ० सन १७६९ ह्या वर्षी अनन्तजोशी ( उपनांव भास्कर ) आहिताग्निचातुर्मास्ययाजी, वसई येथील राहणार, ह्यांजकडेस कोणीएक कोंकणस्थ नारायण-जोशी बोरगांवकर राहावयास जागा मागत होता, परन्तु स्थलसङ्कोचामुळें त्याचें बोलणें अग्निहोत्रीबुवांनीं कबूल केलें नाहीं; ह्मणून बोरगांवकरांनीं दाण्डगाई करून बुवांचे घरांत शिरून त्यांची हौत्राग्निकुण्डें विच्छिन्न केलीं; सबब भाऊसाहेब पेशवे ह्यांजकडेस अनन्त-जोशी अग्निहोत्री फिर्याद गेले, त्यावरून त्यांस पेशव्यांनीं पुनः हौत्रस्थापन करण्याची आज्ञा दिली. (परिशिष्ट 'ट' पृष्ठ १२८व१४३ पहा.)

७४. सामवेद्यांस अभयपत्र.—इ० स. १७७७ ह्या वर्षी सामवेदीब्राह्मणांस पेशव्यांनीं अभयपत्र दिलें आहे, त्यांत त्यांनीं कसें आचरण ठेवावें व त्यांजकडील उपाध्यायवृत्ति इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांनीं कोणत्या वेदमन्त्रेंकरून चालवावी एतद्विषयीं निरूपण केलें आहे. (परिशिष्ट 'घ' पृष्ठ ९८।९९ पहा.)

७५. राघोबादादांचें मुम्बईस वास्तव्य.—इ० स०१७९७ ह्या सुमारास राघोबा ऊर्फ रघुनाथ दादा पेशवे (शेवटले बाजीरावाचे तीर्थरूप) हे कांहीं दिवस मुम्बईस रहात होते, त्या वेळीं ते इकडील

प्राचीन वाजसनेयब्राह्मणांची विधियुक्त पूजा करून त्यांस दक्षिणा देत व त्यांचा वेदोक्त आशीर्वाद घेत. (परिशिष्ट 'ट' पृष्ठ १५२।१५४पहा.)

७६. केळवें येथील इनामसनद.—इ० सन १७१७ ह्या वर्षी केळवें येथील वे. रा. रा. केशव रणछोड पुरन्दरे ह्यांनीं भिल्लोकांचें बण्ड मोडण्यास मदत केल्यावरून त्यांस पेशव्यांनीं सरदार केलें आणि रोटें गांव वंशपरम्परेनें इनाम दिलें. (परिशिष्ट 'ङ' पृष्ठ १००।१०४ पहा.) हें गांव त्यांचे वंशजांकडेस अद्यापि चालू आहे.

७७. सोपारें येथील वृत्ति.—इ. स. १८१० ह्या वर्षी वे. रा. रा. धोण्डु अर्जुन पण्डित, राहणार केळवें—माहीम, ह्यानें वसईप्रान्ताचे सुभेदार परशुराम खण्डेराव ह्यास अर्ज केला कीं, मौजे सोपारें, तालुका आगाशी येथील आमची वडिलोपार्जित ज्योतिष व उपाध्ये-पणाची वृत्ति आह्मांकडेस चालविण्याचा बन्दोबस्त व्हावा. ह्यावरून चौकशी होऊन पेशवाईतून ती वृत्ति धोण्डु अर्जुनानेंच वंशपरम्परेनें चालवावी ह्मणून हुकूम झाला. (परिशिष्ट 'च' पृष्ठ १०४।११५ पहा.) सदर्हू पण्डितास आणखी माहीम येथील कांहीं वृत्ति सदर्हू-प्रमाणें चालविण्याचा हुकूम झाला. (परिशिष्ट 'छ' पृष्ठ ११५।११६ पहा.)

७८. पेशव्यांचें वैतरणासङ्गमीं स्नान-इ. स. १८०३ च्या सुमारास शेवटले बाजीराव पेशवे वैतरणासङ्गमीं स्नानास गेले, त्या वेळीं त्यांनीं तिकडील पुरन्दरे ह्या उपनांवाचे वृद्धंशी ह्यांजकडून स्नानसङ्कल्प श्रवण केला व त्यांसच स्नानवस्त्रें दिलीं. हल्लीं तीं वस्त्रें त्या ब्राह्मणांच्या वंशजांकडेस आहेत.

७९. शिरगांव येथील श्रीसिद्धेश्वराचे लिङ्गोत्पाटणाचा खटलाः—इ. स. १८०८।१८०९ ह्या वर्षी वे. रा. रा. गम्बाजी नाईक जावळे, गोविन्द जोशी पळशीकरवगैरे ब्राह्मणांनीं पुणें येथें पेशव्यांच्या दरबारीं जाऊन अशी फिर्याद केली कीं, त्यांचा आप्त वे. रा. रा. यादव नाईक ह्याची सून रमाबाई हिनें इ० स० १८०० शेंच्या सुमारास शिरगांव येथें श्रीसिद्धेश्वरदेवाची

लिङ्गस्थापना पञ्चायतनसुद्धां केली असून त्या देवाची पूजाअर्चा वादीच्या जातीचे ब्राह्मण व कोंकणस्थ निर्द्वेषानें करीत असतां, इ. स. १८०८ च्या सुमारास वसई येथील कोंकणस्थ* भाऊभट्ट जोगळेकर, बाबाजीभट्ट फडके, कृष्णराव दिवाकर वगैरे एकुणीस इसम शिरगांवास वैशाख वद्य एकादशीच्या दिवशीं पहांटेस येऊन वरील सिद्धेश्वराचें पञ्चायतनसुद्धां लिङ्गोत्पाटण केलें. सबब ह्याची चौकशी होऊन लिङ्गोत्पाटण करणारांस त्यांच्या अन्यायानुरूप शिक्षा होऊन, आमच्या देवाची पुनः स्थापना करण्याची आह्मांस आज्ञा व्हावी. ह्या खटल्याची चौकशी सुमारें ७।८ वर्षेपर्यन्त चालून, शेवटीं वादीस सदर्हू सिद्धेश्वराची स्थापना करण्याविषयीं पेशव्यांनीं अभयपत्र दिलें. (परिशिष्ट 'ण' पृष्ठ १७३।१७६ पहा.) त्याप्रमाणें ती स्थापना वादींनींच केली. न्यायदृष्टीनें पाहिलें असतां लिङ्गोत्पाटण करणारे इसमांस ह्या महागुन्ह्याबद्दल कांहीं तरी शिक्षा होणें रास्त होतें, तथापि गुन्हेगार सर्व कोंकणस्थ असल्याकारणानें त्यांस मुळींच शिक्षा करण्यांत आली नाहीं; (विशेष, परिशिष्टांतील १६८ पृष्ठावरील टीप पहा.) परन्तु, कोंकणस्थादि लोकांनीं असलीं अधर्मी कृत्यें पुनः न करण्याविषयीं त्यांस ताकीद मात्र दिली आहे. दुसरें हे पळशेब्राह्मण यजुर्वेदी आहेत आणि राजाबिम्बापासून आजतागाईत त्यांचे कागदपत्र पहातां, हे यजुर्वेदी ब्राह्मण खरे आहेत असें ठरलें; ह्मणून, ह्यांचें उपाध्यिक कोंकणस्थांनीं देतआल्याप्रमाणें दिलेंच पाहिजे; अशी विशेष ताकीद त्यांस दिली. (परिशिष्ट 'ढ' पृष्ठ१७०।१७२ पहा.) हा सम्पूर्ण खटला पाहिला ह्मणजे वाचकांची पूर्ण खातरी होईल कीं, ह्या प्राचीन वाजसनेयांचा उपमर्द करून कोंकणस्थांचें इतरांस उच्चत्व दिसावें, ह्याच इराद्यानें हा सर्व खटला उपस्थित केला

---

* हे गृहस्थ कोंकणस्थ ह्मणवीत असतांहि त्यांनीं ह्या सिद्धेश्वराचें उत्पाटन पहारांनीं खणून करावें काय ? असला जर स्थापितदेवावर अनर्थ! तर मग ह्यांनीं काय न करावयाचें होतें ?

होता खरा, तत्रापि त्याच लोकांतील कित्येक विचारी गृहस्थांनीं व इतर ब्राह्मणादि सर्व वर्णांच्या लोकांनीं ह्या वाजसनेयांच्या तर्फे पुरशिसा दिल्या आहेत. त्या सर्वांनीं वाचण्याजोग्या आहेत. (परिशिष्टें 'ट,' 'ठ,' 'ड,' 'ढ' आणि 'ण' पृष्ठ १२०।१७६ पहा.)

८०. पेशवाई झाल्यापासून पुढें बरींच वर्षेंपर्यन्त श्रीनिर्मलेश्वर येथील अन्नसत्र इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांकडेसच चालू होतें. (परिशिष्ट 'थ' पृष्ठ १७८ व 'द' पृष्ठ १७९ पहा.) ह्या सत्राचें काम इंग्रजीराज्यांत देखील इ. स. १८२२ सालपर्यन्त वे. बापुमहादेव भट्ट जोशी पुरन्दरे ह्यांजकडेस होतें. पुढें तें त्यांनीं स्वसन्तोषें सोडून दिलें. ह्या सत्राविषयीं विशेष माहिती वसई येथील मामलतदाराचे दप्तरांत दाखल आहे.

८१. शिरगांव येथील श्रीसिद्धेश्वराचे खटल्यांत दाखल केलेल्या श्रीच्या प्रतिष्ठेच्या यादी व परिशिष्ट 'ळ' पृष्ठ २१९-२२४ ह्यांतील जबान्या, तद्वत् तदनन्तर झालेल्या प्रतिष्ठेच्या कांहीं यादी, ह्यांजवरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल कीं, इकडील प्राचीन वाजसनेय-ब्राह्मण आणि गुर्जर, तैलङ्ग, चित्पावन, कऱ्हाडे वगैरे अन्यशाखीय-ब्राह्मण ह्यांनीं एकत्र बसून प्रतिष्ठेचीं वगैरे अनुष्ठानें केलीं. (परिशिष्ट 'ऊ २' पृष्ठ ३६५।३७६ पहा.) हाच क्रम हल्लीं देखील चालू असतांहि केवळ दुराग्रहानें कित्येक चित्पावन व त्यांचे अनुयायी ह्या वाजसनेयांचा द्वेष विनाकारण करितात, तेव्हां त्यांस काय ह्मणावें ?

८२. जीं पत्रें ह्या ब्राह्मणांस लिहिण्यांत आलीं, त्यांत ब्राह्मणवर्णास योग्य जीं पदाक्षरें (वेदमूर्ति इत्यादि) तींच पेशवे व त्यांचे ज्ञातीचे लोक लिहित गेले, हें वाचकांस परिशिष्टांत दिलेल्या पेशव्यांच्या पत्रांवरून समजेल. आणि हा क्रम हल्लींहि त्या लोकांकडून चालू आहे.

८३. **श्रीनिर्मलेश्वराची प्रासादप्रतिष्ठा.**—वसई घेतल्यानन्तर पेशव्यांनीं शङ्कराजी केशव प्रभुवने, ह्यास तेथें सुभेदार नेमिलें, त्यानें श्रीनिर्मळेश्वराचें देवालय शके १६६३ चे सुमारास बान्धिलें. ह्या देवालयाची प्रासादप्रतिष्ठा करितेसमयीं कोंकणस्थ व इकडील

प्राचीन वाजसनेयब्राह्मण एकत्र बसून प्रतिष्ठा झाली. अशा समयीं तुमची व आमची एक पङ्क्ति व्हावी; असा कोंकणस्थांनीं विचार केला, परन्तु ती गोष्ट ह्या वाजसनेयांनीं कबूल केली नाहीं असें ह्मणतात. कारण कीं, हा वेळपर्यन्त गङ्गथडीवगैरेकडील त्यांच्या मूलस्थ स्वशाखीयबान्धवांचा आणि कोंकणस्थांचा पङ्क्ति-व्यवहार सुरू झाला नव्हता. तेणेंकरून अर्थातच ह्या वाजसनेयांस त्यांच्या मूलदेशीयब्राह्मणांच्या कृतीस अनुसरून वागणें भाग पडलें. तेव्हांपासून इकडील वाजसनेयब्राह्मणांस शनीची दशा बसली असें समजलें पाहिजे!!! कारण कीं, ह्यांजवर पुढें जो कित्येक अनुचितकर्मांचा वर्षाव कित्येक दुरभिमानी कोंकणस्थांकडून होत गेला, तो पुढें वर्णिलाच आहे.

## पेशव्यांचें राज्य झाल्यापासून उत्तरकोंकणांतील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांची स्थिति व एतद्विषयीं सारासारविचार.

८४. वरील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें उत्तरकोंकणांत पेशवाई झाल्यावर, पुढें पेशव्यांची सत्ता सम्पूर्ण महाराष्ट्र देशावरहि पसरत गेली, तेणेंकरून पेशव्यांच्या ज्ञातींतील कित्येक लोक अभिमानी झाल्या-कारणानें त्यांच्यापासून इतर जातींच्या सर्व लोकांस वेळोवेळीं (पेशवाईच्या अखेरपर्यन्त) अनेक त्रास पोंहचूं लागले. वाचकांस हेंहि ठाऊक असेल कीं, पेशवे हे चित्पावन* जातीचे ब्राह्मण होते खरे, तथापि कऱ्हाडे खेरीजकरून दुसऱ्या देशस्थ जातींच्या ब्राह्मणांबरोबर चित्पावनांचा पङ्क्तिव्यवहार होत नव्हता इत्यादि प्रकार मागील प्रक-रणांत विदित केलाच आहे. सर्व ब्राह्मणांबरोबर आपला पङ्क्तिव्यवहार सुरू होऊन त्या सर्वांत आपणांस मान्यता मिळावी व आपलें मूळचें गौणत्व† नष्ट व्हावें ह्मणून ते खटपट करूं लागले.

---

* चित्पावन हे आपणांस कोंकणस्थ ह्मणवितात. परन्तु ह्यांखेरीज ज्या दुसरे ब्राह्मणांस श्रीपरशुरामानें कोंकणांत उत्पन्न केलें त्यांनीं देखील कोंकणस्थ कां म्हणवून घेऊं नये ? हें कळत नाहीं.

† *Bombay Gazetteer*, Poona, page 101.—Under the rise of Balaji

८५. पेशवाई झाल्यावर चित्पावन व कऱ्हाडे ह्या उत्तरकोंकणांत येऊन इकडील वाजसनेयांचे नवीन यजमान झाले; तथापि, त्यांच्या यजमानवृत्तीपासून ह्या वाजसनेयांस ह्मणण्यासारिखा लाभ झाला नाहीं, कारण कीं, त्यांच्यांतील कित्येक कोंकणस्थ(ह्या वाजसनेयांपेक्षां) आपणांस विशेष मान्यता मिळावी ह्मणून, होईल तितका त्यांचा उपमर्द करण्यास प्रयत्न करूं लागले.

---

Wishwanath Peshwa who belonged to their class, the Chitpawans held a low position, and were known chiefly as spies or harkarus. Even after several generations of power and wealth, with strict attention to Brahmin rules the purer classes of Brahmins refuse to eat with them, and it is said that when Bajirao, the last Peshwa, (1796-1818), was at Nasik, he was not allowed to go down to the water by the same flight of steps as the priests. भावार्थः—मुम्बईगझेटीअर-पुणें-पृष्ठ १०१—बाळाजी विश्वनाथ पेशवा ह्याच्या भरभराटीपूर्वी चित्पावनलोक हलक्या प्रतीचे होते व 'हरकारे' किंवा 'गुप्तघातमंदिर' ह्या धन्द्यावरून त्यांस लोक ओळखीत. ते बहुत पिढ्यांपर्यंत अधिकारावर असून सम्पत्तिवान् असतां व ब्राह्मणधर्माचे नियम मोठ्या काळजीनें पाळीत असतांहि, त्यांच्याबरोबर उंचप्रतीचे ब्राह्मण जेवण्यास नाकारितात. असें म्हणतात कीं, शेवटला बाजीराव पेशवा (१७९६-१८१८) नासिकास होता तेव्हां ज्या पायऱ्यांवरून नासिक येथील ब्राह्मण गङ्गेस जात, त्यांवरून त्यास जाऊं दिलें नाहीं.—*Bombay Gazetteer*, Poona, page 101, foot-note—Hamilton's Description of Hindustan, II., 197 ; Grant Duff's Marathas, I., 8; Wilk's (History of the South of India, I., 157-158); says that when he wrote (about 1880) the Brahmins of the other parts of India denied that the Konkanasthas were Brahmins. In their predatory incursions the Konkanasthas are said to have greedily sought for copies of the Saihyadri Khand, and destroyd them. Grant Duff's (Marathas, I., 8), mentions that a few years before the Peshwa's overthrow a respectable Brahmin of Wayin, in Satara, was degraded, because he had a copy of the Saihyadri Khand. भावार्थः—बाम्बेगझेटीअर-पुणें-पृष्ठ १०१ वरील टीप १—हामिल्टनकृत हिन्दुस्थानाचें वर्णन २-१९७; ग्राण्टडफकृत मराठ्यांचा इतिहास १-८; विल्क्स (दक्षिणहिंदुस्थानाचा इतिहास १-१५७।१५८) साहेब म्हणतो कीं, हिन्दुस्थानांतील (कोंकण खेरीज करून) दुसरे भागांवरील लोक कोंकणस्थांस ब्राह्मण म्हणत नाहींत. ते लुटालूट करीत भटकत असतां, त्यांनीं मोठ्या अधाशीपणानें सह्याद्रिखण्डाच्या प्रती मिळवून त्यांचा त्यांनीं नाश करून टाकिला. ग्राण्टडफ (मराठा १-८) ह्मणतो कीं, पेशव्यांचें राज्य लयास जाण्याचे कांहीं दिवस पूर्वी सातारें येथील वांई क्षेत्रांतील एका सम्भावित ब्राह्मणाजवळ सह्याद्रिखण्डाची एक प्रत मिळाल्यावरून त्यांजकडून त्याचा छळ करण्यांत आला.

८६. अग्निहोत्रकुण्डविच्छिन्नाचा व शिरगांव येथील श्रीसिद्धेश्वराचे लिङ्गोत्पाटणाचा खटला कसा उत्पन्न झाला, हें वाचकांस कळविणें अतिमहत्त्वाचें आहे. उत्तरकोंकणांत पेशवाई झाली खरी; तथापि, इकडील वाजसनेयब्राह्मणांनीं कोंकणस्थांबरोबर पङ्क्तिव्यवहार करण्याचें नाकारल्याकारणानें हे खटले उपस्थित झाले. दुसरें, श्रीनिर्मलेश्वराच्या प्रासादप्रतिष्ठेंत देखील, कोंकणस्थ आग्रह करीत असतांहि, ह्या वाजसनेयांनीं त्यांजबरोबर पङ्क्तिव्यवहार केला नाहीं.

८७. तसेंच, इकडील प्राचीन वाजसनेयांचा कोंकणस्थांबरोबर भोजन न करण्याचा दुराग्रह वेळोवेळीं दृष्टीस पडूं लागल्याकारणानें, त्यांचा समूळ नाश करावा व तेणेंकरून त्यांच्या वृत्तिहि हरण व्हाव्या, ह्मणून कित्येक कोंकणस्थांनीं हरतऱ्हेचे उपाय योजिले; शिरगांव येथील श्रीसिद्धेश्वराच्या लिङ्गोत्पाटणाचा खटला त्यांपैकींच एक होय. पहा:—

"वेदशास्त्र सम्पन्न राजश्री बाळशास्त्री दीक्षित बावा स्वामीचे सेवेसीं'
'विद्यार्थी नारोराम गाडगीळ कृतानेक साष्टांगनमस्कार. विज्ञापना'
'तागाईत पौष शुद्ध ११ पावेतों स्वामीचे आशीर्वादेंकरून क्षेम असों.'
'विशेष—श्रीमन्त राजश्री गणपतराव जिवाजी यांचे कारकीर्दींत'
'राजश्री बाळाजी भगवन्त कारभारी वसईस होते, त्यांणीं देवस्थापनेविसी'
'(विषयीं) आधाटी घेतली; तेसमयीं येथें शिरगांवांत देवालय आहे तें'
'कोण्हीं स्थापिलें आहे अशी चौकशी करविली, तेव्हां फिरंगी'
'राज्यांत वे० रा० महादेव भट्ट दाते केळवेकर व वृत्त्यंशी पळशीकर'
'मिळोन केली अशी सड समजली. नन्तर सुभेदार यांणीं आह्मांस'
'आज्ञा केली कीं, **काहीं आह्मांस लभ्यांश होय असा हिसका मा-'**
**'रून ठेवावा, ह्मणजे** सरकारआज्ञा पुसोन देवस्थापना करतील. त्याज-'
'वरून चिटणीस यांचे घरीं आम्हीं जाऊन आज्ञेप्रमाणें देवस्थापना'
'करणें ती चित्पावन ब्राम्हण करितील, पळशे वगैरे करूं लागल्यास'
'मनाई करणें, म्हणोन सनद घेतली; तेव्हां आमची तसलमात चिट-'
'णीसाचे कीर्दीस लागली. पुढें सुभेदाराजवळ सनद आम्हीं दिली.'
'मग मोर्तब व गणराज जाहला किंवा नाहीं, तें आम्हांस ठावकें नाहीं.'

'प्रगणे माहीमचे कमावीसदार राजश्री सोमाजी रघुनाथ लवाटे'
'वसईस होते, त्यांस आह्मीं सदहू आज्ञेप्रमाणें सांगोन देवस्थापनेस'
'हिसका मारून ठेविला, वृत्यंशीब्राह्मणपळशीकर यांणीं सनद'
'घेतली नाहीं. सनदेची हकीगत आमचे हातोन जाहली होती, ती'
'सत्योत्तरें स्वामींस लिहिली आहे. कळावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.'
'हस्ताक्षर खुद्द गाडगीळ." (ह्या पत्राची नकल आमच्या एका मित्रानें आह्मांस दिली.)

८८. गङ्गथडी वगैरे ठिकाणचे वाजसनेयांस कोंकणस्थांनीं इकडील कन्यापरिणयाचें वर्तमान सांगितल्यावरून, ते लोक इतके खवळले कीं, उत्तरकोंकणांतील एखादा वाजसनेय त्यांजकडेस गेल्यास, त्यांनीं त्यास स्पष्ट सांगावें कीं, तुह्मीं शाखाउच्छेद करण्यास प्रवृत्त झाल्याकारणानें "तुमच्याशीं सम्बन्ध ठेवण्यास आह्मीं खुषी नाहीं." कारण कीं, श्रीयाज्ञवल्क्यस्मृतींत असल्या ब्राह्मणांस "शाखारण्ड" ही संज्ञा दिली आहे. त्यावरून इकडील वाजसनेयांनीं आपल्या मूलदेशीयबान्धवांस खरी माहिती कळविली कीं, केवळ एका मनुष्यानें हें कर्म केलें आहे, आणि त्याबद्दल तो बहिष्कृतहि आहे. हें वर्तमान ऐकल्यावरून कांहीं कालानें ते स्वस्थ राहिले.

८९. तुकम्भट्ट धर्मभट्ट पळशीकर ह्यांच्या अग्निहोत्राचा विच्छेद व तदनन्तर शाखासङ्कर करण्याचा क्रम कोंकणस्थांनीं सुरू केला, त्या वेळेपासून कोंकणस्थांबरोबर पङ्क्तिव्यवहार न करण्याचा कृतसङ्कल्प जो इकडील वाजसनेयांनीं केला, तो पेशवाई अखेरपर्यन्त देखील चालला; कारण कीं, पेशव्यांनीं शिरगांव येथील सिद्धेश्वराच्या पुनःस्थापनेविषयींचा खटला पण्डितांकडेस मनसुबीसाठीं पाठविला, तत्सम्बन्धीं पण्डितांनीं आपली सम्मति दिली ती अशी:—

'त्यांचे (इकडील वाजसनेयब्राह्मणांचे) कागदपत्र व'
'सडसाक्ष भोगवटा तिहीं क्रमेंकरून शिष्टमतें विचार करितां'
'पळशे (इकडील वाजसनेयब्राह्मण) ब्राह्मण यांचा व'
'वसईकर ब्राह्मण (कोंकणस्थ) यांचा पङ्क्तिव्यवहार मात्र नाहीं;'

'परन्तु कार्यप्रयोजनांत गन्धाक्षता, विडादक्षिणा व परस्पर-'
'नमस्कार करणें याप्रमाणें इतर ब्राह्मणांची वहिवाट चालत'
'आहे. व पळशेब्राह्मण यजुर्वेदान्तर्गत वाजसनेय शाखाध्ययनें-'
'करून श्रौतस्मार्तकर्मानुष्टानें त्यांचे शाखेवरून करीत आहेत.'
इत्यादि. (परिशिष्ट 'ड' पृष्ठ १६६।१६८ पहा.)

१०. वरील अग्निहोत्र विच्छेदाचा खटला कोंकणस्थांनीं उपस्थित करण्याचें कारण हेंच असावें कीं, इकडील वाजसनेयब्राह्मण त्यांजबरोबर पङ्क्तिव्यवहार करण्यास कुरकुर करूं लागले; कारण कीं, हा काल (१७६) पर्यन्त कोंकणस्थांचा व इतर देशस्थ ब्राह्मणांचा पङ्क्ति-व्यवहार मुळींच होत नसे. ह्याजविषयीं 'लोकहितवादीकृत' ऐतिहासिक गोष्टी भाग १ पृष्ठ ४३ यांत उल्लेख केला आहे तो असा:—

"पूर्वी घांटावरील देशस्थब्राह्मण, चित्पावनब्राह्मणांचे पङ्क्तीस'
'जेवावयास बसत नसत, पण ज्या वेळेस श्रीनिवास परशुराम'
'पण्डित प्रतिनिधी यांचे मुलाची कऱ्हाडाजवळ कोळेगावांस'
'मुंज झाली, त्यावेळेस बाळाजी विश्वनाथ यांस पेशवे पद प्राप्त'
'झालें होतें. त्यांणीं प्रतिनिधीची व आपली मैत्री जाणून सर्व'
'ब्राह्मणांकडून एक पङ्क्त* करविली. आणि तेव्हांपासूनच'
'कोंकणस्थ व देशस्थ पङ्क्तिव्यवहारांत एक झाले."

* कित्येकांचे ऐकण्यांत असें आहे कीं, ही पङ्क्त एक होण्यापूर्वी कोंकणस्थांचा व तैलङ्गब्राह्मणांचा पङ्क्तिव्यवहार नुकताच चालू झाला होता; आणि तो चालू करण्यास हम्पी येथील **जोगय्या नेमाने वारु**, व विरूपाक्ष येथील **सुभाभट्ट** ह्या दोन तैलङ्गब्राह्मणांस, कोंकणस्थांनीं हातीं धरून ते व हे एकत्र बसून भोजन करूं लागले. तेव्हांपासून पुण्यांत एखाद्या कोंकणस्थाकडेस हव्यकव्य झालें असतां, तैलङ्गब्राह्मणांस कोंकणस्थांपेक्षा दुप्पट दक्षिणा देण्याचा प्रघात पडला. ह्याप्रमाणें त्यांस दुप्पट दक्षिणा न मिळाल्यास तैलङ्गब्राह्मण ती त्यांपासून भाण्डून घेतात. कित्येक असेंहि सांगतात कीं, तैलङ्ग दूर देशचे असल्याकारणानें, त्यांस दुप्पट दक्षिणा देण्यांत येते; पण ही गोष्ट सयुक्तिक दिसत नाहीं. असें असतें तर, खुद्द पुण्यांत व दुसरे ठिकाणींहि ह्या तैलङ्गांस इतर ब्राह्मणांकडेसहि दुप्पट दक्षिणा देण्याचा साम्प्रदाय पहाण्यांत आला असता; पण कोंकणस्थांव्यतिरिक्त हा दुप्पट दक्षिणा देण्याचा साम्प्रदाय कोठें पाहण्यांत किंवा ऐकण्यांत येत नाहीं.

९१. 'गोमान्तक, मलबार, इत्यादि स्थलीं चित्पावनादिकांना ब्राह्मण शब्द कोणी लावीत नाहींत; त्यांस केवळ गुरवाप्रमाणें मानितात. मलबारप्रान्तीं, कोची, मञ्जेश्वर इत्यादि स्थलीं सारस्वतांच्या देवळांमध्यें चित्पावनादिकांला मुळींच येऊं देत नाहींत. (मग त्यांतील देवांस त्यांजपासून विटाळ कसा तरी व्हावा ?)

९२. तेथें कित्येक स्थलीं तर सारस्वतब्राह्मण चित्पावनाला विहिरीसहि शिवूं देत नाहींत. (सरस्वति मण्डल पृष्ठ १८४।१८५.)

९३. धारवाड जिल्ह्याच्या गॅझेटीअरवरून असें समजण्यांत येतें कीं, तिकडील मध्वसाम्प्रदायाचे दक्षणीब्राह्मण चित्पावनांस मुळींच पंक्तीस घेत नाहींत, किंवा चित्पावनांचे हातचें जेवीत नाहींत. (*Bombay Gazetteer*, Dharwar).

९४. चित्पावनांची सद्यः देखील स्थिति ह्याचप्रमाणें असतांहि ते ह्या वाजसनेयांस गौणत्व आणण्यासाठीं, ह्यांचा व इतर माद्य ब्राह्मणांचा पंक्तिव्यवहार असतांहि, "तो नाहीं" असें जगतास दाखविण्याचा आव घालितात, तेव्हां असल्या लोकांस काय ह्मणावें ? पंक्तिव्यवहार नाहीं ह्मटल्यानें ब्राह्मण होत नाहीं असें नाहीं.

९५. तेव्हां, वे० शा० सं० रा० रा० तुकम्भट्ट धर्मभट्ट पळशीकर अग्निहोत्री प्रभृति इकडील यजुःशाखीय मण्डळीनें असा विचार केला कीं, आपले गङ्गातीरस्थ मूलदेशीयवाजसनेयब्राह्मण ह्यांचा व कोंकणस्थांचा पङ्क्तिव्यवहार चालू नसल्याकारणानें, आपण कोंकणस्थांबरोबर पङ्क्तिव्यवहार कसा चालू करावा ? ह्याजवरून सदहू अग्निहोत्रीबुवांच्या मण्डळीनें कोणाची भीड न धरितां, असा सङ्कल्प केला कीं, आपण किंवा आपल्या स्वशाखीय ब्राह्मणांनीं कोंकणस्थांबरोबर संसर्ग देखील ठेऊं नये. तेव्हां अन्नव्यवहार कोठून होणार ? हा सङ्कल्प सिद्धीस जाऊं देऊं नये, एतदर्थ कित्येक कोंकणस्थांनीं इकडील प्राचीन वाजसनेयांचा व त्यांचे मूलदेशस्थबान्धवांचा, तसाच देशस्थ ऋग्वेद्यांचा सतत पङ्क्तिव्यवहार चालू असावा, ह्मणून जातिसङ्कर करण्याच्या पापास न भितां, एखादा परकीय जातीचा

गरीब दक्षणीब्राह्मण पाहून, त्यास द्रव्याचा लोभ दाखवून, त्याच्या मुलीचें लग्न एकाद्या कोंकणस्थाबरोबर लावून द्यावें, किंवा एखाद्या कोंकणस्थाच्या मुलीचें लग्न एखाद्या परज्ञातीय दक्षणीब्राह्मणाबरोबर लावून द्यावें, ह्मणजे, पङ्क्तिव्यवहार चालू राहण्यास कधीं अडचण पडणार नाहीं, असा कित्येक कोंकणस्थांनीं क्रम चालविला. ह्या कृत्यास खुद्द पेशव्यांनीं देखील पुढें सरसावून स्वतःची लग्नें करून घेतलीं. ह्याजविषयीं लोकहितवादीकृत पुस्तकांतील खालील गोष्ट पहाः—

ऐतिहासिक गोष्टी. पुणें-चित्रशाळा छा० छा० एप्रिल सन १८८४. गोष्ट ६९. "बाळाजी बाजीराव पेशवे ऊर्फ नाना साहेब यांस' 'चार जातींच्या ब्राह्मणांच्या बायका होत्या. एक चित्पावन रास्ते' 'यांची कन्या गोपिकाबाई, जी पुढें नासिकास राहिल्यामुळें प्रसिद्ध' 'आहे ती. दुसरी कन्हाड्याची मुलगी. तिसरी पैठण येथील वाखरे' 'ह्मणून देशस्थाची मुलगी. चवथी क्रमवन्तब्राह्मणाची मुलगी."

९६. ह्या उत्तरकोंकणांतहि तोच प्रकार घडला. असें ऐकण्यांत आहे कीं कोणी एकनाथ नामक शेवन्तकर ह्या उपनांवाचा वाजसनेयब्राह्मण ठाणें येथील राहणार, ह्यास कोंकणस्थांनीं हातीं धरून वरील प्रकारचें लग्न ( तिकडील एका यजुर्वेद्याच्या मुलीचें ) कोंकणस्थाबरोबर लावून दिलें खरें; तथापि हा क्रम फार दिवस चालला नाहीं. कारण कीं, इकडील वाजसनेयब्राह्मणांनीं साताऱ्यास जाऊन छत्रपति महाराजांपर्यन्त कोंकणस्थांविरुद्ध गाऱ्हाणें* केलें; तेणेंकरून कोंकणस्थ स्वस्थ बसले. ह्या गाऱ्हाण्यांत चित्पावनांची उत्पत्ती श्रीपरशुरामानें कशी केली इत्यादि सह्याद्रिखण्डाच्या आधारानें मार्मिक शब्दांनीं उल्लेख केलेला आहे असें सांगतात. वरील प्रकारची लग्नें इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांबरोबर कोंकणस्थांनीं लाविल्यापैकीं हल्लीं आह्मांस एकाचा सुगावा† लागला आहे, तो वाचकांसाठीं टिपेंत दिला आहे.

* पण्ढरपुराजवळ करकम गांवीं हें प्रकरण साद्यन्त आहे, असें कित्येकांचे ऐकण्यांत आहे. खालीं दिलेलें पत्र वे. रा. रा. ब्रह्मदेव त्र्यम्बककर ह्यांजपाशीं आहे.

† वे. रा. रा. ब्रम्हदेव काका देवकुटे त्र्यम्बककर हल्लीं वस्ती मुम्बई यांस—वासुदेव धोण्डु थिगळे मुकाम मुम्बई यांचा साष्टांग नमस्कार. विनन्ती विशेषः—लिहावयास

१७. वरील उपनांवांपैकीं शेवन्तकर ह्यासच केवळ अपंक्त ठेविलें असें नाहीं; तर, जे कोणी कोंकणस्थांचे शरीरसम्बन्धी झाले त्या सर्वांस इकडील प्राचीन वाजसनेयांनीं आपणांतून काढून टाकिलें. पुढें कोंकणस्थांनीं असा दुराग्रह धरिला कीं, तुमच्यांतील ज्यांचा आमच्याबरोबर शरीरसम्बन्ध झाला आहे, त्यांस तुह्मीं पंक्तिपावन करावें; परन्तु, हें त्यांचे बोलणें ह्या वाजसनेयांनीं नाकबूल केलें; कारण कीं, ह्यापुढें शाखासङ्कर होऊं नये.

---

कारण कीं, माझे वंशजांची व त्यांच्या मूळ ठिकाणाची माहिती मला असलेली व माझ्या ऐकिवांत आलेली आपणांस कळवितों, तिजबद्दल चौकशी करून खरें व खोटें काय तें मला लिहून कळवावें. व तें कळविल्यानें मला किमपि राग न येतां, आपला आभारी होईन. आमचें उपनांव थिगळे. मूळठिकाण मुङ्गी-पैठण किंवा त्याच्या असमंतात वीस पंचवीस कोसांचे अन्तरानें बीडः— साधारण माहितीवरुन सुमारें दीडशें वर्षे जाहलीं असावीं, त्या सुमारास गोविन्द थिगळे या नांवाचा पुरुष मुङ्गीपैठण येथील राहणारा असोन ठाण्यास मोठ्या तलावाजवळ येऊन राहिला. हा माझा पणजा असोन, त्याचा बाप रङ्गनाथ हे दोघे मिळून उदरनिर्वाहार्थ कीर्तनें करीत असत. तेथें त्यांस त्यांचे आप्त व स्नेही भेटत असत, असेंहि ऐकिवांत आलें आहे. व वरील गोविन्द थिगळे परागन्दा जाहले असावे असेंहि ऐकतों. पुढें त्यांहीं ठाणें सोडून वसईस वास्तव्य केलें. नन्तर वासुदेव आमचा आजा अष्टागरांत जाऊन राहिला. तेथें त्याणें अष्टागरांतील एका कोंकणस्थब्राम्हणाचे मुलीबरोबर लग्न केलें. याप्रमाणें आतां आम्हीं अष्टागरांतच थळ मुक्कामीं स्थायिक होऊन राहिलों व तेणेंकरुन कोंकणस्थांचे व आमचे शरीरसम्बन्ध होऊं लागले. आमचे मूळपुरुष मुङ्गी-पैठणाहून ह्या प्रान्तांत आले ते व त्यांचीं आजमितीपर्यन्तचीं वंशावळी खालीं लिहिल्याप्रमाणेंः—

रङ्गनाथ.
|
गोविन्द.
|
वासुदेव. (ह्यांचें लग्न अष्टागरकर ह्यांच्या मुलीशीं जाहलें.)
|
महादेव–धोण्डू–गोपाळ.
|
वासुदेव–गोविन्द.

ह्याप्रमाणें वंशावळी असून, आम्हीं ऋग्वेदी किंवा यजुर्वेदी आहों याची माहिती करून दिल्यास मीं आपला महत् आभारी होईन व याविषयीं आपणावर कांहीं एक जोखीम पडणार नाहीं. माहिती कशीहि मिळो. ती माझे शिरावर आहे......हे विनन्ति. मुक्काम मुम्बई, मार्गशीर्ष शुद्ध ३ बुधवार ता० १२ दिसेंबर सन १८८३ इसवी.

शेवटीं असा परिणाम झाला कीं 'थिगळे, औटी, शेवन्तकर' वगैरे (ज्यांनीं कोंकणस्थांबरोबर शरीरसम्बन्ध केला होता ते) जे ह्या वाजसनेयांपासून वेगळे राहिले ते अद्यापि तसेच आहेत. सारांश ते धड ना ऋग्वेदी, धड ना यजुर्वेदी असे झाले.

९८. आतां, वर दर्शित केल्याप्रमाणें कोंकणस्थांचें बोलणें ह्या वाजसनेयांनीं नाकबूल केल्याकारणानें पुढें त्यांचे बरेंच अनहित होत गेलें. उदाहरणार्थः—

प्रथम.—कोंकणस्थ राजसत्ताधीश असल्यामुळें, त्यांस ह्या वाजसनेयांविषयीं जितकें उणें मिळेल, तितकें खोळण्याचा त्यांनीं प्रयत्न केला व सद्यःदेखील करीत आहेत.

द्वितीय.—हे वाजसनेय निष्कलङ्क असतांहि त्यांस पळशीकर प्रभृति ह्मणण्याचा प्रचार कागदोपत्रीं घातला.

तृतीय.—कांहीं दिवस पळशीकर आणि नन्तर पेशवाईचे अखेरीस पळशीकर किंवा पळशेब्राह्मण असेंहि लिहित गेले. कित्येक कोंकणस्थ तर ह्यांस पळशीब्राह्मण ह्मणूं लागले. असा ज्ञातिवाचक विलक्षण शब्दांचा उपयोग करण्यांत कोंकणस्थांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं.

चतुर्थ.—अशा विलक्षण ज्ञातिवाचक शब्दांचा अर्थहि विपरीत करून दाखविण्यास, कित्येक चित्पावनांनीं कमी केलें असें नाहीं व सद्यःहि तोच प्रकार चालू आहे.

पञ्चम.—शिरगांव येथील सिद्धेश्वराच्या खटल्यांत यज्ञेश्वर मराठे नामक एका चित्पावनानें जी जबानी दिली आहे, तींत पळशे ह्मणून आमच्या देशीं एक ज्ञाति आहे, असा तर्कटी लेख लिहून दिला; परन्तु, पेशव्यांनीं त्यांस शिक्षा देखील केली नाहीं.

षष्टम.—वरील खटल्यांत पेशव्यांस जें पण्डितांनीं संमत्तिपत्र दिलें आहे, तें देतेवेळेस त्यांनीं पुष्कळ ग्रन्थ धुण्डिले; परन्तु, 'पळशे' ही एक ज्ञात आहे असें त्यांस कोठेंहि आढळलें नाहीं. तेव्हां ह्या पळशीकरांबरोबर अन्य ब्राह्मणांचा पंक्तिव्यवहार नाहीं ह्मटलें हेंहि अगखी एक त्यांनीं तर्कट केलें.

सप्तम.—वरील यजुर्वेद्यांचीं क्षुद्रें धुण्डित असतांहि, तीं चित्पावनांपैकीं शास्त्री, पण्डित वगैरे मण्डळीस सांपडलीं नाहींत, तेव्हां ह्यांस 'पळशीकर प्रभृति' ह्मणण्याचा प्रघात त्यांनीं सुरू केला.

अष्टम.—ह्या यजुर्वेद्यांस कोणत्याहि प्रकारें गौणत्व आणावें व आपला स्वार्थ साधावा हाच उपक्रम कित्येक कोंकणस्थ करीत गेले.

नवम.—ह्याप्रमाणें कित्येक चित्पावन ह्या वाजसनेयांस सर्वतोपरि त्रास देत असतांहि, ह्यांनीं आह्मीं 'पळशीकर' किंवा 'पळशे' किंवा 'पळशी' ब्राह्मण असें सरकारदरबारीं किंवा कोठेंहि लिहून दिलें नाहीं. व अजूनहि तसें लिहून देत नाहींत.

दशम.—वरप्रमाणें जुलूम चालत असतां तिगस्तसालीं सरकारानें खानेसुमारी केली त्यावेळीं वसई व केळवें–माहीम येथील सरकारीअधिकाऱ्यांनीं ह्या वाजसनेयांस तुह्मीं 'पळशेब्राह्मण' आहां, असें लिहून देण्याविषयीं ताकीद केली. तेव्हां ह्यांनीं ठाण्याचे कलेक्टरास अर्ज करून ह्या जुलमाची सर्व बिना कळविली. व त्याच्या समर्थनास आमचें 'विनन्तिपत्र' शके १८०१ चें दाखविलें. त्यावरून सदहू कलेक्टरानें 'तुह्मीं ज्या जातीचे ब्राह्मण असाल ती लिहून द्या, ह्मणून फर्माविलें. त्यावरून ह्या वाजसनेयांनीं आह्मीं 'देशस्थ शुक्लयजुर्वेदीब्राह्मण' असें स्पष्ट लिहून दिलें.

एकादश.—आपला हेतु सिद्धीस नेण्याकरितां कित्येक कोंकणस्थांनीं गङ्गातटस्थ वाजसनेयांस असें दर्शित केलें कीं, उत्तरकोंकणांतील तुमचे स्वशाखीय ब्राह्मण आपल्याकडेस पङ्क्तिव्यवहार करितात, इतकेंच नव्हे; तर त्यांनीं आमच्या ज्ञातींत शरीरसम्बन्ध देखील केले. तेव्हां तुह्मीं आह्मांबरोबर पङ्क्तिव्यवहार कां करूं नये? सारांश, अशा उलट समजुतीनें त्या कोंकणस्थांनीं इकडील वाजसनेयांचा व त्यांचे गङ्गातीरस्थ बान्धवांचा विरोधमात्र पाडला.

९९. कोंकणस्थांबरोबर किंवा त्यांचे संसर्गानें राहणारे यजुर्वेदी स्वशाखीय ह्यांजबरोबर पङ्क्तिव्यवहार न करण्याचा जो कृतसङ्कल्प इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांनीं वरील अग्निहोत्री तुकम्भट्ट धर्म-

भट्ट ह्यांचे वेळेपासून केला होता, तो सिद्धीस नेण्याकरितां पुढेंहि त्यांच्या वंशजांनीं तदनुसार व्यवस्था ठेविली. उदाहरणार्थ :— श्रीमन्त पन्त प्रतिनिधी (हे शुक्लयजुर्वेदी होते) कृष्णातिरीं विहाळी येथें जाऊन त्यांनीं उत्तराङ्गपूर्वक तीर्थविधि केला, त्या वेळेस त्यांस तीर्थविधि आणि श्राद्धसङ्कल्पादि प्रयोग इकडील पळशीकर जावळे ह्या उपनांवाचे दोन प्राचीन वाजसनेयांनींच सांगितला. तथापि ते (पळशीकर), श्रीन्मत पन्त प्रतिनिधी ह्यांचे पङ्क्तीस भोजनास बसले नाहींत; अथवा त्यांजकडील शिजलेलें अन्न देखील त्यांनीं ग्रहण केलें नाहीं. स्वतः स्वयंपाक सिद्ध करून ते जेविले. (परिशिष्ट 'ट' पृष्ठ १६३।१६४ पहा.)

१००. शाहुमहाराजांकडेस इकडील वाजसनेयांचीं गाऱ्हाणीं गेलीं, त्या वेळेपासून पांच-पन्नास वर्षेपर्यन्त कोंकणस्थांकडून तादृश ह्मणण्यासारखा ह्या वाजसनेयब्राह्मणांस त्रास पोंचला नाहीं. अखेरपर्यन्त पेशव्यांकडून ह्या वाजसनेयांस न्यायच मिळत गेला; परन्तु कोंकणस्थांतील कित्येक भट्टभिक्षुकांनीं ह्या वाजसनेयांची पाठ अद्यापि सोडली नाहीं. तथापि पेशव्यांचें राज्य उत्तरकोंकणांत झाल्यावर चित्पावन, कऱ्हाडे वगैरे ह्या वाजसनेयांचे यजमान झाले, ही मात्र एक विशेष महत्त्वाची गोष्ट झाली. सर्व महाराष्ट्रवर्णांकडील उपाध्याय व ज्योतिषपणाची वृत्ति इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांनींच अव्याहत चालवावी, ह्मणून ह्या ब्राह्मणांस वेळोवेळीं पेशव्यांनीं अभयपत्रें करून दिलीं तीं परिशिष्टांत दाखल केलींच आहेत. तशांत, कोंकणस्थादि सर्व महाराष्ट्रधर्मानुयायीलोकांकडील वृत्तीचा उपभोग आजतागाईत हे वाजसनेय घेत असतांहि, कित्येक चित्पावन व त्यांचे अनुयायी हे, ह्या वाजसनेयांस त्रास दिल्यावांचून राहत नाहींत. व "ग्रन्थान्तरींचा आशय पहातां तेथेंहि पळशे ज्ञाति भिन्न आहे असें लागत नाहीं." (परिशिष्ट 'ण' पृष्ठ १७४ पहा.) ह्या पेशव्यांच्या अभयपत्रांतील वाक्यांकडेहि ते लक्ष देत नाहींत, हें फार शोचनीय होय.

१०१. वरील लेखांवरून असें स्पष्ट होतें कीं, ज्यांस पळशे-ब्राह्मण ह्मणण्याचा प्रघात ह्याच राज्यांत पाडला, ते वाजसनेयब्राह्मण खरे आहेत; परन्तु, कोंकणस्थांबरोबर ते पङ्क्तिव्यवहार मात्र करीत नाहींत. दुसरें असेंहि सिद्ध होतें कीं, वाजसनेयादि ग्राह्यब्राह्मणां-बरोबर त्यांचा (पळशीकरांचा) पङ्क्तिव्यवहार होतच आहे, ह्मणून त्याजविषयीं वरील पण्डितांनीं उल्लेख केला नाहीं, हें रास्तच केलें. ह्या वरील सम्मतीच्या सन्दर्भावरून इकडील वाजसनेयब्राह्मणांचा कोंकणस्थांव्यतिरिक्त इतर ग्राह्यब्राह्मणांबरोबर पङ्क्तिव्यवहार होत नव्हता, किंवा होत नाहीं, असें ह्मणणारे केवळ बालिश आहेत असें समजलें पाहिजे. (परिशिष्टांतील १६७।१६८ पृष्ठांवरील टीप पहा.) सारांश, ह्या वाजसनेयांचें आचरण ब्राह्मणधर्माव्यतिरिक्त असतें, तर कोंकणस्थांनीं त्यांच्या कन्या कशा केल्या असत्या? अथवा त्यांजकडेस आपल्या कन्या तरी कशा दिल्या असत्या?

१०२. पूर्वापार असें चालत आलें आहे कीं, गङ्गथडी वगैरे ठिकाणचा स्वशाखीयब्राह्मण ह्या प्रान्तीं आल्यास त्यास वसिष्ठवामदेव समजून (त्याचा अनादर न करितां) इकडील प्राचीन वाजसनेय-ब्राह्मण त्याजबरोबर पङ्क्तिव्यवहार ठेवीत गेले, व सद्यः देखील-ठेवितात, हें उघडच आहे. तसेंच कोणी इकडील प्राचीन वाज-सनेय काश्यादिक्षेत्रीं गेला असतां तिकडील वाजसनेयब्राह्मण त्याजबरोबर अनुष्ठानें व पङ्क्तिव्यवहारादि एकत्र बसून करीत गेले, व सद्यःहि करितात. तसेंच कोंकणस्थ व इकडील प्राचीन वाज-सनेय अनुष्ठानादिकर्में एकत्र बसून करीत गेले, व प्रस्तुतकालीं-देखील करितात, हें परिशिष्ट 'ऊ२' पृष्ठ ३६५।३७६ ह्यांत दाखल केलेल्या कित्येक यादींवरून वाचकांच्या लक्षांत येईल.

१०३. कोंकणस्थांच्या आश्रयानें राहणारे कित्येक नासिकादि*

* Extract from the *Bombay Gazetteer*, Thanna, Vol. XIII., page 81:—"Though the Nasik Madhyandins profess to look down on them, the fact that they are followers of the same branch of Ved, and that marriage into the family stock of the mother's father is forbidden." ......भावार्थ—बांबेगझेटीर-ठाणें, भाग १३,

क्षेत्रांतील वाजसनेयब्राह्मण, दक्षिणेच्या किंवा द्रव्याच्या लोभानें ह्या कोंकणांतील प्राचीन वाजसनेयांबरोबर असणारा आपला पङ्क्ति-व्यवहार उघडपणें सांगण्यास टाळाटाळ करितात; कारण कीं, ह्या बिचारे कोंकणांतील वाजसनेयांकडून त्यांस काय लभ्यांश होणार? सारांश "द्रव्येण सर्वे वशाः" असाच प्रकार होत गेला.

१०४. शके १६६३ पर्यन्त—ह्मणजे अन्ताजी रघुनाथपन्त कावळे गुदरले तेथपर्यन्त-त्यांस, त्यांच्या बन्धूस किंवा त्यांचे सामुदायिक वाजसनेयब्राह्मण ह्यांस पेशव्यांनीं किंवा इतर कोंकणस्थांनीं, "पळशीकर*ब्राह्मण" अथवा "पळशेब्राह्मण" असे शब्द लिहिले नाहींत. परन्तु तदनन्तर ह्मणजे वर दर्शित केलेला अग्निहोत्राचा खटला उपस्थित झाला त्या दिवसापासून ह्या वाजसनेयांस प्रथमतः "पळशीकर" आणि पुढें थोडक्याच कालांत वरील शब्दांतील 'कर' प्रत्ययाचा ऱ्हास करून 'पळशेब्राह्मण' किंवा 'पळशीब्राह्मण' असें पेशव्यांकडून आलेल्या आज्ञापत्रांत लिहिण्यांत येऊं लागलें. तथापि 'वेदमूर्ति,' 'स्वामीगोंसावी,' 'नमस्कार' इत्यादि, जीं ब्राह्मणांस योग्य पदें तींमात्र त्यांच्यानें लिहिण्यांतून काढतां आलीं नाहींत; इतकेंच नव्हे तर, आजमितीपर्यन्त कोंकणस्थादि सर्व लोकांकडून तीं पदें ह्या वाजसनेयांस अव्याहत चालू आहेत. हे वाजसनेयब्राह्मण योग्य आहेत ह्मणूनच पेशवाईचे अव्वलपासून तों आजतागाईत चित्पावन, कऱ्हाडे वगैरेकडे मङ्गलादि कार्यांत त्यांचा मुळेपणा (जोशीपणाची वृत्ति) चालत आहे. नाहींपेक्षां कोंकणस्थादि लोक ह्या वाजसनेयांचे आशीर्वाद कसे घेते? अस्तु.

---

पृष्ठ ८१ ह्यांत असें लिहिलें आहे कीं, यद्यपि नासिकाकडील माध्यन्दिन ह्यांजविषयीं (इकडील माध्यन्दिनांविषयीं) बाह्यात्कारीं तिट्कारा दाखवितात तथापि ते एकाच वेदाचे शाखानुयायी आहेत व त्यांच्यांत आणि ह्यांच्यांत देखील मातुलगोत्राशीं विवाहसम्बन्ध होत नाहीं...

* ज्या तुकम्भट्ट अग्निहोत्र्याच्या वेळेपासून वरील शब्द लिहिण्यांत आला आहे, तो पारनेर महालांतील "पळशी-वनकुटें" येथील मूळचा राहणारा असल्यामुळें असला शब्द लिहिण्यांत आला असावा असें आह्मांस वाटतें. दुसरें कांहीं नाहीं.

कित्येक वृत्त्यभिलाषी कोंकणस्थांनीं ह्या वाजसनेयांविरुद्ध नानाप्रकारचे खटले उपस्थित केले, परन्तु हे वाजसनेय निष्कलङ्क असल्यामुळें त्यांचें केसाइतकेंहि वांकडें झालें नाहीं. असें असतां, ह्यांचा जे विनाकारण छळ करितात, त्यांस काय ह्मणावें? पेशव्यांसहि ह्या उत्तरकोंकणांतील राज्य मिळवून देण्यास कारणभूत जे हे वाजसनेयब्राह्मण त्यांजवरच कोंकणस्थादिकांनीं असले प्रसङ्ग आणावे काय?

१०९. आतां वरील वाचकशब्दानें साम्प्रतकालीं अर्थाचा अनर्थ करून कसा सोडिला आहे तो पहा. गांवावरून नामवाचक शब्द होतात हें खरें आहे; तथापि ते शब्द ज्ञातिवाचक होत नाहींत ह्मणून समजदार गृहस्थ त्यांचा खरा अर्थ करितात आणि त्यांस विपर्ययास जाऊं देत नाहींत. उदाहरणार्थ—पिम्पळगांवकर, लोहगांवकर, पळशीकर, पैठणकर, त्र्यम्बककर, प्रभृतिमण्डळी गांवोगांवचे ब्राह्मणांत आहेत. ह्मणून लोकांनीं त्यांचा विपरीत अर्थ करावा काय? गांवावरून केवळ ज्ञातीचें स्वरूप कळत नाहीं. शास्त्रांत देखील असले शब्द आढळणें कठीण. जातिविवेक, चरणव्यूह, सर्वब्राह्मणोत्पत्तिमार्तण्ड, सह्याद्रिखण्ड वगैरे सशास्त्रग्रन्थांत पळशीकर ऊर्फ पळशे, लोहगांवकर, नासिककर, त्र्यम्बककर, आदिकरून सर्व 'करान्त' शब्द ज्ञातिवाचक आहेत असें लागत नाहीं; तद्वत् पेशव्यांच्या आज्ञापत्रांत देखील 'पळशे ज्ञाति भिन्न आहे असें लागत नाहीं' असें स्पष्ट लिहिलें आहे (परिशिष्ट 'ण' पृष्ठ १७४ पहा.) तेव्हां असल्या शब्दांवरून कोणत्य हि ज्ञातीचा बोध होतो असें नाहीं. ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, द्वेषानें किंवा थट्टेनें हा शब्द वरील वाजसनेयांस लागू केला असावा. तसेंच ह्याच वाजसनेयांचे मूलस्थबान्धवांस कित्येक कोंकणस्थ "धामे" हा शब्द लावून देऊन त्यांस धामे असें ह्मणतात. आतां धामे ह्या शब्दाचा अर्थ पहाः—धाम ह्मणजे घर ह्यावरून, घर न सोडणारा असा अर्थ होतो; परन्तु, ह्याच

धामे शब्दाचा 'ओङ्गळ ब्राह्मण' असा अर्थ करून त्यांच्या शत्रूंनीं अर्थात्चा अनर्थ करून सोडिला आहे. दुसऱ्यांस नांवें ठेवण्याचें सोपें, पण त्यांसच जर एखाद्यानें "प्रेत्या" किंवा "चिपुळण्या" किंवा "चितपोळ्या" असे शब्द लाविले तर त्यांस कसें वाटेल? तें कांहीं असो. परन्तु पेशवाईत इकडील वाजसनेयांस जें नूतन नांव देण्याचा प्रघात पडत गेला, तेणेंकरून वर्तमानकालांत ह्या ब्राह्मणांस देशीं व परदेशीं तोच शब्द लागत चालला आहे. वरील शब्दान्वयें इकडील वाजसनेयांचा आणि त्यांचे मूलदेशस्थ बान्धवांचा, व इतर ब्राह्मणांचा आपापसांत विनाकारण द्वेषभाव मात्र वाढवून देण्यास कित्येक चित्पावन हे कारणभूत होऊन त्या दोघांची मजा पाहण्यास उभे राहिले. तशांत कित्येक दुराग्रही कोंकणस्थांनीं आपलें उच्चत्व दाखविण्यासाठीं मूळच्या सह्याद्रिखण्डाच्या प्रति नष्ट केल्या. (पृष्ठ ४९ पहा) तसेंच १५।१६ वर्षांपूर्वी बृहत्पाराशरस्मृति हा ग्रन्थ छापण्याच्या इराद्यानें (इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मण वे० शा० सं० रा० रा० रामकृष्ण मोरेश्वर भट्ट पाठक पञ्चानने ऊर्फ बाबा पाठक ह्यांजकडेस त्या ग्रन्थाची असलेली) एक प्रत वे. शा. सं. गोपाळशास्त्री घांटे व कृष्णशास्त्री साठे हे गृहस्थ घेऊन गेले. आणि त्या प्रतींत चित्पावनांचें उच्चत्व दाखविण्यासाठीं कांहीं नवीन बनावट श्लोक घुसडून दिले. (ते पहाणें असल्यास सदहू बाबा पाठक दाखवितील.) नन्तर वरील ग्रन्थ छापिला. ते श्लोक येणेंप्रमाणें:—इत्येतद्ध्यानमार्गन्तु वदन्ति कवयो द्विजाः। "कौंकणाश्चित्तपूर्णास्ते चित्तपाव (न?) संज्ञकाः॥ ॥४२॥ ब्राह्मणेषु च सर्वेषु य (त?) स्ते उत्तमा मताः। एतेषां वंशजाः सर्वे विज्ञेया ब्राह्मणाः खलु ॥४३॥ माध्यन्दिनाश्च देशस्था गौडद्राविडगुर्जराः॥ कार्णाटा तैलङ्गादयोपि चित्तपूर्णस्य वंशजाः॥ ४४ ॥ अतश्चित्तस्य पूर्णं यो निन्द्यात्तस्य क्षयो भवेत्॥" केचिदन्येन्यथा ब्रूयुः (?) रूपं ब्रह्मविदो विधेः ॥ ४५ ॥ (तारीख १६ जून १८७३ इसवीचा इन्दुप्रकाश विशेष माहिती-

साठीं पहा.) वरील श्लोकांवरून जगतास असा भास वाटावा कीं, देशस्थ ( ऋग्वेदी, यजुर्वेदी, माध्यन्दिन, ) गौड, द्राविड, गुर्जर कर्नाटकी, तैलङ्ग इत्यादि सर्व ब्राह्मण चित्पावनांचे वंशज आहेत ! ! परन्तु तो ग्रन्थ प्रसिद्ध झाल्यावर कै० वे० शा० सं० रा० रा० विष्णु परशुराम शास्त्री पण्डित ह्यांनीं हे बनावट श्लोक उघाडीस आणिले. नाहीं तर कालान्तरानें हे श्लोक ऋषिवाक्यांत गणले जाऊन, इतर बिचाऱ्या ब्राह्मणांस खालीं पहावें लागतें. सारांश, आपली थोरवी वाढविण्यास व दुसऱ्याची हानि करण्यास ह्या लोकांतील कित्येकांचा जणूं काय अङ्गस्वभावच होऊन गेला आहे, असेंच वारंवार दिसून येतें. कलकत्ता येथें छापिलेल्या बृहत्पाराशरस्मृतींत वरील श्लोक नाहींत.

१०६. इ० स० १७७५ ह्यावर्षीं श्रीत्र्यम्बकेश्वराचें देवालय बान्धून पूर्ण झालें. प्रासादप्रतिष्ठेंत दक्षिणद्वार वाजसनेयांचें असतांहि, तें द्वार हिरण्यकेशी ह्मणजे आपस्तम्ब* चित्पावनांस द्यावें असा पेशव्यांचा मानस होता. ह्यावरून मोठा कलह पडला, परन्तु तिकडील वाजसनेय पेशव्यांचें बोलणें कबूल करीतना; ह्मणून ती प्रतिष्ठा आजमितीपर्यन्त झाली नसून त्या बिचारे ब्राह्मणांस कर्नाटकांत नरगुन्द (नवलगुन्द) येथें कैद भोगावी लागली. त्यांतून कित्येक शिष्टांचीं नावें येणेंप्रमाणें:—१—शङ्कर धुण्डिराज शुक्ल ऊर्फ शङ्करदाजीशुक्ल, २—राजाराम नथु शुक्ल, ३—रङ्गनाथ गोविन्द ऊर्फ आपा शुक्ल, ४—वामन भट्ट लोहगांवकर, ५—रामचन्द्र बाबा दीक्षित ऊर्फ राम दीक्षित, ६—चिमणभट्ट पेण्ढवळे, ७—रघुपतराव देशमूख, ८—शिव दीक्षित आबा, ९—वामन दीक्षित भाऊ, १०—राजाराम तात्या काशीकर वैद्य, ११—रङ्गभट्ट भाऊ वाडेकर, १२—गिरीभट्ट वाडेकर,

*** It seems that Bajirao ordered a Temple at Trimbak to be consecrated by Konkanasths Black Yajurvedis and not by the local White Yajurvedis. The White Yajurvedis gathered in a mob to stop the consecration and were dispersed by Bajirao's orders, several of them being sent to prison. For this the community cursed him, and at Nasik the Yajurvedis' curse is believed to have been one of the chief causes of Bajirao's mistakes and ruin. ( Page 40, Vol. XVI., Nasik, *Bombay Gazetteer.*)

१३—उमापति बापा शिङ्गणें, १४—खण्डभट्ट नाना कावळे, १५—तिमा अण्णा जोशी वगैरे सुमारें शें-सव्वाशें वाजसनेयब्राह्मणांस तेथें कैद भोगावी लागली. ह्याजविषयीं एक आर्या लोकांच्या ह्मणण्यांत आहे तीः—"कर्नाटकांत नेले क्षेत्रींचे द्विज धरूनियां तेरा ॥ यवनादि शत्रु ह्मणती बाजीराया नहीं धरम तेरा ॥ १ ॥" तसेंच, त्र्यम्बकेश्वराचे नन्दीस वरील प्रतिष्ठा न झाल्याकारणानें आजपावेतों पेण्ढ्यांत गुंढाळून जिकडच्या तिकडे कुलुप मारून अडकेस ठेविला आहे.

१०७. ह्याप्रमाणें पेशवाईत जीं जीं सुखदुःखें ह्या वाजसनेयांस भोगावीं लागलीं त्यांचे संक्षिप्तवर्णन झालें. येवढ्यावरून वाचकांची खातरी होईल कीं, ह्यांस खुद्द पेशव्यांकडून जरी वेळोवेळीं न्याय मिळत गेला तरी त्यांच्यांतील कित्येक दुर्जनांनीं ह्यांची अद्यापि पाठ सोडिली नाहीं.

## इङ्ग्रिशांच्या राज्यक्रान्तींत उत्तरकोंकणांतील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांचे दैनन्दिनचर्येचें वर्णन.

१०८. मुम्बई येथील वृत्त्यंशी-वे० रा० रा० पुरुषोत्तमपन्त कावळे पैठणकर ह्यांस ह्या उत्तरकोंकणप्रान्तांत वृत्तिदान मिळाल्यावर, ती निर्विघ्नपणें चालावी, ह्मणून पैठण वगैरे ठिकाणचे आपल्या समागमें आलेले स्वशाखीय ब्राह्मण ह्यांस त्यानें त्या वृत्तीपैकीं कांहीं वृत्ति दिली. पुढें ही वृत्ति सुरळीत चालावी ह्मणून वरील ब्राह्मणांनीं व त्यांचे वंशजांनीं आपापसांत गांवोगांव गुमास्ते ठेवून ती वृत्ति आजपर्यन्त अव्याहत चालविली आहे. त्यांपैकीं, मुम्बई व मुम्बई-माहीम येथील वृत्ति वे० रा० रा० अनन्तभट्ट छत्रे ह्यांस मिळाली. (पृष्ठ २९ पहा.) त्याप्रमाणें ती वृत्ति छत्रे चालवीत असतां, इंग्रिशांचें राज्य मुम्बईत झाल्यावर ह्या छत्र्यांच्या वंशजांस, इकडील सर्व महाराष्ट्रलोकांकडील ज्योतिष व उपाध्यायपणाची वृत्ति चालविण्याचा अधिकार वेळोवेळीं मिळत गेला. हा अधिकार त्यांनींच चालवावा ह्मणून मुम्बईच्या गव्हर्नरांनीं छत्र्यांस सनदपट्टे (पेटेण्टस्) करून दिले. ह्याविषयीं 'ऋ२' परिशिष्टांत लेख आढळतो.

१०९. मुम्बई येथील वृत्तीविषयीं दावा—इसवी सन १८०१ ह्या वर्षी मुम्बईच्या रेकार्डराचे न्यायालयांत ( वरील छत्र्यांचा वंशज ) रामनाईक जीवननाईक ह्यानें अशी फिर्याद केली कीं, विठ्ठल माणिक जोशी, त्र्यम्बक जोशी व रघुनाथ जोशी हे त्रिवर्ग, माझी मुम्बई येथील ज्योतिष व उपाध्यायपणाची वृत्ति बळकावूं पाहतात. सबब त्यांस मनाई होऊन माझी वृत्ति मला देववावी. त्यावरून चौकशी होऊन ती वृत्ति वंशपरम्परें रामनाइकाची ठरून, त्यानें व त्याच्या वंशजांनीं ती अव्याहत चालवावी असा वरील न्यायालयांतून हुकूम झाला. (परिशिष्ट 'ऋ २,' पृष्ठ ३७७। ३८४ पहा.)

११०. मुम्बई—माहीम येथील वृत्ति—इ. सन १६८५ ह्या वर्षी वरील वाजसनेयांपैकीं वे॰ रा॰ रा॰ काशीनाथ गम्बा नाईक, विठ्ठल नाईक व भानू उपाध्ये ह्यांस इंग्लिशसरकारांतून मुम्बई—माहीम येथील सर्व महाराष्ट्रलोकांकडील उपाध्याय व ज्योतिषपणाची वृत्ति चालविण्याचा सनदपट्टा* मिळाला. ह्यांत दुसरें असेंहि लिहिलें आहे कीं, मुम्बई-माहीम येथील लोकांस औषध देणें झाल्यास ह्यांनींच द्यावें. (परिशिष्ट 'म' पृष्ठ १८९।१९० पहा).

१११. मुम्बई येथील वृत्तीचा सनदपट्टा—इसवी सन १७२२ ह्या वर्षी वे॰रा॰ रा॰ शामाचार्य ह्या नांवाच्या(ह्याच वाजसनेयांपैकीं) एका ब्राह्मणास मुम्बईतील सर्व महाराष्ट्रलोकांकडील उपाध्याय व ज्योतिषपणाची वृत्ति चालविण्याचा सनदपट्टा† इंग्लिशसरकारानें दिला. (परिशिष्ट 'र' पृष्ठ १९२।१९६ पहा.)

---

* मुम्बई-माहीम येथील वृत्तीचा अधिकार छत्र्यांचा असतां, जावळे व क्षीरसागर उपाध्ये ह्यांनीं तिकडील वृत्ति चालवावी म्हणून इंग्लिशसरकारांतून त्यांनीं सनदपट्टा कसा मिळविला, ह्याचें मूळ कारण समजत नाहीं. कोणी असें सांगतात कीं, छत्रे, जावळे व क्षीरसागर हे शरीरसम्बन्धी असल्याकारणानें छत्र्यांनीं त्यांस ही वृत्ति दिली असावी. मग काय असेल तें असो ! हल्लीं त्या वृत्तींत छत्र्यांचा हक्क नाहीं.

† इंग्लिश सरकारांतून ह्या शामाचार्यास हा सनदपट्टा कसा मिळाला असावा हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. तथापि जुन्या कांहीं कागदांवरून असें वाचण्यांत येतें कीं, हा शामाचार्य छत्र्यांचा भाचा होता. आणि ज्या वेळेस इकडील वृत्ति चालविणारा छत्र्या निवर्तला, त्या वेळीं (त्याचा मुलगा लहान असल्याकारणानें)

११२. मुम्बई येथील वृत्तीच्या कांहीं भागांचे विक्रित— इसवी सन १७४३ ह्या वर्षी वे० रा० रा० हर नाईक छत्रे ह्यांनीं मुम्बई येथील आपल्या वृत्तीचा सहावा हिस्सा वे० रा० रा० गौतम नाईक सांवखेडकर वैद्य ह्यांस विकत दिला. (परिशिष्ट 'ल' पृष्ठ ५१।५४ पहा.) हें विक्रितखत पोर्टुगीज व इंग्रिश सरकारांत बहाल केलेलें आहे.

११३. ह्याप्रमाणें इ० स० १७४३ पर्यन्त वरील वृत्त्यंशी छत्रे, आचार्य आणि वैद्य, मुम्बई येथील आपली उपाध्याय व ज्योतिष-पणाची वृत्ति वंशपरम्परेनें चालवीत आले. पुढें आपापसांत कलह न व्हावे ह्मणून त्यांनीं स्वसन्तोषानें एक हद्दापत्रक करून सदर्हू वृत्ति चालविली. त्याप्रमाणें ह्या वृत्त्यंशांचे वंशज आपापल्या हद्दींतील वृत्ति आजपावेतों चालवून तिचा उपभोग घेत आहेत. (परिशिष्ट 'व' आणि 'श' पृष्ठ १९७।२०२ पहा.)

११४. मुम्बई—माहीम येथील वृत्तीचा सनदपट्टा—इसवी सन १७५५ ह्या वर्षी वे० रा० रा० विठ्ठल नाईक, गम्बा विठ्ठल नाईक आणि भानू उपाध्ये ह्यांच्या पूर्वजांस मुम्बई—माहीम (व त्याचे आसमन्तातभागांतील खेडीं) येथील सर्व महाराष्ट्रलोकां-कडील उपाध्याय व ज्योतिषपणाची वृत्ति चालविण्याचा सनदपट्टा इंग्रिशसरकारांतून मिळालेला पुन्हा चालू केला. (परिशिष्ट 'स' पृष्ठ २०२।२०३ पहा.) तसेंच, ह्यांच्या वृत्तीच्या वांटणीसम्बन्धीं झालेला दस्तऐवज परिशिष्ट 'य' पृष्ठ १९१।१९२ येथें दाखल केला आहे तो पहा. हा दस्तऐवज त्यांच्या यजमानांच्या हातचा आहे.

११५. ह्याप्रमाणें वरील वृत्त्यंशी आपापली मुम्बई व मुम्बई-माहीम येथील वृत्ति वंशपरम्परेनें चालवीत असतां, जसजसा मुम्बईचा भरभराट होत चालला, तसतशी महाराष्ट्रधर्मीलोकांची बाहेर गांवांकडून वस्तीहि वाढत चालली. आणि त्यांचे

---

सदर्हू सनदपट्टा शामाचार्यानें साध्य केला असावा. पुढें छत्र्याचा मुलगा प्रौढ वयांत आल्यावर आपल्या वृत्तीविषयीं नेहमीं भाण्डणें होतात असें पाहून, तीं पुढें न व्हावीं ह्मणून 'श' हें हद्दापत्रक उभयतांनीं करून भाण्डण मिटविलें.

तत्स्थानिक उपाध्याय त्यांजबरोबर येथें येत चालले. तशांत इकडील प्राचीन वृत्त्यंशी ह्यांचे यजमान (ब्राह्मणांव्यतिरिक्त) श्रीमान होत चालल्यामुळें, आपापल्या घरीं ब्राह्मणांनीं वेद-मन्त्रोक्तकार्यें करावीं असा दुराग्रह धरून बसूं लागले; परन्तु, त्यांचें ह्मणणें ह्या वृत्त्यंशांनीं कबूल केलें नाहीं. शेवटीं त्याचा असा परिणाम होत चालला कीं, ह्या वृत्त्यंशांच्या वृत्तीमध्यें कांहीं-अंशीं चित्पावन, कऱ्हाडे, किरवन्त, देशस्थ ऋग्वेदी, तैलङ्ग, गुर्जर इत्यादि ब्राह्मणांचा प्रवेश होऊं लागला.

११६. मुम्बई येथील वृत्त्यंशी.—हल्लीं मुम्बई शहरांत मूळ-वृत्त्यंशी उपाध्याय ह्मटले ह्मणजे, छत्रे ( जनार्दन रघुनाथ ), आचार्य (आत्माराम भास्कर), वैद्य-सांवखेडकर (केशव ऊर्फ केरोबा वासु-देव), हे व ह्या त्रिवर्गांचे वृत्तीचा हल्लीं अंशतः उपभोग करणारे गोत्रज होत. ते आपापली वृत्ति स्वतः किंवा गुमास्ते* ठेवून चालवित आहेत.

११७. शिवाय, मुद्गल पण्डित—( आत्माराम वामन व लक्ष्मण विनायक), धर्माधिकारी——शासनकर (पाण्डुरङ्ग भास्कर ग्रामजोशी), मटकर—उपाध्ये (महादेव सखाराम), जोशी—बाबरेकर, स्मार्त—शिङ्गणें, पाठकपञ्चानन, पाठक—सप्तर्षी, उपाध्ये—क्षीरसागर, पुरोहित, चामरे, काळे, जोशी— पुरन्दरे इत्यादि प्राचीन वाजसनेयब्राह्मण मुम्बईत उपाध्येपणा करितात.

११८. मुम्बई-माहीम येथील वृत्त्यंशी.—मुम्बई-माहीम येथें जावळे (चिन्तामण बाळम्भट्ट व त्यांचे गोत्रज), क्षीरसागर—उपाध्ये (नीलकण्ठ विठ्ठल, काशीनाथ हेरम्ब, केशव वामन, बाळकृष्ण भास्कर व त्यांचे बन्धु), हेहि आपापली उपाध्याय व ज्योतिषप-णाची वृत्ति वंशपरम्परेनें चालवितात; तथापि, तेथें देखील परस्था-निकब्राह्मण मुम्बईप्रमाणें व्यवस्था करूं लागले आहेत.

११९. निर्मलेश्वर येथील अन्नसत्र.—इ० स० १८२० ह्या वर्षी

---

* तरडे ऊर्फ घडयाळे, सांवखेडकर-वैद्य, सप्तर्षि-पाठक, काळे, पाध्ये, पुरन्दरे वगैरे उपनांवांचे कित्येक गृहस्थ हल्लीं देखील ह्या वृत्त्यंशांचे गुमास्ते आहेत.

इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांचे परभू आदिकरून यजमान ह्यांनीं सरकारांत अर्ज केला कीं, श्रीनिर्मलेश्वर येथील अन्नसत्राचें काम ह्याच ब्राह्मणांपैकीं वे. रा. रा. बापू महादेवभट्ट जोशी पुरन्दरे ह्यांजकडे, माजी राज्यांतून चालत आल्याप्रमाणें, चालू ठेवावें; कारण कीं, ह्यांच्या वृत्तीचा उपमर्द (वृत्ति हरण करण्याकरितां) वसईकडील चित्पावन करितात खरे; तथापि, हे (वाजसनेय) आमचे पूर्वापार उपाध्याय असून आह्मीं त्यांची पूजा करून तीर्थ घेतों आणि त्यांजकडे जेवितों व आमचे वडीलहि जेवित आले. (परिशिष्ट 'थ' पृष्ठ १७८ पहा). सदर्हू अर्जान्वयें ह्या अन्नसत्राचें काम पूर्वीप्रमाणें वरील वे. रा. रा. बापूभट्ट ह्यांजकडेसच सरकारानें कायम केलें. ह्या अन्नसत्राविषयीं, इ० स० १८२३ ह्या वर्षी श्रीमच्छङ्कराचार्यांनीं इकडील प्राचीन वाजसनेय वृत्त्यंशी ह्यांस एक पत्र लिहिलें आहे, तें त्यांनीं अजम एल्फिन्स्टन साहेब मुम्बईचे माजी गव्हर्नर ह्यांस दाखवावें, ह्मणजे वरील सत्राचें काम ह्या वाजसनेयांकडेसच ते साहेब चालू ठेवतील; कारण कीं हे वृत्त्यंशी यजुर्वेदीदेशस्थब्राह्मण खरे आहेत. कोंकणस्थ (चित्पावन) त्यांच्या वृत्तिहरणार्थ इतर जातींस अनृत द्वेष समजावून विद्वेषता वाढावी, ह्यास्तव त्यांस 'पळशेब्राह्मण' असें ह्मणूं लागले, हें आह्मांस पक्कें समजून आलें. असा ह्या पत्राचा इत्यर्थ आहे. (परिशिष्ट 'द' पृष्ठ १७९।१८० पहा.)

१२०. ठाणें येथील सिद्धेश्वराचे अर्चेविषयीं.—इ० स० १८२३ ह्या वर्षी वे० रा० रा० विश्वनाथ विनायक पण्डित ह्यानें सरकारांत अशी फिर्याद केली कीं, ठाणें येथील श्रीसिद्धेश्वराची अर्चा माझेच हातून व्हावी; कारण मीं, त्या गांवचा वृत्त्यंशी असून, वरील देवाचें देवालय बान्धणारी बाई माझी यजमानीण आहे; असें असतां, इतर ब्राह्मण ह्या कार्यांत अडथळा करूं पाहतात; ह्मणून त्यांस तसें न करण्याची ताकीद व्हावी. त्यावरून सरकारांतून निवाडा सदर्हू वृत्त्यंशाच्या वतीनेंच झाला. (परिशिष्ट 'ळ' पृष्ठ २०६।२२८ पहा.)

१२१. नाना रामचन्द्र दीक्षिताची जबानी—वरील खटल्यांतील २२९ पृष्ठांत वे० रा० रा० नाना रामचन्द्र दीक्षित त्र्यम्बककर ह्यांची जबानी विशेषत: वाचण्याजोगी आहे. तिजवरून सर्वांची खातरी होईल कीं, ह्या प्राचीन वाजसनेयवृत्त्यंशांचा आणि त्र्यम्बकादि क्षेत्रस्थ यजुर्वेद्यांचा पङ्क्तिव्यवहार मूळपासून चालत आला आहे. (परिशिष्ट 'ळ' पृष्ट २२९ पहा.)

१२२. शङ्कराचार्यांचीं पत्रें—इ० स० १८३१ पासून इ० स० १८८३ पर्यन्त इकडील प्राचीन वाजसनेयांस अनेक कारणांस्तव श्रीमच्छङ्कराचार्यांनीं वेळोवेळीं पाठविलेल्या पत्रांपैकीं कांहीं पत्रें नमूद केलीं आहेत. (परिशिष्ट 'ध' पासून 'भ' पर्यन्त पृष्ठ १८०।१८९ पहा.)

१२३. गंगाधर आपाचे पाटीलकीविषयीं—इ० स० १८३१ ह्या वर्षीं वे० रा० रा० गङ्गाधर आपा नाईक ह्यांस मौजे वाढींव येथील पाटीलकीची सनद सरकारांतून मिळाली, तींत हे वाजसनेयब्राह्मण आहेत असा लेख आहे. (परिशिष्ट 'क्ष' पृष्ठ २२९ पहा.)

१२४. बापूजी रघुनाथाचे पाटीलकीविषयीं—इ० स० १८३१ ह्या वर्षीं वे० रा० रा० बापूजी रघुनाथ मोगरे ह्यांस शिरगांव येथें पोलीस कारभाऱ्याची सनद सरकारांतून मिळाली. ह्या सनदेंत सदर्हू मोगरे हे वाजसनेयब्राह्मण आहेत असा उल्लेख आहे. (परिशिष्ट 'ल' पृष्ठ १९६।१९७ पहा.)

१२५. श्रीसिद्धेश्वरास इनाम—इ० स० १८३५ ह्या वर्षीं शिरगांव येथील श्रीसिद्धेश्वराची पूजा नित्य यथास्थित होत जावी, म्हणून सव्वा मुडा भात उत्पन्न होईल इतकी जमीन सरकारांतून वे० रा० रा० बापूजी रघुनाथ पाटील मोगरे ह्यांच्या मार्फत देवळाकडेस इनाम दिली. (परिशिष्ट 'त' पृष्ठ १७६।१७७ पहा.)

१२६. बोळिंजचे वृत्तीविषयीं—इ० स० १८४० ह्या वर्षीं वे० रा० रा० नाना बापू जोशी ह्यांनीं बोळिंज येथील वृत्ति विकत घेतली. (परिशिष्ट 'अ २' पृष्ठ २३७।२३८ पहा.)

१२७. कुर्लें येथील वृत्तीविषयीं-इ० स० १८४८ ह्या वर्षीं वे० रा०

रा० राघोबा गणेश देव ह्यांनीं कुर्ले येथील आपली कांहीं वृत्ति मक्त्यानें दिली. (परिशिष्ट 'ष' पृष्ठ २०४ पहा.)

१२८. खाम्बाळें येथील वृत्तीचा खटला.—इ० स० १८५० ह्या वर्षी वे० रा० रा० सखाराम नाना आचार्य ह्यांनीं सरकारांत अशी फिर्याद केली कीं, बाळकृष्ण मोरेश्वर वगैरे, माझे ज्योतिषपणाचे वृत्तीचे गांव बळकावूं पाहतात, ह्मणून त्या गांवची वृत्ति माझी मजकडेस चालू असावी. हे गांव तर्फ दुर्गाड, तर्फ खाम्बाळें आणि तर्फ कुन्दें ह्या ठिकाणीं आहेत. त्याप्रमाणें चौकशी होऊन ह्या खटल्यांत सखाराम नाना आचार्य ह्यांचे तर्फेनें निवाडा झाला. (परिशिष्ट 'आ१' पृष्ठ २३८।२६१ पहा.)

१२९. वसई येथील चित्पावनांकडील ज्योतिषपणाच्या-वृत्तीचा दावा.-इ० सन १८५९ ह्या वर्षी वे० रा० रा० विनायक आबा जोशी पुरन्दरे ह्यांनीं सरकारांत अशी फिर्याद केली कीं, वसई येथील समस्त महाराष्ट्रलोकांकडेस ज्योतिष व उपाध्येपणाची वृत्ति माझी वंशपरम्परेनें मीं चालवीत असतां, हल्लीं तिकडील चित्पावन व कऱ्हाडे ह्यांजकडील माझी ज्योतिषपणाची वृत्ति ते बन्द करूं पाहतात. त्यांपैकीं गोविन्द नारायण कर्पे ह्याजकडेस लग्न झालें, त्या समयीं मला न बोलावितां दुसऱ्या जोश्याकडून घटिका घालवून व पत्रिकापूजन करवून माझा हक्क तो बुडवूं पाहतो. सबब माझा हक्क मला देववावा आणि माझी जोशीपणाची (चित्पावन व कऱ्हाडे ह्यांजकडील) वृत्ति जशी अव्याहत चालत आहे, तशी चालविण्याचा हुकूम व्हावा. त्याप्रमाणें चौकशी होऊन ह्या खटल्यांत विनायक आबा जोशी पुरन्दरे ह्यांचे तर्फेनें निवाडा झाला. (परिशिष्ट 'इ१' पृष्ठ २६२।२८१ पहा.) ह्या खटल्यांत चित्पावन व कऱ्हाडे ह्यांनीं ज्या जबान्या कोर्टांत दिल्या आहेत, त्यांत वादी हा ब्राह्मण आहे असें स्पष्ट लिहून दिलें आहे.

१३०. श्रीमातृकेचे पूजेबद्दल वेतन.—इ० स० १८६७ ह्या वर्षी वे० रा० रा० जयराम आपा नाईक पाराशरे ह्यांणीं केळवें-माहीम

येथील श्रीमातृकेची पूजा नित्यशः करावी ह्मणून सरकारातून ह्यांस प्रतिवर्षी वेतन मिळण्याविषयींची सनद दिली आहे. (परिशिष्ट 'ह' पृष्ठ २०५।२०६ पहा.) राजाबिम्बानें वरील देवीची स्थापना केल्या दिवसापासून सदर्हू ब्राह्मणाचे वंशजच ह्या देवीची पूजा करीत आले.

१३१. आगाशी येथील चित्पावनांकडील ज्योतिषपणाचे वृत्तीचा दावा--इ० सन १८७३ ह्यावर्षी वे० रा० रा० लक्ष्मण गोविन्द जोशी पुरन्दरे ह्यांनीं सरकारांत अशी फिर्याद केली कीं, आगाशी येथील समस्त महाराष्ट्रलोकांकडेस ज्योतिष व उपाध्येपणाची वृत्ति मीं वंशपरम्परेनें चालवीत असतां, हल्लीं तिकडील चित्पावन व कऱ्हाडे ह्यांजकडील माझी ज्योतिषपणाची वृत्ति ते बन्द करूं पाहतात. त्यांपैकीं बाळाजी विश्वनाथ माटे ह्याजकडेस मुञ्ज झाली, त्या समयीं मी तेथें प्रत्यक्ष असतां मजकडून घटिका न घालवितां किंवा, पत्रिकापूजन न करवितां, तें काम दुसऱ्याकडून करवून माझा हक्क बुडवूं पाहतो; सबब माझा हक्क मला देववावा आणि माझी जोशीपणाची (चित्पावन व कऱ्हाडे ह्यांजकडील) वृत्ति जशी अव्याहत चालत आहे तशी चालविण्याचा हुकूम व्हावा. त्याप्रमाणें चौकशी होऊन ह्या खटल्यांत लक्ष्मण गोविन्द जोशी पुरन्दरे ह्यांचे तर्फेनें निवाडा झाला. (परिशिष्ट 'ई२' पृष्ठ २८२।३२४ पहा.) ह्या खटल्यांत चित्पावन व कऱ्हाडे ह्यांनीं ज्या जबान्या कोर्टांत दिल्या आहेत, त्यांत वादी हा ब्राह्मण आहे असें स्पष्ट लिहून दिलें आहे.

१३२. आगाशी येथील श्रीभवानीशङ्कराचे देवालयांत जाण्याचा खटला.---इ० स० १८७२ ह्या वर्षी वे० रा० रा० शङ्कर दाजी आचार्य वगैरे आगाशी येथील प्राचीन वाजसनेयब्राह्मण ह्यांनीं वान्द्रें येथील फर्स्ट असिस्टन्ट माजिस्ट्रेट ह्यांजकडेस अशी फिर्याद केली कीं, आगाशी गांवांत श्रीभवानीशङ्कराचें देवालय आहे, त्यांत आंतील गाभाऱ्यांत जाऊन श्रीभवानीशङ्कराची पूजा करण्यास आह्मांस अटकाव करावा ह्मणून आनन्दराव भिकाजी फडके वगैरे चित्पावनांनीं सदर्हू देवाचे देवालयास कुलूप मारिलें आहे, तें खुलें

करून नित्याप्रमाणें त्या देवाची पूजा करण्यास आह्मांस मोकळीक व्हावी. ह्याप्रमाणें फिर्याद झाल्यावर वादी व प्रतिवादी ह्यांचें बोलणें ऐकून घेऊन, माजिस्ट्रेटानें वादीच्या तर्फें निवाडा केला व त्यांस देवालय खुलें करून दिलें. नन्तर प्रतिवादींनीं सेशन जज्याकडेस अपील केलें असतांहि, माजिस्ट्रेटानें वादींच्या तर्फेनें केलेला निवाडा सेशनांत कायम झाला. पुढें प्रतिवादींनीं वरील देवालयाच्या मालकीविषयीं दावा केला; त्यांत देखील वसई व ठाणें येथील दिवाणीकोर्टांत ते हरले. शेवटीं त्यांनीं मुम्बई येथील हायकोर्टांत अपील केल्यावर वादींच्या वकिलाच्या हयगईमुळें ह्मणा, अगर कांहीं अन्यकारणांमुळें ह्मणा, वादींची देवळांत जाण्याची वहिवाट* नाहीं, असा हायकोर्टानें निवाडा केला. (परिशिष्ट 'उ२' पृष्ठ ३२५।३६४ पहा.)

१३३. हा खटला उपस्थित होण्याचें कारण असें आहे कीं, पेशवाई राज्यांत हें देवालय बान्धिल्या दिवसापासून त्याच्या गाभाऱ्यांतील महादेवाची पूजा वादी व प्रतिवादी ह्या दोन्हीं जातींचे ब्राह्मण करीत; असें असतां, ही फिर्याद झाली त्या वर्षी पर्जन्यानिमित्त सन्ततधाराभिषेक व्हावा, एतदर्थ दोन्ही जातींच्या ब्राह्मणांनीं विचार केला; त्यांत चित्पावन असें ह्मणूं लागले कीं, प्रथम आमचा अभिषेक व्हावा. नन्तर ह्या वाजसनेयांचा व्हावा. हें ह्मणणें वाजसनेयांस रुचलें नाहीं. ह्यावरून चित्पावनांनीं देवालयास कुलूप लाविलें.

१३४. वरील खटल्यांत एका साक्षीदारानें (सीताराम त्र्यम्बक

---

* केळवें-माहीम येथील महेश्वराचे देवालयांत तिकडील चित्पावनादि ब्राह्मण व प्राचीन वाजसनेयब्राह्मण पूजाअर्चा करण्यास पूर्वापार जात आहेत. तेथील श्रीव्यङ्कटेशाचें लग्न (विजयादशमीस आणि कार्तिक मासांत) वे. रा. रा. भाई सखाराम जोशी स्मार्त शिङ्कणे प्रभृति इकडील प्राचीन वाजसनेय ग्रामोपाध्यायच लावितात. सारांश, ह्या कोंकणांत स्थलोस्थलीं चित्पावनादि लोकांनीं जीं देवालयें बान्धिलीं आहेत, त्यांतील देवांची पूजा, अर्चा आणि सांवत्सरिक उत्सवादि कार्यें इकडील प्राचीन वाजसनेय करीत आले आहेत. असें असतां, आगाशी येथील भवानीशङ्कराच्या देवालयांत वादींची जाण्याची वहिवाट नव्हती, हें म्हणणें केवळ पोरकट दिसतें. श्रीत्र्यम्बकेश्वरादि प्रसिद्ध क्षेत्रीं देखील वादींस देवालयांत जाऊन ज्योतिर्लिङ्गाची पूजाअर्चा करण्यास पेशवाईत प्रतिबन्ध झाला नाहीं आणि आगाशीसच असली व्यवस्था!

जोशानें ) नासिक येथील कोर्टांत असें सांगितलें कीं, वादींच्या जातीच्या एका ब्राह्मणाकडेस नानाबर्डे नासिककर हा जेविल्यावरून त्यास प्रायश्चित्त* दिलें होतें; परंतु, ही गोष्ट कोर्टासमोर खरी करून देण्यास त्या साक्षीदारानें वहिवाटीप्रमाणें नासिक येथील धर्माधिकाऱ्याचा दाखला हजर केला नाहीं. ह्याजवरून ह्या साक्षीदाराच्या जबानीची मातबरी किती आहे हें वाचकांनीं समजावें. सदर्हू नाना बर्डे हा नासिकचा यजुर्वेदीब्राह्मण असून, मुम्बईस कै० वे० रा० रा० रघुनाथ कृष्ण जोशी ह्यांजकडेस पांच-पञ्चवीस वर्षें कारण-परत्वें येऊन राहत असे व परस्परांचा पङ्क्तिव्यवहारहि होत असे, हें मुम्बई व नासिक येथील बहुतेकांस माहीत आहे. तशांत, सदर्हू बर्डे ह्यानें इकडील प्राचीन वाजसनेय आणि नासिककर वाजसनेय ह्या परस्परांची एकी व्हावी ह्मणून बरीच मेहनत केली; परन्तु, त्याचा अकालिक मृत्यु झाल्याकारणानें ती गोष्ट तशीच राहिली. (परिशिष्ट 'ल१.' पृष्ठ ३८५।३८६ पहा.)

१३५. मुम्बईतील हायकोर्टानें वरील खटल्यांत जो निकाल केला आहे, त्यांत वादी (इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मण) ह्यांच्या ब्राह्मणत्वास यत्किञ्चित्‌हि गौणत्व आणिलें नाहीं. ( पुरवणी पृष्ठ ३६३।३६४ पहा. ) असें असतांहि, कित्येक कोंकणस्थ वरील निकालाचा विपरीतार्थ करून जगतास दाखवितात, तेव्हां असल्या लोकांच्या साहसाची कमालच झाली.

१३६. भायन्दर येथील ब्रह्मदेवाचे पूजेबद्दल इनाम- इ० सन १८८३ ह्या वर्षीं मौजे भायन्दर येथील श्रीब्रह्मदेवाची पूजाअर्चा

* वाचकांस हें सुचविणें अवश्य आहे कीं, सदर्हू नाना बर्डे हा वादीच्या जातीच्या लोकांकडेस पांचपन्नास वर्षें जेविला असतां, शेवटीं त्यास प्रायश्चित देणें म्हणजे मोठेंच नवल!! बर्ड्यांचे सोयरेधायरे व त्याचे जातीचे नासिककर जे त्याजबरोबर जेवीत गेले त्यांची काय वाट? बरें त्याचें प्रायश्चित्त घेणें हें तरी खरें आहे काय? आपली आई वारली असतां ब्राह्मणांच्या रूढीप्रमाणें बर्डे ह्यानें सक्षौर प्रायश्चित्त केलें. ही गोष्ट मात्र खरी आहे. सदर्हू सीताराम त्र्यम्बक जोशानें ह्या खऱ्या गोष्टीचा विपरीतार्थ करून अशी जबानी दिली. सर्वच अर्थाचा अनर्थ !

यथास्थित चालावी ह्मणून, तिकडील सांवखेडकर वैद्य ह्यांजवळ माजीराज्यांतून कांहीं जमीन इनाम मिळाल्याची सनद होती, ती गहाळ झाल्याकारणानें, वरील जमीन सदहू वैद्य ह्यांजकडेस निरन्तर इनामादाखल चालावी ह्मणून, वे० रा० रा० आनन्दराव गणेश नाईक वैद्य सांवखेडकर ह्यांस इ० सन १८८३ तारीख ६ आगष्ट ह्या मितीची नवीन सनद हल्लींचे सरकारांतून दिली आहे. (ही सनद इंग्लिश आणि मराठी मोडी लिपींत असून तिजवर टी. डी. मेकन्झी ह्या कलेक्टराची सही आहे.)

१३७. श्रीनिर्मलेश्वर येथील तीर्थोपाध्याय जोशी भानुशे ह्या उपनांवांचे आहेत. त्यांपैकीं हल्लीं वे० रा० रा० अनन्त पुरुषोत्तमभट्ट वगैरे तिकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मण तीर्थोपाध्यायाची वृत्ति चालवितात. ह्यांचें वास्तव्य वाघवली येथें आहे.

१३८. तसेंच, श्रीनिर्मळेश्वराचे प्रतिवार्षिकउत्साहांत पेशवाईपासून हेच वाजसनेय ब्राह्मण कीर्तनें करीत आणि त्याबद्दल त्यांस दक्षिणाहि मिळे. सद्यः देखील ह्या ब्राह्मणांपैकीं वे० रा० रा० आपा महादेव कीर्तने, रावजी बाळकृष्ण पाठक पञ्चानन, गङ्गाधर बापू गोंसावी पण्डित, मोरेश्वर रघुनाथ भानुशे वगैरे ह्यांस वरील उत्साहानिमित्त हल्लींदेखील सरकारांतून दक्षिणा मिळते.

१३९. वसई येथील ग्रामोपाध्याय व ग्रामजोशी, जोशी-पुरन्दरे ह्या उपनांवाचे असून माजी राज्यांत त्यांपैकीं वे० रा० रा० रामचन्द्र* व कृष्ण† बापू जोशी ह्या उभयतांस प्रतिवर्षी शम्भर रुपये दक्षिणा ग्रामजोशीपणाची मिळत असे. हल्लीं देखील वे० रा० रा० पुरु-

---

* रामचन्द्राचे वंशजः–वे. रा. रा. गणपति बळवन्त, सुन्दर भालचन्द्र, राजीबा महादेव आणि लक्ष्मण मोरेश्वर; †कृष्णाचे वंशजः—वे रा. रा. राघोबा, रघुनाथ, दामोदर, सदोबा, वासुदेव, शिवराम, नारायण व आपा हे बन्धु असून भास्कर जोशी ह्यांचे चिरंजीव होत; तसेच ह्यांचे चुलतबन्धु पाण्डुरङ्ग आबा जोशी इत्यादि; आणि वे. रा. रा. प्रभाकर, रघुनाथ आणि रामचन्द्र विठ्ठल (हे त्रिवर्ग बन्धु), गोविन्द विनायक, लक्ष्मण बाबाभट्ट वगैरे वरील पुरन्दरे घराण्यांतले असून आजपावेतों वसईतील व तिच्या आसपासच्या गांवांतील उपाध्येपणाची व ज्योतिषपणाची वृत्ति सर्व महाराष्ट्र लोकांकडील बहुधा हेच चालवितात.

षोत्तम ऊर्फ गोविन्द बापू व केशव आपा ह्यांस मामलतदार कचेरींतून सालीना दक्षिणा मिळत आहे. हे देखील वरील उपनांवाचे घराण्यांतील आहेत.

१४०. कोळवण येथील श्रीमहालक्ष्मीची पूजाअर्चा आणि प्रतिवार्षिक उत्सवाबद्दल स्मार्त-शिङ्णे ह्यांस जव्हार संस्थानांतून दक्षिणा मिळते. हल्लीं ही दक्षिणा वरील उपनांवाचे गृहस्थ वे० रा० रा० भाई सखाराम ह्यांस मिळत आहे. तसेंच ह्या देवीसमोर लग्नादि मङ्गलकार्यें झालीं असतां, त्यांचें सर्व उपाध्यिक सदहू भाई शिङ्ण्यासच मिळतें.

१४१. ह्याप्रमाणें उत्तरकोंकणांतील ज्या ज्या गांवीं हे वाजसनेय ब्राह्मण राहतात त्या त्या गांवीं उपाध्याय आणि ज्योतिषपणाची बहुतेक वृत्ति ह्याच वाजसनेयांची आहे, व आजतागाईत ही वृत्ति तेच चालवीत आहेत.

१४२. ग्रामदेवी येथील इष्टि.—इ० सन १८८३ ह्या वर्षी मुम्बईत श्री ग्रामदेवीच्या देवालयांत इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मण आणि त्यांचे गङ्गातीरस्थ (मूलदेशीय) बान्धव ह्यांनीं एकत्र जमून प्रकृति व नवान्नइष्टि केली. तिजविषयीं तारीख २९ अक्टोबर सन १८८३ इसवीच्या 'प्रभाकर' वर्त्तमानपत्रांत कांहीं मजकूर आला आहे, त्यांतील सारांश येणेंप्रमाणें:—

"मुम्बई येथील श्रीग्रामदेवीच्या देवालयांत इकडील प्राचीन शुक्लयजुर्वेदीयमाध्यन्दिन शाखेचे वतनदार, वृत्त्यंशी व उपाध्याय ह्यांनीं तच्छाखीय औरङ्गाबादेजवळील चिखलठाणकर आहिताग्नि चातुर्मास्ययाजी वे० रा० रा० सखाराम गोपाळ जोशी यांजकडून शके १८०५ आश्विन शुक्ल १५ व कृष्ण १ दा (मङ्गळ व बुध) तारीख १६।१७ अक्टोबर इसवी रोजीं प्रकृति व नवान्नइष्टि (यज्ञ) करविली. त्या समयीं वे० रा० रा० नारायण विठ्ठल वैद्य पुरन्दरे, बाबा मोरेश्वर भट्ट पाठक पञ्चानन, केरोबा वासुदेव वैद्य, आत्माराम वामन पण्डित मुद्गल, जनार्दन रघुनाथ छत्रे,

दिवाकर प्रभाकर छत्रे, नीलकण्ठ विठ्ठल शास्त्री मुम्बई-माहीमकर, महादेव सखाराम भट्ट मटकर राजगुरु प्रभृति यजुःशाखीय मण्डळी—वे० रा० रा० ब्रह्मदेव काका देवकुटे, आबा रामचन्द्र दीक्षित, गोविन्द सखाराम अग्निहोत्री, गोपाळ तानपाठकी, गोविन्द रामचन्द्र भट्ट ढेरें वगैरे तच्छाखीय क्षेत्रस्थ ब्राह्मणमण्डळी—व वे० रा० नरोत्तम गौरीशङ्कर शुक्ल, कृपाशङ्कर दुर्गाशङ्कर शुक्ल, मणिशङ्कर हरिशङ्कर शुक्ल, वगैरे शुक्लयजुर्वेदीय गुर्जरब्राह्मणमण्डळी एकत्र बसून हीं इष्टी पूर्ण केली. ह्या इष्टींत पञ्चकुण्डें असल्यामुळें अर्थातच ही इष्टी श्रौताग्निविधानेंकरून झाली.

ही इष्टी पहाण्यास अन्यशाखीय ब्राह्मण व यजमानादि लोकांचा समुदाय दोन दिवसपर्यन्त जमत असे.

येणेंप्रमाणें ही इष्टी समाप्त झाल्यानन्तर वरील गुर्जरब्राह्मणमण्डळी खेरीजकरून भोजनसमारम्भहि दोन दिवस मोठ्या थाटानें झाला. रात्रौ मन्त्रजागरास वे० रा० रा० प्रभाकर दाजी जोशी वांईकर, चिन्तामण दादा नाकिल अग्निहोत्री जुन्नरकर, विष्णु गोपाळ उपासने जुन्नरकर, वरील अग्निहोत्र्याचे उपाध्याय-रङ्गभट्ट-वारे नासिककर, वरील सर्व मण्डळी वगैरे ३०।४० ब्राह्मणमण्डळी मिळून त्यांनीं आपल्या मन्त्रजागरानें रात्रौ १२ वाजेपावेतों देवालय अगदीं दणाणून टाकलें होतें." अस्तु—

१४३. आणखीहि ह्या इष्टीचे भोजनसमारम्भांत धार (पोंवाराची) येथील आहिताग्नि चातुर्मास्ययाजी यज्ञेश्वर मनोहर दीक्षित (ढमढेऱ्याचें तळेगांवकर), दाजी रामचन्द्र उपाध्ये क्षीरसागर, बाबा भाऊ कावळे पैठणकर, लक्ष्मण विनायक पण्डित मुद्गल, जयराम लाडम्भट्ट सप्तर्षिपाठक, बापु रङ्ग भट्ट पेण्ढवळे त्र्यम्बककर, साम्ब अनन्तभट्ट शौचे त्र्यम्बककर, बळवन्तराव बाजी उपाध्ये क्षीरसागर, भास्कर व वासुदेव चिन्तामण आचार्य, बाळकृष्ण बापू आचार्य, दामोदर धोण्डू जोशी पुरन्दरे, रघुनाथ महादेव पण्डित, परशुराम, दिनकर व अमृत नारायण वैद्य पुरन्दरे, राघोबा बळवन्त

वैद्य पुरन्दरे, मोरेश्वर अनन्त पुरन्दरे, देवराव यादवराव वैद्य, दामोदर राघोबा पुरन्दरे, केशव नीलकण्ठ धर्माधिकारी, सखाराम रघुनाथ वैद्य पुरन्दरे, बाळकृष्ण विश्वनाथ आचार्य, पद्मनाभभास्कर शिङ्गणे वगैरे ७९ वर मण्डळी होती. ह्याप्रमाणें ही इष्टी सम्पूर्ण झाली.

१४४. पैठण येथील चातुर्मास्य यज्ञ.—शके १८०६ ज्येष्ठ वद्य १ पदा शनौ ह्या दिवशीं श्रीप्रतिष्ठान (पैठण) येथें ढोल दरवाज्यानजीक शेषा बापू ह्यांच्या मठांत वे. शा. सं. रा. रा. सखाराम गोपाळ जोशीआहिताग्नि चातुर्मास्ययाजी ह्यांनीं चातुर्मास्ययज्ञ केला. तन्निमित्त मुम्बई येथील वृत्त्यंशी वे. रा. रा. केशव ऊर्फ केरोबा वासुदेव वैद्य सांवखेडकर आणि मण्डळी ह्यांनीं तेथें ब्राह्मण सन्तर्पण केलें. त्यावेळेस त्या मठांत पैठण येथील ब्राह्मण मण्डळीचा आणि मुम्बईहून तेथें गेलेल्या इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मण मण्डळीचा एकत्र बसून प्रशस्त रीतीनें व सर्वांसमक्ष भोजनसमारम्भ झाला. भोजनसमारम्भांत असलेले ब्राह्मणांचीं नांवें येणेंप्रमाणें:—

१ वे. सखाराम गोपाळ जोशी अग्निहोत्री चिखलठाणकर.
१ ,, बापू महादेव कण्व बिडकीनगांवकर.
१ ,, धोण्डो महादेव दीक्षित नासिककर.
१ ,, कुशाबा चिन्तामणि दीक्षित नासिककर.
१ ,, रमाकान्त सखाराम जोशी चिखलठाणकर.
१ ,, दामोदर शिवपुरी पैठणकर.
१ ,, गोविन्द सखाराम जोशी चिखलठाणकर.
१ ,, राजाराम सखाराम जोशी चिखलठाणकर.
१ ,, त्र्यम्बक आनन्दराव ऊर्फ नाना

**मुम्बईहून गेलेली मण्डळी.**

१ वे. केशव ऊर्फ केरोबा वासुदेव वैद्य सांवखेडकर, मु. मुंबई.
१ ,, ब्रह्मदेव काका देवकुटे त्र्यम्बककर, मु. त्र्यम्बक.
१ ,, लक्ष्मण गोविन्द जोशी पुरन्दरे उज्जनीकर. मु. नाळे.
१ ,, लक्ष्मण गोविन्द जोशी पुरन्दरे निफाडकर. मु. आगाशी.
१ ,, पाण्डुरङ्ग महादेव पाठक पञ्चानन नगर हवेलीकर, मु. केळवें.
१ ,, देवराव यादवराव वैद्य सांवखेडकर, मु. वसई.

साहेब पाटील महाजन कावळे पैठणकर.
१ वे. केशव नाईक कोळगांवकर.
१ ,, गणपति बावा शेवन्तकर.
१ ,, लक्ष्मण जोशी पैठणकर.
१ ,, महादेव भट्ट पिम्परीकर.
१ ,, राजाराम जगन्नाथ दाभाडीकर
१ ,, जनार्दन अग्निहोत्री शेवन्तकर.
१ ,, भाऊजोशी पैठणकर.
१ ,, त्र्यम्बकराज धर्माधिकारी पैठणकर.
१ ,, रामभाऊ हुबळीधारवाडकर.
१ ,, आपा बापू शास्त्री जुन्नरकर.
१ ,, नारायण शेवन्तकर आणि त्याचा मुलगा.
१ ,, गोविन्द शिवपुरी पैठणकर.
१ वे. हरी गङ्गाधर पण्डित भानुशे घनेसाङ्गवीकर, मु. वसई. वगैरे ब्राह्मण मण्डळी ह्या समारम्भांत असून तो निर्विकल्प झाला. हा भोजनसमारम्भ झाल्यावर पुढेंहि कांहीं दिवस मुम्बईकर मण्डळीपैकीं कित्येक गृहस्थ पैठणास होते. ह्या भोजनसमारम्भांत पाकसिद्धिहि करण्यास मुम्बईकरांपैकीं एक दोन गृहस्थ होते.

१४५. पुढें दुसऱ्या दिवशीं (शके १८०६ ज्येष्ठ वद्य २ या रवौ) मुम्बईहून वे. रा. रा. नारायण विठ्ठल वैद्य पुरन्दरे पुणताम्बेकर, बाबा भाऊ कावळे पैठणकर, नीलकण्ठ विठ्ठल शास्त्री उपाध्ये क्षीरसागर राहुरीकर, रामचन्द्र मल्हार जोशी भानू पळशीकर आणि दिनकर नारायण वैद्य पुरन्दरे पुणताम्बेकर ही मण्डळी प्रतिष्ठानास कांहीं कामाकरितां गेली होती. तेथें त्यांचा व कित्येक वर दर्शित केलेले सन्तर्पणांत असलेले ब्राह्मण ह्यांचाहि भोजनसमारम्भ एकच पंक्तींत झाला.

१४६. शके १८०६ ज्येष्ठ शुद्ध ७ मी शनौ ह्या दिवशीं वे. रा. रा. केशव ऊर्फ केरोबा वासुदेव वैद्य सांवखेडकर, लक्ष्मण गोविन्द जोशी पुरन्दरे उज्जनीकर, लक्ष्मण गोविन्द जोशी पुरन्दरे निफाडकर, पाण्डुरङ्ग महादेव पाठक पञ्चानन नगरहवेलीकर, हरि गङ्गाधर पण्डित भानुशे घनेसांगवीकर, आणि ब्रह्मदेव काका देवकुटे त्र्यम्बककर; तसेच, शके १८०६ ज्येष्ठ शुद्ध १४ शी शनौ

ह्या दिवशीं वे. रा. रा. नारायण विठ्ठल वैद्य पुरन्दरे पुणताम्बेकर, नीलकण्ठ विठ्ठल शास्त्री क्षीरसागर उपाध्ये राहुरीकर, बाबा भाऊ कावळे पैठणकर, रामचन्द्र मल्हार जोशी भानू पळशीकर आणि दिनकर नारायण वैद्य पुरन्दरे पुणताम्बेकर वगैरे मण्डळीं मुम्बईहून नगरास गेली होती. तेथें वे. रा. रा. भाऊ वामन डाङ्गे ह्यांनीं त्यांचा आदरसत्कार करून त्यांस आपणांकडेस ठेवून घेऊन प्रशस्त रीतीनें ह्यांचा व त्यांचा पंक्तिव्यवहार (नगरकर ब्राह्मणमण्डळीचे समक्ष) झाला.

१४७. शके १८०६ ज्येष्ठवद्य ३ या सोमे ह्या दिवशीं वरील मुम्बईकर मण्डळी पैकीं कांहीं गृहस्थ पैठणाहून नगरास परत आल्या वर, वे० शा० सं० रा० रा० नाना बापू जोशी रेखी ह्यांनीं देखील त्यांचा आदरसत्कार करून त्यांस आपणांकडेस ठेवून घेतलें. रेखी व हे गृहस्थ एका पंक्तीस भोजनास बसले इतकेंच नव्हे; तर, पाकसिद्धिहि ह्या मुम्बईकरांपैकीं एका गृहस्थानें आणि आचाऱ्यानें मिळून केली. हा भोजनसमारम्भ श्रीस्वामीच्या देवालयांत सर्वांसमक्ष झाला. तेथें पुण्याकडील दोन आश्वलायन शास्त्रीहि ह्या भोजनास होते.

१४८. ह्याप्रमाणें इकडील प्राचीन वाजसनेयांचा आणि त्यांचे मूलदेशीय बान्धवांचा पंक्तिव्यवहार प्रत्यक्ष एकत्र होत असतांहि, तो होत नाहीं असें ह्मणणारे किती बरें सत्याला अनुसरणारे असावे ?

## इंग्लिशांचें राज्य झाल्यापासून उत्तर कोंकणांतील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांची स्थिति व एतद्विषयीं सारासार विचार.

१४९. पेशवाईनन्तर इंग्लिशांचें राज्य ह्या उत्तर कोंकणांत झाल्यावर देखील ह्या वाजसनेयांविरुद्ध ज्या बीजांचें कित्येक कोंकणस्थांनीं माजी राज्यांत रोपण केलें होतें, तें पुढें बलवत्तर होऊं लागलें. कारण कीं, जरी कोंकणस्थांची सत्ता बुडाली तथापि हल्लींच्या सरकारास मार्गदर्शक कोंकणस्थच झाले; ते असे कीं, कित्येक हुद्यांचीं कामें ह्यांच्या हातीं सरकारास देणें भाग पडलें.

पुढें कांहीं कालानें इकडील लोकांची स्थिति, जाति, देशवर्णन, लोकसंख्या वगैरेचीं पुस्तकें सरकारांतून छापून प्रसिद्ध करण्यांत येऊं लागलीं. तेव्हां अर्थात जी जी माहिती सरकारास पाहिजे होती ती ती कोंकणस्थांकडूनच मिळाली. ह्मणून त्यांनीं वरील वाजसनेयांस जें विपरीत नामाभिधान देण्याचें पेशवाईपासून सुरू केलें होतें तेंच नांव असल्या माहितींत दाखल केलें. तशांत, त्या कालीं किंवा सद्यःदेखील ह्मणण्यासारखा एखादा उत्कृष्ट इंग्लिश शिकून विद्वान झालेला किंवा सरकार दरबारीं ज्याचें वजन आहे, असा कोणींहि इकडील वाजसनेय नसल्याकारणानें, जें जें ह्या वाजसनेयांविरुद्ध लिहिण्यांत आलें त्याचा प्रतिकार ह्यांज-कडून झाला नाहीं, हें उघडच आहे. ह्यावरून वाचकांस पूर्ण कळेल कीं, जें जें ह्या वाजसनेयांविरुद्ध वरील ग्रन्थांत लिहिलेलें आढळेल तें केवळ ह्मणजे सर्व सत्यच आहे असें होत नाहीं.

१६०. मुम्बईत फार दिवसांपासून अशी चाल आहे कीं, एखाद्या श्रीमन्त गृहस्थाकडेस विवाहादि मङ्गलकार्य किंवा सांवत्सरिकादि अपरकार्य झाल्यास तो गृहस्थ महाजनवाडींत* ब्राह्मणांस चवऱ्यायशी† देतो, ही चवऱ्यायशी इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांस व गुर्जर ब्राह्मणांस मात्र मिळते. कोंकणस्थांस वगैरे मिळत नाहीं. आपणांस चवऱ्यायशीं मिळावी ह्मणून ह्या (कोंकणस्थ) लोकांनीं बरेच प्रयत्न केले, परन्तु ते सर्व व्यर्थ गेले.

१६१. इ० स० १८६९ ह्या वर्षी मुम्बईत 'जातिभेदविवेक-सार' ह्या नांवाचें एक पुस्तक छापिलें आहे. हें पुस्तक छापणाराचा मूळ उद्देश असा दिसतो कीं, भरतखण्डांत जातिभेद ह्मणून मुळींच नसावा. सबब ह्या पुस्तककारानें उंचवर्णांच्या जातींवर कटाक्ष

---

* लग्न व भोजनसमारम्भादि कार्यें होण्यास जी प्रशस्त जागा किंवा वाडी (तींत इमला बांधलेली) महाजनांनीं केली आहे, तिला महाजनवाडी ह्मणतात. महाजन=सम्भावीत गृहस्थांची मण्डळी.

† चवऱ्यायशी ज्ञातींचे ब्राह्मणांस सिधासामुग्री देऊन त्यांजकरवीं जें ब्राह्मण-भोजन करविणें त्यास चवऱ्यायशी असें ह्मणतात.

करून त्यांचें त्या ग्रन्थांत नीचत्व दाखविण्याचा झोंक आणिला आहे. ह्याच इराद्यानें, इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांस विनाकारण गौणत्व आणण्याचा रोख ग्रन्थकारानें सदहू पुस्तकांत दाखविला आहे. तो असाः—मुम्बईतील श्रीवालुकेश्वराचे अर्चेविषयींचा कांहीं निराधार मजकूर लिहून, त्याचें प्रतिपादन करण्याविषयीं काशीस्थपण्डितांचें एक निनांवी पत्र ह्मणून दाखल केलें आहे. पत्र लिहिण्याच्या नेहमींच्या परिपाठाप्रमाणें ह्या पत्रांत मायना किंवा नांवांनिशीं सह्या नसून, फक्त १८ उपनांवांची त्यांत योजना केली आहे. हीं उपनांवेंहि कोंकणस्थांच्या उपनांवांप्रमाणें भासतात. पत्रावर, संवत् १८४४ (शके १८७०) ह्यांवर्षी तें लिहिलें आहे, असा शक लाविला आहे. आतां १८४४ ह्या संवत्सराला जरी ९४ वर्षें होऊन गेलीं, तरी १८७० हा शक येण्यास अझून ६९ वर्षें लोटलीं पाहिजे आहेत. अमुक मास, पक्ष, तिथी किंवा वार ह्या दिवशीं तें पत्र लिहिलें गेलें आहे, असें ह्मणण्यास ह्या पत्रांत पुरावा ह्मणून अगदींच दिसत नाहीं. किलकसंवत्सर मात्र घातला आहे; परन्तु, तो दक्षिणेंतील साम्प्रदायाचा आहे. काशी अथवा उत्तर हिन्दुस्थानाकडे संवत्सर वेगवेगळाले लिहिण्याचा प्रघात आहे. ह्यावरून हें पत्र काशींत लिहिलें आहे, किंवा दक्षिणेंत लिहिलें आहे, ह्याचा निर्णय होत नाहीं. तसेंच, हें पत्र हल्लीं कोणाच्या सङ्ग्रही आहे किंवा कसें? ह्याचाहि उल्लेख वरील पुस्तकप्रकाशकानें कांहींएक केला नाहीं. तेव्हां, अर्थातच हें पत्र सचवटीचें आहे, असें ह्मणतां येत नाहीं, असो. ह्या पत्रांत 'वृद्धारण्य' नामक ग्रन्थांतील 'कैवर्तकस्य भिल्लस्य पिता भवति यो नरः ॥ माता या गोलकी नारी पालाशज्ञातिरुच्यते ॥१॥' हा स्वकपोलकल्पित श्लोक दिला आहे. आतां, वृद्धारण्य हा ग्रन्थ प्राचीन किंवा अर्वाचीन ग्रन्थांत कोठेंहि आमच्या पहाण्यांत आला नाहीं. तेव्हां, ह्या ग्रन्थकारास वरील श्लोकास आधार कोठून मिळाला? दुसरें, हा श्लोक देखील मुळींच

सन्दर्भघटित नसून, श्लोक बनविणाराचे बालिशविद्वत्तेचा बराच प्रकाश करितो. श्लोकांचा* अर्थ पहा—“जो नर कैवर्तक जातीच्या भिल्लाचा बाप होतो, आणि जी गोलकी नारी माता होते” पुढें वाक्याचा कांहींच सम्बन्ध लागत नाहीं. आणि “पालाशज्ञा-तिरुच्यते.” ह्यावरून श्लोक करणाराच्या विद्वत्तेची व त्यावरून श्लोकाच्या खरेपणाची मातबरी मुळींच राहत नाहीं. असें असून, मशारनिल्हे पत्रकारास वरदर्शित केलेल्या ग्रन्थांत मात्र ह्या एवढ्याच श्लोकाचा कायतो निर्णय आढळला!! असें ते पत्रकारच स्वतः ह्मणतात. तेव्हां, खरोखर असल्या विलक्षण पत्रलिहिणाराच्या कल्पनेची सीमाच झाली. सारांश, वरील जातिभेदविवेकसारांतील तें पत्र, व तो मजकूर आणि त्यांतील श्लोक हे केवळ निराधार आहेत, असें वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. तसेंच वरील पुस्तकांत ह्या वाजसनेयांविरुद्ध शके १७१० तील शङ्कराचार्यांचें ह्मणून एक पत्र छापलें आहे, त्याचाहि खरेपणा कितपत आहे, हें ह्या इति-हासांतील परिशिष्टांत दिलेल्या शङ्कराचार्यांच्या कितीएक पत्रांवरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल, ह्मणून त्याचा उल्लेख करण्याचें प्रयोजन नाहीं.

१६२. सारांश, ह्या वाजसनेयांस सद्यः कोणाचें पाठबळ नसल्याकारणानें ते चारी बाजूंनीं नाडले जाऊन त्यांस विनाकारण त्रास पोंहचत चालला आहे. तशांत ते कोणाच्याहि आगीदुगींत नसतां त्यांच्या वृत्तिहरणार्थ इतर ब्राह्मणांनीं प्रयत्न करणें ह्मणजे त्यांचें नुकसानच करणें होय. मुम्बईंतीलच उदाहरण पहाः—मुम्बईंतील जदुनाथजी महाराज ह्यांचे घराण्यांत पूर्वी ह्या वाजसनेयांपैकीं वे० शा० सं० रा० रा० आत्माराम शास्त्री नामक एक गृहस्थ असत. आतां तेथें ह्यांपैकीं कोणीच नाहींत. ठाकूरद्वार येथें प्रतिवर्षी उत्साहानिमित्त कै० आत्माराम बावापासून रा० हरिभाऊपर्यन्त तिकडील मठाधिकारी

---

* ‘सारस्वतब्राह्मण’ नामक पुस्तकांतील पृष्ठ १८२। १८३ ह्यांत वरील पत्र व श्लोक ह्यांचें योग्य खण्डन केलें आहे. तें वाचकांनीं अवश्य वाचावें.

सेवक चिमणाजी बल्लाळ नमस्कार. सुरुसन इसन्ने सलासिन मया व अलफ. (शके १६५३.) तुम्हीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. लिहिला अर्थ अवगत जाहला. तुमचे विशीं राजश्री कृष्णराव यांस लिहिलें आहे. तीा राजश्री ——— राव साताऱ्यास गेले आहेत, ते लौकरच येतील आणि तुमची खर्चाची बेगमी व गांवची सनद व हुजऱ्या ऐसें तुह्मांकडे पाठविलें जाईल. आपलें समाधान असों देणें. तुह्मीं फिरङ्गीयाचे परम शत्रू आहां. हें फिरङ्गीयास फारच असह्य; यास्तव तुह्मीं फिरङ्गियाचे सरहद्देपासून चहूंपांचां कोसांवर राहणें. त्यांच्या जवळ न राहाणें. बेलापूरचा मजकूर लिहिला, तर तेंहि राजकारण राखून ठेवणें. तीर्थरूप आलियावर येविषयींचा विचार करणें तो केला जाईल. जाणिजे. आपलें वर्तमान वरचेवर लिहित जाणें. छ १९ जिलकाद. आज्ञा प्रमाण.

(लेखन-सीमा.)

(७.) अखण्डित लक्ष्मी अलङ्कृत राजमान्य राजश्री
अन्ताजी रघुनाथ गोंसावी यांस——

सेवक बाजीराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुरुसन इसन्ने सलासिन मया व अलफ. (शके १६५३.) तुह्मीं विनन्तिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. लोकांचे (फाटून गेलें) एक हुजऱ्या पाठवावा, व गांव राहावयास देववावा ह्मणून लिहिलें, तें कळलें, ऐशियास राजश्री कृष्णराव महादेव यांस भेटीस बोलाविलें आहे. ते येतांच तुह्मांस गांव नेमून देऊं (न) व लोकांची बेगमी करून देणें ते देऊं. आपलें समाधान असों देणें. वरकड राजश्री सखोजी आङ्ग्रे सरखेल यांजकडील वेठबेगारीचा उपसर्ग लागतो. तेविषयीं मशारनिल्हेस लिहिलें आहे. याउपरी वेठबेगारीचा उपसर्ग देणार नाहींत. आपलें

वर्तमान वरचेवर लिहित जाणें. छ २४ जिलकाद. आज्ञा प्रमाण.

लेखन-
सीमा.

(८.) अखण्डित लक्ष्मी अलङ्कृत राजमान्य राजश्री
अन्ताजी रघुनाथ गोंसावी यांस—

सेवक बाजीराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुहा इसन्ने सलासिन मया व अलफ (शके १६५३.) तुह्मीं विनन्तिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. साद्यन्त वर्तमान कळलें. कित्येक आपल्या परिवाराचा विचार लिहिला तो विस्तारें निवेदन जाहला; ऐशियास तुह्मीं जो मजकूर लिहिला तो यथार्थच, परन्तु यन्दा स्वारींतून आलियावरी तमाम लोक आपल्या घरीं गेले आहेत. दुसरी गोष्ट राजकार्यभागानिमित्त राजश्री स्वामींच्या दर्शनास स्वार होऊन गेलों. यास्तव तो प्रस्तुत योग घडत नाहीं. सातारियाहून फिरून पुण्यास आलियावरी तुह्मांस भेटीस बलाऊन कार्यभाग केला जाईल. तूर्त तुह्मीं अहां तैसेंच असणें. पुढें इकडील सुरू कार्य केलें जाईल. खातरजमा असों देणें, जाणिजे. छ ४ जिल्हेज.

लेखन-
सीमा.

(९.) श्रीमन्त राजश्री पन्त प्रधान
स्वामींचे सेवेसीं—

आज्ञाधारक खण्डोजी माणकर चरणावर मस्तक ठेऊन साष्टाङ्ग दण्डवत. विज्ञापना तागाईत छ २ रविलाखर पावेतों स्वामींच्या कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष—रा। अन्ताजी रघुनाथ यांहीं पूर्वीपासोन सेवा चाकरी केली. फिरङ्गाणच्या मनसुब्यामुळें हैरान(ण) फैरोशान जाहले. ठाणें घ्यावें ह्मणोन सेवकास रवाना केलें. तेव्हां अन्ताजी रघुनाथ व अणजूरकर व उतेकर बरोबर दिल्हे. त्यांत तिघांनीं आव म्हणावा तैसा धरिला. सेव-

कानें तिघांस हातीं धरून, यद्यपि एकाचे हातून जाहलें तर एकाचे हातून कार्यसिद्धता करावी. त्याचप्रों तिघांनीं आत्र धरून कार्य सिद्धता स्वामींचे पुण्यप्रतापेंकरून जाहली. त्यास अन्ताजीपन्ताची वाजवी गोष्ट कोणी न ऐकत, यास्तव आपले जागां श्रमी होऊन घरीं बसले आहेत. साम्प्रत स्वामी पुण्यास आले ह्मणोन दर्शनास आले आहेत. यांचें तोण्ड अफाट, मुळें दरबारांत यांचे पदरीं खटाई पडली. गांवसींव मुतलख प्राप्त व्हावा तो न जाहला. आजपावेतों श्रीमन्त राजश्री आपास्वामींनीं कृपा करून चालविलें. या उमेद रक्षून यांचे हातून काम काज घ्यावें. हे इतकेंच इच्छितात कीं, धण्याचे पुण्यप्रतापें फिरङ्गाण सुटावें, म्हणजे आपलें वतन सुटेल. हा हेत स्वामींचे प्रतापें सिद्धीस पावेल. सन्देह नाहीं. परन्तु यांचा अव्हेर न होई, तो अर्थ करणार स्वामी धणी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

## परिशिष्ट (ए*)

## वे रा० रा० अन्ताजीपन्त कावळ्यास पेशव्यांनीं दिलेला कौल.

### हिजरी ११४४ (शके १६५३ इ. स. १७३१.)

शिक्का काजीमहंमद

المتبعک
شریعت اللہ
العاصم خادم شرع
قاضي محمد قاسم
سنہ ١١۴۴

कासम याचा हिं० ११४४.

सर्वानुमतें सर्वांच्या साक्षीनें ही मोहर केली आहे.

باقرار مقرین مرقوم المتن مُہر نمودہ شد

श्रीमन्त राजश्री अन्ताजीरघुनाथ व रामचन्द्र रघुनाथ व जगजीवन रघुनाथ सरदेसाई व सरदेशपाण्डे.

---

* ही अस्सल सनद मोडी लिपींत असून ती वे. रा. रा. बाबा भाऊ कावळे पैठणकर हल्लीं वस्ती ठाणें ह्यांजपाशीं आहे.

मोकदमान्, व ह्मातारीयांन्, व मढवीयांन्, बरेयांन्, मुजारीयांन्, व समस्त जमीदारांन् प्रा १४ बीा काा वसई बाहदरपूर किा सोपारा प्रगणे मालाड व प्रा मरोळ व माहीम मुम्बई, उरण, भोंरै व प्रा शहाबान, खैरणे, प्रा पञ्चनद व प्रा आठगांव, अणजोर व प्रा काह्मणखांच, सायेबान व प्रा मनोरा व किल्ले प्रा असेरी व प्रा माहब प्रा केळवेंमाहीम, व प्रा तारापूर व प्रा ओवळी व प्रा कामण सदरहू प्रमाणें प्रा शिरगांवासुद्धां इसन्ने सलासिन मया व अलफ (शके १६५३.) महजर लिहून दिल्हा ऐसाजे, तुमची देशमुखी व



देशपाण्डेगिरीचा हक्क, लवाजिमा वगैरे पट्टी, पासोडी, पञ्चोत्रा माण्ड-वटक्का, घटिका, पाट, अन्त्रपट, विडा, टिळा, पद, प्रायश्चित, साटबाट व दरबिघा कुडव (१) एक साली (शाली-भात) व कुळबाब, कुळ-कानू, याप्रमाणें व शिलोत्रे दरगांवास शेत १, जमीन बिघे २ याप्रमाणें पूर्वापार बादशहा सुलतान अल्लाउद्दीन गाजी शहर बेदर, खास मोहर सनद सन ८२४ भोगवटा चालत आला, त्याजपुढें बादशहा सुलतान बाहदर निजामशाही सन ९२४ त्यापुढें मुलकांत फिरङ्गी-यांचा अम्मल जाहला. त्यास पूर्वापार प्रमाणें तुमचा हक्क, लवा-जिमा, बासतांवरे बोस बस्तियांव पुर्तुगाल त्याजपूर्वापार सनद बमुजीब सनद खास करून दिली. फिरङ्गी सन १५८० पन्धराशें ऐंशींमध्यें करून दिली ते समयीं गोंव्यांमध्यें विजुरे मतीस अलबूकेर्क, त्यानें अम्मल सुरळीत दिला. त्याउपरी सन १६११ मध्यें बादशहा फिलीप याची सनद जाहली. कुळबाब, कुळकानू, भोगवटा, लुईलारेस दतावर विजुरे गोंव्यांमध्यें होता त्याणें चालविला. यावर रेंबोजांव बादशहा याणें सन १७१४ मध्यें पुन्हा सनद पाठविली. वतन कुळबाब, कुळकानू वासकु अैनोद सिनोर देमिनेंज विजुरेनें अम्मल सुरळीत दिला. त्यामध्यें ज्यांव् सालबान् दि गामा विजुरे बन्दर गोंवा, त्यानें सनद करून दिली, व सर्व मोकासदारांच्या हातचीं लिहिलीं घेऊन दिल्ही कीं, एक लवाजिमा, कुळबाब, कुळ-

कानू, चालवावयास मुजाहीम होईल, त्यास दण्ड होन (५००) पांचशें; ऐसे धाण्डोरे अहद् मुम्बई तहद् दवण पिटिले. त्यास सर्व जनास मशहूर असे. ऐसें सुरळीत चालत असतां, अकस्मात् श्रीमन्त राजश्री कृष्णरावजी सुभे कल्याण स्वामी यांचा व फिरङ्गी यांचा बिघाड जाहला. सुरसन इहिद्दे सलासिन मया व अलफ मध्यें (शके १६५२.) जाहला, त्यास घांटावरून राजश्री पिलाजी जाधवराव आले. त्यांणीं छ १७ जिलकादीं काम्ब्याचा कोट फत्ते केला. मुलूख १२ प्रगणा काबीज केला. त्यास जेव्हां मुलकास कौल सादर करूं लागले, मग आपुली अड घातली कीं, आमच्या देशमुखाशिवाय आपुला कौल न घेऊं, तेव्हां तुह्मांखेरीज कौल आपुला न घेतला. मग तुह्मांस आणून तुमचे हातीं कौल घेतला. त्यास तुह्मांस सनद श्रीमन्त राजश्री मुख्य पन्त प्रधान स्वामींहीं पाठविली. सन इहिद्दे सलासिन मया व अलफ (शके १६५२.) छ ६ मोहरमीं सादर केली. त्याप्रमाणें पूर्वापारप्रमाणें तुह्मीं उपभोग केला. त्यास हल्लीं सुा इसन्नेमध्यें (शके १६५३.) मुलूख उजाड पडला. तेव्हां सन मजकुरीं माहे सवालमध्यें सल्ला जाहली. मग आम्हीं विनन्ति करून श्रीमन्त राजश्री पन्त मुख्य प्रधान स्वामींचा कौल आणविला, कां जर, बेशक् वसाहत करावी; त्यास छ ९ सव्वालीं कौल सादर जाहला. त्यावरून आम्हीं वसाहत केली. तर हल्लीं तुमचा हक्क व लवाजिमा बिलकूल कुळबाब कुळकानू बिलाहुजूर देऊन पूर्वापार चालत आला त्याप्रमाणें देत जाऊं. व यास नोदिगत नाहीं.

### सदर्हू देह झाडा प्रान्त पञ्चनद.

(खालीं लिहिलेल्या सर्व देहझाड्यांस निशाण्या नांगरांच्या आहेत.)

### प्रान्त खेरणे बिा देह झाडा.

बापोजी पाटील प्रा मजकूर. महाद पो मौजे अडावली.
बाळ धरत मौा माहर्दे. फुग ह्यात्रा मौा सारवणें.
भिक ह्यात्रा मौा नेरूळ. बाळ ह्यात्रा मौा कारावें.

बांग ह्मात्रा मौजे बुहवें.
बाळ पो मौा कूलासेत.
महाद ह्मात्रा मौा तुरभें.
नाम पो मौा तळोली.
बाळ ह्मात्रा मौा राबारें.
बाळ पो मौा चिञ्चवली.
गोम पो मौा अहिराळी.
धाक पो मौा सालवण.
नाम ह्मात्रा मौा परसाङ्ग.
तुक पो मौा त्रांसी.
ह्माद पो मौा बोरवली.
सैदजी पो मौा कळवें.
वोस पो मौा अगवली.
बेंड पो मौा टेंभोली.
काळ पो मौा मालवणे.
बाबु नाईक पो मौा सायबान.
धाकुल पो मौा घणसोली.
उन्दीर पो मौा तेंटोली.
महाद पो मौा गोठवली.
बाळ पो मौा दिवें.
गोम ह्मात्रा मौजे दिघें.
राम पो मौा खरार.
चाहू दळवी मौा खडकवली.
हर पो मौा जुहूं.
जोम पो मौा बोडसारी.
हद्या कोळी मौा ईटावें.
जैत पो मौा अगरोळी.
हरी कोळी पो मौा दिवाळें.

## प्रान्त मालाड, देह झाडा.

नामजी ठाकूर मौा विरखोप,
जिवनजी देसला मौा कुर्लें.
गोवर राउत मौा तळोजें.
आल ह्मात्रा मौा दिडोसा.
उढ ह्मात्रा मौा वान्दरें.
आल चौधरी मौा कुहर.
आल ह्मात्रा मौा आलें.
चाङ्ग ह्मात्रा मौा वोळणें.
बाद राउत मौा बरोली.
तुङ्ग ह्मात्रा मौा बावभोई.
बाळ ठाकूर मौा मागाटण.
विट पो मौा एकसार.
येसजी वा माइजी मौा प्रभाळी.
रत्नोजी ताण्डेल मौा वोलबडी.
उन्दीर कोणी मौा मालाड.
लख मुरल्या मौा चिञ्चवली.
मतेस मालो मौा भोरवली.
गोम ह्मात्रा मौा थेडें.
बापोजी ठाकूर व भान ह्मात्रा मौा गोरगाउ.
हर कोळी व गोवर कोळी मौा वडवन.
चाङ्ग चौधरी मौा कान्धवळ.
हर पो मौा सिम्पाळें.

तुक राउत मौा वोझिरवें.
त्रिम्बक ठाकूर व जैत भोईर मौजे दहींस.
वाल ठाकूर मौा इरङ्गळ.
हरजी पो मौा वेसावें.
लोरेस पो मौा वान्धवली.
जिव पो मौा मिरें.
गोजू पो मौा घोडबन्दर.
वाम्भ पो मौा चेणें.
गोंवर पो मौा मुडधें.
केव राउत मौा उत्तन.
मदन पुरी मौा मनोरी.
रामजी पो मौा आकसें.
अन्तोन दिगार मौजे पोंइसर.
बाळको सबजी पो मौा बोबळें खाडी.
येस झात्रा मौा काईसर.
हर पो मौा वेउर.
गोम पो मौा कोलशेत.
हरपो मौा कन्हेरी.
हरजी पो मौा बोरवली.
किस्तो पो मौा मन्डपेसर.
गोवर किणी मौा कान्दर.
आनाजी मौा मढ.
कान्होजी पो मौा जुहूं.
तुप्या मौा वणेरें.
गोम पो व गोवर राउत मौा कासी.
येस पो मौा वरसांव बोरभाट.
लाडकोजी ठाकूर मौा भांयदर.
हरक पो मौा तळावलीडोङ्गरी.
नामजी राउत मौा गोन्हई.
हरजी पो मौा मरवें.
बाद पुर व मौा मालवणी.
बळतीजार फरास मौा आकुली.
राम शेट मौा वडवली.
राम पो मौा चितळसर.
सिंमाव पो मौा दुरफळी.
झुजे वियर पो मौा माझुडें.

## प्रान्त पञ्चनद.

गण झात्रा को मजकूर.
धाग पो मौा भण्डारी.
नाव झात्रा मौा किरवली.
वाळ पो मौा बातिवली.
गार झात्रा मौा घारिवली.
बापुजी पो मौा करेस.
जावळ झात्रा मौा आगसणें.
लडकोजी पो मौा डावलें.
जावजी पो मौा खारघर.
बाळ पो मौा दिवें.
रामजी पो मौा उसरघर.
केर पो मौा नागावें.

खेद पो मौा दहींसर.
नाग ठाकूर मौा अतगांव.
भिक ह्मात्रा मौा दिसरवें.
राध ह्मात्रा मौा भोंपर.
गण ह्मात्रा मौा दिडकाली.
धाक ह्मात्रा मौा लकुरडी.
राम ह्मात्रा मौा गोठें.
पट ह्मात्रा मौा पडलें.
महाद पो मौा हेडिवळी.
बाम मढवी मौा निळजें.
धाम ह्मात्रा मौजे सोनी.
धाक पो मौा ह्मात्राड.
बाळ पो मौा उठाड.
सेखजी पो मौा ठाणें.
राध ह्मात्रा मौा मुरम्बी.
गण ह्मात्रा मौा कोपर.
धागह्मात्रा मौा पाली.
हासघरत मौा कोळें.
रामजी नाईक मौा बेलपाडा.
जोम पो मौा कोम्बडपाडा.
आम्ब पो मौा सन्दपणी.
बामल पो मौा सोमाली.
धाग पो मौा असदेस.
उकीर पो मौा नेवाली.
सेखजी पो मौा देसई.
जबर ठाकूर मौा डोबवली.
जान ह्मात्रा मौा नादिवली.
काल ह्मात्रा मौा साल.
धाग भोईर मौा डायवर.
धाक ह्मात्रा मौा उम्बरसावें.
हळ ह्मात्रा व बाव पो मौा अहिरेपाथरली.
चाहू पो मौा खोतसरें.
जाम चोधरी मौा चाळें.
कृष्णाजी पो मौा धानसर.
सीम्ब्रा पो मौा बीड.
पोस पो मौा धरबें.
कमळ ह्मात्रा मौा पेठ.
धाकोजी भोईर मौा उम्बराळी.
फुण्ड भोईर मौा आगरली.
आमचोधरी मौा कांटई.
जाम पो मौा वाघिवली.
माहाद पो मौा साम्बें.
जोम ह्मात्रा मौा देसई.
गोम ह्मात्रा मौा रोहिनग.

## प्रान्तमरोळ देहझाडा.

राम ठाकूर कौा मजकूर.
मनेलसोज मौा मोरवसा.
अन्तोन पो मौा साखी.
सिंमा व सोज मौा नवघर.
अन्तोन पो मौा आंखी.
सायेल ह्मात्रा मौा चेनोली.

लोरेसविईर मौा तुङ्ग्वें. बाळझात्रा मौा वापनाळें.
धेवग्वास मौा महंमदपुरी. लखम भोईर मौा चाकाळें.
बात्रतीस पोा मौा साहर. हडझात्रा मौा कोलें कल्याण.

---

अखण्डित लक्ष्मी आलङ्कृत राजमान्य राजश्री
अन्ताजी रघुनाथ गोंसावी यांस—

सेवक बाजीराव बल्लाळ प्रधान. नमस्कार. सुरुसन सलास सलासिन मया व अलफ. (शके १६५४.) तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. कार्याचा मजकूर वेसना समुदाय पाहिजे त्याचा अर्थ विस्तारें लिहिला तो कळला. व कित्येक अर्थ राजश्री केशव लिङ्गोजी यांणीं विदित केला. ऐशियास कार्य करावें हें अत्यावश्यकच आहे. जागांजागां जमाव गुन्तला आहे, तो मोकळा करून आणावयास पौर्णिमेची सन्धी अनकूळ पडत नाहीं. याजकरितां जमाव जमा करून अमावास्येस कार्यभाग निश्चयरूप करावाच. जमाव व फौज तयार करीत असों. तुम्हीं लागभाग, वाटीतिटी, हवेलागे, दोरेसारे, राजश्री वासुदेव जोशी याचे निदर्शनास आणून देणें. अतःपर कार्य कर्तव्यच. दुसरा विचार नाहीं. जाणिजे. छ ९ रमजान. आज्ञा प्रमाण.

(लेखन-सीमा.)

अखण्डित लक्ष्मी अलङ्कृत राा राजश्री
अन्ताजी रघुनाथ गोंसावी यांस—

सेवक बाजीराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुा खमस सलासिन मया व अलफ (शके १६५६.) तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. ज्याचे तेच होऊन कार्यभाग करावयास सिद्ध आहेत, परन्तु द्वितीय दिवशीं स्वामींनीं पदात सैन्याचें साहित्य येऊन पोंहचेसें केलें. यांनीं स्वामींचें ध्वजारोहण होतें. सैन्य पाठविणें तें आगोदर 'र'

कारग्रामीं पाठवावें. ह्मणजे नेमिल्यानियमाप्रमाणें कार्यभाग सिद्धीस पावेल, ह्मणोन कित्येक तपशील लिहिले. ते लोक आले, ऐशी-यास तुह्मीं लिहिला मनसुबा बहुत उत्तम आहे; परन्तु याचा विचार बहुत चौकशीनें करणें तो आधीं करून जेथील तेथें ठाकठीक करून रवानगी करावी लागते; तरी तुह्मीं बहुत बहुत जलदीनें हुजूर येणें. एक पळाचाहि, विलम्ब न लावितां येणें. विचार करून टांकोटांक तेचक्षणीं तुमची रवानगी करून एक घडी तुह्मांस ठेवणार नाहीं. तरी बहुत बहुत त्वरेनें येणें. जाणिजे. छ ९ मोहरम. आज्ञा प्रमाण.

लेखन-सीमा.

अखण्डित लक्ष्मी अलङ्कृत राजमान्य राजश्री
अन्ताजी रघुनाथ गोंसावी यांस—

सेवक बाजीराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुा खमस सलासिन मया व अलफ. (शके १६५६.) तुह्मीं विनन्तिपत्र पाठविलें तें (?) कित्येक कार्याची सिद्धता केली आहे. हवेव* मगें भमी होतात आह्मांपाशीं येतात. तीन ठिकाणें एकेच येलगारानें हस्तगत होऊन द्रव्य अमित मिळतें. आणि स्वामीकार्य ह्मणोन चित्तावरीं घेत नाहीं. तें नकळे. याउपरी यांच्या तुमाच्यांत कार्य जाहलें तरी जाहलें, उप्रान्तिक होत नाहीं. त्याचें आरमार येऊन बन्दोबस्ती होईल, ह्मणोन कित्येकविस्तारें लिहिलें तें कळलें. ऐशियास तुम्हीं लिहिलेला अर्थ यथार्थच असे, तुम्हीं साहस करितां कमी न केली, मग सिद्ध करणें तें केलेंत; परन्तु चारी गोष्टी एकावच्छेदें करीन ह्मटल्या, परिणाम कैसा लागेल? विचारें कर्त्तव्य तें करावें लागतें. तरी तुम्हीं आधीं येथें येणें. सर्व हरिद्र चित्तांत आणून तुमचेच विचारें आज्ञा कर्तव्य ते केली जाईल. सारांश तुम्हीं येथें येणें. फकरुद्दीन पाटेल व सैयद अली शाबासकर यांस कौल

* व्हेवलांगें=विव्हलांगें. दुसरापाठ=हवेमांगे=गांवांतील लोक.

पाठवावे ह्मणोन लिहिलें, त्याजवरून तुमच्या लिहिल्याप्रमाणें कौल पाठविले असत. जाणिजे. छ ७ सफर. आज्ञा प्रमाण. (लेखन-सीमा)

आज्ञापत्र राजश्री बाळाजीबाजीराव ता मोकादम निवर यांनीं प्रान्त फिरंगाण सुरुसन सीत सलासिन मया व अलफ. (शके १६५७) राजश्री अन्ताजी रघुनाथ सरदेसाई व सरदेशपाण्डे, प्रान्त मजकूर यांचा सुदामत हक्क, लवाजिमा व भोगभोगवटा चालत आला आहे त्याप्रमाणें चालवीत जाणें, ह्मणून तीर्थरूप राजश्री पन्तप्रधान यांचे पत्र सादर आहे, त्याप्रमाणें चालवीत जाणें. यास खलेल करावयास गरज नाहीं. जाणिजे. छ १७ माहे सवाल. आज्ञा प्रमाण.

---

॥श्री॥ मा अजम रामचन्द्ररघुनाथ, व गणेशरघुनाथ व अन्ताजी-रघुनाथ, सरदेसाई व सरदेशपाण्डे, प्रान्त फिरंगाण, यांस बाजीराव बल्लाळ प्रधान सुरुसन इहिद्दे अर्बैन मया व अलफ (शके १६६२) प्रान्त मजकूरचे सरदेसाई व सरदेशपाण्डेपणाचें वतन तुमचें पुरातन आहे; त्याप्रमाणें तुह्मांस हुजूरच्या सनदा आहेत, त्याप्रमाणें करार केले असे; तरी तुम्हीं वतन सदहूप्रमाणें अनुभव करणें. कोणी इस्कील करील त्यास करावयासीं प्रयोजन नाहीं. जाणिजे. छ ६ माहे मोहरम पा हुजूर.

---

अखण्डित लक्ष्मी अलङ्कृत राजमान्य राजश्री
अन्ताजी रघुनाथ गोंसावी यांस—

सेवक चिमणाजी बल्लाळ नमस्कार. इहिद्दे अर्बैन मया व अलफ. शके (१६६२.) तुम्हीं विनन्तिपत्र पाठविलें तें पावलें. फिरंगाणचे मनसुबीयाचा मजकूर प्रारम्भापासून शेवटपर्यन्त लिहिला व आपले अन्नवस्त्राचा अर्थ लिहिला, तो सविस्तर कळला. ऐशि-

यास प्रस्तुत लष्करचे रवानगीचा गवगवा आहे. लष्कर रवाना जाहल्यावर खासा स्वारी कोंकणप्रान्तीं होईल. तुमचा सर्व अर्थ ध्यानांत आणून आज्ञा करणें ती केली जाईल. जाणिजे. छ २९ रज्जब. आज्ञा प्रमाण.

(लेखनसीमा.)

---

## परिशिष्ट (ऐ*).

## वे. रा. रा. विष्णुभट्ट पुरोहितास दिलेली सनद. शके १६५५ ( ई० स० १७३३. )

(श्री. विसाजी गोविन्द.)

आज स्वारी राजश्री विसाजी गोविन्द नामजाद.

प्रां फिरङ्गाण किल्ले तान्दुळवाडी—

ता विष्णुभट्ट पुरोहित बिन् केसोभट्ट वा तान्दुळवाडी व येडवण सुा आर्बा सलासिन मया व अलफ (शके १६९९) भट्जी मजकूर स्वारी मजकुरीं येऊन विदित केलें कीं प्रां मजकुरीं गांव गंना ज्योतीष व उपाध्येपणाची माझी वृत्ति आहे त्याचें वतन सम्बन्धें मागील फिरङ्गी राज्यांतील कागदपत्र होते परन्तु गलिमाई (बण्डा) मुळें परहस्तगत जाहले सबब वृत्ति मजकूरचा बन्दोबस्त होऊन सुदामत चालवीत आलीयास हरएक गोष्टीचा अडथळा नहोई तें केलें पाहिजे. त्याजवरून भट्जी मजकूर यांचे वृत्ति मजकूरची चौकशी करितां सालाबाद उत्पन्न ज्योतीष व उपाध्यिकपणाचा भोगवटा आजपावेतों निमोनिम करीत आले त्या प्रों मनास आणोन नांव निशीवार किता.

---

* ही अस्सल सनद मोडी लिपींत असून ती वे. रा. रा. नारायण, काशिनाथ, आणि अमृतराव सखाराम आचार्य पुणताम्बेंकर हल्लीं वस्ती भिवण्डी यांजवळ आहे.

| किता. | | किता. | |
|---|---|---|---|
| १ | तान्दुळवाडी. | १ | खडकवली. |
| १ | कलटेण. | १ | उचकवली. |
| १ | नवघर. | १ | भादवें. |
| १ | चटाळें (पुढें लागत नाहीं). | १ | येडवन. |
| ४ | | ४ | |

सदर्हू गांव येणेंप्रों ज्योतीष व उपाध्येपणाचा उपभोग विष्णुभट्ट यांणीं वंशपरम्परा सुखरूप करीत असावा जाणिजे. छ ३ जिलकाद.

मोर्त्तब सुद.

---

परिशिष्ट (ओ*).

## वे. रा. रा. तुकम्भट्ट धर्मभट्ट जावळे अग्निहोत्री पळशीकर ह्यांचें अग्निहोत्र वसई मुकामीं पुन्हः चालू करण्याविषयीं नासिक व त्र्यम्बक येथील समस्त ब्राह्मणांनीं सदर्हू पळशीकर अग्निहोत्र्यांस दिलेलें सम्मतिपत्र.

शके १६६८ (इ० सन १७४६.)

श्रीमच्चतुर्युगप्रख्याताद्यगङ्गाभिख्यानिदानजनस्थानक्षेत्रनिवासिनिखिलागमनिगमतत्त्वज्ञानविशारदधर्माधिकारीप्रमुखर्क्शाखीययजुःशाखीयविद्वत्सभायां नासिकत्र्यम्बकक्षेत्रवृत्तिब्राह्मणान्निकषाऽन्तशर्म्मादिपूर्वजदत्तयाजमानवृत्ति-पत्रेषु तत्प्रतिनिधिषूभयक्षेत्रवृत्तिब्राह्मणपूर्वजलिखितेषु च लिखितं तुकम्भट्टयजुःशाखीयब्राह्मणपिता धर्मभट्ट इत्यादि पूर्वजपथप्रणाल्याविगीतपरस्परनमस्कारानुष्ठानवेदाध्ययनादिशिष्टाचारादिप्रमाणसिद्धं तेषु विप्रत्वं ननु सति कुड्ये चित्रमिति

---

* हें अस्सल सम्मतिपत्र देवनगरी लिपींत असून तें, वे. रा. रा. रावजी रामचन्द्रभट्ट जावळे पळशीकर हल्लीं वस्ती दादर (मुंबई) ह्यांजकडेस होतें तें, वे. रा. रा. बाबामोरेश्वरभट्ट पाठक पञ्चानन नगर हवेलीकर हल्लीं वस्ती मुम्बई ह्यांनीं ह्या ग्रन्थकाराकडेस आणून दिलें, तें अद्यापि ग्रन्थकाराकडेसच आहे.

न्यायेन शिष्टाचारस्य प्रामाण्ये तदुल्लङ्घनं दोषापादकं तदेव नसम्भवतीति चेन्न सहस्तोमाः सहछन्दसऽआवृतः सह प्रमाऽऋषयः सप्तदेव्याः । पूर्वेषां पन्थामनुदृश्यधीरा ऽअन्वालेभिरे रथ्यो न रश्मीनितिदान्नातंयि माध्यन्दिनशाखोदाहृतश्रुत्या तेन स्वाध्वंतेवततउनोधि वोचतमानः प्रथः पित्र्यान्मानवादधिदूरं नैष्टपरावतेति ऋचा ॥ चतुर्णामपि वर्णानामाचारो धर्मपालकः । आचारभ्रष्टदेहानां भवेद्धर्मः पराङ्मुख इत्यन्वयव्यत्तिरेकाभ्यां पाराशरेण-येनास्य पितरो याता येन याताः पितामहाः । तेन यायात्परं मार्गमन्यथा स पतिष्यतीति स्मृतिदर्पणे । मनुना- यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः । स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तत इति श्रीभगवदुक्त्या-तर्काप्रतिष्ठाः श्रुतयो विभिन्ना नैको ऋषिर्यस्य वचः प्रमाणम् । धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां महाजनो येन गतः स पन्थाः इति भारतोक्त्या॥ वेदोऽखिलो धर्ममूलं तद्विदां च स्मृतिशील इति पूर्वमीमांसया बहिस्तूभयतः स्मृतेराचाराच्चेत्युत्तरमीमांसायां व्यासोक्त्या च शिष्टाचारप्रामाण्यव्यवस्थापनात् अतएव शिष्टाचारोल्लङ्घने तन्मूलभूतस्मृतिश्रुत्युल्लङ्घननिबन्धनो दोषो भवत्येव । आचाराच्च स्मृतिं ज्ञात्वा तथा च श्रुतिकल्पनमिति पूर्वमीमांसायां वार्तिकोक्तेः ॥ तथाचानिष्टापादकशिष्टाचारोल्लङ्घनं न कार्यं शिष्टाचारस्य धर्मस्य दूषको राक्षसो भवेदिति सूतसंहितायां सूतोक्तेः ॥ नच तथा सति जामदग्न्यः स्वजननीं जघान शुनःशेपः स्वजनकं तत्याज याज्ञवल्क्यस्त्वाचार्यं तत्याज इन्द्रो गौतमवधूं जगाम ब्रह्मा स्वसुतां जगाम इन्द्रस्त्रिशीर्षं ब्राह्मणं जघान क्षत्रियो बलदेवः सुरां पपौ सोमो गुरोर्भार्यां जहारेत्यादि सदाचारानुसारात्तान्यप्याचरणीयानि स्युरिति वाच्यं ॥ यान्यनवद्यानि कर्माणि तानि सेवितव्यानि नो इतराणीति तैत्तिरीयश्रुत्या शास्त्रलोक निन्दारहितानामाचाराणां कर्तव्योक्तेर्मातृवधादीनामवद्यानां निषेधनाच्च ॥ ननु तथापि अन्यैः कृतान्यवद्यानि न कार्याणि महद्भिः कृतानि तु कार्याण्येव शिष्टाचारत्वाविशेषात् श्रुतौ तु-सामान्यतोवगीतानां निषेधनाच्चेति चेन्न । यान्यस्माकं सुचरितानि तानि त्वयोपास्यानि नो

इतरागीत्यन्तरश्रुत्यानवगीताशिष्टाचाराङ्गीकारस्यावद्यशिष्टाचारान - ङ्गीकारस्य च बोधनात् एतदनुष्ठनाचारस्य क्वाप्यविगानाच्च तदुल्लङ्घन-मिष्टापादकं ॥ तथाच श्रुतिस्मृतिसदाचारसिद्धविप्रत्वाद्विप्रधर्मप्रतिब-न्धकयावनादिनिरासाद्विहितषट्कर्मानुष्ठानं तैः कार्यम् ॥ अन्यैरपितद्द्वेषो न कार्यः ॥ तद्द्वेषे-गतश्रीर्गणकान्द्वेष्टि गतायुश्च चिकित्सकम् । गत-श्रीश्च गतायुश्च ब्राह्मणान्द्वेष्टि भारतेति भारते दोषोक्तेः ॥ तेषां शप-नमपि न कार्यं ॥ तेषां शपने-मातरं पितरं श्वश्रूं गुरुं देवं तथानलम् ॥ विप्रं गां यतिनं नारीं शपने सर्वदा नरः ॥ यो वर्तते सदा तात स-विप्रोऽल्पज्ञ इतीरितः ॥ तस्यैव निष्कृतिर्दृष्टा मुनिभिर्धर्मवित्तमैः ॥ प्रत्यहं दोषशान्त्यर्थं महापातकनाशनम् । तण्डुलानल्पमात्रेण पच-यित्वा चरुं मुदा ॥ भक्षयेद्देवतोद्देशे मण्डलेन विशुध्यति ॥ अन्यथा दोषमाप्नोति यथा शूद्रस्तथैव स इति हेमाद्रौ लिङ्गपुराणे दोषोक्ते-रनुतापे प्रायश्चित्तोक्तेश्च ॥ तेषां वृत्तिहरणमपि न कार्यं-स्वदत्तां पर-दत्तां वा यो हरेच्च वसुन्धराम् । षष्टिवर्षसहस्राणि विष्ठायां जायते कृमिः ॥ एकैव भगिनी लोके सर्वेषामेव भूभुजानां न भोज्या न कर-ग्राह्या विप्रदत्ता वसुन्धरेति देवलस्मृत्या ॥ ग्रामं वा क्षेत्रपात्रं वा केदारं भूमिमेव वा । विप्रादीनां हरेद्राजा यमलोकमुपागमेत् ॥ पश्चा-द्भुवमुपागम्य कृमिराशिर्भवेन्मले ॥ इति देवस्वामिभिः ॥ तथा महा नारदीये-क्षेत्रं ग्रामं तटाकं वा वनं केदारमेव वा । भूमिं वा विप्रदत्तां वा यो राजा प्रभुतांशवान् ॥ हत्वा स नरके राजा कीटोऽभून्मल-मध्यतः । तस्यैव निष्कृतिर्दृष्टा महापातकनाशिनी ॥ क्षेत्रं हत्वा षडब्दं स्याद्ग्रामे चान्द्रायणं स्मृतम् । तटाके तद्द्वयं प्रोक्तं वने चैव तथा चरेत् ॥ केदारे तप्तकृच्छ्रं स्याद्भूम्यां चान्द्रत्रयं स्मृतम् ॥ एतदेक-वारहरणविषयं बहुवारे तद्द्विगुणं ॥ प्रत्यब्दं फलस्वीकरणे ब्रह्मह-त्याप्रायश्चितमर्हतीति हेमाद्रौ निषेधोक्तेरनुतापे प्रायश्चित्तोक्तेश्च ॥ तस्माद्वेदाध्ययने-बह्वल्पं वा स्वगृह्योक्तं यस्य कर्म प्रकीर्तितम् ॥ तस्य तावति शास्त्रार्थे कृते सर्वः कृतो भवेदित्यनुशासनाद्वाजसनेयिभिः कात्यायनसूत्रानुसारेण श्रौतस्मार्तानुष्ठानं कार्यम् अन्यथा दोषोभिहितः॥

हेमाद्रौ मरीचिः—पूर्वजः शुचिरासीनः स्वगृह्याग्नौ यत्नैर्मुदा ।। अग्नि-मग्निं समुद्दिश्य हुत्वा लोकमवाप्नुयात् । अन्यथा दोषमाप्नोति प्राय-श्चितीयते द्विजः ।। तत्रैव जातूकर्ण्यः—यस्तु स्थितायां भार्याया-मग्निं त्यजति मूढधीः । अनग्निक इति ख्यातः सर्वकर्मबहिष्कृत इति ।। तथाच तत्रैव मनु :-अकुर्वन्विहितं कर्म नित्यशो व्रतमाचरन् ।। प्रसज्यते क्रियार्थेषु प्रायश्चित्तीयते नरः ।। तथाच याज्ञवल्क्यः- विहि-तस्याननुष्ठानान्निषिद्धस्य च सेवनात् । अनिग्रहाच्चेन्द्रियाणां नरः पतनमृच्छन इत्यादि बहुवक्तव्ये विस्तरभयात्कृतं बहुलेखेन ।। न्या-याज्जैमिनिसम्भवानमलधीव्यासेन सन्निर्मितान् ग्रन्थान्धर्ममयानवेक्ष्य च बुधैर्दोषोऽत्र देयो नहि ।। विद्वत्तेतरथा भविष्यति वृथा भेदाकरे हंसता स्तन्यापामिव सन्निवेदयति तान्मान्यानिदं पत्रकम् ।। १ ।। वत्सापुरपळसुलीभटेरिग्रामस्थानां वाजसनेयिनां धर्मस्थापकोऽयं पत्र-लेखः ।। बिकलं बचंभट्ट देवधर्माधिकारी यज्ञेश्वरभट्टप्रभुधर्माधि-कारी शके १६६८.

| | |
|---|---|
| दिनकरभट्ट उपासनी त्र्यम्बककर. | आबाभट्ट कानरकर. |
| संमतं खेडकर त्र्यम्बकभट्टानां. | त्र्यम्बकभट्ट खांदवे. |
| भालचन्द्रभट्ट होसिंग. | चिन्तामणभट्ट पाराशरे. |
| विश्वनाथभट्ट भात्खंडीकरस्य सं० | सकंभट्ट शुक्ल. |
| रघुनाथभट्ट हिङ्गणे. | (अक्षरें गेलीं) भानुशे. |
| चिन्तामणिभट्ट खेडकरस्यैतत्सं० | दिनकरभट्ट पैङ्गे. |
| रामभट्ट आपस्तम्ब.. | पत्रार्थे संमत अनन्ताचार्यः. |
| त्र्यम्बकभट्ट झाटे. | भिकंभट्ट शुक्ल. |
| त्र्यम्बककर मोरेश्वरभट्ट विप्रदास. | शिवभट्ट बेळे. |
| वारोपनामक गोविन्दभट्टानां संमतं | गडीशुक्ल. |
| सदाशिव दीक्षित. | कमळाकर जोशी. |
| पत्राप्रो साक्ष बाबजीभट्ट शौचे. | गिरिगोंसावी गर्गे. |
| बळवन्तराव पण्डितसंमतमिदं. | आपाभट्ट वारे. |
| तोतंभट्ट क्षेमकल्याणी. | पत्राप्रो जयरामभट्ट दीक्षित. |

जोशी बाबजी (पुढें लागत नाहीं).
हरभट्ट खेडकर.
भास्करभट्ट खेडकर.
धोण्डभट्ट कोरान्ने.
नारायणभट्ट फणशे.
हरभट्ट पुरकर.
पत्राप्रो नारायणभट्ट लवाटे.
दामोदरभट्ट खेडकर.
विठोबा लोणकर.
हरभट्ट खेडकर चिमणभट्टि.
गिरभट्ट खेडकर.
दिनकरभट्ट पराडकर.
महादेव दांत्या पत्राप्रो संमत.
ज्योतिर्विदुपनामक चित्तपावन जाती नारायणस्य संमतमेतत्.
हरिदीक्षित पटवर्धन.
नारायणभट्ट कर्वे.
गोपाळभट्ट मोहनी.
विश्वनाथभट्ट डिङ्करे.
गणेश जोशी.
महादेवभट्ट जोगळेकरस्य संमतं.
अनन्तभट्ट भडकम्बकर.
संमतमिदं चिन्तामणि दीक्षितानां टकले इत्युपनाम्नां.
आपाभट्ट चितळे.
कृष्णाग्निहोत्री लेले.
बाळम्भट्ट डोङ्गरे.
जीवभट्ट पोळ.
पत्राप्रो साक्ष तिमया गोंसावी.
रामभट्ट कोटिभास्कर.
गोविन्दाचार्य माण्डवगणे.
सिंहराज वैद्य.

---

## वरील सम्मतिपत्राचा सारांश.

श्रीमच्चतुर्युगामध्यें प्रसिद्ध वृद्धगङ्गा (गोदा) नामक नदीचें मूलस्थान जें त्र्यम्बक व जनस्थान (नासिक क्षेत्र) तेथील निवासी सर्व आगम निगम तत्त्वज्ञानविशारद धर्माधिकारीप्रमुख ऋक्शाखीय यजुःशाखीय विद्वज्जनांच्या सभेमध्यें-नासिक त्र्यम्बक क्षेत्रामध्यें राहणारे ब्राह्मणांपाशीं अनन्तशर्मादि पूर्वजांनीं दिलेलीं यजमानवृत्तीचीं पत्रें आणि त्यांचे प्रतिनिधि उभयक्षेत्रांतील ब्राह्मण यांनीं लिहिलेलीं पत्रें यांवरून लिहिलें जात आहे कीं, यजुःशाखीय ब्राह्मण तुकम्भट्ट पिता धर्मभट्ट इत्यादि पूर्वजांच्या मार्गानुरोधानें प्रसिद्ध परस्परांस नमस्कार करणें वेदाध्ययनादि शिष्टाचार इत्यादि प्रमाणांनीं त्यांच्या ठायीं विप्रत्व सिद्ध आहे. आतां भिन्तीवरील चित्राप्रमाणें

शिष्टाचाराचें प्रत्यक्ष प्रामाण्य आहे आणि त्याचें उल्लङ्घन दोषोत्पादक होय; यास्तव तें (उल्लङ्घन) सम्भवत नाहीं अशी शङ्का घेऊं नये. सहस्तोमाः अशी ऋचा आहे. "चार्‍ही वर्णांचा धर्मप्रतिपालक ह्मटला ह्मणजे आचार. ज्यांचा आचार भ्रष्ट झाला त्यांपासून धर्मपराङ्मुख होतो" अशा अन्वयव्यतिरेकांनीं पराशरानें ह्मटलें आहे "ज्या मार्गानें बाप गेले, आजे गेले, त्या मार्गानें जावें अन्यथा पतन होईल, असें स्मृतिदर्पणामध्यें मनुवाक्य आहे. "जें जें श्रेष्ठजन आचरतो तें तेंच इतरजन आचरतात. तो ज्याप्रमाणें वागतो त्याप्रमाणें इतरजन वागतात" असें गीतेमध्यें भगवन्तांनीं ह्मटलें आहे. "तर्क तर गूढ, श्रुति भिन्न भिन्न, ज्याचें वचन प्रमाण असा ऋषि एकच असें नाहीं; सारांश धर्माचें तत्त्व गुहेंत झांकलें आहे, महाजन ज्या मार्गानें गेले तोच मार्ग अशी भारतोक्ति आहे "धर्माचें मूल अखिल वेद, तो जाणणारांचा आचार ती स्मृति" असें पूर्वमीमांसा ह्मणते. "वेदाच्या बाहेर स्मृति आणि आचार असे दोन आधार" असें उत्तरमीमांसेमध्यें व्यासांनीं ह्मटलें आहे. ह्याप्रमाणें शिष्टाचाराचें प्रामाण्य स्थापित केलें आहे, यावरून शिष्टाचाराचें उल्लङ्घन केल्यानें तन्मूलक श्रुतिस्मृतीचेंहि उल्लङ्घन होतेंच. "आचारावरून श्रुतीची आणि स्मृतीची माहिती करून घ्यावी असें पूर्वमीमांसावार्तिक आहे; तसेंच अनिष्टापादक शिष्टाचारोल्लङ्घन करूं नये. शिष्टाचाररूप धर्माला दूषण देणारा मनुष्य राक्षस होतो" असें सूतसंहितेंत नारदानें ह्मटलें आहे. असें जरी आहे, तरी जामदग्न्यानें आपल्या मातेस वधिलें; शुनःशेपानें स्वपित्याला त्यागिलें; याज्ञवल्क्यानें आचार्याला त्यागिलें; इन्द्रानें गौतमवधूशीं गमन केलें; ब्रह्म्यानें स्वसुतेशीं गमन केलें; इन्द्रानें त्रिशीर्ष ब्राह्मणाला वधिलें; क्षत्रिय बलराम मद्य प्याला; सोमानें गुरुपत्नी नेली. इत्यादि गोष्टी चांगल्यांच्या आचरणांतल्या ह्मणून त्याही आपण कराव्या असें ह्मणतां येत नाहीं. जीं कर्मे निर्दोष तीं मात्र आच-

रावीं; अन्य आचरूं नयेत, असें तैत्तिरीय श्रुतीमध्यें म्हटलें आहे. आणखीं शास्त्रामध्यें आणि लोकांमध्यें जे अनिन्द्य आचार तेच कर्तव्य असें म्हटलें आहे, आणि मातृवधादि सदोष कर्माचा निषेध केला आहे. कोणी पूर्वपक्ष करील कीं, असें आहे तरी, अन्यांनीं केलेलीं निन्द्य कर्में आपण आचरूं नयेत, श्रेष्ठांनीं केलेलीं करावींच, कारण कीं, शिष्टाचार हा त्यामध्यें विशेष आहे, आणि श्रुतीमध्यें तर वाईट कर्में आचरूं नयेत असा सामान्य निषेध आहे ( तेव्हां सामान्यापेक्षां विशेष बलवत्तर ) परन्तु असें नाहीं, कां कीं, जीं आमचीं सुचरितें तीं मात्र त्वां आचरावीं इतर आचरूं नयेत, अशा प्रकारें पुढीलच श्रुतीमध्यें निर्दोष शिष्टाचाराचें ग्रहण आणि सदोष शिष्टाचाराचा निषेध केला आहे. असल्या आचरणाचें कोठेंहि विधान केलें नसल्यामुळें सामान्य नियमाचें उल्लङ्घन इष्ट-साधक होणार नाहीं. तसेंच श्रुति, स्मृति, सदाचार यांणीं यांचें विप्रत्व सिद्ध असल्यामुळें आणि विप्रधर्माचे प्रतिबन्धक जे यव-नादि यांचा निरास असल्यामुळें योग्य जें षट्कर्मानुष्ठान तें त्यांणीं करावें इतरांनींहि त्यांचा द्वेष करूं नये. त्यांचा द्वेष केला असतां— "ज्याचें द्रव्य गेलें तो जोश्याला दोष देतो, ज्याचें आयुष्य सम्पलें तो वैद्याला दोष देतो, आणि गतश्री आणि गतायु हे दोघेही ब्राह्मणास दोष देतात," असें महाभारतांत ह्मटलें आहे. त्यांना शिव्याहि देऊं नयेत दिल्या असतां माता, पिता, सासू, गुरु, देव, अग्नि, विप्र, गाय, संन्यासी, स्त्री, यांना जो शिव्या देतो तो ब्राह्मण मूर्ख ह्मटला आहे, त्याला प्रायश्चित ज्ञात्या ऋषींनीं सांगितलें आहे कीं, अल्प तण्डुलांचा चरू करून देवतांना नैवेद्य दाखवून तो भक्षावा ह्मणजे मण्डलानें* तो शुद्ध होतो, अन्यथा तो दोषी शूद्रवत् होय, असें हेमाद्रीनें सांगितलें आहे, आणि लिङ्गपुराणीं दोषाला पश्चात्तापाचें प्रायश्चित्त सांगितलें आहे, त्यांच्या वृत्तीचें हरणहि करूं नये, "स्वदत्त परदत्त भूमीचें जो हरण करितो तो साठ

* ४२ दिवसांनीं.

सहस्रवर्षें विष्ठेमध्यें कृमि होऊन राहातो.'' सर्व राजांना ह्या लोकीं भगिनी म्हणजे बहिण कोणती तर, ब्राह्मणाला दिलेली भूमि ती राजाला भोग्य नव्हे, आणि तिजवर राजानें आपला कर (हात) घालूं नये '' असें देवलस्मृतींत आहे. ''ग्राम किंवा क्षेत्र किंवा पात्र किंवा शेत किंवा भूमि हीं विप्रादिकांकडून राजानें काढून घेऊं नयेत, घेतल्यास तो यमलोकीं जाईल आणि पुनः पृथ्वीवर येऊन नरकामध्यें कृमिराशि होईल,'' ह्याला प्रायश्चित्त देवस्वामींनीं सांगितलें आहे. तसेंच महानारदीयामध्यें-क्षेत्र हरणाला षडब्द* प्रायश्चित्त, ग्रामाला चान्द्रायण, तटाकाला आणि वनाला हीं दोन्हीं, शेताला तप्तकृच्छ्र आणि भूमीला तीन दिवस असें प्रायश्चित्त आहे. प्रथम अपराधाला हें प्रायश्चित्त होय. वारंवार असें घडल्यास द्विगुणित प्रायश्चित्त करावें. प्रतिवर्षी फलाचा स्वीकार केल्यास ब्रह्महत्येचें प्रायश्चित्त करणें योग्य आहे. ह्याप्रमाणें हेमाद्रीमध्यें निषेधोक्ति आणि पश्चात्तापाविषयीं प्रायश्चित्त सांगितलें आहे. तस्मात् वेदाध्ययनामध्यें अत्यल्प किंवा स्वगृह्योक्त ज्याला जें कर्म सांगितलें आहे त्याचा तितका शास्त्रार्थ केला असतां, सर्व केल्याचें फळ येतें असें ह्मटलें असल्यामुळें वाजसनेयी यांनीं कात्यायनसूत्रानुसारें करून श्रौतस्मार्त कर्माचें अनुष्ठान करावें. अन्यथा दोष सांगितला आहे असें हेमाद्रीमध्यें मरीचीचें वचन आहे. शुचिर्भूत होऊन पूर्वाभिमुख होत्साता बसून आपल्या गृह्याग्नीमध्यें आनन्दानें यवांचा होम करावा ह्मणजे लोकप्राप्ति होईल; अन्यथा दोष प्राप्त होतो, आणि द्विज प्रायश्चित्तार्ह होतो. तेथेंच जातूकर्ण्य ह्मणतो—''भार्या जिवन्त असतां जो मूढ मनुष्य अग्नीचा त्याग करितो तो अनग्निक होय आणि सर्व कर्मांपासून बहिष्कृत जाणावा. तसेंच मनु ह्मणतो-नित्यशः व्रत करीत असतांहि विहित कर्म करीत नाहीं त्याला क्रियेचें फल प्राप्त होत नाहीं. आणि तो प्रायश्चित्तार्ह होतो. तसेंच याज्ञवल्क्य ह्मणतो—

---

* १२ दिवसांचें १ कृच्छ्र. याप्रमाणें १८० कृच्छ्रें आचरण केलीं असतां तें षडब्द.

विहितकर्म नकरणें आणि निषिद्ध कर्म करणें आणि इन्द्रियांचा निग्रह न करणें ह्यांपासून पतन प्राप्त होतें इत्यादि सांगण्याजोगें पुष्कळ आहे, परन्तु विस्तारभयास्तव पुरें करितों. न्याय जैमिनीकृत (मीमांसा) शुद्धबुद्धि व्यासानें निर्मिलेले धर्ममय ग्रन्थ पहावे आणि विद्वज्जनांनीं येथें दोष देऊं नये. अविद्येपासून व्यर्थ भेद उत्पन्न होईल याकरितां दुग्ध आणि उदक यांचें ज्ञान ज्या हंसांना आहे त्यांनां हें पत्र पाठविलें आहे. वत्सापुर पळसुलि भटेरी ग्रामस्थ वाजसनेयांचा धर्मस्थापक हा लेख आहे. हस्ताक्षर बचम्भट्ट देव धर्माधिकारी, यज्ञेश्वरभट्ट प्रभु धर्माधिकारी. शके १६६८.

---

## परिशिष्ट ( औ* ).

### वे० रा० रा० रामभट्ट व नागेशभट्ट क्षीरसागर ( उपाध्ये ) इकडील प्राचीन वाजसनेय ब्राह्मण ह्यांस जोशी व उपाध्येपणा चालविण्याची पेशव्यांनीं करून दिलेली सनद.

### शके १६७० ( इ० स० १७४८. )

आज स्वारी राजश्री रामाजी महादेव नामजाद प्रान्त साष्टी ता पाटील रयानगांव व गंजा ता ठाणें व मरोळ सुा तिसा अर्बैन मया व अलफ (शके १६७०) रामभट्ट व नागेशभट्ट उपनांव क्षीरसागर यांची जोशीउपाध्येपणाची वृत्त (वृति) पुरातन जाणोन हुजुरोन यांची यांजकडे करार झाली असे. गांव येणें प्रमाणें:—

| | |
|---|---|
| ता ठाणें कसबे मजकूर. | ता मरोळगांव. |
| पांच पाखाड्या. | १ मौजे मुळुप. |
| १ चरई. | १ मौजे नाउर. |
| १ सिद्धेश्वर. | १ मौजे टोपें. |
| १ पांचघर. | १ मौजे भाण्डुप. |

---

* ही अस्सल सनद मोडीलिपींत असून ती, वे० रा० रा० आपाबाजी क्षीरसागर उपाध्ये राहुरीकर हल्लीं वस्ती ठाणें ह्यांजपाशीं आहे.

| | |
|---|---|
| १ कोळवाड. | १ मौजे कोपरी मालवाडी. |
| १ हजवड. | |
| ५ | ५ |

गांव एक.

ऐकूण पाखाड्या पांच व ता। पांच पुरातन चालत आल्याप्रमाणें रामभट्ट व नागेशभट्ट चालवितील. तुम्हीं यांजवळोन कार्यप्रयोजन शुभाशुभ पूर्ववत्प्रमाणें चालवून उपभोग करूं देणें. जाणिजे. रवाना छ २२ मोहरम. मोर्त्तब सुद.

मोर्त्तब सुद.

ही अस्सल सनद परत मिळणेंविषयीं अर्जदार सुन्दर बाळजोशी व आपाबाजी जोशी व दामोदर मुकुन्द जोशी व जयराम धोण्ड जोशी पैकीं सुन्दर मयत वारीस पुत्र भास्कर व बाळकृष्ण अज्ञान, पालन करणार काशीनाथ बाळ जोशी वगैरे यांचे वकील नारायण शिवराम यांहीं अर्ज नम्बर २२३ चा केल्या लगत मेहरबान असिस्टण्ट जज्य साहेब बाहदूर यांचा हुकूम तारिख १७ माहे जुलै सन १८५८ चा आल्यावरून ही अस्सल सनद अर्जदार यांस परत दिल्ही असे. तारिख २३ माहे जुलई सन १८५८ इसवी.

राघो बाळाजी अमृते दफ्तरदार.

नम्बर ३९१.
सन १८४६ पैकीं,
सनद रामाजी महादेव नामजाद यांचे नांवें छ २२ मोहरम रोजची वादीकडून निशाणी २१.

नम्बर ७५१५.
सन १८४४ पैकीं,
सनद रामाजी महादेव नामजाद यांचे नांवें छ २२ मोहरमची वादीकडून ८०.

दफ्तरीं दाखल.
वामनराव जगन्नाथ बाम्बळेकर,
मुनसीफ.

सदरचा नम्बर ७४८ यांत वादीनें हा कागद जिल्ह्यांत गुजारिला होता तो सदर अदालतींतोन वादी यास परत दिल्हा.

तारीख (फाटली) अप्रील सन १८३७.

परशुराम शिवराम कारकून.

दफ्तरीं दाखल तारीख ७ अक्टोबर सन १८४६.

दादोबा देवाजी मुनसीफ.

---

## परिशिष्ट (अं*).

### इकडील प्राचीन वाजसनेय ब्राह्मण व गोवर्धन ह्यांस वृत्ति चालविण्याविषयीं पेशव्यांनीं दिलेली सनद. शके १६७० (इ० स० १७४८).

अखण्डित लक्ष्मी अलङ्कृत राजमान्य राजश्री
रामजीमहादेव नामजाद प्रान्त साष्टी गोंसावी यांसीं——

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार. सुरुसन तिसाआर्बैन मया व अलफ (शके१६७०) पळशेब्राह्मण व गोवर्धन वतनदार प्रान्त मजकूर यांणीं कसबे पुणें येथील मुक्कामीं हुजूर येऊन विनन्ति केली कीं, आपण पुरातन वतनदार, उपाध्येपण व जोशीपण आपलें आहे. श्रीमन्त कैलासवासी आपा साहेबीं साष्टी प्रान्त फत्ते केला तेसमयीं आपण भयास्तव परागन्दा होऊन मुम्बई प्रान्तीं गेलों होतों. श्रीमन्तांचे दर्शनास यावें, त्यास आह्मीं फिरङ्गाणचे राहणार, या राज्याची स्थितरीत ठावकी नाहीं. भयानें दर्शनास न आलों. वसई व बेलापूर येथील जोशी उपाध्ये हजर होते. त्यांचीं वतनें चालतात आणि आम्हीं समयीं नव्हतों याजकरितां आमचीं वतनें सरकारांत अमानत करून कमाविसीस सरकारचा गुमास्ता ठेविला. त्यास वसई फत्ते जाहली तेसमयीं

---

* ही अस्सल सनद मोडी लिपींत असून ती, वे० रा० रा० पुरुषोत्तम रघुनाथ कावळे पैठणकर हल्लीं वस्ती ठाणें ह्यांजपाशीं आहे.

श्रीमन्त ठाणीयास आले ; तेव्हां आमचे दोघे तिघेजण ब्राह्मण येऊन श्रीमन्ताचे चरणांजवळ अर्ज केला कीं, आम्हीं गरीब, आमचीं वतनें सरकारीं अमानत ठेविलीं आहेत, तीं स्वामींनीं कृपाळू होऊन आमचीं आह्मांस द्यावीं ; त्यावरून श्रीमन्तांनीं आज्ञा केली कीं, साम्प्रत पुण्यास जावयाची उतावळी आहे ; पुढें खासास्वारी या प्रान्तीं होईल ; तेव्हां मनास आणून तुमचीं वतनें तुह्मांस दिलीं जातील ; ह्मणून आज्ञा केली होती, त्यास श्रीमन्त आपा साहेब कैलासवासी जाहले यामुळें आमचीं वतनें तशींच राहिलीं, त्यास अलीकडे चार पांच वर्षे आह्मीं हुजूर अर्ज करावयासीं येतों ; स्वामींनीं कृपाळू होऊन आमचीं वतनें आह्मांस द्यावीं ह्मणून अर्ज केला, व येविसीं (ह्याविषयीं) आह्मीं प्रां मजकूरचे पाटील, ह्मात्रे, (फौजदार) आणून गांवगंना चौकशी करून जोशी, उपाध्ये पुरातन खरे वतनदार होते, त्याप्रमाणें कदबे लेहून घेतले आहेत, म्हणून विनन्ति केली. (त) त्याजवरून पळशे व गोवर्धन हे गरीब, यांजवर कृपाळू होऊन प्रान्त मजकूरचे पाटील ह्मात्रे यांणीं कदबे लेहून दिले आहेत, त्याप्रमाणें पळशे व गोवर्धन मजकूर यांचीं वतनें यांस उपभोग करावयासीं आज्ञा केली असे. देहेझाडा बितपशीलः—

| | | |
|---|---|---|
| २७ ता तुर्भे. | १४ ता ठाणें. | पैकीं वजा अमानत बा- |
| ३३ ता मालाड. | ५ ता घोडबन्दर. | रिसदार नाहींत, सबब |
| २४ ता मरोळ. | ४ ता धारावी. | जोशी उपाध्ये पण सर- |
| १ का वान्द्रें. | १०८ | कारी देहे —— सुमारः— |

| | | |
|---|---|---|
| १३ ता तुर्भे. | बाकी निसबत वतनदार | १ का वान्द्रें. |
| ८ ता मालाड. | देहे —— सुमारः— | ११ ता ठाणें. |
| १४ ता मरोळ. | १४ ता तुर्भे. | ५ ता घोडबन्दर. |
| ३ ता ठाणें. | २५ ता मालाड. | ४ ता धारावी. |
| ३८ | १० ता मरोळ. | ७० |

यांसीं नांवनिशी जोशीः——

रामभट्ट व नागेशभट्ट गांवः——
५ ता ठाणें को मजकूर.
पाखाड्या
१ चरई.
१ सिद्धेश्वर.
१ पांचघर.
१ कोलवड.
१ हजवड.
——
५
गांव निम्में
५ ता मरोळः——
१ मौजे मुळुन्द.
१ मौजे नान्दूर.
१ मौजे ठाणें.
१ मौजे भाण्डूप.
१ मौजे कोन्देरी.
१ मालवडी.
——
५
——
६

कृष्णउपाध्ये गांवः——
५ ता मरोळ.
१ मौजे व्याहाड.
१ मौजे गुणगांव.
१ मौजे साई.

विनायक पण्डित गांवः——
ता ठाणें
१ मौजे चेन्दणी.
१ मौजे नवपाडा.
१ को ठाणें पाखाड्या.
१ माहागिरी.
१ राहवड.
१ भोगेत.
——
३
गांव निम्में
——
३

बापुभट्ट मौजे कावसेर ता ठाणें:—
गांव १

केरभट्ट गोवर्धन मौजे वाडवली ता ठाणें गांव १

गोविन्दभट्ट गोवर्धन ता ठाणें गांवः——
१ मौजे वोवळें.
१ मौजे चेने.
१ मौजे हेरिवड.
——
३

१ मौजे पसपवली.
१ मौजे पंवई.

---
५

१ मौजे तुळसी ता मालाड.

---
६.

शङ्करभट्ट ता ठाणे गांवः——
१ मौजे बळखूम.
१ मौजे माजिवडें.

---
२

शङ्करभट्ट व रामभट्ट ता तुर्भे गांवः——
१ मौजे बरेलें.
१ मौजे वाडवली.
१ मौजे देवनेरे.
१ मौजे अणीक.
१ मौजे वाणबु.
१ मौजे माणखुर्द.
१ मौजे माण्डाळें.
१ कसबे तुर्भे.
१ मौजे नानाळें.
१ मौजे मारिवली.

---
१०

पोसम्भट्ट व शामभट्ट मौजे चेम्बूर ता तुर्भे गांव १.

शिवरामजोशी गांवः——
१ मौजे मिरें ता घोडबन्दर.

धाङ्गभट्ट मौजे तुर्भे, कोलशेत ता ठाणें गांव १.

माधवजोशीः——
०॥० मौजे वरसावें ता चेण निमे-गांव.
५ तो घोडबन्दर.
०॥० मौजे काशी.
०॥० को मजकूर.

---
१

---
१॥.

दामुलजोशी याचा आजा आई-कडील नारायण नाईक नि-पुत्रिक याणे लेकीचे वंशास दामुल जोशी यासीं दिलें गांवः——
०॥० मौजे वरसावें ता ठाणे निम्में.
१ ता घोडबन्दर.
०॥० मौजे काशी.
०॥० को मजकूर.

---
१

---
१॥.

गोपाळभट्ट व बापुभट्ट मौजे मा-हूल ता तुर्भे गांव १.

गोविन्द नाईक व जीवन नाईक कावळे वामन नाईक गांवः—
२ ता तुर्भे.

१ मौजे दहिंस तर्फ मालाड.

२

विठ्ठल नाईक याचा पुत्र वेड नाईक ता मालाड गांवः—

१ मौजे कान्दवली.

१ मालवणी.

१ मौजे दारवली.

१ मौजे चारखोप.

४

बेण्डफाटक गांव

२ ता मालाड.

१ मौजे आकर्से.

१ मौजे मर्से.

४ ता धारावीः—

१ मौजे उत्तन.

१ मौजे गोराई.

१ मौजे मनोरी.

१ मौजे डोङ्गरी.

६

राम नाईक गोवर्धनः—

ता मालाड गांवः—

१ मौजे सिन्दवली.

१ मौजे हेरीवली.

१ मौजे मागाठणें.

१ मौजे कणेरी.

१ मौजे एकसर.

५

१ मौजे जुंहू.

१ मौजे आन्धेरी.

११॥. ता मालाडः—

१ को। मालाड.

१ मौजे वलनई.

१ मौजे दिन्डोसी.

१ मौजे कुरार.

१ मौजे चिम्चोली.

१ मौजे गोरेगांव.

१ मौजे आरें.

१ मौजे वेसारें.

१ मौजे पाहाडी.

१ मौजे मोगरें.

१ मौजे माजास.

०॥० मौजे वेसावें खेरीज कालवड निमे.

११॥.

१ कसबें वानरें व॰दाण्डेंः—

१४॥.

रणसोड नाईक वस्ती वसई ता घोडबन्दर गांव,

१ मौजे भाइन्दर.

१ मौजे मुर्धे.

२

धाकंभट्ट मौजे वेसावें ता मालाड कालवड गांव.

०॥०

येणेंप्रमाणें असामी वीस, यांस देहे बाहत्तर पैकीं सत्तर गांव व पाखाड्या पैकीं दोन गांव यांचीं वतनें यांस द्यावयाचीं करार केलीं असत. तर जोशीउपाध्येपण फिरङ्गी यांचे अमलांत सुदामत चालत होतें, त्याची चौकशी करून पूर्वी चालत आल्याप्रमाणें हल्लीं ह्या छ १९ मोहरमापासून सदहू असामींचें जोशीउपाध्येपण चालवणें. सदहू वतनसम्बन्धें पळशे व गोवर्धन जोशी उपाध्ये यांजकडे सरकारची नजर करार केली रुपये २,००१ यासीं मुदतीः——

१,००० सालमजकुरीं अखेर सालीं घेणें.
१,००१ पेस्तरसालीं सन खमसैनांत अखेर सालीं घेणें.

२,००१

येणेंप्रमाणें दोन हजार एक रुपये करार केला असे. सदहू मुदतीप्रमाणें वसूल घेणें. या खेरीज अडतीस गांव आहेत, त्यांस वारिसदार कोणी नाहीं. सबब जोशी व उपाध्येपण सरकारांत ठेविलें असे. तरी सरकारचे गुमास्ते ठेऊन जोशी-उपाध्येपण चालवणें. जाणिजे. छ ६ मोहरम. बहुत काय लिहिणें.

(लेखन-सीमा.)

## परिशिष्ट (अः *).

## पेशव्यांकडून किङ्कर पण्डित ह्यांस मिळालेली सनद. शके १६७६ (इ. स. १७५४.)

(श्री. राजाशाहू नरपतिहर्षनिधान बाळाजी बाजीराव प्रधान.)

आज्ञापत्र राजश्री पन्त प्रधान ता॥ मायेरात पाटील मौजे कोरें पा

* ही अस्सल सनद मोडीलिपींत असून ती, वे॰ रा॰ रा॰ बाबा बापु जोशी पुरन्दरे उज्जयनीकर हल्लीं वस्ती वसई ह्यांजवळ आहे.

माहीम सुा खमस खमसैन मया व अलफ ( शके १६७६ ) मौजे मजकूर येथील जोशी व उपाध्येपणाची वृत्ति निम्में येसजोशी व निम्में दादजोशी, गोत्र गौतम, याची पुरातन, त्यास दादजोशी याचे पोटीं पुत्रसन्तान नाहीं, यास्तव त्याणें किङ्कर पण्डित भाचा ( बहिणीचा लेंक ) एका वर्षाचा वाढविला होता, त्यास दादजोशी जिवन्त असतां त्याणें आपली निम्में वृत्ति पण्डित मजकूर यास दत्त दिधली. दत्तकपत्र करून दिधलें आहे. त्याप्रमाणें सरकारचें पत्र असावें, ह्मणून जमीदारपाटील मजकूर याणीं विदित केलें; त्यावरून मनास आणितां दत्तकपत्र शके १६६४ मध्यें दादजोशी याणें श्रावणमासीं सर्वांचे साक्षीनें पत्र दिधलें होतें. तें रुबरु* मनास आणून आज्ञापत्र सादर केलें आहे. दादजोशी याची निम्में वृत्ति माडीपावत† व भाभेरीचे शेरीपावत दक्षिणदिशेकडील दत्तकपत्राप्रमाणें किङ्कर पण्डित अनुभवील, त्यास कोणी मुजाहीम‡ न होतां अनुभवूं देणें. जाणिजे. छ २३ रविलाखर. रवाना हुजूर.

लेखनसीमा.

शिका परिशिष्ट (अः) प्रमाणें. §

आज्ञापत्र राजश्री पन्तप्रधान ता किङ्कर पण्डित वस्ती मौजे येडवन पाखाडी देवकी पा माहीम, सुा खमस खमसैन मया व अलफ ( शके १६७६. ) मौजे कोरें, पा मजकूर येथील जोशी व उपाध्येपणाची वृत्ति निम्में येसजोशी व निम्में दादजोशी गोत्र गौतम, याची पुरातन, त्यास दादजोशी याचे पोटीं पुत्रसन्तान नाहीं. तूं त्याचा भाचा; तुजला एक वर्षाचा त्याणें वाढविला होता; यास्तव दादजोशी जिवन्त असतां त्याणें आपली निम्में वृत्ति माडीपावत आणि भाभेरीचे शेरीपावत दक्षिणदिशेची त्याणीं आपले स्वसन्तोषें तुजला दत्त दिधली. वृत्तीचें दत्तकपत्र करून दिधलें आहे. त्याप्रमाणें

---

* समक्ष—स्वतः—खुद. † पर्यन्त-पावेतों. ‡ हलाहरकत. § ८५ पृ० टीप पहा.

स्वामी कृपाळू होऊन सरकार तर्फेचें पत्र द्यावें ह्मणून जमीदार पाटील मजकूर यांणीं विदित केलें. त्यावरून मनास आणितां शके १६६४ छामध्यें श्रावणमासीं सर्वांचे साक्षीनें दत्तकपत्र करून दिधलें होतें. तें रुबरु पाहोन तुजला संजीवन माफी (क) नजर रुपये ७० सत्तर करार करून आज्ञापत्र दिधलें असे. तर मौजे मजकूरची निम्में वृत्ति जोशी व उपाध्येपणाची दत्तकपत्राप्रमाणें अनुभवीत जाणें. जाणिजे. छ २३ रबिलाखर ताा हुजूर.

लेखन-सीमा.

---

## परिशिष्ट (क*).

### वे॰ रा॰ रा॰ जीवननाईक व रामनाईक कावळे ह्यांच्या हातून श्रीहनुमन्ताची स्थापना करविण्याविषयीं पेशव्यांची सनद.

शके १६८६ (इ. स. १७६४.)

पुा राजश्री महादाजी राम हवालदार ताो मालाड गोा यांस—

सुाा खमस सितैन मया व अलफ शके (१६८६.) कसबे मालाड येथें पांचकळशीण बायको आहे तिणें नूतन देवूळ हनुमन्ताचें बान्धिलें आहे, देवाची स्थापना करणार तेथील जोशी उपाध्ये जीवन नाईक कावळे व रामनाईक आहेत, त्यांचे विद्यमानें स्थापना करावी, तें न करितां परकी ब्राह्मण बाहेर गांवचे अथवा ठाण्याहून नेऊन करणार येविसीं ताकीद जाहली पाहिजे ह्मणोन जीवन नाईक याणें हुजूर कल्याणचे मुक्कामीं विदित केलें, ऐशास परकी ब्राह्मण स्थापनेकरितां आणणें तरी वृत्त्यंशी यांचेच विद्यमानें आणोन कार्य सम्पादावें, त्यास दक्षिणा देणें ती द्यावी, जोशी उपाध्ये यांचा विभाग सुदामत

---

* ही अस्सल सनद मोडी लिपींत असून ती, वे॰ रा॰ रा॰ बाबाभाऊ कावळे पैठणकर हल्लीं वस्ती ठाणें ह्यांजवळ होती, ती वे॰ रा॰ रा॰ निळकण्ठ विठ्ठल जोशी पुरन्दरे हल्लीं वस्ती आगाशी ह्यांनीं ग्रन्थकाराकडेस आणून दिली.

जो असेल तो यांचा यांस देवविणें. सदर्हूप्रमाणें ताकीद करून चालवणें. जोशी उपाध्येपणाचें उपार्जित जें असेल तें सर्व यांस देवविणें. जाणिजे रा छ १ माहे जिलकाद.

श्री
लेखनसीमा.

पैवस्ती छ ४ जिलकाद रात्र आवसीची प्रहर पात्रली असे—

---

## परिशिष्ट (ख*)

## वे० रा० रा० गोविन्द व जीवन नाईक कावळे ह्यांस पेशवाईतून वृत्तिसम्बन्धीं दिलेली सनद.

### शके १६७० (इ. सन १७४८.)

आज स्वारी राजश्री रामाजी महादेव नामजाद प्रां साष्टी तां पाटील ह्यात्रे व रयान. गांवगंना ता मालाड सुा तिसा आर्बैन मया व अलफ शके (१६७०.) गोविन्द नाईक व जीवन नाईक कावळे यांची जोशी उपाध्येपणाची वृत्ति पुरातन जाणोन हुजुरून यांची यांजकडे करार होऊन वतनाचा उपभोग करावयासीं आले असत, गांव येणें प्रोा:—

| किता | गांव | किता | गांव |
|---|---|---|---|
| १ | कसबा मालाड. | १ | मौजे आरें. |
| १ | मौजे वळनई. | १ | मौजे वसोरें. |
| १ | मौजे दिण्डासी. | १ | मौजे पाखाडी. |
| १ | मौजे कुरार. | २॥ | मौजे भागेरें देखील राळ आन्धेरी पाली. |
| १ | मौजे चिंचोली. | | |
| १ | को। वान्द्रें. | १ | मौजे माजास. |

---

* ८७ पृष्ठावरील टीप पहा.

| | |
|---|---|
| १ मौजे गोरेगांव. | १॥ मौजे वेसावें खेरीज कोलवड खेरीज जुहूं. |
| ७ | ८ |

गांव.

यो करार गांवचे जोशी (व) उपाध्येपण पूर्ववतप्रमाणें हे चालवितील. तुम्हीं यांचे हातोन कार्यप्रयोजन चालत आल्याप्रो चालवून घेत जाणें. जाणिजे रा छ२१ मोहरम कार्तिक ......

मोर्त्तबसुद.

पुा राजश्री महादाजी राम हवालदार व कारकून
तो मालाड गोंसावी यांसीं—

सुा तिस्सा खमसैन मया व अलफ (शके १६८०) जीवन नाईक व गोविन्द नाईक उपनाम कावळे जोशी उपाध्ये तो मजकूर यांस कोा मजकुरीं देवीचे नवरात्राचें हवन करितात तें उपाध्यिक व ज्योतिष आपलें आरम्भापासून अनुष्ठान आपण करून उपाध्यिक व कर्मसमाप्ति आपली आहे, हल्लीं दुसरीयास सांगतात त्यास ताकीद करावी ह्मणोन त्यांस देवळीं अगर घरीं, पाटलांनीं, कुळांनीं अनुष्ठान, देवधर्म केला तरी तें वृत्त्यंशी यानेंच चालवावें. गोविन्द नाईक याचे सालांत चाललें; जीवन नाईकासीं कटकट करितात त्यास ताकीद करणें. जाणिजे. छ ९ सा.

मोर्त्तबसुद.

परिशिष्ट (ग*)

किरवन्त व गोळक ह्यांनीं आपापली वृत्ति रणसोड नाईक व रामनाईक वैद्य वसईकर ह्यांस विकत दिली त्या सम्बन्धीं दस्तऐवज.

* हे अस्सल दस्तऐवज मोडी लिपींत असून ते, वे रा. रा. केशव (ऊर्फ) केरोबा बापुदेव वैद्य सांवखेडकर हल्लीं वस्ती मुम्बई ह्यांजकडेस आहेत.

राजमान्य राजश्री अन्ताजी भिकाजी हवालदार
व कारकून तालुके आगाशी गोंसावी यांस—

नमस्कार. सुरुसन सबासित्तैन मया व अलफ (शके १६८८.) रणसोड नाईक व रामनाईक वैद्य हल्लीं वस्ती बाजीपुरा यांसीं जंजिरे वसईचे मुक्कामीं विनन्ति केली.—रामचन्द्र गोपाळ वर्तक यांणीं आपलें कुळउपाध्येपण सोपारे (सामवेदी) यांची तर्फ आगाशी यथें वृत्ति आपणांस विकत रुपये १४४०।= चौदाशें सव्वा चाळीस रुपये, दोन आणे घेऊन दिली आहे, त्यास खरेदीखत मनास आणून सरकारचें पत्र आपणांस करून द्यावें म्हणोन; त्याजवरून खरेदीखत मनास आणून सोपारे यांचीं घरें तालुके मजकुरीं सुमार ५४ चौपन आहेत त्यांचें उपाध्येपण उभयतांकडे करार करून दरसदे (दरशेंकडा) रुपये ५ पांच प्रमाणें नजर रुपये पाऊणशें करार केला असे. तरी रामचन्द्र वर्तक यांचीं उपाध्येपणाचीं घरें तालुके मजकूरीं पहिल्यापासून चालत आलीं आहेत, तरी तीं व त्यांणीं आपले गोत्रजांपासून विकत वृत्ति घेतली आहे, एकूण चौपन घरांचे उपाध्येपणाची वृत्ति हरदुजण (दोघेजण)-वंशपरम्परेनें अनुभवीत जाणें; म्हणोन हरदुजणांस अलाहिदा पत्र देऊन हें पत्र तुम्हांस सादर केलें आहे. तरी लिहिल्याप्रमाणें वृत्ति हरदुजणांकडे चालों देणें. जाणिजे चन्द्र १४ माहे (फाटलें) पाहून हुजूर.

---

राजमान्य राजश्री अन्ताजी भिकाजी हवालदार
व कारकून तालुके आगाशी गोंसावी यांसः—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुरूसन सीत सितैन मया व अलफ. (शके १६८७.) तालुके मजकुरीं सोपारेब्राह्मणांचे घरांची उपाध्येपणाची वृत्ति विठ्ठल रणसोड करवन्त (किरवन्त) व गणेश महादेव करवन्त यांची होती. ते या उभयतांनीं आपले स्वसन्तोषें रामचन्द्र गोपाळ करवन्त हल्लीं वस्ती मुम्बई यांस विकत

दिली. यांचें वतनपत्र सरकारचें करून द्यावें ह्मणोन रामचन्द्र गोपाळ यांनीं हुजूर वसईचे मुक्कामीं विनन्ति केली, त्यावरून वृत्तीचीं खरेदीखतें उभयतांचीं आहेत तीं मनास आणून सरकारांत जीवनमाफी नजर रुपये (५०) पन्नास करार करून घेऊन वतनपत्र अलाहिदा करून दिलें असे. पुत्रपौत्रादि वंशपरम्परेनें वृत्तीचा उपभोग करितील. करूं देणें. या पत्राची नक्कल तुह्मीं करून ठेऊन अस्सल पत्र भोगवटी यांस फिरोन देणें. जाणिजे. चन्द्र १० रबिलावल. पाहून हुजूर.

---

गहाणखत रामचन्द्र गोपाळ करवन्त हल्लीं वस्ती मुम्बई. सुा सीत सितैन मया व अलफ. कारणें रणसोड शिवराम नाईक, व राम नाईक माणिक नाईक, उपनाम वैद्य, वस्ती मौजे धोली तर्फ आगर वसई, यांसीं लिहून दिलें ऐसाजेः—तुह्मांपासून रोख रुपये (१,०००) एक हजार घेऊन आपली उपाध्येपणाची वृत्ति सोपारेब्राह्मण तालुके आगाशी पैकीं सायवान येथील यजमानांचीं मूळ घरें (५४) चौपन व सदर्हू यजमानांपासून वृद्धि होऊन घरें जाहलीं असतील तीं, व त्यांचे निसबतीचीं तेरा घरें देखील वृत्ति आपली दरोबस्त सदर्हू रुपयांची तुम्हांस गहाण दिली असे. तुमचे रुपयांचें व्याज नाहीं. आपले वृत्तीचें उत्पन्न व्याजाचे ऐवजीं तुम्हांस दिलें असे, सुखरूप उपाध्येपणाच्या वृत्तीचा उपभोग करीत जाणें. जे समयीं आपल्यास अनुकूळ पडेल ते समयीं तुमचे रुपये उसने देऊन आपली वृत्ति सोडवूं. आपला भाईबन्द हरकोणी दरदावा करील त्याचा जाब आपण करून वतन सम्बन्धें खर्चवेंच पडला तर आम्हीं देऊं. तुम्हांशीं सम्बन्ध नाहीं. भाद्रपद शुद्ध १३, बुधवार, शके १६८७, पार्थिवनाम संवत्सरे, चन्द्र १० माहे रबिलाखर. हें लिहून दिलें सहीः—

१ वर लिहिल्याप्रमाणें सही रामचन्द्र गोपाळ करवन्त.

साक्ष बाळाजी बाबुराव वानसकर. लिहिल्याप्रमाणें साक्ष सुन्दरभट्ट शेण्डे.

---

फरोक्तखत बेसमी रामजोशी वलद गोविन्द जोशी सोपारे-ब्राम्हण वस्ती मौजे बोळींज, तर्फ आगाशी, परगणे सायवान. सुा इसन्ने सबैन मया व अलफ. कारणें रणसोड शिवराम नाईक वैद्य वस्ती मौजे धोली तर्फ आगर वसई, यांसीं लिहून दिलें ऐसाजेः— आपली वृत्ति ज्योतिष मौजे वटार तालुके मजकूर पैकीं वाड्या बितपशीलः——

आबाजी यादव गुमास्ते देशमूख व देशपाण्डे व सरपाटील प्रांत वसई.

१ भाटवाडी.
१ भाट समनाळें.
१ भाट भोङ्गाळें.
१ पाखाडी सतपाळें.
१ पाखाडी खलार.
——
५

१ वाडी नान्दाणें.
१ भाट केतकवाडी.
१ वाडीमाणकें.
——
३
——
८

एकूण आठ, पैकीं वाड्या सहा, पाखाड्या दोन सदरहूचें ज्योतिषपण आपलें, आपण आपले आत्मसन्तोषें तुह्मांस विकत द्यावयाचा करार करून तुह्मांजवळून रुपये ( २८२ ) दोनशें ब्यायशीं रोख घेऊन सदर्हू ज्योतिषपणाची वृत्ति तुह्मांस विकत दिली असे. पुत्रपौत्रादि वंशपरम्परेनें उपभोग करीत जाणें. या उपरी आपल्यास वृत्तीशीं सम्बन्ध नाहीं. आपला भाऊबन्द कोणी दरदावा करील त्याचा जाब आपण करीन. सुखरूप वृत्तीचा अनुभव करीत जाणें. शके १६९३ खरनाम संवत्सरे, मार्गशीर्ष वद्य सप्तमी, मन्दवासर, चन्द्र २३, माहे रमजान. हें लिहून दिलें सही.

रामजोशी गोविन्दजोशी लिहिल्याप्रमाणें सही.

साक्ष लिहिल्याप्रमाणें:—

१ साक्ष अनन्तगोपाळ पण्डित ग्रामोपाध्ये.

१ साक्ष हरपण्डित ग्रामोपाध्ये. साक्ष बालजी पद्मणजी सत्पाळकर.

१ लिहिल्याप्रमाणें साक्ष जयीत चोरघा लखम चोरघा चोन्धा-सतपाळगांव दामबाबळी. गणपती जोशी. सही राम जोशी.

१ साक्ष पुतळाजी शामजी सतपाळकर.

१ साक्ष पेस पाटील मौजे वटार सही बोबुली रङ्गजोशी याची स्त्री. १

१ धरमपाटेल मौजे वटार.

१ साक्ष दादाअनन्त जोशी.

१ साख (क्ष)

साक्ष दाम नाईक खलार.

१ साक्ष हरनाईक. पत्राप्रमाणें साक्ष नारायण मुकुन्द जोशी वस्ती वाघोली.

पत्राप्रमाणें साक्ष गोविन्द अनन्त जोशी वाघोलकर उपाध्ये व ज्योतिषी.

पत्राप्रमाणें साक्ष केर जोशी दामोदर जोशी वस्ती नाळें गुमास्ते निसबत तुक (तुकाराम) जोशी नाळेंकर.

शके १६९३ खरनाम संवत्सरे, माहे मार्गशीर्ष वद्य सप्तमी (७) विकरितखत वटार व त्याच्या पाखाड्या ज्योतिषपण विकत घेतलें. रामजोशी यांपासोन रुपये तीनशें (३००.)

---

कर्जखत शके १६८७ पार्थिवनाम संवत्सरे, माहे भाद्रपद शुद्ध (१३) त्रयोदशी, ते दिनीं खत लिहिते धनको नाम राजश्री रणसोड शिवराम नाईक, व रामनाईक माणीक नाईक उपनांव वैद्य यांशीं ऋणको नाम रामचन्द्र गोपाळ करवन्त हल्लीं वस्ती मुम्बई आपण आत्मकार्यपरत्वें तसलमध्यें तुम्हांपासून घेतले मुद्दल रुपये (१००) अङ्कीं शम्भर यांशीं व्याज दरमाही रुपया (·।।।·) पाऊण प्रमाणें व्याज व मुद्दल भरून देऊं (न) याशीं गहाण ऐवज

आमची वृत्ति सोपारेब्राम्हणांची तालुके आगाशीमध्यें आहे, ती तुम्हांकडे हजार रुपयांवर गहाण आहे तीच गहाण या रुपयांशीं दिली आहे. हें खत लिहून दिल्हें सही.

१ लिहिल्याप्रमाणें सही रामचन्द्र गोपाळ करवन्त. १ सुन्दर भट शेण्डे साक्ष.

विकलम बाळाजी बाबुराव वानसकर.

---

स्वस्तिश्रीमन्नृपविक्रमार्कसमयातीतसंवत् १८२४ श्रीराजेन्द्रचक्रचूडामणौ शालिवाहनशके १६८९ माहे मार्गशीर्ष शुद्ध १ बुधे अनुराधा दिवस नक्षत्रे वृश्चिकस्थे चन्द्रे ते दिवशीं जीवन नाईक तथा घोसनाईक दोघे बन्धु गोवर्धन इ (फाटलें) ति वस्ती भाइन्दर वंशपरम्परीं गोत्र सम्बन्धिक कोणी नाहीं. व रिण (ऋण) मस्तकीं जाणून व पोटभुकेस पाहिजे जाणून हें वृत्त (ही वृत्ति) भाइन्दर, मुढधे व धारावी डोंगरीपाखाड यांसमवेत पूर्वापार आमची वडिलांपासून ते आमचे गर्जे विकत देतों. वेदमूर्ति गौतमनाईक वैद्य यजुःशाखी यांस यजमानांचे साक्षेनें सर्वांहुजूर लिहून देतों. बन्धूचे आज्ञेनें वेदमूर्ति गौतमनाईक वैद्य असर्फी* पंचायशीं (अङ्कीं ८५) रोख घेतल्या. हें वतन विकत दिधलें. ज्योतिषपणा व उपाध्येपण या गांवींचें आजपासून यांचें यांहीं पुत्रपौत्रादि उपभोग घ्यावा. यासीं आम्हीं व आमचे वारस व कोणी सम्बन्धी ह्यास हरकत करणार नाहींत. हें आजपासून वतन यांचें यांस. चुकेल तो दिवाणाचा गुन्हेगार, व ब्रह्मद्रोही, महापातकी. हे सही. आम्हांस कोणी इडदेर (वारस) नाहीं. वतन आम्हीं आमचे गर्जे यास्तव सन्तोषें विकत दिलें. गृहस्थांचे साक्षेनें व दोघां वतनदारांचे साक्षेनें व बन्धु घोसनाईक यांचे आज्ञेनें. हस्ताक्षर जीवन नाईक. सही.

साक्ष खुडक नाईक दरसकर. १ सही. घोस नाईक वतनदार.

कागदाप्रमाणें तान ह्यातारे तिमाजी गणजी साक्ष.

---

* हें एक सुमारें सव्वा रुपयाचे किमतीचें नाणें होतें.

दामजी. खुद्द यजमान भीक पाटील नवघरकर.
खु. यजमान पाटेल माडकर.
खु. जसकिणी मुढधेकर.

नारायण पाटील कुक् पाटील, रामजी गणजी.
लखजी सिमजी ह्यातारे.
लाडकोजी ठाकूर.
खु. बाब भोईर मुढधेकर.
खु. रघ पाटील मुढधेकर.
खु. नान पाटील तानवडी.
नाना पाटील राईकर.

---

विकरितखत रामन्द्र गोपाळ क्रमवन्त हल्लीं वस्ती जंजिरे मुम्बई सुा सितैन मया व अलफ. कारण जे.-रणसोड नाईक व राम नाईक ब्राह्मण यजुर्वेदी, शाखा वाजसनेय, गोत्र पौतमाक्ष, उपनाम वैद्य, वस्ती बाजीपुरा, यांसीं विकरितखत लिहून दिलें असे जे—आपली वृत्ति कुळउपाध्येपणाची सोपारेब्राह्मण तर्फ आगाशी, परगणे सायबान, यांचे घरची वृत्ति आमची पुरातन वृत्त्यंशी यांनीं विकत घेतली. तीं घरें सुमारें:—

खुद्द आपलीं घरें ९ सुमार.　　३६ किता घरें.
　　　　　　　　　　　　　　　९ किता घरें.
९　　　　　　　　　　　　　　——
　　　　　　　　　　　　　　　४५

एकूण घरें सुमार चौपन. यांच्या वृत्तीसहवर्तमान पुढें वृद्धि होईल, ती सहित सदर्हू वृत्ति कुळउपाध्येपणाचीच सोपारेब्राह्मणांची आहे, ती आपण आपले आत्मसन्तोषें विकत देऊन तुह्मांजवळून रुपये १४४०|= अङ्कें चवदाशें सव्वाचाळीस चव्वल घेतले असत, ते घेऊन सदर्हू आह्मीं विकत घेतली होती ती व आमचें कुळउपाध्येपण सोपारेब्राह्मण यांचे घरचें तुह्मांपासोन रुपये चौदाशें सव्वाचाळीस चव्वल घेऊन तुह्मांस विकत दिधलें असे. त्याचा उपभोग वंशपरंपरेनें घेत जाणें. याशीं हल्लाहरकत होणार नाहीं. पुढेंमागें

आपलें अवलादेपासोन अथवा भाऊबन्दांपासोन होणार नाहीं. व आपले भाऊबन्दांचे वृत्तीचे कागदपत्र होते ते सर्व तुह्मांस दिले व सरकारचे कागदपत्र होते ते तुह्मांस दिले असत. शके सोळाशें सत्यांयशीं १६८७ पार्थिवनाम संवत्सरे माहे माघ वद्य ५ गुरौ. बिकलम रामचन्द्र गोपाळ क्रमवन्त, खुद्द सही.

साक्ष.

नारो विश्वनाथ लवाटे लिहि-ल्याप्रमाणें साक्ष. गोविन्द जिवाजी दस्तुर.

१ साक्ष बापू नाईक.

१ साक्ष सुन्दर भट शेण्डे.

साक्ष जीवन भट्ट.

१ पत्राप्रमाणें साक्ष गणेश भट्ट दामले.

१ पत्राप्रमाणें साक्ष निळकण्ठ भट्ट वैद्य.

१ लिहिल्याप्रमाणें साक्ष विठ्ठल जोशी.

१ लिहिल्याप्रमाणें साक्ष गोविन्द जोशी.

१ लिहिल्याप्रमाणें साक्ष माधव नाईक.

१ दादनाईक माहीमकर उपाध्ये व ज्योतिषी.

१ लिहिल्याप्रमाणें साक्ष शङ्कर आचार्य.

१ साक्ष. रणजोशी.

१ साक्ष गणेश महादेव करवन्त हें वतन विकत दिधलें सही.

१ साक्ष सत्यभामा बाई, वतीनें सही गणेश करवन्त.

१ साक्ष विठ्ठल करवन्त सोड करवन्त

पत्राप्रमाणें सई आनुबाई, (घार करवन्त याची विधवा). महादेवभट्ट कर्पेच्या कडून लिहविलें.

पत्राप्रमाणें साक्ष काबजी माळजी देशमूख.

१ लिहिल्याप्रमणें साक्ष हरपाटेल दादपाटेल गांवकर.

१ पत्राप्रमाणें साक्ष मुकुन्दजोशी.

१ नारायण जोशी ज्योतिषी व उपाध्ये वाघोली.

१ तान्हाजी विठा पाटील बोळीं-जकर.
१ साक्ष मालजी रामपाटील मौजे वाघोलीकर.
१ पत्राप्रमाणें साक्ष दादपाटील धरमपाटील राजोडीकर.
१ पत्राप्रमाणें साक्ष जयराम रामपाटील दहींसरकर प्रान्त सायवान
गोविन्दपाटील नाळेंकर साक्ष.
पत्राप्रमाणें केशवजोशी नाळेंकर.
१ पत्राप्रमाणें साक्ष मालपाटील दादपाटील प्रसावकर मौजे कोपराड.
पत्राप्रमाणें साक्ष पदमपाटील रामपाटील प्रसाकर मौजे कोपराड.
हर पण्डित साक्ष.
१ पत्राप्रमाणें साक्ष दामपाटील नवाळकर.
१ पत्राप्रमणें साक्ष धरमपाटील वस्ती मौजे नवाळें
१ साक्ष लक्ष्मण नाईक व श्रीधर नाईक वर्तक मौजे नवाळें.
१ पत्राप्रमाणें साक्ष पोसपाटील धरमपाटील वटारकर.
१ लिहिल्याप्रमाणें साक्ष अनन्त गोपाळ पण्डित आगासकर.
लिहिल्याप्रमाणें साक्ष कमळ पाटील करदेसकर.

---

कर्जखत शके १६८४ चित्रभानू नाम संवत्सरे माहे फाल्गुन वद्य (५) पञ्चमी गुरुवासर ते दिनीं खत लिहिलें धनको नाम रणसोड नाईक, व कृष्णनाईक व रामनाईक वैद्य हल्लीं वस्ती कसबें बाजीपुरा यांसीं रिणको (ऋणको) नाम धर्म नाईक व अर्जुन नाईक, व बाळा नाईक वैद्य हल्ली वस्ती मौजे येडवण आपण आत्मकार्याकारणें रुपये मुद्दल रुपये बेचाळीस (४२) घेतले त्यास गहाण वृत्ति मौजे दांतिवरें व वेडी येथील आपला षष्टमांश गहाण दिला असे. तुमचे रुपयांस व्याज नाहीं. आमचे वृत्तीस जें उत्पन्न होईल तें व्याजाचे ऐवजीं उपभोग घेत जाणें. जे दिवशीं आम्हीं

तुमचे रुपये देऊं, ते दिवशीं आम्हीं आपली वृत्ति आपले स्वाधीन करून घेऊं. हें खत लिहून दिलें सही. बिकलम भिकाजी बल्लाळ फडके निसबत देशपाण्डे कुळकर्णी, प्रान्त माहीम.

१ साक्ष केरजोशी दामुल जोशी नाळें.
१ गङ्गाधर मुरारखोत मौजे येडवण परगणे माहीम.
१ साक्ष पाण्डुरङ्ग जोशी.
१ अर्जुन नाईक सही.
१ नागपण्डित दामपण्डित साक्ष.
१ मुगपण्डित साक्ष.
१ बाबसुरी दारसुरी साक्ष.
१ रामठाकूर कानठाकूर साक्ष.
१६ चैत्र शुद्ध ९ दांतिवरेचे कागद. फाल्गुन शुद्ध ५ रुपये बेचाळीस (४२).

---

परिशिष्ट (घ*)

## पेशव्यांकडून सामवेद्यांस अभयपत्र.

### शके १६९९. (इ० स० १७७७.)

राजा समशेर
श्रीहर्ष निधान
माधवराव नारायण
प्रतिनिधी.

अभयपत्र राजश्री——पन्त प्रधान ताहा सामवेदीब्राह्मण वा आगाशी सुा समान सबैन मया व अलफ (शके १६९९.) तुम्हीं सर्व सामवेदीब्राह्मण यांणीं सरसुभा वसईचे मुकामीं येऊन

* हें अस्सल पत्र वे० रा० रा० केशव (उर्फ केरो) वासुदेव वैद्य सांवखेडकर हल्लीं वस्ती मुम्बई ह्यांजपाशीं आहे.

विनन्ति केली कीं, आमचें उपाध्येपण प्राचीन आमचे वझेब्राह्मण सामवेदीं चालवीत होते त्याप्रो हल्लींहि कांहीं घरचें उपाध्येपण हव्यकव्य वझे ब्राह्मण सामवेदमन्त्रेंकरून चालवीत आहेत व कांहीं घरचें उपाध्येपण वझे ब्राह्मण यांचे नादारीमुळें अलीकडे पळशेब्राह्मण यांणीं वृत्ति जोडोन यजुर्वेदमन्त्रेंकरून चालवितात ऐशास आम्हीं सामवेदीब्राह्मण आमचें हव्यकव्य सर्व सामवेदमन्त्रेंकरून असावें; त्यास अलीकडे पळशेब्राह्मण यांजकडे कांहीं घरांची वृत्तिलागल्यापासून दोन प्रकार जाहले, येविसीं स्वामींनीं मनास आणून यथाधर्म आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे ह्मणून. त्याजवरून मनास आणून तुम्हीं सामवेदीब्राह्मण प्राचीन तुह्मांकडे सामवेदमन्त्रेंकरून हव्यकव्य चालत होतें त्या प्रो चालावें यास्तव तुम्हीं यथास्थित धर्में वर्तणूक करून वझेब्राह्मण सामवेद मन्त्रेंकरून उपाध्यिक चालवितात त्याप्रमाणें पळशे ब्राह्मण यांणीं अलीकडे कांहीं घरांची उपाध्येपणाची वृत्ति मिळविली आहे,* ते चालवावयासीं पळशेब्राह्मण यांणीं गुमास्ते वझे ब्राम्हण ठेऊन त्यांजकडून तुमचें उपाध्यिक हव्यकव्य चालवावें; उपाध्यिकसम्बन्धें उत्पन्न होईल, त्यापौ एक तक्षीम वझे ब्राह्मण गुमास्ते यांस द्यावी व दोन तक्षिमा ज्या पळशेब्राह्मणाचें वतन, त्यांणीं घ्याव्या. कदाचित् वझाब्राह्मण गुमास्ता ठेवावयासीं न बने तरी पळशेब्राह्मण यांणीं सामवेदी प्रभासकर ब्राह्मण गुमास्ता ठेऊन त्याजकडून उपाध्यिक चालवावें. याप्रों करार करून तुह्मांपासून सरकारांत नजर रुपये (१,५००) पन्धराशें करार केले असत, तरी सामवेदमन्त्रेंकरून तुम्हीं आपलें हव्यकव्य चालवून * * * अधर्म आचरण करूं नये. ब्राह्मणरीतीनें यथामार्गें वर्तत जाणें * * * अधर्में जो चालेल तो सरकारचा गुन्हेगार. अभय असे. जाणिजे. छ २ जावल प्रां हुजूर.

लेखन-
सीमा.

तुम्हीं प्रभासकर सामवेदीब्राह्मण आणाल त्यांजपासून पळशे ब्राह्मण तुह्मांकडील वृत्ति ज्यांकडे आहे त्यांणीं सामवेदमन्त्र यथास्थित पाठ करून तुम्हांकडील हव्यकव्य सामवेदमन्त्रेंकरून चालवावें. हें नकरीत तरी सदहू चालणुकेचा मजकूर सदरीं लिहिला आहे, त्याप्रो वर्तणूक करणें. छ मजकूर पा हुजूर.

लेखन-
सीमा.

परिशिष्ट (ङ*)

## पेशव्यांनीं वे. रा. रा. केशव रणसोड नाईक ह्यांस दिलेली सनद.

### शके १७१९ (इ० सन १७९७)

अखण्डितलक्ष्मीअलङ्कृत राजमान्य राजश्री गणपतराव जिवाजी गोंसावी, यांसीं—

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा खमस तिसैन मया व अलफ (शके १७१९) राजश्री केशव रणसोड उपनांव पुरन्दरे, गोत्र गौतम (?) सूत्र वाजसनी, वास्तव्य कसबें केळवें प्रगणें माहीम यांणीं स्वामीसेवा बहुत दिवस केली कुटुम्बवत्सल आहेत यास्तव यांचें चालवणें अवश्य जाणोन यांजवर कृपाळु होऊन यांस कुटुम्बाचे योगक्षेमार्थ मौजे रोटें प्रगणें मजकूर प्रान्त वसई हा गांव दरोबस्त कुलबाब कुलकानु हल्लीं पट्टी व पेस्तर पट्टी जलतरुतृणकाष्ठपाषाणनिधिनिक्षेपसहित, खेरीज हक्कदार व कदीम इनामदार करून सालमजकुरापासून नूतन इनाम सरकारांतून करार करून देऊन भोगवटीयास अलाहिदा पत्रें करून देऊन हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी मौजे मजकूर हा गांव दुमाला

* ही अस्सल सनद मोडींत असून वरील केशव यांचे पुत्राचे प्रपौत्र आनन्दराव सखाराम पुरन्दरे पुणताम्बेकर रोटें इनामदार हल्लींवस्ती केळवें ह्यांजकडेस आहे.

करून देऊन इनामपत्राप्रमाणें चालवणें आणि आकार होईल तो यांचे नावें प्रगणें मजकूरचे हिशेबीं इनामखर्च लिहित जाणें. जाणिजे छ २२ रमजान आज्ञाप्रमाण.

निवाडपत्र जिल्हा उत्तरप्रान्तकोंकण येथील मदतनीस कलेक्टर साहेब यांचे कोर्टांत सन १८२७ कायदा १७ बाब १० नम्बर ५५३ कज्याचा. सन १८२७ पैकीं.

बालकृष्ण केशव नाईक वस्ती मौजे केळवें परगणे माहीम तालुके मजकूर यांजकडे मौजे रोटें परगणे माहीम हा गांव आहे. त्या गांवाचा धारा सरकारांत देत नाहीं.

सन १८२७ कायदा १७ कलम ४० पोटची रकम २ प्रमाणें तारीख २६ माहे सप्तेम्बर सन १८२७ ची बालकृष्ण केशव नाईक यांजवर सदहू गांवाबाबद नोटीस व सन १८२७ कायदा १७ यांतील कलम ४६ व ४९ व ५० याची नक्कल गेली ती सदहू अस्सलनोटीस बालकृष्ण केशव नाईक यांस तारीख २१ माहे अक्टोबर सन १८२७ चे रोजीं लागू जाहली. त्यापैकीं कानूचे कलमाची यादी बालकृष्ण केशव नाईक यांणीं आपले जवळ ठेवून नोटिसीवर सही करून दिली. ती अस्सल नोटीस या कज्यांत दाखल निशाणी नम्बर १ ची व बालकृष्ण केशव नाईक यांणीं अर्जी तारीख १५ माहे डिसेम्बर सन १८२७ ची दिली त्यांतील हंशील कीं, मौजे रोटें परगणे माहीम हा गांव इनाम, माझे बापास श्रीमन्त सवाईमाधवराव यांची चाकरी केली सबब खुषमर्जी होऊन वंशपरम्परा दिला आहे. त्याची सनद होती ती गैरवि-ल्हेस लागली आहे, सांपडत नाहीं. ह्मणोन अर्जी व याच अर्जी-लगत अजम दप्तरदार यांचा रिपोर्ट तारीख १७ माहे डिसेम्बर सन १८२७ चा आहे त्यांत बालकृष्ण केशव नाईक, केशव रण-सोड नाईक याचे पुत्र यांस मौजे मजकूर पैकीं नक्त रुपये ८ व भात खण्डी १२८४ याचे नक्त रुपये १८३ एकून रुपये १९१ याचा दाखला सन सलास अशर सन १८१२ ते १३ चे झडती

ताळ्यांत वसईची आहे यांत व सन समान अशर सन १८१७ ते १८ चे सालचे जाबत्याची नक्कल पुणीयाहून (पुण्याहून) आली आहे त्यांत व पुणीयाचे इंग्रेजी बुकास असे. सदहू अर्जी या कज्यांत दाखल निशाणी नम्बर ९ आहे; व दुसरा दफ्तरदार याचा रपोट (रिपोर्ट) तारीख १४ मार्च सन १८२८ चा या कज्यांत दाखल निशाणी नम्बर १२ चा आहे. त्यांत लिहिलें आहे कीं, सन सबा मयातैन इंग्रेजी सन १८०६ ते ७ चे झडतीखर्चाकडे इनामाचे सदरांत बरहुकूम सनद छ २२ रमजान सन तिसैन इंग्रेजी सन १७८९ ते ९० खेरीज हकदार व कदीम इनामदार करून गांव देविला (देवविला) त्याचा आकार बरहुकूम गुदस्त प्रॉ केशव रणसोड नाईक मृत्यु पावले. हल्लीं त्याचे पुत्र बालकृष्ण केशव नाईक आहेत. त्यांजकडे नक्त रुपये ८ व भात गोडें कैली साडे तिसरी मापें खण्डी १२८४ सन तिसा मयातैन सन १८०८ ते ९ चे सालचे झडतीस बेरजेचा दाखला इनामखर्चाकडे लागला आहे त्याजवरून मनास आणितां सदहू इनामगांवची बेरीज नक्त रुपये ८ व भात कैली खण्डी १२८४ याचे नक्त रुपये १८३ एकूण एकन्दर जमा रुपये १९१ याचा वगैरे दाखला सन सबा मयातैन सन १८०६ ते ७ व सन तिसा मयातैन सन १८०८ ते ९ व सन सलास अशर सन १८१२ ते १३ चे झडत्यांत खर्चाकडे इनामाचे सदरांत व सन समान अशर सन १८१७ ते १८ चे सालचे जाबत्याची नक्कल आहे त्यांत व इङ्ग्रेजी पुणें बुकांत बालकृष्ण केशव नाईक, केशव रणसोड नाईक यांचे पुत्र यांचे नावें लागला सबब बालकृष्ण केशव नाईक यांचे पुत्र यांजकडे इनाम गांव चालतआल्याप्रमाणें चालवणें ह्मणोन दफ्तरदार यांस हुकूम तारीख २६ माहे मार्च सन १८२८ चा केला असे, त्याची नक्कल या कज्यांत दाखल निशाणी नम्बर १३ तारीख २९ माहे मार्च सन १८२८ सुरुसन समान अशर मयातैन व अलफ सन १८२७ ते २८ ताजाकलम सदहू बाबद पुन्हा चौकशीकरितां देशपाण्डे

व गांवकुळकर्णी परगणे माहीम याचें पत्र तारीख १२ जुलई सन १८२८ चें हुजुरून आलें त्यांत लिहिलें आहे कीं, मौजे रोटें हा गांव इनाम बालकृष्ण केशव नाईक यांस कधीं दिल्हा (दिला) त्याचा कागदोपत्रीं आधार लागत नाहीं; परन्तु सन सीत तिसैन सन १७९४ ते ९५ चे सालापासोन आजपर्यन्त इनामाची वहिवाट त्यांजकडे चालली आहे त्याचा दाखला माजी राज्यांतील सन अशर सन १८११ ते १२ चे गांव घडणींस लागला आहे व आमचे हक्काचे हिशेबास लागला आहे. त्यास सदर्हू पत्र या कज्यांत दाखल निशाणी नम्बर १४ व बालकृष्ण केशव नाईक यांणी आपल्या खासगीकडील वहिवाटीचीं बोटखताचीं पत्रकें सन खमस तिसैन मयातैन व अलफ सन १७९३ ते ९४ चे व सन सबा तिसैन सन १७९५ ते ९६ व सन समा तिसैन मया व अलफ सन १७९६ ते ९७ व सन सबा अशर मयातैन व अलफ सन १८१६ ते १७ एकूण चार पत्रकें हुजूर दाखविलीं त्यांच्या नकला या कज्यांत दाखल निशाणी नम्बर १५ व १६ व १७ व १८ एकूण कागद चार व सदर्हू कागद पहातां बालकृष्ण केशव यांजकडे गांवची वहिवाट चालत आली असें दिसोन येतें. सबब यांजकडे गांव चालवावयाचा ठराव करून पेशजीं अजम दफ्तरदार यांस तारीख २९ माहे मार्च सन १८२८ चा हुकूम, सदर्हू गांव चालत आल्याप्रमाणें चालवणें असा केला आहे, तो लायक केला आहे. तारीख १७ माहे जुलई सन १८२८ सुरुसन तिसा अशरी मयातैन व अलफ, सन १८२८ ते २९ सदर्हू सम्बन्धीं कागदपत्रें येणें प्रमाणें:— १ नोटीस निशाणी नम्बर. २—अर्जी. ३—अर्जी तारीख ११ माहे डिसेम्बर सन १८२७. ४-समान महादाजी गोविन्द कोशे. ५-समान सखाराम त्र्यम्बक. ६—समान गोविन्द रघुनाथ केळवेंकर. ७—समान महाद किणी. ८-रपोट महमद सैयद कमाविसदार याचा. ९-अर्जी इनामदार याची. १०-अर्जी गोविन्द रघुनाथ केळवेंकर. ११ व १२-रपोट

आपाजी रघुनाथ दफ्तरदार यांचा. १३-दफ्तरदार यास हुकूम जाहला त्याची नक्कल. १४—देशपाण्डे व गांवकुळकर्णी परगणे माहीम यांचें पत्र. १५, १६ व १७, १८-नक्कल बोटखताचे पत्र-काची. १९-निवाडेपत्र.

(सही) गोपाळ रघुनाथ (कारकून)

(सही) अजम इस्कम साहेब यांची असे.

अस्सल बरहुकूम नक्कल रुजु असे. (इंग्रेजी)

(सही) गोपाळ रघुनाथ (कारकून)

(सही) इङ्ग्रजी.

---

## परिशिष्ट (च*)

## वे० रा० रा० धोण्डुअर्जुन पण्डित पुरन्दरे ह्यांस पेशवाईतून केळवेंमाहीम येथील वृत्तिसम्बधीं दिलेली सनद.

### शके १७३२ ( इ० स० १८१०. )

॥ श्री ॥
श्रीमन्त बाजीरावपन्त
प्रधान चरणीं तत्पर
परशुराम खण्डेराव निरन्तर
(पुढें लागत नाहीं)

आज स्वारी राजश्री परशुराम खण्डेराव सुभेदार प्रान्त वसई ता धोण्डु अर्जुन पण्डित वृत्त्यंशी उपाध्येपण पाखाडी रेवाळें व पोट पाखाडी कसबें माहीम पो मजकूर सुा इहिदे अशर मयातैन व अलफ (शके १७३२.) सुभा बाजीपुरा येऊन विदित केलें कीं, पाखाड्या मजकूर येथील उपाध्येपणाची वृत्ति आमची; त्यास

---

* ही अस्सल सनद मोडीलिपींत असून ती, वे० रा० रा० काशीनाथविठ्ठल पण्डित पुरन्दरे माहूरकर हल्लींवस्ती केळवेंमाहीम (बाजार) ह्यांजपाशीं आहे.

माझा पणजा बाबा पण्डित याचे पुत्र जयराम पण्डित व देव पण्डित व विठ्ठल पण्डित त्यांचा लेंक अर्जुन पण्डित माझा बाप; त्यास त्रिवर्ग आज्यांपैकीं देव पण्डित वृत्तीचा तिसरा विभाग घेऊन विभक्त झाला. कांहीं वर्षें माहिमास राहून पुढें मौजे सोपारें ता आगाशी येथें स्वराज्यापूर्वीं उपाध्येपणाची वृत्ति मिळवून तेथें घर बांधोन राहिला, त्याचे पोटीं पुत्रसन्तान नाहीं, एक कन्या जानकीबाई होती ती नारायण पण्डित उसरणीकर वा केळवें यांसीं दिल्ही; तिचे पोटीं माधव पण्डित व त्र्यम्बकपण्डित हे दोघे पुत्र; पैकीं माधवपण्डित यांसीं देवपण्डित यांणीं दत्तक घेतला. दोहीं कडील वृत्तीची वहिवाट करावयासीं देवपण्डित यासीं न साधे ह्मणोन माहिम येथील तिसरे विभागाची वृत्तीची वहिवाट लेंकीचा लेंक त्र्यम्बकपण्डित याजकडे सांगितली. तो मेल्यावर त्याचे लेंक हल्लीं करीत आहेत. ती वृत्ति व मौजे सोपारें ता आगाशी येथील उपाध्येपणाची वृत्ति देवपण्डित यांणीं स्वराज्यापूर्वीं साध्य केली, ती त्याचा पुत्र माधव पण्डित दत्तक याणें बाळाशिवराम नाईक माहीमकर यांजकडे गहाण घातली आहे. सदहू दोन्ही वृत्ति पण्डित मजकूर यांच्या. त्यास सालमजकुरीं आश्विनमासीं माधव पण्डित मृत्यु, पावला. त्याची नक्कल झाली. त्यापेक्षां त्याचे वृत्तीचे अधिकारी आह्मीं, यास्तव माझी वृत्ति मजकडे देवविली पाहिजे; ह्मणोन त्याजवरून त्र्यम्बकपण्डित उसरणीकर याचा लेक विठ्ठलपण्डित यांसीं सुभा आणविलें. त्यांणीं आपली हकिगत समजाविली कीं, देवपण्डित याचा तिसरा विभाग पाखाड्या मजकूरचा, पैकीं देवपण्डित वर्तमान असतां निम्में भाग आमची आजी जानकीबाई देवपण्डित याची कन्या हिजला विकत दिल्हा व निम्में राहिला तो माधव पण्डित याणें रुपये घेऊन सगळें वृत्तीचें खरेदीपत्र लेहून दिल्हें, तेव्हांपासून वृत्तीचा उपभोग आजपर्यन्त करीत आहों, मध्यें सन आर्बा मयातैनांत (शके १७२९ सांत) माधवपण्डित याणें सजा मजकूरचे महालकरी विसाजी बल्लाळ मोडक याजकडे फिर्याद केली, त्यासमयीं पंचाईत होऊन वृत्ति आमची आम्हांकडे

चालली याविषयीं तिचे कागदपत्र समजाविले ते येणें प्रमाणें:—

१ खरेदीपत्र शके १६८९ आश्विन वद्य ३ त्र्यम्बकपण्डित याणें माधवपण्डित याजपासून घेतलें त्यांतील मजकूर कीं, पाखाड्या मजकूर येथील वृत्ति आमची होती त्यास मागें देवपण्डित याणें निम्में विकत दिल्ही होती; बाकी निम्में आम्हांकडे होती परन्तु तुमचे रुपये नजरेस व देवपण्डित व त्यांची स्त्री या उभयतांचे क्रियेस व मागां खर्चास सरासरी शंभर रुपये पावेतों घेतले होते ते द्यावयासीं सामर्थ्य नाहीं व व्याजसुद्धां द्यावें तरी सामर्थ्य नाहीं, सबब निम्में वृत्ति होती ती तुह्मांस फरोक्त देऊन सगळे वृत्तीसीं आमसीं संबंध नाहीं म्हणोन त्या पत्रावर सही साक्षी.

१ खुद्द माधवपण्डित याची सहि ( बाळबोध ).
१ पत्र लिहिणार रघुनाथ शिवाजी परभु केळवेंकर
३ साक्षीदार—
  १ नाथजोशी दादजोशी वा। ( लागली नाहीं )
  १ नारायण बापूचार्य वा। कामण.
  १ नाथचुरी विठ्ठलचुरी वा। ( लागली नाहीं. )
  ———
  ३
———
५



१ रणछोडपण्डित बिन् माधवपण्डित वा। (लागली नाहीं) हा देवपण्डित याचा गोत्रसम्बन्धी याणें त्र्यम्बक बिन् नारायणपण्डित व माधव बिन् देवपण्डित या दोघांचे नांवांचें पत्र शके १६८६ फाल्गुन शुद्ध ७ भौमवारीं रात्रौ लेहून दिल्हें त्यांत मजकूर कीं, देवपण्डित गोत्रज होता त्याणें आपले भागापैकीं निम्में वृत्ति कन्या जानकीबाई हिजला विकत दिल्ही व निम्में माधवपण्डित यासीं धर्मपुत्र घेऊन त्यास दिल्ही.

याप्रमाणें बहुतांचें साक्षीनिशीं अलाहिदा पत्रें आहेत त्याप्रमाणें आह्मांस मान्य आहे म्हणोन त्या पत्रांवर सहि साक्षी.

१ रणछोड पण्डित याची सही (बाळबोध.)

१ पत्रलिहिणार रघुनाथ शिवाजी परभु केळवेंकर.

३ साक्षीदार–

१ रघुनाथ पुतळाजी परभु केळवेंकर पाताणे.

१ भिंवजोशी त्र्यम्बकजोशी वस्ती (लागली नाहीं)

१ पोसपाठक वालपाटक केळवेंकर.

३

५

पत्र

१ फारकत शके १६८९ आश्विन वा॥ १२ स माधव पण्डित त्र्यम्बक पण्डित यास लेहून देतों त्यांतील मजकूर कीं, तुम्हांकडे देवपण्डित व नारायणपण्डित व मातुश्री जानकीबाई यांचा व आमचेहि जोडीचा ऐवज होता त्यास देवपण्डित याणें आह्मांस पुत्र केला ह्मणोन घरीं जो ऐवज आहे त्याशीं आम्हांशीं सम्बन्ध नाहीं पञ्चरात्री आम्हीं बालट सांगों म्हणोन मातुश्री जानकीबाईनें उबलख ऊर्फ उखते म्हैस एक व कळसा ऊर्फ घागर ताम्ब्याची चवदाशेर एकूण दोन डागिणें दिल्हे ते घेऊन हें फारकत लेहून दिल्हें असे व तुम्हीं आम्हीं सखे बन्धु सबब तुमच्या मागें वंशवृद्धि नसली तरी तुमचे घरचे सर्वकांहीं ऐवजाचे धणी आम्हीं व आमचा वंश व आमच्या मागें आमचा वंश नसला तरी याप्रमाणेंच तुम्हीं व तुमचा वंश असेल, तो आमचे सर्व वस्तूचा धणी म्हणोन त्या पत्रावर सही साक्षी.

१ खुद्द माधवपण्डित बाळबोध सही.

१ पत्रलिहिणार रघुनाथ शिवाजी परभु केळवेंकर.

४ साक्षीदार—

१ माधव नाईक हरनाईक वा। लागली नाहीं.
१ नारायण बापूचार्य वा। कामण.
१ रामजीपाठक वा। लागली नाहीं.
१ नाथचुरी विठ्ठलचुरी वा। लागली नाहीं.

४

६

पत्र

१ छ १७ जिलकाद सन आर्बा मयातेन. पाखाडी रेवाळे येथील पाटील यांसीं सजा माहिमचे महालकरी यांणीं चिठी दिल्ही आहे त्यांतील मजकूर कीं, महादेव देव पण्डित व पाण्डु त्र्यम्बक पण्डित या उभयतांचा कज्या पाखाडी मजकूर व मागेलवाडा पोण्ढा येथील उपाध्येपणाचा लागून माधव पण्डित महालीं फिर्याद होऊन वृत्तीची जप्ती करविली त्याचें व याचें मनास आणितां निम्में वृत्ति देव पण्डित याणें दिल्हीच होती व निम्में राहिली ती माधव पण्डित याणें त्र्यम्बक नारायण पण्डित याजकडून पैका घेऊन दिल्ही त्याचे कागदपत्र त्र्यम्बक पण्डित याचे पुत्र पाण्डुरङ्ग पण्डित याणीं महालीं आणून समजाविले पञ्चमतें माधव पण्डित माझी वृत्ति मीं आपलेकडून गुमास्तेगिरीनें सांगितली आहे ह्मणोन ह्मणतो हें खोटें. देव पण्डित याणें निम्में वृत्ति दिल्हीच होती व निम्में राहिली होती ते माधव पण्डित याणें पैका घेऊन दिल्ही असतां कागदोपत्रीं लेख असोन माझी वृत्ति ह्मणोन वाद सांगत आहे. हा खोटा असें पञ्चमतें ठरलें, सबब जप्तीची मोकळीक करून पाण्डु त्र्यम्बक पण्डित याची वृत्ति याजकडे सांगितली असे, ह्मणोन चिठी महालची कारकीर्द विसाजी बल्लाळ मोडक.

४

एकूण चार पत्रें पाहून धोण्डु अर्जुन पण्डित याजवळ माधव पण्डित याच्या दस्ताऐवजी चिट्या होत्या त्या व माहिमास पंचाईत झाली त्यावेळचे कागदपत्र आणविले त्यांतील मजकूरः——

३ धोण्डु अर्जुन पण्डित यांजपासीं माधव पण्डिताचे दस्ताऐवज आहेत ते शके १७२५ सांतील.

१ वैशाख शुा चे शिवराम त्र्यम्बक पण्डित याचे नांवें माधव पण्डित याणें लिहिलें आहे त्यांतील मजकूरकीं, आमचा वृद्धापकाळ झाला सबब आमचे तक्षिमेचें काम आमचा पुतण्या धोण्डु अर्जुन पण्डित करील तरी तुम्हीं अडथळा करूं नये म्हणोन.

१ ज्येष्ठ शुा ६ धोण्डु अर्जुन पण्डित यांचे नावें माधव-पण्डित चिटी लिहितो त्यांतील मजकूर कीं शिवराम त्र्यम्बक पण्डित यासीं आजार झाला आहे. बरा झाला म्हणजे येणार आहे आल्यावर समजूत करूं म्हणोन चिटीची नक्कल आहे.

१ ज्येष्ठ शुा १२ चे शिवराम त्र्यम्बक पण्डित याचे नांवें माधव पण्डित लिहितो कीं, तुह्मीं आजारी म्हणोन समजावोन चिटी नेलीत आणि गांवांत प्रयोजनें उरकितां त्यास धोण्डूस पहिली चिटी दिल्हीच आहे त्याप्रो तो वृत्ति चालवील म्हणोन चिटी.

---

३

३ माहिमास महालकरी यांणीं जबान्या हरदुवाद्यांच्या व सड घेतली शके १७२५ त्यांतील मजकूरः—

१ माधव पण्डित याणें दोन जबान्या दिल्ह्या पैकीं पहिली जबानी मार्गशीर्ष वा ११ ची आहे त्यांतील मजकूरः— माहीम व सोपारें दोहींकडील वृत्तीची वहिवाट एकट्यास न साधे म्हणोन माहीमचे वृत्तीवर गुमास्ता

ठेवीत होतों तेव्हां जानकीबाई पहिली मातोश्री हिचें बोलणें पडलें कीं, पारका गुमास्ता ठेवूं नको त्र्यम्बक वृत्तीची वहिवाट करून उत्पन्न होईल तें पावतें करीत जाईल. त्यावरून त्याजकडेस गुमास्तेगिरीनें वृत्तीची वहिवाट सांगितली. मातोश्री वर्तमान असतां वृत्तीचें उत्पन्न पावतें होत असे. ती मेल्यावर उत्पन्न न येई म्हणोन मीं माहिमास गेलों होतों तेथें रामगावड भण्डारी पोंढेकर याजकडे लग्न झालें तेथील विभाग आला तो ढोण्या पाटील भण्डारी याचे स्वाधीन करून ठेविला होता, तो त्र्यम्बक पण्डित याणें माझा खोटा निरोप पाटील यास सांगोन विभाग घेऊन गेला. त्यावरून त्याचा व माझा कज्या झाला. नन्तर मजला आजार झाला तेव्हां पाण्डु पण्डित उसरणीकर व धोण्डु अर्जुन पण्डित यांसीं बोलाविलें, तेव्हां पाण्डूचा भाऊ बापू त्र्यम्बकपण्डित व धोण्डु पण्डित हे सोपाऱ्यास आले. तेव्हां बापू यास सांगितलें, कीं तुझ्या तीर्थरूपाकडे वृत्तीचें काम गुमास्तगिरीनें होतें त्यास आजपासून धोण्डु अर्जुन पण्डित आमचा पुतण्या याचे स्वाधीन करणें ह्मणोन सांगितलें व वृत्ति धोण्डूचे हवालीं करावी याच्या चिट्या पेशजीं दिल्याच आहेत व दुसरी जबानी माघ शुा १२ ची आहे त्यांतील मजकूर कीं, त्र्यम्बकपण्डित याचा व त्याचे मातुश्रीचा कज्या होऊन रुसोन बाबुलजोशी याजकडे बसला. मातोश्री समजी करावयासीं गेली तेव्हां त्याचें बोलणें पडलें कीं, माधवपण्डित आपले वृत्तीचें खरेदीपत्र लिहून देईल तर समजेन, नाहींतर गोंसावीं होऊन देशत्याग करीन. त्यावरून मजकडे माणूस पाठऊन मला बोलाऊन नेऊन हें वर्तमान मातुश्रीनें सांगोन रडों लागली; तेव्हां तिचे आग्रहास्तव वृत्तीचें खरेदीपत्र लिहून दिलें

परन्तु एक रुपयाहि घेतला नाहीं. याप्रमाणें दोहों जबान्यांतील मजकूर.

१ पाण्डुरङ्ग त्र्यम्बकपण्डित उर्फ शिवराम त्र्यम्बकपण्डित याचे जबानींतील मजकूर कीं, माझें लेंकूरपण. ही माहिती मजला नाहीं परन्तु तीर्थरूप सांगत असत कीं, देवपण्डित याणें जानकीबाईपासून पैका घेऊन वृत्ति विकत दिल्ही ती फिरङ्गाणापासून आम्हीं वतनाचा उपभोग करीत आलों. माधवपण्डित यासीं दत्तक घेतला त्यानन्तर माधवपण्डित यास पैका देऊन माहीमचे वतनाचें बेदावापत्र करून घेतलें ह्मणोन. मार्गशीर्ष वा। १० ची जबानी.

१ चिन्तामण जोशी व बाबाजोशी माहीमकर वृत्त्यंशी हे लिहून देतात कीं, आमचे वहिवाटीपासून आजपर्यन्त चाळीस वर्षें उपभोग त्र्यम्बक पण्डित करीत आला ह्मणोन सड आहे.

---

३

---

६

सदरहू जबान्या व पत्रांतील व विठ्ठल त्र्यम्बक पण्डित याजवळचे पत्रांतील अन्वय व हरदुवाद्यांचा मजकूर व वृत्त्यंशी याची चाल समजोन घेऊन पञ्चमतें सुभा मनास आणितां विठ्ठल त्र्यम्बक पण्डित याजवळचे कागदपत्रास बाध येतो. तीं कलमें:—

१ त्र्यम्बक पण्डित याणें माधवपण्डित याजपासून शके १६८९ त सगळे वृत्तीचें खरेदीपत्र करून घेतलें त्यास मागेंपुढें गोत्रजांचा वारसा नसावा ह्मणोन रणछोड पण्डित हा माधवपण्डिताचा गोत्र सम्बन्धीं याचें पत्र शके १६८६ त त्र्यम्बक पण्डित व माधवपण्डित या दोघांचे नावें त्र्यम्बकपण्डित लिहून घेतो आणि तें पत्र आपले

पासीं ठेविती त्यांत निम्में जानकी बाईस देवपण्डित याणें विकत दिल्ही व निम्में वृत्ति माधवपण्डित यासीं धर्मपुत्र घेऊन त्यास दिल्ही, असें त्या पत्रांत लिहितो त्यास सगळी वृत्ति पंच्याशींतच दिल्ही. असें असतें तरी शायशींत निमोनिम वृत्तीचे भाग व दोघांचे नांवें पत्र रणसोडपण्डित न लिहिता व त्र्यम्बकपण्डित लिहून न घेता याजमुळें खरेदीपत्रास बाध येतो.

१ वृत्त्यंशी यांगीं चाल सांगितली कीं, वृत्ति विकणें तरी दायादास द्यावी तो न घेई तरी पारकी यास द्यावी. तें पत्र कुळकर्णी याच्या हातचें असावें व दायाद, विभागी व वतनदार वृत्त्यंशी यांच्या व ज्याचे घरचें उपाध्येपण त्या यजमानाच्या साक्षी असाव्या. ही चाल आहे, त्या अन्वयें खरेदीपत्र झालें नाहीं.

१ दायाद विभागी यांचे साक्षीचें कारण नाहीं असें ह्मणावें तरी, वतनाचे विभागास सम्बन्ध नाहीं व पुरुषान्तरेंहि मिळत नाहींत. गोत्रज मात्र रणसोडपण्डित; त्याचे पत्र साधनी भोगवटयास त्र्यम्बकपण्डित लेहून घेतो आणि माधवपण्डित यांचे प्रत्यक्ष चुलत्याचा वंश असतां खरेदीपत्रावर त्याची साक्ष नाहीं; याजवरून खरेदीपत्र घेतलें हें प्रसिद्ध घेतलें असें होत नाहीं.

१ रोख रुपये घेऊन वृत्ति फरोक्त दिल्ही असें ह्मणावें तरी, माधव पण्डित यांगीं माहीमचे जबानींत रुपया एकहि घेतला नाहीं असें लिहून दिल्हें, त्याचा पडोसा पाहातां देवपण्डिताचे जोडीचा व आमचेहि जोडीचा ऐवज येणें ह्मणोन माधव पण्डित त्र्यम्बक पण्डितापासीं खटला करूं लागला, त्या समयीं शके १६८९ त जानकीबाई हिणें म्हैस एक, व घागर एक, उबलख उर्फ उखतें देऊन देवपण्डिताच्या व माधव पण्डिताच्या ऐवजासीं

सम्बन्ध नाहीं ह्मणोन लेंक त्र्यम्बक पण्डित याचे नांवें फारकती जानकीबाई माधवपण्डितापासून लेहून घेत्ये. फारकती दिल्या नन्तर रास्ते यांचे कारकिर्दींत महालानीहायत्ते वृत्तीचे चत्रकशीस बाळाजी राम ठाकूर गेले होते, त्यांजवळ माधव पण्डित फिर्याद करतो कीं, माझा ऐवज त्र्यम्बक पण्डित याजकडे येणें आहे, त्यावरून देव पण्डित यत्नोत्पन्न नव्हता; क्रियेस वगैरे रुपये घेतले असें खरेदीपत्रांत माधव पण्डित लिहितो, तें मातोश्रीचे भिडेमुळेंच लिहितो, असा सम्भव होतो; रोख रुपये घेतले असें होत नाहीं.

१ पाखाडी मजकूरचे पाटील यांचें नांवें पाण्डु त्र्यम्बक पण्डित याणें सजा माहीमची चिठी घेतली आहे, त्यास खरेदीपत्र सगळें वृत्तीचें शके पंच्यायशींत घेतलें असतां मागाहून शके शाहायशींत रणछोड पण्डिताचें पत्र घेतलें आहे, त्यांत निम्में जानकीबाई व निम्में माधव पण्डित असें लिहिलें आहे. रुपयेहि रोख घेतले ऐसा निश्चय ठरत नाहीं; असें असतां गैरवांका समजावून महालची चिठी घेतली.

---

९

येणेंप्रमाणें पांच कलमें लिहिल्याप्रमाणें खरेदीपत्रास बाध येतो व रुपये घेतले असा निश्चय होत नाहीं व खरेदीपत्रावर धोण्डु अर्जुन पण्डित याच्या वडिलांची साक्ष नाहीं व वृत्त्यंशी यांचे चालीप्रमाणें खरेदीपत्र झालें नाहीं व माधवपण्डित याची नक्कल झाली; सबब वृत्तीचा अधिकारी धोण्डु अर्जुन पण्डित हा होतो; परन्तु त्र्यम्बकपण्डित उसरणीकर याचा भाऊ माधवपण्डित यासीं देवपण्डित याणें दत्तक घेतला. वृतीचें खरेदीपत्र दिलें होतें; वहिवाट वृत्तिची फार दिवस त्र्यम्बक पण्डित याचे लेंकांनीं आजपर्यन्त केली; याजक-

रितां देव पण्डित याचा विभाग उभयतांस निमोनिम द्यावा. याप्रमाणें पंचमतें ठरलें; त्यावरून देव पण्डित याचे विभागाच्या वृत्तीच्या वाड्या पाखाड्या मजकूरच्या ———————— सुमारें:—

१ पोंढें वाड्या २ पैकीं खुद्द धोण्डु अर्जुन पण्डित याचे भागाची १ बाकी

२० दरोबस्त वृत्तीच्या वाड्या ————————

| | | |
|---|---|---|
| १ वाडी टाकरोळें. | १ वाडी देळवडी बुद्रुक | १ वाडी देळवडी खुर्द. |
| १ वाडी विझोडी. | १ तद्दल वाडा नजीक देळवडी. | १ भडो भाट. |
| १ वाडी वेडी. | १ वाडी भरवड वाडगें. | १ गोटण भाट. |
| १ वेशा वाडा. | १ वाडी बुलावडी. | १ गोरस वाडी. |
| १ वाडी कामदपुरी. | १ भरड भाट. | १ वाडी महाळुङ्गी. |
| १ वाडी उम्बर भाट | १ वाडी झात्रवडी. | १ चिरा दाउदखानचा. |
| १ वाडी महादोडी. | १ ताड भाट. | ० लग. |
| ७ | ७ | ६ |

२०

२०

एकूण वृत्तीच्या वाड्या एकवीस पैकीं निम्में विठ्ठल त्र्यम्बक पण्डित यांसीं, बाकी निम्में पाखाड्या मजकूर पैकीं व मौजे सोपारें तर्फ आगाशी येथील वृत्ति देव पण्डित यांणीं उपाध्येपणाची स्वराज्यापूर्वीं साध्य केली ती माधव देव पण्डित याणें बाळा शिवराम नाईक माहीमकर याजकडे गहाण ठेविली होती, ते गहाणाचे रुपये तुजकडून बाळा मजकूर यास देववून वृत्ति सोडविली. सदर्हू दोन वृत्ति माधव देव पण्डित याच्या. त्याची नक्कल झाली. तूं त्याचा

चुलतपुतण्या सबब हरदुवृत्तीबाबद नजर रुपये एकूण पन्नास रुपये घेऊन पाखाड्या मजकूर पैकीं निर्म्मे व सोपारें येथील वृत्ति सालमजकुरापासोन तुजकडे सांगितल्या असत; तरी उपाध्ये-पणाचे चालीप्रमाणें वहिवाट करून वंशपरम्परेनें उपभोग करीत जाणें. जाणिजे छ १२ जमादिलावल पा हुजूर.

मोर्त्तब सुद.

---

## परिशिष्ट (छ*).

### वे० रा० रा० धोण्डु अर्जुन पण्डित ह्यांस पेशव्याईतून वृत्तिसम्बन्धीं दिलेली सनद, शके १७३२-(इ० स० १८१०.)

राजमान्य राजश्री माहादाजी नारायण हजरदार सजा माहीम गोंसावीं यांसीं.—

सेवक परशराम खण्डेराव सुभेदार प्रान्त वसई नमस्कार. सुा इहिदे अशर मयातैन व अलफ (शके १७३२) राा धोण्डु अर्जुन पण्डित वृत्त्यंशी माहीमकर याणें सुभा येऊन विदीत केलें कीं, देव-पण्डित माझा चुलतआजा त्याचे विभागाच्या वाड्या उपाध्येपणाच्या सुमारें एकवीस पाखाडी रेवाळें व पोट पाखाडी कसबे माहीम येथें आहेत त्यावृत्तीची वहिवाट देव पण्डित याचे लेंकीचा नातु विठ्ठल त्र्य-म्बक पण्डित केळवेंकर करीत आहे, त्यास देवण्डिताचा लेंक माधव-पण्डित होता तो सालमजकुरीं मृत्यु पावला. त्याची नक्कल झाली. मीं त्याचा चुलतपुतण्या, याजकरितां मनास आणून ती वृत्ति मजकडे देविली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून विठ्ठल त्र्यम्बक पण्डित यास सुभा आणवून उभयतांचे कागदपत्र व हारद्र समजोन घेऊन देव पण्डित याची वृत्ति दोघांस निमोनिम द्यावी असें पंचाईतमतें ठरलें, त्या-

---

* ही अस्सल सनद मोडीलिपींत असून ती वे० रा० रा० काशीनाथ विठ्ठल प-ण्डित पुरन्दरे माहूरकर हल्लीं वस्ती केळवें माहीम ह्यांजकडे आहे.

जवरून देव पण्डित याच्या विभागाच्या वाड्या हरदुपाखाड्या पैकीं सुमारें २१ एकवीस; त्यांपैकीं निम्में वृत्तिची वहिवाट उपाध्येपणाचे चालीप्रमाणें वंशपरम्परेनें करून उपभोग करित जाणें ह्मणोन; धोण्डु अर्जुन पण्डित यांसीं अलाहिदा निवाडपत्र करून देवून ही सनद तुह्मांस सादर केली असे, तरी वृत्तीची वहिवाट चालूं देत जाणें. या सनदेची प्रत करून घेऊन अस्सल सनद धोण्डु मजकूर यास भोगवट्यास देणें. जाणिजे छ १२ जमादिलावल पा हुजूर.

मोर्त्तब सुद.

---

## परिशिष्ट (ज*)

## वे. रा. रा. विष्णुभट्ट पुरोहित ह्यांस श्रीवज्राईचे पूजेबद्दल पेशव्यांनीं दिलेली सनद.

## शके १६५२ (इ० सन १७३०.)

श्री
राजाशाहू नृपति
हर्ष निधान बाजीराव
बल्लाळ मुख्य
प्रधान.

आज्ञापत्र स्वारी राजश्री—पन्तप्रधान प्रान्त फिरङ्गाण किल्ले तान्दुळवाडी ताहां पाटील व मोकादम वाडी नवघर सुा इहिदे सलासिन मया व अलफ (शके १६५२) वेदमूर्ति राजश्री विष्णुभट्ट पुरोहित बिन् केशवभट्ट वा मजकूर हे गांव किल्ले मजकूरचे वृत्त्यंशी तेथील श्रीग्रामदेवता वज्राईची पूजा करितात, सबब श्रीचे नैवेद्यास व ब्राह्मणांचे बेगमीकरितां मौजे मजकूर

---

* हीं व हीच्या पुढील अशा ह्या दोन्हीं अस्सल सनदा मोडीलिपींत असून त्या वे. रा. रा. बाबाजी घनःशाम पुरोहित उज्जयनीकर ह्यांजवळून वे. रा. रा. अमृतराव सखाराम आचार्य पुणताम्बेकर हल्लीं वस्ती भिवण्डी ह्यांनीं ग्रंथकारास आणून दिल्या.

पौा शेत चांगलें ठरावून दिलें आहे, त्याप्रो मशारनिल्हे भटजी यांस शेतें दाखवावीं.

||. तान्दुळवाडी राज्यभाग. ||. नवघर ब्राह्मण टेप.

१

सदहूंप्रो कोंकणी फिरङ्गाणी माफी बतीचा मुडा १ एक त्यास भटजी मजकूर यांणीं वंशपरम्परा शेत मजकूरची लागवड करून श्रीवज्राईची पूजा करीत असावी. छ १३ माहे मोहरम.

मोर्तब सुद.

## परिशिष्ट (झ*).

## वे. रा. रा. विष्णुभट्ट पुरोहितांस श्रीच्या नैवेद्याबद्दल दिलेल्या शेतांबद्दलची सनद.

### शके १६५२ (इ० सन १७३०).

श्री

राजश्री वर्तमानभावी मामले किल्ले तान्दुळवाडी प्रान्त फिरङ्गाण गोंसावी. सेवक बाजीराव बल्लाळ प्रधान. सुरुसन इहिहे सलासिन मया व अलफ (शके १६५२) वेाा राजश्री विष्णुभट्ट पुरोहित वस्ती वाडी नवघर प्रान्त मजकूर, हा ब्राह्मण किल्ले व गांव मजकूरचा वृत्त्यंशी आणि श्री ग्रामदेवतेची पूजा करितो, ह्मणोन श्रीचे नैवेद्याचीं शेतें आहेत, त्यांची लागवड जातीनें होत नाहीं सबब अर्धले यांजकडून लागवड करवितील, तर भटजी मजकूर यांचे अर्धले यांस घरपट्टी व वेठ वगैरे तगादा एकन्दर करूं नये. श्रीचे नैवेद्याचीं शेतें असत. हरएकविसीं उपद्रव होऊं देऊं नये. जाणिजे. छ १३ जिलकाद.

मोर्तब सुद.

* ११६ पृष्ठावरील टीप पहा.

## परिशिष्ट (ञ *)

## वे० रा० रा० विठ्ठलजोशी यांस जोतिष व उपाध्येपणाविषयीं पेशवाईंतून मिळालेलें वाटणीपत्र.

### शके १६५९ ( इ. स. १७३७ )

राा विठ्ठलजोशी यांसीं माधवराव नारायण देशमुख व देशपाण्डेपण व गांवकुळकर्णी व सरपाटीलकी प्रान्त वसई सुाा समान समानीन मया व अलफ ( शके. १६५९ ) तुम्हीं बाजीपुरा येऊन विनंन्ति केली कीं, प्राचीन वडिलांपासून आमची वृत्ति चालत आहे. (तीं) येणेंप्रमाणें:—

| ज्योतिषपणा व उपाध्येपणाः— | ज्योतिषपणा देहे सुमारः— |
|---|---|
| देहे ———— सुमार | १ मौजे आगर वाडी. |
| १ मौजे केहरें. | १ मौजे नागावें. |
| १ मौजे मथाणे. | १ मौजे सफाळें. |
| — | १ मौजे सारबोडी. |
| २ | १ मौजे कपासें. |
| | १ मौजे सिरटें. |
| | १ मौजे कारवलें. |
| | — |
| | ७ |

एकूण नऊ गांव. पैकीं दोन गांवचें ज्योतिष व उपाध्येपण व सात गांवचें जोतिषपण येणेंप्रमाणें आहे; त्यापैकीं आमचे चुलते भीमजोशी यांजकडे निम्में वृत्ति चालत होती; बाकी निम्में तक्षिमेस आम्हीं येणेंप्रमाणें:—

| किता ———— | किता ———— |
|---|---|
| १ नारायण जोशी. | १ गोंवर जोशी. |
| १ खुद्द विठ्ठल जोशी. | १ जगन्नाथ जोशी. |
| — | — |
| २ | २ |

* हें अस्सल वाटणीपत्र मोडी लिपींत असून तें वे० रा० रा० बाबा बापू पुरन्दरे उज्जयनीकर हल्लीं वस्ती वसई ह्यांजकडेस आहे.

एकूण निम्में तक्षिमेंत वाटणी येणेंप्रमाणें करीत होतों; हल्लीं भीमजोशी यांची निम्में तक्षीम मी मशारनिल्हेस शके १६११ त दीडशें रुपये देऊन निम्में वृत्ति आपलेकडे करून घेतली, व मौजे कोहरें येथें निम्में वतन दादजोशी आमचे गोत्रजपुरुष त्यांची तक्षीम होती, ते मृत्यु पावले, त्यांचे पोटीं सन्तान नाहीं, सबब सरकारांत गोंवरजोशी याणें पन्नास रुपये देऊन मशारनिल्हेचे निम्में गांवची वृत्ति करून घेतली. एकूण मीं दीडशें रुपये व पन्नास रुपये गोंवरजोशी याणें वतनाबद्दल खर्च करून वतन करून घेतलें; सबब ऐवज समयिक चौघां भावांचा घालून चार तक्षिमा येणें-प्रमाणें:—

| किता— | किता— |
|---|---|
| १ गोंवर जोशी. | १ जगन्नाथ जोशी. |
| १ खुद्द विठ्ठल जोशी. | १ नारायण जोशी. |
| २ | २ |

एकूण चार तक्षिमा सारख्या करून देववणार स्वामी समर्थ आहेत, ह्मणोन त्याजवरून मनास आणून चार तक्षिमा येणेंप्रमाणें जें उत्पन्न होईल त्यापैकीं वाटणीप्रमाणें वाटून घेतजाणें. जो हजीर नसेल त्याची तक्षिम अमानत ठेवणें. याप्रमाणें करार करून दिल्हें असे; तरी सुरळीत चालवणें, दिकत न करणें. वतनानिमित्त मागील कागदपत्र चौघांतून कोणाजवळ असेल तो रद्द असे. जाणिजे. छ ७ रविलावल. सुरुसन समान समानिन मया व अलफ.

मोर्त्तब सुद.

## परिशिष्ट ( ट* ).

## शिरगांव येथील श्रीसिद्धेश्वराचे लिङ्गोत्पाटणाचा खटला.

## सुरुसन १२०९ शके १७३०-१७३१ ( ई० स० १८०८-१८०९. )

यादी गम्बानाईक जावळे व गोविन्द जोशी पळशीकर व तात्या वैद्य प्रमुख समस्त यांणीं आपण यजुर्वेदी ब्राह्मण वृत्त्यंशी पळशे मुम्बईकर व वसईकर व भिवण्डीकर ह्मणोन हुजूर न्यायाधीशाकडे येऊन विदित केलें कीं, आमचे यादव नाईक मुम्बईमाहीमकर यांणीं मौजे शिरगांव, परगणे माहीम, प्रान्त वसई, येथें शिवालय बान्धिलें. नन्तर यादव नाईक यांचा काळ जाहला; तेव्हां पुढें त्यांची सून रमाबाई कोम अर्जुन नाईक हिणें त्या देवालयांत श्रीसिद्धेश्वर देवाची लिङ्गस्थापना पञ्चायतनसुद्धां केली. त्यास सात-आठ वर्षें जहालीं. त्याची पूजा अर्चा चालत असतां, सन तिसा मया तैनांत ( शके १७३०-३१ ). वैशाख वद्य एकादशीस पहांटेस दोन घटका रात्रीस वेदमूर्ति भाऊभट्ट जोगळेकर व बाबाजीभट्ट फडके व कृष्णराव दिवाकर प्रभृति एकूणीस असामी ब्राह्मण वसईकर वगैरे यांणीं मौजे शिरगांव येथें येऊन श्रीसिद्धेश्वराचें लिङ्गासुद्धां पञ्चायतन पाहरांनीं खणों लागले. त्यांजला आह्मीं श्रीमन्ताच्या ह्वाह्या व गाईब्राह्मणांच्या शपथा घातल्या, त्या त्यांणीं गैरमान्य करून लिङ्गासुद्धां शाळुङ्केसमेत पञ्चायतन पाहरांनीं खणोन तेथून बारा कोसांवर निर्मळास वसईचे बेटांत आणून ठेविलें आहे. याजकरितां भाऊ जोगळेकर व बाबाजी भट्ट फडके व कृष्णराव दिवाकर प्रभृति एकूणीस असामी ब्राह्मण यांस सरकारांत आणून, वाजवी यथाशास्त्र चौकशी होऊन, अन्यायानुरूप शिक्षा जाहली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून भाऊ जोगळे-कर व गणेश जनार्दन फडके वसईकर यांस सरकारांत बोलावून आ-

---

* हा अस्सल खटला कै० वासुदेव सुन्दर ऊर्फ बाबुराव शास्त्री आचार्य पुणताम्बे-कर हल्लीं वस्ती भिवण्डी ह्यांजकडेस असून त्याची नक्कल वे० शा० सं० रा० रा० चिन्तामणी पुरुषोत्तम शास्त्री पुरन्दरे निफाडकर हल्लीं वस्ती वसई ह्यांजकडेस आहे.

णून येविषयींचा मजकूर पुसतां त्यांणीं सांगितलें कीं, वसई प्रान्तीं पळशे ज्ञात आहे, त्यांस प्रासादांत देवप्रतिष्ठेचें अनुष्ठान वेदोक्तमन्त्रें विध्युक्त करून देवस्थापना करावयाचा अधिकार नाहीं. याची पुरवणी करून देऊं ; पुरवणी न केल्यास सरकारचे गुन्हेगार ह्मणोन कदबा लिहून दिल्हा, त्यावरून पळशे ब्राह्मण यांणीं कदबा लिहून दिल्हा कीं, आह्मांस प्रासादांत देवप्रतिष्ठेचें अनुष्ठान वेदोक्तमन्त्रें करून विध्युक्त करावयास अधिकार आहे, त्याप्रमाणें देवस्थापना आह्मीं करित आलों आहों. याप्रमाणें आम्हीं पुरवणी करून देऊं ; पुरवणी न होईल तर वादास खोटे सरकारचे गुन्हेगार ह्मणोन कदबा लिहून दिल्हा. त्यावरून उभयतांची चौकशी सरकारांतून करितां, पळशे ब्राम्हण वृत्त्यंशी यांणीं आपला करिणा व पुरसिसांचीं उत्तरें लिहून दिल्हीं, त्यांतील अन्वय कलमें सुमारः—

१ करिण्यांतील अन्वय कीं, यादव नाईक मुम्बईमाहीमकर यांणीं मौजे शिरगांव प्रान्त वसई, परगणे माहीम, येथें शिवालय बान्धिलें. नन्तर तो मृत्यु पावला. यावर त्याची सून रमाबाई, कोम अर्जुन नाईक हिणें त्या देवालयांत आपले उपाध्ये बाळम्भट्ट जावळे यांजकडून श्रीसिद्धेश्वरदेव याची लिङ्गस्थापना पञ्चायतनसुद्धां करविली, त्यास सात वर्षे होत आलीं ; त्याची पूजा अर्च्या चालत असतां शुक्लसंवत्सरीं वैशाख वद्य एकादशीचे दिवशीं वसईकर वो भाऊभट्ट जोगळेकर व कृष्णराव दिवाकर व बाबाजीभट्ट फडके प्रभृति असामी एकुणीस येऊन पहांटेस दोनघटका रात्र असतां देवालयांत जाऊन पाहरा घेऊन शिवलिङ्ग पञ्चायतनसुद्धां खणों लागले, तेसमयीं आमचे शें-पन्नास ब्राह्मण मिळोन श्रीमन्त बाबासाहेब यांच्या द्वाह्या सात घातल्या व देवब्राह्मणांच्या शपथा घातल्या असतां अमान्य करून, श्रीसिद्धेश्वराचें लिङ्ग व पार्वती व गणपति व नन्दी व कूर्म यांसुद्धां खणून वसईचे वेटांत बारा कोसांवर निर्मळास आणून ठेविलें आहे ; ऐसा आह्मांवर अनर्थ केला आहे ; आणि ह्मणतात कीं, तुम्हीं नमस्कारहि

करूं नये. याप्रमाणें आमचा करिणा आहे. याची हकीगत स्वामींनीं मनास आणून चौकशी यथाशास्त्र करून आज्ञाकरणार स्वामी समर्थ आहेत, म्हणोन;

१ पळशे यांस पुरसिसा केल्या कीं, तुमचे ज्ञातीचे ब्राह्मण कोण्या प्रान्तांतून फिरङ्गाणांत आल्यास वर्षें किती जाहलीं? तेसमयीं फिरङ्गाणांत अम्मल कोणाचा होता? तुमचे ज्ञातीस वृत्ति कशा प्राप्त जाहल्या? तुमचे ज्ञातींत हव्यकव्य, षोडशकर्में यांचा आचार वेदोक्त-विधीनें चालवीत आलां, किंवा, कोणत्या तन्त्रें चालवीत आलां? त्याची वहिवाट तपशीलवार लिहून देणें; ह्मणोन पुरसिसा करितां त्यांणीं उत्तरें लिहून दिल्हीं, त्यांतील अन्वय कलमें बितपशील:—

१ बिम्बदेव राणे देवगिरीकर यांचे तीर्थरूप रामदेव राणे हे किल्ले दौलताबाद व किल्ले नगर येथील अम्मल करीत होते, तेव्हां पातशहा येऊन दोन्ही किल्ले व त्यांजकडून मूळकिल्ला घेतला, तेसमयीं रामदेव राणे लढाईत पडले. त्यांचे पुत्र बिम्बदेव राणे निघोन समुद्रकांठानें बारदापारडी येथें जाऊन अम्मल बसवून, अहद् पारनेरा तहद् अष्टागरपर्यन्त मुलूख सर केला. तेसमयीं पैठणाहून वऱ्हाड कोलापूर याप्रान्तांतून आमचे ज्ञातीचे यजुर्वेदी ब्राह्मण राणे यांचे उपाध्ये वगैरे राणे यांजबरोबर कोंकणप्रान्तीं समुद्रकांठास आले. त्यास वर्षें अजमासें पांचसहाशें होत आलीं. त्यास राणे यांणीं ज्योतिष, उपाध्येपण, धर्माधिकाराच्या वृत्ति दिल्या, त्या अलिकडे बहादूर शहा पातशहा याचा मोङ्गलाई अम्मल कांहीं वर्षें जाहला. त्याअलीकडे भोङ्गळे राजे यांणीं कांहीं वर्षें अम्मल केला. त्याअलीकडे फिरङ्गी यांचा अम्मल दोनअडीचशें वर्षें अजमासें चालला. त्या अलीकडे सरकारी अम्मल जाहला. याप्रमाणें बहुत काळीं मजकूर ऐकींव व पत्ता आहे. येविषयीं वृत्तीचीं पत्रेंहि आहेत. त्याप्रमाणें आजतागाईत वृत्तीचा भोगवटाहि आहे ह्मणोन; ———— कलम

१ आमची ज्ञात कोंकणप्रान्तीं आल्यापासून त्यांचे घरीं षोडश

कर्में चालवावयास आमचे स्वशाखीय ब्राह्मण उपाध्ये येत आहेत, व नासिकत्र्यम्बककर व गुजराथी शुक्ल स्वशाखीय तेहि येऊन सर्व कर्में चालवीत आले ह्मणोन ;———————कलम

१ आमचे ज्ञातीचे घरीं स्वशाखीय ब्राह्मण उपाध्ये स्वसूत्रोक्त वेदोक्त कर्में चालवितात, तेसमयीं चित्पावन व देशस्थ व कऱ्हाडे व तैलङ्ग व गुजराथी व नासिकत्र्यम्बककर स्वशाखीय इतकेहि ब्राह्मण आशीर्वाद वेदोक्त मन्त्रें ह्मणत आहेत. साम्प्रत *वसईचे मात्र चित्पावन व कऱ्हाडे कांहीं ब्राह्मण आदावतीनें ह्मणत नाहीं (त), वरकड गुजराथी व देशस्थ व चित्पावन प्रान्तांत ह्मणतच आहेत ह्मणोन ;———————कलम.

१ पुत्र जन्मला त्याचें नांव बारावे दिवशीं नक्षत्रचरणावरून ठेवितात. 'नारायणशर्मा काश्यपगोत्रोत्पन्नः काश्यपावत्सार-नैध्रुवेति त्रिप्रवरान्वित शुक्लयजुर्वेदान्तर्गत वाजसनेयमाध्य-न्दिनशाखाध्यायी, भो गुरो अभिवादयामि' ह्मणोन ;

१ पुत्राचें उपनयन पांचांवर्षांपासून आठ वर्षांपर्यन्त करितों ; व कन्येचा विवाह पांचांवर्षांपासून आठ वर्षेंपर्यन्त करितों ह्मणोन ;

१ श्राद्धपक्ष करितों तेथें ब्राह्मण आमचे ज्ञातीचे सांगतों ; पक्वान्न करितों ; पिंड पक्वान्नाचे (भाताचे) करितों; व तीर्थीं जातों तेथें स्वशाखीय ब्राह्मण न मिळेल तर चटश्राद्ध करून चटांस पक्वान निवेदन करून तें अन्न गङ्गेमध्यें (टाकितों) अथवा गाईस चारितों ह्मणोन ;

१ आमचे ज्ञातीचे ब्राह्मण व इतर ज्ञातीचे ब्राह्मण सर्वत्रांस परस्परें नमस्कार करितों ह्मणोन ;

१ आमचे ज्ञातींत पूर्वापार स्मार्त व अग्निहोत्र व चतुर्थाश्रम

---

* ह्यांतील अर्थ इतकाच आहे कीं परदेशस्थ अन्य जातीय किंवा स्वशाखीय ब्राह्मण ह्याप्रान्तीं सुखवस्तीस येऊन राहिल्यास त्यांजकडील किंवा दुसऱ्यांकडील उपाध्येपण ग्रामोपाध्याया वांचून दुसऱ्यास आह्मीं करूं देत नाहीं.

करीतच आलों; त्यामध्यें दारकालीं व दायादकालीं स्मार्त सिद्ध सर्वांहीं करावा परन्तु, ज्यास अनुकूळ पडतें तो करितो. पूर्वी अन्ताजीपन्त कावळे आहिताग्नि होते व महादेव उपाध्ये व अनन्त जोशी आहिताग्नि होते. व बापूभट्ट मोगरे व विश्वनाथभट्ट जावळे व वासुदेव उपाध्ये यांणीं चतुर्थाश्रम सम्पादिला होता ह्मणोन;

१ पूर्वापार देवप्रतिष्ठा व अर्चा आह्मीं करीत आलों. मुम्बई प्रान्तीं गणपतीची प्रतिष्ठा व माहीमास विठ्ठलरखमाबाईची प्रतिष्ठा व रामेश्वर व लक्ष्मणेश्वर मुम्बई माहीमास व शम्भुमहादेव वरळीस व मुम्बईस कालिकादेवी व विठ्ठलरखमाई व माजगांवास माणकेश्वर इत्यादिकांची (च्या) प्रतिष्ठा आह्मींच केल्या व वसई प्रान्तीं सोपाऱ्यास चक्रेश्वर व उसरणीस नारेश्वर व माहीमास महेश्वर व केळव्यांस श्रीठाकूरद्वार इत्यादि देवांच्या प्रतिष्ठा आह्मींच केल्या ह्मणोन;

१ अन्यजातीय* स्वशाखेचा ब्राह्मण सुखवस्तू येऊन राहिल्यास त्याचे घरचें उपाध्येपण चालवूं देत नाहीं ह्मणोन;

१ आह्मीं पञ्चमहायज्ञ करितों ते, ऋषियज्ञ व मनुष्ययज्ञ व देवयज्ञ व पितृयज्ञ अनुक्रमानें व ब्रह्मयज्ञ करितों ह्मणोन;

१ आमचे प्रान्तीं मातबर कांहीं प्रयोजन जाहलें तरी सभा होते, तेथें सर्व ज्ञातीचे ब्राह्मण मिळोन तेसमयीं सभेमध्यें गन्धाक्षत व दक्षिणा आह्मांस देत आहेत ह्मणोन;

१ माहीमास गांवकरी यांणीं देवालय बान्धोन तेथें श्रीरामलक्ष्मणेश्वराची प्रतिष्ठा आमचे वृत्त्यंशी ब्राह्मण यांणीं केली

---

* ह्या खटल्यांत पुणें येथील पण्डितांनीं श्रीमन्त पेशव्यांस जें संमतिपत्र इकडील प्राचीन वाजसनेय ब्राह्मणांविषयीं दिलें आहे, त्यांत असा उल्लेख केला आहे कीं, इकडील प्राचीन वाजसनेय ब्राह्मणांचा व वसईकर ब्राह्मण (चित्पावन) यांचा पंक्तिव्यवहार मात्र नाहीं; तथापि मन्त्र गन्धाक्षता वगैरे परस्पर एकत्र बसून होतात. ह्याचें कारण असें आहे कीं, त्या १८ चित्पावन ब्राम्हणांनीं लिंगोत्पाटण केलें, त्यांस शासनार्थ प्रायश्चित्तादि विधि झाला नाहीं म्हणून हा रहदार उत्तरोत्तर बळावत चालला.

त्यास वर्षें अजमासें सव्वाशें जाहलीं. तेथें ब्राह्मणादिकरून दर्शनास व अनुष्ठानास जातात. ते व आह्मीं देवावर अभिषेक चित्पावन व आह्मीं व गुजराथी एके ठिकाणीं बरोबर करितों ह्मणोन;

१ माहीमास श्रीठाकूरद्वार समस्त परभू मिळोन बान्धिलें, आणि देवप्रतिष्ठा आमचे ब्राह्मण वृत्त्यंशी व गुजराथी मिळोन केली. त्या देवाची पूजा व नैवेद्य देवजोशी बावा करित होते. प्रस्तुत त्या देवाची पूजा व नैवेद्य नथूभट्ट पुराणिक करीत आहेत. रामनवमीचे व जन्माष्टमीचे उत्साहाचे दिवशीं चित्पावन व आह्मीं पूजा अभिषेक बरोबर करितों. त्यास वर्षें प्रतिष्ठेस (वर्षें) अजमासें शम्भर जाहलीं ह्मणोन;

१ मौजे वरली, प्रान्त मुम्बई माहीम, येथें गांवकरी यजमान यांहीं देवालय बान्धोन श्रीशम्भूमहादेवाची प्रतिष्ठा आमचे ब्राह्मण यजुर्वेदी वृत्त्यंशी त्र्यम्बकभट्ट उपाध्ये व मल्हारजोशी व रामभट्ट जावळे व चित्पावन विसुभट्ट गद्रे व त्रिम्बकभट्ट पराडकर व त्र्यम्बकभट्ट बेलकर प्राचीन रहाणार व गुजराथी मिळोन आर्त्विज्य करून प्रतिष्ठा केली. या प्रतिष्ठेस वर्षें अजमासें ७५ वर्षें जाहलीं. त्या देवास सभामण्डप श्रीमन्त कैलासवासी दादासाहेब यांणीं बान्धिला आहे; आणि नित्यदर्शनास श्रीमन्त जात होते. त्या देवाची यात्रा वैशाख शुद्ध पौर्णिमेस होत आहे. तेथें पूजा, अभिषेक आह्मीं व चित्पावन बरोबर आजपावेतों करीत आलों ह्मणोन;

१ मौजे सोपारें, प्रान्त वसई, येथें अनन्त जोशी उपनाम भास्कर यांहीं देवालय बान्धोन श्रीचक्रेश्वराची प्रतिष्ठा केली. त्या प्रतिष्ठेस आमचे चार ब्राह्मणांनीं आर्त्विज्य करून प्रतिष्ठा केली. त्या देवाचे पूजेस व अभिषेकास ब्राह्मण आदिकरून सर्व जातात. त्या प्रतिष्ठेस वर्षें अजमासें साठ बासष्ट जाहलीं ह्मणोन;

१ मौजे उसरणी, प्रान्त माहीम, येथें आमचे ब्राह्मण नाग पण्डित यांणीं देवालय बान्धोन श्रीनारेश्वराची प्रतिष्ठा आमचे ब्राह्मणांनीं आर्त्विज्य करून केली. त्या प्रतिष्ठेस वर्षें ९९ जाहलीं. त्या देवाचे पूजेस व अभिषेकास ब्राह्मण आदिकरून जातात ह्मणोन;

१ कसबे माहीम, प्रान्त वसई, येथें दुधारपाखाडी येथें यजमान यांहीं देवालय बान्धोन तेथें श्रीमहेश्वराची प्रतिष्ठा आमचे ब्राह्मण यांणीं केली. त्यादेवाचे पूजेस व अभिषेकास ब्राह्मण आदिकरून जातात. त्याप्रतिष्ठेस वर्षें अजमासें ७९ जाहलीं ह्मणोन;

१ मौजे शिरगांव, प्रान्त वसई, परगणे माहीम, येथें रणछोड जोशी मोगरे यांणीं देवालय बांधोन श्रीबोरेश्वराची प्रतिष्ठा आमचे ब्राह्मण व चित्पावन मिळोन केली. त्यास अजमासें वर्षें ८० जाहलीं. त्याचे दर्शनास व अभिषेकास ब्राह्मण आदिकरून जातात ह्मणोन;

१ सजा केळवें प्रान्त वसई येथें गांवकरी यांणीं ठाकूरद्वार बान्धोन तेथें श्रीठाकूरजीच्या मूर्तीची; प्रतिष्ठित आमचे ब्राह्मण व चित्पावन ब्राह्मण मिळोन आर्त्विज्य करून प्रतिष्ठा केली. तेथें सर्व ब्राह्मण आदिकरून पूजेस व दर्शनास जातात. त्या प्रतिष्ठेस वर्षें ९९ जाहलीं ह्मणोन;

१ मुम्बईस श्रीभुलेश्वराजवळ शिम्पी यांणीं देवालय बान्धोन तेथें श्रीविठ्ठलरखमाईची प्रतिष्ठा आमचे ब्राह्मण वृत्त्यंशी व गुजराथी मिळोन केली. त्यांची नांवनिशी येणें प्रमाणें:—कृष्णम्भट्टजी उपाध्ये व शिवभट्ट व विश्वनाथभट्ट मोगरे व विष्णुजोशी शासनकर धर्माधिकारी व रामभट्ट बाबरे (कर) व वामनभट्ट स्मार्त व बाळम्भट्ट पण्डित वगैरे वृत्त्यंशी व गुजराथी मिळोन आर्त्विज्य करून केली. गुजराथी यांची नांवनिशी येणेंप्रमाणें:—इच्छाराम जोशी, कृष्णदत्त शुक्ल, प्रमुख

देवजी (शुक्ल)आदिकरून वगैरे गुजराथी मिळोन प्रतिष्ठा केली. त्यास वर्षें अजमासें ३५ जाहलीं. त्या देवास ब्राह्मण आदिकरून पूजेस व दर्शनास व पुराणास जात आहेत. प्रतिवर्षीं उत्साह होत आहे. तेथें पूजेस व अभिषेकास चित्पावन व आह्मीं व गुजराथी बरोबर आजपावेतों करीतच आलों ह्मणोन;

१ मुम्बईस श्रीकाळकादेवीचें देवालय आमचेंच बान्धिलें होतें, तेथें देवी स्थापित होती. त्यास सरकार आज्ञा जाहली कीं, शहरचे रस्ते मोठे करावे, तेव्हां श्रीचें देवालय रस्त्यामध्यें आलें, यास्तव देवी तेथोन काढावी; दुसरें स्थळ देतों तेथें स्थापना करावी; याप्रमाणें साहेबांची ताकीद जाहली; तेव्हां रघुनाथ कृष्ण जोशी वैद्य यांणीं देवालय बान्धोन देवीची प्रतिष्ठा केली. त्यासमयीं आर्त्विज्यास वगैरे ब्राह्मण अनुष्ठानास येणेंप्रमाणें:—आचार्य-वामनभट्ट स्मार्त, ब्रह्मा-बापूभट्ट जावळे, सादस्य—बाळम्भट्ट जावळे, गाणपत्य-केशवभट्ट फडके चित्पावन, सर्वोपद्रष्टा—लक्ष्मणभट्ट पाटील कऱ्हाडे, प्रान्त वाडी हल्लीं वस्ती मुम्बई, व अनन्त भट्ट फाटक कऱ्हाडे कोल्हापूरकर, यजुर्वेदी शान्तिपाठार्थ व वज्रदत्तभट्ट शुक्ल शान्तिपाठार्थ व विश्वनाथ भट्ट मोगरे शान्तिपाठार्थ व तैलङ्ग असामी दोन ग्रहजपास व रामभट्ट बाबरे (कर) रुद्रजपार्थ व भगवान्भट्ट उपाध्ये होमार्थ, अन्य ब्राह्मण गुजराथी व स्वशाखीय ब्राह्मण वृत्त्यंशी मिळोन आर्त्विज्य करून प्रतिष्ठा केली. त्या देवीचे दर्शनास सर्व ब्राह्मण आदिकरून जात आहेत. यात्रा मार्गशीर्षमासीं होत आहे. त्या प्रतिष्ठेस वर्षें १५ जाहलीं, तेथें पाठास व पूजेस आह्मीं व चित्पावन बरोबर आजपावेतों जात आहों ह्मणोन;

१ मुम्बईस श्रीभुलेश्वराजवळ गांवकरी यजमान क्षत्रियांनीं देवालय बान्धोन तेथें श्रीबलभद्रेश्वरयाची प्रतिष्ठा आमचे ब्राह्मण वृत्त्यंशी

कृष्णम्भट्ट उपाध्ये व बाबूनाईक छत्रे व लक्ष्मणभट्ट शास्त्री तैलङ्ग व देशस्थ वगैरे वृत्त्यंशी व गुजराथी मिळोन प्रतिष्ठा केली. त्यास वर्षें अजमासें २० जाहलीं. त्या देवाचे पूजेस व अभिषेकास आह्मीं व चित्पावन व गुजराथी बरोबर जात आहों ह्मणोन;

१ रणसोड नाईक वैद्य यांची वस्ती वसईचे किल्यांत होती, तेव्हां मागील दारीं कुलदेवतेचें देवालय लहानसें केलें होतें. त्याची प्रतिष्ठा करावी, इतक्यांत किल्यांतील वस्तीस सरकार-आज्ञा होऊन किल्याबाहेर वाडींत वस्ती जाहली. तेव्हां घरापासून किल्ला कोस-अर्धाकोस आहे. नित्य पूजेस व दिवाबत्तीस कोण जातो? असा विचार करीत होते. पुढें प्रतिष्ठा करावी, इतक्यांत उपद्रव होऊन रणसोड नाईक मृत्यु पावला; त्यामुळें प्रतिष्ठा राहिली. वसईकर ब्राह्मण यांचे अडथळ्यामुळें राहिली. असें जाहलें नाहीं ह्मणोन;

१ अनन्त जोशी, उपनाम भास्कर, वसईस राहात होते; त्यांजवळ नारायण जोशी बोरगांवकर आपणास रहावयास जागा मागत होते; तेव्हां जोशी यांणीं दिली नाहीं. त्या आदावतीनें बोरगांवकर यांणीं दाण्डगाई करून जोशी मशारनिल्हे यांच्या घरांत शिरून कुण्डे विच्छिन्न केलीं. त्यावरून अनन्त जोशी, कैलासवासी भाऊसाहेब यांजवळ येऊन फिर्याद केली तेसमयीं भाऊसाहेब यांणीं बोरगांवकर जोशी यांस विचारलें कीं, कुण्डें विच्छिन्न करावयास कारण काय? तेव्हां जोशी याणें उत्तर केलें कीं, यांस अधिकार नाहीं. त्यावरून भाऊसाहेब यांणीं नासिकत्र्यंबक क्षेत्र उभयतांस नेमून दिलें. नन्तर क्षेत्रीं जाऊन शिष्टमण्डळीस आपला वांका निवेदन केला. तेथें उभयक्षेत्रस्थ शिष्टसमुदाय यांणीं सभा करून निर्णय ठरवून सर्वांनीं सम्मतपत्र करून दिलें, तें बजिन्नस आह्मांजवळ आहे. पुढें अनन्तजोशी मृत्यु पावले. त्यांचे पोटीं

पुत्र नाहीं; यास्तव त्यांचे बन्धु गोविन्द जोशी यांणीं मुम्बईस श्रौत सिद्ध करून चालविलें ह्मणोन;

१ मौजे शिरगांव येथें वेदमूर्ति यादव नाईक यांणीं देवालय बान्धून प्रतिष्ठा करावी, तों ते मृत्यु पावले; यास्तव पुढें देवालय पांच-सात वर्षें तसेंच होतें; तशांत कमावीसदार यांणीं सांगितलें कीं, सरकार आज्ञेशिवाय प्रतिष्ठा करूं नये; त्याजवरून श्रीमन्त राजश्री बाबासाहेब यांची स्वारी वसईस गेली होती; तेसमयीं यादवनाईक यांची सून रमाबाई वसईस येऊन दादा वैद्य यांजकडून रास्ते यांचे कारभारी हरीपन्त करमरकर यांजवळ विनन्ति करोन श्रीमन्ताचे कानांवर घालोन प्रतिष्ठा करावयाची आज्ञा घेतली. नन्तर करमरकर यांणीं सभा करून मागील दाखले पाहून आज्ञा केली कीं, प्रतिष्ठा तुमची तुह्मीं करावी ह्मणोन सांगितलें; तेव्हां रमाबाई हिणें आपले उपाध्ये वगैरे ब्राह्मण स्वशाखीय मुम्बईकर व मौजे मजकूरचे यांजपासून प्रतिष्ठा करविली. नन्तर भाऊ जोगळेकर व बाबजीपन्त फडके यांणीं करमरकर यांजवळ जाऊन समजाविलें कीं, प्रतिष्ठा ठीक केली नाहीं; नन्तर त्यांणीं आह्मांस बोलावून आणून पुसलें कीं, तुह्मीं देवप्रतिष्ठा कशी केली? तेव्हां बाळम्भट्ट जावळे व गङ्गाधरभट्ट जावळे रमाबाईचे उपाध्ये यांस प्रतिष्ठेचा प्रयोग कोनकरी उपाध्ये भिक्षुक ब्राह्मण दोघे व लक्ष्मणपन्त आबा वैद्य विद्वान पञ्चग्रन्थी कोनकर मामलेदार, एकूण तीन असामी चित्पावन आह्मांजवळ बसवून मनास आणितां खातरजमा जाहली. नन्तर आह्मांस बोलले कीं, तुह्मीं कदबा लिहून देणें; त्यावरून आह्मीं देवप्रतिष्ठा करीत आलों त्याप्रमाणें केली, याप्रमाणें पुरवणी करून देऊं, न देऊं तर सरकारचे गुन्हेगार ह्मणोन कदाबा लिहून दिल्हा. नन्तर दुसरे दिवशीं भाऊ जोगळेकर व बाबजीभट्ट फडके यांस करमरकर यांणीं

पुसलें कीं, तुह्मीं कदबा लिहून देणें कीं:—हे ब्राह्मण नाहींत, आणि देवप्रतिष्ठेस अधिकार नाहीं. याप्रमाणें खरें करून देऊं. न देऊं तर सरकारचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करूं ह्मणोन. तेव्हां जोगळेकर व फडके यांणीं उत्तर केलें कीं, आजपावेतों कदबा कोणास लिहून दिल्हा नाहीं, आणि आतांहि देत नाहीं. तेव्हां करमरकर यांहीं सांगितलें कीं, येथें मीं गोट्या खेळावयास व ब्राह्मण्य बुडवावयास बसलों नाहीं; याप्रमाणें उत्तर करून आमचा कदबा घेतला होता तो माघारा दिला. व बाईचे बन्धु यांचे वृत्तीचा कज्या पडला होता त्याचाहि फडशा केला. व मागील कर्जवाले लोकांकडे येणें होतें त्याचाहि वसूल करून दिला. यास्तव दोन तीन कामें मिळोन दरबार खर्चहि दिला असेल. नन्तर बाईस घरांत जावयास निरोप दिल्हा ह्मणोन;

१ मुम्बईस वेदमुर्ति जयरामभट्ट ब्रह्मचारी यांणीं होमद्वारा महारुद्र केला, त्यासमयीं कोणी अडथळा केला हें आह्मांस ठाऊक नाहीं ह्मणोन;

१ आह्मीं यजुर्वेदी ब्राह्मण, वाजसनेय, याप्रमाणें दोन महिन्यांत पुरवणी देऊं, पुरवणी न होईल तर मौजे शिरगांव येथील देव स्थापिला तो आह्मीं काढावा; याप्रमाणें कदबा लिहून दिल्हा नाहीं ह्मणोन;

---

२१

---

२

येविसीं यज्ञेश्वर दीक्षित मराठे प्रमुख वसईकर ब्राह्मण यांनीं करिणा लिहून दिल्हा व कांहीं पुरसिसी लिहून दिल्या, त्यांतील अन्वय तपसील:—

१ आमच्या प्रान्तीं पळशे ह्मणोन कोणी ज्ञात आहे; त्यांतील पळशे यांणीं सरकारांत येऊन विदित केलें कीं, आह्मीं यजुर्वेदी-

ब्राह्मण असतां, मौजे शिरगांव प्रां वसई येथें देवस्थापना केली होती ती वसईकर ब्राह्मण यांनीं देव काढून विमळास आणिला, त्यावरून सरकारांतोन आम्हांस विचारिलें कीं, तुम्हीं या प्रो करावयाचें कारण काय? तें लिहून द्यावें. त्यावरून लिहून दिलें ऐसाजेः—वसईकर वगैरे ठिकाणीं पळशे आहेत; त्यांचे घरीं वेदोक्तमन्त्र ग्रामस्थ भिक्षुक ब्राह्मण म्हणतात असें ऐकण्यांत व पाहाण्यांत प्रसिद्ध नाहीं; पेशजीं गणपतराव जिवाजी यांचे सुभ्यांत मौजे शिरगांव येथें रघुनाथपाटील पळशे यांणीं देऊळ बान्धिलें, नन्तर आमचे जवळ देवस्थापनेचा विचार बोलूं लागले तेव्हां आम्हीं सांगितलें कीं, देवस्थापना करणें ती तुम्हीं द्रव्याची सत्तानिवृत्ति करून दिल्यास आम्हीं प्रतिष्ठा करूं, नाहींतर करणार नाहीं. त्याजवरून कांहींएका ब्राह्मणांकडे आर्जव करून देवाची प्रतिष्ठा पळशे यांणीं करावी. ह्मणोन आज्ञा मागत होते, त्यास पूर्वी पळशे यांणीं वसईच्या किल्ल्यांत देऊळ बान्धून देवीची स्थापना पळशे यांणीं द्रव्याची सत्तानिवृत्ति करून ब्राह्मणांकडून करवावी तें न करितां पळशे करणार होते, त्यामुळें स्थापनेस अडथळा पडून देऊळ तसेंच राहून गेलें. एका पळश्यानें चोरून स्मार्त सिद्ध केला होता तो वेदमूर्ति शिवभट्ट गाडगीळ यांणीं पळश्याकडेस स्मार्ता सारिखें कुण्ड होतें तें विच्छिन्न करून पळश्याचें शासन केलें आहे. अशी मागील प्रवृत्ति पाहून आज्ञा दिली नाहीं, याजकरितां बहुत वर्षें देवालय तसेंच राहिलें होतें; इतक्यांत दादा वैद्य पळशे याणें यजुर्वेदी मीं, असें सांगोन वेदमूर्ति दादम्भट्टजी राजश्री खण्डेराव रास्ते यांजवळ होते त्यांजकडेस श्राद्धीं क्षण घेऊन भोजन केलें. नन्तर दादम्भट्टजीस दादा वैद्य पळशा, असें समजल्यानन्तर भट्टजींनीं प्रायश्चित्त घेऊन पुन्हा श्राद्ध केलें. दादा वैद्य पळशे सरकार अपराधी समजोन इंग्रेजी राज्यांत मुम्बईस पळून गेला. ब्राह्मणाक-

डेस श्राद्ध विध्वंसिलें, असा घात केला. पुढें राजश्री खण्डेराव* रास्ते यांचे सुभ्यांत हरी गणेश कारभारी होते त्यांस लांच† देऊन व आह्मांस न कळवितां शिरगांवास देवाकृति देवळांत माण्डिली; हें वृत्त आह्मांस चौथे दिवशीं कळल्यानन्तर हरी गणेश यांस आह्मीं सर्वांनीं जाऊन विचारलें कीं, पळश्यांस आज्ञा चौकशी केल्याशिवाय कशी दिल्हीत? तेव्हां त्यांणीं उत्तर केलें कीं, ही गोष्ट आमच्यापासोन गैरसमजुतीनें जाहली; त्यावर आमचें बोलणें पडलें कीं, ही गोष्ट अयोग्य जाहली; त्यावरून त्यांणीं सभा करून विचार पाहतां सर्वमतें ठरलें कीं, हें कृत्य पळशे यांणीं अयोग्य केलें; तेव्हां पळशे यांस आणून ताकीद केली कीं, हें कृत्य सर्वांस अमान्य असतां आह्मांस गैरवांका समजावून तुह्मीं केलेंत; तेव्हां सरकार अपराधी ठरलेत; तेव्हां पळशे यांणीं कबूल केलें कीं, आह्मीं यजुर्वेदी वाजसनेय खरे; एक महिन्यांत आपली व सर्व ब्राह्मणांची खातरजमा जशी पाहिजे तशी करून देऊं, असें सभेस सर्वांस विनन्ति करून कबूल केलें, त्याजवर मुदत होऊन बहुत दिवस गेले, तत्रापि खातरजमा केली नाहीं. पुढें रा॥ परशुराम खण्डेराव यांचा सुभा जाहला,

* रा. रा. परशुराम खण्डेराव ह्यांच्या अमलांत ह्या कदब्यांत लिहिल्याप्रमाणें ही गोष्ट घडली असें मुळींच सम्भवत नाहीं; कारण कीं, केळवें माहीम येथील राहणार वे. रा. रा. धोण्डु आर्जुन पण्डित, इकडील प्राचीन वाजसनेय ब्राह्मण, ह्यांचे वृत्तीसम्बन्धी दस्तऐवज पेशवाई सरकारांत बहाल होऊन त्यांतून दोहोंवर मशारनिल्हे परशुराम खण्डेराव ह्यांचें मोर्त्तब आहे (परिशिष्टांतील पृष्ठें (१०४-११६ पहा.) ह्यावरून पळशीकर हे अब्राम्हण ठरले असें मुळींच सम्भवत नाहीं. तेव्हां हा कदबा लिहून देणारे किती मत्सरी व महत्वाकांक्षी असावे ह्याचा विचार वाचकांनींच करावा.

† हरी गणेश हा गृहस्थ, कदबे लिहून देणारे इसमांच्याच जातीचा होता, आणि त्याजवर देखील खोटा आरोप घालण्यास त्यांणीं मागें पुढें पाहिलें नाहीं; तेव्हां इकडील प्राचीन वाजसनेय ब्राह्मणांवर हवें तें बालंट घेण्यास कदबे लिहून देणारे कसे मागें हटले असावे! सुभेदाराचे परवानगीशिवाय देवळांत देव कसा वसवितां येईल! आणि ह्यास कारभाऱ्याची परवानगी शोभेल! सारांश कदबे लिहून देणारांनीं ह्या प्रकरणांत मनःपूत जबान्या दिल्या आहेत, हें ह्या खटल्यावरून वाचकांस समजून आल्यावांचून राहणार नाहीं.

तेव्हां पळशे यांणीं पूर्वीं कृत्य अयोग्य केलेलें आहे असें समजण्यांत येऊन आन्या पाटील पळशा यास बोलावून आणला, नन्तर पूर्वींचा वांका लिहून देणें ह्मणोन सरकार आज्ञा जाहली. त्यावरून त्यांणीं लिहून दिल्हें कीं, आह्मीं लांच देऊन कार्य करून घेतलें असें लिहून दिल्हें; त्यासमयीं पळशे यांस सर्व ब्राह्मणांनीं विचारलें कीं, तुह्मीं मागें करार केला होता कीं, पळशे आह्मीं यजुर्वेदी ब्राह्मण अशी खातरजमा पाहिजे तसी रूढींत दाखवून निशा करून देऊं; असा करार केला असतां खातरजमा केली नाहीं, ती हल्लीं खातरजमा करून देणें ह्मणोन सभेंत सरकार प्रमुख सर्व ब्राह्मणांनीं सांगितलें. तेव्हां पळशे यांणीं कबूल केलें कीं, दोन महिन्यांत पळशे पळशांत विचार करून आम्हीं यजुर्वेदी वाजसनेय, अशी खातरजमा करून देऊं; अतःपर न केल्यास सरकारचे गुन्हेगार व शिरगांवास आम्हीं पळशांनीं देव माण्डिला आहे तो काढावा. याप्रों सरकारवाड्यांत सरकारप्रमुख समस्त ब्राह्मण सभेस होते त्यांजवळ ठराव जाहला, त्याप्रों यजुर्वेदी वाजसनेय खरें करून देतां मुदत टळोन फारदिवस जाहले. पुढें कांहीं दिवसांनीं पळशे यांणीं ब्राह्मण भ्रष्ट करावयाचा उपक्रम माण्डला, ऐसाजेः—सोपान्यास बाबा वैद्य पळशा याणें पण्ढरपूरकर यजुर्वेदी ब्राह्मण यास सांगितलें कीं, आम्हीं यजुर्वेदी ब्राम्हण असें सांगोन भोजनास कांहीं दिवस घालीत होता. नन्तर त्याब्राह्मणांस हा पळश्या असें समजल्यानन्तर हें वृत्त सरकारांत कळवून जो ब्राह्मण भ्रष्ट जाहला त्याणें प्रायश्चित्त घेतलें व ज्या पळश्यानें ब्राह्मण भ्रष्ट केला तो पळश्या सरकार अपराधी ठरून पळश्याची धिण्ड काढली. तो दुर्लौकिक जाहला असतां त्या शिक्षेचा सर्व पळश्यांनीं मनांत वचका न धरितां पुढें वैशाखमासीं मुम्बईस पळशे यांणीं होमद्वारा श्रीभुलेश्वरीं महारुद्राचा उपक्रम

माण्डला. तें वृत्त पूर्वदिवशीं तेथील ब्राह्मणांस व महाजनांस कळलें; तेव्हां त्यांणीं पळश्यांस सांगितलें कीं, हें कृत्य करावयास तुम्हीं योग्य नव्हत. याप्रों निरोध केला असतां सर्व ज्ञातीस अमान्य, तथापि बलात्कारेंकरून कृत्य केलें तेव्हां सर्व ज्ञातीस भासलें कीं, ब्राह्मण्यास उपप्लव जाहला; असें समजोन मुम्बईकर समस्त ब्राह्मण ग्रामस्थ यांणीं वसईस सरसुभेदार यांस व आम्हांस पत्रें लिहिलीं तीं प्रविष्ट होऊन अवलोकन करितां पळशे यांणीं ब्राह्मण्याची हानी केली; ही गोष्ट केवळ अनुचित, अशी सर्वांस भासून सरकारवाड्यांत समस्त ब्राह्मण मिळून विचार सरकारप्रमुख जाहला कीं, पळशे यांणीं ब्राह्मण्याची हानी बहुत माण्डिली. तीं मुम्बईचीं पत्रें हुजूर पाहतां ब्राह्मण्याची हानी कशी केली ती सर्व ध्यानांत येईल. अतःपर पळशे यांची उपेक्षा केली असतां ब्राह्मणांत शिरूं पाहतात तेणेंकरून ब्राह्मण्य भ्रष्ट होईल. पळशे यांची उपेक्षा हल्लीं जाहल्यास पुढें पळशे ब्राह्मणांत शिरतील, हें अनुचित जाणून सर्वांनीं सभेंत विचार करून पाहतां पळशे या कर्माविसीं उद्युक्त होऊन असलीं कृत्यें करूं लागले. याचे पुढेंपश्चात् दाखले सांगोन, सडी दाखऊन, वहिवाटींत आणून, ब्राह्मण्यांत येतील; याजकरितां मागें आन्या पाटील पळशा याचा करार देवाकृती-*विषयीं जाहला त्यास त्यांणीं शिरगांवास देवालयांत देवाकृति माण्डून षट्कर्माधिकारी ब्राह्मण यांसारिखें कृत्य करून पळशे

---

* हा कदबा लिहून देणारे लोक इतके चमत्कारिक होते कीं, श्रीमन्त पेशव्यांनीं इकडील प्राचीन वाजसनेय ब्राह्मणांस वृत्तिसम्बन्धीं आणि श्रीच्या प्रतिष्ठा करण्याविषयीं सरकारी कामदारांस वेळोवेळीं पाठविलेलीं आज्ञापत्रें ह्यांकडे दुर्लक्ष करून वरील प्रकारचा कदबा लिहून देण्यास व दुसऱ्यांची विनाकारण हानी करण्यास त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं, असें परिशिष्ट क, पृष्ट ८७ येथें दिलेल्या श्रीमन्त पेशव्यांच्या एका आज्ञापत्रावरून दिसून येईल; त्यांत श्री हनुमन्ताची स्थापना इकडील कावळें उपनांवाच्या ग्रामस्थ वाजसनेयांनींच करावी; अन्य ब्राह्मणांनीं करूं नये; असा लेख आहे; तेव्हां हा कदबा लिहून देणाऱ्यांचें ह्मणणें कितपत खरें असेल ह्याचा वाचकांनींच विचार करावा!!

यांणीं साधन केलें आहे, तें घेऊन यावें ह्मणोन शिरगांवास वसईकर ब्राह्मण मण्डळी जाऊन देवाकृति घेऊन श्रीविमळ-क्षेत्रीं श्रीच्या सन्निध आणून ठेविली. याचें कारण पुढें असलीं कृत्यें पळशे करणार नाहींत. तेणेंकरून ब्राह्मण्याचा उपमर्द पळशे यांणीं माण्डला आहे तो होणार नाहीं. हल्लीं पळशे सरकारांत येऊन आह्मीं यजुर्वेदी वाजसनेय ब्राह्मण ह्मणून लिहून देतात त्यास शास्त्रानुमतें व ज्या प्रान्तीं पळशे राहतात तेथील रूढीची पुर्तेपणीं चौकशी जाहल्यावर ध्यानांत येईल ह्मणोन भाऊ जोगळेकर व गणेश जनार्दन फडके व वसईकर यांणीं यज्ञेश्वर दीक्षित मराठे प्रभृति वसईकर ब्राह्मण यांचें नांवाचा करिणा लिहून दिल्हा——————कलम.

१ भाऊजोगळेकर व गणेश जनार्दन फडके यांणीं कांहीं पुरसिसांचीं उत्तरें लिहून दिलीं त्यांतील अन्वय कलमें बितपशीलः—

१ पळशे ज्ञात आहे. त्यांचा संसर्ग ब्राह्मण, शेणवी करीत नाहींत. त्यापेक्षां पळशे कोणते वर्णांतील आहेत हें आह्मांस ठाऊक नाहीं ह्मणून;

१ मुम्बईस दोहों देवांच्या स्थापना पळशे यांहीं केल्या आहेत त्या सर्वांस अमान्य म्हणोन मुम्बईकर ब्राह्मण यांणीं सर्वांस लिहिलें. स्थापना वेदोक्तरीतीनें केल्या किंवा कशा केल्या हें आपणांस ठाऊक नाहीं. वसईप्रान्तीं सोपाऱ्यास यांचें देऊळ आहे परन्तु त्याची स्थापना पळशे यांणीं केली हें आम्हांस ठाऊक नाहीं म्हणोन;

१ पळशे यांणीं मुम्बईस देवांच्या स्थापना केल्या त्या देवांचीं नांवें आम्हांस ठाऊक नाहींत व त्यांस वर्षें किती जाहलीं हें आम्हांस ठाऊक नाहीं. वसईकर ब्राह्मणांस ठाऊक असतील. वसईचे ग्रामस्थ शिष्ट कोणी त्या देवस्थापनेसमयीं अनुष्ठानास गेले नाहींत. दुसरे ठिकाणचे कोणते ब्राह्मण होते कीं नाहीं हें आम्हांस ठाऊक नाहीं म्हणोन;

१ रघुनाथ पाटील आम्हांजवळ येऊन विनन्ति करीत असे कीं, आम्हीं देऊळ बान्धिलें आहे त्याची देवस्थापना पळशे यांणीं करावी म्हणोन विनन्ति करोन आज्ञा मागत होता व आमचेहि ऐकण्यांत रघुनाथ पाटील यांणीं देऊळ बान्धिलें असें होतें व पाटील मजकूर याणें देऊळ बान्धिलें तेसमयीं सरकारांतून देवळाचे जागेची सनद पाटील यांणीं आपले नांवीं घेतली होती, आम्हीं पाहिली होती, त्याची नक्कल आपणांस दाखऊं म्हणोन ;

१ वसईचे किल्ल्यांत भोङ्गळे राज्याचे चौबुर्जी किल्ल्यांचे नजीक रणसोड नाईक पळशे यांणीं शङ्काजीपन्त यांचे कारकीर्दीत देऊळ बान्धिलें होतें त्याची स्थापना पळशे यांस करूं दिली नाहीं, सबब हें देऊळ तसेंच राहिलें ह्मणोन ;

१ शङ्काजीपन्त नाना यांचे कारकीर्दीत अनन्त पळशे यांणीं चोरून स्मार्त सिद्ध केला होता तो वो शिवभट्टजी गाडगीळ यांणीं विच्छिन्न करून गाडगीळ याणें पळश्याचे तोण्डांत मारली ह्मणोन ;

१ पळश्यांचे स्मार्त शिवभट्टानें विच्छिन केला ते समयीं पळश्यांचे तोण्डांत मारली पुढें सरकारांत समजल्यानन्तर वसईस ब्राह्मणमण्डळी थोडी, यामुळें कल्याणकर ब्राह्मणांस पत्र लिहून सम्मत आणाविलें त्यांत लिहून आलें कीं, पळश्यांस श्रौत-स्मार्तादि नाहीं ; असें लिहून आलें त्याजवरून सरकारांत सिद्धान्त ठरला ह्मणोन ;

१ सोपाऱ्यास पळशे यांचे घरीं ब्राह्मण जेवून भ्रष्ट जाहला त्या ब्राह्मणाचें नांव काय हें आह्मांस ठाऊक नाहीं. पळश्याची धिण्ड काढली ती राजश्री आन्याबा राहतेकर यांचे अमलांत ह्मणोन ;

१ पळशे यांस देवप्रतिष्ठा वेदोक्त मन्त्रेंकरून करावयास अधिकार नाहीं असें तुह्मीं ह्मणतां, त्यास हे ब्राह्मण नव्हत ह्मणोन यांस

अधिकार नाहीं, किंवा ब्राह्मण असतां कोणते कारणामुळें अधिकार नाहीं व पळशे जातीचे कोण? कोणतें कर्म चालत आलें? तें लिहून देणें ह्मणोन पुरसीस सरकारांतोन केली असतां, जोगळेकर व फडके यांणीं उत्तर लिहून दिलें कीं, पळशे ज्ञातीकडे लग्नें मुंजी होतात हें आह्मांस ठाऊक आहे. ग्रामस्थ भिक्षुकब्राह्मणमण्डळीस कदाचित् पळशे यांणीं बोलाविलें तर, विडा दक्षिणा घेऊन येतात. पळश्यांचे घरीं आह्मीं सर्व प्रान्तस्थ आह्मीं मन्त्रोच्चार करीत नाहीं. ही प्रवृत्ति पूर्वींपासोन आहे. पूर्वीं शङ्कराजी केशव यांचे सुभ्यांत पळशे यांणीं वसईचे किल्यांत देवालय बान्धोन देवीची स्थापना पळशे करूं लागले, तेसमयीं पळशे ज्ञातीची चौकशी शङ्कराजी केशव यांणीं मनास आणितां, हे यजुर्वेदी वाजसनेय, ह्मणोन सांगतात; तें ह्मणावें तरी यांचा मूळठिकाणा अमुक गांवचा, पूर्वीं तुमचा ठावठिकाणा विचारला असतां गांवांचीं नांवें सांगतात, त्याप्रो आह्मांपाशीं पुरवणी करून दिली नाहीं, व यांचा संसर्ग ब्राह्मण व शेणवी करीत नाहींत; यांचें अन्नोदक यजुर्वेदी ब्राह्मण व दुसरे ब्राह्मण वगैरे दोन चार ज्ञाती घेत नाहींत व पळश्यांचें तीर्थ शेणवी, परभू, सोनार देखील घेत नाहींत, याप्रो यांची वहिवाट पाहून त्याजवरून पळश्यांस मनाई करून देवीची स्थापना पळश्यांकडून करूं दिली नाहीं. तें देऊळ तसेंच पडून गेलें, त्यास वर्षें ६० अजमासें जाहलीं व वीस वर्षांपलीकडे श्रीवालुकेश्वराची अर्चा जाहली, तेसमयीं पळशे यांणीं बखेडा केला कीं, अर्चा पळश्यांचे हातून करवावी. तेसमयीं इंग्रेजानेंहि सर्व ज्ञाती मिळवून मनास आणितां पळश्यांस अधिकार नाहीं; असें ठरोन पळश्यांस अर्चा करूं दिली नाहीं व शिरगांवास पळशे देऊळ बान्धावयास उद्युक्त जाहले, तेसमयीं सरकारास विनन्ति करोन देवालयास जागा पाहिजे ह्मणोन सोमाजी रघुनाथ यांस सनद घेतली, तेसमयीं

पळश्यांस देवस्थापनेस अधिकार नाहीं असें समजोन देवस्थापना करणें ती चित्पावनब्राह्मण यांजकडून करवावी, पळशे वगैरे करूं लागल्यास मनाई करावी. अशी सनद दिल्ही. ती पळश्यांनीं मान्य होऊन घेतली आणि देवालय बान्धिलें. नन्तर दहा वर्षें देवस्थापना केल्यावांचून देऊळ तयार होऊन राहिलें. देवस्थापना ब्राह्मणांकडून पळशे यांणीं करवावी, तें न करितां हरी गणेश कारभारी निा खण्डेराव रास्ते यांस लांच देऊन चोरून ब्राह्मणांस (व) सर्वग्रामस्थांस न कळतां केली. पळशे यजुर्वेदीवाजसनेय आपले ठिकाणीं ह्मणवितात. त्याची पुरवणी आह्मीं त्यांस विचारली त्याप्रमाणें जाहली नाहीं, वहिवाटीस ब्राह्मणांत ज्या गांवीं पळशे रहातात तेथें ब्राह्मणांसारिखे मान्य नाहींत.; यामुळें त्यांस अधिकार नाहीं. पळशे ज्ञात आह्मांस कोठें शास्त्रांत आढळली नाहीं. पळशे ज्ञातीची प्रवृत्ति व्यवहारांत चालत आली, ती लिहिली आहे. पळशे ज्ञात ब्राह्मण होत किंवा नव्हत असें विचारलें, त्यास पळशे ज्ञात षट्कर्माधिकारी ब्राह्मण नाहींत, हें आह्मांस परम्परा ऐकण्यांत ठाऊक आहे ह्मणोन;

१ जोगळेकर व फडके यांस सरकारांतून पुरसीस केली कीं, पळश्यांचे घरीं तुह्मीं वेदोक्तमन्त्रें आशीर्वाद करितां व पळशे यांणीं देवस्थापना केल्या आहेत, त्या देवांची पूजा तुह्मीं करितां व ब्राह्मणाव्यतिरिक्तांनीं देव जरी स्थापिला असला तरी त्याचें उत्पाटण करावें असें कोणत्या ग्रन्थीं लिहिलें आहे? व बिम्बराजानें पळश्यांस उपाध्येपण व धर्माधिकारण, ज्योतिष या वृत्ति दान दिल्यापासून ते वृत्ति चालवीत आहेत, असें खरें जाहल्यास यजनादिक सिद्ध जाहलें किंवा नाहीं व सोपारे ब्राह्मण होत किंवा नव्हत व पळशे यांस तुह्मीं वेदमूर्ति वेदशास्त्रसम्पन्न ह्मणोन पत्रें लिहिलीं आहेत किंवा नाहींत; लिहिलीं अशी पुरवणी जाहल्यास पळशे यांस यजनाधिकार आहे

असें कागदोपत्रीं व साक्षभोगवटयानिशीं खरें जाहल्यास याचीं उत्तरें लिहून द्यावीं ह्मणोन, पुरसिसा केल्या असतां तोण्डचीं समर्पक उत्तरें लिहून द्यावीं, तें न करितां गैरसमजुतीचीं उत्तरें लिहून देतात, याजकरितां समर्पक तोण्डचीं उत्तरें लिहून द्यावीं असें ह्मणत असतां चौघे शिष्ट मिळवून त्यांचे विचारें उत्तरें लिहून द्यावयाचीं जाहल्यास देऊं असें ह्मणतात ह्मणोन;

१०

कलम

२

येणेंप्रमाणें उभयतांनीं लिहून दिल्यावर पळशे यांणीं आपले साधनाचे कागदपत्र दाखविले. त्यांतील अन्वय—कागद सुमारें १ सुरत महसूर बाहादूर शाह पातशाह यांचे व काजीचे मोहरांनिशीं सन हिजरी ९०१ नऊशें एकांतील अस्सल आहे, त्यांतील अन्वय कीं, कानजोशी वा दादजोशी शासनकर धर्माधिकारणी व जोशी का माहीम प्रान्त वसई यांचा व त्र्यम्बकपन्त नारायण चक्रवर्तीकर* राजगुरु यांचा, सूर्यवंशी परभू यांचे घरचे मुंजेचे पूजेविषयीं व मेखलापूजन व उपदेशदाम व अग्रपूजेविषयीं कज्या पडला. महास्थानीं ब्राह्मण, परभू—पाठारे, जमीदार, समस्त मिळवून चवकी मजलिस केली त्या मजलिसीमध्यें कानजोशी वा दादजोशी का मजकूर वतनदार तीनशें साठ वाडी, त्याणें सर्व अहलीमवाली देखतां फिर्याद केली कीं, तीनशें साठ वाड्यांमध्यें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अनुलोम, प्रतिलोम, अठरापगड जाती; ज्या आहेत त्यांचे घरचे धर्म, प्रतिष्ठा, होम, हवन, लग्न, माङ्गल्य, मुहूर्त, श्राद्ध, षोडशकर्में, होतील त्यांचें उपाध्यिक, ज्योतिषकर्म, हे अधिकार आमचे. पूर्वी कसबें मजकुरीं चौऱ्याशीं कुळींचे ब्राह्मण

* रत्नागिरी जिल्ह्यांत केळशी अंजरलें यांजनळ भीमेचे कांठचे उपाध्ये. हे पूर्वी आम्बूळपाड्यासन्निध रहात असत.

वाजसनेयांमध्यें अग्रपूजा अशी चालत असतां, त्याबद्दल पांच असामी परभू यांचे माथां तुळशीपत्रें हजीर मजलिसींत ठेऊन त्यांच्या साक्षी लिहून घेतल्या. त्यांणीं लिहून दिल्हें कीं, त्र्यम्बकपन्त राजगुरु यांचा आमचा सम्बन्ध नाहीं. हा आश्वलायन. आमचें कर्म, यजुर्वेदावरून कात्यायनसूत्रोक्त भावी, क्षेत्रगायत्री आह्मांस उपदेश, आमचे कुळगुरू पूर्वापार रघुनाथपन्त कावळे पैठणकर राजगुरू, त्यांचे श्रीपतराव, त्यांचे पुत्र पुरुषोत्तमराव ते शके १२१० बाराशें दहामध्यें बिम्बदेव रामदेव राणे यांणीं गुजराथेस पाठविले; त्यांणीं अहद पारनेरा तहद अष्टागर काबीज केला तेव्हां या प्रान्तीं जमीदार सरदेसाई व सरदेशपाण्डे गोविन्द मिटकरी याचे परगणे चौदा. हे सोळाशें वीस (?) तों यांचे अमलामध्यें लावलदफौत जाहला (निपुत्रिक वारला) त्याची बायको मुसम्मात चाङ्गुणाबाई ती निपुत्रिक ह्मणोन खुशरजावन्दीनें वतन विकूं लागली. तें वतन राजश्री बिम्बदेव स्वामी यांणी होन शुमारें २४००० देऊन विकत घेऊन सूर्यग्रहणीं पुरुषोत्तमराव कावळे पैठणकर राजगुरू यांस दान दिलें आणि सोळाशें देह दरगांवीं शिळाशासनें चार घालून त्यांवर दानपत्र कोरलेल्या अक्षरें लिहून ठेविलें; तीं शिळाशासनें अद्याप आहेत. यांची हे अग्रपूजा व मेखलापूजन व बटुपूजन व अन्त्रपाट घटकापाट, उपदेशदाम ह्या कान्हू त्यांच्या. त्याप्रों त्यांणीं आपले रुसुमांपो परभूंकडील उपदेशदाम होन २ दोन अग्रपूजा इतकी, त्र्यम्बकपन्त चक्रवर्तीकर धर्माधिकारणी तीर्थपुरोहित यांस दत्त दिल्हें. तेव्हां नवाबीं फर्माविलें कीं, दोन होन दत्तरुसूम आहेत, त्यावेगळें आणिक घेतलें तरी गुन्हेगार होशील आणि अक्षतपाणी यासीं हात न लावावा. अग्रपूजेचें वस्त्र जें कोण्हीं त्यावेगळें स्वसंन्तोषें देईल आणि गुरुपूजा करील त्यासीं कोणासीं सम्बन्ध नाहीं. राजकुळगुरू यांच्या ज्या कानू आहेत त्या मुळ्यांनें घेऊन त्यांच्या त्यांस पोंचवाव्या. आणि राजगुरू असें तुह्मीं ह्मणावें. यांतून अधिक जाहलें तर राजदण्ड होईल, मग सभेमध्यें दोघांस शिरपाव देऊन

कानजोशी व त्र्यम्बकपन्त यांस भेटवून महजर करून दिला. तारीख चन्द्र छ १७ माहे जिलकाद ह्मणोनः— यास वर्षें ३२४ जाहलीं अजमासें.

१३ फिरङ्गी व इंग्रेज यांची दोनशें वर्षांपासून साठ वर्षांपर्यन्त त्यांचे सहीचीं अस्सल पत्रें आहेत. त्यांत आत्माचार्य व बाळाचार्य व शामाचार्य ज्योतिषी व उपाध्ये धर्माधिकारी हे सांगतील त्याप्रमाणें चालत जावें ह्मणोन प्रां वसई मुम्बई येथील गांवगन्नाचे वृत्तीविषयीं खटला पडत गेला; त्याविषयीं देत गेले ह्मणोन मजकूर सदरहू पत्रांत आहे त्या पत्रांपौ कांहीं पत्रांवर कोंकणस्थ वगैरे ब्राह्मण व पळशे वगैरे जमीदार यांच्या साक्षी आहेत ह्मणोनः———पत्रें

१ रामदेव राणा राजे किल्ले आसेर सेता प्रांा रामनगर यांचें पत्र संवत् वर्षें १७९० श्रावण शुद्ध १५ वेदशास्त्रसम्पन्न राजश्री विठ्ठल केशव उपाध्ये व मुकुन्द केशव व शिवराम गोविन्द उपाध्ये व हरी नारायण उपाध्ये ब्राह्मण यजुर्वेदी, माध्यन्दिनीशाखा, अगस्ति गोत्र, त्रिप्रवर, वास्तव्य काा फत्तेपूर, यांचे नांवें वृत्तिविशीचें अस्सल पत्र शिक्यामोर्तबानिशीं आहे, यांस वर्षें ७६ झालीं ह्मणोनः—

श्रीमन्त कैलासवासी बाजीराव बल्लाळ प्रधान यांचीं सरकारी पत्रें शिक्यामोर्तबानिशीं आहेत त्यांतील अन्वय पत्रें सुमारें.

१ रामचन्द्र रघुनाथ व गणेश रघुनाथ सरदेसाई व सरदेशपाण्डे प्रान्त फिरङ्गाण यांचे नांवें सुरुसन सलासीन मयातैन व अलफचें नमस्कार ह्मणोन सदरहू वतनाविषयीं आहे, त्यास वर्षें ८१ झालीं.

१ अन्ताजी रघुनाथाचे नांवें सन सलासीनचे अस्सल शिक्यानिशीं नमस्कार ह्मणोन सरकार अमलाविषयींचें पत्र आहे त्यास वर्षें ७९.

१ मुकादम वाडी नवघर यांचे नांवें सुा इहिद्दे सलासीनचें अस्सल आहे; त्यांतील अन्वय कीं, वेदमूर्ति राा विष्णुभट पुरोहित वस्ति मौजे मजकूर हे श्रीग्रामदेवी वज्राईदेवतेची

पूजा करितात, सबब श्रीचे नैवेद्यास व ब्राह्मणाचे बेगमीक-
रितां मौजे मजकूरपो शेत चांगलें भट्जी मजकूर वंशपरम्परें
शेताची लागवड करून श्रीवज्राईची पूजा करीत असावें
ह्मणोनः— छ १३ सफरचें. यास वर्षें ७८.

१ अन्ताजी रघुनाथ यांचे नांवें सुा सबा सलासीनचें अस्सल पत्र
नमस्कार ह्मणोन आहे, त्यांत मजकूर कीं, स्वामींस समाधान
नाहीं, यास्तव औषध घेऊन येणें ह्मणोन; यास वर्षें ७७.

१ अन्ताजी रघुनाथ यांचे नांवें नमस्कार ह्मणोन सन खमस
सलासीनचें अस्सल पत्र सरकारी जाबसालाविषयीं आहे,
त्यास वर्षें ७७.

१ अन्ताजी रघुनाथ यांचे नांवें नमस्कार ह्मणोन सन सबान सला-
सीनचें सरकारी अस्सल जाबसालाविषयीं आहे त्यास वर्षें ७४.

१ रामाजी महादेव नामदार प्राां साष्टी यांचे नांवें सन खमस
आर्बैनचें अस्सल, त्यांतील अन्वय कीं, वेदमूर्ति बापूभट्ट बिन
रामभट्ट मोगरे यांणीं विदित केलें कीं, तर्फ आठगांवपो
परगणे मजकूर येथील भटपणाची वृत्ति आपली आहे, ती
सुरळीत चालत नाहीं, ती सुरळीतपणें चालवणें ह्मणोनः—
त्यास वर्षें ६९.

७

३ श्रीमन्त कैलासवासी चिमणाजी बल्लाळ यांचीं पत्रें अस्सल
सिक्यानिशीं आहेत, त्यांतील अन्वय सुमारः—

१ अन्ताजी रघुनाथ यांचे नांवें नमस्कार ह्मणोन सन इसन्ने
सलासीनचें सरकारी मजकुराचें पत्र आहे, त्यास वर्षें ८०.

१ अन्ताजी रघुनाथ यांचे नांवें नमस्कार ह्मणोन सन सलासीनचें
सरकारीं जाबसालप्रकर्णी आहे, त्यास वर्षें ७९.

१ अन्ताजी रघुनाथ यांचे नांवें नमस्कार ह्मणोन सन सबान सला-
सीनचें सरकारी मजकुराचें पत्र आहे, त्यास वर्षें ७९.

३

१ क्षेत्रनासिकत्र्यम्बक येथील धर्माधिकारी प्रमुख ऋग्वेदी व यजुर्वेदी समस्त ब्राह्मण यांचें सम्मतपत्र शके १६६८ शकांतील बचम्भट्ट देव धर्माधिकारी, यज्ञेश्वरभट्ट प्रभु धर्माधिकारी, यांचे बिकलमाचें आहे त्या पत्रांतील अन्वय कीं, तुकम्भट्ट यजुःशाखी ब्राह्मण, पिता धर्मभट्ट, हे वृत्त्यंशी यजुःशाखी ब्राह्मण, यांणीं कात्यायन सूत्रावरून श्रौतस्मार्तषट्कर्माधिकार वेदाध्ययन करावें ह्मणोन संस्कृत शास्त्रार्थ निर्णयाचे ठरावाचें अस्सल तपशीलवार आहे. त्यावर दोहों क्षेत्रींचे सर्व ज्ञातीचे शिष्ट ब्राह्मण असामी ५८ यांचीं सम्मतें आहेत, त्यास वर्षें ६४.

१ सदहू पत्रान्वयें कैलासवासी श्रीमन्त भाऊसाहेब यांचे नांवें, बळवन्त पण्डित यांचें अस्सल आहे, त्यांतील अन्वय कीं, अनन्तजोशी उपनांव भास्कर वा। वसई हे ब्राह्मण नासिकास आले. येथील सर्व ब्राह्मणांस भेटले आणि आपलें वर्तमान सांगितलें, त्यावरून समस्तांहीं पत्र यांस दिलें आहे, त्यावरून कळेल. सारांश हे वसईप्रान्तींचे वृत्तीश्वर ब्राह्मण, यांच्या वृत्तीचा उच्छेद करावयाच्या उद्देशें कित्येक तेथील ब्राह्मण ह्मणतात कीं, तुह्मांस षट्कर्माधिकार नाहीं; तुह्मी ब्राह्मणाच्या वृत्तीस योग्य नव्हत, तरी ह्या सर्व गोष्टी लोभप्रयुक्त असें दिसतें. बहुत दिवस ते स्थळीं अविन्धाक्रान्त यामुळें श्रौतस्मार्तकर्म उच्छिन्न जाहलें ह्मणोन पुढें न करावें असें नाहीं; यावर तुमचे अवतार ईश्वरधर्मस्थापना करावयानिमित्त केले आहेत; धर्मतत्त्व परम सूक्ष्म आहे व या ब्राह्मणांचा वृत्तिच्छेद, धर्मउच्छेद न होय ऐसें करणें. कां तर, ब्राह्मणांचा धर्म त्यांहीं सुखें आरम्भावा, हा तुमचे राज्याचा महिमा. अलं सूज्ञेष्वतीव लेखनेन. इत्यादिक ह्मणोन अस्सल पत्रः—

१ शिवदत्त शुक्ल इन्द्रगडकर यांचें पत्र काशीनाथ पाध्ये व महादेव पाध्ये श्रौतस्मार्तकर्मानुष्ठानी ह्मणोन नांवें लिहोन नमस्कार असें पत्र शास्त्रार्थाविषयीं लिहिलें आहे, तें अस्सल आहे.

१ रामाजी महादेव यांचें पत्र वेदमूर्ति राजश्री बापूभट्ट बिन्

रामभट्ट मोगरे यांचे नांवें नमस्कार ह्मणोन वृत्तीविषयीं आहे. सन सीत आर्बैनचें अस्सल. यास वर्षें ६४.

१ शङ्करजी केशव यांचें पत्र अन्ताजीपन्त यांचे नांवें नमस्कार ह्मणोन फिरङ्गाणचे मसलतीविषयीं लिहिलें आहे, तें अस्सल छ १९ रज्जबचें.

१ श्रीनरसिंहभारती शङ्कराचार्य करवीर क्षेत्रकर यांचें पत्र चिन्तामण जोशी प्रमुख ब्राह्मण माहीमकर को। माहीम यांचे नांवें अस्सल आहे.

१ विसाजी केशव, माजी सरसुभेदार, यांचे कारकीर्दीचें पत्र सन समान सबैन मयातैन व अलफचें वेदमूर्ति पळशेब्राह्मण वृत्त्यंशी तर्फ आगाशी यांचे नांवें अस्सल शिक्यामोर्तबांनिशीं आहे त्यांतील अन्वय कीं, सोपारे सामवेदीब्राह्मण तर्फ मजकूर यांजकडील उपाध्येपणाची वृत्ति कांहीं घरांची तुह्मांकडे आहे, त्यास तुह्मीं यजुर्वेदी ब्राह्मण, ते सामवेदीब्राह्मण, त्यांजकडील हव्यकव्य सामवेदमन्त्रेंकरून चालवावें. तुह्मीं यजुर्वेदमन्त्रेंकरून चालवितां ह्मणोन त्यांची तुमची परस्परें कटकट होऊन सर्व सोपारे सामवेदीब्राह्मण सरकारांत जंजिरे वसईचे मुक्कामीं फिर्याद आले. त्याजवरून हकिगत मनास आणितां सोपारे ब्राह्मण सामवेदी, त्यांजकडील हव्यकव्य सामवेदमन्त्रेंकरून चालविलें पाहिजे; यास्तव तुह्मीं सामवेदमन्त्रतन्त्र पाठ करून सोपारे ब्राह्मण यांजकडील उपाध्येपणाची वृत्ति चालवावी, याप्रो करार करून तुह्मांपासून दर एक साल रुपये १५०० पन्धराशें सरकारांत घ्यावयाचा करार केला आहे, तरी सामवेदमन्त्र पाठ करून सोपारे सामवेदी ब्राह्मण यांजकडील उपाध्येपणाचे वगैरे वृत्तीचा उपभोग करीत जाणें. जाणिजे छ १० जमादिलाखर प्रान्त हुजूर मोर्त्तबसुद ह्मणोन अस्सल आहे, त्यास वर्षें ३२.

१२ पळशेब्राह्मण यांस वेदमूर्ति, जोशी, उपाध्ये, भट्ट, अशीं नांवें लिहून त्यांस नमस्कार ह्मणोन ब्राह्मण पत्रें लिहीत गेले, तीं पत्रें सुमारें:--

१ कृष्ण दिवाकर यांचें पत्र.
१ येसाजी राम काणे यांचें पत्र.
१ धोण्डभट्ट गडबोले यांचें पत्र.
१ भास्कर विठ्ठल साने यांचें पत्र.
१ माधवराव पाण्डुरङ्ग आंचवल यांचें पत्र.
१ हरी महादेव यांचें पत्र.

६

१ येसाजी बल्लाळ काणे यांचें पत्र.
१ बापू जोशी पांवसकर यांचें पत्र.
१ मोर दीक्षित वसईकर यांचें पत्र.
१ कृष्णाजी बल्लाळ ठाकूर यांचें पत्र.
१ गणेश नारायण नापडे यांचें पत्र.
१ गङ्गाधर विठ्ठल निा जिवजी गोपाळ.

६

१२

सदर्हू पत्रान्वयें आणखी ब्राह्मणांचीं पत्रें व श्रीमन्तांचीं पत्रें पळशे यांसीं बहुत आहेत.

४२

यज्ञेश्वर दीक्षित प्रभृति वसईकर ब्राह्मण यांजकडील साधनाविषयीं भाऊ जोगळेकर यांस सांगितलें कीं, सदर्हू कज्याविषयीं तुह्मांजवळ साधनें काय असतील तीं यादींत लिहिलीं पाहिजेत, यास्तव आणोन दाखवावीं; त्याजवरोन भाऊ जोगळेकर यांणीं उत्तर केलें कीं, काय साधनें असतील तीं श्रीमन्तांस दाखवूं. नन्तर साधनें तुह्मांकडे देण्याविसीं आज्ञा जाहली ह्मणजे साधनें आणून देऊं. याप्रों सांगितलें; सबब वसईकर यांचीं साधनें लागलीं नाहींत ह्मणोन ——— कलम.

येणेंप्रो पळशे यांणीं आपलीं साधनें दाखविलीं, त्यावर सदर्हू तंटयाविषयीं शिष्ट पण्डितांची सभा केली, तेव्हां पण्डितांनीं सभेंत सांगितलें कीं, पळशे अशी निराळी ज्ञात शास्त्रामध्यें धरून त्यांचा

आचारविचार कोठें पृथक् सांगितला नाहीं; यास्तव पळशे यांचा ब्रह्मकर्म करावयाचा व देवप्रतिष्ठा केल्याचा आचार पूर्वापार कसा चालत आहे, याची चौकशी तद्देशीय वगैरे माहीत असतील त्यांस पुसून ठरेल तसें करावें; शास्त्रार्थाचें प्रयोजन नाहीं; असें पण्डितांनीं सांगितलें, त्यावरून मुम्बई व वसई प्रान्तांकडील वगैरे पळशे यांचे वहिवाटीचे माहितगार पुण्यांत होते, त्यांजला सरकारांत बोलावून आणून येविषयींचा मजकूर सत्योत्तरें लिहून देणें ह्मणोन पुसतां त्यांणीं आपले सत्योत्तरें जबान्या लिहून दिल्या, त्यांतील अन्वय सह्या:—

१ येसाजी शिवदेव बेरणे कऱ्हाडे निा विसाजी केशव माजी सुभेदार, उमर वर्षें ८९, त्यांचे जबानींतील अन्वय कीं, आपण विसाजीपन्त लेले सरसुभेदार यांचे तर्फेनें सरसुभ्याचें व वसईसुभ्याचें कामकाज वीस पञ्चवीस वर्षें अखत्यारीनें करीत होतों, याजमुळें पळशे ब्राह्मण यांचे व्यवहाराची माहितगिरी आहे, ती श्रीमन्ताचे पाय स्मरोन लिहून दिली. बितपशील:—

१ विसाजीपन्त लेले यांची कन्या बापटांचे घरीं दिली. सन सलासिनमध्यें लग्न जाहलें, तेसमयीं कल्याणकर, आनगांवकवाडकर व भिवण्डीकर ब्राह्मण चिठ्या पाठऊन वसईस आणले होते. रामाजी महादेव साष्टीकर व नारो त्र्यम्बक सोमण विजयदुर्गकर असे बहुत समुदाय मिळोन लग्नसमारम्भ होऊन ज्याची जशी योग्यता पाहून पळशेब्राह्मण व आपले ब्राह्मण यांस गन्धाक्षता दक्षिणा हीं दिलीं व ही वहिवाट सर्व आमच्या हातून जाहली. ते समयीं चार पांच हजार ब्राह्मण आमचे व पळशे मिळोन जाहले होते. ऋग्वेदी यांचे मन्त्र होऊन मग यजुर्वेदीपळशे वगैरे ब्राह्मणांनीं मन्त्राक्षता दिल्या ह्मणोन, यास वर्षें ४४ जाहलीं.

१ आमची मातोश्री सन खमस सितैनांत माहीमास मृत्यु पावली, तिचे अकरावे दिवशीं दानधर्म केला. ते समयीं आपले ब्राह्मण, तैलङ्ग व पळशे सर्व होते. ते समयीं दानाचा सङ्कल्प आमचे उपाध्ये

आपाभट्ट राहाळकर याणें सांगोन दानें देवविलीं. ते ब्राह्मण आसामीः-

| आपलेब्राह्मण. | पळशेब्राह्मण. |
|---|---|
| १ आपाभट्ट राहाळकर. | १ दादजोशी स्मार्त. |
| १ बापूभट्ट राहाळकर. | १ विश्रामजोशी स्मार्त. |
| १ गणेशभट्ट गडबोले. | १ हरजोशी शासनकर. |
| १ बापशाभट्ट दांते वगैरे. | १ त्र्यम्बक आचार्य भास्कर. |
| | १ विश्वनाथभट्ट केळवेंकर. |
| ४ | ५ |

सदर्हू खेरीज तैलङ्ग व पळशे वगैरे ब्राह्मण होते, त्यांस कोंकणस्थ व पळशे यांस पददानें वगैरे तैलङ्गादि करून ब्राह्मण यांस सर्व दानें दिलीं ह्मणोन, यास वर्षें ४६.

१ आमचे घरीं वसईस त्रिवर्ग भावांच्या तीन मुलांच्या मुंजी एक मुहूर्तानें सन इहिडे सबैनांत जाहल्या; त्यासमयीं कल्याण, भिवण्डी, आनगांवकवाडकर ब्राह्मण यांस चिठ्या पाठवून वसईस आणिलें. समारम्भ थोर केला. तेसमयीं वसईकर ब्राह्मण आपले व पळशे यांस गन्धाक्षत देऊन दक्षिणा दिली. यास वर्षें ४० जाहलीं.

१ भाऊभट्ट जोगळेकर यांचे आजे गणेशभट्ट जोगळेकर साष्टीहून नवेच वसईस आले, त्यांची चातुर्मास्येष्टी द्रव्याविरहित राहिली होती. हें वर्तमान मला कळलें ते समयीं भटजीस बोलावून सर्व साहित्य आह्मीं करून, तेसमयीं वसईकर शिष्टब्राह्मण व पळशे शिवभट्ट व गणजोशी आदिकरून सर्व मण्डळी मिळाली होती ; त्यांस गन्धाक्षत दक्षिणा देऊन मन्त्राक्षता जाहली.

१ मौजे सोपारें येथें श्रीचक्रेश्वर महादेव याची स्थापना यांचे हातें शङ्काजी केशव यांचे कारकीर्दीत जाहली ह्मणोन ऐकिव आहे. तेथें श्रावणमासीं अभिषेकास लेले यांचे कारकीर्दीत ब्राह्मण

जात होते, ते आह्मीं सोपारें येथें गेल्यास दर्शन घेत होतों ह्मणोन;

१ मौजे उसरणी प्रगणें माहीम येथें नागपण्डित पळशे यांणीं श्रीनागेश्वर महादेव याची स्थापना आमचे बन्धु अन्ताजी शिवदेव हवालदार यांचे कारकीर्दीत केली आहे, त्याची पूजा पळशे व आमचे बन्धुवगैरे करीत आले ह्मणोन;

१ त्र्यम्बकेकर* ब्राह्मण वसईस जिनसाचे खरेदीकरीतां आले होते, तेव्हां लेले यांणीं त्यासमयीं पुसिलें कीं, तुमचा व पळशे यांचा अन्नव्यवहार आहे कीं नाहीं ? त्यांणीं उत्तर केलें कीं, पूर्वीं चालत होता. हे (व) आह्मीं एक, परन्तु हे आमचे प्रान्तांतून फिरङ्ग्याचे अमलापूर्वीं या प्रान्तीं आले, त्यास बहुत काळ जाहला, तेव्हांपासून यांचा आमचा अन्नव्यवहार होत नाहीं ह्मणोन;

१ सोपारेब्राह्मण यांचे घरीं कार्यप्रयोजन जाहल्यास यजुर्वेदाचे मन्त्रेंकरून कर्म चालवीत होते. तेव्हां सोपारेब्राह्मण वसईस येऊन फिर्याद केली कीं, सामवेदी आह्मीं ब्राह्मण, आमचे वेदाचे मन्त्रेंकरून कर्म चालवावें; जरकरितां सामवेद हे पढले नसल्यास पढून कार्यप्रयोजनें आमचीं चालवावीं. नाहीं तरी सामवेदीब्राह्मण आह्मीं मिळऊन त्यास उपाध्यिक देऊन कर्मे चालवूं. त्याजवरून मनास आणितां गोष्ट खरीच जाणोन, विसाजीपन्तांनीं पळशे यांस ताकीद केली कीं, तुह्मांस उपाध्यिक रक्षिणें असल्यास सामवेद पढून सोपारे यांचीं कार्यें त्यांचे वेद ह्मणून (पढून) कर्म चालवावें; ह्मणोन ताकीदपत्रें

* तुकम्भट्ट धर्मभट्ट अग्निहोत्री ह्यांच्या कुण्डांविषयीं ७० पृष्ठांत सांगितलें आहे, त्यावेळेपासून इकडील प्राचीन वाजसनेयांचा व कोंकणस्थांचा जो बेबनाव होत गेला तेणेंकरून जे कोणी नासिक वगैरे ठिकाणचे ब्राह्मण येथें येत गेले ते जरी इकडील प्राचीन वाजसनेयांबरोबर भोजन करीत, तथापि राजाश्रित कोंकणस्थांच्या भीतीमुळें ते लोक खरें सांगण्यास टाळाटाळ करीत. असा वरील जबानींतील आशय दिसून येतो, हें वाचकांच्या लक्षांत सहज येईल,

दिलीं आहेत. सोपारेब्राह्मण, पळशे यांचे घरीं जेवतात असेंहि ऐकण्यांत आहे व आमचे घरीं चाकरीस राहून पाणी भरतात. हा पर्वकाळ चालत आहे ह्मणोन;

१ पळशे ब्राह्मणांत सम्भावीत गृहस्थ आहेत, ते आह्मांस लग्नमुहूर्तांत अक्षत देत आले; आह्मीं जातों व आह्मांकडील ब्राह्मणांसहि ते बोलावणें करितात. आह्मीं मशारनिल्हेकडे जाऊन गन्धाक्षता, विडासुपारी घेत असों. तेथें आमचे ब्राह्मणहि वेदमन्त्र ह्मणोन गन्धाक्षता घेत होते ह्मणोन;

१ विसाजीपन्ताचे धाकटे चिरंजीव बापू यांची मुंज सन आबीत वसईस जाहली, तेसमयीं समारम्भ चांगला जाहला; तेव्हां ब्राह्मणसमुदाय आमचे व पळशे व तैलङ्ग असा भरणा फार जाहला होता. गन्धाक्षता दक्षिणा आदिकरून कार्य जाहलें ह्मणोन ;

१ आह्मीं वसईस बहुत दिवस होतों व आमचे ज्ञातीचे ब्राह्मण शिष्टशिष्ट बहुत वसईप्रान्तीं व कल्याणप्रान्तीं राहत आले, परन्तु त्यांणीं पळशांचे ब्राह्मणपणाविषयीं लेले यांचे कारकीर्दींत तण्टा केला हें जाहलें नाहीं; हे ब्राह्मण नव्हत असें ऐकिलें नाहीं ह्मणोन;

१ पळशे यजुःशाखी ब्राह्मण, त्यांच्या वृत्त्या ज्योतिष उपाध्येपणाच्या वसईप्रान्तीं पूर्वापार आहेत, त्यांची वहिवाट आपले वेदेंकरून (यजुर्वेदावरून) चालवीत आले व त्यांणीं देवस्थापनाहि केल्या आहेत, त्या देवांचे दर्शनास व पूजनास सर्व ब्राह्मण आदिकरून जात आले, त्याविसीं लेले यांचे कारकीर्दींत खटला पडला असें जाहलें नाहीं ह्मणोन;

---

१२

येकूण बारा कलमें लिहून दिलीं; त्यांचा मजकूर आपणांस वाऊक होता तो, ऐकिला होता तो, वहिवाटींत आला होता तो, सत्योत्तर लिहून दिल्हा असे ह्मणोन;

श्रीमन्त राजश्री ———— पन्तप्रधान या प्रान्तीं आश्रितान्तर्गतब्राह्मण आश्वलायन, वास्तव्य मुम्बई, कृतानेक आशीर्वाद. विज्ञापना तागाईत चैत्र वा। १३ पावेतों क्षेम असों. विशे आमचे येथें यजुर्वेदीब्राह्मण प्राचीन वृत्त्यंशी यांत्रे उपाध्येपण, ज्योतिषपण चालत आहे; यांणीं येथें देवप्रतिष्ठादि केल्या आहेत; तेथें ब्राह्मणादि जाती जातात व यांजकडे गन्धाक्षत दक्षिणेस आह्मीं जातों; हे आह्मांकडेस येतात; बहुत काय लिहिणें हे विज्ञप्ति. शके १७३२ प्रमोदनाम संवत्सरे.

१ चिन्तामणभट्ट शेण्डे संमतोऽयं.

१ गङ्गाधरभट्ट जाम्भेकराणां संमतोऽयं.

१ सिद्धेश्वरभट्ट फडके विठ्ठल ठाकूर संमतोऽयं.

१ वासुदेवभट्ट बिन् सदाशिवभट्ट ढोमळे, वास्तव्य क्षेत्र श्रीकाशी हल्लीं वा। का। पुणें पेठ रविवार यांणीं लिहून दिल्हें कीं, विठोबा वैद्य पळशीकर जावळे मुम्बईकर काशीस आले होते ते छपन्न भाषा अधीत वैद्यशास्त्र संहिता आणि ब्राह्मण यत्किंचित् अधित होते. त्यांचें वास्तव्य काशींत वेदशास्त्रसम्पन्न राजमान्य रा। वासुदेवभट्ट कोबई यांचे घरीं होतें. सर्व काशीकरांस माहीत आहे. त्यांचे घरीं मुलाचें उपनयन गृह्योक्तविधीकरून जाहलें हें आह्मांस माहीत आहे. मुलांनीं संहिता चाळीस अध्याय ह्मटली. इतकी माहीतगारी आहे. उपरांतिक सोयरीक तेथें नाहीं ह्मणोन मुलाचा विवाह करण्यास कोंकणांत आले. ही गोष्ट पञ्चद्रविड यांस माहीत आहे, प्रतिवर्षीं श्रावणमासीं मनकर्णिकेस महारुद्र करीत होते, तेथें सर्व ब्राह्मण स्वशाखीय अनुष्ठानास येत होते व सन्तर्पणास स्वयंपाक आचारी यांजकडून करवून ब्राह्मणभोजन होत असे, याप्रो आह्मांस माहितगारी आहे ती लिहून दिल्ही असे, शाखोच्छेद करावा हा आमचा धर्म नाहीं. धर्मसंस्थापक प्रभुवर्य आहेत ह्मणोन;

१ बाळमुकुन्द पाठक काशीकर हल्लीं वस्ती पुणें यांणीं लिहून दिल्हें कीं, दशाश्वमेधीं बाळकृष्ण पाठक पञ्चानन यांजकडेस

भवानीशङ्करभट्ट पळशीकर व त्यांचे पुतणे वासुदेवभट्ट पळशीकर उपाध्ये राहत होते, अध्ययन करीत होते, गङ्गारामभट्ट नातु यांजवळ न्यायशास्त्र पढत होते, तेथून भवानीशङ्करभट्ट घरास गेले. वासुदेवभट्टांनीं आतुर सन्यास घेऊन तेथें समाधिस्थ जाहले व दुर्गाघांटीं वासुदेवभट्ट कोबई यांचे वाड्यांत विठोबा पळशे (पळशीकर) राहत होते. प्रतिवर्षीं श्रावणमासीं अभिषेकद्वारा महारुद्र अभिषेक पात्र धरून सर्व समुदायाबरोबर करीत होते. आचारी घरीं बोलावून ब्राह्मण-भोजन करीत होते. याप्रमाणें आपणांस ठाऊक होतें तें लिहून दिल्हें ह्मणोन;

१ लक्ष्मणभट्ट चन्द्रात्रे नासिककर हल्लीं वस्ती पुणें यांणीं लिहून दिल्हें:—पळशे ब्राह्मण क्षेत्रीं जनस्थानीं आले असतां स्नानसन्ध्या तीर्थविधि लघुरुद्रादि महारुद्रादि अभिषेक रामजीस व गङ्गेस हे व आह्मीं एकेजागीं बसून अनुष्ठानें करीत असतों आणि यांचे प्रान्ताची माहीतगारी आह्मांस आहे कीं, यांच्या हातच्या देवप्रतिष्ठा जाहल्या, त्याहि ऐकिल्या आहेत. यांचा आमचा अन्नव्यवहार एके पंक्तीस आपण पाहिला नाहीं. यांचे ब्राह्मण्यांत विक्षेप आजपर्यन्त आह्मीं ऐकिला नाहीं ह्मणोन;

२ दामोदरभट्ट बिन् नारायणभट्ट गोगटे नासिककर हल्लीं वस्ती आगाशी प्रान्त वसई यांणीं लिहून दिल्हें कीं, आह्मीं वसईप्रान्तीं आगाशी येथें नासिकाहून जाऊन राहिल्यास सात आठ वर्षें जाहलीं, तेव्हांपासून पळशे यांचे आचाराची माहितगारी आह्मांस आहे. ब्राह्मण वृत्त्यंशी, ज्योतिषी, वतनदार वसईकर ब्राह्मणांचे घरीं मुंजी, लग्नें होतात तेथें पळशे यांस बोलावून त्यांजकडून घटका घालवावी व पत्रिकापूजनसमयीं पळशे यांचें पूजन करून आशीर्वादमन्त्र घेऊन त्यांस पत्रिकेचीं दक्षिणा व लग्नाची गन्धाक्षत दक्षिणा व ज्योतिषाचे वृत्तिसम्बन्धें एक पागोटें पळशे यांस देतात. व पत्रिकापूजनसमयीं शिष्टब्राह्मण असतात, तेहि दक्षिणा घेतात व पुंण्याहवाचनसमयीं गणपति, गन्धाक्षत, दक्षिणा पळशे यांस देतात.

याच अन्वयें पळशे यांचे घरीं कार्यप्रयोजन जाहलें असतां, तेथें सर्व ब्राह्मण वसईकर बोलाविल्यास जातात. तेथें गन्धाक्षत दक्षिणा घेऊन येतात व पळशीकर आपले घरचें हव्यकव्य, होमहवन, सर्व कार्य यजुर्वेदमन्त्रेंकरून चालवीत आले. याप्रों आपणांस ठाऊक आहे तें लिहून दिल्हें असे ह्मणोन;

१ रङ्गभट्ट बिन् आपाभट्ट उपासनी जुन्नरकर हल्लीं वस्ती पुणें यांणीं लिहून दिल्हें कीं, आपण मुम्बईस एकदोनवेळां गेलों होतों तेसमयीं पळशेब्राह्मण यांचे घरीं मुंजीस व लग्नांस व कूपोत्सर्गास आपण गेलों होतों, त्यासमयीं यांचे घरीं सर्व यातीचे ब्राह्मण लग्नास व मुंजीस आले होते, त्यांणीं गन्धाक्षता व दक्षिणा घेऊन वेदोक्तमन्त्रें-करून आशीर्वाद केले. पळशेब्राह्मण यांणीं आपले घरची मुंजी व लग्में व कूपोत्सर्ग आमचे वेदेंकरून सर्व आचार चालविला. आह्मीं-व मुल्हेरकर व नासिककर व त्र्यम्बककर आदिकरून होतों; तेसम-यीं यांचे घरीं जाऊन अनुष्ठानप्रसङ्ग करीत आलों. पळशे यांणीं स्वाहाकार रुद्र अनुष्ठान करावयासीं कुण्ड भुलेश्वरीं घातलें होतें तें आपण पाहिलें. इतका मजकूर आपणास माहीत होता तो सत्योत्तरें लिहून दिल्हा ह्मणोन;

१ जगन्नाथ जोशी बिन् रङ्गजोशी जुन्नरकर वृत्त्यंशी हल्लीं वस्ती पुणें यांणीं लिहून दिल्हें कीं, पळशे यजुर्वेदी वाजसनेय माध्य-न्दिन ब्राह्मण, यांत संशय नाहीं. आमचे घरीं पूर्वापार सूर्यजोशी आमचे आजे त्यांजपासीं व आमचे तीर्थरूप कैलासवासी रङ्गजोशी यांजपासीं येत होते. इतकी माहितगारी आहे. यांच्या ब्राह्मण्यांत खोट नाहीं. साक्षर वेदपाठक, षट्कर्मे पूर्वापार करीत आहेत. यांचा व आमचा शरीरसम्बन्ध व अन्नसम्बन्ध नाहीं. अनुष्ठानें वगैरे सर्व यांचें आमचें तन्त्र एकच आहे. असा अन्नसम्बन्ध ह्मटला तरी आमचे शाखेंत बहुतेकांचा. आमचे प्रान्तीं यांचे ब्राह्मण अध्ययनास येत होते. श्रीमन्त दादासाहेब मुम्बईस होते तेसमयीं आपणहि कांहीं कार्यानि-मित्त गेलों होतों; तेथें हे ब्राह्मण वृत्त्यंशी महाराजांकडेस आशी-

वांदास येत होते. श्रीमन्त दक्षिणा देऊन सत्कार करीत होते. याप्रों वर्तमान आह्मांस ठाऊक होतें तें लिहून दिल्हें असे ह्मणोन;

१ बाळजोशी अग्निहोत्री ज्योतिषी उपाध्ये मौजे धोमखोत हवेली मौजे धोम प्रान्त वांई हल्लीं वा। पुणें यांणीं लिहून दिल्हें कीं, श्रीमन्त पन्तप्रतिनिधि यांची स्वारी मौजे व्याहाळी येथें कृष्णातीर ह्मणोन तीर्थविधिपूर्वक उत्तराङ्गपूर्वक केलें. यजुर्वेदी याज्ञिक चालवावयाजोगा ब्राह्मण आह्मांपाशीं कोणी नाहीं, सबब सरकारचे स्वारीबरोबर होते, त्याप्रों याज्ञिक उत्तम पळशीकर दोन ब्राह्मण* होते; त्यांजकडून श्राद्धविधि सङ्कल्पसुद्धां करविला, भोजनास मात्र बसले नाहींत. तेसमयीं जवळ वांईकर शिष्ट शामाचार्य व बाळाचार्य व धोमकर जोशी तेथेंच पित्रेश्वर स्वयम्भू याशीं महान्यासपूर्वक लघुरुद्र दुसरे चार ब्राह्मण *सांगून यांजकडूनच करविला. दुसरे दिवशीं धोमांत आमचे घरीं तीर्थश्राद्धें करावयासीं आले, तेथें *संशय भोजनाचा आला ह्मणोन स्वारीबरोबर वे॥ रा॥ हनुमन्त भट्ट होते त्यांस या उभयतांचा आचार पुसिला. त्यांणीं उत्तर केलें कीं, रायांनीं वाजपेय केला तेव्हां पांचसात ब्राह्मण विद्वान शिष्ट ह्मणोन यजुर्वेदी वसईप्रान्तस्थ पळशीकर आले होते; त्यांचे वंशज हे पळशीकर ह्मणोन यांचा आमचा अन्नव्यवहार मात्र नाहीं; वरकड सम्पूर्ण कर्में याज्ञिकसम्बन्धीं तुमचे घरीं त्यांनीं करावीं व त्यांचे घरीं तुह्मीं करावीं. उभयतांच्या शाखा एक याप्रों निश्चय ठरला.

---

* हे दोन्ही पळशीकर ब्राह्मण वे. स. रा. रा. धर्मभट्ट तुकम्भट्ट अग्निहोत्री (परिशिष्ट ओ पृष्ट ७० पहा) ह्यांचे वंशज होते व मशारनिल्हे अग्निहोत्री यांचा सङ्कल्प असा होता कीं, जो कोणी वाजसनेय कोंकणस्थांबरोबर अन्नव्यवहारादि संसर्ग करील, त्याजबरोबर इकडील प्राचीन वाजसनेयांनीं अन्नव्यवहार करूं नये; त्याप्रमाणें ह्यादोघांनीं श्रीमन्तपन्त प्रतिनिधीकडेस व्यवस्था ठेविली. कारणकीं, पेशव्यांचा व पन्तांचा पङ्क्तिव्यहार नुकताच चालू झाला होता. ह्याजविषयीं ह्याच इतिहासांत समर्पक निरूपण केलेंच आहे तें पहा. तेव्हां साक्षीदेणारे हे पन्ताचे आश्रित असल्या कारणानें असली साक्षी दिली ह्यांत नवल नाहीं. जर हे पळशीकर दूषणीय असते तर श्राद्धसङ्कल्पादि विधि पन्तांनीं ह्यांजकडून कसा उरकून घेतला असता! विचार करा!

त्याजवरून श्राद्धादिक उभयतांनीं केलें. नन्तर भोजन त्यांणीं पाक करून वेगळें केलें. पळशीकर तीर्थास येतात त्यांची वहिवाट भोजनाव्यतिरिक्त ब्राह्मणकर्माचा व्यवहार सम्पूर्ण होत असतो व नथुभट्ट पाठक केळवेंकर यांजपाशीं संहितेचे अध्याय पांच आह्मीं ह्मटले होते. इतकें आह्मांस ठाऊक आहे तें लिहून दिल्हें ह्मणोन;

१ बापू महादेव सबनीस किल्ले कोरीगड निा रा बाजी बल्लाळ पटवर्धन हल्लीं वाा शहर पुणें यांणीं लिहून दिल्हें कीं, श्रीमन्त कैलासवासी दादासाहेब यांची स्वारी मुम्बईस गेली होती, ते समयीं आपण मुम्बईस होतों, त्यास श्रीमन्त यांचे दर्शनास जात होतों. तेथें पळशेब्राह्मण वृत्त्यंशी शिष्ट मण्डळीसहित श्रीमन्तांस आशीर्वाद करावयाकरितां आले; त्यांणीं वेदोक्तमन्त्रेंकरून आशीर्वाद करून श्रीफळें दिल्हीं; नन्तर त्यांस श्रीमन्तांनीं दक्षिणा दिल्ही, ती आपण पाहिली. व कैलासवासी चिन्तो विठ्ठल दिव्य, श्रीकामेश्वर पञ्चमुखीमहादेव याचे पाठीमागें सोप्यांत राहिले होते, तेथें पळशेब्राह्मण आशीर्वादास गेले होते, तेथेंहि वेदोक्तआशीर्वाद देऊन दक्षिणा घेतली, तीहि आपण पाहिली व शहरांत सर्व ब्राह्मण पञ्चद्रविडांसमेत अनुष्ठानें होतात, तेथेंहि हे ब्राह्मण अनुष्ठानप्रसङ्गास असतात व वृत्ति ज्योतिषपणाची व उपाध्यिकपणाची पळशेब्राह्मण यांची ग्रामस्थ, स्थाईक व वतनदार आदिकरून यांची वृत्ति वृत्तपणाची चालत आहे. चित्पावनब्राह्मण, शेणवईब्राह्मण यांजकडेस उपाध्यिकपणा मात्र नाहीं. पळशेब्राह्मणांचा ज्योतिषपणा सर्वांकडे आहे. पळशेब्राह्मण यांचें अध्ययन यजुर्वेद आहे; हें आपणास ठाऊक. याप्रों आपण मुम्बई प्रान्तीं व वसई प्रान्तीं पाहत आलों. वर्षें अजमासें ४० जाहलीं. याप्रों आपणास ठाऊक होतें तें सत्योत्तरें लिहून दिल्हें असे ह्मणोन;

१ गणेश शिवाजी पाटकर मुाा मुम्बई, हल्लीं वस्ती पुणें पेठ नारायण, यांणीं लिहून दिल्हें कीं, पळशेब्राह्मण, महाराष्ट्र ब्राह्मण यांचे वहिवाटीचे माहितगारीविषयीं आज्ञा. त्यास मुम्बईंत आपले ज्ञातींत हव्यकव्य जाहल्यास चौघांबरोबर भूयसी दक्षिणा सर्वांस

देतों. वरकड परभू व पांचकळशी वगैरे यांचे घरचें ज्योतिष (व) उपाध्येपण पळशेब्राह्मण यांचें आहे व वेदोक्त स्वकर्म ते करितात; हेंहि आपण पाहतों. उमर वर्षे ३५. आमचे ज्ञातीचे घरीं आले तरी वेदोक्त आशीर्वाद देतात. यांचीं देवालयें मुम्बईस आहेत, तेथें आह्मीं जाऊन पूजा वगैरे करितों ह्मणोन ;

१ काशीनाथ राघवजी परभू पाठारी वा। मुम्बई, हल्लीं वा। पुणें यांणीं लिहून दिल्हे कीं, कलमें वितपशीलः—

१ शिवजी धाकजी यांणीं विठ्ठलरखमाईची स्थापना केली, त्याची प्रतिष्ठा पळशीकर ब्राह्मण यांणींच केली. त्यांचे दर्शनास व पूजेस ब्राह्मणादिकरून सर्व जातात व आह्मींहि जातों ह्मणोन;

१ ब्राह्मणांचे घरीं मुंजीस व लग्नास आह्मीं जातों, तेथें हे वृत्त्यंशी-ब्राह्मण लग्नमुंजीसमयीं गणपतिपूजन, घटकाप्रतिष्ठा, पत्रिकापूजन हेच करितात. यांस पागोटें व दक्षिणा देतात व लग्नमुंजी हेच लावितात व इतर ब्राह्मण असतात, तेथें सर्वांस गन्धाक्षता व दक्षिणा देतात. आह्मीं पाहतच आलों ह्मणोन ;

१ आमचे घरचें ज्योतिष व उपाध्येपणाचे वृत्तीचे अधिकारी पूर्वापार पळशे. प्रयोजनसमयीं कोंकणस्थ व तैलङ्ग व गुजराथी येतात, त्यांसहि गन्धाक्षत दक्षिणा देतों; परन्तु आमचे घरचे क्षयवृद्धीचे अधिकारी पळशे, यांसच दानधर्म देतों व पळशे यांचें तीर्थ आह्मीं घेतों व त्यांची पूजाहि करितों ह्मणोन;

१ पळशीकरब्राह्मण यांणीं देवस्थापना केली आहे, त्या देवांची कोंकणस्थ व इतर ब्राह्मण आदिकरून सर्व पूजा व अभिषेक करितात. आह्मीं श्रावणमासीं पूजा व अभिषेक करविणें जाहलें तरी पळशेब्राह्मण यांजकडून करवितों ह्मणोन ;

१ पळशीकरब्राह्मण व कोंकणस्थब्राह्मण यांचा ब्राह्मण्याविषयीं तण्टा पडला असें आह्मांस ठाऊक नाहीं ह्मणोन ;

श्रीमन्त महाराज पन्तप्रधान............स्वामीचे सेवेशीं, सेवक सूर्यवंशी पाठारे प्रभू वास्तव्य बन्दर मुम्बई विज्ञापना विशेष. इकडील ग्रामस्थयजुर्वेदीब्राह्मण वसईकर व कोंकणस्थब्राह्मण या उभयतांचा देवप्रतिष्ठेवरून कलह होऊन श्रीमन्त......महाराजांकडे मनसुबी गेली, तेव्हां न्यायाधीशाकडे आज्ञा केली; त्याजवरून उभयतांची मनसुबी ध्यानीं आणून सरकारांतून आज्ञा जाहली कीं, तुह्मीं ज्यांकडे उपाध्यिक सम्पादीत असाल त्यांजकडून सडी आणवाव्या; त्यावरून आह्मीं हें लिहून देतों ऐसाजेः—हे ब्राह्मण प्राचीन वृत्त्यंशी आहेत, ह्यांचे हातून आह्मांकडेस हव्यकव्य सम्पादन होत आहे व या ब्राह्मणांची पूजा करून तीर्थ घेऊन दक्षिणा देतों व आमचे घरीं लग्नमुहूर्त असतो, तेव्हां हेहि असतात व तेहि असतात आणीकहि ब्राह्मण असतात, तेव्हां सर्वांस यांजसुद्धां गन्धाक्षत दक्षिणा समान देत आहों. हे ब्राह्मण व कोंकणस्थब्राह्मण असे उभयतां मिळून प्रासादप्रतिष्टा केल्या आहेत आणि त्या ब्राह्मणांच्या हातून प्रतिष्ठित देव जेथें जेथें आहेत, तेथें तेथें ब्राह्मणादिकरून सर्व याती देवदर्शनें घेतात व श्रावणमासीं अभिषेक पूजादि करितात. याप्रा॰ या ब्राह्मणांचे हातांतून प्राचीन व नवीन प्रासादप्रतिष्ठा केल्या आहेत. साम्प्रत कोंकणस्थब्राह्मण आमचे कांहीं गृहस्थांचें आर्जव सम्पादून या ब्राह्मणांचा द्वेषकरून वृत्तिहरण करूं इच्छितात, परन्तु हे यजुर्वेदीब्राह्मण प्राचीन आहेत. हे आह्मांस पूर्वापार वडिलोपार्जित ठाऊक आहेत. हें स्वामीचे सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना. शके १७३२ प्रमोदनामसंवत्सरे चैत्र वा॥ १३ भौमे—

१ लक्ष्मण विठ्ठल प्रभू.
१ जगन्नाथ विसाजी प्रभू.
१ मोरोबा विश्वनाथजी प्रभू.
१ विश्वनाथ बाळाजी प्रभू.
१ जनार्दन गोवरोजी प्रभू सही.
१ संमत सुन्दरकेशवजी.
१ बाळाजीमुगाजी सही.
१ राघोबा पुरुषोत्तमजी.
१ विठोबा काळोबा.
१ काशीनाथ विश्वनाथजी.
१ लक्ष्मण रघूजी.
१ रामचन्द्र बाळाजी प्रभू.

| | |
|---|---|
| १ बाळकृष्ण गोविन्दजी. | १ राघोबा काशीनाथजी. |
| १ अनन्त माधवजी. | १ रघुनाथ माधवजी. |
| १ चन्द्रशेखर रखमाजी सही. | १ मदन पुरुषोत्तमजी. |
| १ रणसोड लक्ष्मणजी प्रभू सही. | १ शङ्कर रामजी. |
| १ रणसोड निळाजी प्रभू सही. | १ जगन्नाथ मल्हारजी. |
| १ रामकृष्ण जीवनजी सही. | १ रामचन्द्र गणेश प्रभू. |
| १ नारोबा दामोदरजी प्रभू सही. | १ भास्कर बापूजी. |
| १ विश्वनाथ सदाशिवजी. | १ दामोदरजी रणसोडजी. |
| १ भवानजी शिवजी प्रभू सही. | १ हरिश्चन्द्र केरोजी. |
| | १ मोरोबा गोवरोजी प्रभू सही. |

३१ सदर्हू असाम्या एकतीस, सत्योत्तरें लिहून दिल्हें असे.—

श्रीमन्त.....................पन्तप्रधान.

स्वामींचे सेवेसीं....................

सेवक सूर्यवंशी, सोमवंशी पा वास्तव्य बन्दर मुम्बई माहीम, वरळी, परळ, माजगांव, गिरगांव, चरणांवर मस्तक ठेऊन विज्ञापना विशेष, इकडील ग्रामस्थयजुर्वेदीब्राह्मण व ऋग्वेदीब्राह्मण या उभयतांचा देवप्रतिष्ठेवरून कलह होऊन श्रीमन्त...महाराजांकडे मनसुबी गेली. तेव्हां न्यायाधीशाकडेस आज्ञा केली. त्याजवरून उभयतांची मनसुबी ध्यानीं आणून सरकारांतून आज्ञा जाहली कीं, तुह्मीं ज्यांकडे उपाध्यिक करीत असाल त्यांजकडून सडी आणवाव्या; त्याजवरून हें आह्मीं लिहून देतों ऐसाजेः—हे यजुर्वेदीब्राह्मण प्राचीन वृत्त्यंशी आहेत. यांचे हातून आह्मांकडेस शान्तिक, पौष्टिक चालत आहे. यांचेच सकल महाराष्ट्र ज्ञातीकडेस उपाध्यिक, ज्योतिषपणादि, सर्व अष्टाधिकार यांचेच आहेत. हे यजुर्वेदीब्राह्मण व कोंकणस्थब्राह्मण वगैरे मिळोन आमचे स्वज्ञातीच्या प्रासादांत प्रतिष्ठा प्राचीन व नवीन केल्या आहेत. त्या येणेंप्रो :—मुम्बईमध्यें श्रीबलभद्रेश्वराचें राा बाळाजीची कन्या गोदावरीबाईचें देवालय एक; व माजगांवांमध्यें श्रीमाणकेश्वराचें देवालय राजश्री द्वारकाजी बाबा यांचें एक; वरळीमध्यें श्रीनीलकण्ठेश्वराचें देवालय

रा। धाकजी यांचे एक; परळामध्यें श्रीवागेश्वरीचें देवालय चान्दुबाईचें एक ; व माहिमामध्यें रा। शिवजी यांचें विठ्ठलरखुमाईचें देवालय एक; व साष्टी प्रां। गोरेगांवांत गङ्गा। पिलूबाईचें देवालय एक; व रा। ह्लाजीचें श्रीरामचन्द्रजीचें देवालय एक ; मालाडांत गङ्गा। निखिलाबाईचें मारुतीचें देवालय एक; येकूण देवालयें प्राचीन व नवीन बान्धून प्रतिष्ठा केल्या आहेत ; तेथें ब्राह्मणादि सर्व ज्ञाती, महाराष्ट्र सर्व ज्ञाती देवदर्शनास जात आहेत. श्रावणमासीं अभिषेकादि पूजा करितात; यात्रेस येतात; साम्प्रत कोंकणस्थब्राह्मण ह्या यजुर्वेदीब्राह्मणांचा द्वेष करून वृत्ति हरण करूं इच्छितात; परन्तु हे प्राचीनवृत्त्यंशी, यजुर्वेदीब्राह्मण आहेत, हें आह्मांस पूर्वापारवडिलोपार्जित ठाऊक आहे. स्वामींचे सेवेसीं श्रुत होय. शाके १७३२ प्रमोदनामसंवत्सरे माहे वैशाख शुद्ध ६ भौमे.—

१ विश्वनाथ धाकजी.
१ हिराजी यादवजी.
१ दामाजी देवजी.
१ दादाजी यादवजी.
१ वासुदेव जीवनजी.
१ पुतळाजी तानाजी.
१ धनाजी रामजी.
१ सदाशिव पदमणजी.
१ त्र्यम्बकजी जवरोजी.
१ नारायणजी बाळकोजी.
१ बावनजी भिकाजी.
१ गोवरोजी जीवनजी.
१ दादाजी नरसोजी.
१ धनाजी नरसोजी.
१ भिवजी माणकोजी.
१ जीवनजी लाडकोजी.
१ जगन्नाथ मुकुन्दजी.
१ भाऊ जीवनजी माहीमकर.
१ पाण्डवजी गणेशजी.
१ कृष्णाजी उन्दीर ह्मात्रे.
१ महादेवजी धाकजी.
१ त्र्यम्बकजी मुरारजी.
१ यादवजी गोळपाजी.
१ जनाजी माधवजी, गिरगांव.
१ केशवजी तुकाजी, गिरगांव.
१ पाण्डवजी भवानजी, गिरगांव.
१ जीवनजी त्र्यम्बकजी, गिरगांव.
१ बाबू भिवजी गिरगांवकर.
१ कानू नावजी.
१ भिवजी गोन्दजी.
१ माणिकजी जनाजी, गिरगांव.
१ जीवनजी सिमाजी;
१ पाण्डुरङ्ग नारायणजी.
१ माणिकजी येसजी, गिरगांव.

१ उद्धव शिवपुरी.
१ मुकुन्दजी धर्माजी.
१ भिकाजी माणकोजी.
१ देवजी विठ्ठलजी.
१ जना पुतळाजी.
१ गोपाळजी सोनपुरी.
१ भिवजी महादजी.
१ कृष्णाजी कानजी.
१ गोविन्दजी गणेशजी.
१ रघुनाथ देवजी.
१ माणिक पिलाजी.

---

४५

सदर्हूप्रो आपणांस ठाऊक होतें तें सत्योत्तरें लिहून दिल्हें असे म्हणोन;

१ विश्वनाथ धाकजी परभू वा। मुम्बई, हल्लीं वा। पुणें, यांणीं लिहून दिल्हें कीं, आमचे घरची ज्योतिष व उपाध्येपणाची वृत्ति पूर्वापार पळशेब्राह्मण यांची; तेच वृद्धिक्षय आदिकरून हव्यकव्य सर्व चालवित आहेत; प्रयोजनसमयीं कोंकणस्थ व तैलङ्ग व गुजराथी येतात, त्यांसहि गन्धाक्षत दक्षिणा देतों. इतर ब्राह्मणांचे घरीं लग्नकार्यास आम्हांस बोलावितात, तेथें आह्मीं जातों, तेथें वृत्त्यंशी-ब्राम्हण व इतर ब्राम्हण असतात, तेथें यांस सर्वांबरोर गन्धाक्षत दक्षिणा देतात, ती आह्मीं पाहत आलों. पळशे यांचें तीर्थ आह्मीं घेतों. आमचे ज्ञातीचे गृहस्थ यांणीं देवालय बान्धोन तेथें देवप्रतिष्ठा सत्तानिवृत्तीकरून आमचे उपाध्ये पळशीकरब्राह्मण यांजकडून करवीत आले, त्या देवांची नांवनिशीः—

१ मुम्बईस श्रीबलभद्रेश्वर देव याचें नूतन प्रासाद बाळाजीची कन्या गोदावरीबाई इणें करवून प्रतिष्ठा करविली ह्मणोन;
१ माजगांवास श्रीमाणकेश्वराचें देवालय होतें, त्याचा जिर्णोद्धार आमचे चुलते द्वारकोजी बाबा यांणीं करवून अर्चा करविली ह्मणोन;
१ वरळीमध्यें श्रीनीलकण्ठेश्वराचें देवालय नूतन आमचे तीर्थरूप धाकजी बाबा यांहीं करवून अर्चा करविली ह्मणोन;

१ परळास श्रीवागेश्वरी भवानीचें देवालय जीर्ण होतें, तें चान्दूबाई इणें नूतन प्रासाद करून जीर्णोद्धार केला ह्मणोन;
१ माहीमामध्यें श्रीविठ्ठलरखमाईचें देवालय शिवजीनें बान्धोन प्रतिष्ठा करविली ह्मणोन;
१ साष्टीप्रान्तीं मौजे गोरेगांव येथें श्रीभवानीशङ्कराचें देवालय पिलूबाईनें बान्धोन प्रतिष्ठा करविली ह्मणोन;
१ प्रां साष्टी येथें श्रीरामलक्ष्मणसीताबाईचें देवालय हुलाजी यांहीं बान्धोन प्रतिष्ठा करविली ह्मणोन;
१ प्रां साष्टी येथें को मालाडामध्यें श्रीमारुतीचें देवालय निखिलाबाईनें बान्धून त्याची प्रतिष्ठा करविली ह्मणोन;

---
८

सदर्हू आठ देवालयें यांच्या प्रतिष्ठा व अर्चा अश्वत्थोद्यापनें व वापीकूपतटाकोत्सर्ग, वेद मूा रा गम्बानाईक जावळे यांचे तीर्थरूप रामभट्ट जावळे व मल्हारभट्ट जावळे व केशवभट्ट उपाध्ये व कृष्णम्भट्ट उपाध्ये व बाळम्भट्ट आचार्य व रामभट्ट जोशी व वामनभट्ट स्मार्त वगैरे वृत्त्यंशी ब्राह्मण व अन्यशाखीय ब्राह्मण कोंकणस्थ व तैलङ्ग व गुजराथी असा समुदाय मिळोन आर्त्विज्य करून प्रतिष्ठा केल्या. त्या देवांस सर्व ब्राह्मण आदिकरून आजपर्यन्त पूजा व अभिषेक दर्शनास व यात्रेस जातात. हें आपणांस ठाऊक आहे. पळशे यांणीं देवस्थापना केल्या आहेत, त्या देवांची पूजा कोंकणस्थब्राह्मण व इतर ब्राह्मण करितात व अभिषेक करितात व आह्मीं श्रावणमासीं पूजा व अभिषेक करविणें तें पळशीकरब्राह्मण यांजकडून करवितों व इतर ब्राह्मणांकडून करवितों. पळशेब्राह्मण यांचा तण्टा पडला होता असें आह्मांस ठाऊक नाहीं ह्मणोन;

१ बाळाजीकेशव परभू कायस्थ वा भिंवण्डी, हल्लीं वा पुणें, उमर वर्षे ६०, यांणीं लिहून दिल्हें कीं, आमचे गांवीं पळशे

ब्राह्मण सर्वांचे घरीं कार्यप्रयोजनीं येतात; वरकड ब्राह्मणांस गन्धाक्षतदक्षिणा देतों त्याप्रो यांसहि देतों. पळशे इतर ब्राह्मणांचे घरीं दक्षिणा घेतात. फिरङ्गाणप्रान्तीं यांच्या ज्योतिषपणाच्या व उपाध्येपणाच्या वृत्ति आहेत. आपले वडील साष्टीप्रान्तांत बहुत दिवस होते. तेथें त्याकाळीं सरकार अमलापूर्वी आमच्या येथें भिक्षुकीपणा हेहि करीत होते व यांचे हातच्या प्रतिष्ठा साष्टीप्रान्तांत आहेत त्या आह्मांस माहीत आहेत. त्या देवांचें दर्शन सर्व घेत आहेत. याप्रों आह्मांस माहितगारी होती ती लिहून दिल्ही ह्मणोन;

१ किशोरदास बैरागी वा। केळवें, प्रान्त माहीम यांणीं लिहून दिल्हें कीं, केळव्यांस श्रीठाकूरद्वार आहे तेथें मीच असतों. ठाकूरद्वार बान्धिलें त्यास अजमासें वर्षें (?) जाहलीं, तेव्हां ठाकूरजीच्या मूर्ति स्थापित केल्या तेसमयीं ब्राह्मण महादेवभट्ट दांत्ये कोंकणस्थ व फिरङ्गाणी ब्राह्मण दादजोशी व देवजोशी व नाथपाठक व दुसरे पाठक गांवचे वतनदार जोशी असे दहावीस जण होते आणि उभयतां मिळोन स्थापना केली. नन्तर श्रीरामजीची मूर्ति स्थापिली, तेसमयीं आपाभट्ट राहळकर, गणेशभट्ट गडबोले व कृष्णम्भट्ट दांत्ये असे चित्पावन व फिरङ्गाणी ब्राह्मण नथूजोशी व देवजोशी व कृष्णम्भट्ट पाठक व विश्वनाथ जोशी व नथूपाठक वगैरे वृत्त्यंशी वतनदार दहावीस होते आणि उभयतांनीं मिळोन स्थापना केली. त्यास वर्षें अजमासें २० जाहलीं ह्मणोन;—

१ भाईजी बिन् जयराम शेट कांसार मुम्बईकर याणें लिहून दिल्हें कीं, आह्मां सर्व कांसारजातींकडील ज्योतिष उपाध्येपणाची वृत्ति पूर्वापार पळशे यांची होती. ती आमचे आजे भगवानशेट यांणीं पळशांची नातवानी (गरीबी) जाहली तेव्हां पळशांपासून विकत घेतली त्यास वर्षें अजमासें तीसपस्तीस जाहलीं. ती वृत्ति आमचे आजे यांणीं मरतेसमयीं पटवर्धन यांजला दान दिल्ही. त्यापासून पटवर्धन चालवितात, परन्तु पळशे व कोंकणस्थ ब्राह्मण हे एक याचें कारण आह्मीं पळशे ब्राह्मण यांचें तीर्थ घेतों, कार्यप्रयोजनीं देशस्थ, पळशे

व कोंकणस्थ यांजला बोलाविर्ते, त्यांस उभयतांचा समारम्भ करितों; याप्रों चालत आहे. कोंकणस्थ ब्राह्मण मिळाले असतां तेथें चार पळशे ब्राह्मण आले असतां त्यांचा ह्यांचा वाद कोंकणस्थ श्रेष्ठ किंवा पळशे श्रेष्ठ असें किमपि नाहीं; दोघांचा समारम्भ सारखा चालत आला; विडा, गन्ध, पुष्प समसमान चालत आलें आहे. अन्नव्यवहार मात्र परस्परें चालत नाहीं. इंग्रेज यांणीं पाणी घङ्गाळांत ठेविलें त्यास कोंकणस्थांचें पाणी सर्वांनीं घेतलें. पळशांचें पाणी कोणीं घेतलें नाहीं, असें आपणास ठाऊक नाहीं ह्मणोन;

१ कमळ्या विठ्ठल रात व शिम्व्रामामरात व विठ्ठल भिखचुरी वगैरे वाडवळ शिरगांवकर यांणीं लिहून दिल्हें कीं, मौजे मजकुरीं बामगोडींत आम्ब्याचे झाडाखालीं श्रीबोरेश्वराचें लिङ्ग व श्रीखाम्बजाईची पिण्डी फिरङ्गी याचे धाकामुळें लपवून ठेविली होती. पुढें महाराष्ट्रधर्म चालला पाहिजे, तेव्हां रयतांनीं फिरङ्गी याजवळ अर्ज केला कीं, आमचा धर्म देवांखेरीज चालत नाहीं. तेव्हां फिरङ्गी बोलला कीं, शेन्दुराखेरीज तुमचा देव तुह्मीं बसवून धर्म चालवावा. तेव्हां श्रीबोरेश्वराचें लिङ्ग गुप्त ठेविलें होतें तें काढून लहानसें लांकडी देऊळ बाजारांत बान्धून देवाची स्थापना केली, तेसमयीं कोंकणस्थ ब्राह्मण महादेवभट्ट दांत्ये शिरगांवकर ब्राह्मण, वृत्त्यंशी—धाकजोशी व विठ्ठल जोशी व जयराम जोशी व काशीनाथ जोशी व विश्वनाथ भट्ट व भिकं जोशी गांवकरी होते त्यांणीं देव स्थापून महाराष्ट्रधर्म चालविला. पुढें स्वराज्य जाहल्यावर सूर्याजीघोडे हवालदार शिरगांवचे कोटांत आल्यावर श्रीखाम्बजाईचें देऊळ लांकडी बान्धून त्याची स्थापना शिरगांवकर वृत्त्यंशी ब्राह्मण यांचे हातून करविली. याप्रों आपणांस ठाऊक आहे ह्मणोन;

श्रीमन्त पन्त प्रधान——————स्वामीचे सेवेसीं.

समस्त नामदेव ज्ञाती शिम्पी वास्तव्य मुम्बई बन्दर, चरणांवर मस्तक ठेऊन विज्ञापना विो, इकडील ग्रामस्थ यजुर्वेदीब्राह्मण व वसईकर कोंकणस्थ ब्राह्मण या उभयतांचा देवप्रतिष्ठेवरून कलह

होऊन श्रीमन्त ———————— महाराजांकडेस मनसुबी गेली, तेव्हां न्यायाधीशाकडेस आज्ञा केली त्याजवरून उभयतांची मनसुबी ध्यानीं आणून सरकारांतून आज्ञा जाहली कीं, तुह्मीं ज्यांकडेस उपाध्यिक सम्पादीत असाल त्यांजकडून सडी आणवाव्या; त्याजवरून आह्मीं हें लिहून देतों ऐसाजेः—हे यजुर्वेदीब्राह्मण प्राचीन वृत्त्यंशी आहेत. यांचे हातांतून आह्मांकडेस हव्यकव्य सम्पादित आहों व ह्या ब्राह्मणांची पूजा करून तीर्थ घेऊन दक्षिणा देतों व आमचे घरीं लग्नमुहूर्त असतो तेव्हां हेहि असतात व तेहि असतात, आणीकहि ब्राह्मण असतात. तेव्हां सर्वांस या ब्राह्मणांसुद्धां गन्ध, दक्षिणा समान देत आहों. हे ब्राह्मण व कोंकणस्थ ब्राह्मण असे उभयतां मिळून प्रासादांत देवप्रतिष्ठा केल्या आहेत, आणि ह्या ब्राह्मणांचे हातांतून प्रतिष्ठित देव जेथें जेथें आहेत तेथें तेथें ब्राह्मणादिकरून सर्व ज्ञाती देवदर्शनें घेतात व श्रावणमासीं अभिषेकपूजादि करितात व मागें शङ्कर गोपाळ शेट यांची स्त्री साजूबाई यांहीं मुम्बईमध्यें श्रीभुलेश्वराजवळ देवालय बान्धोन हे यजुर्वेदीब्राह्मण व कोंकणस्थ ब्राह्मण असे उभयतां मिळोन श्रीविठ्ठलरखुमाईची प्रतिष्ठा केली आहे, तेथें ब्राह्मणादि सर्व ज्ञाती देवदर्शनास व उत्साहास जातात; याप्रो या ब्राह्मणांचे हातांतून प्राचीन व नवीन प्रासादप्रतिष्ठा केल्या आहेत. साम्प्रत कोंकणस्थ या ब्राह्मणांचा द्वेष करून वृत्ति हरण करूं इच्छितात, परन्तु हे प्राचीन यजुर्वेदीब्राह्मण वृत्त्यंशी आहेत, हें आह्मांस पूर्वापार वडिलोपार्जित ठाऊक आहे; हें स्वामींचे सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना. शके १७३२ प्रमोदनाम संवत्सरे माहे वैशाख शुद्ध ३ रवौ.

१ निळाजी अनन्त शेट.
१ नारणजी जानोजी.
१ कृष्णाजी रामजी.
१ पाण्डवजी रामजी.
१ मुकुन्दजी गोवर शेट.
१ पाण्डुरङ्ग तुळाजी शेट शिम्पी.
१ धनाजी भिव शेट.
१ भिकाजी, धर्म शेट.
१ जनाजी बावाजी.
१ सदाशिव विठ्ठलशेट.

१ बाबजी देव शेट.
१ यादवजी पदमणजी.
१ माणिकजी काशिबा शेट.
१ जनाजी हरशेट.
१ गणेशजी गोविन्द शेट.
१ आत्माजी बाळ शेट.
१ धोण्डजी विट शेट.
१ नारायणजी यादव शेट.
१ कृष्णाजी भिव शेट.
१ विठोबा राम शेट.
१ पाण्डवजी पदमाण शेट.
१ बापूजी मुकुन्द शेट.
१ अन्तोबा वाग शेट.
१ हरबाजी अर्जुन शेट.
१ कृष्णाजी रामजी सही.
१ पाण्डवजी बाळ शेट.
१ मकुन्द माधव शेट.
१ जना रामजी.
१ दत्ताजी जनाजी.
१ खण्डोजी भिवजी.
१ नामाजी हरशेट हम्बीर.
१ नामाजी यशवन्त शेट.
१ खण्डोजी हर्बाजी.
१ रणछोडजी भिव शेट.
१ हिराजी नारण शेट.
१ जयराम मल्हार शेट.

३६

सदर्हूप्रमाणें आपणांस ठाऊक आहे तें सत्योत्तरें लिहून दिल्हें असे:—

## परिशिष्ट (*ठ)

## पुण्यास गेलेल्या इकडील वाजसनेयब्राह्मणांनीं वरील श्रीसिद्धेश्वराची पुनःस्थापनेची आज्ञा पेशव्यांनीं दिली येविषयीं इकडील वाजसनेयांस लिहिलेलें पत्र. शके १७३७ (इ. स. १८१५)

श्रीगजानन.

वेदमूर्ति रा. रा. बाबा गणपति जोशी व आबा जोशी तथा रामचन्द्र जोशी, तथा बाळम्भट्ट जावळे तथा दादा वैद्य तथा तात्या वैद्य तथा जगन्नाथ जोशी तथा मुकुन्द नाईक तथा गङ्गाधर विठ्ठल जोशी तथा विठोबा महादेव जोशी तथा रङ्गोबा पण्डित

* हें अस्सल पत्र मोडी लिपींत असून तें वे. रा. रा. गङ्गाधर विठ्ठल मोगरे पैठणकर हल्लीं वस्ती शिरगांव यांजपाशीं आहे.

मुा वसई, वो भास्कर बाळजोशी तथा जगन्नाथ शिव जोशी तथा काशीनाथ नीलकण्ठ जोशी तथा गोविन्द नारायण जोशी मुा वाघोली, वो रघुनाथ हर जोशी मुा सोपारें, वो हरजोशी पुरन्दरे तथा माधवगौतम जोशी तथा रामचन्द्र पाध्ये तथा जगन्नाथ आचार्य मुा आगाशी, वो विश्वनाथ जोशी मुा बोळिंज, वो विठोबा पाठक व विठोबा देव जोशी तथा लक्ष्मण राम जोशी तथा माधव नाईक तथा मुकुन्द नाईक व बापू अनन्त नाईक मुा केळवें, वो चिन्तामण जोशी तथा नानाआचार्य तथा रघुनाथ बल्लाळ जोशी मुा माहीम, वो गङ्गाधर जोशी तथा सदाशिव जोशी पाटील मुा शिरगांव, वो रामचन्द्र जोशी मुा आलेवाडी, वो काशीनाथ जोशी मुा चिंचणी व समस्त केळवें माहीम शिरगांव प्रान्तस्थ ब्राह्मण मण्डळी स्वामीचे सेवेशीं:—

पोष्य बाळम्भट्ट जावळे व राघोबा वैद्य मुा पुणें. कृतानेक साष्टाङ्ग-नमस्कार. विज्ञापना तागाईत माघवद्य ७ मी, चन्द्रवासर (शके १७३७) पावेतों आपले कृपेकरून सुखरूप असों. विशेष, वो नाना दीक्षित व महादेव शुक्ल या उभयतांनीं सक्तप्रयत्न करून श्रीमन्त महाराज बाबासाहेब यांची भेट घेऊन श्रीदेवस्थापनेची आज्ञा निखालस घेतली. वे. शा. सं. रा. रा. बाळशास्त्री बावा आदिकरून सर्वशास्त्रीमण्डळ बोलावून निखालसपणें महाराजांनीं कृपाळू होऊन ताकीद केली कीं, बहुत दिवस जाहले ब्राह्मण हैराण होतात; त्यास यांचा देव यांचे स्वाधीन बिन्‌दिकतपणें संशय कांहीं न धरितां स्वाधीन करावा; आणि यांचे ज्ञातीचे ब्राह्मणांचे हातून स्थापना करवावी. त्यावेळीं सर्वांनीं मान्य करून बेदिकत्पणें ताकीद जाहली. हें वर्तमान सर्वांस कळवावें. आह्मीं सर्वमण्डळी व सरकारचे कारकून व शास्त्रीबावांकडील कारकून व रामचन्द्र दीक्षितबावांकडील कारकून व सरकारचा जासूद व शिपाई याप्रमाणें अष्टमी किंवा दशमीस निघोन वसईस येणार; त्यास यावेळीं वे. हरजोशी बावा व रा सदाशिव पाटील जोशी या

उभयतांवर सर्वज्ञातीनें सादर होऊन ज्ञातीचें कार्य पार पाडावें, व ऐवजाच्या कराराप्रमाणें तयारींत असावें, फाल्गुन शुद्धांत श्रीदेवाची स्थापना करावी. याप्रमाणें येथें नेम ठरून निघावयाचे तर्दुदींत आहेंत. त्यास या वेळेस ऐवजाची व वैदिकब्राह्मणांची तयारी करून ठेवावी. तूर्त हें वर्तमान अन्यत्र ज्ञातीस (चित्पावनांस वगैरे ) कळवूं नये. गडी मुजरत् पांच रुपये देऊन पाठविला आहे, पांचवे किंवा साहवे दिवशीं गडी येथें आला पाहिजे, मुम्बईसहि मुजरत् गडी याच करारानें करून पाठविला आहे. बहुत काय लिहिणें निरन्तर लोभ कीजे, हेविनन्ति.

---

परिशिष्ट (ड*).

## शिरगांव येथील श्रीसिद्धेश्वराच्या लिङ्गाची पुनः स्थापना इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांनींच करावी एतद्विषयीं पुण्यांतील पण्डितांनीं श्रीमन्त पेशव्यांस सादर केलेलें संमतिपत्र.

शके १७३७ (इ. स. १८१५).

श्री.

यादी पळशेब्राह्मण यजुर्वेदी पळशीकर व मुम्बईकर व माहीमकर व वसईकर वगैरे यांणीं मौजे शिरगांव, प्रां माहीम येथें सिद्धेश्वर देव याची लिङ्गस्थापना पञ्चायतनसुद्धां केली होती, त्या देवाची पूजा ( ऊर्जा ) उभय ब्राह्मणसुद्धां सात-आठ वर्षे करीत असतां, पळशेब्राह्मण यांस देवप्रतिष्ठा करण्याचा अधिकार नाहीं, असें वसईकर ब्राह्मण यांहीं ह्मणून सदहू देवाची लिङ्गस्थापना पञ्चायतनसुद्धां खणून आणविली, त्यावरून उभयतांचा कज्या लागोन हुजूर सरकारांत न्यायाधीशाकडे आले. त्यांचे कागदपत्र व सड, साक्ष, भोगवटा, तींहीं क्रमेंकरून शिष्टमतें विचार

---

* हें संमतिपत्र मोडी लिपींत असून तें, वे० रा० रा० गोविन्द विनायक जोशी पुरन्दरे निफाडकर हल्लीं वस्ती वसई ह्यांजपाशीं आहे.

करितां पळशेब्राह्मण यांचा व इतर* (वसईकर) ब्राह्मण यांचा पङ्क्ति-

---

* इतर '(वसईकर) ब्राह्मण यांचा पङ्क्तिव्यवहार मात्र नाहीं,' ह्या लेखावरून वरील पण्डितांनीं असें दर्शित केलें कीं, जर पङ्क्तिव्यवहार नाहीं तर, शरीरसम्बन्ध कोठून होणार! वे. रा. रा. तुकम्भट्ट धर्मभट्ट अग्निहोत्री जावळे उपनांव पळशीकर ह्यांचा खटला व कन्यापरिणयाविषयीं गाऱ्हाणें छत्रपति शाहूमहाराज ह्यांच्या कानीं गेल्यादिवसापासून कोंकणस्थांनीं इकडील प्राचीन वाजसनेय ब्राह्मणांबरोबर बाह्यात्कारें गोडगोड बोलून अन्तर्यामीं कपट धरून ह्यांचा जितका उपमर्द होईल, तितका करण्याचा प्रयत्न केला व हल्लींहि तो क्रम त्यांनीं सोडिला आहे असें दिसत नाहीं; कारण कीं, ह्या 'पळशीकर:' शब्दानें 'कावळे', 'शिङ्गणे,' 'पुरन्दरे', 'वैद्य', 'पञ्चानन', 'धर्माधिकारी', 'क्षीरसागर' वगैरे उपनांवांचे, अनुक्रमें पैठण, नेवासें, पुणताम्बें, सांवखेड, नगरहवेली, पिम्पळगांव, राहुरी इत्यादिगांवचे सदर्हू यजुर्वेदीब्राह्मण मूळचे राहणारे असतां, त्यांस त्यांच्या गांवावरून नामाभिधान न देतां किंवा, यजुर्वेदी असें स्पष्ट न लिहितां, कांहीं दिवस पळशीकर व पुढें थोडक्याच काळांत पळशे हें नांव सर्व ज्ञातीस लावून देण्याचा सपाटा चालविला. आतां, ह्या प्रत्येक गांवांचें एकमेकाशीं महदन्तर असतांहि त्यांस त्यांच्या गांवांच्या नात्यानें ओळखण्याचें सोडून देऊन जणूंकाय ही नवीनच एक ज्ञात आहे, असा जगतास भास करून देण्यास ते राज्यबळमदानें प्रवृत्त झाले, हें उघड आहे.

शके १६६८ पासून मशारनिल्हे तुकम्भट्टजींचा खटला उपस्थित करून ह्या संमतिपत्राच्या मितीपर्यन्त वरील पण्डितांनीं पङ्क्तिव्यवहाराव्यतिरिक्त ह्या यजुर्वेद्यांचें ब्राह्मणत्व कबूल केलें, परन्तु ह्यांच्या ब्राह्मणत्वास यत्किञ्चितहि वैगुण्य प्रदर्शित केलें आहे असें दिसत नाहीं, ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, कोंकणस्थांच्या आश्रयानें दुसरे जे यजुर्वेदी इकडील यजुर्वेद्यांबरोबर अन्नव्यवहारादि सम्बन्ध ठेवणारे ह्यांच्या अन्तःकरणांत कांहीं ना कांहींतरी किल्बिष घुसडून देण्याच्या इराद्यानें 'इतर (वसईकर)' ब्राह्मण यांचा पङ्क्तिव्यवहार मात्र नाहीं, हें वाक्य घुसडून दिलें; ह्मणून अर्थात् ह्या पण्डितांस ह्या पळशीकरांबद्दल लिहिण्यासारखा कांहींच दोष आढळला नाहीं, अथवा ही एक जात आहे असेंहि ग्रन्थाधारावरून त्यांस सिद्ध करितां आलें नाहीं; नाहीं तर त्यांनीं ह्या पळशीकरांवर शिखासूत्र देखील काढून टाकविण्याची पाळी आणिली असती, परन्तु सत्यापुढें मशारनिल्हे पण्डितांचा उपाय थकला; तरीहि ह्या पळशीकरांचें ब्राह्मणत्व अनादिसिद्ध कायम आहे तें आहेच. ते पण्डित मात्र नष्ट झाले. हें खरें आहे कीं, पङ्क्तिव्यवहाराविषयीं मात्र कांक्षा जाणून बुजून ह्या पण्डितांनीं लिहिली, वरकड कोंकणस्थ (चित्पावन) व त्यांचे अनुयायी (कऱ्हाडे, किरवन्त, देवरुखे, जावळ इत्यादि) आणि ह्यांचे आश्रयानें राहणारे इतर ब्राह्मण ह्या परस्परांचा पङ्क्तिव्यवहार कधीं होत होता? हें वरील पण्डितांनीं कसें लक्षांत धरिलें नाहीं? एतावता इकडील यजुर्वेदी पळशीकरब्राह्मण आणि त्यांजकडेस भोजनकरणारे परमामस्थ देशस्थब्राह्मण ह्या परस्परांचा पङ्क्तिव्यवहार होता (व अद्यूनहि आहे) हें ह्या पंडितांस कसें कळलें नाहीं? ह्याचा विचार समस्त यजुर्वेद्यांनींच करावा ह्मणजे, ह्या पण्डितांनीं किञ्चित्

व्यवहार मात्र नाहीं, परन्तु कार्यप्रयोजनांत गन्धाक्षतविडादक्षिणा व परस्परें नमस्कार करणें, याप्रमाणें इतर ब्राह्मणांची व यांची वहिवाट चालत आहे व पळशेब्राह्मण यजुर्वेदान्तर्गत वाजसनेय शाखाध्ययनेंकरून श्रौतस्मार्तकर्मानुष्ठानें त्यांचे शाखेवरून करीत आहेत व यांणीं जागजागीं देवप्रतिष्ठा केल्या आहेत, त्या देवांचें उत्पाटन कोणीं केलें नाहीं, सदर्हू विषयांची कागदोपत्रीं वहिवाट दिसण्यांत येते, तथापि येविषयींचे निर्णयास पण्डितांची सभा होऊन हे ब्राह्मण, त्यापक्षीं यांस देवप्रतिष्ठा करण्याचा अधिकार नाहीं, हें ह्मणणें प्रशस्त नाहीं, असें असतां पळशेब्राह्मण यांणीं लिङ्गस्थापना केली; त्या देवाची पूजा (ऊर्जा) सर्व करित असतां त्याचें उत्पाटन केलें हा अमार्गे अनाचार केला. यास्तव पळशे यांणीं पूर्ववत् सदर्हू देवालयांत लिङ्गस्थापना पञ्चायतनसुद्धां करावी, याप्रमाणें निर्णयांत आलें.† येविषयीं संमतें करावयाचीं. छ ११ रबिलाखर, सुरूसन सीत अशर मयातैन व अलफ.

---

अन्याय केला आहे हें त्यांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. तशांत हे (संमतिपत्रकर्ते) पण्डित बहुतेक चित्पावन होते, ह्यामुळें त्यांचा आणि ह्या वाजसनेयांचा पङ्क्तिव्यवहार नव्हता हें खरें आहे. हे वाजसनेय आपल्या चित्पावन यजमानांच्या घरीं जातात, तेव्हां शिधा घेऊन त्यांजकडेस स्वतः स्वयंपाक करून जेवतात, परन्तु त्या चित्पावन यजमानांच्या हातचें जेवीत नाहींत. ह्याविषयीं पाहिजे असल्यास आगाशी, येथील 'रिसबूड,' 'फडके,' व फडनीस; केळवेंमाहीम येथील दांडेकर प्रभृति चित्पावनच खातरी करून देतील. ह्यांच्या घरीं ह्या यजुर्वेद्यांस प्रतिवर्षी ब्राह्मणभोजन घालण्याचा बहुत दिवसांपासून साम्प्रदाय आहे. दुसरें, ह्या प्रान्ताचे राहणारे सर्व चित्पावन वगैरेंस पक्कें ठाऊक आहे कीं, इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांचा व महाराष्ट्र देशस्थ ब्राह्मणांचा पङ्क्तिव्यवहार प्रत्यक्ष होत आहे. आणि तोहि ते उघड डोळ्यांनीं पहातात, ह्यावरून वरील पण्डितांनीं ह्या संमतिपत्रांत कशी डोळेझांक केली, हें सहज लक्षांत येईल.

† ह्या रीतीचा अनाचार इकडील पळशीकरयजुर्वेद्यांच्या हातून घडला असता तर, ह्याच सभेंतील पण्डितबुवांनीं श्रीमन्त पेशव्यांस कोणत्या रीतीनें समज देऊन संमतिपत्र दिलें असतें व ज्यांनीं हा लिङ्गोत्पाटनाचा अनाचार केला त्यांसहि श्रीमन्त पेशव्यांकडून कांहीं शासन करविलें काय? तर नाहीं. कारण कीं, ते कोंकणस्थ! तेव्हां ह्याचा विचार वाचकांनींच करावा ह्मणजे ह्या खटल्यांत पण्डितादिकांच्या न्यायीपणाविषयीं त्यांची खातरी होईल.

**अत्रार्थे संमतयः**

बाळशास्त्री दीक्षित.
त्र्यम्बकशास्त्री रायदुर्गकर.
अम्बारामशास्त्री. (मोडींत सही.)
बाळापाठक.
परशुरामशास्त्री.
सिद्धेश्वरशास्त्री. (मोडींत सही.)
महादेवशास्त्री साठे.
बाळजोशी व्यवहारे.

रामचन्द्र दीक्षित ओक.
नीलकण्ठशास्त्री थत्ते. (मोडींत सही.)
दामोदरशास्त्री.
सूर्यनारायणशास्त्री.
बाळम्भट्टजोशी धुमकर.
राघवाचार्य.

**बाजीराव रघुनाथ प्रधान.**

**अस्सल बा नक्कल.**

ही नक्कल ता॥ ६ माहे सप्तम्बर सन १८५९ रोजीं लिहिली, हस्तें विनायक सदाशिव उमेदवार कारकून, अस्सल नकलेप्रों रुजू पाहणार राघो बाळाजी अमृते दप्तरदार.

ही नक्कल अर्जदार विनायक आबाजोशी, तालुके वसई यांचा अर्ज मुनसीफ यांजकडेस नम्बर ४९ चा केल्यावर हुकूम कोर्ट-मुनसीफ मजकूर यांचा रपोट आला त्यांत मेहेरबान असिस्टण्ट जज्य साहेब यांचा हुकूम ता॥ १ माहे सप्तम्बर सन १८५९ चा झाल्यावरून वसईकोर्टाचा मुकदमा नम्बर ८६ सन १८५९ यांत दाखल होण्याकरितां त्यांजकडे पाठविली आहे. ता॥ ९ माहे सप्तम्बर सन १८५९.

राघोबा बाळाजी अमृते दप्तरदार.

१२३४

आज्ञापत्र.

८५

## परिशिष्ट (ढ*).

## शिरगांव येथील श्रीसिद्धेश्वराचे लिङ्गाची पुनः स्थापना इकडील प्राचीन वाजसनेय ब्राह्मणांनींच करावी आणि त्यांस कोणीहि अडथळा करूनये एतद्विषयीं श्रीमन्त पेशव्यांनीं कोंकणस्थांस दिलेलें आज्ञापत्र.

### शके १७३७ (इ. स. १८१५.)

श्री.
राजाशाहू
नृपतिहर्षनिधान
बाजीराव रघुनाथ
मुख्य प्रधान.

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरन्धर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बाजीराव रघुनाथ प्रधान ता समस्त रयान प्रान्त वसई व मुम्बई व साष्टी व भिवण्डी व कल्याण व अष्टागर तहद् बालदा-पारडी सुा सीत अशर मयातैन व अलफ (शके १७३७) मौजे शिरगांव, पो माहीम, प्रान्त वसई येथें यादोबा नाईक पळशे मुम्बई-माहीमकर यांणीं शिवालय बान्धिलें, त्या देवालयांत सिद्धेश्वर देव याची लिङ्गस्थापना पञ्चायतनसुद्धां केली असतां पळशे अब्राह्मण, यांस देवप्रतिष्ठा करण्याचा अधिकार नाहीं, असें यज्ञेश्वर दीक्षित मराठे प्रमुख ब्राह्मण वसईकर यांणीं ह्मणोन सदर्हू लिङ्ग पञ्चायतन-सुद्धां खणून आणिलें. येविषयीं गम्बा नाईक जात्रळे व गोविन्द जोशी पळशीकर व हरभट्ट वैद्य प्रमुख समस्त पळशेब्राह्मण वृत्त्यंशी मुम्बईकर व वसईकर व भिवण्डीकर यांचा व यज्ञेश्वर दीक्षित प्रमुख ब्राह्मण वसईकर यांचा कज्या लागोन मनसुबी हुजूर सरकारांत पडली, त्याजवरून उभयतांनीं करणे कबजे देऊन पुरसिसांचीं उत्तरें लिहून दिलीं; त्यास पळशेब्राह्मण यांचे लिहिण्यांतील हंशीलः- आह्मीं

---

* हें आज्ञापत्र मोडी लिपींत असून तें, वे० रा० रा० गोविन्द विनायक जोशी पुरन्दरे निफाडकर हल्लीं वस्ती वसई ह्यांजकडेस आहे.

यजुर्वेदीब्राह्मण वाजसनी, आमचें ज्योतिष, उपाध्येपण व धर्माधिकारणाची वृत्ति अहद पारनेरा तहद् अष्टागर पर्यन्त अद्यापि चालत आहे. आह्मीं यजुर्वेद ह्मणतों व श्रौतस्मार्त अग्निहोत्रादि सर्व ब्राह्मणकर्म वाजसनेयशाखेनें चालवीत आलों व देवप्रतिष्ठा करीत आहों, ह्मणून तपशीलवार मजकूर लिहून देऊन साधनाचे कागदपत्र दाखविले व यज्ञेश्वर दीक्षित प्रमुख ब्राह्मण यांचे लिहिण्यांतील हंशील मजकूर कीं:- आमचे प्रान्तीं पळशे ह्मणून कोणी ज्ञात आहे. ते अब्राह्मण, त्यांजला देवप्रतिष्ठा करण्याचा अधिकार नाहीं; याजकरितां त्यांणीं मौजे शिरगांव येथें श्रीसिद्धेश्वर देव याचे लिङ्गाची पञ्चायतनसुद्धां स्थापना केली होती ती काढून आणिली, ह्मणोन तपशीलवार मजकूर लिहून दिल्हा; त्यास पळशे यांस तुह्मीं अब्राह्मण ह्मणतां येविषयींचे साधनाचे कागदपत्र तुह्मांजवळ असल्यास आणून दाखवावे. पळशे यांचे घरीं वेदोक्तमन्त्रेंकरून तुह्मीं आशीर्वाद ह्मणतां व पळशे यांस तुह्मीं 'नमस्कार' करितां व 'वेदशास्त्र' 'वेदमूर्ति' ह्मणोन पत्रीं लिहितां. पळशे यांणीं देवस्थापना केल्या आहेत, त्या देवांची पूजा, दर्शनें तुह्मीं करितां व कागदोपत्रीं सड, साक्ष, भोगवटद्यानिशीं हे ब्राह्मण, यांस यजनादि अधिकार आहेत असें ठरल्यास याचें उत्तर लिहून देणें ह्मणोन वसईकर ब्राह्मण यांस पुरसीस केली असतां, त्यांणीं दस्तऐवजीं साधनाचे कागदपत्र दाखविले नाहींत व उत्तरहि लिहून दिलें नाहीं; तेव्हां याजवरून वसईकर यांचे पुरवणीचा अर्थ समजण्यांत आला. पळशे ज्या प्रान्तीं राहतात, तेथें पळशे यांची ब्राह्मण्याची वहिवाट पूर्वापार कशी चालत आली, येविषयीं तद्देशीय वगैरे वहिवाट मुम्बईकरब्राह्मण व सूर्यसोमवंशीपरभू पाठारे व शिम्पी वगैरे पळशे यांचे यजमान नाहींत त्यांच्या सह्या सरकारांत लिहून घेतल्या; त्या सदर्हू कागदपत्रांवरून मनास आणितां पळशेब्राह्मण यजुर्वेदी, ज्योतिषादिवृत्ति देवप्रतिष्ठा वगैरे सर्व ब्राह्मणकर्में यांची वहिवाट शतादिवर्षें पूर्वापार परम्परागत चालवीत आले. पळशे यांणीं देवस्थापना मुम्बई वगैरे येथें केल्या आहेत ह्मणून यज्ञेश्वर दीक्षित प्रमुख-

ब्राह्मण ह्मणतात, तशीं आणखींहि जागजागीं पळशे यांणीं देवालयें बान्धोन श्रीच्या स्थापना केल्या आहेत, त्या देवांचीं उत्पाटनें कोणीं केलीं नाहींत; हें यज्ञेश्वर दीक्षित मराठे प्रमुखब्राह्मण वसईकर यांस ठाऊक असतां, उगाच दुराग्रह करून पळशे यांस देवप्रतिष्ठा करण्याचा अधिकार नाहीं, हे अब्राह्मण असें ह्मणोन पळशे यांचे देवाचें उत्पाटन केलें, हा अमार्ग केला असें स्पष्ट दिसण्यांत आलें. याजकरितां, मौजे शिरगांव पो माहीम प्रान्त वसई येथें पळशे-ब्राह्मण यांणीं देवालय बान्धिलें, त्यांत पळशे यांणीं श्रीसिद्धेश्वर-देवाचे लिङ्गाची पञ्चायतनसुद्धां पूर्ववत्प्रमाणें (पळशेब्राह्मण यांस वसईकरब्राह्मण यांणीं अडथळा न करितां) देवस्थापना करून श्रीची प्रतिष्ठा करावी. याप्रमाणें पळशेब्राह्मण (खरे आहेत. असें) वसईकर ब्राह्मण यांचे लिहिण्यावरून व कागदपत्रांवरून व सड-साक्षभोगवटयावरून शिष्टादि पञ्चानुमतें ठरलें. त्यावरून (त्या अन्वयें) पळशे यांचे नांवें आलाहिदा पत्र देऊन हें पत्र तुह्मांस सादर केलें असे; तरी पळशेब्राह्मण हे पूर्वापार आपली वृत्ति, देवस्थापना, (व) ब्रह्मकर्माची वहिवाट चालवीत आले असतील त्या-प्रमाणें चालवीत जातील. तुमचे वडिलांवडिल व तुह्मीं ज्याप्रमाणें उपाध्यिकपणा (पळशेब्राह्मणांस) देत आलां त्याअन्वयें सुखरूप चालवीत जाणें. जाणिजे छ ७ जा आज्ञाप्रमाण.—

अस्सल बा नक्कल.

ही नक्कल ता ६ माहे सप्तम्बर सन १८५९ रोजीं लिहिली. हस्तें विनायक सदाशिव उमेदवार कारकून. अस्सल नकलेप्रों रुजू पहाणार राघो बाळाजी अमृते दप्तरदार.

ही नक्कल अर्जदार विनायक आबाजोशी तालुके वसई यांचा अर्ज मुनसीफ यांजकडेस नम्बर ४९ चा केल्यावर. हुकूम कोर्ट मुनसीफ मजकूर यांचा रपोट आला त्यांत मेहेरबान असिस्टण्ट जज्य साहेब यांचा हुकूम ता १ माहे सप्तम्बर सन १८५९ चा

झाल्यावरून वसईकोर्टाचा मुकदमा नम्बर ८६ सन १८५९ यांत दाखल होण्याकरितां त्यांजकडे पाठविली आहे. ता ९ माहे सप्टम्बर सन १८५९.

(सही) राघोबा बाळाजी अमृते दप्तरदार.

१२३४.
आज्ञापत्र.
८५.

---

## परिशिष्ट (ण*).

## शिरगांव येथील श्रीसिद्धेश्वराचे लिङ्गाची पुनःस्थापना निर्बाध इकडील प्राचीन वाजसनेय ब्राह्मणांनींच करावी ह्मणून श्रीमन्त पेशव्यांनीं त्यांस दिलेलें अभयपत्र. शके १७३७ (इ. स. १८१५)

शिक्का. वरील कोंकणस्थांच्या आज्ञापत्राप्रमाणें.

दुसरें अपील नम्बर २४८।८२.

श्री.

वेदमूर्ति राजश्री गम्बा नाईक जावळे व गोविन्द नाईक जोशी (पळशीकर) व हरभट्ट वैद्य प्रमुख समस्त पळशेब्राह्मण वृत्त्यंशी मुम्बईकर व वसईकर व भिवण्डीकर गोंसावी यांसीं——

सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार. सुहा सीत अशर मयातैन व अलफ (शके १७३७) मौजे शिरगांव, पो माहीम, प्रान्त वसई येथें यादोबा नाईक पळशे मुम्बई माहीमकर यांणीं शिवालय बान्धिलें, त्या देवालयांत श्रीसिद्धेश्वर लिङ्गाची स्थापना पञ्चायतनसुद्धां केली असतां, तुह्मीं अब्राह्मण, देवप्रतिष्ठा करण्यास अधिकार नाहीं, असें यज्ञेश्वर दीक्षित मराठे प्रमुख ब्राह्मण वसईकर यांणीं ह्मणोन शिवलिङ्गाचें उत्पाटन करून आणिलें. यास्तव मराठे वगैरे ब्राह्मणांचा व तुमचा कज्या लागोन हुजूर सरकारांत येऊन न्यायाधी-

---

* हें अभयपत्र मोडी लिपींत असून तें, वे. रा. रा. नारायण विठ्ठल वैद्य पुरन्दरे पुणताम्बेकर हल्लीं वस्ती मुम्बई ह्यांजपाशीं आहे.

शाकडे मनसुबी सोंपली. तेथें मनास आणितां तुह्मीं वृत्त्यंशी पेशजी-पासोन वृत्ति अनुभवीत आलां, ब्राह्मण तुम्हांस विडादक्षिणा देतात व तुह्मीं ब्राह्मणांस देतां व तुह्मीं जागजागां देवालयें बान्धोन श्रीची स्थापना करीत आलां. याची चौकशी करितां पूर्वी बिम्बराजे यांणीं वतनें तुम्हांस दान देऊन शिलालेख करून ठेविले ते व सड, साक्ष, भोगवटा व वसईकर ब्राह्मण तुम्हांस कागदोपत्रीं 'वेदमूर्ति' म्हणोन नमस्कार लिहितात. याप्रमाणेंच कैलासवासी चिमणाजी बल्लाळ व भाऊ साहेब यांचे पत्रीं 'नमस्कार' लिहिण्यांत व ग्रन्थान्तरींचा आशय पाहतां, तेथेंहि पळशेज्ञाति भिन्न आहे असें लागत नाहीं. सदहू अन्वयें ब्राह्मणकर्माची पुरवणी दिसण्यांत (येते) तेपक्षीं तुह्मीं वृत्त्यंशी ब्राह्मण, देवस्थापना वगैरे करण्यास अधिकार, असें ठरोन आलाहिदा तुह्मांस न्यायाधीशाकडील पत्रें करून दिलीं आहेत, त्याप्रमाणें तुह्मीं आपल्या वृत्तीचा अनुभव देवस्थापना, पूजा, अर्चा, यजनयाजनादिकर्मैं आचरीत आल्याप्रमाणें करून ज्योतिषादि वगैरे वृत्तीचा उपभोग घेत आहां त्याप्रमाणें वृत्ति अनुभवीत जाणें. वसईकर वगैरे ब्राह्मण यांणीं तुमचे स्थापनेविषयीं वगैरे कर्मास उपसर्ग करण्याचें प्रयोजन नाहीं, जाणून त्यांस ताकीद केली जाईल. जाणिजे छ ७ जमादिलाखर आज्ञा प्रमाण.

मोर्त्तबसुद.

ही सनद वादीकडोन नम्बर २४६ सन १८७३ चे कज्यांत ·दिल्हीं. ता। ७ जुलई सन १८७६.

वतीनें दामोदर कृष्ण गुप्ते कोर्टांत दिल्ही. ता। २६ ज्यानेवारी १८७८.

(सही) वतीनें गोविन्द (लागत नाहीं)

नम्बर २४६
सन १८७३.

या सनदेचा वरचा भाग व त्रिक-ठिकाणीं कसर लागली आहे.

लक्षुमण गोविन्द—वादी.
बाळाजी विश्वनाथ—प्रावादी.
सनद वादी कडून निा ६३
दाखल ताा ७ जुलै १८७६.
सही इंग्रेजी लागत नाहीं.
स. से. जज्य.

मुाा नम्बर ३८६ सन १८ अक्षरें गेलीं आहेत.
यांत वादीचे वकीलानें दाखल केलें ताा २६ नवम्बर सन १८
( सही ) लक्षुमण गोविन्द जोशी पुरन्दरे सही.

हें अस्सल परत मिळावें ह्मणोन लक्ष्मण गोविन्द जोशी यांणीं अर्ज केल्यावरून याची नक्कल कज्यांत ठेवून हें अस्सल, अर्जदार यास परत दिल्हें असे. ताा १० नवम्बर सन १८७७ इाा.

(सही) बाळकृष्ण शिवराम दप्तरदार.

नम्बर ३८६ सन १८७६.

आनन्दराव भिकाजी व दुसरे......वादी.
शङ्कर दाजीबा व दुसरे......प्रावादी.
दावा रुाा १००.
सनद प्राा वादीकडून निा ९३
दाखल ताा २६ ज्यानेवारी १८७८. सही इंग्रेजी.
फि ८६ से. स. जज्य

ही नक्कल तयार करणार नारो महादेव फीकारकून लिहिली ताा १६।८.


दस्ताऐवज ठिकठिकाणीं फाटलेला असून कांहीं अक्षरें अस्पष्ट आहेत सबब अस्सल बहुकूम रुजू पाहिली. ताा १६।८।८३.

आबा बळवन्त राजे कारकून.

बाळकृष्ण अ. मोहनी असि. शिरस्तेदार यांची सही.

16th *September* 1883. ( True copy.)

( Signed ) K. C. BEDARKAR,
Deputy Registrar.




( Signed ) K. C. BEDARKAR,
Sealer.

नक्कल देण्याचा हुकूम ता १३ आगष्ट १८८३.
नक्कल तयार तारीख १६ आगष्ट १८८३.

अर्जदार परशुराम पाण्डुरङ्ग जोशी यांणीं ही नक्कल मिळणें-विशीं केलेला अर्ज कबूल झाल्यावरून नकलेची फी ⁄ ६ सहा आणे घेऊन ही नक्कल अर्जदार यास दिली. तारीख २१ आगष्ट १८८३.

बाबूराव विट्ठल कारकून.

बाळकृष्ण आनन्दराव मोहोनी असि० सिरस्तेदार.

---

परिशिष्ट. (त*).

शिरगांव येथील श्रीसिद्धेश्वरास दिलेलें इनाम.

शके १७५७. (इ० स० १८३५.)

श्री गजानन. नम्बर १२०

राजश्री बापूजी रघुनाथ कमाविसदार सज्या
शिरगांव परगणे माहिम गोंसावी यासीं

सुरुसन सीत सलसीन मयातैन व अलफ जमिनदार परगणे मजकूर यांणीं सुभा बाजीपुरां येऊन विनन्ति केली कीं, श्रीसिद्धेश्वराचें देवालय मौजे मजकुरीं बहुत काळीं आहे, सरकारची नेमणूक नाहीं, याजमुळें पूजा यथास्थित होत नाहीं; याजकरितां कांहीं नेमणूक करून दिली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून मनास आणितां देवास नेमणूक नाहीं, यास्तव पूजा होत नाहीं, हें जाणोन मौजे मजकुरापैकीं जमीन पडितखेरीज रकमीं नवसाध्य बन्दिस्त करून देवास पूजा-साहित्य व पुजारी यास जमीन रकम बत्तिशी मुडा १ येकूण सव्वामुडा जमीन दिल्ही असे. तरी सदर्हू जमिनीचा आकार जमावन्दीस धरून देवाकडे दरसाल खर्च लिहीत जाणें. जाणिजे चन्द्र २९ जमादिलावल पा. हुजूर.

---

* हा अस्सल कागद, वे. रा. रा. गङ्गाधर विठ्ठल मोगरे यांजकडेस आहे.

हुकूम.

पाहाणीखर्डा श्रीसिद्धेश्वरमहादेव यास जमीन सव्वामुद्याची नवकोर्द मोजून देण्याविषयीं तारीख २९ जून सन १८३५ चा हुकूम सादर जाहल्यावरून वेताळडोङ्गरीजवळ जमीन मोजून दिल्ही ती सुरुसन सीत सलासीन मयातैन व अलफ सन १८३५-३६ तारीख ११ माहे सप्टम्बर सन १८३५.

चतुःसीमा :—

१ पूर्वेस हद्द रान्जणीचें झाड.
१ दक्षिणेस वेताळडोङ्गरी.
१ पश्चिमेस शेत नान्दवभाग-शेत.
१ उत्तरेस मानट पलीकडे खार आलजी.

याशीं जमीन मोजणी :—

| | | | |
|---|---|---|---|
| ॥ | २ प्रत मोजणी | १२ | २० |
| १ | प्रत मोजणी | ४० | १० |
| ।॥ | प्रत मोजणी | २० | १५ |
| ॥२८४ | प्रत मोजणी | २२ | १२ |
| ॥२॥।१ | प्रत मोजणी | १६ | १६ |
| २। | १ प्रत मोजणी | २६ | २० |
| ५ | | | |

एकूण दर खण्डीस जमीन एक बिघा प्रमाणें मुडा १।.

त्रिम्बक आपाजी केतकर, तलाठी सज्या शिरगांव.
बापूजी रघुनाथ पाटील मौजे मजकूर, वती बळवन्तराव बापूजी पाटील.

## परिशिष्ट (थ*).

## श्रीनिर्मळेश्वर येथील अन्नसत्राचें काम वे० रा० रा० बापू माधव भट्ट जोशी पुरन्दरे ह्यांकडे होतें त्याविषयींचा दस्तऐवज.

## शके १७४२ (इ. स. १८२०)

साहेबाचे खिजमतीस प्रभू सूर्यवंशी क्षत्री मुक्काम मुम्बई येथील अर्ज करितों ऐसाजे वो राा यजुर्वेदीब्राह्मण वृत्त्यंशी अष्टाधिकारी मुक्काम मुम्बई व वसई प्रान्तस्थ वतनदार यांजकडेस हल्लीं वो राा बापू माधव भट्ट जोशी पुरन्दरे यांस श्रीनिर्मळेश्वरीं अन्नसत्राचा कारभार सरकारांतून साङ्गितला आहे; तरी फार उत्तम आहे; परन्तु वृत्त्यंशी यजुर्वेदी यांचा व वसईकर चित्पावन लोक यांचा बहुत दिवस (वृत्तीचा उपमर्द करावयाविषयीं) लढा आहे. हें पुर्तें जाणून यांचा हे द्वेष करितात, परन्तु हे (यजुर्वेदी) आमचे ब्राह्मण पूर्वींपासून उपाध्ये व अष्टाधिकारी, यास यांचे आह्मीं तीर्थ घेऊन पूजा करितों; यांजकडेस आम्हीं जेवितों, व आमचे वडील जेवीत आले; याप्रमाणें वर्तन आहे. मार्गशीर्ष शुद्ध १० शुक्रे तारीख १२ दिसेम्बर सन १८२०.

| सही इंग्रेजी. | सही इंग्रेजी. |
| --- | --- |
| रघुनन्द. | सदाशिव पाण्डुरङ्गजी. |
| मोरोबा रकमोजी कुवर. | ह्मादबा (ज) रघुनाथजी. |
| विश्वनाथ बाळाजी. | शङ्कर रामजी. |
| रघुनाथ. (?) | विश्वनाथ गङ्गाधरजी. |
| राघोबा काशिनाथ पी. | मोरोबा दामोदरजी. |

* हें अस्सल पत्र, वे. रा. रा. विठ्ठल नीलकण्ठ पुरन्दरे निफाडकर हल्लीं वस्ती आगाशी यांजवळ आहे.

## परिशिष्ट (द*).

## श्रीमच्छङ्कराचार्यांनीं इकडील प्राचीन वाजसनेयब्राह्मणांस वेळोवेळीं लिहिलेलीं पत्रें.

### शके १७४५ (इ० सन १८२३.)

| कर्नाटकी शिक्का. |
|---|

श्रीगुरु सीताराम जयतु.

वेदशास्त्रसम्पन्न राजमान्य राजश्री सकलब्रह्मवृन्द यजुर्वेदान्तर्गत वाजसनीमाध्यन्दिनीशाखाध्यायी वृत्त्यंशी वास्तव्य मुम्बई, माहीम, साष्टी, वसई प्रान्तस्थान् ब्राह्मणान्प्रति—

विशेष. श्रीची स्वारी शके १७४९ चैत्रमासीं आली होती, त्यासमयीं तुमचे द्वेषी कित्येक ब्राह्मणादिक ज्ञाती यांहीं अनन्वित आह्मांस समजावून आमचे नांवीं अजम अक्रम एल्फिन्स्टन् गव्हर्नर साहेब बहादूर यांस अर्जीपत्रें श्रीविमलनिर्मल संस्थान श्रीआचार्य समाधिस्थानीं अन्नसत्राचें काम तुमचे ब्राह्मणांकडेस आहे त्याविषयीं देवविलीं होतीं. नन्तर आम्हीं संस्थानीं येऊन तुमचे ब्राह्मण्याचा शोध करितां, प्राचीन कागदपत्र व श्रीत्र्यम्बकक्षेत्रस्थ व जनस्थानस्थ ब्राह्मण तुमचे स्वशाखीय यांचे साङ्गण्यावरून श्रीची निःसंशयता जाहली कीं, हे यजुर्वेदी देशस्थब्राह्मण; यांस (हे) कोंकणप्रान्तीं येऊन भूपप्रसन्नतानुग्रहेंकरून वृत्ति सम्पादन करून बहुत वर्षें राहिले. तदनन्तर कोंकणस्थचित्पावन यांचे ज्ञातीनें तुमच्या वृत्तिहरणार्थ इतर ज्ञाती यांस अनृत द्वेष समजावून विद्वेषता वाढवून पळशेब्राह्मण असे साङ्गों लागले, परन्तु तुमचें 'पळशे' असें नांव ज्ञातीस नाहीं व शास्त्रांतहि हें नांव नाहीं; द्वेषानें ह्मणतात आणि तुम्हीं अग्निहोत्रादि यज्ञानुष्ठानदेवप्रतिष्ठादिक षट्कर्म करीत

* हें अस्सल पत्र देवनगरी लिपींत असून तें, वे. रा. रा. गङ्गाधर विठ्ठल मोगरे पैठणकर हल्लीं वस्ती शिरगांव ह्यांजपाशीं आहे.

आलां व पुढेंहि करावींत आणि तुमच्या कोंकणस्थांचे समागमें अन्न-व्यवहार द्वेषामुळें नाहीं, हें आह्मांस पुरतेपणें समजोन आलें. तुमचा गरीबब्राह्मणांचा ते व्यर्थ द्रोह करितात, त्यांहीं न करावा; यास्तव हें पत्र तुह्मांस पाठविलें आहे, तें अजम साहेब यांस दाखवावें व अन्नसत्राचें काम चालल्याप्रमाणें चालवीत जावें.

---

## परिशिष्ट (ध*).

## वे. रा. रा. रघुनाथ कृष्ण जोशी भानू वगैरे यजुर्वेदीब्राह्मण ह्यांस श्रीमच्छङ्कराचार्य यांनीं पाठविलेलें पत्र.

### शके १७५३ ( इ० स० १८३१. )

श्री शङ्करो जयतु.

श्रृंगेरी
श्रीविरूपाक्ष
श्रीविद्याशङ्कर
भारती.

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्यपदवाक्यप्रमाणपारावारपारीण-यमनियमासनप्राणायामप्रत्याहारध्यानधारणासमाध्यष्टाङ्गयोगानुष्ठान-निष्ठतपश्चक्रवर्त्यनाद्यविच्छिन्नगुरुपरम्पराप्राप्तषड्दर्शनस्थापनाचार्यव्या-ख्यानसिंहासनाधीश्वरसकलवेदार्थप्रकाशकसांख्यत्रयीप्रतिपालकसक-लनिगमागमसारहृदयवैदिकमार्गप्रवर्तकसर्वतन्त्रस्वतन्त्रादिराजधानी-श्रीविद्यानगरमहाराजधानीकर्नाटकसिंहासनप्रतिष्ठापनाचार्यश्रीमद्राजा-धिराजगुरुभूमण्डलाचार्यतुङ्गभद्रातीरनिवासऋष्यशृङ्गपुरवराधीश्वरशृ-ङ्गेरीश्रीविरूपाक्षश्रीविद्याशङ्करदेवदिव्यश्रीपादपद्माराधकश्रीविद्याश-ङ्करभारतीकरकमलसञ्जातशृङ्गेरीश्रीविरूपाक्षश्रीनारसिंहभारतीस्वा-मिभिः—

---

* हें अस्सल पत्र देवनगरी लिपींत असून तें, वे० रा० रा० प्रभाकर विठ्ठल वकील जोशी पुरन्दरे निफाडकर हल्लीं वस्ती वसई ह्याजपाशीं आहे. तें वे. रा. रा. लक्ष्मण विठ्ठल वैद्य सांवखेडकर हल्लीं वस्ती वसई ह्यांनीं ग्रन्थकारास आणून दिलें.

श्रीमद्यजनादिषट्कर्मनिरत श्रीमदुमारमणचरणसेवाधुरीण दानधर्मपरोपकारदिगन्तप्रसिद्ध सकलतत्त्वावबोधक हरगुरुभक्तिपरायणतत्पर समस्तसद्गुणाभरणभूषित स्वामिकार्यधुरन्धर मुख्यसंस्थानाभिमानी नीतिकार्यसम्पन्नअस्मदाचार्यप्रेमप्रियशिष्य राजमान्य विवेकी राजपूज्य रघुनाथजोशी वैद्य व काशीनाथजोशी वैद्य व समस्त महाजन यजुर्वेदी वास्तव्य मुम्बई, इविषयीं प्रत्यक् ब्रह्मैक्यानुसन्धान यावस्थित्यावस्थित श्रीनारायणपूर्वकाशिषः विलसन्तुतरां. श्रीमद्भगवत्पादपूज्य श्रीमच्छङ्कराचार्यगुरुपीठपूजाविषयिणी भक्तिः भवजलतारणकारणमेव तत् इतोप्यधिकश्रेयवृद्धिङ्गतास्तव श्रीशारदाम्बाचन्द्रमौलेश्वरस्वामींची प्रार्थना करून फलमन्त्राक्षता पाठविल्या आहेत. स्वीकार कराव्या. श्रीमठाहोन अस्मदाचार्य मठशिष्यबालकृष्णाख्यविश्वरूपभारती स्वामी यांस मठाधिपत्याच्या अधिकारमुद्रा देऊन पाठविले आहेत. श्रीशारदाचन्द्रमौलेश्वरस्वामींची धूप, दीप, आराधनेनिमित्त विशेष सेवाद्रव्य पूजासामग्री अभिमानपूर्वक स्वहस्तें परहस्तें सानुकूल करून सन्मानित पाठवावें, ह्मणजे पूजाउपयोगी धर्मसंस्थानाविषयीं सम्पूर्ण साभिमानपुरःसर धर्मविचारणा करणार. बुद्धिशीलस्य विशेष लिहिणें काय? यतोप्यधिकश्रेयः. शके १७५३ माघवद्य १. इति नारायणस्मृतिः.

श्री विद्या शङ्कर.

---

## परिशिष्ट (न*).

### वे० रा० रा० बापूजी रघुनाथ पाटील मोगरे ह्यांस श्रीमच्छङ्कराचार्यांनीं पाठविलेलें पत्र.

### शके १७५७ (इ. स. १८३५.)

कर्नाटकी शिक्का.

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्यत्वादिसकलबिरुदावलीविराज-

---

* हें अस्सल पत्र देवनगरी लिपींत असून तें, वे० रा० रा० गङ्गाधर विठ्ठल मोगरे पैठणकर हल्लीं वस्ती शिरगांव ह्यांजवळ आहे.

मान श्रीकृष्णानन्दतीर्थस्वामी संस्थान श्रीशृङ्गेरी. मुळ बागिल (?)

अस्मदत्यन्त प्रियशिष्य बापूजी रघुनाथ पाटील ब्राह्मण यजुर्वेदी मुक्काम शिरगांव यांसीं नारायणस्मरणपूर्वकविरचिता आशिषः समुल्लसन्तुतराम् विशेषस्तु. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. सातपाटीचे वतीचे लोकांचे रुपये ३ तीन पावले. जोशी यांणीं त्यांचे घरीं कर्म चालविण्यास जात जावें. मुख्य शिष्येषु विशेष काय लिहिणें. इत्यलम्. मिती आषाढ शुा १२ मङ्गळवार शके १७५७ मन्मथनाम संवत्सरे.

सही कर्नाटकींत आहे.

---

## परिशिष्ट. (प*).

## वे० रा० रा० बाळ गोविन्द जोशी शिङ्गणे स्मार्त ह्यांस श्रीमच्छङ्कराचार्यांनीं दिलेलें पत्र.

### शके १७५८ (इ० स० १८३६)

श्री.
हा शिक्का
कानडी भाषेंत
आहे. लागत
नाहीं.

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्यपदवाक्यप्रमाणपारावारपारीणयमनियमासनप्राणायामप्रत्याहारध्यानधारणासमाध्यष्टाङ्गयोगानुष्ठाननिष्ठतपश्चक्रवर्त्यनाद्यविच्छिन्नगुरुपरम्पराप्राप्तषड्दर्शनस्थापनाचार्यव्याख्यानसिंहासनाधीश्वरसकलवेदार्थप्रकाशकसांख्यत्रयीप्रतिपालकसकलनिगमागमसारहृदयषण्मतस्थापनाचार्यसकलबिरुदावलीविराजमानश्रीच-

---

* हें अस्सल पत्र देवनगरी लिपींत असून तें, वे० रा० रा० लक्ष्मण बाबा भट पुरन्दरे निफाडकर हल्लीं वस्ती वसई ह्यांजवळ आहे.

कनगरोद्धारकर्तावैदिकमार्गप्रवर्तकसर्वतन्त्रस्वतन्त्रादिराजधानीश्रीवि-द्यानगरमहाराजधानीकर्नाटकसिंहासनचक्रवर्तिप्रतिष्ठापनाचार्यश्रीमद्रा-जाधिराजगुरुभूमण्डलाचार्यतुङ्गभद्रातीरनिवासऋष्यशृङ्गपुरवराधीश्व-रशृङ्गेरीश्रीविरूपाक्षश्रीविद्याशङ्करदेवदिव्यश्रीपादपद्माराधकश्रीनर-सिंहभारतीस्वामीगुरुकरकमलसञ्जातोद्भवशृङ्गेरीश्रीविरूपाक्षश्रीबाल-कृष्णाख्यविश्वरूपभारतीस्वामिभिः—

स्वस्तिश्री संवत् १८९२ तथा नृपशालिवाहनशके १७५८ दुर्मुखनाम संवत्सरे महामाङ्गल्यप्रदकार्तिकशुक्ल ५ भानुवासरे श्रीमत्प्रशस्तगीर्वाणगणजेगीयमान श्रीमद्यजनादिषट्कर्मनिरत श्रीमदुमारमणचरणसेवाधुरीण दानधर्मपरोपकारदिगन्तप्रसिद्ध सकल-तत्त्वावबोधकवैशेषिकतर्कव्याकरणादिषट्शास्त्रप्रसङ्गीकृत हरिगुरुभ-क्तिपरायणतत्पर सकलसद्गुणाभरणभूषितस्वामिकार्यधुरन्धर मुख्य-संस्थानाभिमानी नीतिकार्यसम्पन्न अस्मदाचार्यप्रेमप्रियशिष्य उत्तर कोंकण तालुके साष्टी मौजे मुडधें व पाखाड्या मोखे व राइ येथील ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्रादि अष्टादशजातीय गृहस्थेषु कृतविरचित श्रीनारायणस्मरणपूर्वकाशिषः विलसन्तुतराम् ॥ साम्प्रत श्रीमद्भगव-त्पादपूज्य श्रीमच्छङ्कराचार्यगुरुपीठआसेतुहिमाचलपर्यन्तप्रसिद्धपीठ-पूजाविषयिणीभक्तिः भवजलतारणकारणमेवमेतत् इतोप्यधिकश्रेयसां वृद्ध्यर्थं मौजे दहिंसर येथें स्वारी आली तेव्हां जोशी (व) उपाध्ये जातिवाले बोलावून चौकशी करून यांचे वंशपरम्परागत हाच वत-नदार जाणून श्रीमठाहून श्रीमुखआज्ञा सादर केली जाते जे यजुर्वेदान्तर्गत माध्यन्दिन शाखाध्यायी वत्सगोत्रोत्पन्न त्रिप्रवराध्यायी माधवज्योतिषी तत्पुत्र गोविन्दज्योतिषी तत्पौत्र बाळज्योतिषी उपनाम सामर्थकर (स्मार्त) वास्तव्य मौजे मजकूर यांणीं येऊन श्रीमठास अर्जी केली कीं आमचा वृद्धापकाळ आहे, पोटीं सन्तान नाहीं, त्यास सन्तति जाल्यास तो सदर्हू गांवची वहिवाट करील. सन्तति न जाल्यास आमचे भाचे दादा दामु जोशी वास्तव्य दहिंसर याजकडेस १ वहिवाट असावी. त्याजवरून आज्ञा सादर केलीजाते जे, सदर्हू

वतन याचे पुत्रपौत्र वंशपरम्परा चालवावयाकरितां अठरा जातीचे घरांत अष्टाचत्वारविंशति संस्कारांत ज्योतिषी उपाध्येपणाचें दान, दक्षिणा, मान हे जिवन्त आहेत तोंपारियन्त यांस सत्कार देत असावे. हे स्त्रीपुरुष उभयतां असल्यास दुसऱ्यास देऊं नये. या उभयतांचे मागें यांजला पुत्र असलीयास त्याजला द्यावे. पुत्र नसलीयास याचें भाचे दादा दामू ज्योतिषी वास्तव्य दहिंसर याजला ज्योतिषी उपाध्येपणाचे दानदक्षिणा, मान हे सत्कार देत असावे, यास सरकार अथवा मठस्थ कोणी अथवा ज्ञातिवाले ग्रामस्थ व दरखदार व रयत वगैरे याणें हरकत न करितां आचन्द्रार्कपर्यन्त भूयोभूयः पालनीयं भवाद्भिः ॥ स्वदत्ताद्द्विगुणं पुण्यं परदत्तानुपालनम् ॥ परदत्तापहारेण स्वदत्तं निष्फलं भवेत् ॥ इदं पत्रं शासनं सर्वेषां मान्यतरं भूयात् ॥ धर्मसंस्थापनायां सर्वेषु साभिमानपुरःसरेषु धर्मविचारणांकर्तृषुविशेषं किं लेखनं इतोप्याधिकश्रेयः इति नारायणस्मृतिः—

(शिक्का.) सही लागत नाहीं.

## परिशिष्ट (फ*).

### वे॰ रा॰ रा॰ पाण्डुरङ्ग हरी जोशी पुरन्दरे ह्यांस श्रीमच्छङ्कराचार्यांनीं पाठविलेलें पत्र.

### शके १७९१ (इ० स० १८६९)

(श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य ज्योतिर्मठाधीश्वर वेदकाचार्य नित्यानन्द सरस्वती.)

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यपदवाक्यप्रमाणपारावारपारीणयमनियमासनप्राणायामप्रत्याहारधारणाध्यानसमाध्यष्टाङ्गयोगाचरणनिरूपितचक्रवर्तित्वाद्यनाद्यनवच्छिन्न गुरुपरम्पराप्राप्तवैभवसकलनिगमागमसारावगताखिलवेदान्तानुभवाधिगतशुद्धान्तःकरणयुक्ताधिवृत्तम-

* हें अस्सल पत्र देवनागरी लिपींत असून तें, वे॰ रा॰ रा॰ परशुराम पाण्डुरङ्ग पुरन्दरे निफाडकर हल्लीं वस्ती आगाशी ह्यांजपाशीं आहे.

लस्यसान्तक्षेत्रवैदिकमार्गप्रवर्तकश्रीकैलासक्षेत्रस्थितसुवर्णहिरामणिमाणिक्यमौक्तिकविलसन्मण्डपसिंहासनाधिरूढश्रीविष्णुप्रयागतीरनिवाससर्वतन्त्रस्वतन्त्र श्रीगुरुचरणोपासनासञ्जातश्रीमन्महाराजाधिराजज्योतिर्मठाधीश्वरनित्यानन्दसरस्वती स्वामी मुक्काम कसबे आगाशी तालुके वसई येथें कसबे मजकुरीं श्रीभवानीशङ्कराचे देवालयांत.

परम शिष्यवर्गशिरोमणी वेदमूर्ति षट्शास्त्रज्ञ षट्कर्माधिकारी चतुर्वर्णस्य ज्योतिष्युपाध्येष्टाधिकारी ब्रह्मवृन्दवन्द्य राजमान्य राजश्री पाण्डुरङ्ग हरी जोशी पुरन्दरे आदिकरून वृत्त्यंशी वास्तव्य तालुके वसई येथील यांसीं आज्ञा कीं, मागें फिरङ्गी राज्यांत महाराष्ट्र लोकांपैकीं कितीएक शूद्रजातीचे लोकांस बलात्कारें बाटविलें; त्याजवर श्रीमन्त पेशव्यांचे राज्यांत त्या बाटविलेल्यांपैकीं पेशवे सरकारास शरण गेल्यावरून श्रीमन्तांहीं धर्मशास्त्रप्रमाणें प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून महाराष्ट्र धर्मांत आणिलें; आणि त्यांजकडे शुभाशुभकर्म चालविण्याची आज्ञा तुह्मांकडे केली. त्याप्रमाणें तुह्मीं अविच्छिन्न चालवितां, पुढें मेहेरबान इङ्ग्रज सरकार बहादूरचे राज्यांत राजहुकुमतीनें महाराष्ट्रधर्मांत लोक आले आहेत त्यांजकडे शुभाशुभकर्में चालवीत नाहीं ह्मणोन कळलें; त्याजवरून चौकशी करून तुमचे चतुर्वर्णाचे यजमानांची आह्मीं समजूत करून तुह्मांस कोणी हरकत न करी अशी आज्ञा केली आहे, आणि साहेबांचे राज्यांत महाराष्ट्रधर्मांत आलेले लोकांपैकीं तालुके वसई येथील रहाणारे व तालुके साष्टी येथील रायमुर्दे व खारी येथील लोकांपासून आह्मीं भिक्षा घेतली आहे, आणि त्यांस तीर्थप्रसाद देऊन पावन केले आहेत. त्यास आजपासून तुह्मीं श्रीमन्त सरकारानें शुद्ध केलेले लोकांकडे जशीं शुभाशुभकर्में चालवितां त्याप्रमाणें ह्या लोकांकडे चालवावीं असी आमची आज्ञा आहे. कळावें. मिती चैत्र कृष्ण १३ त्रयोदशी भृगुवासरे शके १७९१ शुक्लनाम संवत्सरे.

नित्यानन्द सरस्वती दस्तुर खुद.

## परिशिष्ट. (त्र*).

## वे. रा. रा. केशव† नारायण कीर्तने ऊर्फ केरूबुवा ह्यांस श्रीमच्छङ्कराचार्यांनीं दिलेली सनद.

### शके १७९१ (इ. स. १८६९)

श्रीशङ्करो जयति.

(ज्योतिर्मठाचा शिक्का.)

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्यपदवाक्यप्रमाणपारावारपारीण-यमनियमासनप्राणायामप्रत्याहारधारणाध्यानसमाध्यष्टाङ्गयोगाचरण-निरूपितचक्रवर्तित्वाद्यनाद्यनवच्छिन्नगुरुपरम्पराप्राप्तवैभवसकलनिग-मागमसमावगताखिलवेदान्तानुभवाधिगतशुद्धान्तःकरणयुक्तधीवृत्त मलस्त्रसान्तक्षेत्रवैदिकमार्गप्रवर्तकश्रीकैलासक्षेत्रस्थितसुवर्णहिरामणि-माणिक्यमौक्तिकविलसन्मण्डपसिंहासनादिरूढश्रीविष्णुप्रयागतीरनि-वाससर्वतन्त्रस्वतन्त्रश्रीगुरुचरणकमलोपासनासञ्ज्ञातश्रीमन्महाराजा-धिराजज्योतिर्मठाधीश्वरनित्यानन्दसरस्वतीस्वामी वास्तव्य महिकाव-तिस्थाने माहिमग्रामे श्रीव्यङ्कटेशाच्या देवालयांत ॥ श्लोक ॥—

नारायणं पद्मभवं वशिष्ठं शक्तिञ्च तत्पुत्रपराशरं च ॥
व्यासं शुकं गौडपदं महान्तं गोविन्दयोगीन्द्रमथास्य शिष्यम् ॥
श्रीशङ्कराचार्यमथास्य पद्मापदं च हस्तामलकं च शिष्यम् ॥
तन्त्रोटकं वार्तिककारमन्या अस्मद्गुरुं संततमानतोस्मि ॥ १ ॥

हे गुरुपरम्पराभक्तिपरायण श्रीहरिहरगुरुचरणकमलसेवाधुर-न्धर जगद्गुरुसाम्प्रदायनीलमठाभिमानी श्री वेदशास्त्रपरमभक्ति-

---

* ही अस्सल सनद बालबोध लिपींत असून ती, सदर्हू केरूबुवा ह्यांचे पौत्र वे. रा. रा. नारायण रघुनाथ कीर्तने घनसाङ्गवीकर हल्लीं वस्ती माहीम ह्यांजकडेस आहे.

† हे केशव स्वामी परम साधु असून यांनीं चतुर्थाश्रम धारण केला होता आणि माहीम येथें शके १७९५ चैत्र शुद्ध १० मीस ते समाधिस्त झाले. ह्यांचा समाधि श्रीरामजीचे मन्दिराजवळ असून तो त्यांचे शिष्यमण्डळीनें बान्धिला आहे.

परायण सच्चिदानन्द वेदमूर्ति केशव नारायणबुवा कीर्तने याजुषी वास्तव्य माहीमग्रामे श्रीराममन्दीर येथें. हे फार योग्य आहेत. सर्व वेदान्तिक वगैरे धर्म जाणणारे, यांहीं जसा ज्यांचा धर्म त्याप्रमाणें ह्मणजे—ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्रादि चारी वर्णांस दीक्षा ग्रहण करण्यास योग्य आहेत. व यांस आमची आज्ञा आहे व श्रुतिवाक्य असें आहे कीं, "वर्णानां ब्राह्मणो गुरुः" असें असून ह्यांचा द्वेष करून वर्णाश्रमधर्म त्यागून (जे?) अनाचारी गोंसावी आमचें नांव सांगून अनुग्रह देतात व त्याच्या तोण्डचा प्याला घेतात व मण्डळ भरवितात, असें बहुतेक ठिकाणीं आमच्या पहाण्यांत आलें आहे. हा मार्ग खोटा असें समजून ही सनद दिली आहे. व असे जे अनाचारी यांचे अनुग्रही असतील ते धर्म सोडून अधर्म करितात, तरी हा मार्ग फार अयोग्य आहे; कारण भगवदुक्ति अशी आहे कीं, 'श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ॥ स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ याप्रमाणें शिक्क्या सहीनिशीं सनद करून यांस दिली आहे. इजला जे अमान्य होतील त्यांचा तरणोपाय होणार नाहीं. संवत् १९२५, शके १७९१, माहे आषाढ शुद्ध १३ सौम्यवासरे.

(शिक्का.) सही. नित्यानन्द सरस्वती स्वामी.

## परिशिष्ट (भ*).

## वे० रा० रा० नारायण विठ्ठल वैद्य पुरन्दरे ह्यांस श्रीमच्छङ्कराचार्यांनीं पाठविलेलें पत्र.

## शके १८०५ (इ. स. १८८३)




श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य श्रीमच्छङ्कराचार्य महाराजाधिराज अखण्ड भूमण्डलाचार्य सद्गुरु ज्योतिर्मठाधीश्वर षड्दर्शनस्थापनाचार्य श्रीनगरराजधानी श्रीमच्छङ्कराचार्य श्रीकेशवानन्दस्वामी मुकाम.

चतुर्मास्य. शुरतबन्दर.

परम शिष्योत्तम षट्पदश्रेण्याराधनतत्पर चरणारविन्दमकरन्दमिलिन्द धर्मधुरन्धर मुम्बई बन्दरमध्ये, वेदमूर्ति राजमान्यराजश्री नारायण विठ्ठल वैद्य पुरन्दरेषु नारायणपूर्वक आशीर्वाद. जत अत्रे कुशलं. तत्रास्तु. विशेष लखनेका के, आपनातरफथी आवेलुं पुस्तक वेदमूर्ति राजमान्य राजश्री पुरुषोत्तम यादव देवधर एओए आप्युं, ते अमो बधुं वाच्युं; तेमानुं तत्त्व आपणा श्रमनुं घणुं सार्थक थाय एवुं छे. बीजुं एवा गृहस्थो शर्वे ब्रह्मवृन्द उपयोगी ग्रन्थकरणारा माणशो आ सृष्टिमां घणा जुजवी छे. माटे आपणा जेवा धर्मस्थापनकरणारा पुरुषो आ वखतनी अन्दर थोडाज छे. आपनुं रचेलुं पुस्तक जोई अमारा आत्मानें घणोज सन्तोष थयोछे, ने

---

* हें अस्सल गुर्जर लिपींत असून तें, वे० रा० रा० नारायण विठ्ठल वैद्य पुरन्दरे पुणताम्बेकर हल्लीं वस्ती मुम्बई ह्यांजपाशीं आहे.

अमारो आपनाउपर आशीर्वाद छे के, आ पुस्तक करतां जोई धर्म-सम्बन्धी ग्रन्थो आप प्रसिद्ध करशो, ने धर्मनुं उत्तेजन शारुं वधारशो, लखतन एज आशीर्वाद. संवत् १९४० ना कारतकशुद्ध २ गरेउ. लखतन छोटालाल शदाशङ्करना नमशकार.

श्री.
केशवानन्द स्वामी
ज्योतिर्मठाधीश्वर.

---

## परिशिष्ट (म*).

## वे. रा. रा. काशीनाथ गम्बा नाईक, विठ्ठल नाईक व भानू उपाध्ये ह्यांस इंग्लिश सरकारांतून वृत्तिसम्बन्धीं मिळालेला सनदपट्टा.

### शके १६०७ (इ० स० १६८५.)

Whereas Kassinath Gumba Naique, Wittal Naique and Banna Paddia of Mahim Bramins have for this many years past granted the Office of Bramins in the Township of Mahim and its Jurisdictions in performing the rites and ceremonies of Marriage administering Phisick to the Sick and doing and performing all other Ceremonies relating to the said Office as appears to me by several orders, I have thought fit and do(es) hereby order you the said Cassinath Gumba Naique, Wittal Naique and Banna Paddia do continue in the said Office of Bramins giving full Power to act in the same and to perform all the rites and ceremonies of Marriage and to administer Phisick to the said Inhabitants of Town of Mahim and its Jurisdictions

Upon this request of the within named persons this is confirmed upon them. Bombay Castle, 22nd June 1689.

---

* हा अस्सल सनदपट्टा इंग्लिशभाषेंत असून तो, वे. रा. रा. चिन्तामण बाळम्भट जावळे पळशीकर हल्लीं वस्ती शादर (मुम्बईमाहीम) ह्यांजवळ आहे, आणि ह्याची नक्कल वे. रा. रा. नीलकण्ठ विठ्ठल उपाध्ये क्षीरसागर राहुरीकर हल्लीं वस्ती शादर ह्यांनीं ग्रन्थकाराकडेस आणून दिली.

Prohibiting hereby all persons whatsoever from molesting or disturbing you in the execution of the said Office upon any pretence whatsoever. Given under my hand and sealed with the seal of the Court of Judicature of the Island of Bombay this 22nd of August Anno Domini 1685.

(Signed) J. CHILD. (Signed) J. WAX.

I do hereby confirm and ratifye Cassinath &c. Bramins in their offices in ordering all the respective inhabitants of Mahim to pay a dutyfull respect suitable to their employs. Bombay this 29th October 1686.

(Signed) JON. WYBODIN.

(Signed) STEPHEN COTT, Secy ;

---

## वरील लेखाचा सारांश.

वे. रा. रा. काशीनाथ गम्बा नाईक, विठ्ठल नाईक आणि भानू उपाध्ये, माहीम येथील प्राचीन वाजसनेयब्राह्मण ह्यांस कसबे माहीम आणि त्याच्या आसपासचीं खेडीं (परळ, वरली, सींव, धारावी, नायगांव, माटुङ्गें, वडाळें, खार इत्यादि) येथील राहणार समस्त महाराष्ट्रलोकांकडील ज्योतिषी, उपाध्येपण आणि वैद्यक्रिया पूर्वापार चालत आल्याप्रमाणें चालविण्याविषयींचा सनदपट्टा इ. स. १६८५ ता० २२ आगष्ट ह्या दिवशीं मुम्बई येथील कोर्ट ऑफ् जुदिकेचरच्या शिक्यानिशीं इंग्लिश सरकारानें करून दिला. आणि ह्या सनदपट्टाप्रमाणें वरील गांवचे समस्त महाराष्ट्रलोकांकडेस उपाध्येपण ह्याच ब्राह्मणांनीं करावें व त्यांच्या ह्या कृत्यास कोणी हल्लाहरकत करूं नये अशी ताकीद दिली.

*** हा सनदपट्टा इंग्लिश सरकारच्या दप्तरीं बहाल झालेला आहे, व वरील गृहस्थांचे वंशजहि आजपावेतों ह्या सनदपट्ट्याप्रमाणें आपली उपाध्येपणाची वहिवाट चालवित आले आहेत.

## परिशिष्ट (य*).

## मुम्बईमाहीम येथील प्राचीन वाजसनेयब्राह्मण जावळे आणि उपाध्ये यांचे वृत्तीसम्बन्धीं वांटणीपत्र.

### शके १६४२ (इ. सन १७२०)

॥ श्रीगणेशाय नमः ॥

संवत् १७७६ विक्रमादित्य शके १६४२ शार्वरी संवत्सरे. मल्हार नाईक व दाद नाईक व शाम नाईक व हर उपाध्ये व त्र्यम्बक उपाध्ये या सर्वांची माहीम कसबा व गांवढीं मिळोन वृत्त (वृत्ति) अवघी एक (१). या सर्वांहीं मिळोन अष्टाधिकार या (इकडील) लोकांचे घरचे करावे, ऐसें उदण्डवर्षें चाललें. ऐशीयास साम्प्रत कांहीं एकमेका विभाग्यांमध्यें विरोध पडला ह्मणोन गांवींचे (गांवचे) गृहस्थ मिळोन निश्चय केला ऐसाजेः— भाग दोन (२) वृत्तीचे केले. तेच ऐसेजे माहीम कसबा व सींव, धारावी मिळोन भाग एक (१) व गावडी (गांवढीं) वरलीं, परळ, खार, व सिंवरीं, नागावि (वें), वडाळें, गोंत्रारी, माटुङ्गें, मिळोन वांटणी एक (१), ऐशा दोन वांटण्या केल्या. त्याचे विभागी अवघे मिळोन वांटण्या दोन. त्यास एक वांटणी निवसङ्ग (निसबत्-स्वतन्त्र ?) हरउपाध्ये तथा त्र्यम्बक उपाध्ये यांची, व दुसरे वांटणीस मल्हार नाईक व दाद नाईक व शाम नाईक मिळोन निम्में वांटणी एक (१) ऐशी दोन भागीं वृत्त केली. यामध्यें वांटे (स) करणे जर आहे (त) (तर) त्यास जो वांटा पहिले सालीं चालवील त्यांहीं (त्यानें) दुसरीयाचे वांट्यामध्यें कोणतेंहि कृत्य बरें अथवा वाईट चालवावयास गरज नाहीं, आणि कदाचित् चालविलें तर तो गृहस्थांचा अन्याई (यी) होईल. जो दण्ड गृहस्थ ठेवितील तो मान्यकेला जाईल. उपरी तीर्थ-

* हें अस्सल वांटणीपत्र देवनगरी लिपींत असून तें, वे. रा. रा. चिन्तामण बाळम्भट्ट जावळे पळशीकर हल्लीं वस्ती शहर (मुम्बई माहीम) ह्यांजवळ आहे, आणि ह्याची नक्कल वे. रा. रा. नीलकण्ठ विठ्ठल उपाध्ये क्षीरसागर राहुरीकर हल्लीं वस्ती शहर ह्यांनीं ग्रन्थकाराकडेस आणून दिली.

पर्वणीस शारा ( शहरा ) मध्यें ( तीर्थपर्वणीस ) सुखें हिण्डावें, व गांवढ्यांमध्यें शेताची कवळी ( भारा ) खळेची पुञ्जी ज्यांचे वर्षामध्यें येईल त्यांहीं घ्यावी. उपरी मराठे तथा परळकर व वरलीकर ह्यांचे घरीं श्राद्ध व कांहीं ( कोणतेंहि ) कर्म चालविण्यास सुखरूप जावें. मुहूर्त व अष्टाधिकार ज्यांचा त्यांहीं चालवावा. व वांटेकर लाडकोजी वर्तक याचे घरचे अष्टाधिकार नित्रसङ्ग उपाध्याचे. ह्या लिहिल्याप्रमाणें त्यांस मान्य. हें पत्र लिहिलें, काशीजी तानकोजी प्रभु याचे अक्षरीं. यास साक्ष पासजी हिराजी व निळाजी हिराजी व दामाजी माणकोजी व प्रल्हादजी वालजी व घुसाजी बिन् भिवजी व माणीक नाईक व धरम नाईक. माहे भाद्रपद शुा १५ सोमे आरम्भ संवत् १७७७ पावेतों संवत् १७७८ भाद्रपद शुा १५ सोमे पासून माहीम कसबा व सींव व धारावी मल्हार नाईक व दाद नाईक व शाम नाईक यांहीं वांटणी घेतली. वरीस एक ( १ ) व तैशीच वांटणी एक ( १ ) घेतली, हरउपाध्ये व त्र्यम्बक उपाध्ये यांहीं वरली व परळ, माटुङ्गें पावेतंव (पावेतों). प्रतिवर्षीं बदल होईल. हें सर्व लिखित खरें.

| | |
|---|---|
| १ सही मल्हारी नारायण. | १ सही हर उपाध्ये भानू उपाध्ये. |
| १ सही दाद गम्बाजी. | १ सही त्र्यम्बक शिवराम उपाध्ये. |
| १ सही शामा उद्धव नाईक. | |

---

## परिशिष्ट (र*).

## वे० रा० रा० शामाचार्य ह्यांस इंग्लिशसरकारांतून मिळालेला सनदपट्टा.

### शके १८०१ (इ. स. १७२३.)

Whereas various and Sundry Disputes have arisen concerning ye (the ?) right of administering the rites and ceremonies of

---

* हें अस्सल पेटन्ट इंग्लिश भाषेंत असून तें, वे. रा. रा. कृष्णा गणेश आचार्य पुणताम्बेकर हल्लीं वस्ती मुम्बई ह्यांजपाशीं आहे आणि ह्याची मुम्बई हायकोर्टांतून आणविलेली प्रत वे. रा. रा. नारायण विठ्ठल वैद्य पुरन्दरे पुणताम्बेकर हल्लीं वस्ती मुबई ह्यांजपाशीं आहे.

the Gentoos on this Island and have continued a long time undetermined not only to the great Prejudice of the Person in whom the said Right is vested, but also to the great Detriment of this Island, by the unlimited License of ye (the ?) Brahmins resorting hither as well Drawing the money of the Inhabitants as several other ill Practices tending to Disturb the peace and good government thereof. It being absolutely necessary effectually to put a stop to this evil and the many inconveniences attending it. In order thereto the pretensions of the several claimants having been Impartially examined and their several reasons inquired into, and twelve men, heads of their religion, Four for (from ?) each Caste having been summoned and their opinion * * * * * * † ever arise, and they having unanimously given it as their opinion that the sole Right of administering the said rites and ceremonies of their religion is vested in Shama Charia Brahman (exclusive of all others, Both by right of succession and otherwise) and that the said Shama Charia Brahman is a Person well affected to the English Government, and every way Duly Qualified for the said office.

* This portion of the original text is torn entirely and canont be deciphered.

Seal.

For the above Considerations and well to answer ye (the ?) purposes therein mentioned I J. Courtney Chief Justice of the Port and Island of Bombay being sworn to do Justice according to Equity and a good Conscience, Do by the order and with the consent of the Honble Wm. Phipps, Esquire, Presidt. and Governor of H. M.'s Castle and Island of Bombay &ca. Confirm the aforesaid Sama Charia Brahmin in his said right of Presiding over the Gentoos of this Island so far as it relates to the administering the rites and ceremonies of their religion and the ordering and Directing what Brahmins shall officiate under him, hereby granting him our Patent, Confirming him for ever in the said right and all ye (the ?) Profits

Entered in the Registers of the Court of Bombay.
(Sd.) A. UPRON, Regr.


† From another copy we have, this portion reads:—"required under their hands whereby it is become their proper act and no objection can"

perquisites and advantages arising† * * * * * Behaving himself agreeable to the known Laws and Customs of their Religion and as a good subject to this government requiring by virtue of these Presents entire obedience from all the Gentoos on this Island to his orders and Directions in what concerns their religion and to the rights he is solely vested with both by the Hon'ble the Governor's Proclamation of the 27th of May last Past and by this my Patent granted under the great seal of my office as Chief Justice of the Court of Bombay and Entered in the Register of the said Court. Given in Bombay this twenty-first Day of August In the year of our Lord God one thousand seven hundred and twenty-three and in the tenth year of the reign of our Sovereign Lord George of England, Scotland, France and Ireland, King Defender of the Faith, &ca.

* This portion of the original text is torn entirely and cannot be deciphered.

(Signed)

JOHN COURTNEY.




(True copy.)

(Signed) K. C. BEDARKER,

Deputy Registrar.

(Signed) K. C. BEDARKER,

Sealer.

*The 21st day of August* 1883.

---

नकलेस कागद दिला ता. ११ आगष्ट सन १८८३.

नक्कल तयार ता. २१ आगष्ट सन १८८३.

अर्जदार परशुराम पाण्डुरङ्ग जोशी यांणीं ही नक्कल मिळणेंविषयीं केलेला अर्ज कबूल झाल्यावरून या नकलेची फी. ११ अकरा आणे घेऊन ही नक्कल अर्जदार यास दिली ता. २१ आगष्ट सन १८८३.

बाबुराव विठ्ठल नादरकारकून.

बाळकृष्ण आनन्दराव खर्के आसि० शिरस्तेदार.

---

† The reading of another copy is :—" from the said office he"

## वरील इंग्लिश मजकुराचा सारांश.

ज्याअर्थी ह्या बेटांतील धर्मसम्बन्धीं कार्यें चालविण्याच्या स्वामित्वाविषयीं अनेक भानगडी व तण्टे उपस्थित होऊन त्यांचा पक्केपणें निकाल न लागतां, ते तसेच फार दिवसपर्यन्त चालू असल्या कारणानें ज्या इसमाकडेस वरील धर्मसम्बन्धीं हक्कांचें स्वामित्व आहे त्या इसमासच अपायकारक आहे, एवढेंच नाहीं; तर ह्या बेटांत अन्य ब्राह्मण येऊन ते हव्या त्या रीतीनें इकडल्या लोकांकडून पैसा नेत आहेत व दुसऱ्याहि वाईट चाली पाडीत आहेत; त्यामुळें ह्या बेटांतील राज्यास अपायकारक व शान्ततेचा भङ्ग होण्यासारखें दिसतें; त्याअर्थी ह्या खराब चाली व त्यांपासून होणाऱ्या गैरसोई अजीबात काढून टाकणें फारच अवश्य आहे; सबब अनेक हक्कदारांनीं आणलेले दावे निष्पक्षपातानें तपासून, त्यांनीं जीं जीं प्रमाणें आणलीं त्यांचा त्यांचा चांगल्या रीतीनें विचार करून, त्यांच्या धर्मांतील मुख्य बारा इसमांस—ह्मणजे प्रत्येक जातीपैकीं चार चार इसमांस—आपापले पुरावे देण्याकरितां बोलाविलें; तेव्हां त्या सर्वांनीं एकमतें आपला असा विचार दर्शविला कीं वर सांगितलेलीं धर्मसम्बन्धीं सर्व कार्यें चालविण्याचें स्वामित्व दुसऱ्या कोणाकडेस नसून तें शामाचार्य नामक ब्राह्मणाकडेस मात्र वंशपरम्परेनें चालू आहे. व हे शामाचार्य इंग्रज सरकाराबरोबर मित्रभावानें वागणारे असून वरील कामें करण्यास योग्य आहेत.

ह्या वर सांगितलेल्या कारणांवरून व त्यांतील उद्देश सिद्धीस जावे ह्मणून मीं, जे. कोर्टनी, मुम्बई बन्दराचा व बेटाचा मुख्य न्यायाधीश, सद्धर्माला व न्यायाला भिऊन इनसाफ करण्यास ज्यानें शपथ वाहिली आहे असा मीं, जे. कोर्टनी मुम्बईकिल्ल्याचे व बेटाचे मुख्य नामदार गव्हरनर जे. फिप्स ह्यांच्या हुकुमानें व सम्मतानें वरील शामाचार्यास ह्या बेटांतील (जन्टूस) हिन्दुमात्रांकडील धर्मसम्बन्धी हक्कांचें स्वामित्व देतों व त्यानें आपल्या हाताखालीं काम करण्यास त्यास लागतील ते ब्राह्मण ठेवणें इत्यादि अधिकार ह्या

पेटण्टान्वयें (सनदपट्टचान्वयें) कायम करितों व त्या हक्कांचा उपभोग व त्यापासून होणारे फायदे, मिळकती इत्यादिकांचा उपभोग त्यानें तहाहयात घेण्याचे हक्क कायम करितों.

त्यांच्या धर्मसम्बन्धी रीतीभातींस अनुसरून चालणारा व ह्या राज्याचा राजनिष्ठ प्रजेंतला हा एक असल्यामुळें ह्या बेटांतील लोकांनीं ह्या शामाचार्याचे धर्मसम्बन्धीं जे जे हुकूम होतील ते ते सर्वांनीं अवश्य मान्य केले पाहिजेत. व जे हक्क फक्त त्यानांच (शामाचार्यांस) नामदार गव्हर्नर साहेबाच्या ता० २७ मेच्या जाहिरनाम्यावरून व माझ्या ह्या पेटण्टान्वयें मिळाले आहेत; जें पेटण्ट मीं आपल्या मुख्य न्यायाधीशाच्या हुद्याच्या शिक्यामोर्तबानिशीं दिलें आहे व जें ह्या कोर्टाच्या दप्तरांत नोन्दलें गेलें आहे; आणि जें पेटण्ट मीं मुम्बईमध्यें ता० २१ आगष्ट इसवी सनाच्या १७२७ व्या वर्षीं, व इंग्लण्ड, स्काटलण्ड, फ्रान्स, व ऐर्लण्डचा राजा लार्डजार्ज, धर्मसंरक्षक ह्यांच्या कारकीर्दीच्या दहाव्या वर्षीं दिलें आहे.

---

परिशिष्ट (ल*).

### वे. रा. रा बापूजी रघुनाथ मोगरे ह्यांस मौजे पालघर येथील पाटीलकी दिल्याची सनद.

### शके १७५३. (इ. स. १८३१)

शिक्का माजिस्ट्रेटचा.

सनद अजतर्फ सरकार माजिस्ट्रेट जिल्हा कोंकण बेरमी बापूजी रघुनाथ पाटील वाजसनीब्राह्मण राहणार मौजे पालघर सज्जा शिरगांव परगणे माहीम तालुके. सुरुसन इहिदे सलासीन मयातैन व अलफ. हल्लीं तुह्मांस मौजे मजकूर या गांवचे पोलीसाचा

---

* हें अस्सलपत्र मोडी लिपींत असून तें, वे. रा. रा. गङ्गाधर विठ्ठल मोगरे पैठणकर हल्लीं वस्ती शिरगांव ह्यांजवळ आहे.

कारभारी सरकारांतून केलें असे; तरी तुह्मीं हुशारीनें मौजे मजकुरची खबरदारी राखणें आणि गुन्हेगार लोकांस धरणें व गुन्हे होऊं न देणें. माजिस्ट्रेट साहेब अगर तालुके मजकुरचे अम्मलदार जो हुकूम करतील त्याप्रमाणें खबरदारीनें वर्तणूक करणें व मौजे मजकुरचे बलोतेदार यांजपासून जसें ज्याचें काम असेल तशी त्याजवळून चाकरी घेणें; हें सर्व सरकारी कायद्यांत फर्माविलें आहे, त्याप्रमाणें तुह्मीं करणें. त्या कायद्यांतील कलमांची नक्कल तुह्मांस या सनदेबरोबर दिली असे. जाणिजे. छ १७ माहे सवाल, मिती चैत्रवद्य ४ शके १७५३ खरनाम संवत्सरे, इंग्रेजी तारिख १ माहे एप्रिल सन १८३१.

(Signed) L. R. REID,
Magistrate.

(सही) एल. आर. रीड,
माजिस्ट्रेट.

---

## परिशिष्ट (व*).

## मुम्बई येथील वृत्त्यंशी छत्रे, वैद्य व आचार्य ह्यांनीं आपापसांत वृत्तीसम्बन्धीं केलेलें हद्दापत्रक.

### शके १६६५ (इ. स. १७४३.)

श्री ९. वर्षे शके १६६५ प्रवर्तमाने रुधिरोद्गारीनाम संवत्सरे माहे मार्गशीर्ष शुद्ध ५ पञ्चमी गुरौ तेदिनीं आह्मीं गिरगांवकर व बाजारकर वृत्त्यंशी बापू नाईक व वेण्ट नाईक तथा गौतम नाईक व शामाचार्य व हरजोशी व पोस तिवाड हे आह्मीं सर्व समस्त मिळोन विचार केला कीं, बापू नाइकापासून व आत्माचार्यापासून डोङ्गरीचे हद्देचा कलहो निरन्तर असे तो कैसा? बापू नाईक ह्मणे जर, डोङ्गरीचे दुर्गासीं सूत बान्धोन पश्चिमसमुद्रपर्यन्त न्यावें,

---

* हें अस्सल पत्र देवनगरी लिपींत असून तें, वे. रा. रा. जनार्दन रघुनाथ छत्रे (मुङ्गी) पैठणकर हल्लीं वस्ती मुंबई ह्यांजपाशीं आहे.

उत्तरेकडेची माझी वृत्त (वृत्ति) तथा आत्माचार्य ह्मणत असे जर, फकवडीचे गोवणीसीं सूत बान्धोन पूर्वसमुद्रपर्यन्त न्यावें येवढी हद्द माझी दक्षिणेकडील; ऐसा वाद अहर्निशीं चाले; ऐसें असतां भोगोटा वृत्तीचा कैसा होत असे? धुळपेची तळवली, कोण्ही पोस नायकाची तळवली ह्मणे, तिचे उत्तरपाळीपासून गोवण पश्चिमसमुद्रपावेतं- व तीच नीटच गोवण आली पूर्वेस फकौडिपावेतों. पुढें सेतवाळ. उत्तरेकडेचा भोगोटा गिरगांवकर करितात, दक्षिणेकडेचा भोगोटा बाजारकर करितात, तथा डोङ्गरीच्या खडकावरील घरांचा भोगोटा गिरगांवकर करित असतात. आतां मुम्बादेवीचा सिंवार (वस्ती) वसला, यास्तव आतां कलहो विशेष वाढला; यास्तव ते—आह्मीं मिळोन ठराव केला प्रीतिपूर्वक तो कैसा? तर मुम्बादेवीच्या उत्तरपाळीवरोन उभाराहोन नीटच पूर्वेस देवळ दक्षणेस राहोन भिन्तीचे जवळोन गोवण नीटच पूर्वसमुद्रापावेतों, तो दक्षणे- कडेचा भोगोटा, बाजारकरांचा उत्तरेकडेचा भोगोटा, गिरगांव- करांचा मुम्बादेवीच्या उत्तर पाळीचा पश्चिमकोन व पश्चिम पाळीचा उत्तरकोन पाण्याच्या भिन्तीपासोन उत्तरेस नीट जावें, आशा जमीन हात पन्नास, दोहीं घरांची जागा तेथोन पश्चिमेस गोवणीस जावें, ती गोवण कोणची? दरवाजा कोटाचा उत्तरेचा, त्यापा- सून गोवण नीट निघाली ती गळाचे बावीवरोन तो निट रस्ता उत्तरेस गेला, त्यास तेथें मिळावें. तेथोन उत्तरेस नीटच चालावें, तें कोठपर्यन्त? फकौडीचे गोवणीमध्यें उभें राहोन नीट पूर्वेस फकौ- डीचे सन्मुख तळवली मधोन पूर्वेस मोठ्या रस्त्यास मिळावें, उत्त- रेकडोन पश्चिमेकडेस तो कोन पुन्हा उद्धार करितो—तेथोन पश्चिमेस नीटच फकौडीचे सन्मुख तळवली मधोन फकौडीचे गोवणींतून नीटच पोसनाईकाचे तळौलींपासोन उत्तर पाळीवरोन नीटच समुद्रपर्यन्त दक्षिणाङ्ग बाजारकरांचें, उत्तराङ्ग गिरगांवकरांचे. याउपरी कैवर्तकांची नीत आहे जर, त्यांचे स्वज्ञातीचा मुकादम त्यांचे घरीं जावोन लग्नपत्रिका करितात, (तो) त्या मुकादमाची वस्ती

इकडे, अतःपर तिकडे, तर तो वृत्त्येश्वर जावोन मुकादमाचे तेथें बसोन ज्याकडोन पत्रिका असतील ज्याचे वृत्तीच्या त्याणें घ्याव्या व वाळुकेश्वरीं क्रिया झाली तर त्याज्यवस्त्र, मोक्षधेनू त्या गृहस्थाकडोन आमची व संयोजन श्राद्धींचें अर्धे तेंच गिरगांवकरांस देणें, संयोजन श्राद्धींचेंच व चरुपात्रासीं, उत्तरी वस्त्रासीं कांहीं लागत नाहीं. त्यासीं हजीर असों तर घेवों. हें आह्मी वृत्त्येश्वर मिळोन व बाजारकर व गिरगांवकर मिळोन प्रीतिकरोन शपथपूर्वक करोन हा वृत्तीचा कथला चुकविला. यामध्यें कोण्हीं फिरावें नाहीं. जो या पत्रास मान्य न करील तो दिवाणअन्याई ; दिवाण जो दण्ड करील तो त्याणें सोसावा. हें पत्र आह्मां सर्वांस मान्य, राजद्वारीं मान्य, असीं पत्रें दोन. आमचे हस्ताक्षरींचें बाजारकरांजवळ व बाजारकरांचे हस्ताक्षरींचें गिरगांवकरांजवळ.

१ सही बाबु नाईक.
१ सही वेण्टनाईक.
१ सही गौतम नाईक.

१ साक्ष हिर ह्मात्रे.
१ साक्ष शिवजी बावजी.
१ साक्ष केशव पाध्ये.
१ साक्ष जयराम पाठक.

*Bombay, Town Hall,* 11*th of November* 1743.

Registered at the request of Gotam Naique.

(Signed) W. DAVIS,

Regr.

(Signed) Wm. KENNEDY.

*Bombay,* 25*th February* 1801.

A true copy from the Registry.

(Signed) W. PURSHOTAM POY.

परिशिष्ट (श*).

मुम्बई येथील वृत्त्यंशी छत्रे, वैद्य व आचार्य ह्यांनीं आपापसांत वृत्तीसम्बन्धीं केलेलें इक्कापत्रक.

शके १६६५ (इ. स. १७४३.)

श्री.

श्री ५॥ वर्ष १६६५ प्रवर्तमाने रुधिरोद्गारी नामसंवत्सरे माहे मार्गशीर्ष शुद्ध पञ्चमी गुरुवासरे तद्दिनीं आह्मीं बाजारकर व गिरगांकर वृत्त्यंशी शामाचार्य व हरजोशी व पोस तिवाड व बापू नाईक व गौतम नाईक व वेण्ट नाईक हे आह्मीं समस्त मिळोन विचार केला कीं, आत्माचार्यापासोन तथा बापू नाइकापासोन डोङ्गरीचा कलहो निरन्तर असे तो कैसा? आत्माचार्य ह्मणे, फकौडीचे गोवणीसीं सूत बान्धावें तें पूर्वसमुद्रपर्यन्त न्यावें, येवढी हद्द माझे हद्देची दक्षिणेकडे, तथा बापू नाईक ह्मणत असे— जर, डोङ्गरीचे दुर्गासीं सूत बान्धोन पश्चिमसमुद्रपर्यन्त न्यावें: उत्तरे कडेची माझी वृत्त (त्ति) ऐसा वाद अहर्निशीं चाले. ऐसें असतां भोगोटा वृत्तीचा कैसा होत असे? धुळपैची तळवली, कोण्ही पोस नाईकाची तळवली ह्मणे, तिचे उत्तरपाळीपासून गोवण पश्चिमसमुद्रपावेतों. तीच नीट गोवण आली पूर्वेस फकौडिपावेतंव, पुढें सेतवाळ; उत्तरेकडचा भोगोटा गिरगांवकर करितात; दक्षिणेकडेचा भोगोटा बाजारकर करितात तथा डोङ्गरीच्या खडकावरिल घरांचा भोगोटा गिरगांवकर करीत असत; ऐसें असतां आमचे यांचे सदैव कलहो होत असत. आतां मुम्बादेवीचा सिंवार वसला, यास्तव आतां कलहो विशेष वाढला; यास्तव ते- आह्मीं मिळोन ठराव केला प्रीतिपूर्वक तो कैसा? जर, मुम्बादेवीच्या उत्तरपाळीवर उभाराहून भिन्तीचे जवळून नीटच पूर्वेस देऊळ, दक्षिणेस राहोन भिन्तीचे जवळून गोवण नीटच पूर्वे

* हें अस्सल पत्र देवनगरी लिपींत असून तें, वे. रा. रा. जनार्दन रघुनाथ छत्रे (मुङ्गी) पैठणकर हल्लीं वस्ती मुम्बई ह्यांजपाशीं आहे.

समुद्रापावेतों दक्षिणेकडचा भोगोटा बाजारकरांचा व उत्तरेकडचा भोगोटा गिरगांवकरांचा; मुम्बादेवीच्या उत्तरपाळीचा पश्चिमकोन पश्चिमपाळीचा उत्तरकोन पाण्याचे भिन्तीपासून उत्तरेस नीटच- जावें, आश्रा ज (?) हात ५० पन्नास दोहोंघरांची जागा तेथोन पश्चिमेस गोंवणीस जावें ती गोंवण कोणची? दर्वाजा कोटाचा उत्तरेचा त्यापासोन गोंवण नीटच निघाली ती गळाचे बावीवरून तो नीटच रस्ता उत्तरेस गेला त्यास तेथें मिळावें, तेथोन उत्तरेस नीट चालावें, तें कोठपर्यन्त? जर फकौडीचे गोंवणीमध्यें उभें राहोन नीटच पूर्वेस फकौडीचे सन्मुख तळव- लीमधून पूर्वेस मोठ्या रस्त्यास मिळावें; उत्तरेकडून पश्चिमेस तो कोन. पुन्हा उद्धार करितो. तेथून पश्चिमेस नीटच फकौडीचे सन्मुख तळवलीमधून फकौडीचे गोंवणींतून नीटच पोसनाईकाचे तळवलीपासून उत्तर पाळीवरून नीटच पश्चिम समुद्रपर्यन्त. दक्षिणाङ्ग बाजारकरांचें. उत्तराङ्ग गिरगांवकरांचें. याउपर कैव- र्तकांची नीत आहे, जर त्यांचे स्वजातीचा मुकादम त्यांचे घरीं जाऊन लग्नपत्रिका करितात, त्या मुकादमांची वस्ती इकडे, अतः- पर तिकडे, तर तो वृत्त्येश्वर जाऊन मुकादमाचे तेथें बसोन ज्या कडोन पत्रिका असतील, ज्याचे वृत्तीच्या असतील त्याणें घ्याव्या; व वाळुकेश्वरीं क्रिया झाली तर त्याज्यवस्त्र, मोक्षधेनु त्या गृह- स्थाकडून त्याची व संयोजन श्राद्धींचें वाहिलें तें अर्धेंच गिरगांव- करांस देणें. संयोजन श्राद्धींचेंच व चरुपात्रासीं व उत्तरीवस्त्रांसीं कांहीं लागत नाहीं. हजीर असतील तर घेतील. हें आह्मीं अवघे वृत्त्येश्वर मिळोन गिरगांवकर व बाजारकर मिळोन प्रीति करून शपथपूर्वक करून हा वृत्तीचा कथला (खटला) चुकाविला. यामध्यें कोण्हीं फिरावें नाहीं. जो या पत्रासीं मान्य न करील तो दिवाण (चा) अन्याई. दिवाण जो दण्ड करील तो त्याणें सोसावा. हें पत्र आह्मां(स) सर्वांस मान्य, राजद्वारीं मान्य. ऐसीं पत्रें दोन, आमचे हस्ताक्षरींचें गिरगांवक-

रांजवळ, गिरगांवकरांचे हस्ताक्षरींचें बाजारकरांजवळ. ॥

सही शामाचार्य. १ साक्ष शिवजी बावजी प्रभु.
सही हर जोशी. १ साक्ष जयराम पाठक.
सही पोस तिवाड. १ साक्ष केशव पाध्ये.

*Bombay Town Hall, 11th of November* 1743.

Registered at the request of Shamacharia.

(Sd.) W. DAVIS, Regr.
„ WM. KENNEDY, Regr.

*Bombay, 25th Febuary* 1801.

A true copy from the Registry.

(Sd.) W. PURSHOTAM POY.

---

## परिशिष्ट (स*).

## वे० रा० रा० विठ्ठल नाईक, गम्बा विठ्ठल नाईक आणि भानूउपाध्ये ब्राह्मण ह्यांस इंग्लिश सरकारांतून वृत्ति-सम्बन्धीं मिळालेला सनदपट्टा.

### शके १६७७ (इ० सन० १७५५).

Whereas Wittal Naique Descendant of Cassi Naique, Gumba Naique, Vittal Naique, Banna Paddia, of Mahim Bramins has formily requested me to ratify and confirm a Patent granted his ancestors aforesaid by the Honorable John Vaux Esqr., Governor of this Island A.B. 1605. Confirmed by the Honorable Isiah Wybarrin, Esqr. in 1686 and again by the Honorable John Child, Esq., in 1687, likewise Governors of this Island that they the aforesaid Cassi Naique, Wittal Naique, Gumba Naique, and Banna Paddia should exercise the Office of Bramins in this Town and Jurisdiction of Mahim in performing the rites and ceremonies of Marriages Prescribing Phisick to the sick and doing and performing all other Ceremonies relative to the said Office. I do accordingly order and direct

---

* १८१ पृष्ठावरील टीप पहा.

that you Wittal Naique and your Heirs do continue in the said Office of Bramins giving you and them full Power to Act as such and to perform all the rites and ceremonies of Marriages and prescribing Phisick to the Gentoo Inhabitants of the Town and Jurisdiction of Mahim hereby prohibiting all persons whosoever from molesting or disturbing you or them in the execution of the said Office on any pretence whatsoever. Given under my hand in Bombay Castle and sealed with the Seal of the Honorable Company this 6th July 1755.

(Sd.) RICHARD BOURCHUR.

( True copy from the Original.)

By order of the Honorable Richard Bourchur, Esqr., President for all affairs of the Honorable United English East India Company on the Courts of India, Persia and Arabia, Governor and Commander-in-Chief of His Majesty's Castle and Island of Bombay.

(Sd.) DANIEL DRAPER.

Secy.

---

## वरील लेखाचा सारांश.

कसबे माहीम आणि त्याच्या आसपासच्यीं खेडीं (परळ, वरली, सींव, धारावी, नायगांव, माटुङ्गें, वडाळें, खार इत्यादि) येथील रहाणार समस्त महाराष्ट्र लोकांकडील ज्योतिष, उपाध्येपण आणि वैद्यक्रिया हे अधिकार पूर्वापार चालत आल्याप्रमाणें चालविण्याविषयीं इ. स. १७५५ ता. ६ जुलई ह्या दिवशीं मुम्बई येथील ईस्ट इन्दिया कम्पनीचे प्रेसिदेन्त रिचर्ड बोर्चर ह्यांस वे. रा. रा. विठ्ठल नाईक, इकडील प्राचीनवाजसनेय ब्राह्मण, ह्यांनीं विनन्ति केल्यावरून त्यांस हा सनदपट्टा पुनः कायम करून दिला.

सदर्हू विठ्ठल नाईकाचे पूर्वजांस हा मूळ सदनपट्टा इंग्लिश सरकारानें इ. स. १६०५ त करून दिला होता, तोच पुनः १६८६ त, १६८७ त आणि शेवटीं १७५५ त कायम करून मंजूर केला. ह्याप्रमाणें व्यवस्था त्यांचे वंशज आजपावेतों करितात.

## परिशिष्ट (ष*).

## कुर्ले येथील वृत्ति मक्त्यानें दिलेला दस्तऐवज.

## शके १७७० ( इ० स० १७४८ )

करारपत्र शके १७७० किलकनामसंवत्सरे मार्गशीर्ष वद्य ११ गुरुवार ते दिनीं करारपत्र लिहून घेणार नाम वेदमूर्ति राजश्री राघोबा गणेश नाईक वस्ती मौजे जुहूं, तर्फ तुर्भे, प्रान्त साष्टी यांशीं लिहून देणार वेदमूर्ति राजश्री शिवराम रघुनाथ भावे हल्लीं राहणार मौजे कुर्ले, तर्फ तुर्भे, प्रान्त साष्टी करारपत्र लिहून देतों ऐसाजेः—तुमची खुद्द खासगतीची कुर्ले येथें गांवची वृत्ति उपाध्ये व जोशीपणाची आहे ती आम्हीं तुह्मांपासून रेन्दी ठेविली, त्याचा करार वर्षें ५ अक्षरीं पांच. त्याचा करार रुपया १॥ अक्षरीं दीड दरसाल तुह्मांस देत जाऊं आणि दोन घरें लोहारांची खेरीजकरून सर्व गांवची उपाध्ये व जोशीपणाची हिन्दुधर्मांतल्या कार्य वगैरे हरएक बाब भटपणावृत्ति चालवून उत्पन्न घेत जाऊं. यांत कोणी बखेडा केल्यास त्याचें निवारण तुम्हीं करावें. हें करारपत्र आह्मीं आपले राजीरजावन्दीनें लिहून दिल्हें, सही. तारिख २१ माहे दिसेम्बर. सन १८४८.

साक्ष. — सही.

१ लाला विटलो लव्हाराची साक्ष. — शिवराम रघुनाथ भावे दस्तुर खुद्द.

१ पाण्डु भीवजी लोहाराची साक्ष.

१ ओशेल जुईस दे सोज वलद बावतीस सोज पाटेल हल्लीं कारकून मुकाम कुर्ले खुद्द दोन धन्यांचे समक्ष साक्ष केली असे, दस्तुर खुद्द.

[illegible] नागरी शिवराम भावे वस्ती मौजे कुर्ले, तर्फ तुर्भे, दस्तुर खुद्द.

* हें अस्सल करारपत्र मोडीलिपींत असून तें, वे. रा. रा. काशीनाथ राघोबा देव हल्लीं वस्ती जुहूं ह्यांजवळ आहे.

## परिशिष्ट (ह*).

# वे. रा. रा. जयराम आपा नाईक पाराशरे ह्यांस केळवेंमाहीम येथील श्रीमातृकेचे नित्यपूजेबद्दल इंग्लिशसरकारांतून दिलेली सनद.

### शके १७८९ (इ. सन १८६७.)




(Signed.) W. R. SEYMOUR FITZGERALD.

*This Sunnud* is issued under the signature of *His Excellency* the *Right Hanorable William Robert Seymour Vesey Fitzgerald,* Her Majesty's Governor of Bombay, to the effect that:—

*Whereas* an annual allowance has been paid from the time of the former Government on behalf of the *Temple of Matrooka Devee* in Cusba Mahim Talooka Mahim zilla Tanna, it is hereby declared that the amount of Rupees (18) Eighteen only will be permanently continued on account

जिल्हा ठाणें तालुके माहीमचा गांव कसबे माहीम येथील **मातृका देवी.**

---

---

बद्दल माजीराज्याचे वेळेपासून नेमणूक पावत आहे, ऐसीयास **मलीकामा आझमाचे** मुम्बईइलाख्याचे गवरनर **राईट आनराबल वुईलियम राबर्ट सीमोर वेसी फिटझेराल्ड** साहेब बहादूर यांचे सहीनिशीं ही **सनद** देण्यांत येते कीं वर लिहिलेली **मातृकादेवी**

---

————————————चे

वहिवाटदार जोंपर्यन्त इंग्रेज-

---

* ही अस्सल सनद इंग्लिश व मराठी (मोडी लिपींत) असून ती, वे. रा. रा. चिन्तामण बाळकृष्ण व पुरुषोत्तम हरि व जयराम आपा नाईक पाराशरे कोल्हापूरकर हल्लीं वस्ती केळवेंमाहिम ह्यांजपाशीं आहे.

of the said Institution so long as the Managers thereof shall remain loyal and faithful subjects of the British Government.

सरकाराशीं इमानें इतबारें वागतील तोंपर्यन्त सदहू संस्थानाबद्दल दरसाल रुपये ( १८ ) अक्षरीं अठरा रुपयेची रकम निरन्तर चालविण्यांत येईल जाणिजे. नं. १०.

*Sunnud No.* 10.

(Signed) E. ROGER,
Revenue Commissioner, N. D.

*10th September* 1867.

(Signed) PESTONJEE JEHANGEERJI,
Settlement Officer, N. D.

मातृकादेवीचा वहिवाटदार जयराम आपा नाईक यास दिल्ही असे. तारीख २२ नवेम्बर सन १८६७.

( सही ) बळवन्तराव नारायण, मामलेदार.

---

## परिशिष्ट (ळ*).

### ठाणें येथलि श्रीसिद्धेश्वराचे अर्चेसम्बन्धीं खटला.

### शके १७४५ (इ. स. १८२३)

हरिश्चन्द्र सुन्दर पण्डित ता॥ २४ दिसेम्बर सन १८७२ का. प्र. एकरुपया विक्रीचा नम्बर १३९८. विष्णुमोरेश्वर वेण्डर.

अस्सल बा॥ नकलेची नक्कल रुजूपाहून केली आहे. ता॥ २४ दिसेम्बर सन १८७२.

अपील नम्बर १३९७ ता॥ २२ जानेवारी सन १८२३.

अपील नम्बर सन १८२३ पौ॥ २३९७३.

अस्सल नम्बर ११२५ सन १८२३ पौ॥ रजिष्टर कोर्टांतील अपील झालें.

शिक्का
उत्तर प्रान्त
कोंकण
अदालत.

हुकूमनामा अदालत प्रान्त उत्तर कोंकण.

---

* हा खटला वे. रा. रा. नीलकण्ठ विठ्ठल पुरन्दरे निफाडकर हल्लीं वस्ती अगाशी यांजपाशीं आहे.

## वादी.

वादी विश्वनाथ विनायक पण्डित राहणार ठाणें याचा वकील चिन्तो परशुराम.

## प्रतिवादी.

पुरुषोत्तम विठ्ठल नाईक राहणार ठाणें याचा वकील बाबाजी नारायण.

फिर्याद रुपये १२५ कसबे ठाणें येथें श्रीसिद्धेश्वराचे देवाचे लिङ्गाची स्थापना करून प्रावादी हा अर्चा करीत आहे व तो ह्मणत आहे कीं, दुसरे कोणास अर्चा करण्याचा अधिकार नाहीं व असें केल्यानें माझे अबरूस बट्टा लागतो व मी ह्या गांवचा पुरातन वतनदार असोन आजपावेतों जीं नवीन देवालयें बान्धिलीं त्यांची प्रतिष्ठा माझेशिवाय दुसरे कोणीं केली नाहीं, ही मनाई करण्याविषयींः—

सर्व हकीगत वादस्थापन या कज्याचें मनास आणितां, कोर्टाचे नजरेस येतें कीं, ज्या देवाचे अर्चेबद्दल ही फिर्याद वादी याणें केली आहे, त्या देवाचें देवालय गोविन्द नारायण याणें बान्धिलें आहे व त्याचा वादी हा उपाध्याय आहे, आणि पूर्वीपासोन हे ब्राह्मण असोन पुष्कळ ठिकाणीं यांच्या हातच्या प्रतिष्ठा जाहल्या आहेत आणि सर्व लोक त्या देवांचीं दर्शनें घेतात व कागदोपत्रीं जुना पुरावा बिम्बराजापासोन सनदा व दुसरे कागद पुष्कळ राजेलोकांचे दाखले ब्रह्मकर्माचे अधिकारी कागद पुराव्यास आणिले आहेत; त्याचा आधार पाहून व वादी याणें निशाणी २४ व २५ च्या दोन श्रीमन्त बाळाजी बाजीराव पेशवे यांच्या सनदा पुराव्यास आणिल्या आहेत; त्यांचा आधार कीं, हरपण्डित बिन् विनायकपण्डित हे जातीचे यजुर्वेदी ब्राह्मण असोन ह्यांस अग्निहोत्रादि सर्व ब्रह्मकर्माचा अधिकार आहे व हे पुरातन वतनदार आहेत आणि विनायक पण्डित हा त्याचा वंशी आहे; सबब हुकूमनामा वादी याचे तर्फे केला असोन प्रावादी याणें वादी यास कोणतेहि तऱ्हेनें अर्चा करण्यास हरकत करूं नये व फिर्यादीसम्बन्धीं

वादी यास खर्च रुपये २६।।।. ४३ सुर्ती जाहले ते प्रावादी याणें वादी मजकूर यास द्यावे व प्रावादी मजकूर याचा खर्च खुद्द त्याणें सोसावा. तारीख २३ माहे जानुआरी सन १८२३.

---

फेरिस्त कज्याप्रा कागद :—

१ फिर्यादीचा अर्ज.

२ वकीलपत्र वादीकडून.

३ समान.

४ हजीर जामीन कदबा.

५ वकीलपत्र वादीकडून.

६ उत्तर.

७ दरखास वादीकडून समस्त नासिककर यजुर्वेदी ब्राह्मण यांहीं संमतपत्र नासिक मुक्कामीं दिलें आहे तें हजर करण्याविषयीं.

८ समान वादीकडून श्रीमन्त बाळाजी बाजीराव यांणीं, शिक्क्याचें प्रतिष्ठापत्र पुणें मुक्कामीं दिलें आहे तें हजर करण्याविषयीं.

९ दरखास वादीकडून अण्णासाहेब दीक्षित पैठणकर यांस हजर करण्याविषयीं.

१० दरखास वादीकडून विनायक बाळशास्त्री वांईकर यांस सनद हजर करण्याविषयीं.

११ समान वादीकडून कावळे यांस २४ वतनदार यांचीं सनद आहे ती पाहण्याविषयीं.

प्रावादी याच्या निशाण्या.

१ फिर्यादीचा जाब.

२ वकीलपत्र प्रावादीकडून.

३ कबूलनामा. ४ जामीनकदबा.

५ दरखास प्रावादीकडून विनायक भट्ट बिन् गोविन्द भट्ट याच्या दोन सनदा पाहण्याबा.

६ समान प्रावादीकडून नीलकण्ठ अण्णा यांचें एक पत्र पाहण्याविषयीं.

७ दरखास प्रतिवादीकडून नारायण कृष्ण शास्त्री नासिककर यांचें आधारपत्र पाहण्याविषयीं.

८ समान प्रावादीकडून यज्ञेश्वर गोविन्द आपा यांची ब्रह्मकर्माची व स्थापना करण्याची अधिकाराची सनद हजर करण्याविषयीं.

९ दरखास प्रावादीकडून गोविन्द नारायण वैद्य पुणेकर यांच्या प्रतिष्ठेविषयीं श्रीमन्त बाळाजी बाजीराव पेशवे यांचा दरखास प्रावादी यांणीं निरख प्रतिष्ठा कोणकोणते ब्राह्मणांनीं करावी तो आहे तो पाहण्याविषयीं.

१२ दरखास वादीकडून गोपाळराव मैराळ यांस देवालयावर हक्क दाखविण्याच्या अधिकाराविषयीं सनद सन शीत अशर सालची आहे ती पाहण्याविषयीं.

१३ दरखास वादीकडून आज्ञापत्र शिरगांवकर यांचें पाहण्याविषयीं.

१४ समान वादीकडून मुम्बईचे देवालयावर फिर्याद होऊन अपील सुप्रीमकोर्टांत झालें होतें त्याचा तर्जुमा पाहण्याविषयीं.

१५ दरखास वादीकडून साष्टींतील मौजे मालाड येथील श्रीशिवाचे अर्चेबाा तक्रार होऊन मनसुबा प्रान्त वसई व साष्टीचे सुभे यांजकडे कज्या पडोन हुकूम मिळाला आहे तो पाहण्याविषयीं.

१६ समान वादीकडून पण्ढरपूरचे भास्कर अनन्त वैद्य यांची जबानी घेण्याविषयीं.

१७ समान वामन काशीनाथ भट्ट नासिककर यांची साक्ष घेण्याविषयीं.

१८ दरखास वादीकडून पुणें मुकामीं सभेस सवाल लिहून पाठविले आहेत ते हजर करण्याविषयीं.

१० समान प्रावादीकडून पुण्यांतील अर्चेसम्बन्धीं पत्रकें मिळालीं आहेत तीं पाहण्याविषयीं.

११ समान प्रावादीकडून नारायण काशीनाथ डोङ्गरे यांजकडेस श्रीमन्त बाळाजी बाजीराव पेशवे यांची सनद अर्चेविषयीं आहे ती हजर करण्याकरितां.

१२ दरखास प्रावादीकडून हक्क कागद देऊळ बान्धणारा हा माझा यजमान आहे याचा पुरावा दाजी गङ्गाधर टकले पुणेकर यांजकडेस आहे तो हजर करण्याकरितां.

१३ समान नारायण यज्ञेश्वर दीक्षित यांचा श्रीमन्त बाळाजी बाजीराव यांचा पेशवे हकनामा आहे तो हजर करण्याविषयीं.

१४ समान प्रावादीकडून महादेव नारायण उर्फ अण्णासाहेब केतकर यांचा उपाध्येपणाचा व जोशीपणाचा हक्क आहे तो व त्यासम्बन्धीं जे कागद आहेत ते हजर करण्याविषयीं.

१५ दरखास प्रावादीकडून नारायण बाबा जोगळेकर यांची सनद हजर करण्याकरितां.

१९ दरखास वादीकडून सवाल नासिककर यांचे रामचन्द्र जगन्नाथ पाहणें ते पाहण्याविषयीं.

२० दरखास वादीकडून नारायण आत्माराम जुन्नरकर यांस श्रीमन्त बाळाजी बाजीराव पेशवे यांजकडून ब्रह्मकर्माची परीक्षा समस्त पञ्चाईतमतें घेऊन त्यांस सनद दिली आहे ती हजर करण्याविषयीं.

२१ समान वादीकडून गम्बानाईक जावळे यांची सनद हजर करण्याविषयीं.

२२ दरखास वादीकडून जगन्नाथ पुराणिक नासिककर यांची साक्ष घेण्याकरितां.

२३ समान वादीकडून नाना माधव शेट शिम्पी याची साक्ष पुराण्यांत वतनदार त्या देवाच्या अर्चेविषयीं.

२४ सनद समस्त पण्डित वृत्त्यंशी यांस श्रीमन्तबाळाजी बाजीराव पेशवे यांची छ. ७ सनशीत अशर मया तैन व अलफ.

२५ सनद वादीकडून हरपण्डित बिन् विनायक पण्डित यांस सर्व ज्योतिष उपाध्येपणाचा व सर्व ब्रह्मकर्माचा अधिकार पळशे ब्राह्मण यांस आहे छ. ७ सनशीत अशर मयातैन वअलफ.

१६ दरखास प्रावादीकडून अण्णा नारायण वैद्य कल्याणकर यांची साक्ष घेण्याविषयीं.

---

१६

एकन्दर निशाण्या दाखल्याचे कागद पुराव्यास दिल्हे ते दाखल असत.

जमा रुपये. खर्च रुपये.

८ फिर्यादीचा अर्ज.

·॥· वकीलपत्र.

---

८८४३ भातें.

१ जामीनकदबा.

·॥· दरखास निशाणी.

७ दरखास निशाणी ८ ता। १३.

१ दरखास निशाणी ता। ९ नवेम्बर.

१ दरखास नि॥ १४.

१ नक्कल दिली ता। १६ सप्तेम्बर.

·॥· दरखास निशाणी ९.

१ दरखास नि॥ १६.

---

२१॥८८४३.

·॥· दरखास निशाणी ६.

१ दरखास नि॥ २.

१ दरखास नि॥ ३.

१ दरखास नि॥ ९.

१ दरखास नि॥ ११.

१ भातें साक्षीचे समानाचें.

३ बयाना वकिलास.

४ कमिशन कज्याचें.

२६ दरखास वादीकडून श्रीमन्त बाळाजी बाजीराव यांच्या शिक्याच्या सनदा साक्ष वामनराव यांजकडेस आहेत त्या पाहण्या विषयीं.

२७ दरखास श्रीधर गोविन्द जोशी यांची जबानी घेण्याविषयीं.

२७ सदर्हूप्रमाणें निशाण्या सत्तावीस वादी याजकडून दाखल झाल्या आहेत त्या त्या दाखल असत. सदर्हूप्रा वादी यास खर्च झाला तो येणेंप्रा.

जमा रुपये—खर्च रुपये.

७ फिर्यादीचा अर्ज.

·॥· वकीलपत्र.

·।· भातें.

१ जामीन कदबा.

·॥· दरखास निा ७.

·॥· दरखास निा ८ ता निा १३.

·॥· दरखास निा १६.

·॥· नकल छापील कागदावर.

---

१५ ता १४.

१ दरखास निा १२.

१ नकल छापील कागदावर.

वकीलपत्राबरहुकूम दर बंद करण्याबद्दल.

·॥· साक्षीस भत्ता.

---

२६८८४३

शिरस्तेदार दादाजी देवजी.

१२३४ हुर.

जबानी बो विश्वनाथ धाकजी पाटील वस्ती मौजे वरली, जात पांचकळशे, धन्दा पाटीलकीचा, उमर वर्षे सुमारें ७८. मी कोर्टांत शपथ घेऊन सत्य सांगतों कीं, मीं वादी, प्रातिवादी ह्यांस ओळखीत आहें.

प्रश्न-वादी याचे वकिलाकडून.

प्रश्न—कोा ठाणें येथें विठ्ठलवाडींत नवें देऊळ बान्धिलें तें कोणीं बान्धिलें ?

उत्तर—वहिणाबाई हिचे नांवें देऊळ आह्मीं बान्धिलें.

प्रश्न—सदहू देवळास खर्च कोणीं केला ? आणि देवाचे चाकरीकरितां कोणीं कोणास ठेविलें ?

उत्तर—देवळास खर्च बहिणाबाई हिणें आमचे विद्यमानें केला आणि देवाची चाकरी करावयास बहिणाबाईनें आमचे विद्यमानें आबा माधवराव प्रावादी यास ठेविलें.

प्रश्न—प्रात्वादी यास देवाची चाकरी करावयास ठेविला, त्यावेळेस कोण कोणते देवाची प्रतिष्ठा करावयास कसकसा करार जाहला ?

उत्तर—श्रीशिवप्रतिष्ठा, वादी विश्वनाथ विनायक पण्डित यांचे हातून करावी व विष्णूची व गणपती यांची प्रतिष्ठा आबा माधवराव यांचे हातून करविली.

प्रश्न—तीन देवांतून प्रथम कोणते देवाची प्रतिष्ठा कोणीं केली ? व मागाहून कोणते देवाची प्रतिष्ठा कोणीं केली ? व दरोबस्त खर्च कोणीं केला ?

उत्तर—प्रथम शिवाची प्रतिष्ठा वादी विश्वनाथ विनायक पण्डित याणीं केली; नन्तर विष्णूची व गणपतीची प्रतिष्ठा आबा याचे हातून करविली. व दरोबस्त खर्च तीनहि देवांस बहिणाबाई हिणें केला.

प्रश्न—देवाचे प्रतिष्ठेबाबद तुह्मीं कांहीं करारपत्र लिहून घेतलें आहे ?

उत्तर—करारपत्र प्रावादी यांजकडून लिहून घेतलें आहे.

प्रश्न—हल्लीं तुह्मांस कोडतांतोन शके १७३९ चे सालचें करारपत्र दाखवितों, त्यास हेंच करारपत्र आहे किंवा नाहीं ?

उत्तर—हेंच करारपत्र आहे.

प्रश्न—प्रात्वादी यांणीं करारपत्र लिहून तुह्मांस दिल्हें आहे, त्यांत लिहिलें आहे कीं, शिवाची प्रतिष्ठा तुमचे उपाध्यायाचे हातीं

करावी, त्यास वादी हा तुमचा उपाध्याय आहे, ह्मणून त्याचे हातून अर्चा शिवाची करविली कीं नाहीं ?

उत्तर—वादी आमचा उपाध्याय आहे, सबब त्याचे हातून शिवाची प्रतिष्ठा करविली.

प्रश्न—शके १७३४ चे सालीं शिवाची प्रतिष्ठा तुमचे उपाध्याचे हातून करीत होतां, तेव्हां प्रावादी यांणीं हरकत करून अज्जम हॉलेट साहेब जज्य होते, त्यांजवळ येऊन फिर्याद आला; तेव्हां जज्य साहेबांहीं हुकूम काय दिल्हा ? तेवेळेस देवाची अर्चा होऊन नन्तर तो देव कोणीं चोरून नेला ? त्याजवर पुनः प्रावादी यांणीं करारपत्र शके १७३९ चे सालीं लिहून दिल्ह्यावर पुनः अर्चा केली कीं नाहीं ?

उत्तर—शके १७३४ चे सालीं आमचे ब्राह्मण अर्चा करूं लागले त्यावेळेस प्रावादी यांणीं हरकत केली कीं, तुमचे ब्राह्मणांस अर्चा करावयास अधिकार नाहीं, याजकरितां आमचे ब्राह्मणांपासून अर्चा करवीन असें ह्मणून अज्जम हॉलेट साहेब यांजवळ फिर्याद आला, तेव्हां अज्जम हॉलेट साहेब यांहीं तोण्डींच चौकशी करून प्रावादी यास विचारिलें कीं, देवळास अर्चेस खर्च बहिणाबाई करिते, त्यास यांत तुझें काय आहे ? तेव्हां प्रावादी यांणीं सांगितलें कीं, माझा यांत खर्च नाहीं, तेव्हां अज्जम हॉलेट साहेब यांणीं हुकूम दिल्हा कीं, तूं अर्चेस हरकत न करणें; हरकत केल्यास बान्धून मारीन असा हुकूम करून आह्मांबरोबर दोन शिपाई साहेबांहीं दिल्हे, नन्तर देवाची प्रतिष्ठा केली, नन्तर तो देव कोणीं चोरून नेला. त्याजवर शके १७३९ चे सालीं दुसरा करार प्रावादी यांणीं लिहून दिल्हा आहे, त्याजवरून पुनः प्रतिष्ठा केली आहे.

प्रश्न—पुनः प्रतिष्ठा केल्या नन्तर त्या देवाची चाकरी प्रावादी करीत आहे कीं नाहीं?

उत्तर—चाकरी प्रावादी करीत आहे.

प्रश्न—वादी याचे जातीचे ब्राह्मणांचे हातीं तुमचे पाहण्यांत किती प्रतिष्ठा जाहल्या आहेत? व त्या देवळांत महाजनलोक देवाचे पायां पडावयास येतात कीं नाहीं?

उत्तर—वादी याचे जातीचे ब्राह्मणांचे हातीं सात-आठ प्रतिष्ठा जाहल्या आहेत व महाजनलोक त्या देवांचे पायां पडावयास येत आहेत व नीलकण्ठेश्वराचे देवळांत मनोरदास शेट यांणीं धर्मादाव दिपमाळ बान्धिली आहे.

प्रश्न—प्रावादी याचे वकिलाकडून.

प्रश्न—ज्या जागेवर देऊळ बान्धिलें आहे ती जागा कोणाची आहे?

उत्तर—प्रावादी याची आहे.

प्रश्न—त्या देवळास पाया प्रथम कोणीं घातला?

उत्तर—प्रथम प्रावादी यांणीं दोन-तीन हात पाया देवळाचा करविला होता, त्यास ती जागा पायासुद्धां देवळास बक्षीस केली. पायास खर्च बहिणाबाई हिचाच जाहला होता.

प्रश्न—प्रावादी यास बहिणाबाई हिणें देवळास सत्तानिवृत्तीचें पाणी हातावर घातलें आहे कीं नाहीं?

उत्तर—सत्तानिवृत्तीचें पाणी प्रावादी याचे हातावर बहिणाबाई हिणें घातलें आहे, परन्तु सत्तानिवृत्ति देवाची अर्चा होई तोंपर्यन्तच होती; पुढें देवाचा अधिकार वादी व प्रावादी या दोघांस नाहीं.

प्रश्न—वादी याचे जातीचे ब्राह्मणांचे हातून कोणकोणते देवांची अर्चा जाहली आहे?

उत्तर—माझे समक्ष अर्चा जाहल्या त्या येणेंप्रमाणें:—

१ श्रीवागेश्वरी, संस्थान परळ, जञ्जिरे मुम्बई;

१ श्रीविश्वेश्वर ठिकाण परळ;

१ श्रीकेदारेश्वर, ठिकाण वरली, जञ्जिरे मुम्बई;

१ श्रीकाळबादेवी, ठिकाण मुम्बई;

१ श्रीगणपति, ठिकाण माहीम, जञ्जिरे मुम्बई.

सदर्हूप्रों अर्चा जाहल्या आहेत.

प्रश्न—प्रावादी यास चाकर कोणीं ठेविला ? व दरमहा कोण देत असतो ?

उत्तर—प्रावादी यास चाकर बहिणाबाई हिणें माझे विद्यमानें ठेविला आहे. दरमहाचा कांहीं करार केला नाहीं. देवाचे खर्चाबद्दल वाडी एक माहीमास दिली आहे. तिचे उत्पन्नापैकीं देवाचा खर्च जाऊन प्रावादी यांणीं आपलाहि कालक्षेप करावा. याखेरीज आमचे जातींत लग्न जाहल्यास रुपया, अधेली प्रावादी यांस देतों. ता। १९ माहे जून सन १८२४.

विश्वनाथ धाकजी पाटील सही.

हुर.

जबानी बेहमी मोरोबा दामोदरजी, जात पाठारे प्रभु, धन्दा कारकुनीचा. उमर वर्षे सुमारें ४८. वा। मुम्बई. मीं कोर्टात शपथ घेऊन सत्य साङ्गतों कीं, वादी व प्रतिवादी यांस ओळखीत नाहीं.

प्रश्न—वादी याचे वकिलाकडून.

प्रश्न—नि। १८ चें संमतपत्र, तुह्मांस कोर्टातून दाखविलें आहे. त्याजवर तुमची सही आहे ? व तें पत्र खरें आहे ?

उत्तर—माझी सही आहे व तें पत्र खरें आहे.

प्रश्न—मुम्बईचे काळबादेवीची अर्चा पुनः केली ती कोणते ब्राह्मणांनीं केली, ती तुह्मांस ठाऊक आहे ?

उत्तर—ह्याच वादीचे जातीचे ब्राह्मणांहीं केली व यांजबराबर नासिककर यजुर्वेदी ब्राह्मण दुसरे होते.

प्रश्न—सदर्हू देवळांत दर्शन करावयास सर्व महाराष्ट्रलोक जातात कीं नाहीं ?

उत्तर—ज्यांचे मर्जीस आलें ते जातात, ज्यांचे मर्जीस नाहीं आलें, तर ते जात नाहींत.

प्रश्न—त्या देवळांत दर्शन करावयास जावयाची कांहीं हरकत आहे ?

उत्तर—हरकत कांहीं नाहीं. ज्यांचे खुशीस पडेल ते जातात. ज्यांची खुशी नाहीं ते जात नाहींत.

प्रश्न—वादी यांचे जातीचे ब्राह्मण तुमचे येथें देवप्रतिष्ठा व हरएक कर्मान्तर करितात कीं नाहीं?

उत्तर—करितात.

प्रश्न—प्रतिवादी याचे वकिलाकडून.

प्रश्न—समस्त महाजनलोक मुम्बईकर यांहीं रपोट सन १७८९ चे सालीं गव्हर्नरसाहेबांस केला आहे तो तुह्मीं पाहून सांगावें कीं, खरा आहे कीं नाहीं?

उत्तर—मजला ठाऊक नाहीं.

प्रश्न—पळशेब्राह्मणांचे हातचें तुह्मीं तीर्थ घेतां ?

ऊत्तर—घेतों.

प्रश्न—देशस्थ व कोंकणस्थ व गुजराथी हे पळशे ब्राह्मणांचे हातचें तीर्थ घेतील कीं नाहीं ?

उत्तर—आह्मीं ब्राह्मणांचे जातीचे असतों तर सांगतों.

प्रश्न—तुह्मीं खुद्द पळशे ब्राह्मणांचे कडे जेवतां कीं नाहीं ?

उत्तर—आह्मीं जेवतों.

प्रश्न—तुह्मीं जेवतां किंवा तुमची सर्व जात जेवते ?

उत्तर—जातीस जेवण कांहीं केलें नाहीं, तेव्हां आह्मीं कशावरून सांगावें. जातीस जेवण केलें असतें तर आह्मीं सांगतों.

प्रश्न—देशस्थ व कोंकणस्थ व गुजराथी ब्राह्मण यांहीं जेवण केलें असतां तेथें तुह्मीं व पळशे जेवावयास जाल कीं नाहीं ?

उत्तर—जाऊं.

प्रश्न—पळशे ब्राह्मण यांहीं जेवण केलें असतां देशस्थ व कोंकणस्थ व गुजराथी ब्राह्मण व तुह्मीं जेवावयास जाल किंवा नाहीं?

उत्तर—आह्मीं जेवूं व ब्राह्मणांची गोष्ट आह्मांस ठाऊक नाहीं.

ता। २७ माहे मे सन १८२२.

हुर.

जबानी बो सदाशिव पाण्डुरङ्ग जात प्रभु पाठारे, धन्दा कारकुनीचा. उमर वर्षे सुमारें ४३. वा मुम्बई. मी कोडतांत शपथ घेऊन सत्य सांगतों कीं, वादी प्रावादी यांस मीं ओळखीत नाहींः—

प्रावादी याचे वकिलाकडून प्रश्नः—

प्रश्न—निा १८ चे संमतपत्र तुह्मांस कोडतांतेन दाखविलें आहे. हें पत्र खरें आहे?

उत्तर—माझी सही आहे व हें पत्र खरें आहे.

प्रश्न—मुम्बईचे काळकादेवीची पुनः अर्चा केली, ती कोणते ब्राह्मणांहीं केली हें तुह्मांस ठाऊक आहे?

उत्तर—वादी याचे जातीचे ब्राह्मणांहीं केली व ह्यांजबरोबर दुसरे नासिककर यजुर्वेदी ब्राह्मण होते.

प्रश्न—सदहू देवळांत दर्शन करावयास सर्व महाराष्ट्र लोक जातात कीं नाहीं?

उत्तर—जातात.

प्रश्न—प्रावादी याचे जातीचे ब्राह्मण तुमचे येथें देवप्रतिष्ठा व हरएक कर्मान्तर करितात कीं नाहीं?

उत्तर—करितात.

प्रश्न—गांवांत वतनदार ब्राह्मण असतात, त्यांचे यजमानांहीं आपल्या ब्राह्मणांस सोडून दुसरे ब्राह्मणांजवळून देवप्रतिष्ठा, हरएक कर्मान्तर करूं लागल्यास वतनदार ब्राह्मणांकडून करवावें, किंवा दुसरे ब्राह्मणांकडून करवावें, ही कशी चाल आहे? तें सांगणें.

उत्तर—वतनदार उपाध्ये ज्या घरांचे व ज्या जातीचे असतील त्यांजपासून त्यांहीं करवावें. दुसऱ्याजवळून करवावें अशी चाल पूर्वीहि नव्हती व हल्लींहि नाहीं.

प्रश्न—प्रावादीचे वकिलाकडूनः—

प्रश्न—वरतीं लिहून दिल्हेंत कीं, मी वादी यास ओळखीत नाहीं, आणि प्रश्नांत लिहून देतां कीं, वादीचे जातीचे ब्राह्मण यांहीं

अर्चा, प्रतिष्ठा, कर्म, कर्मान्तर केलें असतां सर्व महाराष्ट्रलोक देवळांत जातात; तेव्हां वरतीं लिहून दिल्हें कीं ओळखीत नाहीं, हें खरें किंवा खालीं लिहून दिल्हें हें खरें ?

उत्तर—मीं वादी यास ओळखीत नाहीं. परन्तु वादी याचे जातीस ओळखीत आहें.

प्रश्न—वादी यांहीं अर्चा, देवप्रतिष्ठा केली असतां देशस्थ व कोंकणस्थ व गुजराथीब्राह्मण व महाराष्ट्र सर्व दर्शनास जातील किंवा नाहीं ?

उत्तर—जातात व जातील.

प्रश्न—वादी याची जात काय ?

उत्तर—वादी याची जात पळशेब्राह्मण असें मीं ऐकींव जाणतों, दृष्टीनें पाहिलें नाहीं.

ता। २७ माहे मे सन १८२२.

## कड्यानम्बर ८६.

सन १८५९.

मीं महाशङ्कर रविशङ्कर शुक्ल कोर्टांत हजर होऊन मीं परमेश्वराचें स्मरण करून आपले धर्माप्रमाणें अशी प्रतिज्ञा करितों कीं, मीं जी साक्ष देतों ती सर्व खरी होईल व जें मजला माहीत आहे तें सर्व मीं सांगेन. खोटी साक्ष देणार नाहीं. याप्रों प्रतिज्ञा अञ्जम वसईचे मुनसीफ यांचे समोर करून लिहून देतों कीं, माझें नांव महाशङ्कर रविशङ्कर शुक्ल, जात गुजराथीब्राह्मण. उमर वर्षें सुमारें ५५. धन्दा भिक्षुकीचा. राहणार ठाणें.

कोडताचे सवालांवरून जबाब. वादी, प्रतिवादी यांस मीं ओळखितों. वसई गांवांत वादी याची वृत्ति जोशीपणाची ब्राह्मण, वाणी वगैरे जातींकडे आहे. त्या वृत्तिसम्बन्धीं लग्नांत घटिका घालणें व पत्रिकापूजन करणें तें सर्व वादी यांणीं करावें; तें ब्राह्मणजातीसुद्धां करावें असें माझ्या पाहण्यांत आहे; कारण कीं,

लग्नांत व मुञ्जींत भिक्षेकरितां मीं जातों, त्यासमयीं मीं पाहतों, तेव-ढ्यावरून माहीत व अशी वहिवाट वादी यांची माझे पाहण्यांत ४० वर्षें आहे. घटिकेबद्दल व पत्रिकापूजनाबद्दल किती उत्पन्न वादी यास मिळतें तें मला माहीत नाहीं व मीं पाहिलें नाहीं. लग्नांत वगैरे प्रथम मङ्गलाष्टकें वादी हे ह्मणतात. वादी यांचे वकिलाचे सवालांवर जबाब. आह्मीं ब्राह्मणलोकांकडे मात्र भिक्षा घेतों. जर गांवांत पुष्कळ लग्नें असलीं, तर वृत्त्यंशी जोशी यांचीं मनुष्यें जातात किंवा नाहीं तें मजला माहीत नाहीं. वादी यांजकडे ते ब्राह्मण, सबब आह्मीं दक्षिणेस जातों. प्रावादी यांचे वकिलाचे सवालांवर जबाब. वादी (व) प्रावादी यांजकडेस आमचा अन्न-व्यवहार मात्र होत नाहीं. पाणीमात्र घेतों व वादी–प्रावादी हे कांहीं अनुष्ठानास बसले आणि आह्मांस बोलाविलें तर आह्मींहि त्यांबरोबर अनुष्ठानास बसतों. वसई येथील राहणार दामोदर मोहनजी यांजकडील दानधर्म कोणी ब्राह्मण यांणीं आणून दिल्यास आह्मीं घेतों. भिक्षेकरितां त्यांजकडे जात नाहीं.

ता। २८ नवम्बर १८५९ दस्तूर परशुराम विठ्ठल कारकून.

महाशङ्कर रविशङ्कर शुक्ल भट्ट दाखुद्द.

समक्ष प्रतिज्ञेवर जबानी घेतली ता। मजकूर.

मोरोबा माणकोबा मुनसीफ.

१२३४. हूर

जबानी बाळम्भट्ट बिन् विठ्ठलभट्ट, जात ब्राह्मण, धन्दा भिक्षुकीचा, उमर वर्षें ५४, वा। माहीम प्रा। मुम्बई. मीं कोड-तांत शपथ घेऊन सत्य सांगतों कीं, वादी–प्रावादी यांस (मीं) ओळखित आहें.

प्रश्न—प्रावादी याचे वकिलाकडून. बहिणाबाई हिणें का। ठाणें येथील विठ्ठलवाडींत श्रीविठोबाचें देवालय बान्धिलें आहे तें तुमचे विद्यमानें बान्धिलें कीं नाहीं?

उत्तर---देवळाचा खर्च माझे विद्यमानें जाहला नाहीं, परन्तु बहिणाबाई व प्रावादी यांचें देवालयाबाबद बोलणें माझें विद्यमानें झालें कीं, देऊळ बहिणाबाई हिणें बान्धावें आणि त्याची प्रतिष्ठा मीं बाळम्भट्ट माझे हातोन करावी असें बोलणें होऊन नन्तर देऊळ बान्धिलें आहे.

प्रश्न---देवळास खर्च दरोबस्त कोणीं केला व जमीन कोणीं देवास अर्पण केली?

उत्तर---देवळास खर्च देवाचे अर्चेसुद्धां बहिणाबाई हिणें केला व जमीन प्रावादी यांची होती, ती त्याणें देवास अर्पण केली. त्याजवर प्रावादी याचा सम्बन्ध नाहीं, ह्मणून त्यांणीं सांगितलें आहे.

प्रश्न---प्रावादी याणें तुमचे जातीचे ब्राह्मणांचे हातोन प्रतिष्ठा करण्याविषयीं हरकत केली, त्याजवरून तुह्मीं पुण्यास जाऊन बाळशास्त्री यांचे संमतपत्र आणिलें आहे कीं नाहीं?

उत्तर---प्रावादी याणें हरकत केली, त्याजवरून मीं पुण्यास जाऊन बाळशास्त्री यांचें पत्र आणिलें आहे.

प्रश्न---वादी व तुह्मीं एक जातीचे यजुर्वेदी आहां व तुमचा अन्नव्यवहार आहे कीं नाहीं?

उत्तर---एक जातीचे आहों व अन्नव्यवहार आहे.

प्रश्न---बाळशास्त्री यांचें पत्र आणिल्यानन्तर तुह्मीं आपले हातोन किती देवांच्या अर्चा केल्या व पूर्वीं किती जाहल्या आहेत?

उत्तर---पत्र आणिल्यानन्तर मीं अर्चा केल्या त्या येणेंप्रों:—

१ श्रीनारदेश्वर, ठिकाण माटुङ्गें, प्रां मुम्बई;

१ श्रीवागेश्वरीची फुलअर्चा, ठिकाण परळ, प्रां मुम्बई;

१ श्रीकेदारेश्वर, ठिकाण वरली, प्रां मुम्बई;

१ श्रीवैजनाथेश्वर ठिकाण परळ, प्रां मुम्बई;

१ श्रीरामेश्वर; हल्लीं ज्या देवाचा तण्टा पडला आहे, त्या देवाची अर्चा प्रथम मींच केली होती.

सदर्हूप्रों मीं आपले हातोन अर्चा केल्या आहेत व पत्राचे पूर्वी मीं व आपले जातीचे ब्राह्मण यांणीं अर्चा केल्या आहेत, त्या येणेंप्रों;——

१ श्रीकालिकादेवी, ठिकाण मुम्बई;

१ श्रीगणपतीची अर्चा, ठिकाण माहीम, प्रां मुम्बई;

१ श्रीविठ्ठलरखुमाई, ठिकाण माहीम, प्रां मुम्बई;

सदर्हूप्रों अर्चा माझे समक्ष जाहल्या आहेत.

प्रश्न——सदर्हू देवळांत महाजन वगैरे लोक दर्शनास येतात कीं नाहीं ?

उत्तर——ब्राह्मण आदिकरून सर्व लोक येत आहेत.

प्रश्न——प्रथम तुह्मीं देवाची प्रतिष्ठा ठाण्यास केली होती, तो देव कोणीं चोरून नेल्यावर पुनः अर्चा वादी यांचे हातोन करविली कीं नाहीं ?

उत्तर——वादी याचे हातोन अर्चा करविली असें ऐकींव ठाऊक आहे.

प्रश्न——तुमचे जातीचे ब्राह्मण यांणीं शिरगांव, प्रां वसई, येथें देवाची प्रतिष्ठा केली होती, तो देव प्रावादी याचे जातीचे ब्राह्मण यांणीं उपटून काढिल्यावर तुह्मीं पुण्यास पेशव्यांचे सरकारांत जाऊन तेथोन पेशव्यांचा हुकूम आणोन त्या देवाची अर्चा तुमचे जातीचे ब्राह्मण यांचे हातोन केली आहे कीं नाहीं ?

उत्तर——शिरगांवचा देव उठविल्यानन्तर आह्मीं पुण्यास बाळशास्त्री दीक्षित, निसबत माजी सरकार, यांजकडे गेलों, त्यांणीं आह्मांबरोबर पुण्याहून दहा बारा ब्राह्मण दिले आणि आन्याबा राहतेकर, वसईचे मामलेदार यांचें पत्र त्यांचे कारभारी राम बावा वसईस होते त्यांस दिल्हें कीं, शिरगांवचा देव उपटून आणिला आहे, तो तेथें पोहोंचवून देणें आणि त्यांसीं अर्चा करूं देणें, त्याजवरून पुण्याचे दहा बारा-ब्राह्मण व आह्मीं मिळोन पुनः अर्चा केली आहे.

प्रश्न—शिरगांवचे देवाची अर्चा केली ती पेशवाईअम्मल असतां केली कीं नाहीं ?

उत्तर—पेशवाई अम्मल असतां अर्चा केली. नन्तर अजमासें एक वर्षानें साहेबांचा अम्मल जाहला.

प्रश्न—बहिणाबाई हिणें देवळाची सत्तानिवृत्ति केली आहे, ती देवाची अर्चा होय तोंपर्यन्तच केली आहे कीं नाहीं ?

उत्तर—महादेवाचें सत्तानिवृत्तीचें पाणी वादी याचे हातावर घातलें होतें व श्रीविठ्ठलरखमाईचें प्रावादी याचे हातावर घातलें होतें, सत्तानिवृत्ति देवाची अर्चा होय तोंपर्यन्त होती.

प्रश्न—प्रावादी याचे वकिलाकडून प्रश्न. तुह्मीं बाळशास्त्री यांचें पत्र दाखविलें आहे, त्याजवर बाळशास्त्री यांची सही आहे ?

उत्तर—श्रीकाराजवळ श्रीसिद्धेश्वर ह्मणून लिहिलें आहे व त्यांचें मोर्तब आहे.

प्रश्न—तुह्मीं बाळशास्त्री यांचे पत्र आणिलें आहे, त्यास ती बहिणाबाई कोणती ?

उत्तर—ज्याण्यास बहिणाबाई हिणें देऊळ बान्धिलें आहे व त्याचा तण्टा हल्लीं पडला आहे त्या बहिणाबाईस पत्र आहे.

प्रश्न—मातुङ्ग्याचा श्रीनारदेश्वर याची अर्चा कोणीं केली ?

उत्तर—नारदेश्वर महादेव याची अर्चा चित्पावनब्राह्मण यांणीं केली. नन्तर त्या देवास देऊळ बान्धिलें त्याची वास्तु मीं खुद्द केली आहे.

प्रश्न—शिरगांवचे देवळाबाबद तुह्मांस पेशवे यांची सरकारची सनद दिली आहे?

उत्तर—सनद दिली आहे ती नाना दीक्षिताजवळ आहे.

प्रश्न—शिरगांवचे तुमचे जातीचे ब्राह्मण यांणीं देवाची अर्चा केली आहे, त्या देवाची पूजा करावयास प्रावादी याचे जातीचा ब्राह्मण आहे किंवा कोण आहे ?

उत्तर—तेथें गुरव पुजारी आहे.

प्रश्न--कोणी देवालय बान्धितो, तो आपल्यासाठीं बान्धितो किंवा सर्व लोकांनीं येऊन दर्शन घ्यावें यासाठीं बान्धितो ?

उत्तर--कोणी देऊळ बान्धितो तो आपल्यास धर्म घडावा यास्तव बान्धितो. कोणाचे मर्जीस आल्यास दर्शन घेतो.
ता। २४ जून सन १८२४.

बाळम्भट्ट विठलभट्ट सही.

१२३४　　हुर

जबानी सुन्दर भट्ट बिन् वामनभट्ट, जात ब्राह्मण, धन्दा भिक्षुकीचा, उमर वर्षें सुमारें ४९. वस्ती मुम्बई. मीं कोर्टांत शपथ घेऊन सत्य सांगतों कीं, मीं वादी-प्रतिवादी यांस ओळखीत आहें.

प्रश्न-वादी याचे वकिलाकडून:-

प्रश्न---वादीची व तुमची जात एक आहे?

उत्तर----एक जात आहे.

प्रश्न---तुम्हीं आपले हातीं कोणत्या देवाची अर्चा केली आहे ?

उत्तर---वडाळ्यास विठ्ठलरखुमाईची अर्चा केली आहे.

प्रश्न---या खेरीज तुमचे जातीचे ब्राह्मण यांणीं कित्येक देवांच्या अर्चा तुमचे समक्ष केल्या आहेत व ऐकण्यांत किती आहेत ?

उत्तर---अर्चा केल्या आहेत त्या येणेंप्रमाणें:---

१ श्रीकाळबादेवी, ठिकाण मुम्बई;
१ श्रीविठ्ठलरखुमाई, ठिकाण माहीम;
१ श्रीरामेश्वर, ठिकाण को। ठाणें;
१ श्रीवाघेश्वरी, ठिकाण परळ, प्रां। मुम्बई;
१ श्रीमहादेव, ठिकाण वरली, प्रां। मुम्बई;
१ श्रीचक्रेश्वर, ठिकाण सोपारें, प्रां। वसई;
१ श्रीगणपति, ठिकाण माहीम;
१ श्रीमहादेवाची, शिरगांव, प्रां। वसई;
१ श्रीशम्भुमहादेव, ठिकाण जुहूं, प्रां। साष्टी;
१ श्रीशिवपञ्चायतन, ठिकाण परळ, प्रां। मुम्बई;
१ श्रीमारुती, ठिकाण वाळकेश्वर, प्रां। मुम्बई;

१ श्रीनर्मदेश्वर, ठिकाण मुम्बई, भुलेश्वराजवळ;
१ श्रीमाणकेश्वर, ठिकाण माजगांव, प्रां मुम्बई;
१ श्रीविठ्ठलरखुमाई, ठिकाण मुम्बई, भुलेश्वराजवळ;
१ श्रीशम्भुमहादेव, ठिकाण वरली, प्रां मुम्बई;

सदर्हूप्रों प्रतिष्ठा कांहीं माझे समक्ष जाहल्या आहेत व कांहीं ऐकींव वाऊक आहेत.

प्रश्न—सदर्हू देवालयांत देवांचे दर्शनास महाजनलोक येत आहेत कीं नाहीं ?

उत्तर—दर्शनास येतात.

प्रश्न—प्रावादी यांचे वकिलाकडून नाहीं.

ता २४ जून सन १८२४.

सुन्दरभट्ट वामनभट्ट स्मार्त.

श्री

आज स्वारी राजश्री बाळशास्त्री दीक्षित ता नारायण शेट व आत्माराम बाळाजी शेट व बहिणाबाई शिम्पी का ठाणें, प्रां माहीम, सुा खमस अशरीन मयातैन व अलफ. ( शके १७४६ ) वेदमूर्ति राजश्री बाळम्भट्ट जोशी जावळे, माहीमकर वृत्त्यंशी यांणीं सरकारांत न्यायाधिशीकडे येऊन विदित केलें कीं, मौजे वडाळें व ठाण्याचे मुक्कामीं नारायण शेट व आत्माराम शेट व बहिणाबाई या त्रिवर्गांनीं श्रीगणपतीचें व महादेवाचें व विष्णूचें ( अशीं ) देवालयें बान्धिलीं आहेत, त्यांची देवप्रतिष्ठा आगन्तुक परस्थळींचे ब्राह्मण यांचे हातोन करविणार, त्यास आह्मीं वृत्त्यंशी आपले वृत्तींत पूर्वापार देवप्रतिष्ठा करीत आलों; त्यापेक्षां प्रतिष्ठा आमचे हातोन व्हावी, ती करविली पाहिजे, ह्मणोन; त्यास वृत्त्यंशी पूर्वापार आपले वृत्तींत प्रतिष्ठा करीत आले. यांस सोडोन आगन्तुक परस्थळांतील ब्राह्मण आणोन त्यांचे हातून प्रतिष्ठा करवून वृत्तिवन्ताचे वृत्तीस बाध आणावा हें ठीक नाहीं. पूर्वापार चालत आल्याप्रों चालवावें. त्याजवरून हें पत्र तुह्मांस लिहिलें

आहे; तरी तिहीं देवालयांत प्रतिष्ठा करणें तें, वृत्त्यंशी बाळम्भट्ट जोशी यांचे हातून करवून उत्तर पाठवावें. परस्थळींचे ब्राह्मणांकडून करविल्यास कार्यास येणार नाहीं. जाणिजे, छ १७. मोर्तब सुद.

मोर्त्तब सुद.

यादी.

| | |
|---|---|
| ८६ या नकलेची फी. | १ नकलेस कागद दिल्हा ता। २ आगष्ट १८७७. |
| ८२ रुजू पाहणार. | १ नकल तयार जाली ता। ४ आगष्ट १८७७. |
| ८१ वाचणाराची. | १ नकल दिल्ही, ता। ४ आगष्ट सन १८७७. |
| ८८६ कागद. | |
| ८९८६ | |

बाळकृष्ण शिवराम, दफ्तरदार.

(नकल)

नम्बर १२३४ सन पो

१८२४. हर.

विश्वनाथ विनायक पण्डित वस्ती चेन्दणी तर्फ ठाणें—वादी.

आबाजी माधवराव वस्ती को। ठाणें—प्रा।वादी.

वादी यांचा साक्षी नाना रामचन्द्र दीक्षित वस्ती त्र्यम्बक.

**प्रश्न वादी यांचे वकिलाकडून.**

१. शके १७२९ वैशाख मासीं मु।। ठाणें येथें श्रीविठोबाचे देवालयांत श्रीरामेश्वराची प्रतिष्ठा वादी विश्वनाथ विनायक पण्डित यांचे हातानें जाहली त्या प्रतिष्ठेत तुमचे बन्धु व तुम्ही व भाऊ

**(उत्तरें)**

१ शके १७२९ सालीं ठाणें येथें श्रीविठोबाचे देवालयांत श्रीरामेश्वराची प्रतिष्ठा विश्वनाथ विनायक पण्डित यांणीं केली, त्या प्रतिष्ठेत आमचे बन्धु भाऊ दीक्षित व चुलते महादेव दीक्षित

दीक्षित असे अनुष्ठानांस होतां कीं नाहीं?

असे होते. आह्मीं गांवांत होतों परन्तु प्रातिष्ठेत नव्हतों.

**नाना रामचन्द्र सही.**

२. मौजे परळ प्रान्त मुम्बई येथें श्रीवागेश्वरीची पूर्वी अर्चा जाहली, त्या अर्चेस यजमान व उपाध्याय व अनुष्ठानांस तुह्मीं व दुसरे ब्राह्मण कोण कोण होते, त्यांचीं नांवें लिहून द्यावीं.

२ वागेश्वरीची अर्चा जाहली ते समयीं होते ते, नांवें बितपशीलः—

१ दादा पांचकळशे यजमान होते;
१ बाळम्भट्ट जावळे माहीमकर;
१ विनायक दीक्षित नासिककर;
१ त्र्यम्बकभट्ट बेळे नासिककर;
१ तात्याभट्ट गायधनी;
१ श्रीकृष्ण शौंचे;
१ खुद्द मी नाना रामचन्द्र दीक्षित.

७

या खेरीज ब्राह्मण फार होते त्यांचीं नांवें आह्मांस माहीत नाहींत.

**नाना रामचन्द्र सही.**

३ तुमचा आमचा अन्नव्यवहार ज्ञातींत प्रसिद्ध होत आहे कीं नाहीं व चित्पावनांचा व आपले यजुर्वेदी यांचा मागापासून द्वेष आहे कीं नाहीं?

३ अन्नव्यवहार ज्ञातींत प्रसिद्ध होत आहे. चित्पावनांचा व यजुर्वेदी यांचा मागापासून (पूर्वींपासून) द्वेष आहे.

**नाना रामचन्द्र सही.**

४ आमच्या हातोन ज्या देवांच्या प्रतिष्ठा जाहल्या आहेत, त्या देवालयांत ब्राह्मण आदिकरून येतात कीं नाहीं?

४ ज्या देवांच्या प्रतिष्ठा तुमचे हातोन जाहल्या, त्या देवालयांत ब्राह्मण आदिकरून येतात.

**नाना रामचन्द्र सही.**

गुजराथी सही.

**हुरमोजी माणीकजी वकील यांची सही.**

| प्रश्न प्रतिवादीकडून. | |
|---|---|
| १ वादी विश्वनाथ विनायक पण्डित, जात पळशे, यांणीं को॥ ठाणें प्रां॥ साष्टी येथें शिवलिङ्गाची अर्चा केली त्या अनुष्ठानांत तुह्मीं होतेत, तर सर्व तुमच्या जातीचे यजुर्वेदी ब्राह्मणांच्या संमतानें होतेत किंवा संमताशिवाय होतेत? | १ को॥ ठाणें प्रान्त साष्टी येथें शिवलिङ्गाची अर्चा केली त्या अनुष्ठानांत दुसरे यजुर्वेदीब्राह्मण होते तेथें आह्मींहि होतों, कोणाचें संमत आह्मीं घेतलें नव्हतें. **नाना रामचन्द्र सही.** |
| १ परळास तुह्मीं पळशांस समागमें घेऊन वागेश्वरीची अर्चा केलीत, ती देशस्थ ऋग्वेदी व यजुर्वेदी व गुर्जर व तैलङ्ग ह्या सर्व ब्राह्मणांच्या संमतानें पळशे व तुह्मीं एकत्र बसून केलीत किंवा सर्व ब्राह्मणांचे संमताशिवाय केलीत? | १ सर्व ब्राह्मणांचे संमतानें पळशे व आह्मीं एकत्र बसून अर्चा वागेश्वरीची केली. **नाना रामचन्द्र सही.** |
| १ विश्वनाथ शास्त्री मुळे त्र्यम्बककर व रघुनाथभट्ट व सदाशिवभट्ट गायधनी नासिककर प्रमुख सर्व यजुर्वेदीब्राह्मण यांचा व तुमचा व वादी पळशे यांचा अन्नव्यवहार आहे? | १ आमचा व वादी पळशे यांचा अन्नव्यवहार आहे; दुसरे कोणाचा आहे किंवा नाहीं हें आह्मांस ठाऊक नाहीं. **नाना रामचन्द्र सही.** |
| १ वसई व साष्टी व मुम्बई प्रान्तीं वादीचे जातीचे पळशे आहेत, ते आपल्यास यजुर्वेदीब्राह्मण ह्मणवितात, त्यांसीं व त्र्यम्बककर व नासिककर सर्व यजुर्वेदीब्राह्मणांबरोबर सर्व प्रसिद्धपणें एकपङ्क्तीस भोजन व्यवहार आहे? | १ पळशे कोणी त्र्यम्बकास यात्रेस येतात तेसमयीं यजुर्वेदीब्राह्मण व पळशे एक ठिकाणीं पङ्क्तींत प्रसिद्धपणें भोजन करितात. नासिककर ब्राह्मण पळशांचे पङ्क्तींत बसून भोजन करितात किंवा नाहीं, हें आह्मांस ठाऊक नाहीं. **नाना रामचन्द्र सही.** |

१ नासिकास व त्र्यम्बकास चित्पावन व कऱ्हाडे ब्राह्मण आहेत, त्यांशिवाय यजुर्वेदी ब्राह्मणांशीं एकपङ्क्तीस भोजन व अनुष्ठानें होत असतात कीं नाहीं ? किंवा चित्पावन व कऱ्हाडेब्राह्मण यजुर्वेदीब्राह्मणांशीं द्वेष करून एकपङ्क्तीस भोजन किंवा एकत्र अनुष्ठान कधींच करीत नाहींत. ज्या गांवांत महाराष्ट्र, गुर्जर, तैलङ्ग, द्रविड मिळोन शेंपन्नास ब्राह्मण आहेत, त्या गांवांत पळशे यांणीं कोणा एका देवाची प्रतिष्ठा केली असतां तेथें सर्व ब्राह्मण प्रसिद्धपणें देवाची पूजा व दर्शनादिक करितात कीं नाहीं? ऐसें तुह्मांस काय ठाऊक आहे ?

१ आबाजी माधवराव सही.

१ चित्पावन व कऱ्हाडेब्राह्मण आहेत, त्यांशिवाय यजुर्वेदी ब्राह्मणांशीं एकपङ्क्तीस भोजन व अनुष्ठान होत आहे. चित्पावन व कऱ्हाडे ब्राह्मण यजुर्वेदीब्राह्मणांशीं द्वेष वीस-बावीस वर्षें करून भोजन व अनुष्ठान त्र्यम्बकांत करीत नाहींत. नासिकत्र्यम्बकाकडे पळशे यांणीं कोणी एक देवाची प्रतिष्ठा केली नाहीं. कोंकण प्रान्तीं पळशे यांणीं देवालयें बान्धून प्रतिष्ठा केली. तेथें सर्व लोक दर्शनास व पूजेस जात आहेत.

नाना रामचन्द्र सही.

तारीख १४ जून सन १८२४ इसवी.

Delivered on oath before me this 14th of June 1824.

(Signed.) W. W. BOYD.

Nassik. A. Magt.

नकल लिहिली. ता। ४ माहे आगष्ट सन १८७७.

धोण्डो रामचन्द्र कारकून.

रुजू, अस्सल बरहुकूम.

शिक्का. कोर्ट ठाणें.

अस्सल बर्हुकूम नकल. ता। ४ माहे आगष्ट सन १८७७ इा.

(Signed.) H. BATTS.

असिस्टन्ट जज्य.

विश्वनाथ गोविन्द.

ही नक्कल मिळण्याविषयीं लक्ष्मण गोविन्द जोशी यांणीं अर्ज नम्बर १२०३ चा केल्यावरून दिल्ही असे.

सदर्हू नकलेची फी ८९८६ खर्च झाला असे. ता। मजकूर.

धोण्डो रामचन्द्र कारकून. बाळकृष्ण शिवराम दफ्तरदार.

## परिशिष्ट (क्ष*).

## वे. रा. रा. गङ्गाधर आपा नाईक ह्यास पाटिलकी दिली त्याबद्दल मिळालेली सनद.

### शके १७५३ (इ. स. १८३१.)

जिल्हा
कोंकण
माजिस्त्रेट.

सनद् अजतर्फ सरकार माजिस्त्रेट जिल्हा कोंकण. बेदमी—गङ्गाधर आपा पाटील नाईक वाजसनीब्राह्मण राहणार मौजे वाढिव सरवली परगणे माहीम तालुके. सुरुसन इहिद्दे सलासिन मयातैन व अलफ. हल्लीं तुह्मांस मौजे मजकूर या गांवचे पोलिसाचा कारभारी सरकारांतून केलें असे; तरी तुह्मीं हुशारीनें मौजे मजकूरची खबरदारी राखणें आणि गुन्हेगार लोकांस धरणें व गुन्हे होऊं न देणें; माजिस्त्रेट साहेब अगर तालुके मजकूरचे अमलदार जो हुकूम करतील, त्याप्रमाणें खबरदारीनें वर्तणूक करणें व मौजेमजकूरचे बलोतेदार यांजपासून जसें ज्याचें काम असेल तसें त्याजवळोन चाकरी घेणें; हें सर्व सरकारी कायद्यांत फर्माविलें आहे त्याप्रमाणें तुह्मीं करणें. त्या कायद्यांतील कलमाची नक्कल तुह्मांस या सनदेबरोबर दिल्ही असे. जाणिजे. छ १७ माहे सवाल, मिती चैत्रवद्य ४ शके १७५३ खरनामसंवत्सर. इंग्रेजी तारीख १ माहे एप्रील सन १८३१.

(Signed) L. R. REID.

कलेक्टर साहेबांची.

---

* ही अस्सल सनद मोडी लिपींत असून ती, वे० रा० रा० त्र्यम्बक दिनकर पाटील वाशीमकर. हल्लीं वस्ती केळवें ह्यांजपाशीं आहे.

# परिशिष्ट ( ज्ञ* ).

## मुल्हेरकर गोपाळशास्त्री सर्म्याविषयीं.

### शके १७५४ ( इ० स० १८३२. )

*Extract from the Bombay "Native Observer," dated Thursday, the 20th September* 1832.

Having observed in the *Gazette* of the 8th instant, that a meeting of Brahmins had been assembled at Bhooleshwar to pass sentence upon one Gopal Shastree, for having eaten with a Yajurvedee Brahmin; and also seeing that some unmerited slurs had been thrown upon the Joshee tribe by them, I think it my duty, as an impartial spectator, to see justice done to that highly respectable class of the native community of this Island, and to prove the falsehood of those who have endeavoured to lower their caste by calling them Pulsheas and making use of other opprobrious epithets. I must commence my statement with the first arrival of the Yajurvedee Brahmins in this country, and therefore, I trust that you will be kind enough to give this communication, although a lengthened one, a place in your paper.

1. Many centuries ago, when Bheem Rajah took possession of the Conkan, a number of the Yajurvedee or Wajasanee Brahmins, together with many other castes, accompanied him and granted permission to these Yajurvedee Brahmins on particular day to perform the religious ceremonies connected with the whole of the different tribes assembled, and granted a Sunnad to this effect, which is now in the possession of these Brahmins, granting them also Inam lands. Many kings succeeded the said Bheem Rajah, and they also confirmed what he had previously done; at length the reign of the Peishwas began, and they also, on examining the old documents, granted new ones, enabling them to perform the ceremonies that former Princes had allowed them to perform, all of which original papers are in the possession of the Yajurvedee Brahmins; in addition to all these Patents there is one given by the British Government from which I give an extract.—(*Vide* this Patent at page 192 of the *Appendix.*)

2. On the Portuguese conquering this country, the Hindoo temples were destroyed and no native religious ceremonies were allowed to be performed, but when they were driven out, the British took possession of the country, and with that good feeling which they have always shewn towards the natives allowed them the free use of their religion, and in consequence of such permission, the image at Bhooleshwar, taken out of the place in which it had been secreted, (and?) was consecrated by one Mallar Naik of the said Yajurvedee caste; how then can the Brahmins of the present day, say that the claims of the Yajurvedees to Brahminhood are not generally acknowledged, when they themselves up to this moment worship the said image (Lingum) which was, as I have before said, consecrated by Mallar Naik? After the consecration of the above-named image at Bhooleshwar, the idol at Maha-Luxmee (Breach Candy) was consecrated by Shama Charia, the holder of the Patent from the British Government, and the Hindoos up to this date pay their adorations at that shrine. After this many images were consecrated by the Yajurvedee Brahmins in this country.

3. When the Peishwa took Bassein from the Portuguese, one Annunt Joshee erected a temple and placed the idol of Chakreshwar Mahadeo after having consecrated it in the temple, and all Hindoos worship this image; whenever the Peishwa addressed one of the Yajurvedee caste, the letter was always addressed to the individual with this title—*Vedamoohoortee*—a title only given to Brahmins in general, and to no other caste, and these very Brahmins who have now thrown this slur upon the Yajurvedees address them in the same way; how then dare they say that they are not Brahmins?

4. A number of the Brahmins who lately assembled at Bhooleshwar to pass sentence upon Gopal Shastree, have been guilty of the very offence (as they call it) of which he was accused, and to my certain knowledge both the uncle and father of this Gopal Shastree as well as himself have always been in the habit of taking their meals at the house of Yajurvedee Brahmins for many years, which was well known to a great portion of the community, if then this was a crime

according to Hindoo Law, why were not the offenders punished long before ?

5. It has lately been ascertained that a woman of the Gorao (mind not Gooroo) tribe, a very inferior caste, has been for a considerable time residing with a Brahmin, and has been in the constant habit of cooking not only his meals but the meals of those who visited him; if this is not an offence according to Brahmanical Law, God knows what it is; and therefore those who have so polluted themselves ought not surely to have been allowed to sit in an assembly which was to take into its serious consideration matters of Brahmanical faith. Numbers of the same caste of Brahmins as those to whom I have alluded to are also in the constant habit of attending on dancing women and other mighty immoral persons as musicians, thereby degrading their character as Brahmins and acting contrary to all religion, not only committing heinous sins themselves, but causing others to believe that their acts are not guilty by countenancing, as Brahmins, such immoral and irreligious conduct. I appeal to any of your readers whether persons of the same caste as those above-named are fit to sit in judgment on any religious offence? And I also defy any person of any caste whatsoever to say that any individual of the Yajurvedee caste of Brahmins has been guilty of similar offences, and I imagine that few native families are so well regulated as those of the Joshee tribe.

6. A great portion of the motley assembly who passed sentence on Gopal Shastree was composed of Chitpawan or Conkny Brahmins, and I will leave it to your native readers (aye! and European also) to judge of the general character of this class of Brahmins, who are well known to be most licentious in their habits, even prostituting their families for the sake of livelihood (for decency's sake I will not enter into particulars), and I may, although a Hindoo, I trust, without offence, quote a phrase from Scripture and advise these said Brahmins to *pluck out the beam from their own eye before they look at the mote in the eyes of others.* I will not, Mr. Editor, tire your readers with any further details, and I have to apologize for taking so large a space in your columns.

SPECTATOR.

## वरील इंग्लिशमजकुराचा सारांश.

**बाम्बे नेटीव ऑब्झर्व्हर, गुरुवार तारीख २० सप्टेम्बर सन १८३४.**

मुम्बईतील प्राचीन शुक्लयजुर्वेदीब्राह्मणांबरोबर जेवल्यामुळें कोणीएक गोपाळ शास्त्री (सर्गे मुल्हेरकर बागलाणी) ह्यास शिक्षा (प्रायश्चित्त) देण्याकरितां भुलेश्वरीं कांहीं ब्राह्मणांची सभा भरली होती, असें तारीख ८ मिनहूच्या गझेटांत वाचल्यावरून व सदर्हू यजुर्वेद्यांच्या जातीवर (जोशीलोकांवर) अपशब्दांचा भडिमार झाला आहे असें पाहून 'निःपक्षपाती प्रेक्षक' या नात्यानें त्या अतिसन्माननीय जातीचा रास्त न्याय करणें व त्यांस 'पळशे' हें नांव व दुसरींहि अनुचित नांवें ठेवून त्यांच्या जातीस नीचत्व आणण्याचा ज्यांनीं प्रयत्न केला आहे, त्यांचें ह्मणणें अगदीं निराधार व असत्य आहे, हें दाखविणें एक माझें कर्तव्यकर्म आहे असें मीं समजतों. हे यजुर्वेदीब्राह्मण येथें आले त्या दिवसापासून आजपर्यन्तची हकीगत देणें जरूर आहे. ह्मणून हें पत्र जरी लांब आहे, तरी मेहेरबानी करून ह्यास आपल्या पत्रीं जागा द्याल अशी आशा आहे.

१. बहुत शतकांपूर्वीं राजाबिम्बानें कोंकण आपल्या हस्तगत करून घेतलें, त्यावेळीं पुष्कळ यजुर्वेदी किंवा वाजसनेयब्राह्मण व दुसऱ्या अनेक जाती त्याजबरोबर येथें आल्या. तेव्हांपासून इकडील सर्व जातींकडील हरएक धर्मसम्बन्धीं उपाध्यिककर्म करण्याची परवानगी राजा बिम्बानें ह्या यजुर्वेद्यांसच दिली व तत्सम्बन्धीं त्यांस सनदहि करून देऊन जमीनहि इनाम दिली. ही सनद ह्या ब्राह्मणांकडे आज दिवसपर्यन्त आहे. बिम्बानन्तर पुष्कळ राजे झाले; त्यांनींहि बिम्बाचे ठराव वेळोवेळीं बहाल केले; शेवटीं पेशवाई सुरू झाली. पेशव्यांनींहि जुने कागदपत्र पाहून त्यांस (ह्या यजुर्वेद्यांस) नवे कागदपत्र करून देऊन, पूर्वींच्या राजांनीं ह्यांचें चालविलेलें धर्मसम्बन्धीं सर्व उपाध्यिक कायम केलें.

हे सर्व अस्सल दस्तऐवज ह्या यजुर्वेद्यांपाशीं आहेत. ह्या खेरीज ब्रिटिशसरकारानें दिलेल्या पेटण्टांपैकीं (सनदपट्यांपैकीं) एका पेटण्टाचा उतारा खालीं देतों:—

( हें पेटण्ट परिशिष्टांतील १९२ पृष्ठावर पहा. )

२. हा देश पोर्तुगिजांच्या हातीं गेल्यावर त्यांनीं हिन्दूंच्या देवालयांचा विध्वंस केला व कोणतेंहि धर्मकृत्य होऊं दिलें नाहीं. पुढें पोर्तुगिजांस हांकून लावल्यावर हा देश ब्रिटिशांच्या हातीं आला. नेटिवांवर (एतद्देशीयांवर) जी त्यांची निरन्तर दया असते त्याअन्वयें त्यांस (वरील यजुर्वेद्यांस) आपल्या धर्माप्रमाणें चालण्याची परवानगी दिली. ही परवानगी मिळाल्यावरून ह्या यजुर्वेद्यांपैकीं मल्हार नाईक नामक एका ब्राह्मणानें श्रीभुलेश्वराचें लिङ्ग ( कोणीं स्थानभ्रष्ट करून छपवून ठेविलेलें) काढून त्याची प्रतिष्ठा केली. असें असतां, वर दर्शित केल्याप्रमाणें मल्हार नाईकानें ज्या लिङ्गाची प्रतिष्ठा केली, त्याच लिङ्गाची पूजा हे सभा भरविणारे ब्राह्मण आजपर्यन्त करीत असूनहि ह्यांचे ( यजुर्वेद्यांचे ) ब्राह्मणत्वाचे हक्क सर्वमान्य नाहींत, असें हे ब्राह्मण कोणत्या आधारांवरून ह्मणूं शकतात ? भुलेश्वराची प्रतिष्ठा झाल्यानन्तर महालक्ष्मी (ब्रीचक्याण्डी) येथील देवीची प्रतिष्ठा शामाचार्यानें ( ज्यास ब्रिटिशसरकारचें पेटेन्ट आहे त्यानें ) केली आणि आजमितीपर्यन्त सर्व हिन्दुलोक त्या देवीची पूजा करीत आहेत. पुढें ह्या यजुर्वेदी ब्राह्मणांनीं पुष्कळ मूर्तींच्या प्रतिष्ठा ह्या प्रान्तांत केल्या आहेत.

३. पेशव्यांनीं पोर्तुगिजांपासून वसई घेतली, त्यावेळीं ह्या यजुर्वेद्यांपैकीं अनन्त जोशी नांवाच्या एका ब्राह्मणानें देवालय बान्धून त्यांत चक्रेश्वरमहादेवाच्या लिङ्गाची प्रतिष्ठा केली; आणि सर्व हिन्दुमात्र या मूर्तीची पूजा करितात. जेव्हां जेव्हां पेशव्यांनीं ह्या यजुर्वेद्यांस पत्रें लिहिलीं आहेत, तेव्हां तेव्हां त्यांस "वेदमूर्ति" हीं अक्षरें त्यांच्या नांवापूर्वी लिहिलीं आहेत. हीं अक्षरें ब्राह्मणांवांचून इतरांस लावीत नाहींत. खुद्द हेच ब्राह्मण, जे हल्लीं ह्या

यजुर्वेद्यांस दूषणें देतात, ते देखील, सदहूप्रमाणें पत्रें लिहित आले आहेत; तर ते (यजुर्वेदी) ब्राह्मण नाहींत, असें ह्मणण्याचें धाडस ते कसें करूं शकतात?

४. गोपाळ*शास्त्री ह्यांस प्रायश्चित्त देण्याकरितां भुलेश्वरीं जमलेल्या ब्राह्मणांपैकीं बहुतेकजण, त्याजवर शाबीद केलेल्या (त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें) गुन्हयाबद्दलचे गुन्हेगार आहेत. आज बहुत वर्षांपासून हा गोपाळशास्त्री, त्याचा चुलता व बाप, हे ह्या यजुर्वेद्यांकडेस जेवीत आले आहेत व हें ह्यांपैकीं पुष्कळांस विदित आहे, असें मीं खात्रीपूर्वक सांगतों. असें असून हिन्दुधर्माप्रमाणें हा गुन्हेगार होतो असें आहे, तर गुन्हेगारास शिक्षा पूर्वींच कां झाली नाहीं?

५. अलीकडे असें समजण्यांत आलें आहे कीं, एका गुरव (गुरु नव्हे हें पक्कें समजा!) ह्मणजे अति नीच जातीच्या मनुष्याची स्त्री फार दिवसांपासून एका ब्राह्मणाबरोबर राहत आहे व ती नेहमीं, त्यालाच काय, पण त्याजकडे सर्व येणारे ब्राह्मणांस देखील स्वयंपाक करून घालित आहे व ब्राह्मणीशास्त्राप्रमाणें (तें शास्त्र-काय असेल तें एका ईश्वरासच माहित!) हा जर गुन्हेगार नव्हे तर ह्यास काय ह्मणावें? ह्मणून ह्याप्रमाणें जे बाटले त्यांस

* सदहू गोपाळशास्त्री वरील यजुर्वेद्यांकडे लहानाचा थोर होऊन विद्याभ्यास वगैरे ह्याच यजुर्वेद्यांपासून करून, शेवटीं शास्त्री बनला, आणि लग्न झाल्यानन्तरहि सहकुटुम्ब ह्यांच्यांतच राहत असतां, द्रव्याच्या लालचीनें वरील सभेनें त्याजवर असा प्रसङ्ग गुजरविण्याचा विचार केला; परन्तु गोपाळशास्त्री व त्याचे सुहृत्सम्बन्धी ह्या परस्परांचे अन्नोदकव्यवहार गांवीं व परगांवीं अक्षय होत असतां ह्यास जर प्रायश्चित्त द्यावें तर, जे शेंकडो लोक त्याजबरोबर जेवित गेले त्यांस प्रायश्चित्त देण्याच्या इरादानें ह्या सभेंत कां बोलाविलें नाहीं? ह्याचा विचार सभासदांनीं कां केला नाहीं? तेव्हां, वरील यजुर्वेद्यांकडे हा गोपाळशास्त्री व त्याचे अनुयायी, सुहृत्सम्बन्धी, सोयरेधायरे, आईबाप वगैरे जेवीत असतांहि तो द्रव्याच्या आशेनें भस्मासुरासारखी व्यवस्था करण्यास सिद्ध झाला; तेव्हां अर्थातच भस्मासुराप्रमाणें आपल्या हातींच आपला नाश करून घेतला हें उघड आहे. वाहवारे सभा व तिचे सभासद!! त्यांच्या अकलेपुढें तर हातच टेंकण्याचा प्रसङ्ग येईल!! वाचक हो, ह्या सभासदांच्या न्यायीपणाचा तुह्मींच विचार करा.

असल्या सभेंत (जी सभा ब्राह्मणधर्माच्या गहन विषयावर विचार करण्यास जमली होती तींत) घ्यावयाचें नव्हतें. वर दर्शित केलेल्या ब्राह्मणांपैकीं पुष्कळजण नाचणाऱ्या व नीतिभ्रष्ट कलावन्तिणीच्या मागें तबलजींचीं कामें करितात, जीं खरोखर ब्राह्मणत्वास हानि आणणारीं असून सर्व धर्मबाह्य आहेत. ते स्वतःच अशीं अघोर कर्मे करितात इतकेंच नव्हे, तर अशीं धर्मबाह्य व अनीतीचीं कामें करूनहि इतरांस असा भास करून देतात कीं, आह्मीं करितों तें सर्व निर्दोष आहे. तर आमचे वाचकांस इतकेंच विचारणें आहे कीं, ह्या जातीचे ह्मणजे वर दर्शित केलेले जातीचे लोक धर्मसम्बन्धाचे बाबतींत न्याय करण्यास बसण्याचे कामीं योग्य आहेत काय? ह्या यजुर्वेद्यांपैकीं अशा गुन्ह्याबद्दल एखादा इसम अपराधी ठरला आहे, असें कोणत्याहि जातींतील एकानें तरी काढून दाखवावें, असें मी आग्रहपूर्वक त्यांस विचारतों व माझा असा समज आहे कीं, त्या (जोश्यांच्या) ज्ञातीप्रमाणें नेमस्त चालणारी ज्ञात क्वचित् आढळेल.

६. ह्या पञ्चरङ्गी (विजातीय) सभेंत गोपाळशास्त्र्यास प्रायश्चित्त देण्याकरितां जमलेल्यांपैकीं बरेच इसम चित्पावन किंवा कोंकणी ब्राह्मण होते. दुर्व्यसनांत पटाईत अशा त्या चित्पावनांच्या जातीच्या लोकांची साधारण वर्तणूक कशी असते? ह्याचा विचार करणें मी आपल्या (एतद्देशीय व युरोपियन) वाचकांकडे सोंपवितों. उदाहरणार्थ, आपल्या कुटुम्बास सुद्धां * * *
(शरमेमुळें आणखीं उदाहरणें देण्यास सङ्कोच वाटतो.) मीं स्वतः हिन्दु आहें, तरी बायबलांतील एक ह्मण आपणांस दाखवितों व त्यांस (वरील ब्राह्मणांस) असें सुचवितों कीं, त्यांनीं दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळ काढण्यापेक्षां आपल्या डोळ्यांतील मुसळ काढावें हें बरें आहे. * * * * *

## परिशिष्ट (अ २*)

## वे० रा० रा० नाना बापू जोशी ह्यांचा वृत्तीसम्बन्धीं दस्तऐवज शके १७६२ इ० स० १८४०.

फरोक्तखत शके १७६२ शार्वरीनाम संवत्सरे माहे वैशाख शुद्ध ७ भृगुवार ते दिवशीं फरोक्त लिहून घेणार वे. रा. रा. नाना बापू जोशी वस्ती मौजे बोळिञ्ज तर्फ आगाशी, तालुके वसई, यांसीं फरोक्त करदे (करून देणार) गङ्गाबाई अयाळ केशव गौतम नाईक याची स्त्री व पाण्डुरङ्ग गौतम नाईक व नाना बापू नाईक व विठू बापू नाईक एकूण असामी ४ वस्ती मौजे मजकूर कारणें—आह्मीं तुह्मांजवळून रुपये दोनशें एक (२०१) पुणें शिक्का घेऊन आह्मीं आमचें इष्टेट तुह्मांस फरोक्त देतों, त्याचा तपशील येणेंप्रमाणें:—

१ मौजे मजकूर, आमचें राहतें घर कौलारी जमीन इमला परसुं (वाडा) व विहीर झाडझाडोरासुद्धां आहे, त्यापैकीं निम्में घर व निम्में वाडा व निम्में विहिरीसुद्धां पूर्वेकडील आह्मीं पेशजी लखमणनाथ नाईक बोळिञ्जकर यांस फरोक्त दिल्हें आहे. बाकी निम्में पश्चिमेकडील हल्लीं तुह्मांस फरोक्त दिल्हें तें.

० लंग

१ परगणे सायबान, तालुके वसई, येथील आमचे जोशीपणाचे गांव आहेत ते येणेंप्रों:—

१ मौजे विरार.
१ मौजे चोरघोडी.
१ मौजे मोहोरे.
१ मौजे कोळवडी.
१ मौजे नारङ्गी.
१ मौजे डोङ्गरपाडा.
१ मौजे चिखलडोङ्गरें.

७

सदर्हू आह्मीं आमचें घर निम्में व वृत्तीचे गांव जोशीपणाचे सात तुह्मांपासून रुपये दोनशें एक घेऊन आह्मीं तुह्मांस वर लिहिलेलें फरोक्त दिल्हें असे. तरी तुह्मीं पुत्रपौत्रादि वंशपरम्परेनें उपभोग सुखरूप घेत जावा. याजवर आमचा कोण्ही वालीवारस

लिकलम सखाराम रामचन्द्र बाग वाहिंत.

* हें अस्सल फरोक्तखत मोडी लिपींत असून तें, वे. रा. रा. लक्ष्मण बावा भट्ट पुरन्दरे निफाडकर हल्लीं वस्ती वसई ह्यांजपाशीं आहे.

तुह्मांस दरदावा सांगूं लागल्यास त्याचा जाब आह्मीं करूं. हें फरोक्तखत आह्मीं चौघेजणांनीं एकाजतीनें, एकामतीनें, राजीरजावन्दीनें (व) स्वसन्तोषें लिहून दिल्हें. सही. तारीख ८ माहे मे, सन १८४० सु० आर्बैन मयातैन व अलफ. संवत् १८९६.

साक्ष.

१ राघो हरी नाईक वस्ती वसई.
१ हरी पुतळाजी पाटील वा॥ वसई.
१ रामजी बाळ पाटील नारङ्गीकर हस्ताक्षरखुद्द.
१ पिल्या जीवन पाटील, साक्ष हस्ताक्षर खुद्द, विरारकर.
१ धरमा येसू पाटील बोळिञ्जकर.
१ लखमणनाथ नाईक खलारकर हल्लीं वा॥ बोळिञ्ज हा॥ मुकुन्द हर नाईक बोळिञ्जकर.
१ पाण्ड्या हर पाटेल डोङ्गरकर (पुढें लागत नाहीं.)

सह्या.

१ गङ्गाबाई अयाळ केशव गोतम नाईक, निशाणी तुळसीची माळ हा॥ पाण्डुरङ्ग गौतम नाईक.
१ पाण्डुरङ्ग गौतम नाईक सही दस्तुरखुद्द.
१ नाना बापू नाईक बोळिञ्जकर हा॥ खुद्द, वर लिहिल्या प्रों सही.
१ विठू बापू नाईक बोळिञ्जकर हा॥ खुद्द वर लिहिल्या प्रों सही.

---

## परिशिष्ट (आ २*)

### वे० रा० रा० सखाराम नाना आचार्य ह्यांच्या तर्फे ज्योतिषपणाचे वृत्तीचा झालेला निवाडा—

### शके १७७२ (इ० सन १८५०)

प्रिन्सिपाल
सदर अमीन
मु॥ ठाणें जिल्हा
कोंकण.

जज्य साहेब जिल्हा कोंकण यांचे कोडतांतून

. फिर्याद आली. दावा १०० रुपये.

---

* हा अस्सल निवाडा मोडी लिपींत असून तो, वे० रा० रा० नारायण, काशीनाथ, अमृतराव, व गोविन्द सखाराम आचार्य पुणताम्बेकर हल्लीं वस्ती भिवण्डी ह्यांजपाशीं आहे.

निवाडपत्र विद्यमान पाण्डुरङ्ग मोरेश्वर प्रिन्सिपाल सदर अमीन जिल्हा कोंकण मुकाम ठाणें, तारीख २६ माहे एप्रिल सन १८५०, शके १७७२ साधारण नाम संवत्सरे, सुरुसन खमसैन मयातैन व अलफ, संवत् १९०६.

प्रिन्सिपाल सदर अमीन कोर्डताचें निवाडपत्र.

वादी.

वादी प्रतिवादींचीं नांवें.

सखाराम नाना आचार्य वा। को। भिवण्डी वकील—हरी बाजी हजर आहे.

प्रतिवादी.

१ मोरोबा लाल जोशी वा। शिराळें, हल्लीं मयत याचे वारीस लेंक—

| | |
|---|---|
| १ बाळकृष्ण मोरेश्वर. | वकील नारायण जनार्दन, हजर आहे. |
| १ बापू मोरेश्वर. | |
| १ विष्णु मोरेश्वर. | |
| १ बायको रखमाबाई. | |

एकूण असामी चार वा। मौजे शिराळें, तर्फ खाम्बाळें.

१ विठ्ठल अमृतेश्वर माधवी, हल्लीं मयत, याची इष्टेट वारीस बायको रमाबाई कोम विठ्ठल अमृतेश्वर माधवी राहणार मुम्बई बाहेर कोट भुलेश्वराजवळ. इचा कुलअखत्यारी आबाभट्ट बिन् खण्डभट्टजी पुणगे वा। शिराळें तालुके भिवण्डी.

वकील नारायण जनार्दन हजर आहे.

दावा ज्योतिषपणाचे वृत्तीचे गांव वगैरे मालकीनें गहाण लावून दिल्हे आहेत, ते रद्द होऊन वृत्तीचे उत्पन्नावरील जप्ती दूर होण्याविषयीं एक सालचे उत्पन्नाचे दसपटीअन्वयें रुपये १००० हजारची आज वादी सखाराम नाना आचार्य व त्याचा वकील व वारस प्रतिवादींपैकीं बाळकृष्ण व बापू व आबाभट्ट यांचा वकील असे हजर आहेत, बाकी असामी हजर नाहींत.

फिर्यादीची बाबत.

साक्षीदार हजर किंवा गैरहजर.

ही फिर्याद ता २८ माहे सप्टम्बर सन १८४९ मिा अश्विन शुद्ध ११ शके १७७१ रोजीं जज्य साहेबांचे कोर्टीत दिल्ही, ती तेथें त्याच तारखेस फैल होऊन त्या तारखेचे हुकुमाबरोबर या कोडतांत आली, ती येथें सदहू तारखेस फैल जाहली आहे.

फिर्याद फैल केल्याचा प्रकार.

नन्तर प्रावादी मोरोबा लाल मयत जाहला; सबब त्याचे वारीस लेंक बाळकृष्ण मोरेश्वर व बापू मोरेश्वर व विष्णु मोरेश्वर व बायको रखमाबाई ह्यांचीं नांवें वादी सखाराम नाना आचार्य याणें मिा २७ चा अर्ज देऊन दाखल करविलीं आहेत.

पो त्याचे वारसांचीं नांवें दाखल केल्याचा प्रकार.

वारीस प्रावादी याजला समान पाठविलें, तें विष्णु याजला पोंहचलें; परन्तु तो अज्ञान आहे सबब त्याणें समानावर सही केली नाहीं आणि रखमाबाई ही लग्नास गेली होती, याजमुळें तिजला समान पोहोंचलें नाहीं; सबब नोटीस केली तेव्हां ती महालांत फिरावयास गेली होती; सबब नोटिसीची नक्कल तिचे सुनेचे हातांत दिल्ही आहे. परन्तु रखमाबाई ही हजर जाहली नाहीं व विष्णूचे पालनकरणाराचें नांव वादी सखाराम नाना आचार्य याणें दाखल केलें नाहीं.

प्रावादीस समान नोटीस पोंहचल्याचा प्रकार.

प्रावादी बाळकृष्ण बापू यांणीं वृत्तीचे गांव किती चालू आहेत व मोरोबा लाल याचे देण्याघेण्याची वहिवाट त्याची बायको करीत असे. हल्लीं आह्मीं करितों व बापूजोशी व आह्मीं विभक्त आहों, या शाबिदीकरितां चार साक्षीदार दिल्हे, त्यांपैकीं दोन असामींच्या जबान्या झाल्या आहेत; तेव्हां त्याच बाबतीचे आणखी साक्षी घेण्याचें कांहींच कारण नाहीं, सबब बाकी दोन साक्षीदार गोविन्द व चाङ्गपाटील यांच्या साक्षी घेणें रद्द केल्या असत.

साक्ष रद्द केल्याचें कारण.

फिर्यादीचा सारांश.

वादी सखाराम नाना आचार्य यांचा फिर्याद करण्याचा हंशील मुद्दा असा आहे कीं, तर्फ सोनाळें व कुन्दें व दुर्गाडी व खाम्बाळें या महालचे ज्योतिष-पणाच्या वृत्तीची वहिवाट माजी राज्यांत कांहीं दिवस आमचे तीर्थरूप नारायण जोशी यांजकडे व कांहीं दिवस प्रावादी मोरोबा लाल याचा चुलता बापू जोशी याजकडे चालोन, पुढें समायिक वहिवाट चालवून उत्पन्न, नफ्याबाबद होईल तें निमो-निम वांटून घेऊं; ह्मणोन ठराव करून बापू जोशी याणें आमचे तीर्थरूपांस पत्र शके १७२६ वैशाख वद्य १० मी ह्मणजे सन १८४४।४५ सालीं लिहून दिल्हें आहे आणि वहिवाट कांहीं वर्षें चालविली. नन्तर हरकत करूं लागला. तेव्हां आमचे तीर्थ-रूपांनीं सन १८५६।५७, शके १७३८ सालीं कल्याणचे मामलेदार यांजकडे फिर्याद केली; तेव्हां मागील सालचे निम्मे हिशाबाबद आमचे तीर्थरूपांस बापू जोशी याणें रुपये २५ द्यावे आणि वहिवाट पुढें निमोनिम चालवावी, असें ठरवून बापू जोशी याचा कागद सरकारांत लिहून घेतला आणि वहिवाट बापू जोशी व प्रावादी मोरोबा लाल हे करीत आले. नन्तर त्याणें आमचे वहिवाटीचा मजकूर असिस्टण्ट कलेक्टर साहेब यांस दाखल कर-ण्याचा छपवून तीन महालची सनद सन १८२४ सालीं आपले नांवें घेतली; व सोनाळें महालचे नऊ गांवचा हुकूम घुले यांस देवविला. त्याजवरून मीं कलेक्टर साहेबांस ता॥२३ आगष्ट सन १८२९ चा अर्ज केला, त्याचे चौकशींत प्रावादी मोरोबा लाल याणें सरकारांत करारनामा लिहून दिल्हा कीं, सन १८१६।१७ पर्यन्त सखाराम नाना आचार्य यांचा भोगवटा शाबूद जाहल्यास सरकार हुकूम करील त्यास कबूल आहें. त्या-जवरून सदहू चौकशी केल्यावर, आमचा भोगवटा शाबूद आहे ह्मणोन दफ्तरदार यांहीं रपोट केला, त्याचे फैसल्याचा हुकूम माझे गैरहजिरीमुळें होणें राहिला. नन्तर सन १८३३।४८ सालांत

पुन्हा मीं अर्ज केल्यावर, प्रावादी मोरोबा लाल व त्याचा कारकून बळवन्तराव असे आह्मांकडे येऊन, पूर्वींपासोन वहिवाट निमोनिम वृत्तीचा ऐवज घेण्याची चालत आली, त्याप्रों चालविण्याची कबूल करून माझे नांवानें कराराचा दस्तऐवज ता २१ सपटम्बर सन १८४८ रोजीं लिहून दिल्हा. नन्तर प्रावादी मोरोबा लाल हा मुका असोन त्याजला कांहीं समजत नसतां, सदहू करार बनावटीचा केला आहे, असा अर्ज त्याचे मुलानें फौजदारींत केला. त्याचे चौकशींत मोरोबा लाल हा समजदार हुशार आहे, अशी खात्री होऊन त्याचा अर्ज रद्द केला. ऐसियास पहिला प्रावादी याणें दुसरा प्रावादी यास वृत्तीचे गांव गहाणखतांत लिहून दिल्हे. त्या गहाणखतावरून मोरोबा लाल याजवर व दुसरे असामींवर फिर्याद करून निवाडा करून घेतला; आणि दरोबस्त वृत्तीचे उत्पन्नावर टांच मारवून ऐवज घेतला आहे. त्यास पहिला प्रावादी व दुसरा प्रावादी याचा आमचे निम्मेवृत्तीवर सम्बन्ध नसोन गहाणखतांत लिहून देतो व घेतात तें वाजवी नाहीं. ते गांव येणेप्रमाणेः—

११ तर्फ दुर्गाड या महालचे गांवः—

| | | | |
|---|---|---|---|
| १ मौजे आंवळें. | १ मौजे कासिंबे. | १ मौजे दलाडें. | १ मौजे आसनाळी |
| १ मौजे दिगासी. | १ मौजे चोण. | १ मौजे महारभीड. | १ मौजे आंवाडी. |
| १ मौजे पाहरें. | १ मौजे वारट. | १ मौजे झिरकें. | ० लग. |
| ३ | ३ | ३ | २ |

११

१४ तर्फ खाम्बाळें या महालचे गांवः—

१ मौजे गोदाड. १ मौजे शिराळें. १ मौजे उम्बरखेड. १ मौजे दुधणी.
१ मौजे वाहाणें. १ मौजे देवचोण. १ मौजे घोटेवार. १ मौजे कान्देवली बु.
१ मौजे खावाळ. १ मौजे चरघर. १ मौजे माहाण. १ मौजे जाम्बिवली.
१ मौजे कान्देवली खुर्द. १ मौजे साहागांव.

१४

१९ तर्फ कुन्दें या महालचे गांवः—

| | | | |
|---|---|---|---|
| १ मौजे मागाटण. | १ मौजे किरवली. | १ मौजे येकसाल. | १ मौजे करमळें. |
| १ मौजे खदरोड. | १ मौजे ह्मसवाड. | १ मौजे पाली. | १ मौजे खरवली. |
| १ मौजे घारण. | १ मौजे जाळसेत. | १ मौजे कारलें. | १ मौजे चिञ्चवली |
| १ मौजे उसरें. | १ को। खुरदे. | १ मौजे खुटवली. | ० लग |

४० १९

येणेंप्रों चाळीस गांवांची समायिकवृत्तीची वहिवाट चालत आली असोन, त्या गांवचे निम्मेवृत्तीचें उत्पन्न आमचें. यास्तव त्याजवरून दुसरे प्रा।वादी यांचा टांच उठवून सदहू गांवांपैकीं निम्में गांव सरसनिरस उत्पन्नावर प्रा।वादी मोरोबा लाल यांणीं दस्तऐवजांत वांटून घेण्याविषयीं ठरविलें आहे, त्याप्रों गांव माझे ताब्यांत देववावे.

पुरवणी अर्जाचे हंशील.

नन्तर नि।। ९ चा पुरवणीअर्ज ता। २ अक्टोबर सन १८४९ रोजीं दिल्हा; त्यांत अखत्यारी प्रा।वादी आबाभट्ट यांची वस्ती फिर्यादींत लिहिली नाहीं. त्यास आबाभट्ट हा हल्लीं शिराळें तों भिवण्डी येथें राहत आहे. ती वस्ती त्याचे फिर्यादींत दाखल करावी ह्मणोन लिहून दिल्यावरून त्याप्रों वस्ती दाखल केली आहे.

जाबांतील हंशील.

याजवर अखत्यारी आबाभट्ट याणें जाब नि।। १९ चा ता। ३ नवम्बर सन १८४९ रोजीं दिल्हा; त्यांत प्रा।वादी मोरोबा लाल हा मुका, तोण्डानें बोलतां येत नाहीं; व कानांनीं ऐकूं येत नाहीं; आणि आमचे यजमानांस गांव गहाण लावून दिल्हे, तें खत एकटे मोरोबा लाल याचे नांवाचें नाहीं. त्याची स्त्री व पुत्र या सर्वांचे नांवचें आहे व फिर्यादींत लिहिलेले गांवांपैकीं आठ गांव मोरोबा लाल याच्या भावाबन्दाकडे आहेत. ते आमचे यजमानाकडे गहाण नसोन चालतहि नाहींत, ह्मणोन वगैरे तक्रार लिहिली आहे. आणि मोरोबा लाल याचे वारसांपैकीं बाळकृष्ण व बापू यांणीं जाब नि।। ३९ चा ता। ११ जानेवारी सन १८५० रोजीं दिल्हा. त्यांत वादी हा आमचे जातीचा नसोन पळशा आहे.

तेव्हां त्याजला आमचे वृत्तीचा विभाग मिळणार नाहीं; आणि आमचे वडिलांनीं करार लिहून दिल्याचा जोर फिर्यादींत लिहितो; परन्तु बळवन्तराव राम यास वादीनें सामील करून पाहिजे तसा दस्तऐवज लिहून मोरोबा लाल हा मुका, बोलतां येत नाहीं व ऐकूं येत नाहीं; त्याचे नांवाचीं अक्षरें त्याजपुढें लिहून ठेविलीं ह्मणजे तितकीं काढूं शकेल. त्याजला कज्याच्या नकला घेण्याचा अर्ज अशी खूण करून कपटानें फसवून आह्मांस न कळवितां दस्तऐवज बनाविला आहे; तत्रापि मिताक्षरा व मयूखाचें बूक कोडतांत आहे; त्यांत एकबानीनें केलेला लेख प्रमाण होत नाहीं; असें लिहिलें आहे. त्याजवरून तो लेख रद्द आहे. आणि वृत्तीचें उत्पन्न चारशें रुपयांवर होत असोन शम्भर रुपयांचे दसपटीचा दावा मतलबानें करीत आहे व वादीची वहिवाट ४०।४५ वर्षें नाहीं; व बापू जोशी वर्तमान असतां, घरोटीच्या वांटण्या होऊन निकाल झाला आहे. तेव्हां वृत्तीचा व बापू जोशी याचा सम्बन्ध नाहीं. सनदेंत बापू जोशी याचें नांव लागलें; परन्तु त्याणें वहिवाट केली नाहीं. सनद मिळाल्यापासून आह्मींच उपभोग करितों. वृत्ति मला त्याणें घेतेवेळेस दुसरा भागीदार असला, तत्रापि त्यांपैकीं एकास सनद करून दिल्यावर त्याजवर दुसऱ्याचा दावा चालणार नाहीं; ह्मणोन वगैरे तक्रारी लिहून कळविल्या आहेत. याचें उत्तर वादी सखाराम नाना आचार्य यांणीं दिल्हें नाहीं.

तपासणीचे दिवसाचे दफ्तरांतील सारांश.

त्यास फिर्यादींत लिहिलेले सर्व गांवांचे वृत्तीचा मालक प्रावादी मोरोबा लाल हाच आहे, किंवा त्यांपैकीं निम्मे हिश्शाचा मालक वादी सखाराम नाना आचार्य हा आहे आणि प्रावादी मोरोबा लाल हा मुका आहे, तेव्हां तो समजदार आहे किंवा नासमजदार आहे; इतकीच तजवीज ह्या मुकदम्यांत पाहिली पाहिजे.

वादी कडून पुरवणी.

वादी सखाराम नाना आचार्य याजकडून दस्तऐवज व साक्षींच्या जबान्या कज्यांत दाखल आहेत त्याः—

निशाणीचा अङ्क. दस्तऐवज.

१२ करारपत्र, वृत्तींत निम्मेंहिस्सा प्रावादी मोरोबा लाल याणें कबूल केल्याचे शाबुदीस.

३९ दस्तऐवजीपत्र, वृत्तींत आपला हिस्सा आहे असें शाबीद करण्याकरितां.

४० नकल भगवन्त राव त्र्यम्बक याचे जबानीची. } मागील वहिवाटीचे
४१ नकल श्रीधर बल्लाळ याचे जबानीची. } शाबिदीकरितां.

४२ दस्तऐवजीपत्र, बापू जोशी याचे वृत्तीचें उत्पन्न निमोनिम वांटून घेण्याविषयीं जोशी मजकूर याणें कबूल केलें त्याचे शाबिदीस.

४३ नकल करारनाम्याची, मागील वहिवाट शाबूद झाल्यास सरकार हुकूम कबूल आहे, असें प्रावादी मोरोबा लाल याणें कबूल केल्याचे शाबिदीस.

४४ नकल दफ्तरदार यांणीं सारांश केला त्याची, निमोनिम वृत्ति उभयतांस असावी येविषयींचे शाबिदीकरितां.

४५ नकल जप्तीचे दरखासाची, तण्ड्याचे गांवांची वृत्ति जप्त झाल्याचे शाबिदीकरितां.

६५ नकल नम्बर ५५२ चे कज्यांत प्रावादी मोरोबा लाल वगैरे यांणीं जाब दिल्हा त्याची, प्रावादी मोरोबा लाल हा समजदार मनुष्य आहे असें शाबीद करण्यास.

साक्षींच्या जबान्या.

२० शिवराम भगवान याची.
२१ बळवन्तराव परशुराम याची.
२२ बळवन्तराव राम याची.
२३ बाळकृष्ण अनन्त याची.
२४ बाळकृष्ण परशुराम याची.
२५ गणपतराव जगन्नाथ याची.
४८ आबाजी त्र्यम्बक याची.
४९ दाजी हणमन्त याची.

प्रावादी मोरोबा लाल मयत याचे वारीस बाळकृष्ण व बापू यांजकडून दस्तऐवज सा जबान्या कज्यांत दाखल आहेत त्या :—

प्रावादीकडून पुरावा.

५८ नकल सनदेची, ही वृत्ति आह्मांस सरकारांतोन दिली आहे, असें शाबीद करण्याकरितां.

६० नकल वादीचे अर्जाची निम्में तक्षीम वृत्तींत त्याची नाहीं असें शाबीद करण्याकरितां.

६२ नकल खताची.
६३ नकल निवाड्याची.
} प्रावादी मोरोबा लाल हा आमचे इतल्याखेरीज एकटा दस्तऐवज लिहून देत नसे असें शाबीद करण्यास.

सा जबान्या.

५१ श्रीपत राजाराम याची.
५२ रघु पाो बिन् माहाद पाो याची.

६६ सवाल वादी सखाराम याचे वकिलास ता २४ एप्रिल सन १८५० रोजीं, दहा गांवचे फरकाविषयीं केला त्याचे जबाबांत प्रावादी मोरोबा लाल याणें करार लिहून दिल्ह्याप्रमाणें गांव फिर्यादींत लिहिले आहेत व आबाभट्ट बनावत (!) आज गांवांवर जप्ती नाहीं, ह्मणोन तो या कारणानें फरक पडत असे ह्मणोन वगैरे मजकूर लिहून दिल्हा तो.

सरकार तर्फेचा.

६७ सवाल वारस प्रावादी बाळकृष्ण, बापू यांचे वकिलास ता २४ एप्रिल सन १८५०. रोजीं, फिर्यादींपैकीं दहा गांव जप्तीचे दरखांत नाहींत, ते कोणाचे वहिवाटीस आहेत, ह्मणोन केला त्याचा तपशील त्याणें ता २५ मिनहूस लिहून दिल्हा ; त्यांत ते गांव कोणाकडे आहेत त्याचा तपशील ता २९ मिनहूस दिल्हा.

सदर्हू ह्या मुकदम्याचे दुतर्फा चौकशींत साक्षी, दस्तऐवज मनास आणोन पक्षकार यांचे वकिलाचें बोलणें ऐकून घेऊन विचार करितां दिसोन येतें कीं, वादी सखाराम याणें सन १८२९ चे सालांत मेहेरबान कलेक्टर साहेब

ठरावाचे मुद्दे.

बहादूर यांचे हुजूर अर्ज केला, त्याच अर्जाची नक्कल प्रावादी मोरोबा लाल मयत याचे वारिसांनीं निा ६० ची गुजरविली आहे. त्या अर्जावर दफ्तरदार याजला चौकशी करण्याचा हुकूम झाला. सबब त्यांणीं चौकशी करून सारांश सन १८३० चे सालांत केला; त्याची नक्कल निा ४४ ची दाखल आहे. त्यांत बचम्भट्ट याचे गांव २९ व मी हरभट्ट याचे गांव १६ व बचम्भट्ट व बापू जोशी मिळोन गांव आठ, एकूण एकन्दर ४९ लिहून सदर्हू असामींपैकीं बचम्भट्ट व मल्हार भट्ट याचे वंशाची नक्कल झाली. सबब सदर्हू गांवांचे वृत्तीची वहिवाट सरकारांतून कोणे सालीं कच्चे उत्पन्नाची व कोणे सालीं मक्तयानें बाळकृष्णास देण्याची सनद १८२३।२४ पर्यन्त चालवून, नन्तर सन १८२४ चे सालांत तर्फ दुर्गाड व कुन्दें व खाम्बाळें या तीन महालांपैकीं ३९ गांवचे वृत्तीची सनद बापू जोशी व मोरो जोशी शिराळकर यांस दिल्ही. परन्तु सदर्हू चार महालांची वहिवाट शिराळकर व नारायण जोशी आचार्य यांजकडे सन १८१६।१७ पर्यन्त चालत आली, असें बापू जोशी याणें नारायण जोशी यास सन १८०४।५ सालीं पत्र लिहून दिल्हें, त्याजवरून सन १८१६।१७ सालीं पञ्चाईत झाली. त्यांतील दोन असामींचे जबान्यां वरून नजरेस येतें, याजकरितां वृत्ति बापू जोशी व नारायण जोशी या दोघांस असावी, ह्मणोन वगैरे मजकूर सारांशांत लिहिला आहे. आणि बापू जोशी याणें शके १७२६ ह्मणजे सन १८०४। ५ चे सालांत नाना जोशी ह्मणजे वादी सखाराम याचा बाप यास जें पत्र लिहून दिल्हें, तें पत्र निा ४२ चे मुकदम्यांत दाखल असोन सदर्हू पत्र बापू खारकर याचे हातचें लिहिलेलें आहे. परन्तु तो दहा-पन्धरा वर्षे झालीं तेव्हां मयत झाला आहे व सदर्हू पत्राचे शेवटील अक्षर खुद्द बापू जोशी याचे हातचें लिहिलेलें आहे, असें निा ४८।४९ चे साक्षीवरून शाबीद झालें असोन, बापू जोशी हा मयत प्रावादी मोरोबा लाल याचा सखाचुलता आहे, असें निा ४८।४९ व ५१।५२ चे साक्षींवरून शाबीद आहे. आणि बापू

जोशी याणें निा ४२ चे दस्तऐवजांत नाना जोशी यांसीं असा मजकूर लिहून दिल्हा आहे कीं, आपण मक्तयाचें बोलणें बोलूं नये; ह्मणजे चार महाल आह्मीं कमीमक्तयानें करूं. सरकार व गुमास्ते व हक्कदार फेडून राहील तें उभयतां वांटून पुढें घेत जाऊं. ह्मणोन वगैरे मजकूर त्यांत लिहिला असोन, ह्याच पत्रावरून पुढें पञ्चाईत होऊन, तीन सालांत कांहीं उत्पन्न झालें नाहीं व पाञ्च सालांबाबद निम्मेहिशाचे पञ्चवीस रुपये वादी सखाराम याचा बाप नाना आचार्य यास बापू जोशी याणें द्यावे; असें बापू जोशी यांचे जांवई गोविन्दराव यांचे मार्फतीनें ठराव केला आहे. निा ४० व निा ४१ चे जबान्यांचे नकलेवरून मालूम होतें. याप्रों वादी सखाराम याजकडून मागील वहिवाटीची शाबिदी झाली आहे.

सदरीं लिहिलेले पञ्चाईतीनन्तर वादी सखाराम किंवा त्याचा बाप नाना आचार्य यांची तण्टयाचे गांवांत वहिवाट चालली आहे, अशी कांहींच शाबिदी नाहीं. आणि सन १८२४ चे पूर्वीं नांवरसीमुळें सरकारांतून ज्योतिषपणाचे वृत्तीचे गांवांची वहिवाट करीत होते. ती सरकारची वहिवाट रहित करून तण्टयाचे चाळीस गांवांपैकीं पस्तीस गांवांची वहिवाट सुखरूप करीत जाणेंविषयीं बापू जोशी व मयत प्रावादी मोरोबा लाल या उभयतांचे नांवानें मेहेरबान मुख्य मदतनीस कलेक्टर साहेब यांहीं सन १८२४ चे सालांत सनद करून दिल्ही. त्याची नक्कल निा ५८ ची दाखल आहे; त्या दिवसापासून सदहू गांवचे वृत्तीची वहिवाट करूं लागले. बाकी पाञ्च गांव सनदेंत नाहींत. त्यांची वहिवाट करीत असतील तर दगलबाजी करीत आहेत; असें निा ४४ चे सारांशांत लिहिलें आहे. त्यास त्या पाञ्च गांवांविषयीं कलेक्टर साहेब यांहीं काय तजवीज केली, येविषयींची शाबिदी ह्या मुकदम्यांत कांहींच नाहीं. आणि बापू जोशी हा मयत झाल्यानन्तर मयत प्रावादी मोरोबा लाल हा एक च तण्टयाचे सर्व गांवचे वृत्तीविषयीं वहिवाट करूं लागला असें दिसतें. त्यास वादी सखाराम नाना आचार्य याचा फिर्याद कर-

ण्याचा मुख्य मुद्दा असा आहे कीं, निा १२ चें करारपत्र मयत प्रावादी मोरोबा लाल यांनीं लिहून दिलें. त्यांत तण्टयाचे चाळीस गांवांपैकीं निम्में हिस्सा मजला लिहून दिला आहे. व पूर्वींचे माझे वहिवाटीचा मजकूरहि सदर्हू करारपत्रांत सर्व दाखल आहे. येविषयीं प्रावादी मोरोबा लाल मयत याचे वारीसपुत्र बाळकृष्ण व बापू यांची तक्रार अशी आहे कीं, मयत प्रावादी मोरोबा लाल हा बहिरा व मुका असोन, त्याजला कांहीं समजत नाहीं. आणि आह्मांस व आमचे आईस समजूं न देतां कपटानें हें करारपत्र लिहून घेतलें आहे. त्यास येविषयींची तजवीज करून पाहतां बहिरा व मुका व आन्धळा असे मनुष्य व्यवहाराचे रीतीस धर्मशास्त्राप्रमाणें वर्ज्य आहेत. हा मजकूर खरा आहे. परन्तु निा ९८ चे सनदेवरून मालूम होतें कीं, सदर्हू तण्टयाचे गांव मयत बापू-जोशी व प्रावादी मोरोबा लाल या उभतांचे सम्पादन केलेले आहेत आणि तोच मोरोबा लाल वादी सखाराम नाना आचार्य याजला निा १२ चें करारपत्र लिहून देत आहे. त्यांत प्रावादी विठ्ठल अमृतेश्वर मयत याचे वारीस रमाबाई हिचा कुलअखत्यारी आबा भट्ट याणें गहाणखतावरून सन १८४८ पैकीं नम्बर ९९२ ची फिर्याद प्रावादी मोरोबा लाल मयत व त्याचे पुत्र बाळकृष्ण व स्त्री रखमाबाई यांजवर केली. त्या मुकदम्यांत सदर्हू प्रावादींनीं जाब दिल्हा, त्याची नक्कल निशाणी ६९ ची या मुकदम्यांत दाखल आहे; त्या-प्रों प्रावादी बाळकृष्ण खेरीजकरून बाकी असामींनीं असा मजकूर लिहिला आहे कीं, खतावर आह्मीं सह्या केल्या नाहींत. आह्मांपैकीं मोरोबा लाल व बापू यांस लिहितां येतें व मी रखमाबाई बायको-माणूस माझा भ्रतार जिवन्त आहे. तेव्हां या कामाची मजला जरूर नाहीं व आह्मीं समजदार असोन आमच्या सह्या न घेतां खत कोणतेप्रकारें केलें हें कळत नाहीं. ह्मणोन वगैरे मजकूर लिहिला आहे. परन्तु निा ४९ चे दरखासाची नक्कल पहातां रखमाबाई ही स्त्री आहे व बापू अज्ञान आहे, सबब त्या उभयतांवरील दावा रद्द

करून मोरोबा लाल व बाळकृष्ण या उभयतांवर भिवण्डी येथील मुनसिफ यांणीं सदरीं लिहिलेले फिर्यादीचा निवाडा केला आहे आणि त्याच निवाड्याचे रुपयांचे ऐवजीं फिर्यादींत लिहिलेले (?) गांवांपैकीं बहुतेक गांव अखत्यारी प्रावादी आबा भट्ट याजकडे जप्तीस असून, तो त्या गांवांचे वृत्तीची वहिवाट करीत आहे,' असें सदहू दरखासाचे नकलेवरून मालूम होतें. त्यास मोरोबा लाल प्रावादी मयत हा मुका व बहिरा असून व्यवहारांत वर्तत आहे; अशा सबबीमुळें त्याणें लिहून दिलेला दस्तऐवज कायम ठेऊन, त्याजवर सदरीं लिहिलेला निवाडा झाला आहे असें दिसतें. आणि वारस प्रावादींपैकीं बाळकृष्ण व बापू यांणीं निवाडपत्राची नक्कल. निा ६३ ची गुजरविली आहे. त्यांतील हंशील पाहतां मयत प्रावादी मोरोबा लाल याणें मोरो विनायक यांसीं खत लिहून दिलें. त्याजवर आपले नांवाच्या सहीकरितां आपली खूण गणेशा अशी करून दिल्ही. त्याजवर मोरो विनायक याणें मयत प्रावादी मोरोबा लाल व त्याची स्त्री यांजवर फिर्याद कल्याणचे मुनसीफ कोर्टांत केली. त्याजवरून मुनसिफ यांणीं शास्त्रीसाहेब यांजला प्रश्न केला. त्याचा जबाब त्यांणीं दिल्यावरून सदहू खताबद्दल मुनसीफ यांणीं असा ठराव केला कीं, मुक्या पतीचें द्रव्य घेणार स्त्री इणें पतिद्रव्यांतून रुपये द्यावे असें आहे. परन्तु स्त्रीनें पतिद्रव्य घेतलें नाहीं, त्याचा व्यवहार मात्र करीत आहे. याजकरितां मयत प्रावादी मोरोबा लाल मुका याचे इष्टेटांतून रुपये वसूल व्हावे, ह्मणोन वगैरे त्या निवाड्यांत ठराव झाला आहे. त्याजवरून बहिरा व मुका याणें लिहून दिल्हेला दस्तऐवज धर्मशास्त्राप्रमाणें रद्द होऊं शकला नाहीं. आणि वादी सखाराम नाना आचार्य यांचे अर्जाचे तजविजींत मेहेरबान कलेक्टर साहेब बहादूर यांजकडे मयत प्रावादी मोरोबा लाल याणें करारनामा सन १८३० चे सालीं लिहून दिल्हा, त्याची नक्कल निा ८३ ची मुकदम्यांत दाखल आहे. त्यांत वादी सखाराम नाना आचार्य यांजकडे वृत्तीचे कामाविषयीं भोगवटा शके

१७३८ पर्यन्त निम्मे ऐवज पावत आला. अशी सरकारची निशा कागदपत्रांवरून व साक्षीमौजे यांवरून झाल्यास सरकार हुकूम करील तो मजला कबूल आहे. ह्मणोन वगैरे मजकुराचा लिहून देऊन, त्याजवर मोरोबा लाल याणें आपली सही बालबोध लिपीची केली आहे. त्या सदर्हू नकलेवरून मालूम होतें व निा ५८ ची ही सनद मयत बापू जोशी व मयत प्रावादी मोरोबा लाल यांचे नांवाची वृत्तिसम्बन्धीं झालेली आहे. या रीतीनें मयत प्रावादी मोरोबा लाल हा मुका व बहिरा असतांहि, त्याचे नांवाचा व्यवहार चालत आला आहे; व धर्मशास्त्राचे आधावरून त्याणें लिहून दिल्हेले दस्तऐवजहि कायम होत आले आहेत. तेव्हां निा १२ चा करारनामा रद्द करण्यास कोणता आधार दिसत नाहीं.

आतां सदर्हूकरारनामा कपटानें लिहून घेतला, ह्मणोन वारस प्रावादी बाळकृष्ण व बापू यांची तक्रार आहे. येविषयींची तजवीज करून पाहतां मयत प्रावादी मोरोबा लाल याचा कारकून बळवन्तराव राम याचे हातचा निा १२ चा करारनामा लिहिलेला आहे आणि तो बळवन्तराव आपले निा २२ चे जबानींत असा मजकूर लिहून देतो कीं, प्रावादी विठ्ठल अमृतेश्वर मयत याचे वारीस रमाबाईचा अखत्यारी आबाभट्ट याचा निवाडा मोरोबा लाल व त्याचा मुलगा बालकृष्ण यांजवर ऐवज फिटतो. गहाणवट त्याणें आपले कबजांत ठेऊन, ऐवज वसूल करून घेण्याविषयीं निवाडा झाला. त्याजवरून वादी याणें सांगितलें कीं, ह्या निवाड्यावर आपण अपील करून निवाडा फिरवूं आणि वृत्तिसम्बन्धीं आमचा व मोरोबा लालचा तण्टा पूर्वीपासून चालत आला आहे, त्यास निम्मे वतनाचे गांव आह्मांस देतील, तर त्यांची आह्मीं मदत करून निवाडा फिरवूं. त्याजवरून मीं हा मजकूर मोरोबा लाल याची बायको रखमाबाईजवळ सांगितला. आणि वादी याणें दस्तऐवजाचा मसुदा करून दिल्हा. तो तिजला वाचून दाखविला. तेव्हां तिणें सांगितलें कीं, आपलें कार्य होत असेल तर वादी

याजला दस्तऐवज लिहून द्यावा. त्या वेळेस मोरोबा लाल याचा मुलगा बाळकृष्ण हा नासिकास गेला होता. सबब प्रावादी मोरोबा लाल याची सदरीं लिहिलेल्या मजकुराबद्दल रखमाबाई इणें समजूत केली. कारण कीं, मोरोबा लाल हा स्वच्छन्दी आहे. त्याची बायको त्याजला खुणेनें समजावून सर्व मजकूर सांगते. आणि त्याची चांगली पक्की समजूत झाली, ह्मणजे मग कोणतेहि गोष्टीचा रुकार देतो. नाहीं तर कोणाचें ऐकत नाहीं. सबब वादी याणें सांगितल्याचा सर्व मजकूर मोरोबा लाल याचे बायकोनें मोरोबा लाल यासीं समजून सांगून, त्याजला माझेबराबर दिल्हा आणि दस्तऐवज लिहून तुह्मीं आपले जवळ ठेवावा. आपलें कार्य झालें ह्मणजे तो दस्तऐवज वादीस द्यावा. ह्मणोन त्या बाईनें सांगितलें त्याजवरून मोरोबा लाल याजला बरोबर घेऊन मीं भिवण्डीस आलों आणि तो मजकूर वादी याजला सांगून नन्तर मसुद्याप्रमाणें स्टाम्पाचे कागदावर मीं दस्तऐवज लिहून तयार केल्यावर, मोरोबा लाल याजला त्याजवर सही करण्यास सांगितली आणि सही करण्या पुरतेंच त्याजला बाळबोध लिहितां येतें. सबब त्याणें आपले हातानें सही केली. आणि त्याचे बायकोनें पूर्वीं त्याची समजूत केली होती. सबब मीं तो दस्तऐवज त्याजला वाचून दाखविला नाहीं. त्या दस्तऐवजावर साक्षीदारांच्या साक्षी झाल्यानन्तर तो दस्तऐवज घेऊन मीं व मोरोबा लाल असे माझे बिऱ्हाडीं आलों. नन्तर दोनतीन दिवसांनीं सदहू दस्तऐवज कोणास दाखविणें आहे, असें सांगून वादी हा मजजवळोन दस्तऐवज घेऊन गेला. आणि त्याचा मसुदा मोरोबा लाल याचे बायकोस दिल्हेला आहे. ह्मणोन वगैरे मजकूर लिहून देतो आणि सदहू निशाणी १२ चे करारनाम्यावरील साक्षीदार, बळवन्तराव परशुराम हा निा २१ चे जबानींत असा मजकूर लिहून देतो कीं, दस्तऐवज लिहिणार बळवन्तराव याजला मीं विचारलें कीं, हा दस्तऐवज तुमचे हातचा लिहिलेला आहे? तेव्हां त्याणें सांगितलें कीं, माझे हातचा लिहिलेला

आहे. तुह्मीं साक्षी घाला. त्याजवरून प्रावादी मोरोबा लाल हा तेथें होता त्याजला खुणेनें विचारलें कीं, याजवर साक्षी घालूं ? तुमचे वृत्तीचे निम्मे गांव वादी यास जातील. तेव्हां त्याणें खुणेनेंच सांगितलें कीं, साक्षी घाला, व निम्मे वृत्तीचे गांव गेले तर जाऊं द्यावे. मोरोबा लाल याणें दस्तऐवजावर सही केली होती. तिजवर बोट ठेवून विचारलें, तेव्हां त्याणें आपले छातीस हात लाविला. त्याजवरून ती सही त्याणेंच केली आहे, असें समजून मीं आपली साक्ष घातली. व विठ्ठल अमृतेश्वर मयत याची बायको रमाबाईचे तर्फेनें प्रावादी आबा भट्ट मुखत्यार, याणें प्रावादी मोरोबा लाल व त्याचा लेंक बाळकृष्ण व त्याचा दुसरा मुलगा व मोरोबा लाल याची बायको रखमाबाई इजवर फिर्याद केली होती. त्यास प्रावादी मोरोबा लाल व त्याचा लेंक बाळकृष्ण, या दोघांचे तर्फेनें मीं भिवण्डीचे मुनसीफ कोर्टांत वकील होतों. ह्मणोन वगैरे मजकूर लिहून देत आहे. आणि नििा १२ चे करारनाम्यावरील दुसरे साक्षीदार नििा २३, २४, २५ हे तीन असामीहि बळवन्तराव परशुराम याप्रों साक्ष घातल्याबद्दलचा बहुतेक मजकूर सांगत आहेत. आणि नििा २३ चा साक्षीदार ह्मणतो कीं, बळवन्तराव राम याणें दस्तऐवज पुरा जाहल्यावर बाळकृष्ण परशुराम याचे घरीं आल्यावर वादीचे हवालीं केला आहे. नििा २५ चा साक्षीदार ह्मणतो कीं, माझी साक्ष झाल्यानन्तर वादीचे स्वाधीन दस्तऐवज केला आहे. याप्रों सदहू दस्तऐवज वादी सखाराम याचे स्वाधीन केल्याबद्दल नििा २२।२३।२५ चे साक्षीदारांचे बोलण्याचा प्रकार वेगळा वेगळा पडत आहे. तत्राप, तो दस्तऐवज वादी सखाराम याचे स्वाधीन झाला आहे असें शाबीद होत आहे. तेव्हां निशाणी १२ चा करारनामा कपटानें जाहलेला आहे असें दिसत नाहीं; परन्तु निशाणी २२ चे साक्षीदार बळवन्तराव राम हा अपिलांत निवाडा फिरवावयाचे कारणानें दस्तऐवज लिहिल्याची सबब सांगून, त्या मजकुराचे तोण्डचें बोलणें होऊन कोणीं कोणाशीं दगा करूं नये ह्मणोन शपथाआणाहि

झाल्या आहेत, आणि त्या मजकुराचे वेळेस बाळकृष्ण याजला हा मजकूर ठाऊक आहे. ह्मणून वगैरे मजकूर आपले जबानींत लिहून देतो. त्यास बाळकृष्ण याची जबानी निशाणी २३ ची ह्या मुकदम्यांत जाहली आहे. तो ह्मणतो कीं, कोणते कारणास्तव हा दस्तऐवज लिहून दिल्ह्याची मजला माहिती नाहीं. आणि ह्या दस्तऐवजाबाबद वारस प्रतिवादी बाळकृष्ण याणें फौजदारींत फिर्याद केली होती, त्याजविषयीं निशाणी २२ चा साक्षीदार आपले जबानींत असा मजकूर लिहून देतो कीं, बाळकृष्ण मोरेश्वर हा नासिकाहून आल्यानन्तर आश्विनमासांत मजवर व वादी, बाळकृष्ण परशुराम खारकर, बाळकृष्ण अनन्त ह्या चार असामींवर भिवण्डी येथील मामलेदार यांजकडे माझा बाप बहिरा व मुका असून, ह्या चार असामींनीं कपटानें दस्तऐवज लिहून घेतला आहे; अशा बावतीची फौजदारींत फिर्याद केली. तेथें वादी याणें मजला जो मजकूर सांगितलेला, तो मीं प्रतिवादी मोरोबा लाल याचे बायकोस सांगितला. व त्या बायकोनें प्रतिवादी मोरोबा लाल याची समजूत केली. त्याजवरून हा दस्तऐवज लिहून दिल्हा आहे, अशी मी त्या मुकदम्यांत शाबिदी करून दिल्ही; त्याजवरून बाळकृष्ण मोरेश्वर याची तक्रार फौजदारींत रद्द झाली आहे, वगैरे मजकूर तो आपले जबानींत सांगतो. आणि ह्या फौजदारीबद्दलचा मजकूरहि वादी सखाराम याणें आपले फिर्यादींत व वारस प्रतिवादी बाळकृष्ण व बापू यांणीं आपले निशाणी ३९ चे जाबांत लिहिलेला आहे; परन्तु सदहू फौजदारींत माझा दावा कायम जाहला किंवा रद्द जाहला, हें वारसप्रतिवादी बाळकृष्ण हा आपले जाबांत कांहींच लिहित नाहीं. आणि हा दस्तऐवज कपटानें केला आहे असें जर ठरलें असतें, तर सदरीं लिहिलेले चार असामींस कांहीं (तरी) शिक्षा मिळाली असती. तसा प्रकार कांहींच झालेला दिसत नाहीं. तेव्हां निशाणी १२ चा करारनामा फौजदारीचे चौकशींतहि तावून सुलाखून निघाला; तो दस्तऐवज कपटानें झाला आहे, किंवा दगाबाजीनें जाहला आहे, असें कांहींच ह्मणूं शकवत नाहीं. आणि

निशाणी २२ चा साक्षीदार अपिलांत निवाडा फिरविण्याची सबब आपले जबानींत लिहून देतो, तो मजकूर मी फौजदारींत सांगितला नाहीं. ह्मणोन तो आपले जबानींत सांगतो. तेव्हां निशाणी १२ चा करारनामा अपिलांत निवाडा फिरवून देण्याचे सबबेमुळें जाहला आहे, किंवा कपटानें किंवा दगाबाजीनें जाहला आहे, असें कोणतेहि रीतीनें ह्मणूं शकवत नाहीं. याजकरितां निशाणी १२ चा करारनामा व बापू जोशी याचे निशाणी १२ चें दस्तऐवजी पत्र या दोहों दस्तऐवजांवरून वादी सखाराम नाना आचार्य याचा दावा शाबीद होत आहे.

निशाणी ४२ चे दस्तऐवजांवरून व निशाणी ४४ चे सारांशाचे मतलबावरून दिसून येतें; वादी सखाराम नाना आचार्य याणें पूर्वीपासोन सदर्हू तण्टयाचे गांवांवर हक्क आहे आणि निशाणी १२ चे करारनाम्यावरून तर मुस्तकीमच? शाबिदी झाली आहे आणि फिर्यादींत लिहिलेले ४० गांवांपैकीं प्रतिवादी विठ्ठल अमृतेश्वर मयत, याची वारीस रमाबाई हिचा अखत्यारी आबाभट्ट याचे वहिवाटीस आहेत. मात्र फिर्यादींत लिहिलेले बाकी दहा गांव आबाभट्ट याचे ताब्यांत नाहींत असें निशाणी ४५ चे दरखासाचे नकलेवरून व फिर्यादीचे मतलबावरून दिसत आहे व आठ गांव माझे ताब्यांत नाहींत; असें आबाभट्टहि आपले जाबांत लिहित आहेत आणि त्या दहा गांवांविषयीं वारसप्रतिवादी बाळकृष्ण व बापू याचे वकिलानें निशाणी ६७ बन्दावरील दुसरे सवालाचे जबाबांत तपशील लिहून दिल्हा आहे तो येणें प्रमाणें:—

१ मौजे देलोंडें तर्फ दुर्गोड खुद्द आमचेकडे आहे.

४ तर्फ खाम्बाळें पैकीं.

२ ओस गांव आहेत ते:—

१ मौजे चरघर.

१ मौजे देवचाळ.

२

२ आमचे भाऊबन्द त्र्यम्बक गणेश यांजकडे आहेत ते गांवः—

१ मौजे सागावें.

१ मौजे दुधनी.

२

४

५ तर्फ कुन्दें पैकीं:—

२ ओस आहेत ते गांवः—मौजे नाळसेत व मौजे दुरिवली.
१ १

१ मौजे ह्मसवाडची वहिवाट आमचेकडे चालत नाहीं. त्या गांवीं मोकाशी आहेत, ते त्र्यम्बक गणेश यास हक्क देतात अगर दुसराहि ब्राह्मण बलावितात.

२ त्र्यम्बक गणेश आमचा भाऊबन्द याजकडे आहेत तेः—

१ मौजे करमळें. १ कसबे कुपे.

५

१०

सदर्हूप्रमाणें दहा गांवचा तपशील लिहून दिल्हा आहे. त्यास या दहा गांवांशिवाय, फिर्यादींत लिहिलेले बाकी तीस गांवांपैकीं निम्मे हिशाचे वृत्तीवरील, प्रतिवादी विठ्ठल अमृतेश्वर मयत याची वारीस रमाबाई हिचा अखत्यारी आबाभट्ट याची जप्ती दूर करावी. आणि फिर्यादींत लिहिलेले चाळीस गांवांपैकीं निम्मे गांव जोशीपणाची वृत्ति वादी सखाराम नाना आचार्य याजला देववावी हें योग्य दिसतें. आणि वृत्तीचें उत्पन्न वादी सखाराम यांणीं थोडें लिहिलें आहे, ह्मणोन प्रतिवादी बाळकृष्ण वगैरे यांची तक्रार आहे. त्याची तजवीज करून पाहतां, निशाणी ४४ चे सारांशांत उत्पन्नाचा मजकूर लिहिला आहे. त्याजवरून एकन्दर उत्पन्न अजमासें पावणे दोनशें रुपये होतें, असें दिसतें. तेव्हां त्या मानानें वादी सखाराम याणें आपले निम्मे हिशाचें उत्पन्न शम्भर रुपये फिर्यादींत लिहिलें आहे, तें बरोबर आहे. आणि

त्र्यम्बक गणेश याजकडे कांहीं गांव आहेत ह्मणोन सदरीं लिहिलें आहे. ते गांव त्र्यम्बक गणेश याजकडे चालत असल्यास, तो व वादी सखाराम हे एकमेकांवर फिर्याद करून घेण्यास मुखत्यार आहेत. सबब हुकूम कीं, फिर्यादींत लिहिलेले चाळीस गांवांपैकीं वर लिहिलेले दहा गांवांशिवाय बाकी तीस गांवांपैकीं निम्मे गांवांचे जोशीपणाचे वृत्तीवरील प्रतिवादी विठ्ठल अमृतेश्वर मयत याची वारीस रमाबाई हिचा अखत्यारी आबाभट्ट याची जप्ती दूर केली आहे व फिर्यादींत लिहिलेले चाळीस गांवांचे जोशीपणाचे वृत्तीपैकीं निम्मे गांवांची वृत्ति मयत मोरोबा लाल याचे वारीस पुत्र बाळकृष्ण व बापू यांणीं वादी सखाराम नाना आचार्य यांचे ताब्यांत द्यावी आणि फिर्यादीसम्बन्धें खर्चाचे रुपये १३३८८६ एकशें तेहतीस रुपये, आठ आणे, सहा पै, कम्पनी चालू वादी सखाराम नाना आचार्य याजला प्रतिवादी मोरोबा लाल मयत याचे वारसांपैकीं बाळकृष्ण व बापू अमृतेश्वर मयत याची वारीस रमाबाई हिचा अखत्यारी आबाभट्ट यांणीं द्यावे. आणि बाळकृष्ण व बापू यांचा खर्च रुपये ३४८८ चवतीस रुपये, आठ आणे, व आबाभट्ट यांचा खर्च रुपये ७ ज्याचा त्याणें सोसावा. व प्रतिवादी मोरोबा लाल मयत याचे वारसांपैकीं विष्णु मोरेश्वर हा अज्ञान आहे त्याचें पालन करणाराचें नांव वादी सखाराम याणें दाखल केलें नाहीं व रखमाबाई ही स्त्री आहे, सबब त्या उभयतांवरील वादी सखाराम नाना आचार्य यांचा दावा रद्द केला आहे.

## खर्चाचा तपशील.

१३३८८६ वादी यास खर्चः—

| | |
|---|---|
| ५२ | अर्ज निशाणी १ पुरवणीसुद्धां. |
| २ | वकीलपत्र निशाणी २. |
| २ | वकीलपत्र निशाणी ४. |
| २ | (लागत नाहीं) निशाणी ५. |
| १८६ | समानभातें निशाणी ७।८. |

१४　दरखास निशाणी ९ तागाईत निशाणी ११.
८४८६समानभार्ते निशाणी १८।१९.
२　अर्ज निशाणी २६.
२　अर्ज निशाणी २७.
८११ समान भार्ते निशाणी २८.
८११ हुकूम निशाणी २९.
१४　दरखास निशाणी ३७।३८.
१　नकला निशाणी ४०।४१.
१८८ नकला निशाणी ४३।४५.
४　दरखास निशाणी ४७.
२　दरखास निशाणी ६४.
८८ नक्कल निशाणी ६३.
१　हिशेबसालचें भार्ते निशाणी ६८.
३०८८ वकीली.
　८८ बयाना.
　३० कामिशन (पुढें लागत नाहीं).
　———
　३०८८
———
१३३८८८६
४१८८ प्रतिवादी यांसः—
७ आबाभट्ट यास.
२ वकीलपत्र निशाणी १३.
२ अर्ज निशाणी १४.
३ जाब निशाणी ३.
———
७
३४८८ बाळकृष्ण व बापू यांसीः—
२　वकीलपत्र निा ३३.
२　अर्ज निशाणी ३४.
३　जाब निशाणी ३५.
२　अर्ज निा ४६.
८　दरखास निा ६०।५९.

८ अर्ज निा ५४.
८ दरखास निा ५०।५९।६१.
१६८ नकला निा ५८।६०।६२.

३४६८

४१६८

१७५६५६

भिवण्डीचे कज्याप्रकरणीं कागदः—

१ फिर्यादीचा अर्ज.
२ वकीलपत्र वादीकडून गणपतराव जगन्नाथ यांचे नांवें.
३ हुजूरचा हुकूम फिर्याद पाठविल्याबाबद.
४ वकीलपत्र वादीकडून हरबाजी यांचे नांवें.
५ अर्ज वादीकडून अखत्यारीप्रतिवादीचे वस्तीविषयीं.
६ समान वादीचें.
७।८ समान प्रतिवादीचें.
९।११ दरखास वादीकडून सहा सालांविषयीं व करारपत्राबाबद.
१२ करारपत्र वादीकडून.
१३ वकीलपत्र प्रावादींपैकीं आबाभट्ट यांजकडोन व नारायण यांजकडोन.
१४ अर्ज प्रतिवादींपैकीं आबाभट्ट याजकडोन जाब कबूल करण्याविषयीं.
१५ जाब प्रतिवादींपैकीं आबाभट्ट यांजकडून हरकतीचा.
१६ नकला साक्षींविषयीं मामलेदार तालुके भिवण्डी यांस यादी लिहिली तिची.
१७ नकला यादी मुनसीफ मुकाम भिवण्डी यांसी साक्षींविषयीं लिहिली तीं.
१८।१९ समानें वादीकडील साक्षींविषयीं.
२० जबानी शिवराम भगवान साक्ष प्रावादी याची.
२१ जबानी बळवन्तराव परशुराम साा वाा याची.
२२ जबानी बळवन्तराव राम साक्षी वाचा याची.
२३ जबानी बाळकृष्ण अनन्त साक्षी वादीचा याची.
२४ जबानी बाळकृष्ण परशुराम साक्षी वादीचा याची.

२५ गणपतराव जगन्नाथ साक्षी वादीचा याची.

२६ अर्ज वादीकडून मुकदमा तहकूब ठेवण्याविषयीं.

२७ अर्ज वादीकडून प्रतिवादी मोरोबा लाल याचे वारसांचीं नांवें दाखल करण्याविषयीं.

२८ समान वादीस प्रतिवादीचें.

२९ हुकूम कारकून यासीं नोटिसीविषयीं.

३० नोटीस प्रतिवादींपैकीं बाळकृष्ण याची.

३१ नोटीस प्रावादींपैकीं बापू याची.

३२ नोटीस प्रावादींपैकीं रखमाबाई हिची.

३३ वकीलपत्र प्रतिवादींपैकीं बाळकृष्ण व बापू याजकडून नारायण जनार्दन याचे नांवें.

३४ अर्ज प्रावादी बापू याजकडोन जाब कबूल करणें वि॰.

३५ जाब प्रावादींपैकीं बाळकृष्ण व बापू यांजकडोन हरकतीचा.

३६ दरखास वादीकडून एक दस्तऐवजाविषयीं.

३७।३८ दरखास वादीकडून सहा दस्तऐवज दाखल करणेंविषयीं.

३९ दस्तऐवजीपत्र वादीकडून.

४० नकल भगवन्तराव त्र्यम्बक याचे जबानीची.

४१ नकल श्रीधर बल्लाळ याचे जबानीची वादीकडोन.

४२ दस्तऐवजीपत्र वादी याजकडून.

४३ नकल प्रावादी मोरोबा लाल याचे करारनाम्याची वादी याजकडून.

४४ सारांश साक्षीदार कांहीं लोक त्यांची नकल वादीकडून.

४५ नकल दरखासाची वादीकडून.

४६ अर्ज प्रावादींपैकीं बाळकृष्ण व बापू यांजकडून पुरावा कबूल करण्याविषयीं.

४७ दरखास वादीकडोन दोन साक्षी हजर केल्याबद्दल.

४८ जबानी श्रीपत राजाराम साक्षी प्रतिवादीचा याची.

४९ जबानी दाजी हणमन्त तिटवाळकर साक्षी वादीचा याची.

५० दरखास वारस प्रतिवादी बाळकृष्ण व बापू यांजकडून चार साक्षी हजर केल्याबाबद.

५१ जबानी श्रीपत राजाराम साक्षी प्रावादीचा याची.

५२ जबानी बापू पाटेल बिन माहाद पाटेल साक्षी याची.

५३ अर्ज वारस प्रातवादी बाळकृष्ण व बापू यांजकडोन मुदतीविषयीं.
५४ अर्ज प्रतिवादींपैकीं बाळकृष्ण व बापू यांजकडोन.
५५।५६ अर्ज प्रातवादींकडून मुदतीविषयीं.
५७ दरखास वारीस प्रातवादी बाळकृष्ण मोरेश्वर व बापू मोरेश्वर यांजकडोन एक कागदाविषयीं.
५८ नकल वृत्तीबाबद सनद कलेक्टर साहेब यांचे मदतनीस यांजकडून मिळाली तिची प्रतिवादी बाळकृष्ण व बापू यांजकडून.
५९ दरखास वारीस प्रातवादी बाळकृष्ण मोरेश्वर व बापू मोरेश्वर यांजकडून एक कागदाबाबद.
६० नकल वाद्याचे कलेक्टर साहेब यांजकडे अर्ज केला त्याची बाळकृष्ण व बापू यांजकडून.
६१ दरखास प्रातवादीकडून दोन दस्तऐवजांविषयीं.
६२ नकल खताची प्रातवादी बाळकृष्ण व बापू यांजकडून.
६३ नकल निवाडपत्राची प्रातवादी बाळकृष्ण व बापू यांजकडून.
६४ दरखास वादीकडून एक कागदाविषयीं.
६५ नकल नम्बर ५५२ सन १८४७ पैकींचे कज्यांत प्रातवादी मोरोबा लाल वगैरे यांणीं जाब दिल्हे त्यांची वादीकडून.
६६ सवाल जबाब वादीचे वकिलाचा.
६७ सवाल जबाब प्रातवादी बाळकृष्ण व बापू यांचे वकिलास.
६८ दिसवो साक्षीचे भत्त्याबाबद.
६९ निवाडपत्र.

---

रुजूपाहणार रावजी मैराळ कारकून.
अस्सलावरून रुजू आहे.

**पाण्डुरङ्ग मोरेश्वर प्रिन्सिपाल.**

**सदर अमीन.**

रणसोड मुकुन्द नाईक कारकून निसबत दफ्तरदार.

**नारो हिराजी दफ्तरदार.**

## परिशिष्ट (*इ २)

## वे. रा. रा. विनायक आबा जोशी ह्यांच्या तर्फे वसई येथील चित्पावन व कऱ्हाडे लोकांकडील ज्योतिषपणाची वृत्ति चालविण्याविषयींचा झालेला निवाडा.

**शके १७८१ (इ. स. १८५९.)**

शिक्का
मुनसिफ कोर्ट
वसई.

निवाडपत्र विद्यमान माणकोबा मोरोबा मुनसिफ, जिल्हा कोंकण कोर्ट मुक्काम जज्झिरे वसई.

**वादी.**

नम्बर ८६
फैल तारीख ८ मार्च
सन १८५९.

विनायक आबाजोशी वृत्त्यंशी, वस्ती वसई-याचा वकिल आत्माराम बळवन्त व प्रभाकर विठ्ठल.

**प्रतिवादी.**

गोविन्द नारायण कर्वे व गणेश विनायक उर्फ आबा मोघे एकूण असामी २ वस्ती वसई—यांचा वकील काशीनाथ दिनकर. दावा ज्योतिषपणाचे वृत्तीचा हक्क शाबीद होण्याबाबद व त्या सम्बन्धीं नुकसानाबाबद रुपये २९८८८१.

वादीची निशाणी १ ची फिर्याद—प्रतिवादी गोविन्द नारायण कर्वे व गणेश विनायक मोघे यांजवर अशी कीं, वसई गांवांत ब्राह्मणवगैरे जे लोक राहतात, त्या ब्राह्मणांचे जातींत मुञ्जी व लग्नें होतात, त्यांत आह्मीं वतनदार वृत्त्यंशी आमचा ज्योतिषपणा-

---

* हा अस्सल निवाडा मोडी लिपींत असून तो, वे० रा० रा० गोविन्द विनायक जोशी पुरन्दरे व प्रभाकर, रघुनाथ, आणि रामचन्द्र विठ्ठल जोशी पुरन्दरे निफाडकर हल्लीं वस्ती वसई ह्यांजपाशीं आहे.

सम्बन्धें हक्क आहे. तो असा कीं, सदर्हू कार्यांत आह्मीं घटका घालावी आणि त्याचें उत्पन्न घ्यावें व पत्रिकापूजन करून त्याचें उत्पन्न घ्यावें. याप्रमाणें आमचे वाडवडील व प्रावादीचे वाडवडील शेंकडो वर्षे जाहलीं, आमचा हक्क देत आले व आमचे वडील व आह्मीं घेत आलों. असें असतां शके १७७८ फाल्गुन शुद्ध ३ चे रोजीं पहिले नम्बरचा प्रावादी गोविन्द याजकडेस त्याचे मुलीचें लग्न जाहलें; त्यांत त्याणें आह्मीं हजर असतां आह्मांस घटकावगैरे घालूं दिली नाहीं व आमचे घरीं घालूं नये व आह्मीं घालूं देत नाहीं, याप्रमाणें सदर्हू प्रावादीनें सांगून, तें काम दुसरे नम्बरचे प्रावादीनें चालविलें आणि हक्काचें उत्पन्न त्यांणीं घेतलें त्याचा तपशीलः—

| | |
|---|---|
| ८२ तान्दूळ अधोली सव्वा. | ८२ खण १ पत्रिकापूजनाचा. |
| १८८ पत्रिका पूजनाची दक्षिणा. | ८१ घटके जवळची दक्षिणा. |
| ८१८८ नारळ पांच. | ८१२ शेला. |
| ८८३ सुपाऱ्या १०. | ८१५ |
| १८११८११ | |

येणेंप्रों आमचें उत्पन्न घेऊन वंशपरम्परेचा आमचा हक्क बन्द करूं पाहतात. त्यास तसें होणार नाहीं. अशा हक्कांचे बहुत फैसले सदर दिवाणीअदालत येथें ज्योतिषी यांचे तर्फेनें जाहले आहेत. यास्तव देशरिवाजांप्रों आमचा हक्क शाबीद होण्याविषयीं सदरीं जाहीर केलेलें एक सालचें उत्पन्न रुपये २८१०८११ त्याचा दसपट आकार रुपये २६८१३८२ व सदरील लग्नासम्बन्धीं आमचें नुकसान जाहलें तें रुपये २८१०८११एकूण रुपये २९८८८१ ची फिर्याद केली आहे, तर प्रावादी यांहीं आमचे हातून मुञ्जींत व लग्नांत ज्योतिषपणासम्बन्धीं घटका वगैरे घालण्याचें व पत्रिकापूजनाचें काम घेत जावें व त्यासम्बन्धें जें उत्पन्न आहे तें देत जावें; असा निवाडा आमचे वतीनें हक्काचे शाबिदीविषयीं व एकसालचें उत्पन्न रुपये २८१०८११ प्रावादीकडून देण्याविषयीं व या मुकद्दम्याचा खर्च होईल त्यासहित प्रावादी याजवर करावा ह्मणोन वगैरे.

प्रावादी गोविन्द नारायण याचे निशाणी ६ चे जाबाचें इंशीलः— वादी विनायक आबाजोशी याणें मजवर व गणेश विनायक मोघे यांजवर ज्योतिषपणाचे वृत्तीचा हक्क शाबीद होण्याबाबद व त्या-सम्बन्धीं उत्पन्न घेण्याबाबद मिळोन रुपये २१८८८१ ची फिर्याद केली आहे, ती खोटी व गैरशिस्त आहे, ती रद्द करण्याचीं कारणेंः—

१ वादी फिर्यादींत लिहित आहे कीं, वसई गांवांत ब्राह्मण यांचे घरीं लग्न व मुञ्जींचीं कार्यें होतात, त्यांत घटका घालण्याची वृत्ति आमची आहे. तो हक्क शाबीद होण्याकरितां दसपट दावा रुपये २६८१३८२ चा केला आहे ह्मणोन लिहित आहे. त्यास वसई गांवांत दुसरीं ब्राह्मणांचीं घरें सुमारें ६०।६५ आहेत. त्या घरींहि वादीकडून घटका घालविण्याची वहिवाट नाहीं. तेव्हां सर्वांवर दावा न करितां मजएकटयावर दावा करितो, हा कायद्या-विरुद्ध आहे.

२ वादी घटका घालण्याची वृत्ति आमची शेंकडो वर्षें वाड-वडिलांपासून चालत आली ह्मणोन लिहित आहे, त्यास आमचे कडे घटका घालावी असा त्याचा हक्क मुळींच नाहीं. घटका घालण्याची कांहीं वृत्ति वादीचे वडिलांस किंवा वादीस आमचे वडिलांनीं किंवा आह्मीं लिहून दिल्ही नाहीं. आमचे जातींत ज्याचे मर्जीस येईल, तो वादीस घटका घालण्यास बलावित असे व अलीकडे कितीएक वर्षें अगदींच कोणाचे घरीं बलावित नाहीं. कारण ही गोष्ट आमचे खुशीवर आहे. वादीचा आमचेवर हक्क नाहीं. वादीची जात पळशे असोन ती जात वेगळीच आहे. त्याचा आमचे ब्राह्मणांत कांहींच सम्बन्ध नसतां, कोणी मर्जीप्रों वादीस घटका घालण्यास बलावित असे; तितक्यामुळें आमचे धर्माचे कामांत वादी हे आह्मांस सम्पर्क करूं लागले वगैरे कार-णानें वादी वगैरे पळशे यांस आपले घरीं घटका घालण्यास न बलाविण्याविषयीं आमचे जातीनें नेम केला आहे. हें वादीस व त्याचे भाऊबन्दास जाहीर आहे. त्यावरून त्याणें घटका घालण्याचें

काम मिळविण्याविषयीं पुष्कळ इलाज केला; परन्तु आमचे जातीचे लोकांनीं (ती) गोष्ट कबूल केली नाहीं व आमचे जातींत नियम जाहला. तेव्हांपासून आजपर्यन्त मजशिवाय आमच्या जातींत दुसरे पुष्कळ लोकांचे घरीं लग्न व मुञ्जी माझ्या घरीं लग्न जाहल्यापूर्वी व नन्तर जाहल्या. त्यांत वादीस घटका घालण्यास कोणीं बलाविलें नाहीं व त्याबद्दल वादीस कांहीं दिलें नाहीं व याप्रों जातीचे नेमाप्रों मलाही चाललें पाहिजे. असें असोन, सर्व ग्रामस्थांवर दावा न करितां मज एकट्यावर दावा केला तो गैरशिस्त आहे.

३ वादी, पत्रिकापूजन करून त्याचें उत्पन्न घ्यावें असा हक्क आपला आहे ह्मणोन, लिहितो; त्यास पत्रिकापूजन करणें, हें ज्या घरीं कार्य तो यजमान करीत असतो ती त्या यजमानाचा उपाध्या सांगतो, हें समन्त्रक कर्म आहे व वादीचा आमचे ब्रह्मकर्मांत मुळींच उपयोग नाहीं व पत्रिकापूजन करणें हें काम वादीचें मुळींच नाहीं. आतां पत्रिकेपुढें ठेविलेली दक्षिणा कोणीं खुशीप्रों वादीस दिली असेल; परन्तु तीसुद्धां वादीस न मिळण्याविषयीं सदरीं दुसरे कलमीं लिहिल्याप्रों वादीस मना केल्याचे पोटीं जाहलेलें आहे.

४ घटका घालणें हें कांहीं वृत्ति आहे कीं काय? हें कोर्टानें पहावें. कारण घटका घालण्याचा उद्देश काय आहे कीं, वेळ समजली पाहिजे. त्यास घटका न घालतां पादच्छायावगैरे दुसरें यन्त्र साधलें असतां, त्याजवरूनहि वेळ समजण्यास सहज आहे. (येतें).

येणेंप्रों ध्यानीं आणोन वादीचा दावा रद्द करून माझा खर्च देववावा. ह्मणोन वगैरे जाबतक्रारी प्रावादी गणेश विनायक ऊर्फ भावा मोघे यांचा निा ८ चा त्यांत हंशील.

१ वादीनें आपला जो हक्क शाबीद करण्याविषयीं दाव्याचा आकार केला आहे, तो फक्त एकटे प्रावादी गोविन्द नारायण याचे घरचे उत्पन्नाधारें करून तितके दाव्यांत कर्वे यांचे व आमचे असे दोघांचे घरीं घटकेबद्दल वगैरे हक्क शाबीद करूं पाहतो, तसा दावा चालवूं नये.

२ वादीनें प्रावादी गोविन्द नारायण याचे घरीं लग्न जाहल्याचें साल लिहिलें आहे. त्या सालीं आमचे घरींहि मुलीचें लग्न जाहलें. त्या लग्नांत वादीस आह्मीं घटका घालण्यास बलाविलें नाहीं व त्यास कांहीं दिलेंहि नाहीं; कारण वादीचा मुळींच आह्मांवर हक्क नाहीं. या गांवांत दुसरीं आमचीं ब्राह्मणांचीं घरें आहेत त्यांच्या घरींहि वादीची घटका घालण्याची वहिवाट चालू नाहीं. जर वादीचा हक्क वसई गांवांतील ब्राह्मणांवर असेल तर, त्यांसुद्धां सर्वांवर वादीनें दावा करावा.

३ प्रावादी गोविन्द नारायण याचे घरींहि लग्नांत त्याणें आह्मांस घटका घालण्यास बलाविलें. त्याजवरून आह्मीं घटका घालून उत्पन्न घेतलें व याप्रों गांवांत आमचे ब्राह्मणांचे घरीं जो कोणी आह्मांस सन्तोषानें बलावितो त्याजकडे आह्मीं जातों.

४ दोघां प्रावादींनीं मिलाफ करून दाण्डगाई केली असें जें कांहीं लिहिलें आहे तें मिथ्या आहे.

येणेंप्रों ध्यानीं आणोन वादीचा दावा रद्द करून खर्च देववावा. ह्मणोन वगैरे वादीनें निशाणी ९ चे उत्तराचें हंशील. प्रावादी गोविन्द नारायण याचे जाबाचें उत्तर.

एक मनुष्यावर दावा करून त्या दाव्यांत सर्व लोकांवर निवाडा, असा जर या दाव्यांत मागितला असता तर सर्व लोकांवर दावा करणें प्राप्त होतें; व सर्वांवर दावा करणें न करणें ही आमची मुखत्यारी आहे. घटका घालण्याचा प्रावादीचे व आमचे वडिलांपासून हक्क शेंकडो वर्षें चालत आलेला, तो प्रावादीचे खुशीवर नाहीं, व या कामांत दस्तऐवज होण्याची जरूर नाहीं. घटका घालण्यास आह्मांशिवाय दुसरे कोणास बलाविण्याचा प्रावादीस अधिकार नाहीं. आमची वहिवाट प्रावादीनें आडधटाईनें बन्द केल्यास दोन अडीचवर्षें जाहलीं. त्यापूर्वीं निर्वेध वहिवाट सुरूच आहे. प्रावादी विनाकारण नाहीं तो दोष लावून आमची वृत्ति हरण करूं पाहतात. प्रावादीचे जातींत पाहिजे तसे नियम

जाहले, ह्मणोन आमचे वृत्तीस त्याणें हरकत येत नाहीं. हें उघ-डच आहे व आह्मीं घटका घालीत असों असें प्रात्वादीस कबूलच आहे. पत्रिकापूजनाची वहिवाट आमचे हातोन होत आली व दक्षिणाहि आह्मीच घेत आलों व आह्मांसहि मिळत आली. आज नवीन मागतों असें नाहीं. घटका घालण्याचा हक्क आमचा नसता तर प्रात्वादी हे घटका घालण्यास आह्मांस कां बलाविते? व त्यांचे जातींत घटका घालतां येत नव्हतें असें नाहीं. घटका न घालतां दुसरे इतर यन्त्रांवर कार्यसिद्धीच जाहलेली नाहीं व ऐकिलें नाहीं व घटका घालणें शास्त्राबाहेर नाहीं, व जी परम्परा चालत आली तीच योग्य आहे.

प्रात्वादी गणेश विनायक याचे जाबाचें उत्तर असें कीं, हरदु प्रात्वादी याणें एक मिलाफानें पहिले नम्बरचे प्रात्वादीचे घरीं आह्मांस अटकाव केल्यावरून, जो आह्मीं दावा केला आहे तो बरा-बर आहे. व सर्व लोकांवर दावा करणें ही आमची मुखत्यारी आहे. ज्याचें काम त्यास न करूं देतां जो मनुष्य तें काम करील तो जोखमास अधिकारी आहे. सबब गणेश यावर दावा केला आहे, तो बरावर आहे.

येणेंप्रों ध्यानीं आणोन फिर्यादी अन्वयें आमचे वतीनें निवाड-पत्र व्हावें ह्मणोन वगैरे.

या कज्यांत तपासणीचे मुद्दे ठरविण्यांत येतात ते येणेंप्रों:—

१ ज्योतिषपणाचें उत्पन्न देणार नम्बर १ चा प्रतिवादी व उत्पन्न घेणार नम्बर २ चा प्रात्वादी या दोघांवर फिर्यादीचीं कारणें वेगळीं आहेत, असें असून एकेच फिर्यादींत दावा चालेल कीं काय? व हक्काचा व उत्पन्नाचा दावा सदर अदालतीचा फैसल्ला सुपरन्यू-मररीलिष्ट नम्बरअन्वयें वेगळे केले पाहिजेत किंवा कसें?

२ वादी याचा वसई गांवांत सर्व जातींचे लोकांवर ज्योतिष-पणाचा हक्क आहे कीं काय? असेल तर प्रात्वादी वगैरे ब्राह्मण लोकांवरही आहे कीं कसें?

३ सदर्हू हक्क काय आधारानें उत्पन्न जाहला व सरकारचे हुकुमानें अगर प्रावादी वगैरे ग्रामस्थलोक व वडिलांचे सम्मतानें अथवा फार दिवस वहिवाट चालले कारणानें ?

४ फक्त प्राचीनवहिवाटीवरून असेल, तर सर्व ब्राह्मणांकडे वादीची वहिवाट निरन्तर बिनहरकत मालकीनें मुदतीच्या कायद्या अन्वयें बाध न येईल अशी चालली आहे कीं काय ?

५ सदर्हू हक्क जरी असेल, तथापि तो मोडण्यास ग्रामस्थ-लोक मुखत्यार आहेत अगर नाहींत ? मुखत्यार असतील तर वादी हा ब्राह्मण जातीचा नाहीं कीं काय ? व त्याणें ब्राह्मणांस उपसर्ग केल्यामुळें सर्व ब्राह्मण जातीचे लोकांनीं वादीस बलावूं नये असें ठरविलें आहे काय ? ठरविलें असेल तर—

६ वादीस नुकसान मिळण्यास ज्या लोकांनीं वादीस बलावूं नये ह्मणोन ठरविलें, त्या सर्वांस प्रावादी करून फिर्याद करणें अवश्य होती किंवा नाहीं ?

७ पत्रिकापूजनाचें उत्पन्न वादीस मिळत होतें कीं काय ? व असेल तर त्याबाबद प्रावादीची तक्रार वाजवी नाहीं किंवा कसें ?

८ सदर्हू प्रकारचें उत्पन्न नम्बर १ च्या प्रावादीनें नम्बर २ चे प्रावादीस आपले खुशीनें दिलें असेल, तर वादीचे नुकसा-नास तें घेण्यानें नम्बर २ चा प्रावादी जबाबदार होईल कीं नाहीं ?

सदर्हू मुद्दे माजी अकटिङ्ग मुनसिफ नारायण जगन्नाथ भिडे यांहीं ठरविले आहेत. परन्तु या कोर्टाचे नजरेस या कज्यांत इतकेच मुद्यांचा तपास करणें आहे कीं, वादी हे वृत्त्यंशी जोशी असून त्यांचा जोशीपणाचा हक्क वसई गांवांत ब्राह्मणजातीवर आहे कीं काय ? जर असेल तर त्याजला फिर्यादीप्रों दावा देवविण्यास योग्य आहे किंवा कसें ? व दुसरे प्रावादी याणें वादीचें जोशीपणाचें उत्पन्न घेतलें आहे, तें त्याजकडून किंवा पहिले प्रावादीकडून देव-विण्यास वाजवी आहे किंवा नाहीं ? इतकें पाहणें जरूर आहे. बाकी मुद्यांची चौकशी करणें जरूर दिसत नाहीं.

या कज्यांतील कागदपत्र वाचून पाहून व उभय पक्षकारांचे वकिलांचीं बोलणीं ऐकून घेऊन, कोर्टाचे नजरेस असें येतें कीं, वादी याची जोशीपणाची वृत्ति सर्व गांवांत ब्राह्मणलोकांकडे आहे. ती असी कीं, लग्न व मुञ्जींत वादीनें घटका घालणें व पत्रिका करून देणें याप्रों असून त्याबद्दल दक्षणा वगैरे उत्पन्न वादी यांणीं घ्यावें असें वडिलोपार्जित फार वर्षांची वहिवाट चालत आहे. सबब पहिले प्रावादीनें दुसरे प्रावादीपासून लग्नसमयीं घटका व पत्रिकेचें काम. करविलें, तरी वादी याजला पहिले प्रावादीकडून दावा देवविण्यास योग्य आहे. दुसरे प्रावादी याजवर वादी याजला दावा देवविणें योग्य नाहीं, त्याचीं कारणें:—

वादी याणें आपले दाव्याचे पुराव्यास निशाणी ४४।४५।४६। ४७।७३।७४।८५।८६।८७।८८।९०।१०५।१०६।१०७।१०८ ।१०९।११०।१११ चे साक्षीदार व सदर अदालतींत जाहलेल्या हुकूमनाम्याच्या नकला निा ५२।१०४ व सनदेची नक्कल निा ६८ आज्ञापत्राची नक्कल निा ६९ व यादीची नक्कल, निा ७० व जबानीची नक्कल निा ७१ असा पुरावा गुजरविला. त्यांपैकीं निा ६८।६९।७०।७१ हे चार कागद दाव्याचे पुराव्यास हल्लीं ठरविलेले मुद्यांस लागू नाहींत. सबब ते खेरीजकरून बाकी पुराव्यावरून पाहतां वादी, हे वसई गांवांत ब्राह्मणलोकांत लग्न व मुञ्जींत घटका घालतात व पत्रिका करून देतात. त्याबद्दल दक्षणा व अन्तरपाटाचा शेला वगैरे उत्पन्न घेतात. त्याप्रों वादी याचा जोशीपणाचा हक्क फार वर्षांपासून चालत आहे. असें सदरीं लिहिलेले वादीकडील साक्षीदार यांचे जबान्यावरून शाबीद आहे.

प्रावादी याणें आपले तक्रारीचे पुराव्यास साक्षीदार निा ७५। ८९।११२।११३ चे गुजरावून सदर अदालतीचे अजम शास्त्री याचे सवालाचे जबाब निा ३२ व सुप्रीमकोर्टाचा दाखला निा ११८ चा असा पुरावा गुजरविला. त्यांपैकीं सुप्रीम कोर्टांतील दाखला निा ११८चा हल्लीं जितके मुद्यांची तजवीज करण्यांत येते

त्या मुद्द्यांस लागू नसून निा११२चा साक्षीदार प्रावादीचे तक्रारीस उपयोगी नसून, बाकी प्रावादी कडील साक्षी निा ७५।८९। ११३ हे प्रावादी याचे तक्रारीप्रों साङ्गत नसून वादी, वसई गांवांत ब्राह्मणलोकांमध्यें जोशीपणाचें काम लग्नांत व मुञ्जींत घटका घालण्याचें व पत्रिका करून देण्याचें काम करितो, असें लिहून देतात त्याजवरून प्रावादीची तक्रार बराबर नाहीं.

आतां प्रावादी याची दुसरी तक्रार अशी आहे कीं, वादी कडून आह्मांस कार्यांत उपसर्ग लागतो. सबब आमचे जातीचे लोकांनीं वादीस घटका घालणें वगैरे कामास अलिकडे सुमारें २।३ वर्षांपासून बन्द केलें; ह्मणून तक्रार असून पक्षकार याजकडील कांहीं साक्षीदार वादी हे मुञ्जींत व लग्नांत वधूवरांचे डोळ्यांस घटकेचें पाणी लावितात व मङ्गलाष्टकें बोलून पत्रिकापूजन सांगतात. याप्रों ब्राह्मणलोकांस उपसर्ग लागल्यामुळें, वादी याजला सर्व ब्राह्मणलोक यांणीं घटका वगैरे घालण्यास बलावूं नये असें ठरविलें आहे, ह्मणून लिहून देतात; परन्तु त्यांचें बोलणें एकाचें एकास मिळत नसून असें करण्यानें ब्राह्मण लोकांस उपसर्ग लागून धर्मास विरुद्ध होतें असें नाहीं. पूर्वीपासून ब्राह्मणजातींत लग्न व मुञ्जींत घटका घालून व मङ्गलाष्टकें बोलून पत्रिका करण्याची वहिवाट वादी याची आहे. असें वादीतर्फेचे साक्षीदार लिहून देत असून त्यांत कितीएक साक्षीदार ब्राह्मणजातीचे आहेत. तेव्हां चालत आलेले वहिवाटीस दोष ठेवून, वादी याचे ज्योतिषपणाचे हक्कास बाध आणणें, हें प्रावादीचें करणें नादुरुस्त आहे.

प्रावादीतर्फेनें अजम सदरअदालतीचे शास्त्री यांचे सवालाचे जबाबावरून पाहतां, अधर्में चालत आलेली वहिवाट बन्द करावी; परन्तु धर्मेंकरून चालत आलेली वहिवाट बन्द करण्यास शास्त्राधार नाहीं. असा त्यांचा अभिप्राय आहे. त्यापेक्षां वादी हे रीतीनें पूर्वीपासून ब्राह्मण जातींत लग्न व मुञ्जींत मुहूर्तघटका घालण्याची वहिवाट करीत आले, ती वहिवाट धर्माप्रों नाहीं, असें हल्लीं ह्मणतां येत नाहीं.

पहिले प्रावादी यांची आणखी अशी तक्रार आहे कीं, वादी याणें सर्व ब्राह्मणजातीवर फिर्याद करावयाची होती, तसें न करितां मजवर केली आहे. ती बराबर नाहीं ह्मणून आहे. ती तक्रार प्रावादीची वाजवी नाहीं. कारण कीं, प्रावादी याजकडे लग्न जाहलें आणि वादी याजला बलाविलें नाहीं. याजकरितां वादी याणें प्रावादीवर दावा केला आहे तो बराबर आहे.

सदर्हू कारणांवरून वादी हा वसई गांवांत ब्राह्मणलोकांमध्यें वृत्त्यंशी जोशी आहे, असें शाबीद होतें. सबब पहिला प्रावादी याणें दुसरे प्रावादीपासून जोशीपणाचें काम करविलें, तरी वादी याजला पहिला प्रावादी याजकडून त्याचा हक्क देवविण्यास योग्य आहे आणि असे बाबदींत सदरअदालतीचे निवाडे नम्बर ६० व ४००० असे जाहले आहेत. त्यांच्या नकला वादी याणें निा ९२।१०४ च्या गुजरविल्या आहेत.

वादी याणें दुसरे प्रावादीवर दावा केला आहे. परन्तु त्याजला पहिला प्रावादी याणें आपले खुशीनें लग्नांत जोशीपणाचें काम चालविण्यास बोलाविल्यावरून त्याणें पहिले प्रावादीकडे घटका वगैरे घालण्याचें काम केलें आहे. सबब त्याजवर वादीचा दावा पोंचत नाहीं.

यास्तव हुकूम कीं, दुसरा प्रावादी गणेश विनायक याजवरील वादीचा दावा रद्दकरून पहिले प्रावादी गोविन्द नारायण याचे लग्नाचे घटकेबाबद वगैरे उत्पन्न दुसरे प्रावादीस दिलेलें वादी जें फिर्यादींत मागतो तें रुपये २८१०८११ व फिर्यादीसम्बन्धीं वादीस खर्च झाला त्यापैकीं रुपये १३८६८२ एकूण रुपये १६ ८१८१ कम्पनी चालू वादी विनायक आबा जोशी याजला प्रावादी गोविन्द नारायण याणें द्यावे. बाकी खर्च रुपये ४८६ वादीनें सोसून दुसरे प्रावादीचा खर्च रुपये १८१०८२ त्याजला वादी याणें द्यावे आणि पहिले प्रावादीचा खर्च त्यांचा त्यांणीं सोसावा, ह्मणून ठराव केला असे. ता २८ जानेवारी सन १८६२.

फेरिस्त कज्यासम्बन्धें कागदः—

१ फिर्याद अर्ज.

२ वकीलपत्र वादीकडून.

३ समान प्रावादीचें.

४ हुकूम नोटिसीचा.

५ वकीलपत्र प्रावादी गोविन्द नारायण याजकडून.

६ जाब प्रावादी गोविन्द नारायण याजकडून तकारी.

७ प्रावादी गणेश विनायक याजकडून.

८ जाब तकारी प्रावादी गणेश विनायक याजकडून.

९ उत्तर वादीकडून.

१० अर्ज वादीकडून प्रावादीचे प्रतिज्ञेवर.

११ पुरवणीअर्ज वादीकडून.

१२ टिपण मुद्याचें.

१३ दरखास वादीकडून साक्षीचा.

१४ दरखास प्रावादींपैकीं गोविन्द नारायण याजकडून साक्षीचा.

१५ अर्ज प्रावादी गोविन्द नारायण याजकडून दाखल्याविषयीं.

१६ अर्ज प्रावादीकडून पुराव्यास मुदतीचा.

१७ दरखास वादीकडून साक्षीचा.

१८ अर्ज वादीकडून साक्षीचा.

१९ ता। २४ समानें वादीचे साक्षीचीं.

२९ याद ठाणें येथील मुनसिफ यांस लिहिलेली.

२५ तागाईत २८ समानें प्रावादीचे साक्षीचीं.

३१ याद कल्याणचे मुनसिफ यांस लिहिलेली.

३० याद भिवण्डीचे मुनसिफ यांस लिहिलेली.

३३ ता। ३७ समानें वादीकडील साक्षीचीं.

३२ समानें प्रावादीकडील साक्षींचीं.

३८ याद वादीकडून बळवन्तराव हरी यांस लिहिलेली.

३९ ता। ४१ समानें प्रावादीकडील साक्षींचीं.

४३ याद मुनसिफ कोर्ट कल्याण यांस लिहिलेली.

४२ याद भिवण्डीचे मुनसिफ यांस लिहिलेली.

४५ जबानी वादीचा साक्षी बळवन्तराव हरी याची.

४४ जबानी वादीकडील साक्षीदार दामोदर चिन्तामण याची.

४७ जबानी वादीचा साक्षी कृष्णाजी विठ्ठल याची.

४६ जबानी वादीचा साक्षी बापूजी धोण्डदेव याची.

४९ समान प्रावादीकडील साक्षीचें.

४८ समान वादीचे साक्षीचें.

५१ दरखास अर्ज नकलेच्या लगत प्रकरणसहित.

५० याद मुनसीफ ठाणें यांस लिहिलेली.

५३ अर्ज वादीकडून साक्षीचे वस्तीविषयीं.

५२ नकल सदर अदालत नम्बर ४००० चे निवाड्याची.

५४ ता ५९ समानें वादीचे साक्षींचीं.

६० ता ६३ समानें प्रावादीकडील साक्षींचीं.

६४ याद नम्बर २२० कल्याणचे मुनसीफ यांस.

६५ याद मुनसीफकोर्ट ठाणें यांस लिहिलेली.

६६ याद भिवण्डीचे मुनसीफ यांस लिहिलेली.

६७ दरखास वादीकडून नकलेविषयीं.

६८ सनदेची नकल वादीकडून.

६९ आज्ञापत्राची नकल प्रावादीकडून.

७० यादीची नकल वादीकडून.

७१ सुन्दरभट्ट बिन वामनभट्ट याचे जबानीची नकल वादीकडून.

७२ रपोट जज्ज साहेबांस केलेला.

७४ जबानी वादीचा साक्षी कृपाराम दुलभराम याची.

७३ जबानी वादीचा साक्षी सखाराम रामचन्द्र जोशी याची.

७६ भात्याबाबद दरखास वादीकडून रशीब.

७५ जबानी प्रावादीचा साक्षी विठ्ठल जैत पाटील याची.

७७ ता ८१ समानें वादीकडील साक्षींचीं.

८२ ता ८४ समानें प्रावादीचे साक्षींचीं.

८५ जबानी चिन्तामण नारायण साक्षी वादीचा याची.

८६ जबानी महाशङ्कर रविशङ्कर साक्षी वादीचा याची.

८७ जबानी भास्कर गङ्गाधर आचार्य साक्षी वादीचा याची.

८८ जबानी गङ्गाधर जगन्नाथ आचार्य साक्षी वादीचा याची.

८९ जबानी आबाजी विश्वनाथ शेट साक्षी वादीचा.

९० जबानी केशव आबाजी बर्वे साक्षी वादीचा.

९१ अर्ज वादीकडून दोन साक्षी हजर करणेंविषयीं.

९२ अर्ज प्रावादीकडून साक्षी हजर करण्याचे मुदतीचा.

९७ वारन्ट वादीचे साक्षीचें.

९९ समान प्रावादीचे साक्षीचें.

१०२ वकीलपत्र वादीकडून प्रभाकर विठ्ठल यांचे नांवाचें.

१०५ जबानी आत्माराम जीवनजोशी साक्षी वादीचा याची.

१०७ जबानी बापूजी पाण्डुरङ्ग राखे साक्षी वादीचा.

१०८ जबानी आनन्दराम दुलभराम साक्षी वादीचा.

१११ जबानी नारायण भट्ट आनन्दभट्ट साक्षी वादीचा.

११३ जबानी बाळाजी नारायण जोशी साक्षी वादीचा.

११६ दरखास प्रावादीकडून दाखल्याविषयीं.

११८ दाखला प्रावादीचे दरखासावरून.

११९ मिनीट फैसल्याची.

९३ पुरसीस प्रावादीची.

९४ ता ९६ समानें वादीकडील साक्षींचीं.

९८ वारन्ट वादीचे साक्षीचें.

१००।१०१ वारन्टें प्रावादीचे साक्षींचीं.

१०३ दरखास वादीकडून दाखल्याचा.

१०४ सदर अदालतीचे नम्बरचे निवाड्याची नकल वादीकडून.

१०६ जबानी सदाशिव रघुनाथ साक्षी वादीचा.

१०९ जबानी सखाराम रामचन्द्र साक्षी वादीचा.

११० जबानी नारो कृष्णभट्ट साक्षी वादीचा.

११२ जबानी नथू राघव शेट साक्षी प्रावादीचा.

११४ दरखास प्रावादीकडून दाखला आणण्याचा.

११५ दरखास प्रावादीकडून दाखल्याविषयीं.

११७ अर्ज प्रावादीकडून सुप्रीमकोर्टांतून नकल आणण्याविषयीं.

१२० निवाडपत्र.

खर्चः- रुपये.

१७८१२८२ वादीस.

१४८१० स्टाम्पकागद.

२ निा १ ८२ निा २ ८२ निा ९ ८४ निा १० ८२ निा

११ ०३ निा १३ ०२ निा १६ ०४ निा १७ ०२ निा १८ ०४ निा ५१ ०८ निा ५२ ०२ निा ५३ ०८ निा ६७ ०८ निा ६८ ०८ निा ६९ ०८ निा ७० ०८ निा ७१ ०२ निा ९१ ०२ निा १०२ ०२ निा १०३ ०१ निा १०४

१०४०३ भत्ता

००६ निा ३ ००६ निा १९ ००३ निा २० ०१ निा २१ ००६ निा २२ ००६ निा २३ ००३ निा २४ ००३ निा ३३ ००६ निा ३४ ००६ निा ३५ ०१ निा ३६ ००६ निा ३७ ००३ निा ४८ ००६ निा ५४ ००६ निा ५५ ००६ निा ५६ ००३ निा ५७ ००३ निा ५८ ०१ निा ५९ ०६ निा ७६ ००३ निा ७७ ००६ निा ७८ ००३ निा ७९ ०१ निा ९० ००६ निा ९१ निा ००३ ९४ ००६ निा ९५ ०१ निा ९६ ००६ निा ९८

००९ फी

०१०६ निा ६८०३०२ निा ६९ ०१०५ निा ७० ०१०३ निा ७१

१०६०२ वकिलास बयाना कमिशन

०८ ०१४०२

१७०१३०२

तपशील :—

४०३ वादीवर.

१३०६०२ प्रावादीवर.

१७०१३०२

२३०१४०११ प्रावादी यांस :—

१०१००२ गणेश विनायक यास नम्बर २चा प्रावादी

०४ स्टाम्पकागद निा ७ निा ८

०२ ०२

१०६०२ वकिलास बयाना कमिशन

०८ ०१४०२

१०१००२

२२८४८९ गोविन्द नारायण कर्वे यास निा १ चा प्रतिवादी.

३८१० स्टाम्पकागद.

८२ निा ५।८६ निा ६१ निा १४ ८२ निा १५ ८२ निा
८१ निा ११५ ८२ निा ११६ ८२ निा ११७ ८२ निा ९२
८८ निा ११८

८६८९ भत्ता

८८३ निा २५ ८८३ निा २६ ८८६ निा २७ ८८६ निा २८
८८६ निा ३९ ८८३ निा ४० ८८६ निा ४१ ८८३ निा ४९
८८६ निा ६० ८८३ निा ६१ ८८६ निा ६२ ८८३ निा ६३
८८३ निा ८२ ८८६ निा ८३ ८८३ निा ८४ ८८३ निा ९९
८८६ निा ११० ८८६ निा १०१

८२　　८१८९　　८१८९　　८१८३

१७८१२　फी　निा ३२　निा ११८
　　　　　　८८　　१७८४

८८　वकिलास बयाना

२२८४८९

२३८१४८११

४१८११८१

दस्तुर पाण्डुरङ्ग दाजी बदलीकारकून.

रुजू जनार्दन भास्कर कारकून.

माणकोबा मोरोबा, मुनसीफ.

ही नक्कल ता ९ माहे फेब्रुवारी सन १८६६ रोजीं लिहिली.

दस्तुर परशुराम विठ्ठल उमेदवार.

नक्कल रुजू आहे.

भास्कर भिकाजी अकाटिङ्गकारकून.

राघो बाळाजी अमृते दफ्तरदार.

सही इंग्रेजी.

## अपील नम्बर ७१ सन १८६० पैकीं.

स्पेशिअल अपील नम्बर ५५६ सन १८६३ पैकीं याचा हुकूमनामा ता। १२ जानेवारी सन १८६४ रोजीं मुम्बई येथील हायकोर्टांत होऊन हा मोकदमा पुन्हा चौकशी होण्याकरितां परत आला.

त्या हायकोर्टाचे हुकूमनाम्याचे ठरावाप्रों आह्मांस फक्त खालीं लिहिलेले मुद्यांविषयीं ठराव करणें आहे:—

विनायक आबा जोशी याणें आपण वसई गांवचे वंशपरम्परेचे जोशी आहों असें शाबीद केलें किंवा कसें ?

त्याणें शाबीद केलें आहे असा सदर्हू मुद्यांविषयीं आमचा ठराव आहे. विनायक आबा जोशी हा वसई गांवचा वंशपरम्परेचा जोशी असल्याविषयीं, तोण्डचे व दस्तऐवजी पुराव्यांवरून पुर्तेपणीं शाबीद जाहलें आहे. ह्या कोर्टांतील अपिलेण्ट याचे वकीलांनीं कबूल केलें असून, ती गोष्ट अपिलेण्ट याणें आपले निा ६ चे जाबांत अगर अपिलाचे यादींत स्पष्टपणें नाकबूल केलेली नाहीं; अगर अपिलेण्ट यांणीं अपिलाचे यादींतहि तो मुद्दा काढला नाहीं.

आमचे ठरावाकरितां राहिलेल्या एका मुद्याविषयीं सदर्हूप्रमाणें त्याबद्दल आमचा ठराव असलेकारणानें मुनसीफ यांचा हुकूमनामा आह्मांस कायम करणें भाग आहे.

खर्चाविा ठराव करण्याची मुखत्यारी हायकोर्टाचे ठरावावरून आह्मांकडे राहिली आहे. यास्तव दिवाणीकाम चालविण्याचे रीतीविषयींचे कायद्यांतील कलम १८७ अन्वयें आह्मीं असा हुकूम करितों कीं, या अपिलांतील प्रत्येक पक्षकारानें सर्व कोडतांतील आपापला खर्च सोसावा.

या ठरावापासून काय परिणाम होतील, अगर दाव्यांतील पक्षकारांनीं कांहीं मुद्दे काढले असतां त्याचा विचार करण्याविषयीं हायकोर्टाचे हुकूमनाम्यावरून आह्मांस अटकाव आहे आणि त्यामुळें ज्या एका मुद्याचा आह्मीं सदरीं निकाल केला आहे, त्याचा वाजवी निकाल करण्याविषयींची जबाबदारी खेरीजकरून बाकीची

सर्व आमचे वरील जबाबदारी सदहू हायकोर्टाचे हुकूमनाम्यावरून दूर जाहली आहे, असें आह्मीं समजतों.

सही इंग्रेजी.

ता॥ १६ जुलई सन १८६४. लिहिली ता॥ ६ फेब्रुवारी सन १८६६.

दस्तुर लक्ष्मण हरी काळे उमेदवार.

अस्सलबरहुकूम रुजू ता॥ ७ फेब्रुवारी सन १८६६.

आत्माराम शिवराम कारकून.

राघो बाळाजी अमृते दफ्तरदार.

सही इंग्रेजी.

ह्या नकलेची फी ०२ ०६ दोन आणे सहा पै घेऊन ही नक्कल रिसपान्डेण्ट याचे वकीलास दिली असे. ता॥ १४ फेब्रुवारी सन १८६६.

राघो बाळाजी अमृते दफ्तरदार.

यादी.

नकलेस कागद दिल्हा. ता॥ ९ फेब्रुवारी सन १८६६. नक्कल तयार झाली. ता॥ ८ मिनहू. नक्कल घेतली. ता॥ १४ मिनहू.

शिक्का
जज्ज जिल्हा
ठाणें.

ता॥ १६ जुलई सन १८६४.

अपील नम्बर ७१ सन १८६० पैकीं. } अस्सल नम्बर ८६ सन १८५९ पैकीं.

जिल्हा कोंकण मुक्काम ठाणें येथील जज्ज साहेबांचे कोडतांत,

गोविन्द नारायण कर्वे, जात ब्राह्मण, धन्दा ज्योतिषपणाचा, वस्ती वसई. याचा वकील भास्कर मोरेश्वर. } अपिलेण्ट (प्रावादी.)

| | |
|---|---|
| विनायक आबा जोशी वृत्त्यंशी, जात पळशे ब्राह्मण, धन्दा याचकपणाचा. वा वसई. याचा वकील रामचन्द्र त्र्यम्बक. | रिसपाँण्डेन्ट (वादी.) |

सदर्हू अपिलाचा पूर्वी फैसला ता। १३ माहे जूलै सन १८६३ रोजीं निवाडपत्र केलें. त्या निवाड्यास रिसपाँन्डेण्ट नाराजी होऊन त्याणें स्पेशिअल अपील नम्बर ५५६ सन १८६३ पैकीं केलें. त्याचा फैसला हायकोर्टांत ता। १२ जानेवारी सन १८६४ रोजीं अक्टिङ्ग मेहेरबान जज्ज साहेब यांचा हुकूमनामा फिरवून कज्याचे कागद हुकूमनाम्याचे नकलेसोबत परत चौकशीस आले सबब हल्लीं पुनः फैसला केला तो :—

आजरोजीं कोर्ट बसलें, तेव्हां या अपिलाची सुनावणी जाहल्यावरून असें ठरविण्यांत आलें कीं, मुनसीफ यांचा निवाडा कायम करून या अपिलांतील प्रत्येक पक्षकारांनीं सर्व कोडतांतील आपापला खर्च सोसावा.

खर्चाचा तपशील:—

३१८१२८७ अपिलेण्ट यास.

२९८५८१ पूर्वीचे अपिलाचे निवाड्यांत दाखल झाल्याप्रों.
२८२८६ स्पेशिअल अपिलांतील निवाड्यांत लागल्याप्रों.
८४ हल्लींचे तजविजींत भातें.

३१८१२८७.

३४८७८१० रिसपाँन्डेन्ट यास.

३३८२८१० पूर्वीचे अपिलाचे निवाड्यांत दाखल जाहल्याप्रों.
११८५ स्पेशिअल अपिलांतील निवाड्यांत लागल्याप्रों.
० हल्लींचे तजविजींत.

३४८७८१०.

६६८४८५

एकूण सात्तष्ट रुपये चारआणे पाञ्च पई खर्च असे. ता मजकूर.

वामन विठ्ठल कारकून- सही इंग्रेजी, जज्ज साहेबांची.

गोविन्द रामचन्द्र, अक्टिङ्ग शिरस्तेदार,

लिहिली ता ८ फेब्रुवारी सन १८६६. दस्तुर लक्ष्मण हरी उमेदवार.

अस्सलबरहुकूम रुजू. ता ७ फेब्रुवारी सन १८६६ इ०

आत्माराम शिवराम, कारकून.

राघो बाळाजी अमृते दफ्तरदार. सही इंग्रेजी.

ह्या नकलेची फी ०२०६ दोन आणे, सहा पई घेऊन ही नक्कल रिसपॉन्डेण्ट याचे वकिलास दिल्ही असे. ता १४ फेब्रुवारी सन १८६६.

राघो बाळाजी अमृते दफ्तरदार.

० तुरुंगाचा दरखास्त दिल्हा, ता १० एप्रिल सन १८६७ नम्बर २७९.

यशवन्त आपाजी कारकून.

०४ भातें जमा. ता १९ एप्रिल सन १८६७.

सीताराम केशव, कारकून.

२०१४०११.

ता ११ जुलै सन १८६७ इ०.

प्रावादी गोविन्द नारायण कर्वे यांहीं दिल्हे ते २०१४०११ जमा असत. ता मजकूर.

प्रभाकर विठ्ठल, वकील.

---

Fee 7 Annas.

IN THE COURT OF THE DISTRICT OF THE KONKAN AT TANNA.

APPEAL No 71 OF 1860.

GOVIND NARAYAN of Bassein, in the Talooka Bassein, of the Tanna Collectorate, in the Konkan District (Original Defendant) ........................................................*Appellant.*

*Versus*

VINAYUK ABA JOSHI, of Bassein, in the Talooka Bassein, of the Tanna Collectorate, in the Konkan District (Original Plaintiff) ..........................................*Respondent.*

Rs. 29-8-1

For Appellant Bhaskar Moreshwar. Suhusraboodhe and Bulwuntraw Bajee Shaligram.

For Respondent Ramchandra Trimbuk Acharya.

This case was remanded for re-trial by the Decree of Her Majesty's High Court of Judicature at Bombay, in Special Appeal No. 556 of 1863, dated 12th January 1864.

The only issue left for my decision by the terms of the High Court Decree is :—

Has Vinayuk Aba Joshi proved that he is the hereditary Joshi of the village of Bassein ?

My finding on this issue is in the affirmative. That Vinayuk Aba Joshi is the hereditary Joshi of the Village of Bassein is fully proved both by oral and documentary evidence. This is admitted by the pleaders for the Appellant in this Court. The fact was not explicitly denied by Appellant in his answer No. 6 or in his Memo. of Appeal.

Nor was the issue raised by Appellant in his Memo. of Appeal. Such being my decision on the only issue left for my decision, I am compelled to confirm the Decree of the Moonsiff.

The decree of the High Court leaves with me the discretion of awarding costs, and therefore under the provisions of Section 187 of the Code of Civil Procedure, I direct that each of the parties to this Appeal bear his own costs in all Courts.

I understand, the decree of the High Court to preclude me from considering the effect of this Judgment or any of the other issues raised by the parties to the suit, and as therefore divesting me of all responsibility except for the decision of the single issue, which I have decided above.

(Sd.) ROBERT HILL PINHEY,
Judge.

(True Copy.)
(Sd.) ROBERT HILL PINHEY,
Judge.

*16th July* 1864.

## परिशिष्ट ( ई २. * )

## वे. रा. रा. लक्ष्मण गोविन्द जोशी पुरन्दरे यांच्या तर्फे आगाशी येथील चित्पावन व कऱ्हाडे लोकांकडील ज्योतिषपणाचे वृत्तिसम्बन्धीं झालेला निवाडा.

### शके १७९५ (इ० स० १८७३.)

### निा १.

### वसई येथील सेकण्डक्लास स. जज्जकोर्टांत.

| | |
|---|---|
| लक्ष्मण गोविन्द जोशी, जात—यजुर्वेदीब्राह्मण, धन्दा भिक्षुकीचा व जोशीपणाचा, राहणार कसबे आगाशी, तालुके वसई, जिल्हा ठाणें. | वादी. |
| बाळाजी विश्वनाथ माटे, जात-ब्राह्मण, धन्दा कारकुनीचा, वाा कसबेमजकूर. | प्रावादी. |

दावा रुपये ६८६८३.

आगाशी कसब्यांत जोशी (व) उपाध्यिकपणाची वृत्ति आमची. व (ती) आमचे कुळांत पूर्वापार असोन, त्यांत प्रावादीचे जातींत जोशी ह्मणजे ज्योतिषपणाची वृत्ति आमची पुरातन बहुत वर्षांची चालू असोन प्रतिवादीचे व आमचे वाडवडिलांपासून प्रावादीकडेहि लग्नें व मुञ्जी वगैरे कार्यासम्बन्धीं घटिका घालण्याचा व पत्रिकापूजन करण्याचा व त्यासम्बन्धीं उत्पन्न घेण्याचा हक्क आमचा पूर्वापार सतत चालत असतां, माझे सालांत प्रावादी याजकडेस शके १७९३ चे फाल्गुन शुा २, तारीख ११ माहे मार्च सन १८७२ रोजीं मुलाची मुञ्ज झाली. त्या मुञ्जींत घटिका घालण्यास आह्मीं हजर असतां, प्रतिवादींनीं आह्मांस घटिका घालूं दिल्ही नाहीं व पत्रिकापूजन करूं दिल्हें नाहीं व त्यांसम्बन्धीं उत्पन्नहि आमचें आह्मांस दिलें नाहीं; तसेंच प्रावादीचे मुलाचें लग्न शके मजकूरचें

---

* हा अस्सल निवाडा मोडी व इंग्रेजी लिपींत असून तो, वे. रा. रा. लक्ष्मण गोविन्द जोशी पुरन्दरे, परशुराम पाण्डुरङ्ग व त्यांचे चुलतबन्धु नीलकण्ठ विठ्ठल जोशी पुरन्दरे निफाडकर हल्लीं वस्ती आगाशी, ह्यांजपाशीं आहे.

फाल्गुन वद्य ३, तारीख २७ माहे मार्च सन मजकूर रोजीं जाहलें. त्या लग्नांत घटिका घालण्यास व पत्रिकापूजन करण्यास आह्मीं हजर असतां, प्रातिवादीनें आह्मांस तें काम करूं दिल्हें नाहीं व उत्पन्नहि घेऊं दिल्हें नाहीं. सबब तें उत्पन्न घेण्याचें कारण हरदु-कार्यें जाहलीं त्या तारखेस जाहलें आहे, त्यावरून उत्पन्न रुपये ६८६८३ देववावे. त्याचा तपशील:—

२८१ मुञ्जीसम्बन्धीं उत्पन्न;

८५ तान्दूळ अधोली २८२; ८२ नारळ ४ दर ८८६ प्रों;

८८९ केळीं चार व सुपाऱ्या सात व विड्याचीं पानें वगैरे मिळोन; ८२ चोळखण १;

१ घटिकेची दक्षिणा;

८८ पत्रिकेची दक्षिणा;

८३८३ किरकोळ कलशांत वगैरे द्रव्यदक्षिणा वगैरे मिळोन;

४८१८३ लग्नासम्बन्धीं उत्पन्न;

८७ तान्दूळ अधोली ३८२; ८३ नारळ ६ दर ८८६ प्रों;

८१ केळीं ५ व सुपाऱ्या १० व विड्याचीं पानें मिळोन; ८८ चोळखण २ दर ४ प्रों;

८१२ पत्रिकेची दक्षिणा:

८१२ अन्तःपटाचा शेला १; ८६८३ किरकोळ कलशांत वगैरे द्रव्यदक्षिणा मिळोन.

१ घटिकेची दक्षिणा;

६८६८३

सदर्हू रुपये खर्च सुद्धां प्रातिवादीकडून देववावे ता॥ २८ माहे फेब्रुआरी सन १८७३.

लक्ष्मण गोविन्द जोशी सही दस्तुर खुद्द.

वर अर्जांत लिहिलेला लक्ष्मण गोविन्द जोशी वस्ती आगाशी, सदर्हू वादी, मी आपले पुरे समजुतीप्रमाणें व खात्रीप्रमाणें अशी प्रतिज्ञा करितों कीं, या अर्जांत लिहिलेला मजकूर खरा आहे. तारीख मजकूर.

लक्ष्मण गोविन्द जोशी दा॥ खुद्द.

मुकदमा नम्बर २४६ सन १८७३. निा २५.

लक्ष्मण गोविन्द जोशी राहणार आगाशीं......वादी.

बाळाजी विश्वनाथ माटे वा कसबे मजकूर......प्रतिवादी.

दावा ६८६८३.

मीं प्रातवादी बाळाजी विश्वनाथ माटे आपली कैफियत देतों कीं, वादीची फिर्याद खोटी आहे कारणः—

१. आगाशी कसब्यांत वादीचे कुळाची जोशीउपाध्यिकपणाची (वृत्ति ?) असल्याचें मला माहीत नाहीं. आमचे ब्राह्मणजातींत वादीची किंवा त्याचे कुळाची जोशीपणाची वस्ती (वृत्ति?) मुळींच नाहीं. व वादी, त्याचे व माझे वाडवडिलांपासून आमचे घरचे कार्यांत वादीनें घटिका घालून पत्रिकापूजन करण्याचा त्याचा हक्क आहे असें ह्मणतो, परन्तु तसा त्याचा किंवा त्याचे कुळाचा हक्क नाहीं. व तो (त्यानें?) किंवा माझे वाडवडिलांनीं कधीं कबूल केलेला नाहीं. वादी आपले त्या हक्कावरून दावा करीत असल्याचें दिसतें, त्यास तसा आपला हक्क शाबीद करण्याची तजवीज पूर्वी करावयाची, ती न करितां त्या हक्कावरून उत्पन्न घेण्याचा दावा वादी करितो, तो गैरशिस्त आहे, सबब चालवूं नये;

२. पत्रिकापूजनाचा मन्त्र आमचे उपाध्ये सांगतात; वादी हे पळशे असल्याकारणानें त्यांस असा मन्त्र आह्मांस सांगण्याचा अधिकार नसोन, त्यांणीं असें कधीं केलेंहि नाहीं;

३. लग्नमुञ्जीचे कार्यांत घटिका घालणें व पत्रिकापूजन करणें, हें हिन्दुशास्त्राप्रमाणें अवश्य कर्म आहे; सबब मीं आपले घरीं कार्यांत घटिका घातली पाहिजे, असा मजवर बोजा नाहीं; यास्तव त्याबद्दल आपला हक्क वादीस सांगतां येणार नाहीं. माझे घरीं लग्नमुञ्जीचें कार्य जाहलें असतां, घटिका घालण्याचें आमचे मर्जीस असल्यास वादीचे कुळांतील कोणास त्याचा हक्क ह्मणून नव्हे परन्तु, ते त्या कामांत जाणते असल्याकारणांनीं त्यांस सदहू काम कर-

ण्यास बोलावितों. व त्याबद्दल व पत्रिकेपुढें ठेविलेले दक्षिणेबद्दल आमचे मर्जीस येईल तें देतों; यास्तव वादीस एवढ्यावरून कोणताहि हक्क मिळूं शकत नाहीं;

४. वादीनें फिर्यादअर्जीत हक्क ह्मणून ज्या जिनसा मागण्याचा दावा केला आहे, त्या तितक्या दिल्या पाहिजेत असा नियम नसोन, दाव्यांतील लिहिलेले कार्यांत तितका खर्च मीं केला नाहीं. हा खर्च करणें व तो कोणास देणें हें आमचे खुशीवर आहे;

५. वादीनें माझे मुलाचे लग्नांतील घटिकेपत्रिकेचे निमित्त उत्पन्नाचा दावा केला आहे, परन्तु मुलाचे लग्नांत मुलाकडे घटिका घालण्याचा सम्बन्ध नाहीं, असें असतां, त्याबद्दलचा दावा गैर-शिस्त आहे;

६. वादीचें कोणतेहि प्रकारें नुकसान जाहलें असेल, तरी त्याबद्दल त्याचा दावा मजवर चालणें वाजवी नाहीं;

७. वादीची जात पळशे आहे, ते आमचे ब्राह्मणलोकांबरोबर घटिका घालण्याचें काम करितांना सम्पर्क करूं लागले; यास्तव या लोकांपासून आपले धर्माचे कामांत गोन्धळ होऊं नये, असें योग्य वाटल्यावरून, आमचे जातीनें या लोकांस घटिका घालण्याची बन्दी केली आहे; सबब हा जातीशीं वाद आहे, यास्तव याबाबद दिवाणी कोर्टांत कायद्याप्रमाणें दावा चालवूं नये;

यास्तव वादीचा दावा रद्द होऊन माझा खर्च वादीकडून देववावा. तारीख ७ माहे जुलई सन १८७३.

**बाळाजी विश्वनाथ माटे आगासकर दस्तुर खुद्द.**

गङ्गाधर काशीनाथ, वकील.

वर कैफियतींतला लिहिलेला बाळाजी विश्वनाथ प्रतिवादी अशी प्रतिज्ञा करितों कीं, वर लिहिलेला मजकूर माझे समजुतीप्रमाणें खरा आहे. तारीख मजकूर.

**बाळाजी विश्वनाथ माटे आगासकर दा खुद्द.**

नम्बर २४६.

सन १८७३.

पुरसीस वादीतर्फें वकिलाचीः—

कोर्टाचे सवालांवर जबाबः—वादीतर्फें बाकी राहिलेले साक्षी आजरोजीं जबान्या जाहल्या, त्याशिवायचे हे आगाशीगांवीं वादी हे वृत्त्यंशी जोशी आहेत, याबद्दलची त्यांस माहिती असल्याबद्दलचे आहेत व लोकांकडील वृत्तीबद्दल वादीस उत्पन्न काय मिळतें; त्याबद्दल त्यांस माहिती आहे. वादी हे ब्राह्मणलोकांकडेस जोशीपणाचे वृत्तीचें काम करितात, त्या वेळेस वधूवर व मुञ्जीचा मुलगा याचे डोळ्यांस पाणी लावितात, अशी त्यांची पूर्वापार वहिवाट आहे. ती वहिवाट त्या ब्राह्मणलोकांस पसन्त वाटत नसल्यास तसें करण्याविषयीं वादीचा आग्रह नाहीं. तारीख २८ माहे जानेवारी सन १८७५.

वतीनें दामोदर कृष्ण वकील.

आत्माराम बळवन्त वकील यांची सही.

पुरसीस प्रतिवादीतर्फें वकिलाचीः— निा ३१.

कोर्टाचे सवालांवर जबाबः—वादी पळशे यांणीं वधूवर व मुञ्जीचा मुलगा व लग्नमुञ्जीचे कार्यामध्यें जे सोंवळेलोक असतील त्यांजला स्पर्श न केला असतां, त्यांजपासून जोशीपणासम्बन्धीं घटिका घालण्याचें काम करविण्यास कांहीं हरकत नाहीं. मात्र तें कार्य करून घेणाराचे मर्जीवर, त्याकडून तें काम घ्यावयाचें आहे किंवा न घ्यावयाचें आहे. ता २८ माहे जानेवारी सन १८७५.

दामोदर किसन वकील.

नम्बर २४६. निा ३२.

सन १८७३.

जबानी बाळाजी विश्वनाथ याची. वादीतर्फें सवालांवर जबाबः— माझा धाकटा मुलगा गोविन्द याची मुञ्ज मीं, शके १७९३ सालांत केली, त्यावेळीं घटिका घातली होती; पत्रिकापूजन केलें होतें; हीं

दोन्ही कामें आबा मोघे वसईचे राहणार, यांजकडून मीं करविलीं आहेत; माझे वडील मुलाची मुञ्ज जाहली, तेवेळेस मीं घटिकापत्रिका कोणाकडून घालविली, त्याचें मला स्मरण नाहीं ; माझा मोठा मुलगा महादेव याचें लग्न आगाशी गांवीं झालें ; तें भिवण्डकर याचे मुलीबराबर झालें ; त्या कार्यांत घटिका घातली होती व पत्रिकापूजन केलें होतें, तें कोणाचे हातून केलें होतें त्याचें स्मरण नाहीं ; त्या ठिकाणीं लग्नाच्या वेळीं वादी लक्ष्मण गोविन्द जोशी हा तेथें आला नव्हता. मीं आबा मोघे यास माझे मुलाचे मुञ्जींत तीन घटिका घातल्याबद्दल, व पत्रिकापूजनाबद्दल ८२ आणे किंवा ८४ चार आणे दिल्हे आहेत ; याशिवाय सुमारें ४ टिपऱ्या तान्दूळ दिल्हे आहेत व गणपतिपूजनाबद्दल एक सुपारी दिल्ही आहे व विड्याचीं पानें किती दिल्हीं आहेत, त्याचें स्मरण नाहीं. व नारळ, केळीं त्याजला मीं दिल्हीं नाहींत. माझे मुलाचे लग्नांत मीं घटिकापत्रिकेबद्दल कांहीं दिल्हें नाहीं. जोशास त्याबद्दल कांहीं द्यावें लागतें किंवा नाहीं, याचें स्मरण नाहीं. लग्नांतील अन्तःपटाचा शेला कोणास दिलेला आहे, त्याचें मला स्मरण नाहीं. व काय किमतीचा शेला आणला होता, त्याचेंहि स्मरण नाहीं ; मुञ्जीची व लग्नाची घटिका घालण्यासाठीं खण लागतात, हें ठाऊक नाहीं ; आणले होते किंवा नाहीं, हें स्मरण नाहीं.

वादीतर्फे सवाल नाहीं. तारीख २८ माहे जानेवारी सन १८७५ इसवी.

आजरोजीं आमचे समोर प्रतिज्ञेवर जबानी लिहून दिल्ही. ता मजकूर.

सखाराम कृष्ण शेट. से. स. जज्य.

नम्बर २४६. निा ३३.

सन १८७३.

जबानी बळवन्तराव आपाजी पटवर्धन याची. वादीचे सवालांवर जबाब:—आगाशी गांवांमध्यें जोशीपणाचें काम वादी लक्ष्म-

ण गोविन्द जोशी हे करीत आले, असें मीं, माझे बारा वर्षांचे उमरीपासोन हल्लींचे दोन वर्षांचे मागील वर्षापर्यन्त पाहत आलों. त्यांणीं तें काम, जोशीपणाचे वृत्तीचें काम चित्पावनब्राह्मण व पळशेब्राह्मण व सोनार व सामवेदी व वाणी यांजकडे चालविलें आहे. जोशीपणाचें काम वादी याणें लग्नमुञ्जीमध्यें घटिका घालण्याचें व पत्रिकापूजन करण्याचें वर लिहिलेले जातींकडे केलेलें आहे. मजकडे मुञ्जी व लग्नें जाहलीं, त्यावेळीं जोशीपणाचें काम वादी लक्ष्मण जोशी यांणीं केलें; त्यांजला प्रत्येक मुञ्जींत व लग्नांत घटिकेबद्दल (व) पत्रिकेबद्दल एक अधोलीपासून तीन अधोलीपर्यन्त तान्दूळ दिल्हे. व चार नारळ व दहाबारा सुपाऱ्या व दक्षिणा किर्कोळ ८२ आणे व पत्रिकेची दक्षिणा ८४ आणे पासोन ८८ आणेपर्यन्त दिल्हेली आहे. व घटिकेचे पात्रामध्यें तान्दूळ भरून दिल्हेले आहेत. घटिका व पत्रिकेबद्दल मीं भाण्डीं व कपडे दिलेले नाहींत. मीं मुलीचें लग्न केलें, त्या मुलीच्या सासऱ्याकडील अन्तःपटाचा शेला वादी लक्ष्मण जोशी यास मिळालेला आहे.

प्रतिवादीतर्फे सवालांवर जबाबः—मीं चित्पावनब्राह्मण आहें. जोशीपणाचे कामाबद्दल जोशी यास अमुकच द्यावें, असा कांहीं ठराव असल्याचें मला माहीत नाहीं. जोशीपणाचें काम, मुहूर्त पाहणें व घटिका घालणें व पत्रिकापूजन करणें व आणखी कामें आहेत तीं जोशीपणाचे वृत्तीचीं आहेत; त्या कामांचे सम्बन्धानें ती जोशीपणाची वृत्ति आहे, अशी माझी समजूत आहे. पाण्डोबा हर जोशी हे पळशेब्राह्मण आहेत. त्यांचें मला देणें होतें, तें मीं दिल्हें आहे. त्यांणीं मला सूट दिल्ही नाहीं. मी ऋग्वेदीब्राह्मण आहें. वादी लक्ष्मण गोविन्द जोशी हे कोणते वेदाचे शाखेचे ब्राह्मण आहेत, तें मला माहीत नाहीं. जो ज्या शाखेचा ब्राह्मण आहे, त्याजला दुसरे शाखेचे ब्राह्मणांकडून आपले घरीं शास्त्रविधिसंस्कारामध्यें जोशीपणाचें काम करून घेतां येईल किंवा नाहीं,

याची मला माहिती नाहीं. मीं आगाशी गांवांतील वतनदार आहें. माझे घरचा कोपरकर उपाध्या आहे. त्याचें नांव मोरभट्ट कोपरकर. तो आगाशीगांवांतील दुसरे कोंकणस्थलोकांचाहि उपाध्या आहे. त्याजकडून माझे घरीं विधिसंस्कारांमध्यें जोशीपणाचें काम करून घेण्यास मला कांहीं अडचण नाहीं; परन्तु मीं त्याला आजपर्यन्त बोलाविलें नाहीं. माझे घरीं वादी लक्ष्मण जोशी याणें जोशीपणाचे सम्बन्धानें जें काम केलें, त्यावेळेस मन्त्रोचार जो करावा लागतो तो वादी लक्ष्मण जोशी याणेंच केलेला आहे. तो मन्त्रोचार मीं शिकलों नाहीं. तारीख २८ जानेवारी सन १८७५.

आजरोजीं आमचे समोर प्रतिज्ञेवर जबानी लिहून दिल्ही, ता मा.

सखाराम कृष्ण शेट, से. सबार्डिनेट जज्य.

नम्बर २४६. निा ३४.

सन १८७३.

जबानी सदाशिव गणेश (फाळके) याची. वादीचे सवालांवर जबाव:—मीं चित्पावनब्राह्मण आहें. मीं आगाशीगांवीं तीन पिढ्यांचा रहिवासी आहें. माझे घरीं दोन मुलींचीं लग्नें पाञ्च-सहा वर्षांचे पूर्वी जाहलीं व पाञ्च-सहा वर्षांचे मागें माझे दोन मुलांच्या मुञ्जी जाहल्या. त्यावेळेस पाण्डोबा हरजोशी यांचे कुळांतील माणसांकडून मीं घटिका घालविली आहे. ज्या असामींनीं घटिका घातली, त्यांचीं नांवें ध्यानांत नाहींत. लक्ष्मण गोविन्द जोशी व पाण्डोबा हरजोशी एकाच कुळांतील आहेत. मीं घटिका घालविली, त्यावेळीं तेथें पत्रिकापूजन करावें लागतें, तें पत्रिकापूजन मीं केलें व पूजा माझा उपाध्या मोरू नाना कोपरकर यांणीं केली. ज्या जोशानें घटिका घातली, त्याणें पत्रिका तयार करून आणली होती. त्याशिवाय त्या जोशाचा त्या पत्रिकेसम्बन्धीं कांहीं उपयोग जाहला नाहीं. मीं माझे उमरीचे नग १२ वे वर्षापासून मीं समजुतींत आलों, त्या वेळापासून पाण्डुरङ्ग हरजोशी

याचे घराण्यांतील कसबे आगाशी गांवांमध्यें लग्नमुञ्जींत हल्लींचे दोन वर्षांपूर्वींपर्यन्त घटिका घालीत आले. ती घटिका त्यांणीं सोनार व वाणी व माझे जातीचे लोकांकडे विधिसंस्कारांत घातलेली आहे. जोशाला मीं घटिका घालण्याबद्दल, व पत्रिकेबद्दल काय दिलें, त्याचें मला स्मरण नाहीं. प्रतिवादीतर्फे सवालांवर जबाबः— मीं ऋग्वेदीब्राह्मण आहें. घटिकापत्रिका मुञ्जीलग्नांमध्यें घालणें हें ज्योतिःशास्त्राचे सम्बन्धाचें आहे. तें, वेळ समजण्यासाठीं आहे. घटिकापत्रिका न घालतां लग्नमुञ्जीसाठीं घड्याळ पाहून वेळ ठरवितां येईल. जोशी (काम) हें मला ठाऊक नाहीं. माझा उपाध्या मोरभट्ट कोपरकर याजला घटिकापत्रिका घालण्याची माहिती नाहीं व त्या उपाध्यानें घटिकापत्रिका घालण्याची माहिती करून घेतली, तर मीं त्याजकडून घटिकापत्रिका घालवूं (वीन). आगाशीगांवांमध्यें पाण्डोबा हरजोशी याचे घराण्यांतील लोकांशिवाय कोणास घटिका घालण्याचें माहीत नाहीं. परम्परा आल्याप्रमाणें पाण्डोबा हरजोशी यांचे घराण्यांतील लोकांस मीं बोलाविलें आहे. तारीख २८ माहे जानेवारी सन १८७५ इा.

आजरोजीं आमचे समोर प्रतिज्ञेवर जबानी लिहून दिल्ही, ता मजकूर.

सखाराम शेट. से. स. जज्य.

नम्बर २४६. निा ३५.

सन १८७३.

जबानी पाण्डुरङ्ग सदाशिव (कर्पे) याची. वादीतर्फे सवालांवर जबाबः—मीं कऱ्हाडाब्राह्मण आहें. मीं गुदस्तां माझे मुलीचें लग्न केलें व चार वर्षें जाहलीं, तेव्हां मीं माझे मुलाची मुञ्ज केली. त्या मुञ्जीचे वेळेस घटिका घालण्यास जोशी होता. तो कोणता जोशी होता, हें स्मरण नाहीं. परन्तु पळशांपैकीं जोशी होता. आगाशीगांवांमध्यें लक्ष्मण गोविन्द जोशी व पाण्डोबा हरजोशी

यांची तीन वर्षांचेपूर्वी वृत्ति होती. त्या दोघांचे घरांपैकीं मजकडेस घटिका घालण्यास जोशी आलेला होता. सदहू जोशाची वृत्ति आगाशीगांवांत कुळम्बी व वाणी व हेटकरी व कुडाळेब्राह्मण व सामवेदीब्राह्मण यांजकडे आहे. याशिवाय आणखी कोणाकडे आहे किंवा नाहीं, तें मला माहीत नाहीं. कोंकणस्थब्राह्मणांकडे त्याणें तीन वर्षांचेपूर्वी वृत्तीचें काम केलेलें आहे. पाण्डोबा हरजोशी व लक्ष्मण गोविन्द जोशी, यांणीं आगाशीगांवांत वृत्तीपणाचें काम केलेलें वीस वर्षें मीं पाहिलें आहे. मजकडे मुञ्जींत ज्याणें घटिका घातली त्याणेंच पत्रिका आणली व वाचिली व त्या पत्रिकेची पूजा केली.

प्रतिवादीचे सवालांवर जबाबः—माझे घरीं माझे मुलीचें गुदस्तां लग्न जाहलें, त्या वेळची घटिकापत्रिका आबा मोघे यांणीं केली. ते आबा मोघे माझे जातीचे कऱ्हाडेब्राह्मण आहेत. आगाशीचे लोकांनीं पळशेब्राह्मणांस बोलावण्याची मनाई केल्यामुळें, मीं आबा मोघे यांस बोलाविलें. घटिका घालण्यासम्बन्धीं काय काय कृत्य करावें लागलें त्याचें मला स्मरण नाहीं व पत्रिकेंत काय लिहिलें होतें, याचेंहि स्मरण नाहीं व जी घटिका घातली होती, ती लग्नाची व मुञ्जीची वेळ साधण्याकरितां घातली होती. आगाशीगांवांत माझा उपाध्या नाहीं. माझा घर-उपाध्या वसई येथें खाण्डेकर आहे. मी पूर्वीचा वसई गांवचा राहणारा असोन हल्लीं पञ्चवीस—सत्तावीस वर्षें आगाशी येथें राहतों. आगाशीस माझे जातीचे उपाध्ये आहेत. त्यांजकडून लग्नमुञ्जीचे उपाध्यिकपणाचें काम मीं करविलें आहे. त्यांजला मीं विचारल्यावरून त्यांणीं सांगितलें कीं, मीं जोशीपणाचें काम करणार नाहीं. मीं मुलीचें लग्न व मुलाची मुञ्ज केली, त्यावेळेस जोशीपणाचें काम करण्यास पळशेब्राह्मणांशिवाय दुसरे कोणी शिकलेले नव्हते. पत्रिकापूजन मजकडील लग्नमुञ्जींमध्यें जाहलें, त्यावेळेस मीं तेथें बसलों होतों, किंवा नाहीं याचें मला स्मरण नाहीं. त्यावेळेस यजमानासच

बसलें पाहिजे असें नाहीं. त्याचा आप्तसम्बन्धी कोणी बसला तरी चालतो. पत्रिकापूजनाचे वेळेस मन्त्र ह्मणावा लागतो किंवा नाहीं, याची मला माहिती नाहीं व मजकडील कार्यांत कोणीं मन्त्र ह्मटलेला होता किंवा नाहीं, याचें मला स्मरण नाहीं. घटिका घालण्याचें काम यास मीं 'वृत्ति' असें ह्मणतों.

वादीतर्फे सवालांवर जबाबः—पळशेब्राह्मणांस जोशीपणाचे कामास न बोलावण्यासाठीं आगाशी गांवचे चित्पावनब्राह्मण व कऱ्हाडेब्राह्मण यांणीं मनाई केली होती, त्याप्रमाणें मी न वागलों असतों, तर मला त्या लोकांनीं जातीबाहेर केलें असतें.

आजरोजीं आमचे समोर प्रतिज्ञेवर जबानी लिहून दिल्ही ता.

सखाराम कृष्ण शेट. से. स. जज्य.

नम्बर २४६ निा ३९.

सन १८७२.

जबानी **गोपाळ सदाशिव गद्रे**†(ऊर्फ नाना गद्रे) यांची. वादीचे सवालांवर जबाबः—आगाशीगांवांत लग्नमुञ्जीच्या कार्यांमध्यें जोशीपणाचें काम करण्याचा हक्कदार कोणीं आहे किंवा नाहीं, तें मला माहीत नाहीं.

---

* ह्यावरून वाचकांच्या लक्षांत सहज येईल कीं, आह्मीं ह्मणतों त्याप्रमाणें ह्या लोकांनीं मुद्दाम हद्दवाद वाढविण्यासाठीं वेळोवेळीं भलतीं कुभाण्डें रचण्याच्या कामीं प्रयत्न करण्याचें कमी केलें आहे असें नाहीं. सारांश वृत्तीचा अभिलाष.

† आगाशी येथें हा एक सधन पुरुष आहे. याचें, तिकडील प्राचीन वृत्त्यंशी (ह्या खटल्यांतील वादी) ह्यांजबरोबर वरवर स्नेहभाव राखून, परिणामीं त्यांनां गौणत्व आणण्याच्या प्रयत्नास शरीरानें व द्रव्यादिद्वारा झटून पडणें, हें केवढें विचाराचें काम असावें? हा गृहस्थ नुकताच त्र्यम्बक, नासिक व काशी इत्यादि क्षेत्रीं यात्रेच्या वगैरे उद्देशानें गेला होता असें ऐकण्यांत येतें. तेथें वरील वादींच्या विरुद्ध संमतिपत्र आणण्याच्या खटपटींत गुन्तून, त्यांस गौणत्व आणून जगतांत त्यांचें हंसें करावें, हाच काय तो यात्रेचा वगैरे उद्देश? याविषयींचा बोभाटा काश्यादिक्षेत्रांतून आलेल्या लेखांवरून प्रत्यक्ष दिसत आहे. ज्या वृत्त्यंशी ब्राह्मणांची वृत्ति आजमितीपर्यन्त चालवून, ज्यांस आपण व आपल्या वडिलांनीं वंशपरम्परेनें पूजिलें, त्यांच्याच पाठीमागें हात धुवून लागणें, ही केवढी मौजेची गोष्ट !! द्रव्यानें ब्राह्मण होत नाहींत किंवा, द्रव्यानें कोणाच्यानें ब्राह्मणत्व नष्ट करितां येत नाहीं, हें निर्विवाद होय. ह्या वृत्त्यंशांचें जें अनादिसिद्ध ब्राह्मणत्व आहे तें आहेच, कारण कीं जें खरें तें खरें. ह्या जबानीवरून स्पष्ट दिसून

ज्याला आम्हीं तें काम करण्यास बोलावूं तो येतो. त्याजकडून आम्हीं त्या कार्यांत घटिका घालवितों. तेथें पत्रिकेची जरूर पडते किंवा नाहीं, तें मला माहीत नाहीं. मीं माझे घरीं लग्नमुञ्जी केल्या आहेत. मीं आगाशी गांवांत शें-पन्नास वर्षें राहतों. तें राहणें माझें व माझे वडिलांचें आहे. माझे घरचे कार्यांत घटिका घालण्याचें काम मीं कोणाकडून करविलें याची मला आठवण नाहीं. वादी लक्ष्मण गोविन्द जोशी व त्याचे भाऊबन्द यांजकडून मीं जोशीपणाचें काम करविलें आहे किंवा नाहीं, तें मला स्मरत नाहीं. पाण्डोबा हरजोशी यांचे घराण्यांतील लोकांकडून माझे घरीं जोशीपणाचें काम लग्नमुञ्जींत करविलें आहे. तें कोणते सालांत करविलें, त्याची आठवण नाहीं. परन्तु तीन-चार वर्षांचेपूर्वीं करविलें आहे. मीं चित्पावन जातीचा ब्राह्मण आहें. लक्ष्मण गोविन्द जोशी याचे जातीचे ब्राह्मणांखेरीज दुसरे जातीचे ब्राह्मणांनीं माझे घरीं जोशीपणाचें काम केलेलें नाहीं. पळशेब्राह्मण यांणीं मजकडे जोशीपणाचें काम केलेलें आहे. तीनवर्षांचे पूर्वीं आगाशीगांवांत पळशे व कऱ्हाडे व चित्पावन, या जातींचे लोकांनीं लग्नकार्यांत लोकांकडे जोशीपणाचें काम केलेलें आहे, तें कोणाकडे केलेलें आहे तें ध्यानांत नाहीं. तीन वर्षांचे पलीकडे पळशेब्राह्मणांशिवाय, दुसरे ब्राह्मणांनीं आगाशी गांवांमध्यें जोशीपणाचें काम कोणाकडे केलें, असें मीं पाहिलेलें नाहीं. हल्लींचे तीन वर्षांत पळशेब्राह्मणांशिवाय दुसरे ब्राह्मणांनीं आगाशी गांवांत जोशीपणाचें काम केलेलें आहे, तें कऱ्हाडे व चित्पावन व देशस्थ ब्राह्मण यांजकडे त्यांणीं केलेलें आहे. पळशेब्राह्मणांचे हातून जोशीपणासम्बन्धीं काम घेऊं नये, असा आपसांत कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे यांणीं हल्लीं दोन वर्षांवर नियम केला आहे. तो नियम कोणीं मोडल्यास, त्या मोडणारास काय प्रायश्चित्त द्यावें, याची पट्टी (किंवा!) कांहीं नियम जाहल्याचें माझे ध्यानांत नाहीं.

---

येईल कीं, जो गृहस्थ न्यायाधीशापुढें "**पळशेब्राह्मण**" हीं अक्षरें स्वदस्तूर लिहून देतो, तोच गृहस्थ वरील प्रकारचीं संमतिपत्रें घेण्याचे खटपटींत पडतो, तर त्याचें धाडस मोठेंच समजायाचें! वाचकांस हेंहि समजेल कीं, या खटल्यांत चित्पावन, कऱ्हाडे व इतर लोकांनीं ज्या जबान्या दिल्या आहेत, त्या सर्वांत हे वृत्त्यंशी ब्राह्मण अनादिसिद्ध आहेत, असें स्वदस्तुरीं लिहून दिलें आहे; असें असतांहि, त्यांस गौणत्व आणावें ह्या इराद्यानें जे प्रयत्न करणारे ते केवळ बालिश आहेत, असें सहज लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

प्रतिवादीतर्फे सवालांवर जबाबः—पळशेब्राह्मण हे ब्राह्मणलोकांकडेस पूर्वीं जोशीपणाचें काम करीत, त्यावेळेस नवरानवरीस व ज्या मुलाची मुञ्ज व्हावयाची त्यास स्पर्श करीत नसत व ते पेढाचे (पिढीचे!) ब्राह्मण नसल्यामुळें व आह्मीं ब्राह्मण असल्यामुळें आमचे धर्माविरुद्ध त्यांचें स्पर्श करणें आहे व त्यांचे स्पर्शानें आमचा शुचिर्भूतपणा बिघडतो व ते लोक अलीकडे दोन चार वर्षें नवरानवरी व मुञ्जीचा मुलगा यांच्या डोळ्यांस पाणी लावून त्यांस स्पर्श करूं लागले, या कारणानें त्यांणीं जोशीपणाचें काम न करण्याविषयीं आह्मीं आपसामध्यें निश्चय केला. जोशांकडून जी घटिका घालावी लागते, ती कालसाधनासाठीं घालावी लागते. जोशांकडून घटिका न घालवितां लग्नमुञ्जींतील काल साधण्याकरितां घड्याळाचें साधन घेतां येईल, आणि तसें करणें धर्मशास्त्रांत विरुद्ध होईल असें मला वाटत नाहीं. घटिका घालण्यांत ज्योतिषशास्त्राची माहिती पाहिजे. पळशेलोकांशिवाय आगाशीगांवांत ज्योतिःशास्त्रज्ञ कोणी नाहींत. माझा घरउपाध्या कवाड येथें देव आहे(त), त्याजला ज्योतिःशास्त्राची माहिती नाहीं. त्याजला जर माहिती असती, तर मीं त्याजकडून आपलेकडचें जोशीपणाचें काम घेतलें असतें.

वादीतर्फे सवालांवर जबाबः—ब्राह्मणलोकांकडे लग्नमुञ्जींमध्यें घटिकापत्रिकेचें काम ब्राह्मणजातीशिवाय, दुसरे असामीकडून घेतां येईल किंवा नाहीं, याविषयींची मला माहिती नाहीं, कारण मला धर्मशास्त्राची माहिती नाहीं. लग्नमुञ्जीमध्यें कुळम्बी* ज्योतिषपणाचें, कालसाधनाचें काम करील, तर तें त्याजकडून काम घेण्यास हरकत पडेल असें मला वाटत नाहीं. लग्नमुञ्जीची घटिका घालितात, त्यास पूजा करावी लागते किंवा नाहीं, तें मला माहीत नाहीं. तारीख २८ माहे जानेवारी सन १८७५.

आजरोजीं आमचे समोर प्रतिज्ञेवर जबानी लिहून दिल्ही. तारीख मा.

**सखाराम कृष्ण शेट से. स. जज्ज.**

---

* ह्या जबानीवरून असें दिसतें कीं, कुळम्ब्यांकडूनहि ब्राह्मणांकडेस घटिका घालविल्यानें किंवा, त्यांजकडून पत्रिकापूजन करविल्यानें ज्यास दोष वाटत नाहीं, त्यास विधिनिषेधाचा बाऊ किती वाटत असेल !! वः ! काय ब्राह्मणत्वाचा अभिमान! ज्याची इकडील यजुर्वेद्यांच्या वृत्तिहरणार्थ, सर्व तजवीज !!!

नम्बर २४६. निा ४०.

सन १८७३.

जबानी **रावजी नारायण दातार** याची. वादीतर्फे सवालांवर जबाबः— आगाशीगांवांत माझें राहणें सुमारें ४० वर्षें आहे. त्या गांवांत जोशी-पणाचे वृत्तीचा हक्क कोणाचा आहे, याची मला माहिती नाहीं. मीं चित्पावनजातीचा ब्राह्मण आहें. तीन वर्षांचेपूर्वीं मीं माझे एका मुलाची मुञ्ज केली व एक मुलीचें लग्न केलें, त्यावेळेस जोशीपणाचें काम मीं पळशेजातीचे लोकांकडून करविलें आहे. पळशेलोकांनीं आगाशीगांवांत दुसरे ब्राह्मणलोकांकडे जोशीपणाचें काम केलेलें आहे, अशी आठ-नऊ वर्षांची माहिती आहे. त्यापूर्वीचें स्मरण नाहीं. मजकूरील लग्नांत व मुञ्जींत पळशे यांणीं घटिका घातली आहे. या-शिवाय दुसरे कांहीं त्यांणीं केलेलें नाहीं. सदर्हू घटिकेची पूजा करावी लागते किंवा नाहीं, तेथें एका देवतेची पूजा करावी लागते किंवा नाहीं, याची मला माहिती नाहीं. त्या घटिकेजवळ पत्रिकेची पूजा करावी लागते. ती पूजा माझे घरीं कोणीं केली, त्याची आठवण नाहीं. माझे घरीं लग्नमुञ्जीचे वेळेस पत्रिका आणली होती किंवा नाहीं, याची माहिती नाहीं व पत्रिकेची आवश्यकता आहे किंवा नाहीं हें, मला माहीत नाहीं. दरएकाबद्दल जोशास मीं काय दिल्हें, याचें मला स्मरण नाहीं. प्रतिवादीतर्फे सवाल नाहीं. तारीख २८ माहे जानेवारी सन १८७५.

आजरोजीं आमचे समोर प्रतिज्ञेवर जबानी लिहून दिल्ही. ता मा.

**सखाराम शेट से. सबार्डिनेट जज्य.**

नम्बर २४६. निा ४२.

सन १८७३.

Defendant objects, that as the preliminary issue was decided in the Lower Court in his favour, his evidence was not taken, as would appear from Exhibits 20 and 55. But as Plaintiff's Pleader argues it would appear from No. 75 and the proceedings that after the 10th July 1876, when the evidence had been concluded (Plaintiff's witnesses having been all examined), there were further post-ponements from time to time, *viz.*, to 22nd July, and again to 27th July. There is no application on the record to show, that Defendant made any effort whatsoever to secure the attendance or examination of his witnesses. The Subordinate Judge does not make any mention of Defendants requiring witnesses to be examined, as from Exhibits 20 and 55 it would appear that they should have done, if they still denied it after the conclusion of Plaintiff's case. There is, therefore, no necessity to send this case back for their evidence. The amount to be awarded to Plaintiff on account of these ceremonies is called in question by Issue No. VII. Defendant in his Kaiphiyat alleges that the sum paid on these occasions is optional, but he does not assert that what the Plaintiff claims is excessive, while each of the witnesses who depose on that point, including his own caste-fellows, approach more closely to Plaintiff's estimate of what is usual than Defendant's statement in Exhibit No. 31. This last seems purposely vague and inadequate. Still, as Plaintiff's witness, No. 33, gives the fee for Patrika-Pujan at 4 annas instead of 8 annas, as Plaintiff claims, and the Munj-Dakshina at 2 annas, instead of Rs. 3-3, it seems that this, the lowest estimate, may be taken as the minimum Defendant could decently have given, and the Re. 1 for the marriage Ghatka being also deducted, the rest of Plaintiff's claim would seem to tally with the estimate of his witnesses. The sum of Re. 1-5-3 being thus deducted, leaves Rs. 5-1-0 due to Plaintiff for the two ceremonies.

The decree of the Subordinate Judge is reversed, and Plaintiff's claim to receive Rs. 5-1 is awarded. The remainder of

his claim is rejected. Defendant to pay Plaintiff's costs, and to bear his own throughout.

*October* 15*th* 1877.

(Signed) H. BATTY,
Acting Assistant Judge.
True Copy.




Deputy Registrar.

Sealer.

*The* 12*th day of July* 1883.

---

Decretal Order passed by the High Court in the above case, being second appeal No. 33 of 1878.

The Court confirms the Decree of the Lower Appellate Court with costs on the appellant in the High Court.

(Signed) R. WEST,
(Signed) R. H. PINHEY.

*This* 30*th day of July* 1878.

Seal of the High Court, Bombay.

True Copy
(Signed) K. C. BEDARKAR,
Dy. Registrar.

*The* 12*th day of July* 1883.

नकलेस कागद दिल्हा ताा ३ जुलई सन १८८३.
नक्कल तयार ता. १२ जुलई सन १८८३.

अर्जदार लक्ष्मण गोविन्द जोशी याणें ही नक्कल मिळणेंविषयीं केलेला अर्ज कबूल जाहल्यावरून या नकलेची फी ४८९ चार रुपये नऊ आणे घेऊन ही नक्कल अर्जदार यास दिल्ही. ता. २६ जुलई सन १८८३.

बाबुराव विठ्ठल नाझर कारकून.

बाळकृष्ण आनन्दराव खळे, भ० शिरस्तेदार.

## परिशिष्ट (उ २.*)

# आगाशी येथील श्रीभवानीशङ्कराचे देवालयाचा खटला.

## शके १७९३. इ. स. १८७१.

## ठाणें डिस्ट्रिक्ट जज्जकोर्टांत.

**आनन्दराव भिकाजी फडके, जात ब्राह्मण, धन्दा व्यापाराचा, राहणार कसबे आगाशी, तालुके वसई, जिल्हा ठाणें.** } वादी.

**बि. म्युलकसाहेब, फुलपावर माजिस्त्रेट प्रान्त वसई, जिल्हा ठाणें.** } प्रतिवादी.

दावा रुपये १२५.

प्रतिवादी यांणीं क्रिमिनलप्रोसिजरकोड कलम ६२ प्रमाणें केलेला हुकूम रद्द करून, प्रतिवादी यास निरन्तरची ताकीद देण्याविषयीं मीं वादी आनन्दराव भिकाजी दावा करितों कीं, प्रतिवादी याणें ता. १९ आगष्ट सन १८७१ नम्बर १९० ची मजला नोटीस दिली; ती खालीं लिहिल्याप्रमाणें: —

आनन्दराव भिकाजी फडके, राहणार आगाशी यांस—तुह्मीं कसबे आगाशी येथील भवानीशङ्कराचे देवालयांतील देवाची पूजा चित्पावन व पळशेब्राह्मण व लिङ्गाईतलोक (ह्यांची?) करण्याची वहिवाट असतां, त्या देवालयांतील गाभाऱ्यास तुह्मीं कुलूप लाविलें आणि ह्या तुमचे कृत्यानें पळशेब्राह्मणलोकांस देवाची पूजा करण्यास पीडा जाहली व त्यापासून तण्टा उत्पन्नहोण्याचें व मोठी मारामार

---

* हा अस्सल खटला इंग्रजी व मोडी लिपींत असून तो, वे. रा. रा. विठ्ठल नीलकण्ठ जोशी निफाडकर हल्लीं वस्ती आगाशी यांजपाशीं आहे. ह्या खटल्यांत वादी व प्रतिवादी ह्यांचे तर्फेचे साक्षीदार एकन्दर सुमारें १२५ आहेत; त्यांच्या जबान्या बहुशः आपआपल्या पक्षकाराच्या अभिप्रायास अनुसरून आहेत; त्यांत तर वादींचे अनुयायी गद्रे हे सम्पन्न असल्यामुळें तत्पक्षपाती बहुतेक साक्षीदार त्यांचे देणेंकर होते, हें त्यांनीं कोर्टासमोर दर्शविलेंच आहे. त्या सर्व जबान्या ह्या पुस्तकांत दिल्या असतां उगीच ग्रन्थविस्तार होईल ह्मणून दिल्या नाहींत; प्रत्येक कोर्टांत प्रतिवादीतर्फेंच न्याय झाला. अखेरीस वकिलाच्या हयगईमुळें शेवटचा फैसला वादीतर्फें झाला. तथापि त्यांचें सर्वच मागणें मञ्जूर झालें नाहीं.

होण्याचें भय आहे ; यास्तव तुह्मांस फरमाविण्यांत येतें जेः—तुह्मीं सदर्हू देवालयाचे गाभाऱ्यास कुलूप लाविलें आहे, तें देखतहुकुमीं काढून दरवाजा खुला ठेवावा आणि कोणास हरकत करूं नये. ता. १९ आगष्ट सन १८७१. ताजाकलमः—सदर्हूप्रमाणें न कराल तर, पिनलकोडाचें कलम १८८ प्रमाणें शिक्षा होईल. तारीख मजकूर.

सदर्हूवरून, आमचे घराण्यांतील एका पुरुषानें बान्धिलेल्या मालकीच्या व वंशपरम्परा आमचे देखरेखी व वहिवाटीखालीं असलेल्या देवळांत सदरील नोटिसीमुळें, आमच्या वंशपरम्परेच्या व जातीच्या अनन्यवहिवाटीच्या हक्कास अडथळा आणिला; आणि जे लोक सदर्हू देवळाचे गाभाऱ्यांत जाण्याची वहिवाट नाहीं, असे लोक जाण्यास मार्ग जाहल्यामुळें आमचें देऊळ विटाळून देशरिवाजांत व धर्मांत खटले उत्पन्न जाहले. यावरून दावा केला आहे, तरी प्रतिवादी यांणीं जी देशरिवाजाचे व धर्माचेविरुद्ध व कायद्याविरुद्ध आमच्या व आमच्या जातीच्या देवळांत नवीन वहिवाट सुरू करण्यास कारणीभूत जाहलेला, असा जो हुकूम केला आहे, तो रद्द करून पुन्हा असें न करणेंविषयींची निरन्तर ताकीद देऊन, केलेली नोटीस रद्द करणार कोर्ट मुखत्यार आहे. फिर्यादीचें कारण नोटिसीचे तारखेस जाहलें. ह्या मुकदम्यासम्बन्धीं खर्च प्रतिवादीकडून देववावा. तारीख ७ नव्हेम्बर सन १८७१ इ. अस्सल नोटीस व फिर्याद अर्जीबरोबर दिल्ही आहे. तारीख मजकूर.

सही, आनन्दराव भिकाजी फडके, दस्तुर खुद्द.

मीं आन्दराव भिकाजी फडके राहणार आगाशी सदरील वादी आपले पुरेसमजुतीप्रमाणें अशी प्रतिज्ञा करितों कीं, वर अर्जींत लिहिलेला मजकूर खरा आहे. तारीख मजकूर.

आनन्दराव भिकाजी फडके, दस्तुर खुद्द.

दाखल ता. १८ नव्हेम्बर सन १८७१. हस्तें परशुराम विष्णु वकील.

अस्सल नम्बर ३८ सन १८७१.

अर्ज वादीकडोन प्रतिवादीस ताकीद देणेंविषयीं दिल्हा, तो नाकबूल केला आहे.

फी ८१८२. नकल करणार गोपाळ त्र्यम्बक फीकारकून.

रुजू— भगवन्त आत्माराम कारकून.

नकलेस कागद दिल्हा ता. १२ जुलै सन १८७७. नकल तयार ता. १३ मिनहू. अर्जदार पाण्डुरङ्ग हरी जोशी यांणीं ही नकल मिळणेंविषयीं अर्ज केला, तो मञ्जूर जाहल्यावरून, या नकलेची फी ८२८१० उमेदवार यास देऊन ही नकल अर्जदार यास दिल्ही ता. १३ माहे जुलै सन १८७७.

**भगवन्त आत्माराम** कारकून. (सही) इंग्रेजींत, जज्ज साहेबांची.

रिगलर (रेग्यूलर) अपील नम्बर २३ सन १८७३. कैफियत आनन्दराव भिकाजी याची. निा ५ जबानी जाहली आहे, तिच्या नकलेस पाण्डुरङ्ग हरजोशी यांणीं (अर्ज?) दिला.

अस्सल कज्या नम्बर ३८ सन १८७१.

निा ५.

मीं परमेश्वरस्मरणपूर्वकप्रतिज्ञा करून लिहून देतों कीं, माझें नांव आनन्दराव, बापाचें नांव भिकाजी, आडनांव फडके. माझी उमर वर्षें सुमारें ४८, माझा धर्म हिन्दु, माझी जात ब्राह्मण, माझा धन्दा सावकारीचा, माझें राहण्याचें ठिकाण आगाशी, तालुके वसई, जिल्हा ठाणें.

वादीचे वकिलाचे प्रश्नांचें उत्तर. मेहेरबान म्युलक साहेब फुलपावर माजिस्त्रेट जिल्हा ठाणें यांजवर—त्यांणीं हुकूम दिलेला-नोटीस दिल्ही ती रद्दकरण्याविषयीं मीं फिर्याद केली आहे. त्यांणीं ता. १९ आगष्ट रोजीं नोटीस दिल्ही. आह्मीं देवळाचे आंतील गाभाऱ्यास कुलूप घातलें, तें कुलूप घालूंनये ह्मणोन नोटीस दिल्ही होती. ती नोटीस माझे हातांत निा १ ची आहे. देऊळ माझे मालकीचें आहे. तें सदर्हूदेऊळ आगाशीगांवीं आहे,

नोटीस मजला मिळाल्यावर, मीं देवळाचे दरवाज्याचें कुलूप काढिलें. कुलूप काढिल्यामुळें शिंम्पी व पळशेजातीचे लोक देवळाचे गाभाऱ्यांत जाऊं लागले. याजमुळें देव विटाळला. त्या लोकांनीं देवाची पूजा केली. देवळांत साम्बाची मूर्ति आहे. देवळांत चित्पावनब्राह्मण व लिङ्गाईतगुरव यांची जाण्याची वहिवाट आहे. मीं चित्पावनब्राह्मण आहें. कुलुपावांचून देवळाचा गाभारा जितके दिवस राहील, तितके दिवस शिम्पी व पळशे-लोक तेथें गाभाऱ्यांत येतील जातील.

कोर्टाचे प्रश्नांचें उत्तर—देऊळ माझे वडिलांनीं बान्धिलें आहे. व देव हा सर्व लोकांचा आहे. देवाचा पुजारी तेथें एक आहे, त्या पुजाऱ्याचा खर्च सरकारांतून नेमणुकी आहे. नोटीस मजला लागण्याचे पूर्वीं दोन-तीन दिवस मीं देवळाचे गाभाऱ्यास कुलूप लावलें होतें. मीं कुलूप लावण्यापूर्वीं दहा-पांच वर्षांपूर्वीं मीं असें कुलूप एक-दोन दिवस देवळास लावलें होतें. त्यापुढें देऊळ खुलें होतें. दहा-बारा वर्षांपासून[†] चित्पावनब्राह्मण व लिङ्गाईत-गुरव या लोकांशिवाय दुसरे जातीचे लोक देवळाचे गाभाऱ्याचे आंत गेले नाहींत. पळशे, दहा-पांच लोक देवळाचे गाभाऱ्यांत जाऊं लागले, ह्मणून मीं कुलूप लावलें. ते लोक देवळाचे आंत जाऊन देवाची पूजा करीत होते, ह्मणून मीं कुलूप लावलें होतें. ता। १८ नवम्बर सन १८७१ इ.

समक्ष प्रतिज्ञेवर जबानी आज तारखेस झाली, ता। मजकूर.

इंग्रेजी सही जज्ज यांची.

अर्जदार पाण्डुरङ्ग हरी जोशी याणें ही नक्कल मिळणेंविषयीं अर्ज केलेला मञ्जूर जाहल्यावरून या नकलेची फी ८२ आणे उमेदवार यास

---

* शिम्पीलोक त्या देवळांत जात होते असें स्वतः मालक ह्मणतो, तर त्यांजवर कां फिर्याद केली नाहीं? अतएव हद्दवाद कायतो पळशीकर ब्राह्मणांबरोबर!!

† एकूण दहा-बारा वर्षांपूर्वीं त्या देवळांत प्रतिवादींचे जातीचे ब्राह्मण जात होते, असें खुद्द वादी (देवालयाचा मालक) ह्याच्याच तोण्डीं सिद्ध झालें.

देऊन ही नकल अर्जदार यास दिल्ही. असे ता. १३ माहे जुलै सन १८७७ इ.

भगवन्त आत्माराम कारकून. सही इंग्रेजींत जज्जाची.

मुकदमा नम्बर ३८६ सन १८७६. निा १.

ठाणे डिस्ट्रिक्ट जज्य कोर्टांत.

आनन्दराव भिकाजी फडके, राहणार आगाशी, तो वसई. वादी.

मिस्तर म्युलकसाहिब, फुलपावर माजिस्त्रेट प्रान्त वसई जिल्हा ठाणें. } प्रतिवादी.

दावा रुपये १२५.

ह्या मुकदम्यांत मीं वादी अर्ज करितों कीं प्रतिवादी यांणीं नम्बर १९० ची नोटीस केली आहे, तो हुकूम फिर्यादीचा निकाल होई-पर्यंत महकूब होणेंचा कोर्टानें हुकूम करावा. तसा हुकूम चालू-राहिल्यानें जे लोक देवळाचे गाभाऱ्यांत जाऊं नयेत, असे लोक जाऊं लागून, देऊळ अपवित्र जाहलेलें शुद्ध करून, सुमारें ५।७ दिवसांवर सदहूदेवळाचा उत्साह आला आहे; तो करण्यास अडथळा आला आहे. करितां कोर्टानें सदरील हुकूम महकूब करणें-विषयीं माझें मागणें मान्य करावें हा अर्ज. ता. १८ नव्हेम्बर सन १८७१ इसवी. (सही) परशुराम विष्णु योगी, वकील.

I refuse to grant the injunction prayed for. The deposition of the Plaintiff shows that the temple only is his property, the idol being public property; and that the idol is served by a priest paid by Government, and that the doors of the sanctuary have been open hitherto, with the exception of a period of a few days ten years ago. It is clear that the closing the doors of the sanctuary is a novelty, contrary to custom. I see, therefore, no good cause to issue an injunction, as asked, to the Magistrate directing his orders as to the opening of the doors to be suspended.

18*th November* 1871. (Signed) W. M. COGHLAN, Judge.

(True Copy.)

(Seal of the High Court, Bombay.) K. C. BEDARKAR, Deputy Registrar. Sealer.

(True Copy). No. 95.

The Stamp Fee for the translation of the Minute in the Regular Appeal No. 23 of 1873.

ORIGNAL SUIT.

No. 38 of 1871.

IN THE COURT OF ACTING JOINT JUDGE.

ANANDRAO BHIKAJEE, residing at Agasi ... } Plaintiff,

*versus*

W. B. MULOCK, Esq., Full Power Magistrate of Prant Bassein, Zilla Thana ... ... ... } Defendant.

Claim Rs. 125.

Mr. Parashuram Vishnu, Vakil for the Plaintiff.

Mr. Ramchandra Trimbak, Vakil for the Defendant.

The Plaintiff's suit is for a temple of Bhawani-Shankar, situate at Kusba Agasi. It was built by a member of his family, and he has the hereditary management of superintending over it as owner. The Defendant, on the 19th of August 1871, under Sec. 12 of the Criminal Procedure Code, served a notice on us, that it was an order to remove immediately the padlock which we had put to the doors of sanctuary of the temple and to leave the doors of the sanctuary open and to restrict none from entering into it, as this act puts the Palshi-Brahmans in trouble of worshipping the idol, and thereby the fear of quarrel and disturbance is apprehended. This notice brings the obstacle to our exclusive hereditary caste-right of use and gives access to those people who have no practice to enter the sanctuary. In consequence of this, our temple is polluted and it gives rise to dissensions and quarrels against the practice of the country and religion. Our prayer, therefore, is to cancel the order which the Defendant has passed to introduce the new practice against the practices of our country, against our religion and against the law and further to warn hin never to do such thing again.

The Defendant contends that he has ground to do so under Sec. 18 of 1850, if there be no such ground, the order which was passed was proper and fit according to the circumstances

of the time. The present suit cannot be maintained as the Plaintiff has no exclusive right over the temple mentioned in the plaint.

ISSUES FOR DISPOSAL.

1. Had the Defendant lawful right to pass that order for which the suit is filed and may it be proper for him to do so?

2. Had the Defendant protection under the Sec. 18 of 1850?

The Defendant's Vakil asks a third issue, which is whether the Plaintiff has proved his exclusive right over the temple, but we do not allow this issue to be raised, because it seems to us as the Plaintiff endeavours to cancel the order of the Magistrate as illegal. The right over the temple of the Plaintiffs and a third man cannot arise in a proper way. The Plaintiff can only get this right decided in a suit at the instance of a third party. The suit filed is for the legality of the order and not for deciding the right referred to.

(Signed) SATIANDRANATH TAGORE,
Acting Joint Judge.

1*st August* 1872.

The Defendant's Vakil contends that the Court mis-understood the issue which he had asked to raise and his argument was this, that the Plaintiff could not proceed with this suit unless he could establish his exclusive right over the temple, and we find no reason to raise issue in respect of this point.

(Signed) SATIANDRANATH TAGORE,
Acting Joint Judge.

31*st August* 1872.

Whether the Plaintiff has right to the original suit to obtain an order for cancelling the order passed by the Magistrate. As regards this point the Defendant's Vakil, Mr. Shantaram, seeks to frame out the original issue and thus argues that the parties took always forth whether any order passed under this section is legal or not, is to dis-obey that order, and under Section 188 of Penal Code to get the suit filed, but the suit to cancel such order cannot lie. And we

think that the party whom Mr. Shantaram represents what he says is right, and what the opposite party says is not right. If any party seeks to file a suit in a Civil Court for cancelling that order, rather than to choose to risk himself to be sent in a jail by disobeying such order passed by the Magistrate. It appears to us there is no any sort of restriction to do so. We perceive clearly that although no appeal can be preferred against the order passed by the Magistrate under Section 62, yet as it is liable to be reversed by a suit in a Civil Court, we refuse to raise on such a plain and clear point.

Again a question is raised in this suit whether upon the Plaintiff or the Defendant the burden of proof is. We find that the burden of proofs is on the Defendant, for (1) It is admitted that the order which is passed is *ex parte* and it is passed without making inquiry, into it, and hence it affects the personal right of the party. Hence it is necessary for the Magistrate to show plainly on what grounds he acted thus; (2) under Section 106, Indian Evidence Act, when any person purposely knows anything, the burden to prove that thing, is upon him. Now in this suit, the Magistrate purposely knows on what grounds he acted himself. Rather than to compel the Plaintiff to show that the Defendant's act was illegal and improper; we think it will be more proper to put the burden of proofs upon the Magistrate for the circumstances on which he acted and on which he put his faith as to the legality of his order. We think, if the burden of proofs is thrown upon the Plaintiff, he shall be required to bring proofs which will be difficult for him to do so and is not expected from him to show that the order passed was not according to the section on which the faith is placed (that is to deny all facts mentioned in the section which compel Magistrate to interfere with). Hence we find that the burden of proofs to show that the order passed was proper is upon the Defendant. We think " the Defendant has fully cleared himself from the burden of proofs which was thrown upon him. *We found from the given proofs that the Palshi-Brahmans had lawful right to go to the temple for worship, that the Plaintiff prevented them to enter into it. This act* of the Plaintiff was likely to cause troubles. This was

likely to produce disturbance to the legally appointed person. Hence we think the order given was constituent with the Sec. 62 of the Criminal Procedure Code. The Plaintiff's Vakil argues that although the full weight is given to the proofs adduced, and witnesses considered to be such as to place confidence in the order passed by the (Magistrate) Defendant, seems to be not proper because the Defendant had not before him such lawful proofs as satisfied him, that they would cause break of peace and disturbance so as to compel him to interfere with. The Magistrate had all that is before him, was only the application of Sadashio Mahadeo who was not taken on solemn affirmation nor had the least ground of proofs and the report of Constable which is signed by some people. But the Defendant had no information nor the Magistrate had made inquiry therein upon such application, the order passed by the Magistrate under Sec. 62, Criminal Procedure Code, was illegal. As regards this, he cites several cases which are as follows:—Queen *vs.* Bhuhiru Dayal Sing, Weekly Report, Vol XI., page 46, Criminal Decrees; Queen *vs.* Rai Lachmidat Sing, Weekly Report, Vol XIV., Criminal Decree, page 17, Madras High Court Decrees, Vol IV., Appendix, page 67. In the first case it is decided that it is not proper for the Magistrate to pass an independent order on the report of the Constable to issue notice or on the supposition which have ground without proofs or on groundless admission; and in the second case, it is decided that the Magistrate cannot issue order of obstruction under Sec. 62, Criminal Procedure Code, unless he gives notice to show cause why such order should not be passed.

Now we begin to inquire into the authorities which Mr. Shantaram has shown. We find that the import of the case of Queen *vs.* Jaicrishna Murarjee, Bengal Report, Vol. I., Criminal Decrees, page 20, is inconsistent with the meaning shown in the case Queen *vs.* Rai Luchmidat Sing referred to. Justice Frere observes between Sec. 62 and 308 the principal difference is such that the matter to which the section applies, the Magistrate's warning order should be conditional, that is the order should not be disobeyed and within the time mentioned therein if the party will show cause, it cannot be

brought into force. The Section 62 states as to the issuing of the independent order rather than to give opportunity to the party to show cause against the order otherwise and the order which has the conditional nature under Sec. 62, Criminal Procedure Code. The Magistrate's order is not a fair one in the case of two rival owners of the Buzars, that one of them is prevented to hold his Buzar for certain days in a week, in order to check hindrance, trouble and injury under Sec. 404, Criminal Procedure Code. In order to subject it to the investigation of the High Court, Mr. Shantaram shows the full Bench decision in the case of the Queen *vs.* Abhas Ali Choudri, Vol. 6, Bengal Report, page 74. In this case the Justice Johnson observes, that when it seemed that in the circumstances that are apt to go under Sec. 62 the special practice for a Magistrate is mentioned in the Law. We know several Sections of Criminal Procedure Code to that effect. We think the Magistrate shall be required to act according to that practice in the matter, which are apt to go under the meaning of that Section, where the arguments of the parties must be heard and presumption must be formed on the proofs. In such case undoubtedly the investigation is fair and order becomes legal, but Magistrate shall have to give decision as to several orders which are not passed under Section 62. And we think such decision is not given with the intention that another person shall be affected by any person, who receives or who does not receive such order in respect of the property or by any act or by conducting himself according to the performance of any act, but he is required to keep proper management for the happiness or protection of those men, who have no knowledge at the time when the inquiry as to their protection is on foot or the fear of trouble or hindrance is caused. The Section 62 gives power to pass order without any inquiry. It appears to us from the nature of the case, that the Magistrate shall have power to pass often such order whenever it shall be necessary for time. Hence the Bombay High Court finds that the orders passed under Sec. 62 are not intended to be used in justice like enunciation of the Section 404. They are final and not subject to the investigation—*vide* Bapujee

Jugjiwan *vs* A. S. C. Trevor, 4 Bombay Report Civil Decrees, page 143. It is found that it is not the intention of the legislators that the Magistrates should act at the time of conducting his duty in a legal way under Section 62. It appears to us that upon making strict inquiry into all the grounds and upon giving due regard to the words in Sec. 62 there is strong ground for him to interfere with. The application No. 12 produced and the report of the Chief Constable, and the replies of the people to that report, fully satisfied the Magistrate then, we perceive that it is not necessary for the Magistrate to make legal inquiry into it.

From the abovementioned grounds, we give decree on the first issue for the Defendant and we need not decide the other issue.

We reject the claim of the Plaintiff with cost, dated the 30th November 1872.

*Copy of the High Court Order passed under date the* 23*rd of June* 1873 *in Regular Appeal No.* 23 *of* 1873.

ANANDRAO BHICKAJEE PHADKE, of the Thana District (Original Plaintiff) ............Appellant.

*vs.*

W. B. MULOCK, ESQ., F. P. in the Thana District (Original Defendant) .........Respondent.

Value of claim—Rs. 125-0-0

Quorum.—The Hon'ble Chief Justice and Nanabhoy.

The Court confirm the Decree of the Joint Judge. Each party pays his own costs in appeal.

(True Copy.)

(Signed) G.

(Signed) M. C.

Assistant Registrar.

## वरील ठरावाचें भाषान्तर.

रेग्युलर अपील नम्बर २३ सन १८७३. यांतील अस्सल मिनिटेचे तरजुम्यास स्टाम्प. अस्सल कज्या नम्बर ३८ सन १८७१. नि. ९९.

अक्टिङ्ग जॉइन्ट जज्ज कोर्टांत.

आनन्दराव भिकाजी फडके राहणार आगाशी......वादी.
वी. म्युलक साहेब, फुलपावर माजिस्त्रेट प्रां वसई...प्रतिवादी.

**दावा रुपये १२५.**

वादीतर्फे वकील परशुराम विष्णु.
प्रतिवादीतर्फे वकील रामचन्द्र त्रिम्बक.

वादीची फिर्याद कसबे आगाशी येथील भवानीशङ्कराचें देऊळ आमचे घराण्यांतील एका पुरुषानें बान्धलेल्या मालकीच्या व वंशपरम्परा आमचे देखरेखवहिवाटीखालीं असलेल्या देवळा-बद्दल प्रतिवादी यांणीं क्रिमिनल प्रोसिजर कोडाचें कलम ६२ प्रमाणें ता. १९ आगष्ट १८७१ ची आह्मांस नोटीस दिली कीं:— त्या देवळांतील गाभाऱ्यास कुलूप आह्मीं लाविलें आणि त्या कृत्यानें पळशेब्राह्मणलोकांस देवाची पूजा करण्यास पीडा जाहली व त्यापासून तण्टा व मारामारी होण्याचें भय आहे; तें कुलूप देखत हुकूम काढून दरवाजा खुला ठेवावा आणि कोणास हरकत करूं नये, ह्मणोन दिली; त्या नोटिशीमुळें आमच्या वंशपरम्परेच्या व जातीच्या अनन्यवहिवाटीच्या हक्कास अडथळा आणिला आणि जे लोक देवळाचे गाभाऱ्यांत जाण्याची वहिवाट नाहीं असे लोक जाण्यास मार्ग जाहल्यामुळें आमचें देऊळ विटाळून देशरिवाजांत व धर्मांत तण्टे उत्पन्न जाहले: त्यास प्रतिवादी यांणीं देशरिवा-जाचे व धर्माचे व कायद्याविरुद्ध आमच्या व आमच्या जातीच्या देवळांत नवीन वहिवाट सुरू करण्यास हुकूम केला आहे, तो रद्द करावा आणि पुन्हा असें न करण्याची निरन्तर त्याजला ताकीद मिळावी ह्मणोन.

प्रतिवादीची तक्रार कीं:—मला सन १८५० चा आक्ट १० याचा आधार आहे व जरी तसा आधार नसेल तरी, या प्रसङ्गा-प्रमाणें जो हुकूम केला तो योग्य व वाजवी होता. हल्लींचा दावा चालूं शकत नाहीं, कारण फिर्यादअर्जींत लिहिलेले देवळावर वादीचा अनन्यग्राह्य अधिकार नाहीं.

## ठरावाचे मुद्दे.

१ ज्या हुकुमाबद्दल फिर्याद जाहली आहे तो हुकूम करण्यास प्रतिवादीस कायदेशीर अधिकार होता कीं काय? व तो करणें वाजवी होता कीं काय?

२ प्रतिवादीचा सन १८५० चा आक्ट १८ वरून बचाव होतो कीं काय?

प्रतिवादीचा वकील तिसरा मुद्दा मागतो तो असा कीं, वादीनें आपला देवळावरील अनन्यग्राह्य अधिकार शाबीद केला आहे कीं काय? परन्तु हा मुद्दा काढण्याचें आह्मीं नाकबूल करितों, कारण ज्याअर्थी वादी हा माजिस्त्रेटाचा हुकूम बेकायदेशीर रद्द करूं-पाहतो असें आह्मांस दिसतें, त्याअर्थी वादी व तिसरे मनुष्यांचा देवळावरील हक्क या कज्यांत बरोबर रीतीनें निष्पन्न होऊं शकत नाहीं. त्या हक्काचा निर्णय वादी व तिसरे मनुष्य यांचे दरम्यानचे दाव्यांत मात्र करितां येईल. आणि ज्या हुकुमाबद्दल फिर्याद जाहली आहे, त्या हुकुमाचा कायदेशीरपणा वरलिहिलेले हक्काचे निर्णयावर नाहीं, असें आह्मांस दिसतें. तारीख १ आगष्ट सन १८७२.

(सही) सत्येन्द्रनाथ टागोर. अक्टिंग जाइण्ट जज्य.

प्रतिवादीचा वकील अशी तक्रार करितो कीं, जो मुद्दा काढावयास मीं सांगितला त्या मुद्याविषयीं कोर्टाची गैरसमज जाहली आहे व माझी तक्रार अशी होती:— वादीनें देवळावर आपला अनन्यग्राह्य अधिकार स्थापित केल्याशिवाय त्यास हल्लींचा दावा चालवितां येत नाहीं; परन्तु, त्या गोष्टीबद्दल मुद्दा काढण्याचें कारण आमचे नजरेस येत नाहीं. तारीख ३ आगष्ट सन १८७२. (सही) सत्येन्द्रनाथ टागोर अक्टिङ्ग जाइण्ट जज्ज.

माजिस्त्रेटानें जो हुकूम केला तो रद्द करण्याविषयीं हुकूम मिळण्यास वादीस मूळदाव्याचा अधिकार होता किंवा नाहीं; याबद्दल प्रतिवादीचे वकील मिस्तर शान्ताराम हे प्रथम आरम्भींचा

मुद्दा काढूंपाहतात. ते अशी तक्रार करितात कीं, या कलमा-अन्वयें केलेला एखादा हुकूम कायदेशीर आहे किंवा नाहीं, ह्याची परीक्षा तो हुकूम अमान्य करून व पिनलकोडाचें कलम १८८ प्रमाणें फिर्याद करून घेऊन पक्षकारांस नेहमीं पाहतां येतें; परन्तु, तो हुकूम रद्दकरण्याविषयीं दावा चालत नाहीं. आह्मांस असें वाटतें कीं, शान्ताराम याचें आस्ती पक्षाचें बोलणें आहे, तें बरोबर आहे व जें नास्ती पक्षाचें बोलणें आहे, तें बरोबर नाहीं; जर एखादा पक्षकार, माजिस्त्रेटानें केलेला हुकूम अमान्य करून तुरुङ्गांत पाठविण्याचे धोक्यांत पडण्याचें पसन्त न करितां दिवाणींत दावा करून तो हुकूम रद्द करूं पाहतो, तर असें करण्यास कोणती मनाई आहे, हें आमचे नजरेस येत नाहीं. हें आह्मांस अगदीं उघड दिसतें कीं, माजिस्त्रेटानें ६२ कलमा अन्वयें हुकूम केला असेल, त्या हुकुमावर जरी अपील नाहीं, तरी तो दिवाणी दाव्यांत रद्द होण्यास पात्र आहे, इतके स्पष्ट व उघड गोष्टी बद्दल मुद्दा काढण्यास आह्मीं नाकबूल करितों.

दुसरून असा प्रश्न काढला कीं, या कज्यांत पुराव्याचा बोजा वादीवर आहे किंवा प्रतिवादीवर आहे? आह्मीं असें ठरवितों कीं, पुराव्याचा बोजा प्रतिवादीवर आहे; कारण, (१) जो हुकूम केला तो एकतर्फी व न्यायाची चौकशी केल्यावांचून केला, असें कबूल करण्यांत आलें आहे व त्यावरून प्रथमदर्शनीं पक्षकारांचे खासगी हक्कास बाध येतो; याजवरून आपण कोणते आधारावरून वर्तन केलें हें दाखविणें माजिस्त्रेटास उघड जरूर आहे; (२) हिन्दुस्थानचे पुराव्याचे कायद्याचे १०६वें कलमा अन्वयें जेव्हां एखादी गोष्ट एखादे मनुष्यास मुद्दाम माहीत असेल तेव्हां, ती गोष्ट शाबीद करण्याचा बोजा त्याजवर आहे. आतां ह्या कज्यांत आपण कोणत्या आधारावरून वर्तन केलें, हें माजिस्त्रेटास खरोखर मुद्दाम माहीत आहे; याजवरून प्रतिवादीचें कृत्य बेकायदेशीर अयोग्य होतें, असें दाखविण्यास वादीस जरूर पडण्यापेक्षां

आपण ज्या गोष्टीवरून वर्तन केलें व आपले हुकुमाचे वाजवीपणाविषयीं ज्या गोष्टींवर भरवसा ठेवितों, त्या गोष्टी शाबीद करण्याचा बोजा माजिस्त्रेटावर घालणें अधिक वाजवी होईल, असें आह्मांस वाटतें. जर पुराव्याचा बोजा वादीवर घातला तर, ज्या कलमावर भरवसा ठेविला आहे, त्या कलमाचे अर्थाचेखालीं सदर्हू हुकूम आला नाहीं (ह्मणजे ज्यावरून माजिस्त्रेटास हात घालणें वाजवी होईल, त्या कलमांत सांगितलेल्या सर्व गोष्टींचा निषेध करणें) हें दाखविण्यास त्यास पुरावा आणावा लागेल. हें करणें फारच अवघड आहे; किंबहुना, तें करण्याची आशा करावयास नको. यावरून आह्मीं असा ठराव करितों कीं, जो हुकूम केला तो वाजवी होता, हें दाखविण्याचा बोजा प्रतिवादीवर आहे.

प्रतिवादीवर जो बोजा घातला होता, त्यापासून त्यानें आपल्यास पूर्ण रीतीनें मोकळें करून घेतलें आहे, असें आह्मीं समजतों. दिलेले पुराव्यावरून आह्मांस असें आढळतें कीं, पूजेकरितां देवळांत जाण्याचा पळशेब्राह्मणांस कायदेशीर हक्क होता व वादीनें त्यांस आंत जाण्याची मनाई केली, या त्यांचें कृत्यावरून कायदेशीर नेमलेले मनुष्यास हरकत अगर त्रास होण्याजोगा होता व त्यापासून बहुतकरून दंगा होण्याजोगा होता व यावरून या कज्यांत जो हुकूम केला होता, तो फौजदारी काम चालविण्याचे कायद्याचे रीतीविषयींचे ६२ वे कलमाचे ठरावा अन्वये होता, असें आह्मांस वाटतें. वादीचे वकील अशी तक्रार करितात कीं, जो पुरावा दिला आहे, त्यास जरी भरपूर वजन दिल्हें व साक्षीदार खरे व भरवसा ठेवण्याजोगे आहेत, असें जरी समजलें तरी, प्रतिवादीनें जो हुकूम केला तो त्यास करणें वाजवी होता असें दिसत नाहीं; कारण, ज्यावरून प्रतिवादीनें हात घालावा असें जरूर होतें, असा स्वस्थपणा मोडणें अगर दङ्गा अगर मारामारी होण्याजोगी होती, अशी त्याची खात्री होण्यास त्याचे समोर त्यावेळेस कायदेशीर पुरावा नव्हता, असें कबूल

करण्यांत आलें आहे. माजिस्त्रेटासमोर जें काय सर्व होतें तें प्रतिज्ञालेखानें खरें केलेलें नाहीं व ज्यास पुराव्याचा आधार नाहीं, असा सदाशिव महादेव याचा अर्ज व चीफकान्स्टेबल याचा रिपोर्ट कांहीं लोकांनीं सह्या केल्या आहेत, परन्तु ज्याची प्रतिवादीस कांहीं खबर नाहीं. अगर माजिस्त्रेटानें कांहीं चौकशी केली नाहीं, अशा अर्जावरून फौजदारीचें काम चालविण्याचे रीतीविषयींचे कायद्याचे ६२ वे कलमाअन्वयें माजिस्त्रेटानें केलेले हुकूम बेकायदेशीर आहेत, अशाबद्दल तो पुढें लिहिलेले कज्ये दाखवितो. ते येणेंप्रमाणें:—

( राणीसरकार विरुद्ध बहिरू दयाळसिङ्ग उईलिरिफ व्हाल्युम ११ फौजदारी ठरावाचें पान ४६. राणीसरकार विरुद्ध राइ लछमिपतसिङ्ग उईक्ली रिपोर्ट व्हॉल्युम १४ फौजदारी ठरावाचें पान १७ व मद्रास हायकोर्टाचा ठराव व्हॉल्युम ४ आदिडिक्सन पान ६७ ) पहिले कज्यांत असें ठरविलें आहे कीं, लोबीफोरस कान्स्टेबलचे रिपोर्टावरून, अगर ज्यास जो पुरावा नाहीं त्याचा आधार आहे, अशा कल्पनेबद्दल व बिनआधार म्हणावरून माजिस्त्रेटास स्वतन्त्र हुकूम करणें वाजवी नाहीं. दुसरे कज्यांत असें ठरविलें आहे कीं, तो हुकूम कां करूं नये? अशाबद्दल कारण दाखविण्यास पूर्वीं नोटीस केल्याशिवाय फौजदारी रीतीविषयींचे कायद्याचे ६२ वे कलमाअन्वयें माजिस्त्रेटास प्रतिबन्धाचा हुकूम करितां येत नाहीं.

आतां मिस्तर शान्ताराम याणें जे आधार दाखविले आहेत, त्यांचा तपास आह्मीं करावयास लागतों. वर लिहिलेला राणीसरकार विरुद्ध राई लछमिपतसिङ्ग या कज्यांत जो अभिप्राय दर्शविला आहे, त्याचेच विरुद्ध राणीसरकार विरुद्ध ज्या कृष्ण मुरारजी बेङ्गाल रिपोर्ट व्हॉल्युम १ फौजदारी ठरावाचें पान २० ह्यांत अभिप्राय आहे असें आह्मांस आढळतें. न्यायाधीश फियर असें ह्मणतात कीं, त्यांत (ह्मणजे कलम ६२ व कलम

३०८ यांत) मुख्य भेद असा आहे कीं, ज्या गोष्टीस तें कलम लागू आहे, त्या गोष्टींत माजिस्त्रेट साहेबांचा ताकिदीचा हुकूम शर्तीचा असावा, ह्मणजे तो हुकूम मान्य करूं नये, अशाबद्दल त्यांत लिहिलेल्या मुदतींत पक्षकार जर कारण दाखवील, तर तो अमलांत यावयाचा नाहीं, अशी शर्त ज्याबरोबर आहे तो व दुसरेपक्षीं हुकुमाविरुद्ध कारण दाखविण्यास पक्षकारास सवड द्यावयाची आहे, असें न सांगतां कलम ६२ यांत स्वतन्त्र हुकुमाबा सांगितलें आहे. हरकत, त्रास व इजा होऊं नये ह्मणोन दोन निरनिराळे हाट (बाजार) प्रतिस्पर्धी मालकांपैकीं एका मालकावर आठवड्यांतून अमुकवारीं याणें आपला हाट ह्मणजे बाजार भरूंनये अशा बद्दल फौजदारी काम चालविण्याचे रीतीविषयींचे कायद्याचे ४०४ कलमाअन्वयें हायकोर्टाचे तपासणीस पात्र नाहीं, अशा बद्दल राणीसरकार विरुद्ध आह्मांस, आलीचौद्री ( व्हॉल्युम ६ बंगाल रिपोर्ट पान ७४ ) या कज्यांतील फुलबेंचा ठराव मिस्तर शान्ताराम दाखवितात. या कज्यांत न्यायाधीश जाक्सन असें ह्मणतात कीं, ज्या गोष्टी ६२ कलमाखालीं येण्याजोग्या आहेत असें दिसेल, त्या गोष्टींत ज्यांत माजिस्त्रेटाकरितां विशेष वहिवाट सांगितली आहे, असें फौजदारी काम चालविण्याचे रीतीविषयींचे कायद्याच्या कांहीं बाबी व कलमें आहेत व ज्या कलमांत विशेष वहिवाट सांगितली आहे, त्या कलमाचे अभिप्रायाखालीं ज्या गोष्टी बरोबर रीतीनें आल्या, त्या गोष्टींत त्या वहिवाटीप्रमाणें माजिस्त्रेटास वर्तणें अवश्य होईल, असें आह्मांस वाटतें व जेथें त्या वहिवाटीवरून पक्षकारांची तक्रार ऐकिली पाहिजे व पुराव्यावरून अनुमान केलें पाहिजे, तेथें ती चौकशी निःसंशय न्यायाची होते व हुकूम न्यायाचा असतो; परन्तु जे हुकूम ६२ कलमाअन्वयें करण्यांत आले नाहींत, अशा पुष्कळ हुकुमांविषयीं माजिस्त्रेटास जो निर्णय करावयाचा असतो, तो जो मनुष्य आपले मिळकतीबरोबर कांहीं हुकूम घेतो, अगर आपले मिळकतीबरोबर कांहीं हुकूम घेत नाहीं, अशा मनुष्याचें

व अशा कृत्यांनीं अगर तसें कृत्य करण्याचे वर्तण्यानें ज्या दुसरे मनुष्यास बाध येणार आहे, त्या दुसरे मनुष्याचे दरम्यान नाहीं असें आह्मांस दिसतें; परन्तु, आपले सुरक्षितपणाची चौकशी चालली आहे, अगर त्रास, अगर हरकत होण्याची दहशत घातली आहे, असें त्या मनुष्यास त्या वेळेस माहीत नाहीं, असे पुष्कळ मनुष्यांचे सुरक्षितपणाविषयीं अगर सुखाविषयीं त्यांस वास्तविक बन्दोबस्त केला पाहिजे. रीतीप्रमाणें कांहीं चौकशी केल्याशिवाय जो हुकूम करण्याचा ६२ कलमांत अधिकार आहे, तसा हुकूम करण्याची माजिस्त्रेटास वारंवार जरूर पडेल, असें कज्याचे प्रकारांवरून आह्मांस दिसतें. यावरून मुम्बई हायकोर्टानें असें ठरविलें आहे कीं, ६२ कलमाअन्वयें जे हुकूम करण्यांत येतात ते ४०४ कलमांतील व्याख्येप्रमाणें न्यायाचे कामीं नाहींत. शेवटले हुकूम असोन तपासणीस पात्र नाहींत. (पहा बापूजी जगजीवन विरुद्ध ये. समरी ट्रेव्हर ४ मुम्बई रिपोर्ट दिवाणी ठरावाचें पान १४३.)

कलम ६२ अन्वयें वहिवाट करतेवेळीं माजिस्त्रेटानें न्यायरीतीनें वर्तावें, असा कायदे करणाराचा हेतु नव्हता, असें ठरविलेले सर्व आधारांची खबरदारीनें तपासणी केल्यावरून व कलम ६२ यांतील शब्दांकडे लक्ष दिल्यावरून आमचे नजरेस येतें. आपण हात घालणें वाजवी होण्यास सबळ कारणें आहेत अशाबद्दल नि. १२ यास दाखल केलेले अर्जावरून, चीफकान्स्टेबलचे रिपोर्टावरून व त्या रिपोर्टास ज्या लोकांचे जबाबांचा आधार आहे, अशा लोकांच्या जबाबांवरून जेव्हां माजिस्त्रेटाची खात्री झाली होती, तेव्हां या कज्यांत न्यायाचें काम करण्याचें व रीतीप्रमाणें चौकशी करण्याचें त्यास जरूर नव्हतें असें आह्मीं समजतों.

सदरीं लिहिले कारणांवरून पहिले मुद्याबद्दल आह्मीं प्रतिवादीतर्फे ठराव करितों. दुसरे मुद्याबद्दल ठरावाची जरूर नाहीं.

आम्हीं वादीचा दावा खर्चेसुद्धां रद्द करितों. ता. ३० नव्हेम्बर सन १८७२.

(सही) सत्येन्द्रनाथ टागोर, अक्टिङ्ग जाइण्ट जज्ज.

---

दहा रुपयांचा स्टाम्प.

**वसईचे सबार्डिनेट सेकण्डक्लास जज्य कोर्टांत.**

| | | |
|---|---|---|
| १ | आनन्दराव भिकाजी फडके उमर ५० | वादी. |
| २ | विष्णु वासुदेव लोण्ढे उमर ....३० | |
| ३ | दिनकर बल्लाळ राजवाडे उमर..३५ | |
| ४ | हरि नारायण ओक उमर......२५ | |

४

आसामी चार राहणार कसबे आगाशी, तो वसई, जिल्हा ठाणें.

| | | |
|---|---|---|
| १ | शङ्कर दाजी आचार्य उमर ....३५ | प्रतिवादी. |
| २ | चिन्तु शिवराम आचार्य उमर..३५ | |
| ३ | बाळकृष्ण काशीनाथ आचार्य उमर ४५ | |
| ४ | पाण्डुरङ्ग हरी जोशी उमर वर्षे ..६५ | |
| ५ | लक्ष्मण गोविन्द जोशी उमर....६० | |
| ६ | जगन्नाथ मुकुन्द जोशी उमर....४० | |
| ७ | प्रभाकर केशव जोशी उमर....५५ | |
| ८ | वामन बापू पण्डित उमर वर्षे....६० | |
| ९ | वामन धोण्ड जोशी उमर वर्षे....३८ | |
| १० | त्र्यम्बक बाबा जोशी उमर ....३५ | |
| ११ | जनार्दन भास्कर जोशी उमर ..३५ | |
| १२ | सदाशिव महादेव पण्डित उमर..५० | |
| १३ | मोरु नाना जोशी उमर ......३० | |

येणेंप्रमाणें प्रतिवादी राहणार कसबे मजकूर, तो वसई, जिल्हा ठाणें.

**दावारुपये १००.**

**कसबे आगाशी येथें श्रीभवानिशङ्कर या देवाचें शिवालय आहे. हा देव अर्चा केलेला आहे व हें देऊळ चित्पावन जातींतील शङ्कराजी**

केशव फडके राहणार पुणें यांगीं बान्धिलें असोन, त्या देवाची उत्साहसम्बन्धीं वगैरे सर्वव्यवस्था व तसेंच अनुष्ठानें व देवळाची दुरुस्ती आमचे ब्राह्मणजातीकडूनच होत आली आहे. या देवालयांत देवाजवळ जाऊन अभिषेक, पूजा, नैवेद्य वगैरे करण्याचा अधिकार व वहिवाट आमचे जातीची व आमचे जातीशीं अन्नव्यवहार असणारे इतरब्राह्मणांची व गुर्जरब्राह्मणांची आहे. व याप्रमाणें वहिवाट देऊळ बान्धिल्यापासून आजपर्यन्त शम्भर वर्षांहून अधिक चालत आली आहे. व देऊळ बान्धणाराचा हेतूहि याप्रमाणेंच आहे.

वर लिहिलेल्या आमच्या ज्ञातीच्या लोकांखेरीज, इतर ज्ञातीचे लोकांची वहिवाट, देवदर्शन, गाभाऱ्याचे बाहेर उभें राहून घेण्याची आहे व पूजा, अभिषेकवगैरे करणें जाहल्यास, त्याकरितां मुख्य देवाचे गाभाऱ्याचेबाहेर एक शिवलिङ्गस्थापन केलें आहे, तेथें करण्याची वहिवाट आहे.

याप्रमाणें हकिगत असतां, सन १८७१ चे सुमारें आगष्ट महिन्यांत किंवा त्या सुमारास, तारखेचें स्मरण नाहीं, तेव्हां इतर ज्ञातीं-पैकीं या गांवांत एक पळशे ह्मणोन जात आहे; त्या जातीपैकीं प्रतिवादीपैकीं नम्बर १।२ यांगीं दुसरे प्रतिवादीचे अनुमत्तानें सदर्हू देवालयांतील गाभाऱ्यांत देवाजवळ जाऊन देवावर अभिषेक व पूजा करण्याचा इलाज केला व त्यां अलीकडे सर्वप्रतिवादी हे अशी अधर्माची व बिनहक्काची व देशरिवाजाविरुद्ध वहिवाट करितात. यामुळें सदर्हू देवाचे शिवलिङ्गाचे पवित्रतेस कमतरपणा प्रतिवादी यांगीं आणिला आहे, याकारणानें आह्मांस पूर्ववत् वहिवाटीप्रमाणें व हक्काप्रमाणें सदर्हू देवाची पूजा, अभिषेक वगैरे करण्यास हरकत जाहली आहे; यास्तव दाव्याचें कारण त्याचवेळेस घडलें, ह्मणोन देवाजवळ जाण्याचा हक्क असणारे ग्रामस्थांचे मान्यतेनें दावा करीत आहें; तर कसबें आगाशी येथील श्रीभवानिशङ्कराचे देवालयांत देवाजवळ जाऊन अभिषेक, पूजा, नैवेद्य व उत्साहसम्बन्धीं सर्वकामें करण्याचा हक्क आमच्या ब्राह्मणलोकांचा-ह्मणजे वर लिहिलेला ज्ञातीचा-

मात्र आहे. पळशे व आवान्तर ज्ञातीचा नाहीं, असा ठराव होऊन प्रतिवादींनीं सदर्हू देवाजवळ अभिषेक, पूजा, नैवेद्य करूं नये अशी त्यांस सक्तचीताकीद देण्याविषयीं व या कामांत कोर्टास वाटतील ते व दुसरे न्यायाचे व योग्य ठराव करून हुकूमनामाखर्चेसुद्धां आमचे तर्फेचा व्हावा. ता. माहे अक्टोबर सन १८७६.

कोडतांत दिल्ही ता. ६ दिसेम्बर सन १८७६.

वादी असामी ४ ह्यांच्या सह्या.

गङ्गाधर काशीनाथ वकील.

नम्बर ३८६ सन १८७६ फडशा ता. ७ जुलै सन १८७९. फैसलनाम्याचे नकलेस कागद प्रतिवादीकडोन दिल्हा. ता. ८ जुलै सन १८७९.

८१४ लिहिणार. १ नकलेस कागद दिल्हा. ता. ८ जुलै स. १८७९.
८६ रुजूपाहणार.१ नकल तयार केली. ता. २६ जुलै स. १८७९.
८४८६ वाचणार. १ नकल दिली. ता. २६ जुलै स. १८७९.
८८३ कागदाबद्दल.१

---

१८८८९

डिस्ट्रिक्ट ठाणें, कोर्ट वसई येथील सेकण्डक्लास सबार्डिनेट जज्य यांचे कोर्टांत.

मुा नम्बर ३८६ सन १८७६.

१ आनन्दराव भिकाजी फडके.
२ विष्णु वासुदेव लोण्ढे.
३ दिनकर बल्लाळ राजवाडे.
४ हरी नारायण ओक.
} वादी.

१ शङ्कर दाजी आचार्य. २ चिन्तु शिवराम आचार्य.
३ बाळकृष्ण काशीनाथ आचार्य. ४ पाण्डुरङ्ग हरी जोशी.
५ लक्ष्मण गोविन्द जोशी. ६ जगन्नाथ मुकुन्द जोशी.
७ प्रभाकर केशव जोशी. ८ वामन बापू पण्डित.
९ वामन धोण्ड जोशी. १० त्र्यम्बक बाबा जोशी.
११ जनार्दन भास्कर जोशी १२ सदाशिव महादेव पण्डित.
१३ मोरू नाना जोशी.
} प्रतिवादी.

दावा रुपये १००.

वादीचा दावा असा आहे कीं, कसबे आगाशी येथें श्रीभवानीशङ्कर या देवाचें शिवालय आहे. या देवाजवळ जाऊन अभिषेक, पूजा, नैवेद्य वगैरे करण्याचा अधिकार व वहिवाट आमचे जातीची व आमचे जातीशीं अन्नव्यवहार करणारे इतर ब्राह्मणांची व गुर्जरब्राह्मणांची आहे. इतर लोकांची नाहीं. असें असतां सन १८७१ चे आगष्ट महिन्याचेसुमारें प्रतिवादी, पळशेजातीचे, यांपैकीं नम्बर १।२ यांणीं दुसरे प्रतिवादीचे अनुमतानें सदर्हूदेवालयांतील गाभाऱ्यांत देवाजवळ जाऊन अभिषेक (व) पूजा करण्याचा यत्न केला व त्या अलिकडे सर्वप्रतिवादी हे अशी अधर्माची व बिनहक्काची व देशरिवाजाविरुद्ध वहिवाट करितात; यामुळें सदर्हू देवाचे शिवलिङ्गाचे पवित्रतेस कमतरपणा प्रतिवादी यांणीं आणिला आहे. या कारणानें आह्मांस पूर्ववत् वहिवाटीप्रमाणें व हक्काप्रमाणें सदर्हू देवाची पूजा, अभिषेक वगैरे करण्यास हरकत आली आहे. सबब हक्क असणारे ग्रामस्थांचे मान्यतेनें हा दावा केला आहे. तरी सदर्हूप्रमाणें आमचा हक्क आहे व प्रतिवादीचा हक्क नाहीं, असा ठराव होऊन प्रतिवादी यांणीं सदर्हू देवाजवळ जाऊन पूजा, अभिषेक, नैवेद्य करूं नये, अशी प्रतिवादीस ताकीद देण्याविषयीं या कामांत कोर्टास वाटतील ते न्यायाचे व योग्य ठराव करून हुकूमनामा आमचेतर्फे व्हावा.

मु. नम्बर ३८६ सन १८७६.

वसईचे से. स. जज्य कोर्टांत.

आनन्दराव भिकाजी वगैरे असामी ४ राहणार आगाशी...वादी.
शङ्कर दाजी आचार्य वगैरे असामी १३ राहणार आगाशी..प्रतिवादी.

दावा रुपये १००.

ह्या मुकदम्यांत आह्मीं प्रतिवादी कैफियत देतों ती येणेंप्रमाणें:—

१. तण्टयाचें देवालय वादीलोकांचे मालकीचें नाहीं. यासाठीं ताकीद मागण्याचा दावा करण्यास त्यांस अधिकार पोंहचत नाहीं,

व आह्मांविरुद्ध दावा करण्यास दाव्याचें कारणहि उत्पन्न जाहलेलें नाहीं ;

२. दाव्याचें देऊळ चित्पावन एकट्याजातीचें मालकीचें नाहीं. वादीलोकांस त्यांचे सर्व ज्ञातीबान्धवांकरितां व ज्या ज्या इतर ज्ञाती कीं, ज्यांस देवालयाच्या गाभाऱ्यांत बसोन पूजा करण्याचा अधिकार आहे, ह्मणून वादीचे फिर्यादींत मान्य केलें आहे, त्या सर्वांकरितां दावा आणितां येत नाहीं ;

३. वादी लोकांच्या पूजा वगैरे करण्याच्या हक्कास आह्मीं अडथळा केला नसून, तो हक्क शाबीद करावा ह्मणोन विनाकारण आह्मांवर दावा केला आहे ;

४. आह्मीं व आमचे जातीचे इतर ब्राह्मणांहीं गाभाऱ्यांत बसून शिवपूजा केली असतां, शिवलिङ्गाला कोणत्याहि प्रकारें अपवित्रता येतनसून व आह्मीं शिवपूजा करूं नये, असा प्रतिबन्ध हिन्दुधर्मशास्त्रांत नाहीं, असें असतां विनाकारण दावा केला आहे;

५. खालीं लिहिलेले कारणांवरून दावा मुदतींत नाहीं. तीं येणेंप्रमाणें:—

  १. वादी याची फिर्याद दाव्याचें कारण उत्पन्न जाहल्यापासून दोन वर्षांत केली नाहीं, सबब दावा मुदती बाहेर आहे;

  २. दाव्याचे देवळांतील गाभाऱ्यांत जाऊन श्रीभवानीशङ्कराची पूजा वगैरे करण्याची आमची वडिलांपासून प्राचीन वहिवाट आहे; त्यामुळें तो हक्क आमचे मालकीसारखा जाहला आहे, (ह्मणून) आतां दावा चालवूं नये ;

  ३. वादीचे फिर्यादीचा उद्देश पूर्वी माजिस्त्रेट साहेब यांणीं जो एक ठराव करून हुकूम केला, तो हुकूम रद्दकरण्याचा आहे ; सबब दावा एकवर्षांत होणें जरूर होता.

६. ह्याच वादींपैकीं आनन्दराव भिकाजी फडके ह्यांणीं ह्याच मासल्याची व अर्थाची, माजिस्त्रेट साहेब याणें दिल्हेला हुकूम रद्द करण्याकरितां नम्बर ३८ सन १८७१ सालीं ठाणें येथील

डिस्ट्रिक्ट कोर्टांत फिर्याद केली होती, त्यां कामांत दाव्याचे देवळांत जाऊन पूजा करण्याचा आमचे ब्राह्मणांचा हक्क खरा ठरल्यावरून तो दावा रद्द जाहला व अपिलांत तोच ठराव नामदार मुम्बई हाय कोर्टानें मञ्जूर केला आहे, असें असतां हल्लींचा दावा विनाकारण केला आहे;

७. अशा जातीचा दावा दिवाणी कोर्टांत चालत नाहीं.

---

सदर्हू कारणांवरून वादीचा दावा रद्दकरून आमचा खर्च देववावा. ता. २४ ज्यानेवारी सन १८७७.

प्रतिवादी असामी १३ यांच्या सह्या.

कोर्टांत दिल्ही. ता. २४ ज्यानेवारी सन १८७७.

आत्माराम बळवन्त, वकील.　　गोविन्द लक्ष्मण, वकील.

दामोदर किसनदास, वकील.

## प्रतिवादीची कैफियत.

१ तण्टयाचें देवालय वादी लोकांचें मालकीचें नाहीं. यास्तव वादीला दावा करितां येत नाहीं.
२ सर्वलोकांचे तर्फेनें वादीला दावा करितां येत नाहीं.
३ वादीचे हकास आह्मीं अडथळा केला नाहीं.
४ आह्मीं शिवलिङ्गाची पूजा केली असतां, शिवलिङ्गाला अपवित्रता येत नाहीं. व आह्मांस पूजा करण्याचा हिन्दुधर्मशास्त्रावरून प्रतिबन्ध नाहीं.
५ दाव्यास मुदतीचे कायद्याची हरकत आहे.
६ जातीसम्बन्धाचा दावा दिवाणी कोर्टांत चालवूं नये.

## चौकशीचे मुद्दे असे आहेत कीं:—

१ या दाव्यास मुदतीचे कायद्यावरून हरकत होते कीं काय?

२ हा दावा जातिसम्बन्धाचे स्वरूपाचा आहे कीं काय? असेल तर, दिवाणीकोर्टांत चालण्यास कायद्यावरून प्रतिबन्ध होतो कीं काय?

३ वादी याजला हा दावा करण्यास कारण होण्यासारखा प्रतिवादीकडून प्रतिबन्ध जाहला आहे कीं काय ?

४ सार्वजनिकसम्बन्धानें सर्वलोकांकरितां वादीला हा दावा करण्यास कायद्यावरून मोकळीक आहे कीं काय ?

५ दाव्याचे अर्जांत लिहिल्याप्रमाणें देवाची पूजा, नैवेद्य व अभिषेक करण्याचा वादीचा व दाव्याचे अर्जांत लिहिलेले दुसरे-ब्राह्मणलोकांचा मात्र हक्क व वहिवाट आहे, प्रतिवादीचा हक्क व वहिवाट नाहीं, असें वादी शाबीद करितात कीं काय ?

६ सदहू शिवलिङ्गाची प्रतिवादी यांणीं पूजा केली असतां, त्या शिवलिङ्गास अपवित्रता येते असें वादी शाबीद करितात कीं काय ?

७ वादीचे दाव्याप्रमाणें ठराव करण्यास योग्य कारण आहे कीं काय ? जास्ती मुद्यांची जरूर नाहीं, असें पक्षकार यांणीं जाहीर केलें.

ता. २४. १. १८७७. सखाराम कृष्ण शेट से० स० जज्य.

(सही) इङ्ग्रजी, सबार्डिनेट जज्य सखाराम कृष्णशेट यांची.

रेग्युलर अपील नम्बर २३ सन १८७३ पैकीं. यांतील अव्वलकोर्टांत आनन्दराव भिकाजी फडके यांणीं ता. १८ नवम्बर रोजीं अर्ज केला आहे, त्याचे नकलेस अर्जदार पाण्डुरङ्ग हरजोशी यांणीं अर्ज दिल्हा.

---

नम्बर ३८६ सन १८७६.

**पुरसीस वादीतर्फे वकिलाची:—**

कोर्टाचे प्रश्नावरून जाब. हा दावा देवळावर व देवळांतील मूर्तीवर मालकी शाबीद करण्याचा नाहीं. वहिवाटीवरून हक्क शाबीद करण्यासाठीं हा दावा केला आहे. ता. १७ जुलई सन १८७७.

आजरोजीं आमचे समोर पुरसीस लिहून दिल्ही.

**सखाराम कृष्णशेट** से. सबा. जज्य.

**पुन्हा लिहून देतों कीं:—**

कोर्टाचे प्रश्नावरून जाब. प्रतिवादी यांणीं वादीलोकांस व ते ज्या सर्व

लोकांचे सम्बन्धानें दावा करितात, त्यांस देवाचे पूजेस व अभिषेक वगैरे कोणचेंहि कृत्य करण्यास प्रतिबन्ध केला नाहीं. प्रतिवादी हे देवाचा अभिषेक व पूजा करितात, त्यामुळें देवाचे मूर्तीस त्यांस स्पर्श करावा लागतो, यामुळें देव अपवित्र होतो, ह्मणोन वादी लोक त्या अपवित्र जाहलेले देवाचे मूर्तीची पूजा विधियुक्त होत नसल्या कारणानें करीत नाहींत. अशा प्रकारचा प्रतिबन्ध प्रतिवादीकडून वादी याजला जाहला आहे. वादी यांणीं स्वतांकरितां किंवा दुसरे लोकांकरितां हा दावा केला आहे. त्या दुसरे लोकांचीं अखत्यारपत्रें वादीपाशीं नाहींत. वादीला दावा करण्यास त्या दुसरे लोकांची तोण्डची मान्यता आहे. फिर्याद अर्जींत लिहिलेलें देऊळ त्यांतील देवदर्शन घेण्याचे सम्बन्धानें सार्वजनिक आहे. दुसरे रीतीनें सार्वजानिक नाहीं. या कज्यांत विष्णु गोविन्द मराठे यांची साक्ष जाहली आहे, त्याच प्रकारचे खालीं लिहिलेले साक्षी आहेत.

१ बाळाजी विश्वनाथ ठाकूर. १ मोरभट्ट बिन् आबाभट्ट कोपरकर.
१ त्र्यम्बक मोरेश्वर मराठे. १ महादेवभट्ट बिन् मोरभट.
१ महादेव बाळकृष्ण दिवेकर. ता. १७ जुलई सन १८७७.

आजरोजीं आमचे समोर पुरसीस लिहून दिल्ही. ता. मजकूर.

**सखाराम कृष्णशेट से. स. जज्य.**

नम्बर ३८६ सन १८७५ निा २७.

जबानी विष्णु गोविन्द मराठे, राहणार आगाशी याची:—

**तपासणी.**

वादीचे वकिलाचे सवालांस उत्तरः—भवानीशङ्करमहादेव आगाशी येथील देव याचें लिङ्ग स्थापित आहे, तें लिङ्ग देवळाचे गाभाऱ्यांत आहे. दुसरें लिङ्ग गाभाऱ्याचे बाहेर आहे. गाभाऱ्याचे आंतील लिङ्गाची पूजा, अभिषेक ब्राह्मणलोक करितात व त्या देवळाचा पुजारी गोसावी हा व जङ्गमलोक गाभाऱ्यांत जाऊन लिङ्गाची पूजा करितात. त्या शिवाय इतरकोणी त्या लिङ्गाची पूजा, अभिषेक करीत नाहींत. त्यादेवळाचे गाभाऱ्याबाहेर एक लिङ्ग आहे त्या लिङ्गाची पूजा इतरलोक करितात, ब्राह्मण लोक करीत नाहींत. प्रतिवादी शङ्कर दाजी व बाळकृष्ण काशीनाथ हे व यांचे जातीचे लोक गाभाऱ्यांतील लिङ्गाची पूजा करीत नाहींत. गाभाऱ्याबाहेर जें लिङ्ग आहे त्या लिङ्गाची पूजा हे

लोक करितात, अशी वहिवाट हल्लीं ३० वर्षें मीं पहात आलों. हल्लीं ५।६ वर्षें प्रतिवादी शङ्कर दाजी व त्याचे जातीचे लोक हे गाभाऱ्यांतील लिङ्गाची पूजा, अभिषेक करितात. मी ब्राह्मण आहें. मीं व माझे जातीचे लोक हे हल्लीं ५।६ वर्षें गाभाऱ्यांतील लिङ्गाची पूजा करीत नाहींत. कारण प्रतिवादी शङ्कर दाजी व दुसरे असामी हे गाभाऱ्यांतील लिङ्गाची पूजा करूं लागल्यामुळें त्या लिङ्गाला अपवित्रता जाहली. आनन्दराव भिकाजी व दुसरे असामी यांणीं प्रतिवादी शङ्कर दाजी याजवर आगाशी येथील देवळाचे सम्बन्धानें जी फिर्याद केली आहे, ती फिर्याद करण्यास मीं व माझे जातींतील दुसरे ब्राह्मण लोक यांणीं परवानगी दिली आहे. प्रतिवादी शङ्कर दाजी व त्याचे जातीचे लोक यांला मीं पळशे ह्मणतों व ते ब्राह्मण नव्हत आणि त्यांणीं देवाची पूजा, अभिषेक केल्यामुळें हिन्दुशास्त्राप्रमाणें देवाचे लिङ्गास अपवित्रता जाहली.

## उलट तपासणी.

